UNIVERSAL
LIBRARY
OU_192823
UNIVERSAL
LIBRARY

मनोहर-ग्रंथमाला-प्रकाशन २२ वें

संस्कृति-संगम

(सुधारून वाढवलेली दुसरी आवृत्ति)

लेखक

दत्तात्रेय केशव केळकर



१९४६

किंमत ६ रुपये

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर.
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड. पुणें २.

(सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन)

मुद्रक :
लक्ष्मण नारायण चापेकर.
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रस्तावना



संस्कृति या शब्दाइतका व्यापक अर्थबोधक शब्द कचितच असेल. या शब्दानें कोणत्याहि समाजाच्या सर्व आचार-विचार-व्यवहाराचें, त्याच्या आर्थिक व्यापाराचें, त्याच्या शास्त्र व कला याच्या उपासनेचें, त्याच्या समाजधारणेनें प्रवर्तित केलेल्या धर्म, नीति व कायदेकानू याच्या नियमकलापाचें व त्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें, अशा सर्व अंगोपागांचें एकसमयावच्छेदेंकरून दिग्दर्शन होतें. स्वतःची प्रगति सहेतुक बुद्धिपुरस्सर घडवून आणणें, सृष्टीतील जीवनकलहाच्या रूपाने प्रकट होणारी बाह्य परिस्थिति आणि रागद्वेषादींनीं नटणारी अन्तःसृष्टि यावर हुकमत चालाविणें व त्यावर आपल्या व्यक्तिमत्वाचा संस्कार घठविणें यातच मानवाचें मानष्य सांठलेलें आहे. मुळात मानवप्राणी हा आपल्या इतर जातभाई प्राण्याप्रमाणें निसर्गानें आपल्याला दिलेल्या सिद्धवस्तूंनींच व्यवहार करीत असावा. पंण प्रत्येक वस्तूवर संस्कार करणाऱ्या कल्पकतेची जी देणगी मानवास प्राप्त झाली आहे तिच्या साहाय्यानें त्याने. मोंवतालची कठोर मासणारी भौतिक सृष्टि आणि स्वतःच्याच अन्तःकरणांतील रागद्वेषादींनीं हटवादी रूप धारण करणारी अन्तःसृष्टि या दोन्हींवर आपल्या व्यक्तित्वाचा, आपल्या मानष्याचा संस्कार करून दोन्हींचेहि रूप काहीं मर्यादेंत आपल्या हुकमतीखालीं आणलें आहे. अर्थात् **अन्तःसृष्टि आणि बाह्यसृष्टि यांतील ज्या ज्या गोष्टींवर त्यानें आपल्या मानष्याची संस्कार-मुद्रा ठोकली आहे, त्या त्या सर्व गोष्टींचा कलाप म्हणजे त्याची संस्कृति.**

इतर प्राण्यांनाहि बुद्धीचें देणें अगदींच मिळालेलें नाहीं असें नाहीं. स्वसंरक्षणाकरितां कळप करून राहणें, निवाऱ्याची जागा शोधणें, आगोटीच्या तोंडीं खाद्याचा सांठा करून ठेवणें, घरटीं व वारुळें बाधणें, अपत्यसंवर्धन

करणें, उपकारकर्त्यांशीं इमान जगविणें व अपकारकर्त्याचा दंश धरून सूड उगविणें इत्यादि प्रकार त्या त्या प्राण्यांत आढळून येतात. पण मानवाशीं तुलना केली असता इतर प्राण्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास इतका अत्यल्प आहे, कीं तो जमेस न धरला तरी चालेल. इतर प्राण्याला मिळाली तीच सृष्टि मानवालाही मिळाली आहे, पण तिच्या स्वभावांतील मर्म नीट ओळखून त्यानें तिला आपली सेवादासी करून सोडली आहे. झाडावरून पडलेलीं आयतीं फळें न खाता धान्य पेरून हुकमी अन्न तो पिकवूं लागला. वणव्याच्या आगीनें भेदरून जाण्याऐवजीं त्याच आगीवर तो अन्न शिजवूं लागला. अंगावर चालून आलेल्या हिंसकावर नुसता धोंडा उचलून न फेकता तो धोंडा घासून अणकुचीदार करू लागला. सगळ्या जमावानें शिकारी धुंडीत न बसता नरानों शिकार करावी व नारींनीं राघावी असा श्रमविभाग करूं लागला. हाताच्या खुणाऐवजीं आवाजाच्या खुणानीं भाषा बोलूं लागला. आकाशातील चंद्र-सूर्यादिकांच्या दर्शनानें नुसतें स्तंभित न होता त्यांचीं स्तोत्रें रचूं लागला. तेव्हांच आपल्या मानव्याचे ठसे वा संस्कार तो सर्वत्र वठवूं लागला. या त्याच्या अनंत संस्काराचा एकत्रित संभार म्हणजे त्याची संस्कृति. मानवी संस्कृतीच्या विकासाची सामान्य दिशा सर्वत्र एकच असली तरी गति भिन्न भिन्न असल्यानें, भिन्न भिन्न समाज हे एकाच कालखंडात भिन्न भिन्न अवस्थातून जात असतांना आढळतात आणि परिस्थितिभिन्नत्वामुळें संस्कृतीच्या विविध अंगातील कोठें एक विशेष पोसलें गेलें असतें तर कोठें दुसरें पोसलें गेलें असतें. यामुळें भिन्न समाजांच्या संस्कृतीला भिन्न घाट येत असतो. दळणवळणानें वैशिष्ट्याचे हे कंगोरे झिजून एकरूपतेकडे घाट झुकूं लागतो. पृथ्वीच्या चारी खंडांवर पसरलेल्या समाजात दळणवळण फार प्राचीन काळापासून सुरू आहे. पण आजवर त्याची गति मंद होती; आता मात्र असा समय येत चालला आहे कीं ज्या वेळीं सर्व मानवसमाजाच्या संस्कृतीला एकच **मानवसंस्कृतीचा** घाट यावा. असो.

पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांची घसट आपल्या देशांत

सध्यां चालू आहे. ही घसट पाश्चात्यांच्या राजकीय आक्रमणामुळेंच केवळ निर्माण झालेली आहे असें मात्र नाहीं. जपान हा देश पाश्चात्यांच्या राजकीय आक्रमणाच्या बाहेर असूनहि तेथें ही घसट सुरूच आहे. किंबहुना तशी ती सर्व जगभरच आहे. कारण पाश्चात्य संस्कृति ही चालू काळांतील प्रभावी संस्कृति असून जुन्या संस्कृतीशीं ती सर्वत्र सामना देत आहे. फार काय, खुद्द पाश्चात्य देशांतहि ती जुन्या संस्कृतीशीं लढत आहे, कारण आज पाश्चात्य संस्कृति म्हणून जी ओळखली जाते ती खुद्द पाश्चात्य देशातहि नवी आहे ! तिला खऱ्या नावाने संबोधावयाचें तर तिचा उल्लेख भौतिकशास्त्र-प्रधान संस्कृति असा केला पाहिजे.

अशा या शास्त्रीय संस्कृतीशीं शास्त्रीय विज्ञानाच्या पूर्वीच्या अवस्थेंत असलेल्या आपल्या संस्कृतीची प्रस्तुत घसट चालू आहे. या घसटीमुळें आपल्या संस्कृतीला कालान्तरानें कोणता घाट येणार आहे तें कालपुरुष ठरवीलच; पण कोणता आला असता हितावह होईल याची चर्चा करणें निष्फळ होणार नाहीं.

आवडो वा न आवडो पण शास्त्रीय शोधानीं सुसाध्य केलेलीं आगगाडी, छापखाना, रेडिओ, विजेचीं रोषनाई, बोलपट, असलीं सुखसाधनें आपण सर्रास वापरूं लागलों आहेत. शास्त्रीय दृष्टीच्या प्रगतीमुळें जीवनांत व साहित्यांत वास्तवता व ऐहिकता बद्धमूल होऊं लागलीं आहेत. आणि औद्योगिक क्रातीच्या मंथनातून घुसळून वर येणारीं समाजरचनेंतील साम्यवादाचीं तत्त्वेंहि प्रसार पावत आहेत. या सर्व गोष्टी एखाद्या महापुरातील प्राण्याच्या लोंढयाप्रमाणें अप्रतिहत गतीनें येत आहेत, व त्या लोंढयासरशीं आपल्या संस्कृतींतील परंपरेनें चालत आलेल्या साधी राहणी, जन्मजात श्रेष्ठत्व, परलोकनिष्ठा, संसाराविषयीं विरक्ति, समाधानी वृत्ति वगैरे गोष्टी वाहून जातील असा रंग दिसत आहे.

अशा परिस्थितींत विवेकानें कोणती भूमिका स्वीकारावी ? हें सर्व होत आहे तें अनिष्ट होत आहे असें मानून हा प्रवाह डोकीवरून कालांतरानें निघून जाईल म्हणत बुडी मारून, कानात बोटें घालून फुरंगटून बसावयाचें, कीं येणाऱ्या प्रवाहाबरोबर घरदार वाहून गेलें तरी फारा

शतकाची जुनी घाण निघून गेली म्हणून वाहून गेलेल्या वस्तूवर आनंदानें गुढ्यातोरणें उभारावयाचीं, किंवा याच लोंढ्याचें पाणी घेऊन त्यानेंच आपला जुना मळा शिंपून त्यात नवीन पीक काढावयाचें? असे तीन पक्ष संभवतात. पैकीं तिसरा पक्ष हा हितकारक होय ह्या भूमिकेवरून मीं या पुस्तकात विवेचन केलेलें आहे.

परक्याच्या नव्या गोष्टी स्वीकारण्यास मन स्वाभाविकच प्रथम तयार होत नाहीं. आणि होत नाहीं तें एका अर्थी रास्तहि आहे. कारण नवी गोष्ट स्वीकारावयाची ती विवेकबुद्धीला नीट पटल्यावरच स्वीकारली गेली तर उत्तम. त्यातून ज्याच्याकडून या गोष्टी स्वीकारावयाच्या ते जेते म्हणून आपणास उर्मटपणें तुच्छतेनें लेखीत असले तर प्रथम तरी मनोवृत्ति अधिकच आवळून बसावी आणि परक्याच्या तुच्छतेच्या भावनेला तितक्याच तुच्छतेच्या भावनेनें प्रतिकार करण्यास सज्ज व्हावी हें साहजिक आहे. हा प्रकार कसा घडतो याचे पहिल्या तीन प्रकरणांत दिग्दर्शन केले आहे. हे आघात-प्रत्याघात चालू असता पाश्चात्यातील काहीं विचारवत स्वतःच्याच संस्कृतीची निंदा करताना आढळून येऊं लागले म्हणजे तर मन अधिकच गोंधळून जातें. त्याचें चित्र चवथ्या प्रकरणात काढलें आहे. या गोंधळलेल्या मनःस्थितींतून पुढील मार्ग दिसूं लागावयाचा असल्यास विवेकदृष्टीवर आलेलीं पूर्वग्रहाचीं काहीं पटलें दूर करणें जरूर पडते. पैकीं एक जबरदस्त पूर्वग्रह हा कीं पौर्वात्य संस्कृति व पाश्चात्य संस्कृति ह्या मूलतः, स्वभावतः, प्रकृतितः भिन्न होत. यामुळें काहीं मनोवृत्ति अशी धास्ती घेतात कीं, पाश्चात्य संस्कृतींतील काहीं गोष्टींचें आमच्या संस्कृतीवर कलम केलें तरी येथें तें पोसणार नाहीं आणि अट्टाहासानें रुजवावयाचें ठरविलें तर आपल्या पूर्वपरंपरेला तें उच्छिन्न केल्याविना राहणार नाहीं. दोन्ही संस्कृतींचें हें मानीव भिन्नत्व, पाश्चात्य संस्कृति ही आधिभौतिक असून भारतीय ही आध्यात्मिक होय अशा सूत्रमय वाक्प्रचारांत रूढ होऊन बसलें आहे. पण तें कसें निराधार आहे व ऐतिहासिक दाखल्यानें याच्या नेमकें उलट तऱ्हेचें चित्र रेखाटणें शक्य आहे तर तें कसें शक्य आहे हें प्रकरण पांच व सहा यांत दर्शविलें आहे.

पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृति या मूलतः भिन्न होत ही समजूत रूढ होण्याचें मुख्य कारण आपल्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाविषयी हेळसाड हें होय. आपली अशी समजूत होऊन बसलेली असते कीं, गेल्या हजार-बाराशें वर्षांत आपल्या संस्कृतीला जो घाट आला आहे तोच तिचें अनन्य-रूप होय. पण दुर्दैवानें याच कालखंडात आपल्या संस्कृतीला स्थिरावस्था प्राप्त झालेली असून तिचें प्रवाही प्रगतिपर रूप नष्ट झालेलें आहे. तिच्या जागत्या कर्तबगारीच्या स्वरूपाची ओळख करून घ्यावयाची झाली तर तत्पूर्वीच्या कालाचा चित्रपट पाहिला पाहिजे. तो पाहिला म्हणजे आपली संस्कृति पाश्चात्य संस्कृतीहून भिन्नस्वरूपी होय ही समजूत लयास जाईल. म्हणून सातव्या, आठव्या व नवव्या प्रकरणामध्यें आपल्या संस्कृतींतील दुर्लक्षित व उपेक्षित असे जे भाग, म्हणजे तिच्यातील आपल्या पूर्वजांची ऐहिक ऐश्वर्याची उपासना, शासनसंस्थेतील त्याचा लोकशाहीचा प्रयोग, त्याचा जगभर अनिर्बंध संचार यांचें धावतें चित्र रेखाटलें आहे. आपले पूर्वज पूर्वी जगभर संचार करीत असल्यानें शास्त्र, विद्या, कला, धर्म, तत्त्वज्ञान या सर्व बाबतींत परक्यांना आपल्या विद्या शिकविणें व जरूर तेथें त्याच्या स्वीकारणें हे प्रयोग मोकळ्या मनानें करीत. म्हणजे संस्कृति-संगम आजच प्रथम होत नसून पूर्वीहि प्रवाह अनेकदा एकमेकांत मिसळ-लेले आहेत आणि आपल्या संस्कृतीला मिश्र संकीर्ण स्वरूप आलेलें आहे. या प्राक्कालीन संगमावर व्यवहार व विद्या याची देवाण-घेवाण कशी झाली व ती चालू असता आपल्या पूर्वजांनीं संग्राहक वृत्ति कशी पोसली याचा त्रोटक आढावा प्रकरण दहामध्यें घेतला आहे. पण बाहेरच्या संघर्षापेक्षांहि आपल्या संस्कृतीचें स्वरूप संमिश्र व गंगाजमनी बनलें तें येथीलच वैदिक व वेदबाह्य याच्या संघर्षामुळेंच. आपली संस्कृति ही आज वैदिक म्हणून बाह्यतः मिरवत असली तरी वेदबाह्याच्या अनेक गोष्टींचा समावेश तिच्यांत कसा केला गेला व तो करीत असतां सहिष्णुता व संग्राहकता या वृत्ति तिच्यांत कशा पोसल्या गेल्या याचें दिग्दर्शन अकराव्या व बाराव्या प्रकरणांत केलें आहे. संस्कृतीचा प्रवाह हा जिवंत खेळता राहण्यास संग्राहकता व सहिष्णुता यांच्या जोडीला विचारस्वातंत्र्य व सत्याचा आग्रह धरण्याचा कणखरपणा हाहि उसळत राहावा लागतो. तो न राहिल्यामुळें

आपल्या संस्कृतीला कालांतरानें स्थिरावस्था प्राप्त झाली. या स्थिरावस्थेंतील मनोवृत्तीनें राजकारणाला कसें दुर्बल केलें हें तेराव्या प्रकरणांत दाखवून चौदाव्या प्रकरणांत याच दुर्बल मनोवृत्तीनें शास्त्र, विद्या, कला, समाजशासन या सर्व क्षेत्रात स्वतंत्र मूलगामी विचाराची धमक कशी खचली व त्यामुळें आम्ही जगाच्या शर्यतींत कसे मागें पडलों याचें विवेचन केलें आहे. पुढें पंधराव्या प्रकरणीं स्थिरावस्थेची चर्चा करून शेवटच्या प्रकरणीं आपली आजची मागासलेली अवस्था संपावयाची असल्यास पाश्चात्य संस्कृति ही आसुरी संस्कृति म्हणून तिच्यापासून दूर न पळतां, आपल्या संस्कृतीच्या प्राचीन प्रगतिपर व उत्साही स्वरूपाचें स्मरण ठेवून पाश्चात्याच्या बरोबरीनें आपणहि भौतिकशास्त्राची जोपासना केली पाहिजे, समाजरचनेंत सर्वांना समान संधि या रूपानें प्रकट होणारा साम्यवाद स्वीकारला पाहिजे आणि परलोकनिष्ठधर्म ही वैयक्तिक बाब समजून समाजाच्या सुखसोयीच्या वर्धनाचे आणि आपत्तीच्या निराकरणाचे प्रयत्न लौकिक, ऐहिक व्यावहारिक दृष्टीनें केले पाहिजेत असें प्रतिपादन केलें आहे.

वरील सर्व विवेचनांत विवेचनाची फोड करण्याकरिता म्हणून जागोजाग ऐतिहासिक दाखले दिले आहेत; व त्याचीं साधनें लक्षात यावीं इतपत त्याचे संदर्भहि दिले आहेत. मात्र इतिहास देण्याचा येथें इरादा नसून मुख्य भर आहे तो विवेचनावर आहे हें वाचकाच्या ध्यानीं येईलच.

रुइया कॉलेज, मुंबई.
१ सप्टेंबर १९४१

दत्तात्रय केशव केळकर

दुसरी आवृत्ति

'संस्कृति संगम' हें पुस्तक १९४०–४१ सालीं प्रथम वाङ्मयशोभा या मासिकांतून प्रकरणशः प्रसिद्ध झालें. नंतर स्वतंत्र पुस्तकरूपानें १९४१ सालीं त्याची आवृत्ति काढण्यात आली. ती प्रसिद्ध झाल्यापासून वर्ष दीड वर्षाच्या आतच खपून गेली. पण कागदाच्या महर्गतेमुळें नवीन आवृत्ति काढणें लाबणीवर पडलें. काव्यालोचनाचीही प्रथम आवृत्ति संपून गेली होती. तेव्हा प्रथम गेल्या सालीं काव्यलोचनाची नवी आवृत्ति प्रसिद्ध केली. आज संस्कृति-संगमाची दुसरी आवृत्ति वाचकांस सादर करीत आहें.

गुणग्रहणपर परीक्षणें लिहून, पारितोषिकें देऊन, एम्. ए.च्या परीक्षेस नेमून, ओळख नसताहि अनाहूतपणें अभिनंदनपर पत्रे पाठवून ज्यानीं प्रथम आवृत्तीचें स्वागत केलें त्या सर्वांचा मी ऋणी आहें.

प्रतिकूल टीकाहि झाल्या. त्यापैकीं कांहींत उपस्थित केल्या गेलेल्या प्रश्नांची चर्चा 'वाङ्मयशोभा' मासिकांत केली होती. तो लेख परिशिष्ट म्हणून जोडला आहे.

स्नेहभावानें केलेल्या सूचना लक्षांत घेऊन जरूर वाटलें तें अधिक उणें केलें आहे. 'भारतीय संस्कृतीचें गंगाजमनी स्वरूप' या प्रकरणाचीं तें व 'एकीकरणाची प्रक्रिया' अशीं दोन प्रकरणें केलीं आहेत. 'स्थिरावल्येची चर्चा' हें प्रकरण नवीन घातलें आहे. कांहीं प्रकरणांत भर घातली आहे.

कागदाची व छपाईची अडचण असतांहि प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल मनोहर ग्रंथमालेच्या चालकाचा मी आभारी आहें.

रुइया कॉलेज, मुंबई.
वर्ष प्रतिपदा १८६८
३ एप्रिल १९४६.

द. के. केळकर

संस्कृति-संगम

अनुक्रमणिका

		पृष्ठें
	प्रस्तावना	
१	संगमाच्या वाटेवर	१
२	संगमावरील आघात	७
३	प्रत्याघात	२९
४	विचाराचे भोंवरे	४९
५	आध्यात्मिक युरोप	६१
६	आसुरी भारत	८७
७	भारतीयांची ऐश्वर्योपासना	११७
८	प्राचीन भारतातील लोकशाही	१४९
९	भारतीयांचा विश्वसंचार	१७२
१०	प्राचीन संगमावरील देवाण-घेवाण	२०७
११	भारतीय संस्कृतीचें गंगाजमनी स्वरूप	२३८
१२	एकीकरणाची प्रक्रिया	२६१
१३	संस्कृतीचा राजकीय तट कोसळूं लागला ...	३००
१४	विचारदौर्बल्याचें शेवाळे	३५०
१५	संस्कृतीच्या स्थिरावस्थेची चर्चा	३७९
१६	संस्कृतिगंगेचा पुनश्च जोरकस प्रवाह	४२०
	परिशिष्ट–'संस्कृति-संगम'च्या परीक्षणातील काहीं मुद्द्याची चर्चा	४४३
	ग्रंथ-ग्रंथकार-नामसूचि	४७६

प्रकरण पहिलें

संगमाच्या वाटेवर



दोन संस्कृतींचा संगम हा अनेक दृष्टींनीं दोन नद्यांच्या संगमासारखा असतो. संगमस्थानी जेथें दोन प्रवाह प्रथमच एकमेकास भेटतात तेथे ते एकमेकावर जोराने आदळून मोठी तुफानी खळबळ होत असते. त्यानंतर काही काल दोन्ही प्रवाह एकमेकाशीं घासून-घसटून पण अलग रीतीनें वाहताना दृष्टीस पडतात. आणि शेवटीं दोन्ही एकस्वरूपी होऊन अंतीं एकाच किंवा जोडनावानें ओळखले जातात. संस्कृतींच्या संगमासहि हीच गोष्ट लागू आहे. दोन संस्कृति जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्या तुल्यबल असल्यास प्रथम दोन्हींतील आचारविचाराचे एकमेकावर जोराचे आघात-प्रत्याघात होतात. तुल्यबल नसल्यास राजकीय दृष्ट्या वरचढ असलेली संस्कृति ही जित राष्ट्राच्या संस्कृतीला शक्य तर नामशेष करूं पाहते. जित राष्ट्राची संस्कृति मुमूर्षु असल्यास ती या आक्रमणाच्या रथाखालीं चिरडली जाऊन नष्ट होते. पण ती जोमदार असल्यास दोन्ही संस्कृतींत देवाण घेवाण होऊन एकंदर मानवी संस्कृतीचें पाऊल पुढें पडतें.

पाश्चात्य संस्कृतीच्या व आर्य संस्कृतीच्या संगमावरहि असाच मनोहर देखावा दिसूं लागेल अशी आशा व्यक्त करणें अस्थानीं होणार नाहीं.

हा देखावा मनोरम ठरेल असें म्हटलें खरें पण तें त्या देखाव्याच्या उत्तररूपाला अनुलक्षून होय हे सांगावयास नको. प्रथमारंभीं संस्कृतींचा संगम हा प्रीतिसंगम नसून वैरसंग्रामच ठरत असतो. आणि त्याचा प्राथमिक लढा शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांनीं रणांगणावरच लढला जातो. या रणांगणावरील लढ्याचा निकाल तारतम्यानें थोड्या कालांत लागतो. पण नंतरचा सांस्कृतिक लढा हा दीर्घकालपर्यंत चालू राहतो.

साता समुद्रापलीकडून येऊन वास्को-ड-गामाने कालिकतच्या झामोरिनला १५०२ मध्यें पराजित केला व लोकाची राक्षसी कत्तल केली तेव्हाच पाश्चात्य संस्कृतीनें भारतीय संस्कृतीला अर्वाचीन कालातील खडखडीत असें पहिलें आव्हान दिलें. झामोरिननें हा अपमान निमूटपणें सोसला त्याच वेळीं असें ठरून चुकलें, कीं राजकीय क्षेत्रांत भारतीय संस्कृति ही पाश्चात्य संस्कृतीपुढे दुबळी ठरणार. तेव्हापासूनच पाश्चात्यांचें दर्यावर्चस्व व राजकारणपटुत्व यानीं भारतीय संस्कृतीच्या राजकीय हमल्याला हादरून सोडण्यास सुरुवात केली आणि शेवटच्या पेशव्यानें इंग्रजाच्या हातावर राजकारणाचें उदक सोडले तेव्हा पौर्वात्य-पाश्चात्य संस्कृतींच्या झगड्यातील पहिला राजकारणाचा अंक समाप्त झाला.

पहिला अंक समाप्त झाला हें अशाकरिता म्हटलें आहे, कीं या राजकीय झगड्याचे पुढील अंक अद्याप खेळले जावयाचे आहेत. यापुढील अंकातून राजकीय दौर्बल्य झिंझाडून टाकून जागतिक राष्ट्रमालिकेंत स्वतंत्र राष्ट्र म्हणून मिरविण्याचा मान भारतीय संस्कृति पुनश्च स्थापन करील हें भविष्य भारतीय संस्कृतीच्या पूर्वेतिहासाचें परिशीलन करणाऱ्या कोणालाहि निःसंदिग्धपणें वर्तविता येईल. पण ते पुढील अंक कालपुरुष पाहणार आहे.

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यावर संस्कृतीच्या संगमावरील एका राजकीय क्षेत्रातील उसळत्या लाटा थांबतील पण बाकीच्या क्षेत्रातील लढा तेवढ्यानेंच संपणार नाहीं. स्वातंत्र्य टिकविण्याकरिताही भारतीय संस्कृतीला पाश्चात्य संस्कृतीशीं तुल्यबल होण्याची दक्षता जागवावीच लागेल. कारण येथें हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं आजच्या पाश्चात्य संस्कृतीचें जें आक्रमण जगभर पसरत चाललें आहे तें केवळ राजकीय दृष्ट्या पारतंत्र्यात खितपत पडलेल्या राष्ट्रावरच तेवढें होत चाललेलें नसून, स्वतंत्र व परतंत्र अशा सर्वच राष्ट्रावर होत चाललें आहे. आशिया खंडांतील आपला पूर्वेकडील शेजारी व आपल्याच भगवान् बुद्धाला ईश्वरी विभूति मानणाऱ्या जपान देशाचेंच उदाहरण घ्या; तो देश तर काल परवापर्यंत राजकीय दृष्ट्या सर्वस्वीं स्वतंत्र होता ना ? स्वतंत्र होता इतकेंच नव्हे, तर पाश्चात्यानाच व्यापार व राजकारणाच्या दोन गोष्टी त्यानें शिकवाव्या असें त्याचें तेज दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चाललें होतें. पण या जपाननें पाश्चात्य संस्कृति जितकी

आत्मसात् केली आहे तितकी पाश्चात्याच्या दास्यात खितपत पडलेल्या राष्ट्रांनींहि केलेली आढळून येणार नाहीं. कालपर्यंत जपान राष्ट्रमालिकेंत इतरांच्या बरोबरीनें, मानानें, मरातबानें बसूं शकत असे याचें कारणच हे आहे, कीं त्यानें पाश्चात्य संस्कृतीतील महत्त्वाचा भाग आत्मसात् केला होता, पचविला होता. तो तसा पचविल्याशिवाय जीवनकलहात टिकून, तगून राहणेंच कोणत्याहि राष्ट्राला दुर्घट होत चाललें आहे. शस्त्रविद्येत उत्तम प्रावीण्य संपादिलें असताहि जर्मनी व जपानची आज १९४५ सालीं धूळधाण झालीच ना अशी शंका मनात येईल. पण तिच्या समाधानाकरिता हें लक्षात ठेवलें पाहिजे कीं दोन बलिष्ठ लढत असता कोणाचा तरी जय होणारच. दुर्बलाना मात्र केव्हाच आशा नाही.

जी इतराची गत तीच हिंदुस्थानची. हिंदुस्थाननें कितीहि आव आणला कीं जगाला पूर्वी अज्ञात असलेलें आणि अपूर्व असे सास्कृतिक तत्त्वज्ञान आपण इतरांना शिकवूं, राजकीय स्वातंत्र्य संपादण्याचे व टिकविण्याचे अभूतपूर्व असे अभिनव प्रयोग खेळून दाखवूं, तरी हे प्रयोग यशस्वी होण्याचा काल कल्पनेच्या क्षितिजावरहि अद्याप दिसूं लागला नसल्यानें जीवनकलहात टिकून राहण्याकरिता म्हणून तरी पाश्चात्य संस्कृतीतील अवश्य भाग हिंदुस्थानालाहि आत्मसात् करावाच लागेल. म्हणजेच पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति याच्या भेटीचें प्राथमिक स्वरूप झगड्याचें झाले असलें तरी पाश्चात्य संस्कृतीतील काहीं गोष्टींना भारतीय संस्कृतीला आपल्या घरीं नादवून घ्याव्याच लागतील, म्हणजे अंतीं तें तडजोडीचेंच ठरेल. आणि या गोष्टी दूर दृष्टीनें पाहिल्यास परिणामीं रमणीय अशा ठरतील असें वाटत असल्यानें संस्कृतींच्या भेटीचें हें झगड्याचें स्वरूप लोपून त्याला संगमाचें मनोहर रूप प्राप्त होईल असें त्याचे वर्णन करणें अस्थानीं होणार नाहीं.

पाश्चात्य संस्कृतीचें स्वरूपदर्शन आज आपणास घडत आहे तें तो संस्कृति राजकीय वर्चस्वाच्या तोऱ्यानें ताठून उद्दामपणें मिरवत असलेल्या अवस्थेत घडत आहे. यामुळें या संस्कृतीचे खरें स्वरूप समजून घेण्याच्या बाबतींत मोठी नाजुक परिस्थिति उत्पन्न झाली आहे. पाश्चात्याची कोणतीहि गोष्ट स्वीकारणें म्हणणे आज आपल्या संस्कृतीच्या सरणात एक एक गोवरी रचणें होय अशी अढी अशा स्थितींत परतंत्रतेच्या मनात उत्पन्न

झाली तर नवल कसलें ? आणि तशी ती उत्पन्न झाली म्हणजे आपली संस्कृति रक्षण करावयाची असेल तर परक्या संस्कृतीची सावलीहि तिच्यावर पडणार नाहीं अशा रीतीनें तिला जपलें पाहिजे अशी वृत्ति जोरावली तर आश्चर्य कसले ? ती जोरावूं लागली म्हणजे स्वतःच्या संस्कृतीचें व परक्याच्या संस्कृतीचें खरें स्वरूप पारखण्याची जिज्ञासा आणि पात्रता हीं कोळपून जातात, चिकित्सक दृष्टीवर तिमिर वाढतो, आणि प्रगतीचा मार्ग रुद्ध होतो.

दृष्टीवरील हें पटल दूर करावयाचें असेल व मनाच्या या अढी मोडून काढून साफ करावयाच्या असतील तर आपल्या व परक्याच्या दोन्ही संस्कृतींचे खरे स्वरूप समजावून घ्यावें लागेल. ते तसें नीट समजावून घेतलें म्हणजे काहीं महत्त्वाचे गैरसमज नष्ट होतील व परकी संस्कृतींतील इष्ट माग आत्मसात् करण्याविषयीं वाटणारा बुजरेपणा जाऊन परक्याच्या आहारीं न जाताहि त्याचे गुणविशेष आपण पचनीं पाडूं शकूं असा आत्मविश्वास उत्पन्न होईल.

त्या महत्त्वाच्या गैरसमजापैकीं पहिला गैरसमज म्हणजे भारतीय संस्कृति व पाश्चात्य संस्कृति या मूलतः भिन्नस्वरूपी होत हा होय. वस्तुस्थिति अशी कीं या दोन्ही संस्कृति जातितः भिन्न होत ही समजूत चुकीची आहे. या दोन्ही संस्कृतींचीं गेल्या दोन-तीन हजार वर्षांतील स्थित्यंतरें डोळ्याखालीं घातलीं तर या दोन्ही संस्कृति स्वभावतःच भिन्न होत हा गैरसमज आपले बहुत दिसाचें मनातील घर सोडून बाहेर पडेल.

पाश्चात्य संस्कृतीला आज घाट आला आहे तो सर्वस्वीं नवा असा आहे. तो गेल्या शतकातल्या शास्त्रीय व औद्योगिक क्रांतीनंतर आलेला आहे. पण त्याच्या पूर्वीचें पाश्चात्य संस्कृतीचे ध्यान नीट पाहिले तर कोणी म्हणेल, कीं भारतीय संस्कृतीची ही जुळी बहीण तर नाहीं ? या बुट्ट्या बहिणीच्या घरून उचलण्या-शिकण्यासारखें फारसे नाहींहि. पण गेल्या शतक दोन शतकात पाश्चात्य संस्कृतीने जो नवा संसार थाटला आहे त्यातून मात्र काहीं चिजा अवश्य उचलण्यासारख्या आहेत.

त्या उचलण्यास मन साफ व्हावयाचें असेल तर एक गोष्ट प्रथम ध्यानीं ठसवून ध्यावी, कीं पाश्चात्य देशांत गेल्या शतक दोन शतकात जी संस्कृति

अवतरलेली आहे ती संस्कृति ही वस्तुतः नवी अभूतपूर्व अशी संस्कृति होय, अथवा पूर्वसंस्कृतीचें अभिनव स्थित्यंतर होय. या संस्कृतीचे खरें नामकरण करावयाचे तर तिला **शास्त्रीय संस्कृति** म्हणूनच संबोधिलें पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रात तिचा उदय झाला म्हणून तिला पाश्चात्य संस्कृति म्हणावयाचें इतकेंच. पण या नव्या संस्कृतीचा जुन्या रूढ भारतीय संस्कृतीशीं जसा निकटचा संबंध नाहीं तसा औद्योगिक व शास्त्रीय क्रान्तीपूर्वीच्या पाश्चात्य संस्कृतीशींहि नाहीं. शास्त्रीय संस्कृति ही जुन्या संस्कृतीचे अभिनव रूप असून ती मानवी संस्कृतीच्या विकासावस्थेंतील पुढारलेली अवस्था होय. तिची जोपासना कोठें कमी कोठे जास्त होत असली व तिचा उगम कोठेंहि झाला असला तरी ती आता अखिल **जागतिक संस्कृति** झाली आहे. हे तिचें खरें स्वरूप ओळखलें म्हणजे आपल्या जेत्याची संस्कृति म्हणून तिला स्वीकारण्यात मनाला जो संकोच वाटतो तो दूर होईल.

परक्याचीच नव्हे तर कोणतीहि नवी गोष्ट स्वीकारण्यास मन प्रथम कचरतेंच. अशा वेळीं त्याची समजूत पाडण्याचा एक मार्ग म्हणजे पूर्वी अनेक प्रसगीं त्याने नवीन गोष्टी स्वीकारल्या आहेत या दाखल्याची आठवण त्याला करून देणें हा होय. प्राचीन काळी जशा परक्या राष्ट्राना आपण अनेक गोष्टी शिकविल्या आहेत तशाच परक्यापासून काहीं गोष्टी उचलल्याहि आहेत हें इतिहासाच्या दप्तरीं असलेल्या पुराव्यावरून जर दाखवून दिलें तर नव्या गोष्टी स्वीकारताना मन कच खाणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या आपण चागल्या पचवू शकूं असा आत्मविश्वासहि उत्पन्न होईल.

हा आत्मविश्वास उत्पन्न होण्याकरितां दोन संस्कृतींच्या संगमावरील मत्सर, दुराग्रह, अज्ञान, अहंकार वगैरेंच्या उसळणाऱ्या लाटा आधीं थोड्या स्थिर दृष्टीनें अवलोकन करूं या. कारण दोन्ही संस्कृतींच्या यथार्थदर्शनानें नवी दृष्टि प्राप्त होणारी असली व परक्या वाटणाऱ्या संस्कृतीतील इष्ट भाग आत्मसात् करण्याची मनोभूमिका तयार होणार असली तरी आज ही परकी सस्कृति आमचें स्वातंत्र्य अपहार करणाऱ्या परक्याच्या मुखानें बोलते आहे हें केव्हाहि विसरणें शक्य नाहीं. नव्या शास्त्रीय संस्कृतीची व जुन्या भारतीय संस्कृतीची गांठ जी पडली ती एक जेती व दुसरी जिता

अशा नात्यानें पडली आहे. या विशिष्ट परिस्थितीमुळें या दोन संस्कृतींच्या उपासकामध्यें परस्पराविषयीं जे दुराग्रहमूलक गैरसमज उत्पन्न झाले त्याचें स्वरूप प्रथम अवलोकन केलें पाहिजे. तेव्हा जेते जे पाश्चात्य त्यानीं आपल्या भारतीय संस्कृतीचा अधिक्षेप, उपहास कसा आणि किती रीतींनीं केला, त्याच्या आहारीं जाऊन आपल्यापैकींच कांहींनीं त्याच्या सुराशीं आपला सूर कसा मिळवून दिला, या प्रकाराची प्रतिक्रिया म्हणून आपणापैकीं कांहींनीं परकीयाना ठलट अहेर कसा केला व पाश्चात्यातील कांहींनीं तो अहेर कसा योग्य म्हणून स्वीकारला, ह्या सर्व चित्रपटावरून क्षणभर नजर फिरवूं या म्हणजे मनाची मळमळ कमी होऊन मन साफ, शुद्ध व घीट होण्यास मदत होईल.

प्रकरण दुसरें

संगमावरील आघात

पाश्चात्य संस्कृतीचें जें आक्रमण गेलीं शे-दीडशें वर्षें सुरू आहे त्यात भारतीय संस्कृतीला पहिली जबरदस्त ठोकर बसली ती तिचें राजकीय स्वातंत्र्य नष्ट होण्यात बसली.

जो स्वातंत्र्यहरण करूं शकतो त्याला दुरुत्तरें बोलण्याचा अधिकार प्राप्त होतोच, आणि तो गाजविण्याचें अवसानहि पण चढतेंच. तेव्हा त्यानें भारतीयाच्या पराक्रमाबद्दल व पौरुषाबद्दल हेटाळणीनें उल्लेख न केला तरच आश्चर्य. त्यांतहि विशेष हें कीं अहंकार, गर्व, उद्दामपणा हीं व्यक्तींत एकपट असलीं तर राष्ट्रांत शतपट असतात. यामुळें एका राष्ट्रानें दुसऱ्याला रणागणावर जिंकले म्हणजे जेत्या राष्ट्राच्या मनात जित राष्ट्राविषयीं पराकाष्ठेची तुच्छताबुद्धि उत्पन्न व्हावी हें स्वाभाविक होऊन बसतें. व्यक्तीला आपला अहंकार व दुसऱ्याविषयीं तुच्छबुद्धि मिरविण्याला जनलज्जेची व मनलज्जेची थोडी तरी मर्यादा असते पण एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राची निंदा करूं लागलें म्हणजे तें इतकें बेताल होऊं शकतें कीं लज्जेलाच तेथें उभें राहण्याची लाज वाटावी. हा बेतालपणा कोठवर जाऊं शकतो हें काहीं वर्षांपूर्वी मेयोबाईनीं एक पुस्तक लिहून हिंदुस्थानातील शेकडा नव्वद पुरुषाचें पौरुषत्व तीस वर्षांच्या आतच संपुष्टात येतें, व येथील स्त्रियाना आठव्या वर्षी मुलें होतात असलीं आचरट विधानें केलीं होतीं त्यावरून चागलें प्रत्ययास आलें होतें.[1] मेयोबाई ह्या प्रवृत्तीचें एक अतिरिक्त

१. Mother India पान ४४. मेयोचें पुस्तक प्रसिद्ध होताच सप्रू, सेटलवाड, परांजपे इत्यादि बजनदार पुढाऱ्यांनीं त्याचा तीव्र निषेध करणारें पत्रक लंडन टाइम्सकडे पाठविलें; पण ट इम्सनें तें छापण्याचें नाकारलें !

उदाहरण होय. म्हणून मेयोनें हिंदु संस्कृतीला मोजलेल्या शिव्या ह्या उद्धृत करण्याच्याहि योग्यतेच्या नाहींत. पण जित राष्ट्राच्या संस्कृतीच्या हरएक अंगोपागाविषयींची हीनबुद्धि ही जेते राष्ट्राच्या रक्ताशीं इतकी एकजीव होते कीं विचारवंतावरहि तिचा पगडा बसल्याशिवाय राहत नाहीं. स्वतःची व्यक्तिविषयक थोरवी गाताना विचारवंताना थोडा तरी संकोच उत्पन्न झाल्याविना राहत नाहीं; पण व्यक्तीऐवजीं व्यक्तिसमूहाची अथवा राष्ट्राची थोरवी गाताना जित राष्ट्राचा उल्लेख हेटाळणीनें करण्यात विचारवंताचीहि बुद्धि ढळूं शकते. **किंबहुना व्यक्तिविषयक अहंकार मिरविण्याविषयींची जी वासना नैतिक कल्पनांनीं दडपून टाकलेली असते ती वासना सामुदायिक अहंकाररूपानें पुरविली जाते, असेंहि म्हणतां येईल.**

या वासनेचा आविष्कार पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींच्या झगड्यात रांगडेपणानें वावरत असलेला पाहावयास सापडतो.

प्रारंभीं मॅक्स मुल्लर सारख्याचें उदाहरण घेऊं. मॅक्स मुल्लर हा एरवी भारतीय संस्कृतीकडे सहानुभूतीनें पाहणारा विद्वान् होय. तेव्हा त्याचाहि ग्रह कसा विपरीत झाला होता हें पाहणे बोधप्रद होईल. तो लिहितो कीं "ग्रीक आणि हिंदु दोघेहि आर्य. पण दोहोंत केवढे अंतर? ग्रीकाच्या दृष्टीनें जीवन हें सत्यमय, आनंदमय तर हिंदूंच्या दृष्टीनें तें स्वप्न किंवा आभास होय. ... अशा लोकानीं इतिहासाकडे दुर्लक्ष करावें यात आश्चर्य कसलें? अशा लोकानीं सामाजिक आणि राजकीय गुणाची जोपासना केली नसली किंवा सौंदर्य व उपयुक्तता याविषयीं त्यानीं विचारहि केलेला नसला तर नवल कसलें? धकाधकीच्या जीवनाकडे हिंदूंनीं पाठ फिरविली आणि आत्मचिंतनाच्या मार्गाचा तेवढा ध्यास घेतला."[१] पुढें तो लिहितो कीं "हिंदूंना राष्ट्रभक्ति म्हणून म्हणतात त्याची कल्पनाच कधीं आलेली नव्हती. कवींस स्फुरण चढावें असे वीरच त्याच्यात झाले नाहींत किंवा इतिहासकाराला स्फूर्ति यावी असे प्रसंगच त्याच्या इतिहासात घडलेले नाहींत. **तेव्हां जगाच्या राजकीय इतिहासांत हिंदुस्थानला स्थान नाहीं असें**

१. History of Ancient Sanskrit Literature, p 9-10.

खुशाल म्हणतां येईल. शिकंदराच्या मोहिमेसारखी मोहीम एखाद्या हिंदु सम्राटाला सुचली असेल याची कल्पना देखील करवत नाहीं." (कित्ता पान १७).

मॅक्स मुल्लरचा हा अभिप्राय १८५९ इतका जुना आहे. पण सेनार्त या फ्रेंच पंडितानें १८९७ सालीं व पुन्हा नव्या आवृत्तींत १९२७ सालीं म्हणजे अर्थशास्त्रासारखे प्रौढ ग्रंथ उपलब्ध झाल्यावरहि वरीलसारखाच अभिप्राय द्यावा हें आश्चर्य होय. तो लिहितो, "हिंदुस्थानात राजकीय सत्तेचा उदय झाला असता तर भिन्न जातींना एका सूत्रात गोवण्याचा प्रयोग झाला असता. पण राजकीय घटनाची कल्पना देखील तेथें उदयास आली नाहीं. आणि धार्मिक सत्तेला राजकीय सत्ता प्रतिस्पर्धी म्हणून नकोच होती. देशाची भौगोलिक परिस्थितीहि राजसत्ता केंद्रीभूत होण्याला अनुकूल नव्हती. तात्पर्य, राजकीय सत्तेचा मागमूसहि नव्हता." १९२७ सालीं असलीं विधानें करणें म्हणजे शुद्ध धाष्टर्य नव्हे काय ?[1]

ज्याला व्यवहार साधत नाहीं, राजकारण सिद्धीस नेता येत नाहीं, रणागणावर पराक्रम गाजवता येत नाहीं, तो जगाच्या बाजारात एकदरीनें मागासलेला, रानटी समजला न गेला तरच नवल. शिक्षणशास्त्राचा इतिहासकार ग्रेव्हज यानें हिंदु लोकावर असाच शेरा मारला आहे. तो लिहितो कीं, "हिंदूंची एकंदर बौद्धिक व आध्यात्मिक प्रगति कितीहि आश्चर्यकारक असली तरी हिंदु लोक हे मासलेवाईक रानटीच होत.[2] आश्चर्यकारक बौद्धिक प्रगति करणारे लोक हे रानटी कसे असूं शकतात हें शिक्षणशास्त्रज्ञ साहेबमजकूरच जाणूं शकोत. पण हिंदूचा व्यवहार फसला ना ! त्यांना स्वातंत्र्य टिकवितां आलें नाहीं ना ? मग त्यानीं रानटी हें एवढेंच विशेषण काय पण याहीपेक्षा कटुतर विशेषणेहि ऐकून घेतलींच पाहिजेत. हाच ग्रेव्हज पुन्हा लिहितो कीं, "हिंदूच्या शिक्षणात मानसिक उन्नति किंवा जीवनाची तयारी याचा विचारच केलेला नाहीं. व्याकरण, अलंकार, गणित, ज्योतिष वगैरे शास्त्रांत ब्राह्मणानीं बरीच प्रगति केली

१. Caste in India भाषांतर Ross. पा. २११-१२.

२. Typically barbarous.

होती हें खरे पण साकल्यानें पाहता ऐहिक ऐश्वर्य व सुधारणा या कल्पनाना ते पारखेच होते.''[१]

ग्रेव्ह्जनें शिक्षणाचा इतिहास लिहिताना हिंदूंच्या पदरीं बौद्धिक प्रगतीचे तरी पुण्य बाधलें आहे पण हिंदुस्थानातील शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविणाऱ्या मेकॉलेला ही प्रगतीहि बिलकूल मान्य नव्हती. मनगटाच्या जोरावर हिंदूंना जिंकलें असल्यामुळे, बंगाली लोकाविषयीं ते सुस्त, बशे, नामर्द लोक होत असे उद्गार तर त्यानें काढलेच पण हिंदु लोकाच्या एकंदर वाङ्मयासंबंधानें जे मत ठोकून दिलें तसलें अज्ञानमूलक, दुराग्रस्त आणि निरर्गल मत ऐकून मेकॉलेच्या दर्जाच्या कोणाहि साहित्यिकाला लाजेनें मान खालीं घालावीशी वाटेल. पण मेकॉलेच्या डोळ्यांवर जेतृत्वाची धुंदी चढलेली होती. आणि धुंद माणसासारखेंच तो बरळलाहि पण आहे. हिंदुस्थानातील लोकाना शिक्षण द्यावयाचे तें कोणतें द्यावें, जुन्या परंपरेचें संस्कृतमधील शिक्षण द्यावें कीं नवीन पाश्चात्य धर्तीचें द्यावे असा मेकॉलेपुढे प्रश्न होता. त्या प्रश्नावर रिपोर्ट लिहिताना जुन्या भारतीय शास्त्रकला, वाङ्मय याविषयीं त्याने जीं मुक्ताफळे उधळलीं तीं मोठीं मासलेवाईक आहेत. तो लिहितो, 'संस्कृत किंवा अरबी भाषेशीं माझा तसा परिचय मुळींच नाहीं. त्यातील प्रसिद्ध ग्रंथाचीं भाषान्तरें मात्र मीं वाचलेलीं आहेत. पौर्वात्य लोक स्वतः आपल्या ग्रंथाना जी किंमत देतात ती घेऊन चालण्यास मी तयार आहें. पण यूरोपच्या ग्रंथालयातील एखादें कपाटहि संस्कृत आणि अरबी भाषेंतील सर्व वाङ्मयाच्या तोडीस उतरेल हें विधान नाकारणारा मला एकहि पौर्वात्य पंडित भेटला नाहीं ! ... भेटेल कसा ? त्यांचा धर्म खोटा आणि त्या धर्माशीं गुरफटलेला त्याचा इतिहास, ज्योतिष, वैद्यक हेहि खोटे. असले विषय शिकवून काय फायदा ? तेव्हा संस्कृत व अरबी ग्रंथ छापण्याचें ताबडतोब बंद करावें असें मला तरी वाटतें.' मेकॉलेनें पोटांतला हेतूहि सागून टाकला आहे. ''नव्या शिक्षणानें आपणाला जी नवी पिढी तयार करावयाची आहे ती अशी निपजावी कीं ती रंगानें आणि

१. To the Hindus prosperity, progress are foreign ideas. —History of Education by Graves.

रक्तानें हिंदी पण मनानें एकजात इंग्रजी बनेल याविषयीं आपण आटोकाट प्रयत्न केला पाहिजे."[१] मेकॉलेला सल्ला देणारे प्राच्यपंडित कोण होते तोच जाणे, पण ज्या ग्रथावर मेकॉलेने हा अभिप्राय झोडला आहे त्या ग्रंथाची मुखपृष्ठें तरी त्यानें अवलोकन केलीं होतीं किंवा नाहीं येथून जाणे ! कारण हा अभिप्राय भगवद्गीता, शाकुंतल, उपनिषदें हीं पाश्चात्य भाषेंत भाषान्तरित झालेल्या काळाच्या नंतरचा आहे ! पण उर्मट अहंकारालाच न्यायासनावर बसविले तर तो वरीलपेक्षा निराळा निर्णय देणार कसा !

मेकॉले हा कोठल्याच शास्त्रातला तज्ज्ञ नव्हता. तेव्हा सर्वच शास्त्रावर अभिप्राय देण्यास त्याने प्रवृत्त होणे म्हणजे शुद्ध रागडें धाडस होतें. म्हणूनच बेछूट अज्ञान व उर्मट अहंकार काय बरळूं शकतात हें दर्शविण्या-इतकीच मेकॉलेच्या अभिप्रायाची किंमत. पण मेकॉलेसारखा भरमसाट लेखक सोडला व त्या त्या विषयातील अभ्यासू लेखक घेतले तरी त्याच्या-तहि अज्ञान आणि अहंकार याचा खेळ कमी पाहावयास सापडतो असे नाहीं. रस्किन हा एक अव्वल दर्जाचा कलाकोविद म्हणून प्रख्यात आहे. त्यानेंहि भारतीय कलेविषयीं जो शेरा दिला आहे तो युरोपियनाना इतर देशाविषयीं वाटणाऱ्या तुच्छबुद्धीला साजेसाच आहे. 'व्हेनिसचें शिल्प' या ग्रंथात तो लिहितो कीं, " हिंदूंचें मूर्तिशिल्प म्हणजे विक्षिप्त, भेसूर व रानटीपणाचा अर्क होय. या मूर्तीपेक्षा अधिक रानवट मूर्ति पॅसिफिक बेटातील अगदीं जंगली लोकातच काय त्या सापडतील." रस्किनेने हा शेरा दिला तो भारतीय शिल्पकलेचे जे चार वेडेवाकडे नमुने ब्रिटिश अजबखान्यात माडलेले असतील तेवढे पाहूनच दिला असावा. सांची, भारहूत, अजंठा वगैरेंतील शिल्पाचा रस्किनच्या काळीं बोलबाला झालेला नव्हता. पण ज्यांनीं भारतीय शिल्पाचे नमुने पाहिले होते अशा बर्डवुडनेंहि रस्किनसारखाच अरसिक अभिप्राय दिला आहे हें आश्चर्य ! हिंदु देवताच्या मूर्तीचें ध्यान दाखवावयाचें तें ध्यानस्थ व नासाग्रदृष्टि असलेलें असें दर्शविण्याची पूर्वपरंपरा आहे. या प्रकारांतलें मर्म न ओळखून बर्ड-वुड लिहितो कीं, शून्य दृष्टीनें नाकावरून खालीं हाताकडे पाहणाऱ्या या

१. Source Book of Modern Indian Education by M R. Paranjpe, पा. १८, २६, २८.

मूर्ति म्हणजे शुद्ध अर्थशून्य निर्बुद्धतेच्या प्रतिमा होत. निर्विकार पावित्र्य आणि अगाध शांति येवढेच या शिल्पकाराना दिग्दर्शित करावयाचें होतें तर शिलेवर खोदकाम करण्याचे श्रम तरी त्यानीं कशाला घेतले कोणास ठाऊक ! नुसता शिजवलेल्या उकडीचा गोळाच मूर्ति म्हणून स्थापला असता तरीहि भागले असते. निर्विकारताच हवी असेल तर अशा गोळ्यात निर्विकारता मूर्तिमंत आढळेल.[१]

हिंदुस्थानची विशेष ख्याति कशाविषयीं असेल तर ती वेदान्त अथवा तत्त्वज्ञानाची जी सुंदर प्रणाली हिंदु ऋषींनीं निर्माण केली तीबद्दल. या क्षेत्रात तरी त्याना धन्यवाद मिळावे ना ! पण अज्ञान आणि दूषित ग्रह यानीं दोन्ही बाजूंनीं गळा दाबल्यावर धन्योद्गार बाहेर पडावे कसे ? पूर्वग्रहच मुळीं असा कीं शुद्ध ज्ञानविज्ञान प्रथम कोठल्या भूमीत अवतरले असेल तर ते फक्त ग्रीसमध्ये. ईजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे राष्ट्रे ग्रीसपेक्षा वृद्ध अशीं राष्ट्रे आहेत खरीं; धर्म, तत्त्वज्ञान वगैरेसंबंधीं विचारहि त्यानीं केलेला आढळतो हेंहि खरें; पण तात्त्विक विचारसरणीला खरा रेखीव शास्त्रीय घाट प्रथमच प्राप्त झाला तो फक्त ग्रीसमध्ये. अशा प्रकारची विचारसरणी सर्वसामान्यपणें पाश्चात्य विद्वानांमध्यें रूढ आहे. याचे उदाहरण म्हणून तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणारे अमेरिकन विद्वान् प्रो. फ्रॅंक थिली याचे उद्गार देता येतील. हे ग्रीसबाहेरील भारतीय, चिनी वगैरे तत्त्वज्ञानाविषयीं काय उद्गार काढतात ते पाहा. ते लिहितात कीं, "तत्त्वज्ञानाचा जागतिक स्वरूपाचा इतिहास लिहावयाचा तर तो सर्व देशातील तत्त्वज्ञानाचा लिहावा लागेल; पण सर्व देशांत पद्धतशीर विचारसरणी निर्माण झालीच कोठें ? काहीं देशात दैवतवादापलीकडे विचाराची परिणति गेलेलीच नाहीं. हिंदुस्थान, ईजिप्त, चीन ह्या प्राच्य देशातील तत्त्वज्ञान हें मुख्यतः दैवतविषयक नैतिक कल्पनाच्या स्वरूपाचेंच आढळतें. **त्यामुळें त्या तत्त्वज्ञानांना तर्कशुद्ध दर्शनें म्हणतां येणार नाहीं.** त्याच्या तत्त्वज्ञानात काव्य आणि शब्दप्रामाण्य याची मेसळ बेसुमार आहे. त्यामुळें आम्ही आमच्या इतिहासात

१. A boiled suit pudding would serve equally well as a symbol of passionless purity and serenity of scul. —Industrial Arts of India by G. Birdwood.

ग्रीसपासून सुरू होणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाचाच तेवढा विचार करणार आहों. "[1] आहे कीं नाहीं धाष्टर्य ? पौर्वात्य तत्त्वज्ञानाविषयीं आपलें अज्ञान झाकण्यासाठीं या बहाद्दराने सर्व पौर्वात्य तत्त्वज्ञानावर अशास्त्रीय असा शेरा ठोकून दिला आहे.

वरीलपेक्षा अधिक अर्वाच्य मत पाहावयाचे असल्यास उपनिषदाचें भाषांतर करणाऱ्या गॉफ या विद्वानाचें पाहा. उपनिषदाविषयीं तो लिहितो कीं, " हीं उपनिषदे म्हणजे मागासलेल्या काळच्या, बुरसलेल्या आणि प्रगतिविन्मुख अशा लोकाचे ग्रथ होत."[2]

धार्मिक बाबतींत तरी हिंदूंच्याविषयीं चार चागले उद्गार काढता येतील का ? छे ! नाव कशाला ? हिंदु ही जातच मुळीं रानटी. या रानटी माणसाच्या मगजात कोणताहि उच्च विचार उद्भवणेच कठीण. हिंदूंच्या धार्मिकतेबद्दल काहींनीं उगीचच हूल उठविली आहे. कारण हिंदु हे मनाने, वृत्तीने धार्मिक आणि आध्यात्मिक होत वगैरे समजुती म्हणजे शुद्ध थोताड होय असा निर्वाळा एका बहाद्दराने दिला आहे. हे बहाद्दर म्हणजे बर्नार्ड शॉ साहेबाचे एक मित्र व इंग्लडातील एक नावाजलेले पत्रपडित वुइल्यम आर्चर हे होत. यानीं हिंदुस्थानविषयक एक पुस्तक लिहिलें आहे.[3] पुस्तक फार जुन्या काळीं लिहिलेले आहे असे नाहीं. सुमारें पचवीस वर्षेंच झालीं. म्हणजे हिंदूच्या धर्म तत्त्वज्ञान वगैरेंचा चागला परिचय युरोपियनाना झाल्यानंतर लिहिलेले आहे. पण जित राष्ट्रामध्यें कोणताच गुण असूं शकत नाहीं अशी अढी मनात बसल्याने हा लेखक हिंदूंच्या धार्मिकतेबद्दल बेफिकीरपणें लिहितो कीं, " हिंदूंची दानत कोठल्या विषयात विशेष खालावलेली असेल, हिंदु संस्कृतीचें कोणते अंग विशेष विकल झालेलें असेल, तर तें धर्मविषयक होय. हिंदूनीं पराक्रम गाजविला असेल तर तो आध्यात्मिक प्रवृत्तीचा विकास करण्यात नसून शुद्ध व सकस अशा अध्यात्मतेच्या गळ्याला नख लावण्यातच गाजविला आहे. म्हणून माझें

१. Frank Thilly—History of Philosophy p. 3.

२. They are the works of a deteriorated race and a barbarous unprogressive community.

३. India and the Future

तर असें स्पष्ट मत आहे कीं हिंदु हे मोठे आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहेत असे प्रतिपादणें म्हणजे शुद्ध धादान्त वदतोव्याघात होय.[1]

हिंदूंच्या व विशेषतः हिंदु स्त्रियांच्या नीतिमत्तेबद्दलहि कुत्सित टीका करण्याची हौस काहींनीं भागवून घेतली आहे. अशा एका साहेबबहादुराचें नाव ॲशबर्नर होय. पुनर्विवाहाच्या कायद्याविषयीं लोकात वादविवाद चालू असता या साहेबानीं नॅशनल रिव्ह्यूमध्यें लेख लिहून असें प्रतिपादिलें होतें कीं पुनर्विवाहाचा कायदा हिंदु विधवानाच मान्य होणार नाहीं. कारण वैधव्यदशेंत त्याना व्यभिचाराचा जो सदर परवाना मिळालेला असतो तो गमावून पुनश्च विवाहाच्या बंधनात त्या पडतीलच कशाला ? **हिंदु विधवा म्हणजे बोलूनचालून सनदी स्वैरिणी.**"[2] हे स्वैरोद्गार वाचून सुधारकाग्रणी आगरकर तळतळून लिहितात " आमच्या हतभाग्य हिंदु विधवावर ॲशबर्नर यानीं जे असभ्य, खोडसाळ व असत्यप्रचुर आरोप लादले आहेत ते लादण्याइतक्या नीचतर पदावर साहेबमजकूर घसरतील असे कोणासहि वाटलें नसेल. अलीकडील चळवळीपासून आपल्यावर मोठा अनर्थ कोसळेल म्हणून वेडावून जाऊन नेटिव्हावर अद्वातद्वा आरोप आणणारे इंग्रजबहादर आमच्या पाहण्यात पुष्कळ आहेत. परंतु या द्वेषामुळें हिंदु स्त्रियाची विटंबना करण्यास प्रवृत्त झालेले फारसे आढळत नाहींत. ... गुलामाचा व्यापार सुरू ठेवण्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या काहीं इंग्रज मुत्सद्द्यानीं काळ्या कातडयाचे लोक गोऱ्याच्या सेवेकरिताच ईश्वरानें सृजिले आहेत म्हणून जसें एक महातत्त्व शोधून काढले होतें तसें सुधारलेल्या गोऱ्या लोकाच्या थट्टेकरितांच ईश्वरानें हिंदु स्त्रियास वैधव्य आणलें आहे असें एखादे अपूर्व तत्त्व या हिंदुद्वेष्ट्यानें नवीन शोधून तर काढलें नाहीं ना ! नाहीं तर 'हिंदु विधवास वाटेल तसा अनाचार करण्यास समाजानें पूर्ण सनद दिली असल्यानें असली अत्यंत स्पृहणीय व अप्रतिबंध अशी स्वच्छंदपणाची आयती मिळालेली वृत्ति सोडून देऊन पुनर्विवाहाच्या कायद्याचा

---

१. I hold it the acme of paradox to claim for the Hindus an exalted spirituality. (Is India Civilised ? by Woordroff पा. १४८.)

२. Chartered libertines.

आश्रय त्या कां म्हणून करतील' असे शब्द साहेबमजकुरांच्या लेखणीतून खचित निघाले नसते."[१]

हिंदु स्त्रियाची खोटी नालस्ती करणारा दुसराहि एक साहेब आगरकराना आढळला. त्याचा उल्लेख त्यानीं केला आहे तोच 'आणखी एक शहाण्याचा कादा' अशा शेलक्या शब्दानींच. हा साहेब एक लष्करी अंमलदार असून गायनविद्येचा षोकी होता. त्याचे नाव वुइलियर्ड. यानें 'हिंदुस्थानचें सगीत' या नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यात वस्तुतः गायनविद्येचीच तेवढी चर्चा यावयास पाहिजे पण जाता जाता हिंदूंना दोन टोले लगावण्यासारखी काहीं संधि प्राप्त झाली असता तो ती काय म्हणून टळूं देईल ? आणि तशी ती त्याला सापडलीहि. या गायकी चिजा बहुधा सर्व शृगारपर असून त्याचा एकंदर थाट लावणीच्या स्वरूपाचा असतो हें सुशिक्षितास सागावयास नकोच. आता प्रत्येक देशात आणि प्रत्येक कालात उत्तान शृगारपर लावणी-वाङ्मयाची निपज होतच असते. आणि समाजाच्या काहीं थरातून त्याचा विशेष प्रचार असतो. पण त्या चिजामधून वर्णिलेली परिस्थिति ही सर्व समाजाची प्रातिनिधिक म्हणून कोणी समंजस मानीत नाहीं. पण वरील 'शहाण्याच्या काद्या'नें नेमकें हेंच केलें आहे. नायकिणीच्या तोडीं असणाऱ्या हिंदुस्थानी सगीतातील शृंगारिक चिजावरून त्याने असा सिद्धान्त बाधला आहे की हिंदुस्थानातील स्त्रिया या अत्यंत कामलोलुप असल्या पाहिजेत आणि जावा-नणंदाचा डोळा चुकवून वल्लभाची संकेतस्थळीं गाठ घेण्यात मोठ्या निष्णात असल्या पाहिजेत ! येवढा महत्त्वाचा शोध हातीं लागल्यामुळे या लष्करी सुभेदाराला आपण समाजशास्त्रज्ञ म्हणूनहि मिरवूं शकूं असें वाटून त्यानें वरील परिस्थितीची कारणमीमासाहि दिली आहे कीं हिंदु स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होतात त्या हिंदुस्थानातील सामाजिक अव्यवस्था, अनेक बायका करण्याची चाल व स्त्रियाचें गाढ अज्ञान या कारणत्रयीमुळें होत असाव्यात. आगरकरानीं साहेबाना एवढेंच उलट खडसून विचारलें आहे कीं, 'मिस्टरीज् ऑफ दि कोर्ट ऑफ् लंडन' या

१. आगरकर निबधसग्रह भा. २

रेनॉल्ड्सच्या कादंबऱ्यावरून इंग्रजांच्या नीतिमत्तेविषयी कोणी अनुमान बाधलें तर साहेबाना तें न्याय्य वाटेल काय ? आगरकराच्या वेळी अमेरिकन न्यायाधीश लिंडसे याची तरुणतरुणींच्या अनैतिक लीला वर्णन करणारी पुस्तकें निर्माण झाली नव्हतीं; नाहीं तर त्यानीं त्यातील व्यभिचाराचे शेलके मासले वुइलियर्डच्या तोडावर मोजून मारण्यास कमी केलें नसते. वस्तुतः गायनकलेच्या इतिहासावर वुइलियर्डनें पुस्तक लिहावयास घेतलेलें त्यात हिंदूंच्या चालीरीतींचा ऊहापोह पाहिजेच कशाला ? पण आपल्या जातीच्या वर्चस्वाचा अहंकार ही एक नशा आहे. ती चढली असली म्हणजे हरकोणा विषयात परकीयाविषयीं तुच्छतेनें गरल ओकल्याशिवाय ती राहत नाहीं.

व्याकरण हा विषय तर तुम्ही सोवळा समजाल ना ? पण एका व्याकरणकारालाहि हिंदूंना कोपरखळी मारण्याची लहर आलेली दाखविली तर काय म्हणाल ? हा व्याकरणकारही असा तसा नव्हे बर आधुनिक आर्यभाषाचे तौलनिक व्याकरण लिहिणारा सुप्रसिद्ध बीम्स हा होय. ओरिया भाषेचा अभ्यास करताना त्या भाषेत त्याला काहीं मराठी शब्द आढळले. आणि ते शब्द निघाले तेहि मराठ्याचा दरारा प्रकट करणारे. झालें ! येवढ्यावरून साहेब गरम झाले व त्यानीं प्रवचन झोडले कीं, "हिंदुस्थानात ब्रिटिश राज्य जारी होऊन आज सत्तरवर वर्षे होऊन गेलीं (१८७१ मध्यें) तरी मराठ्यानीं केलेल्या लुटारूपणाच्या आणि जुलुमाच्या खाणाखुणा ओरिसाच्या भाषेत अद्यापीहि नष्ट झालेल्या नाहींत. मोसल्यानीं बाधलेले तलाव, बंधारे, पूल, रस्ते अजूनहि शाबूत आहेत आणि त्या सर्वांची बाधणी ऐश्वर्यसंपन्न राजाधिराजाला शोभेल अशा थाटाची आहे." हें वाक्य वाचून तुम्हाला वाटेल, बीम्स हा तर मोसल्याची स्तुति करतो आहे. पण थाबा; असा भलताच प्रकार बीम्स करील असें समजू नका. कारण तो पुढें काय लिहितो तें ऐका. तो म्हणतो " पण मोसल्याचीं कामें ऐश्वर्यसंपन्न नसायला झालें काय ? कारण सर्व कामे वेठीनें करून घेऊन कामगाराच्या हातीं नरोटी ठेवणें ही तर त्याची पद्धत; मग थाटाचीं कामें उडवून दिलीं तर नवल कसलें ? आमच्या ब्रिटिशांचीं सार्वजनिक कामें हलक्या दर्जाचीं म्हणून नाक मुरडणारानीं हा लहानसा मुद्दा ध्यानीं धरावा. आम्ही

जीं कामें करून घेतों त्याची पैन् पै चुकती करतों."[1]

अकल्पित घटना

हिंदूंची नालस्ती करण्याची ही लाट एकीकडे उसळत असता दुसरीकडे एक अशी महत्त्वाची घटना घडून येत होती कीं त्यामुळें या नालस्ती-वाल्यांना आपला पहिला मोकळ्या मैदानावरील पवित्रा बदलून गनिमी काव्याने हिंदूंना नामोहरम करण्याचा नवा पवित्रा स्वीकारावा लागला. हीं महत्त्वाची घटना म्हणजे संस्कृत वाङ्मयाचा युरोपमध्ये दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाणारा पद्धतशीर अभ्यास ही होय. या वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति होण्याचे कारण म्हणजे हें वाङ्मय, उपलब्ध वाङ्मयात प्राचीनातील प्राचीनतम आहे हें होय. भारतीयांचे वेदग्रंथ हे अखिल जगातील जुन्यातील जुनें वाङ्मय होय. हें उमगल्याबरोबर मानवी संस्कृतीचा प्राचीन इतिहास रचण्यात या वाङ्मयाचा बिनमोल उपयोग होईल हें ध्यानीं येण्यास वेळ काय लागणार? शिवाय जर्मन, लॅटिन, ग्रीक या भाषातील काहीं महत्त्वाच्या शब्दाचीं सदृशरूपेंहि संस्कृतमध्ये सापडतात, हा शोध लागताच भाषाशास्त्राच्या दृष्टीनेंही संस्कृत वाङ्मयाची थोरवी फार श्रेष्ठ दर्जाची ठरली गेली आणि संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासास जोरानें चालना मिळाली. या वाङ्मयाचा वर वर अभ्यास करणाराच्या तोंडूनहि मेकॉलेनें काढले तसले आचरट उद्गार निघणें शक्य नव्हते. मग ज्यानीं खोल अभ्यास केला ते तर विस्मित व्हावेत यांत नवल कसलें?

आधुनिक भाषाशास्त्राचें बीजारोपण तर संस्कृत भाषेच्या अभ्यासानंतरच झालें. त्याचा परिणाम म्हणून 'गुण', 'वृद्धि' असले संस्कृत पारिभाषिक शब्द पाश्चात्य भाषाशास्त्रज्ञ इतके सरसहा वापरूं लागले कीं जुन्या पठिक वैयाकरणाना त्याचा जाच वाटावा.[2] त्या भाषेंतील पाणिनीच्या व्याकरणाचें

---

१. Comparative Grammar of Modern Aryan Languages of India Vol. I, p. 110 and footnote. —Beams.

२. Study of Language by Jesperson.

शास्त्रीय स्वरूप अवलोकून युरोपिअन व्याकरणाकारानीं तोंडात बोटें घातलीं. भाषेला इतकें नियमबद्ध रूप देता येईल याची त्याना त्यापूर्वी कल्पनाहि नव्हती. भारतीयाची नुसती वर्णमाला घेतली व तिच्यातील अक्षराची कंठ-तालव्य वगैरे स्थानभेदानें केलेली शास्त्रशुद्ध माडणी पाहिली तरीहि युरोपात प्रचलित असलेली केवळ सव्वीस अक्षराची पागळी रोमन वर्णमाला व तिच्यातील अक्षराची हेगाडी माडणी याबद्दल युरोपियन पंडिताना मान खालीं घालण्याचा प्रसग आला. संस्कृत वाङ्मयाचा इतिहासकार मॅक्डोनेल लिहितो कीं, "भारतीयाची वर्णमाला पाणिनीच्या पूर्वीच पूर्णत्वास पोंचलेली होती तर आम्ही युरोपियन लोक पाणिनीला पंचवीस शतकें लोटलीं तरी अद्याप रोमन वर्णमालेला– कीं जिच्यात सर्व उच्चार प्रकट करण्याचें सामर्थ्य नाहीं आणि जिच्या माडणींत कोणतीहि पद्धति नाहीं अशा तीन हजार वर्षांपूर्वी ग्रीक लोकानीं सेमिटिक लोकाकडून घेतलेल्या वर्णमालेलाच– चिकटून आहोत!"

संस्कृत वाङ्मय हे एक अमोलिक रत्नमाडार आहे याची एकदा कल्पना आल्यावर अमेरिकेतील सुवर्णाच्या खाणींवर युरोपियन व्यापारी जसे तुटून पडले, तसे युरोपियन पंडित संस्कृतसुवर्ण आत्मसात् करण्याकरितां बद्ध-परिकर झाले. त्यानीं धर्मशास्त्राचा अभ्यास केला, तत्त्वज्ञान पालथें घातलें, काव्य-नाटकात अवगाहन केले, वैद्यक-ज्योतिषादि शास्त्राचा आढावा घेतला. मॅकॉले म्हणे कीं, युरोपियन भाषेंतील एखादें साधें चोपडेंहि संस्कृत-मधील या वाङ्मयप्रपचाच्या श्रीमुखात देऊं शकेल. मेकॉलेनें संस्कृत वाङ्मयाचे मुख अवलोकन केलेलेच नसावे म्हणून तो असें बरळूं शकला. पण आस्थेवाईक पंडित व अभ्यासू या गीर्वाणवाङ्मयाच्या मुखाकडे पाहूं लागले तेव्हा त्याना यशोदेला श्रीकृष्णाच्या मुखात दिसला त्याप्रमाणें विश्वाला व्यापणारा वाङ्मयविस्तार दिसूं लागला. संस्कृताचा अभ्यास प्रथम इंग्रज पंडितानीं सुरू केला असला तरी या सारस्वताचें महोदारत्व कळून येताच जर्मन फ्रेंचादि इतर देशातील विचारवंताच्याहि त्याच्यावर उड्या पडूं लागल्या. १८२३ सालींच जर्मन पंडित श्लेजेलनें लिहिलें कीं, "संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासाचा मक्ता फक्त इंग्रज पंडिताकडेच राहील म्हणता ! मुळींच नाहीं. लवंगा-वेलदोड्यांचा मक्ता त्यानीं वाटल्यास आपल्या हातचा

सोडूं नये; पण संस्कृत सारस्वत हें आतां कोणाच्या मिरासदारीचे उरलें नसून सर्व सुशिक्षित जगाच्या मालकीचें झाले आहे."[१]

श्लेजेलचे हें भविष्य शब्दशः खरे ठरलें. यापुढें भारतीय संस्कृतीचा अभ्यास इंग्लंडपेक्षा अन्यत्रच अधिक फोफावला. तो इतका कीं श्लेजेल-नतर ऐशीं वर्षांनीं 'बुद्धकालीन भारत' या ग्रथाचा कर्ता व प्रसिद्ध पाली पडित व्हिस डेव्हिज याला आपल्या प्रस्तावनेत मोठ्या खेदानें लिहावें लागले आहे कीं, "पॅरिस, बर्लिन, व्हिएन्ना, सेंट पीटर्सबर्ग वगैरे स्थळीं पौर्वात्य सस्कृतीच्या अभ्यासाकरिता मोठमोठ्या संपन्न संस्था स्थापन झालेल्या आहेत, तर इग्लडमध्ये मात्र या विषयाची गोडी असणारा कोणी निघाला तर त्याला पोट बांधून काम करावे लागतें. इग्लंडमध्ये संस्कृता-च्या प्राध्यापकाच्या जागा दोन आहेत तर जर्मनीमध्ये अशा सरकारी जागा चागल्या विसावर आहेत हे आश्चर्य नव्हे काय? आमच्यापेक्षा जर्मनीचे हितसंबध भरतखंडात अधिक गुंतलेले आहेत असे तर नव्हे?"[२]

संस्कृत भाषेच्या अभ्यासाचे एक अनपेक्षित फळ म्हणजे पौर्वात्यांची संस्कृत भाषा व पश्चिमात्याच्या ग्रीक, लॅटिन वगैरे भाषा या एकाच कुटुंबात वाढलेल्या असाव्यात हें निदर्शनास आलें हे होय. संस्कृतमधील मातृ, पितृ, स्वसृ, दुहितृ असे नित्याच्या व्यवहारातील शब्द ग्रीक, लॅटिन, जर्मन, इंग्लिश भाषामध्येहि तसेच सापडावे हे यदृच्छया होणे अशक्य. अर्थात् या निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक हे फार प्राचीन काळीं केव्हा-तरी एकत्र राहत असावेत हा तर्क मान्य केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. या बाबतींत मॅक्स मुल्लरनें तर असा सिद्धान्त माडला कीं या सर्व भाषा बोलणाऱ्या लोकाचे मूलस्थान मध्यएशियात असावें व ते सर्व लोक एकाच वंशाचे व रक्ताचे असावे. मॅक्स मुल्लरच्या या सिद्धान्तानें टेलर नावाच्या विद्वानाला बेचैन करून सोडले. साहेबाच्या अगात जे रक्त तेंच काळ्या हिंदूंच्या अगात! अब्रह्मण्य! आणि पाश्चात्य युरोपियन हे मूळ आशियातून युरोपात आले? छे! मलतेंच? हे सिद्धान्त खोडून काढलेच पाहिजेत अशी खूणगाठ बाधून टेलर यानीं आर्यांचें मूलस्थान या नांवाचा ग्रंथ लिहिला

१. History of Sanskrit Literature by Winternitz, Vol I, p 22.
२. Buddhist India by Rhys Davids.

व त्यांत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं भाषा एकच असली म्हणजे रक्त एकच असलें पाहिजे असें निश्चित अनुमान निघूं शकत नाहीं. व वरील समान भाषा बोलणाराचा मोठा गट युरोपात असल्याने मूलस्थान आशियात असणेही शक्य नाहीं. भाषा एकच असली म्हणजे रक्त एक असतेच असे नाहीं हे मान्य होण्यासारखें आहे. पण ते एक नव्हतेच हें सिद्ध करण्याइतका बळकट पुरावा टेलरने दिलेला नाहीं. शीर्षमापनशास्त्राची साक्ष दिली आहे पण आज ती निर्णायक मानण्यात येत नाहीं. समान भाषेच्या गटापैकीं मोठा गट युरोपात आहे यावरही भर देता येत नाहीं. बौद्ध धर्माच्या उपासक राष्ट्राचा मोठा गट हिंदुस्थानच्या बाहेर आहे. पण त्यावरून बौद्ध धर्माचे मूलस्थान हिंदुस्थानच्या बाहेर असले पाहिजे असे कोण म्हणेल ! टेलरला मात्र आपण मोठे सकट टाळण्याची कामगिरी केली असे वाटले असावे. कारण ग्रंथाच्या शेवटीं समाधानाचा सुस्कारा टाकीत तो लिहितो कीं संस्कृत पंडिताच्या आजवर चाललेल्या कुरघोडींतून सुटलों एकदाचे म्हणावयाचें ![1]

सर्वच सिद्धान्त अशा रीतीने संशयास्पद करण्यासारखे नव्हते म्हणून संस्कृत वाङ्मयाच्या वाढत्या मोहिनीमुळे प्रतिनिविष्ट पंडितवर्ग डोळे चोळू लागला. रानटी म्हणून ज्याना आपण लेखीत आलो त्या लोकामध्ये उत्तम वाङ्मय, उत्कृष्ट कला आणि प्रौढ शास्त्रे आढळावीं म्हणजे काय या विचाराने पंडितांचीं डोकी सुन्न झालीं. प्रज्ञेचें आणि प्रतिभेचे देणे कोणत्या संस्कृतीला मिळाले असेल तर तें फक्त युरोपिअन सस्कृतीला, इतर संस्कृतींना त्याचें दर्शनहि घडले नाहीं, अशा पूर्वग्रहाने मनामध्यें पक्के ठाणें दिलेलें. मग भारतीयाच्या बौद्धिक थोरवीची उपपत्ति लावावी तरी कशी असें या पंडिताना मोठें कोडे पडलें. भारतीय संस्कृतीचा निकट परिचय झाल्यावर तिचें ऐश्वर्य आणि वैभव नाकारण्याची सोयच उरली नाहीं. तिच्या अंगावरील अलंकार शंखशिंपाचे नसून हिऱ्यामोत्याचे आहेत हें मान्य करणें नशिबींच आलें. पण मोकळेपणानें तें कबूल करणें जिवावर आलें, जीभ घोटाळूं लागली.

१. 'The whilom tyranny of the Sanskritists is happily over past.'—p. 332. Origin of the Aryans by Isac Taylor.

उसनें वैभव

पूर्वग्रह तर चैन पडूं देईनात. तेव्हा दुसरी एक कल्पना माडण्यात आली ! भारतीय संस्कृतीच्या अंगावरील जडजवाहीर तेजस्वी व पाणीदार आहे यात शंका नाहीं. पण तें तिच्या स्वतःच्या कमाईचे, तिच्या मालकीचें आहे असें म्हणाल तर मात्र फसाल ! अहो, हें सर्व उसने मागून आणलेलें आहे ! तिच्या अंगावरील एक एक नग जरा न्याहाळून पहा, एक एक पोत जरा पारखून घ्या, म्हणजे ताबडतोब तुमच्या लक्षात येईल कीं त्यातील हरएक चीज भारतीय संस्कृतीनें शेजारच्या ग्रीक संस्कृतीच्या जामदारखान्यातून उसनी तरी मागून आणलेली आहे किंवा तिच्या धर्तीवर नकली तयार केलेली आहे ! बुद्धिमत्तेचे देणें दयामय परमेश्वरानें एकाच राष्ट्राला दिलें. ते राष्ट्र म्हणजे ग्रीस. सर्व कला, सर्व शास्त्र, सर्व विद्या यांचें आदिपीठ म्हणजे ग्रीस. जगात अन्यत्र कोठेहि शास्त्रकलादिकाचा प्रपंच आढळला तर खुशाल समजावे, कीं तो प्रपंच ग्रीक संस्कृतीला विचारून थाटला गेला असला पाहिजे.

या समजुतीच्या आहारीं जाऊन भारतीय वाङ्मय, कला, शास्त्रें हीं सर्व ग्रीकाच्या अनुकरणानें तयार झालीं असलीं पाहिजेत असें प्रतिपादण्यास सुरुवात झाली. शिकंदरानें हिंदुस्थानवर स्वारी केली हा ऐतिहासिक पुरावाहि हाताशीं होताच. तेव्हा या पंडितानीं अशी खूणगाठ बांधली, कीं आपणास जिंकावयास आलेल्या या जेत्यापासून धूर्त व कावेबाज अशा भारतीय ब्राह्मणानीं त्याच्या शास्त्रकला चोरून नेल्या असल्या पाहिजेत. या ब्राह्मणाना स्वतंत्र प्रज्ञा लाभली नसली तरी दुसऱ्याचें अनुकरण करण्यात मात्र ते मोठे वाकबगार असावेत.

उपपत्ति एकदा मनाशीं ठाम झाल्यावर तिच्या समर्थनार्थ सापडतील ते सबळ-दुर्बळ आधार शोधले गेले आणि माडले गेले. संस्कृतमध्यें नाटकातील रंगित पडद्याला 'जवनिका' असें नाव आहे. जवनिका म्हणजे यवनिका. यवनिका म्हणजे यवनापासून घेतलेली किंवा त्याच्यात रूढ असलेली. यवन कोण तर आयोनियन ग्रीक. बस् ! आणखी कोणता पुरावा पाहिजे ? तस्मात् भारतीयानीं रंगभूमीची सजावट ही यवनांपासूनच उचलली असली पाहिजे, इतकेंच नव्हे तर समग्र नाट्यकला सुद्धा त्यांनीं

यवनाच्या पायापाशीं बसूनच आत्मसात् केली असली पाहिजे. सस्कृत नाटकांत विदूषकाचें पात्र असतें तें ग्रीक विदूषकाची नक्कलच असावें. आबटतोंड्या भारतीयाना विनोदी पात्र कोठून सुचणार? विंडीश नामे विद्वान् लिहितो कीं, विट, शकार, विदूषक हीं सर्व पात्रे ग्रीक नाट्यातूनच भारतीय वाङ्मयात प्रविष्ट झालेलीं असावीं. रगभूमीवर खून, मारामारी असले देखावे दाखवूं नयेत असा भारतीय नाट्यातील दडक; पण मृच्छकटिकात पाहावे तो वधस्तभाचा देखावा दाखविलेला. तेव्हा या नाटकावर ग्रीक नाट्याची सावली अवश्यमेव पडलेली असली पाहिजे. बाणभट्टाची कादंबरी हा एक सस्कृत कथानकी गद्याचा दैदीप्यमान अलंकार आहे. इतक्या मोलाचा अलंकार भारतीय संस्कृतीच्या स्वतःच्या जामदारखान्यात घडला गेला असेल? छे! नाव कशाला? या ग्रंथाचे इंग्रजी संपादक पीटरसन सागतात कीं, कादंबरीची मूळ कल्पना ग्रीक वाङ्मयातून आली असली पाहिजे. कारण कादंबरींत नायिकेच्या सौदर्याचे ज्या तऱ्हेचे वर्णन आहे तसेच ग्रीक वाङ्मयातहि आहे! भारतीय लोक वाल्मीकीला आद्यकवीचा मान देतात. या कवीचे रामायण हे एक रम्योज्ज्वल महाकाव्य आहे हे निःसंशय. पण महाराज, ते आले कोठून? तर ग्रीक कवि होमर याच्या इलियडवरून. हेलन राणीला सोडविण्याकरिता म्हणून ट्रोजन युद्ध झाले त्याची नक्कल म्हणून सीतेला सोडविण्याकरिता राम-रावण-युद्ध वाल्मीकीनें वर्णिले इतकेच काय तें. आता तुमच्या पतिव्रता सीतेला रावणानें पळवून नेली तर आमची हेलन पतीला कटाळून स्वतःच पाहुणा म्हणून आलेल्या पारिस नामक युवकाचा हात धरून पळून गेली इतकाच काय तो फरक! हिंदूंचा पवित्र ग्रंथ भगवद्गीता हा एक अव्वल दर्जाचा धार्मिक ग्रंथ होय. पण तो चागला उतरला का तर या ग्रंथाचे जर्मन भाषातरकार लारिन्सरसाहेब सागतात कीं,[1] तो बायबलवरून बनविला म्हणून. बायबलात येशू म्हणतो कीं, जो माझ्यावर प्रीति करतो त्यावर मी प्रीति करतों! आणि गीतेतील कृष्ण सागतो कीं, 'प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थं अहं स च मम प्रियः।' अर्थात् कृष्णाच्या स्फूर्तीचा उगम बायबलात असला पाहिजे. कृष्णाच्या

१ गीतारहस्य पृ ५८०. न्यायमूर्ति तेलगांनीं लॉरिन्सरचें हें मत सप्रमाण खोडून काढलें आहे. (Bhagawatgeeta translated into English Blank Verse,)

तोंडचीं वचनेंच नव्हे तर कृष्णचरित्र हेंहि येशूच्या चारित्र्यावरूनच रेखाटलें असलें पाहिजे.

ललित व तात्त्विक वाङ्मय याच्याविषयीं हे अभिप्राय, मग ज्योतिष, वैद्यक वगैरे व्यावहारिक शास्त्राची तर गोष्टच बोलावयास नको. भारतीय लोक म्हणजे नाक मुठींत धरून फुरंगटून बसणारे लोक. संसाराविषयीं उत्साहच त्याच्यात नाहीं, मग शास्त्रीय विचारसरणीचा उदय त्याच्यात होईलच कसा? एक हुशारी मात्र त्याच्यात होती. ती म्हणजे लोकांचें ज्ञान उसनें घेण्याची. या हुशारीवर त्यानीं आपलीं सर्व शास्त्रें थाटलेलीं आहेत.

उसनें ज्योतिषशास्त्र

व्यावहारिक शास्त्रापैकीं ज्योतिषात हिंदूची प्रगति पुष्कळच झाली होतीं. पण मूळ ज्योतिष हिंदूंनीं कोठून तरी बाहेरून आणलें असावें अशी युरोपियन पंडितानीं समजूत करून घेतलेली. मग तें खाल्डियातून घेतलेलें असो, ईजिप्तमधून असो किंवा ग्रीसमधून असो. भारतीयाच्या मनोभूमींत ते मूलतः उत्पन्न होणें अशक्य हा ठाम ग्रह. एतद्विषयक सूर्यसिद्धान्ताचे इंग्रजी भाषातर करणारा व्हिटने काय म्हणतो ते पाहा: "आमचें मत असें आहे कीं, ख्रिस्ती सनाच्या आरंभानंतर लवकरच हिंदु-ज्योतिषशास्त्र हें ग्रीक शास्त्रापासून उत्पन्न झाले आणि पाचव्या-सहाव्या शतकात पूर्णतेस पोंचले, **कारण कीं, हिंदु लोकांचा कल आणि स्वभाव यांसंबंधीं जी माहिती आहे तीवरून पाहतां सत्यनिष्ठ असें ज्योतिषशास्त्र हिंदूंचें असेल अशी अपेक्षाच करतां येत नाहीं.** अवलोकन करणें, सत्य गोष्टीचा संग्रह करणें आणि त्यावरून अनुमानें बांधणें, या गोष्टींकडे त्याच्या मनाचा कलच नाहीं. हिंदूंची पद्धति मूळची त्याचीच असेल तर ती पुष्कळ काळ चाललेल्या वेधावरून स्थापित झाली असली पाहिजे. असे आहे तर तिनें ते आधारच न सांगता आपलें शास्त्र सनातन असून त्यात फेरबदलास जागाच नाहीं असें सांगणें कसें संभवेल?" वगैरे. केंब्रिज इतिहासग्रंथातही हीच मनोवृत्ति दिसून येते. त्यातील लेखक कीथ लिहितो कीं, "भारतीयानीं नक्षत्रे हीं बाबिलोनियातून उचललीं असावीं असाच संभव फार. मात्र बाबिलोनियन

लोकांना नक्षत्रें माहीत होतीं याविषयीं साक्षात् पुरावा अद्याप उपलब्ध व्हावयाचा आहे."[1] आहे कीं नाहीं मौज! बाबिलोनियनांना नक्षत्रें माहीत असतील वा नसतीलहि, पण भारतीयांनीं तीं बाहेरून कोठून तरी घेतलीं असलीं पाहिजेत हें मात्र ठाम!

रसायनशास्त्र हें भारतीयांनी अरबांपासून घेतलें असावें अशी युरोपिअनांनीं आपली समजूत करून घेतलेली. ही समजूत किती दुराग्रहाची असूं शकते हें बार्नेलच्या उद्गारावरून चांगलें लक्षात येतें. रससार नांवाच्या ग्रंथाच्या कर्त्याने ग्रंथाच्या शेवटीं स्वच्छ लिहिलें आहे कीं, "बौद्धमतं तथा ज्ञात्वा रससारः कृतो मया।" पण तंजावर ग्रंथालयातील या पोथीविषयीं लिहितांना बार्नेलनें चक्क शेरा मारला आहे की, 'ग्रथकाराचे बौद्ध म्हणजे बहुधा मुसलमान असावे!' स्वतंत्र बुद्धि कोठें चमकली कीं तें ज्ञान बाहेरून आले असावे ही कल्पना करावयाची, कारण बुद्धि ही हिंदुस्थानच्या मनोभूमींत रूजूच शकत नाहीं ही ठाम समजूत. क्षारपाकावरील सुश्रुतामधील विवेचन इतके आधुनिक शास्त्राशीं जुळतें आहे कीं, बर्थलो याला तें भारतीयाचें अस्सल असेल हें खरेंच वाटेना. म्हणून त्याने भाष्य केलें आहे कीं, हा भाग प्रक्षिप्त असून युरोपिअन रसायनशास्त्राशीं परिचय झाल्यावर कोणीं तरी घुसडलेला असावा. पण अकराव्या शतकातील चक्रपाणी नांवाच्या ग्रंथकारानें सुश्रूतातील हा उतारा जसाच्या तसा घेतला आहे आणि जुन्या जखमा क्षारानें जाळण्याच्या क्रियेचा उल्लेख ख्रिस्ती शकपूर्व दुसऱ्या शतकातील मिलिंदपन्हो ग्रथाइतका जुना आहे. तात्पर्य काय, कीं भारतीय वाङ्मय, कला, शास्त्रें याना प्रौढ स्वरूप आलेलें दिसतें खरें पण मूळ बियाणें सर्व ग्रीसमधून आणलेलें असावे असें ठासून प्रतिपादन करून युरोपियनानी आपली वर्चस्वबुद्धीची तळमळ शान्त केली.[2]

हाहि डाव उलटला

पण हाहि डाव कालान्तरानें कोलमडूं लागला. संस्कृत वाङ्मयाचा सखोल अभ्यास वाढूं लागला तसें संस्कृत वाङ्मयाचें कालदृष्ट्या प्राचीन-

---

१. Cambridge History of India Vol. I, p. 140.

२. Indian Chemistry by P. Ray, Vol. II, p. 42.

स्वहि सिद्ध होऊं लागले आणि जीं साम्यस्थलें पूर्वी भारतीयाच्या उसनवारीकरीता माडलीं केलीं होतीं, तींच आता भुतासारखीं उलट मानगुटीवर बसूं लागलीं! बुद्ध आणि कृष्ण हे खाइस्टाच्या पूर्वी शेंकडों वर्षे होऊन गेले हें स्वतत्र निःसंदिग्ध निर्णयात्मक पुराव्यानें सिद्ध होऊं लागल्यावर उसनवारी उलटी गळ्याशीं येऊ लागली. शेवटीं आणखी एक कल्पना विद्वानानीं काढली. ती म्हणजे भारतीयानीं थोर मानलेल्या बुद्ध कृष्ण वगैरे विभूति या मुळीं काल्पनिकच होत असें प्रतिपादणे ही होय. त्यानीं असें प्रतिपादण्यास सुरुवात केलीं कीं, प्राचीन भारतातील बऱ्याच महान् विभूति या निव्वळ काल्पनिक होत. कौरव-पाडव काल्पनिक, बुद्ध काल्पनिक, चाणक्य काल्पनिक, व्यास काल्पनिक, श्रीकृष्ण काल्पनिक, साराश थोर व्यक्ति इथून तिथून साऱ्या काल्पनिक! राम व कृष्ण या थोर विभूति भरतखडात पूर्वी अशा होऊन गेल्या कीं, त्याच्या यशोगधानें भरतखंडातील सर्व वाङ्मय दरवळून गेलें आहे. आणि बुद्धाची थोरवी निर्बुद्धालाहि पटविण्याकरिता भरतखंडभर जागोजागीं स्तूप आणि विहार बाहू ऊर्ध्व करून उभे आहेत. पण पडिताना यांचें काय? बुद्धाविषयीं ओटोफ्रॅंक लिहितो कीं, "माझी तर खात्री आहे कीं, बौद्धग्रथात वर्णिलेले बुद्धाचे सहा पूर्वज जितके काल्पनिक तितकाच **गौतम बुद्ध हाहि शुद्ध काल्पनिक होय.** बुद्ध ही कदाचित् एखादी वृक्षदेवताहि असू शकेल." सेनार्त व बार्थ या पडितानींहि आपला असाच ग्रह करून घेतला होता.[१] साधी गोष्ट अशी आहे कीं, कोणत्याही शास्त्राची किंवा धर्मस्थापनेची पूर्वपीठिका देण्याचा प्रसंग आला असता गौरवास्तव ती पीठिका कोणत्या तरी देवतेपर्यंत नेऊन भिडवावी अशी रूढि पडून गेली आहे. पण तेवढ्यावरून तें शास्त्र वा तो धर्म आकाशातून खालीं पडला असे कोणी मानीत नाहीं. तेव्हा बुद्धाचे पूर्वज काल्पनिक असले म्हणजे बुद्धहि काल्पनिकच असला पाहिजे ही तर्कसरणी निखालस अशास्त्रीय होय. पण भारतीय परंपरेविषयीं अज्ञान आणि तिच्या योग्यतेविषयीं दुराग्रहमूलक हीन भावना मनीं रुजलेली असली म्हणजे तर्काला तर्कटाचे फाटे

१. History of Sanskrit Literature by Winternitz, Vol. II, p. 598.

फुटू लागतात. बुद्धासंबंधीं सागावयाचे म्हणजे बुद्ध ही एक ऐतिहासिक अवतारी विभूति होऊन गेली अशी समजूत फार प्राचीन काळापासून म्हणजे अशोकाच्या वेळेपासून रूढ आहे. बुद्धाची जन्मभूमि जी लुंबिनीग्राम तिचें दर्शन घेण्याकरिता अशोक तेथे जातिनिशीं गेला होता व त्याने आपल्या यात्रेच्या स्मरणार्थ जवळच एक स्तंभ उभारला होता. त्यावरील शिलालेखात लिहिले आहे कीं, राजा प्रियदर्शी हा राज्यावर बसून वीस संवत्सरे झाल्यावर शाक्यकुलातील बुद्ध याची जी ही जन्मभूमि तिचे समक्ष दर्शन घेण्याकरिता येथे येऊन गेला.[1] कपिलवस्तूच्या जवळच पिप्रावा या गावीं बुद्धाच्या अस्थींचा एक करंडकहि सापडलेला आहे. आता बुद्धाच्या पूर्वजात काहीं काल्पनिक असतील पण त्याची जन्मभूमि अमुक असे मानून त्याची यात्रा कोणी करीत नाहीं. साराश, गौतमबुद्ध ही काल्पनिक व्यक्ति होय असे मानण्याला कोणताच पुरावा देता येण्यासारखा नाहीं.

बुद्धाप्रमाणेच अलौकिक अशी अन्य क्षेत्रातील व्यक्ति म्हणजे अर्थशास्त्र या ग्रथराजाचा कर्ता आर्य चाणक्य हा होय. यानेंच नंदाचा समूळ उच्छेद करून चंद्रगुप्ताला गादीवर बसविला अशाविषयीं विष्णुपुराण, दशकुमारचरित, कामंदकीय नीतिसार अशा अनेक जुन्या ग्रंथानीं ग्वाही दिलेली आहे. पण इंग्रज पंडित कीथ याने ठरविलें आहे कीं, चाणक्य हा काल्पनिक असावा.[2] का ? तर त्याच्या चरित्रात अद्भुत गोष्टींचा उल्लेख येतो म्हणून ! 'स्थविरावलि चरिता'मध्यें हेमचंद्रानें चाणक्याचे वर्णन केले आहे कीं, "तो जन्माला आला तेव्हा त्याच्या दाताची संपूर्ण कवळी तयार झालेली होती आणि अवतारसमाप्तीनंतर त्यानें स्वतःला जाळून घेतले व नतर तो देवतारूप पावला." असल्या अद्भुत कथा कोणत्या थोर विभूतीभोवतीं गोळा होत नाहींत ? तशा त्या झाल्या म्हणून मूळ विभूतिच खोटी मानणे ही विचारसरणी तर्कदुष्ट नव्हे काय ?

अशाच प्रकारच्या विचारसरणीनें कौरव-पाडव, राम-कृष्ण, व्यास-

१. Select Asokan Epigraphs by S. Bhattacharya p. 54.

२. अर्थशास्त्र by Jolly. Introduction.

वाल्मीकि हे सर्व कल्पनेचे खेळ होत असें काहीं युरोपियन पंडितानीं ठरविले आहे. पण त्यानीं ठरविले म्हणून ऐतिहासिक सत्य थोडेच नष्ट होतें ! शतकानुशतकें अबाधित चालत आलेला पुरावा अमान्य करावयाचा झाला तर त्याला तसाच उलट बाजूचा सबळ पुरावा उभा करता आला पाहिजे. तसा कोणताच पुरावा या पंडिताना सादर करता आलेला नाहीं. यामुळें काल्पनिक उपपत्तीचे त्याचे शरसंधान हें आकाशाच्या पोकळींतील शरसंधानासारखे फुकट गेले आहे.

काल्पनिकतेचा बाण फुकट गेल्यावर आणखी एक बाण त्यानीं भात्यातून काढिला. तो म्हणजे बुद्ध, चंद्रगुप्त, राम वगैरे थोर पुरुष हे मूळचे परकीय असावे. बुद्धाच्या वंशात सूर्योपासना होती तेव्हा तो बहुधा पर्शियन असावा. आणि त्याचें कुल लिच्छवी हे इराणातील बंदर निसब्रिस येथलें असावें. निसब्रिसचे निच्छवी व नंतर लिच्छवी अशीं रूपें झालीं असावींत. दुसऱ्या काहींच्या मतें तो तिबेटी असावा किंवा सिथियन असावा. भारतीय मात्र निश्चित नसावा. कारण एवढी थोर विभूति भरतखंडाच्या नाठाळ भूमींत जन्मास येईल कशी ? राम हाहि ईजिप्तमधून आला असावा आणि चंद्रगुप्त इराणातून अवतरला असावा !

साराश, युरोपच्या बाहेर कोठें प्रगल्भ संस्कृति असूं शकेल हें मान्य करताना केवढे आढेवेढे या पंडिताना घ्यावे लागले, केवढे आवंढे गिळावे लागले, हें पाहिले म्हणजे मौज वाटते. आधीं भरतखंडात कोणत्याहि शास्त्रकलेतील प्रतिभावान् पुरुष जन्मास येणेच अशक्य असें म्हणावें, पुढें शास्त्रकलादिकातील प्रगति मान्य करावीच लागली तर ती ग्रीसमधून उसनी घेतली असें म्हणावें, तेंहि अंगलट येण्याचें चिन्ह दिसताच प्रतिभावान् समजलेल्या विभूति काल्पनिक आहेत असे म्हणून पहावें, आणि तितक्याउपर त्या ऐतिहासिक आहेत असे मान्य करण्याचें नशिबीं आलेंच तर त्या परदेशातून आल्या असाव्यात असें ठरविता येईल का पाहावें ! इसापनीतीमधील वाघोबा शेळीशीं असाच वाद घालीत नव्हता का ? तू पाणी गढूळ केलें नसलेंस तर तुझ्या बापाने केलें असेल. तर काय झालें, कीं भारतीयाचें श्रेष्ठत्व मोकळेपणानें मान्य करण्यापूर्वी जितके पर्याय उलट बाजूनें माडता येण्यासारिखे होते तितके माडले गेले. ते सर्व क्रमवार

माडले गेले किंवा ते माडण्यात काहीं आखीव धोरण होते असे म्हणणें नाहीं, तर ते जेत्याचे स्वाभाविक पूर्वग्रह होते. असल्या अवास्तव, बिन-बुडाच्या व मत्सरी अवहेलनेची प्रतिक्रिया होणें क्रमप्राप्तच होतें. तशी ती झालीहि. कशी तेंच आता पुढील प्रकरणीं पाहूं.

प्रकरण तिसरें

प्रत्याघात



अहंकाराने पछाडलेले जेते हे जित राष्ट्राचा कसा व किती निरानिराळ्या तऱ्हेने पाणउतारा करितात ते मागे पाहिले. आता त्याच्या प्रतिक्रियेकडे थोडी नजर टाकूं या.

जित राष्ट्राची संस्कृति ही अगदींच दुर्बल असली तर ती परक्याच्या सर्वस्वीं आहारीं जाते. पण तीच सबल असली तर काहीं काल मान खालीं घालून अपमानाचे प्रहार तिने शिरीं घेतले, तरी थोडक्या अवधींत भानावर येऊन स्वत्वाची खूण पटून परकीय अवहेलनेला जशास तसा अहेर करण्यास बद्धपरिकर झाल्याविना राहत नाहीं.

प्रतिक्रिया सुरू होण्यापूर्वी काहीं काल मात्र स्तिमितावस्थेत किंबहुना दिङ्मोहात जातो. या अवस्थेत विचारवंतानाहि भूल पडल्याविना राहत नाही; हळूहळू आत्मनिरीक्षणाने स्वतःचे दोष दिसूं लागतात. पण प्रथम प्रथम त्या दोषांचें आविष्करण ते इतक्या त्वेषानें करितात कीं, त्यामुळें सद्गुणापेक्षा दुर्गुणच आपल्यात जास्त आहेत अशी निरुत्साहकारक कल्पना रूढ होऊं लागते. रणागणावर जेव्हा भारतीयाचा पराभव झाला त्या वेळीं ईश्वरच बोलून चुकला कीं, तुमच्यात दौर्बल्याचा दोष उत्पन्न झाला आहे म्हणून. पण हा दोष राष्ट्राच्या सर्व व्यवहाराना ग्रासून टाकणारा असला व याच्या सानिध्यात सर्व सद्गुण काहीं काल लोपून गेले तरी ते कायमचे नष्ट होतात असें थोडेंच आहे ! ज्या राष्ट्रांत कोणताच गुण शिल्लक उरला नाहीं त्याला पुनरुद्धाराची आशाच करावयास नको. म्हणून अवगुणाचें दिग्दर्शन करतानाहि राष्ट्राच्या तेजोभंग होणार नाहीं याबद्दल खबरदारी घ्यावी लागते.

हा विवेक संस्कृतीच्या लढ्याच्या प्राथमिक अवस्थेमध्ये जागविणें दुस्तर असते. व्रणावर टोंच मारावी त्याप्रमाणें दोषांचा विचका करून दाखविण्यास परकीय तर टपलेलेच असतात. अशा वेळीं आपल्या संस्कृतीतील अभिमानास्पद गोष्टींची जाणीव राखल्यानेच परकीय टीकाकाराच्या डोळ्याशीं डोळा भिडविता येईल. हें करीत असताना आपल्यातील खऱ्या दोषाकडे डोळेझाक करावयाची असेहि नव्हे पण दोषाचीं बाडगुळे छाटीत असताना गुणाचा बुंधा छाटला जाणार नाहीं अशी सावधगिरी बाळगलीच पाहिजे.

पण ही सावधगिरी सर्वांनाच बाळगिता आली नाहीं. इंग्रजाचें राज्य सर्वांआधीं बंगालमध्यें स्थिर झालें आणि त्या प्रांतीं परकी संस्कृतीविषयीं अवास्तव आदर आणि स्वतःच्या संस्कृतीविषयीं अमर्याद अनादर याचें पीक पहिल्या पिढींत जोमाने आलें. शाक्तपंथाने आचारभ्रष्टता आधींच आलेली होती. तींत नव्या इंग्रजी शिक्षणाची भर पडली. तेव्हा काहीं उल्लूंनीं आपण पूर्वपरंपरा तुच्छ समजतों हें दर्शविण्याकरिता मद्य-मास उघडपणें खाण्यास व स्तोत्राऐवजीं इलियड पाठ म्हणण्यास सुरुवात केली! परकीयाच्या धर्मकारणाचें स्तोम माजविणारे हरीचे लालहि निघाले. ख्रिश्चन मिशनऱ्याची छाप बंगालवर सर्वांत अधिक बसली. त्या प्रांतातील ब्राह्मो समाजाचे संस्थापक राम मोहन यानीं असे उद्गार काढले कीं, 'धर्मतत्त्वाचे मीं जें सतत पुष्कळ वर्षें संशोधन केलें त्यात ख्रिस्तानुशासन हेच साऱ्या धर्मांत विशेष नीतिसंवर्धक व बौद्धिक जगास अधिक उपयोगी असे मला आढळलें.' याच पंथातील भावनाप्रधान पुढारी केशवचंद्र हे तर एवढ्यावरच न थांबता म्हणतात कीं, " खरोखरच ही मोठी आमच्या भाग्याची गोष्ट कीं, ख्रिस्ती मिशनरी जगदुद्धाराकरिता ख्रिस्तधर्म शिकविण्यास निघाले तेव्हा हिंदुस्थानचा त्याना विसर पडला नाहीं, **आम्हां नेटिवांचें अंतःकरण अत्यंत संकुचित व स्वार्थी असून भावना व आकांक्षा खुरट्या होत.**"[१]

आपल्या संस्कृतीतील दोष काढून टाकण्याठीं परकीयाचे पाय धरण्यां-

१. अधिक माहिती द. के. केळकरकृत बादळीवारे लेख ६ मध्यें पहावी.

तील आपल्या वाकबगारीबद्दल काहीं बंगाली लोक अभिमानहि बाळगतात असे दिसतें. त्याच्या ब्राह्मो समाजाच्या मुखपत्राचे[1] संपादक लिहितात, "धर्मकल्पनाचें जोखड सहज झुगारून कोणी देत असेल तर बंगालीच ! सेन राजाचा ब्राह्मणीधर्म जेव्हा त्याना जुलमी व अप्रागतिक वाटूं लागला तेव्हा बंगाली बौद्धानुयायानीं पठाण राजाना राजे म्हणून पाचारण केले, व नंतर एकटाकी बहादुरीसारख्या ब्राह्मण जहागिरदाराची व या पठाणाची सोयरीकहि सुरू झाली. नंतर मोगलाचे राज्य जेव्हा निर्जीव वाटूं लागलें तेव्हा हिंदु बंगाल्यानीं नव्या तरतरीत रक्ताच्या इग्रजाचे स्वागत केले ! मराठेहि त्याचें दार ठोठावीत होतेच; पण त्यानीं त्याच्याशीं संगनमत केले नाहीं. आणि यात त्याची दूरदृष्टिच दिसून येते. कारण बगाल्यानीं इंग्रजाचे स्वागत केलें, राज्यकारभारात त्यास हरएक प्रकारची मदत केली आणि त्याच्या सस्कृतीचा अगीकार करण्यास आपणास वाहून घेतले, म्हणूनच अभिनव व अभूतपूर्व अशा पाश्चात्य सस्कृतीचा सर्वत्र फैलाव झाला. ह्या महद्भाग्याबद्दल बगालला अभिमान वाटला पाहिजे !"[2]

अरे तर कां रे

असल्या महद्भाग्याबद्दल स्वतःस धन्य समजणाराची साथ करणारे पुढारी महाराष्ट्रातहि होते. हिंदुस्थानचा आणि इग्लडचा सबंध आला तो ईश्वरी कृपेचेच फळ होय अशी समजूत आपल्यातील थोर पुढाऱ्याचीहि झालेली होती. अव्वल इंग्रजीतील एक सुविद्य आणि चौकस असे विद्वान् लोकहितवादी त्यानीं लिहिले आहे कीं, 'हिंदु लोकामध्यें मूर्खपणा वाढला तो दूर होण्याकरिताच हे गुरु दूर देशाहून ईश्वराने इकडे पाठविले आहेत.' (शतपत्रे क्र. ४६). उत्तरोत्तर अधिक अनुभव आल्यावरही न्यायमूर्ति रानड्यानीं हीच विचारसरणी चालू ठेवली व त्याचे शिष्य नामदार गोखले यानीं तर १९०५ सालीं, म्हणजे इंग्रजी सत्ता स्थिर झाल्यावर सुमारें शंभर वर्षे लोटल्यावरही, भारतसेवकसमाजाची स्थापना करिताना समाजसेवकानीं मानावयाचें आद्य तत्त्व म्हणून नमूद केलें तें हें कीं

१. Indian Messenger च्या ९-५-२६ चा अग्रलेख.

२. स. कृ. फडके कृत नवयुगधर्म पृष्ठ ७६५.

'ब्रिटिशाचा आणि हिंदुवासीयाचा संबंध हा दैवी योजनामूलक असून हिंदवासीयाच्या हितासाठींच होय.'[१]

पण परकीयाना आपल्यात कोणताच गुण दिसत नाहीं, व आपल्यात नसलेल्या दोषाचेहि कुभाड ते आपल्यावर रचताहेत आणि अहकारानें ताठून जाऊन भलभलते प्रलाप काढूं लागले आहेत, हे पाहिल्यावर पहिल्या क्षणात सुप्त व सुन्न झालेला अभिमान हा डवचल्याने जागा होऊन फणा काढल्यावाचून कसा राहील ? कोणत्याहि राष्ट्रातील अभिमानाचें मर्मस्थान म्हणजे त्या राष्ट्राची नीतिमत्ता व चारित्र्य ! आणि त्यातल्या त्यात स्त्रियाचे चारित्र्य ! त्याच्या चारित्र्यावर कोणी निष्कारण शिंतोडे उडविले तर राष्ट्राचे अत्यत नाजुक असे मर्मस्थान दुखावले जातें आणि मग ते राष्ट्र दलित असलें तरी मुंगीने चावा घ्यावा त्याप्रमाणें अपशब्दाचा कडकडून चावा घेतल्याशिवाय राहत नाहीं. ह्या सबंधात मासलेवाईक दाखला सुधारकाग्रणी आगरकर ह्याचा देता येईल. आपल्यातील अनेक दुर्गुणाची त्याना योग्य जाणीव होती आणि अप्रियता स्वीकारूनहि ते दुर्गुण वेशीवर टागण्यातच उभा जन्म त्यानीं आपली लेखणी झिजविली. पण नसती नालस्ती आपली कोणी करू लागला तर आगरकरासारखा मानी माणूस हा ह्या नालस्ती करणाराची उलटी पूजा शेलक्या शब्दानीं बाधल्याशिवाय कसा राहील ? 'अशबर्नर'साहेबानें हिंदु स्त्रियाची नालस्ती त्या सनदी स्वैरिणी होत अशा विषारी शब्दानीं कशी केली होती ह्याचा उल्लेख मागें येऊन गेलाच आहे.[२] त्यावर आगरकरानीं जो उलट आहेर केला तो आता पाहा. अशबर्नर आणि त्याचे जातभाई ह्याना उद्देशून आगरकर लिहितात, "कोणत्याहि देशातील लोकानीं दुसऱ्या देशातील लोकास व्यभिचारी ठरविण्याचे धाडस करूं नये. म्हणून आम्ही इंग्लिश लोकाच्या व्यभिचाराविषयीं काहींएक म्हणत नाहीं. तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें लादूं लागतील तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें

१. आजकालचा महाराष्ट्र पृ. २०५ पाध्ये-टिकेकर.

२. पृ १५.

तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत असें म्हणण्यास आम्ही कधींहि सोडणार नाहीं."

परकीयानीं निष्कारण, अन्याय्य व असत्य असा आघात केला म्हणजे दुसऱ्या बाजूनें आघात करणाऱ्याच्या पायाखालीं काय जळत आहे हें दाखवून देणें ओघानेंच येतें. कांहीं वर्षांपूर्वी मिस् मेयो नावाच्या एका अमेरिकन प्रौढ कुमारीनें हिंदुस्थानच्या नालस्तीनें पान अन् पान बरबटलेले असें एक गलिच्छ चोपडे प्रसिद्ध केलें. त्या वेळी आगरकराच्याप्रमाणे गौबा व लाला लजपतराय हे प्रतिकाराकरिता बद्धपरिकर झाले. त्याना ह्या प्रकाराची अतिशय चीड येऊन त्यानीं 'मारतमाता' नावाचें चोपडें लिहिणाऱ्या मिस् मेयोच्या माय देशात सामाजिक अन्यायाचा केवढा उकिरडा माजलेला आहे हे, तो उकिरडा उपसून चव्हाट्यावर माडूनच दाखविलें. भारतीयाच्या नीतिमत्तेवर निष्कारण कुमाड रचणाऱ्या गोऱ्या लोकांना गौबानीं खणखणीतपणें असें बजावलें कीं, "स्वातंत्र्याच्या, सामाजिक नीतिमत्तेच्या आणि समाजसुधारणेच्या बल्गना निष्कारण तुम्ही आमच्यापुढें करूं नका. इंग्लिश इतिहासकार लॉर्ड ब्राईस याने तुम्हाला मोठें शिफारसपत्र दिलें आहे कीं, सामाजिक नीतिमत्तेच्या प्रातात सम्राट् म्हणून कोणत्या राष्ट्रास मिरविता येईल तर ते अमेरिकेस.[1] या 'अहोरूपा'तील खरा ध्वनि आम्ही जाणून आहोंत. प्रत्यक्ष व्यवहारांत ही सामाजिक नीति तुमच्यात कितीशी उतरली आहे ह्याचें एकच उदाहरण सागतों ते ऐकून ठेवा. १९२०-२१ सालची गोष्ट. फार जुनीहि नव्हे. ह्या सालीं तुमच्यातील दोन फार बड्या अंमलदारांना सरकारी पैसे खाल्ल्याबद्दल कोर्टात शिक्षा ठोठावण्यांत आल्या होत्या. आणि हे अंमलदारहि असे तसे नव्हते तर दोन प्राताचे दोन गव्हर्नर होते! हा प्रकार तुम्ही विसरलात तरी आम्हास अवगत आहे. आतां पैसे खाणें हेंच नीतिमत्तेचें लक्षण असेल तर गोष्ट वेगळी![2]

लजपतरायानीं तर मेयोच्या मायभूमीत म्हणजे अमेरिकेंत कांहीं वर्षें साक्षात् वास्तव्य केलें होतें, आणि स्वातंत्र्याच्या पायघोळ गप्पा मारणाऱ्या या

१. America is the moral giant of History.

२. Uncle Sham, by Gauba.

अमेरिकेंत तेथील जित व दलितवर्ग जो नीग्रो त्याच्यावर किती आणि कोणत्या प्रकारची अन्याय्य बंधनें घातली गेली होतीं हें समक्ष डोळ्यानीं पाहिलें होते. तसेच नीग्रोंच्या असहाय स्थितीचा इतिहासहि त्यानीं अभ्यासला होता. त्याच्या जोरावर लजपतराय लिहितात कीं, अस्पृश्याना आम्ही अन्याय्य रीतीनें वागवीत आलो आहोंत हें आम्ही कबूल करतों. पण या आमच्या पापाची जाणीव तुम्ही मात्र आम्हाला करून देण्याचे कारण नाहीं. कारण आम्हीं अस्पृश्यावर एकपट नियंत्रणें घातली असलीं तर त्याच्या दसपट नियत्रणे तुम्हीं तुमच्या देशातील अस्पृश्यावर म्हणजे नीग्रो लोकांवर घातली आहेत याची वाट काय ? या नीग्रोंवरील जुलुमाचें पाप जोंवर तुम्हीं धुऊन काढलें नाहीं तोंवर वर मान करून आम्हाला उपदेश करण्याचा अधिकार तुम्हाला काडीमात्र प्राप्त होत नाहीं. तुम्ही विसरलां असलात तरी या नीग्रो लोकाचा जो अनन्वित छळ तुम्हीं केलात आणि अद्यापिहि करीत आहात त्याची नोंद इतिहासाच्या दप्तरीं रुजू आहे.

गेल्या शतकाच्या सुरुवातीस बहुतेक नीग्रो जनता दास्यात खितपत पडली होती; पण जे दास्यातून मुक्त झालेले होते अशाच्यावरहि अनेक निर्बंध लादलेत. त्यानीं गहूं विकता कामा नये, औषधें विकता कामा नयेत, नावा चालवूं नयेत कीं तंबाखूचा व्यापार करूं नये. आणि इतके निर्बंध सोसून पुन्हा त्यानीं बेकारहि राहतां कामा नये. नीग्रोंनीं गोऱ्या लोकाशीं शरीरसंबंध जोडूं पाहणें हें तर महापातकच मानीत होता. १९१० सालीं अमेरिकेंतील ५२ संस्थानापैकीं निम्यानीं एतद्विषयक कायदे पास करून घेतले व वरील महापातकाबद्दल दहा वर्षें तुरुंगवास एवढी जबर शिक्षा ठेवली. या गोष्टीचा आधीं जाब द्या, आणि मग नाक वर करून आम्हास उपदेशामृत पाजा !

आणि नीग्रोंना दगडानें ठेचून मारण्याचा आणि जिवंत जाळण्याचा 'लिंचिंग'चा प्रकार ? माणुसकीचा अल्प थेंब तरी तुमच्या रक्तात शिल्लक असेल तर या राक्षसी प्रकाराचा नुसता नामनिर्देश करिताच शरमेनें तुमची मान खालीं जावयास हवी. नीग्रोनें काहीं आगळीक केली असा नुसता वहीम आला कीं कायदे कोर्ट वगैरे सर्व गुंडाळून ठेवून तुम्ही लाडग्यासारखे त्याच्यावर तुटून पडतां आणि रस्त्यातून त्याला फरफटत नेऊन

धोंड्यांनीं ठेचून त्याचा प्राण घेता. आणि या प्रकारात तुमच्यातलीं शहाणीसुरतीं माणसेंहि भाग घेतात.[१] तुमच्याच शिकागो येथील 'ट्रिब्यून' वर्तमानपत्रावरून या प्रकाराचे आकडे घेतले तरी असले घोर प्रकार क्वचित् घडणारे नसून नित्याचे आहेत हे तुम्हाला कबूल करावें लागेल. १८८५ ते १९१८ पर्यंतच्या चौतीस वर्षांतील आकडे घेतले तर असले राक्षसी प्रकार २ ९७५ येवढे घडले असे ट्रिब्यूनवरून दिसतें. हे प्रकार अद्यापीहि चालू आहेत. त्याचा जाब कोठे द्याल? आणि तुमची वैवाहिक नीतिमत्ता? मुलामुलींच्या गुन्ह्याचा इनसाफ करणारे न्यायमूर्ति लिंडसे याचे पुस्तक उघडून पहा.[२] विवाहपूर्व सहवासाने अडचणींत सापडलेल्या सर्व गुन्हेगार मुली वय १४ ते १७ च्या दरम्यान! असे असता कोणत्या तोंडाने तुम्ही दुसऱ्याना हिणवणार?

निष्कारण 'अरे' म्हणून कोणीं म्हटले तर अनेक बाबतींत त्याला 'कां रे' म्हणून असेच हटकता येईल. प्रतीक म्हणून आम्ही लिंगाकृतीची पूजा-अर्चा करतों म्हणून तुम्ही आमचीं मोठी हेटाळणी करीत असतां. तसें पाहिले तर शिवलिंगाच्या दर्शनानें आमच्या स्वप्नींहि कधीं गलिच्छ भावना स्फुरली नाहीं पण लिंगपूजेचीच गोष्ट काढलीत तर तो प्रकार तुमच्याकडेहि आमच्याइतकाच जारी होता असे तुमचे इतिहासकारच सांगतात.[३]

आमच्या भक्तिपंथातील मधुरपंथात भक्त आणि देव यातील नातें हें पतिपत्नीच्या नात्यासारखें मानले जाते, व कृष्ण-गोपींच्या रासक्रीडेत हाच प्रकार चालतो याचा उल्लेख करून तुम्ही नाकें मुरडतां पण तुमच्या बायबलातील सालोमनचे गाणे याच प्रकारचें आहे हे तुम्हीं लपविलेंत तरी आम्हास माहीत आहे. आमच्या वंशशुद्धतेच्या अभिमानाची तुम्ही आजवर टवाळी करीत आलात पण युद्धापूर्वी जर्मनीमध्ये शुद्ध नार्डिक रक्तच

१. America Comes of Age, by Siegfried पा. ९८-९९.

२. Revolt of Modern Youth.

३. In Flanders and in France ithyphallic saints were not uncommon such as St. Giles in Brittany, St. Rene in Anjou, St. Greluchon at Bourges– (*Sex in Civilisation* p. 40.)

तेवढें जर्मन राष्ट्राच्या नाडींतून वाहिलें पाहिजे याविषयीं जो कडकडीत सोवळेपणा माजून राहिला होता व नार्डिकेतर म्हणजे ज्यू लोकाना जें सर्क्कानें हद्दपार केले जात होते त्याची तरफदारी कशी करणार ? आम्ही मिश्रविवाहाला विरुद्ध होतो ते आता अनुकूल होत चाललों आहोत पण तुमच्या ब्रिटिश दक्षिण आफ्रिकेत सात वर्षांपूर्वीच बिल आले होते ना, कीं मिश्रविवाह बेकायदेशीर मानावा म्हणून ? अशाप्रकारे उलट अहेर हवा तेवढा देता येईल.

पाश्चात्य म्हणजे द्विपाद पशु

प्रत्याघाताचा हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार म्हणजे आपल्या संस्कृतींची अवास्तव स्तुति आणि परकीय संस्कृतीची निंदा हा होय. हिंदु-संस्कृतींतील वाङ्मय, धर्म, शास्त्र, कला ह्या सर्वच उसन्या आणि हीन होत अशी निरर्थक हेटाळणी परकीयानीं सुरू केली म्हणजे दुसऱ्या बाजूने आम्हीं दुसऱ्यापासून कधींच काहीं उसनवारी केली नसून आजहि आम्हास पाश्चात्यापासून शिकण्यासारखे नाहीं, इतकेंच नव्हे तर आजच्या शास्त्रीय युगात जे जे नवीन शोध म्हणून लोकाना दिपवून सोडीत आहेत तेहि सर्व आपणास शेंकडो वर्षांपूर्वीच अवगत होते, अशी भाषा सुरू होणे निसर्गप्राप्तच होय. या प्रवृत्तीचे एक उदाहरण म्हणजे आर्यसमाजी वाङ्मय होय. या पंथाने असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, कीं आजच्या युगातील झाडून सारे शोध हे वेदकालींहि अवगत होते. त्याच्या मतें वेदात नाहीं अशी गोष्टच नाहीं. तोफा, तारायंत्र, विमानें सर्व कांहीं वैदिक लोकाना अवगत होतें. इतकेंच नव्हे तर काहीं बाबतींत, उदाहरणार्थ लोहाचे सुवर्ण करण्यात, ते आजच्या भौतिक शास्त्राच्याहि पलीकडे गेलेले होते.

उलट सनातनी दृष्टीनें पाश्चात्याची समाजव्यवस्था म्हणजे नागड्या स्वैरचाराचा धुमाकूळ ! त्याची यांत्रिक सुधारणा म्हणजे अनर्थावह दारिद्र्याला प्रसवणारी साक्षात् राक्षसी ! त्याचें वैद्यक शरीराला निःसत्त्व करणारें, त्याचा धर्म पोटपूजेचा, त्याचें राजकारण परस्वापहरणाचें, त्याची भूमि ही भोगभूमि, त्याचा आहार तामसिक, आचरण भ्रष्ट, एवंच त्याची सर्व संस्कृतीच हीन. या प्रवृत्तीचा नमुना म्हणून 'आधिभौतिक सुधारणा व आध्या-

त्मिक धारणा' या पुस्तकातील एक दोन उतारे नजरेखालीं घालण्यासारखे आहेत. आपल्या प्राचीन शास्त्रीय शोधाविषयीं गौरवाने उल्लेख करताना ग्रंथकार लिहितो कीं, पशुविद्या, कृषिविद्या, वृक्षविद्या इत्यादि आधिभौतिक विद्याची पायाशुद्ध माहिती आपल्या लोकाना इतकी होती कीं, त्यापुढें हल्लींचे शोध काहींच नाहींत ! चाणक्याच्या अर्थशास्त्रातील बारीकसारीक नियमाविषयींची दक्षता पाहिली म्हणजे असें वाटूं लागतें कीं, सर्व प्रकारच्या सुधारणाना आर्यभूमि हेंच गुरुघर आहे आणि त्याच्यापुढे पाश्चिमात्य सुधारणा कवडीमोल होत. अंगाला रग लावून कातडीं पाघरून निर्वाह करणाऱ्या रानटी पाश्चात्याचे आजकाल काय नशीब फळफळलें असेल तें यांत्रिक कलेवर ! त्याचे शौर्य, धैर्य, कौशल्य सर्व यांत्रिक कलेवर ! केवळ यंत्राच्या जोरावर आजकाल ते सुधारणेचे शिरोमणि म्हणून गणले जात आहेत. याशिवाय खऱ्या मानवी अत्युच्च स्वभावाची वाढ त्याच्यात अद्याप झालेली नाहीं." (पृ. २९५-९६).

ग्रंथकार अन्यत्र लिहितो: 'डार्विनच्या उत्क्रांतितत्त्वाप्रमाणे पाहिलें तर पाश्चिमात्य लोक हे माकड आणि माणूस याच्या मधल्या स्थितींत अद्याप असावेत. मनुष्याची पूर्ण वाढ अद्याप त्याच्यात झालेली नाहीं असें म्हणावे लागते. त्याचा एकलकोंडेपणा, उच्छृखल वर्तन, रानात वस्ति, उलट्या हाताने अग खाजविणें इत्यादि हालचाली कित्येक आसुरी तर कित्येक मानवी ! **या सर्व लक्षणांवरून पाश्चिमात्य लोक हे माकड, दानव आणि मानव यांच्या मधल्या कोणत्या तरी स्थितींत आहेत असे म्हणावें लागतें.** त्याच्या मूळ जातीला केल्ट असे म्हणतात, आणि कोंकणातहि वानर-माकडे याना केल्टी म्हणतात !' (पृष्ठ ७२).

पाश्चात्य संस्कृतीची अशी हजेरी घेतल्यावर आपल्या संस्कृतीच्या वैशिष्ट्याचे उत्तान चित्र तो कसें रेखाटतो तें पाहा: "आत्मज्ञानाला जशा प्रकारच्या अंतःकरणाची, मनाची, बुद्धीची ठेवण पाहिजे तशी मनुष्यप्राण्यावाचून इतराची नाहीं हें जसें नरदेहाचें वैशिष्ट्य, तसेंच भरतभूमीचें भाग्य आहे कीं, तिच्यातच असे अध्यात्मवेत्ते निर्माण व्हावे. इतर सर्व योनि या भोगयोनि आणि मानवयोनि येवढीच मात्र मोक्षयोनि. **त्याचप्रमाणें इतर सर्व देश ही भोगभूमि असून भरतभूमि ही**

मोक्षभूमि होय. मोक्षप्रवृत्ति व प्राप्ति होण्याला अवश्य लागणारी परिस्थिति, सोय, राहणी या सर्वांची अनुकूलता भरतभूमीवाचून इतरत्र नाहीं. येथे दैवी प्रकृति वास करते. इतर देशात राक्षसी महत्त्वाकांक्षा वसते. आपल्या शास्त्रकारांनी परदेशगमनाला प्रतिबंध करण्याला अनेक कारणे दिलीं आहेत. त्यांपैकीं मुख्य हे कीं या मोक्षभूमींतून त्या भोग-भूमींत गेलें असता बुद्धिभ्रश होईल तो न व्हावा." (पृ. १७). भारती-याचा बुद्धिभ्रश तर झाला नाहीच; उलट त्याच्या उत्कर्षकाळात त्यानीं व्यापार, धर्मप्रसार, राजकारण या निमित्ताने केवढ्या मोठ्या प्रमाणावर दर्यावरील मुशाफिरी केली याचे दिग्दर्शन पुढील एका प्रकरणात यथा-वकाश येणार आहे.

युरोपियन संस्कृतीच्या निंदेचा आणखी एक मासला पाहावयाचा असल्यास गो. म. जोशी याचे 'हिंदूचे समाजरचनाशास्त्र' उघडा व त्यातील केवळ बानगीदाखल खालील वाक्यें पाहा : "युरोपातील द्विपादपशूला, त्यातल्या त्यात रशियाला, पोटाची खळगी भरण्यापलीकडे मानव म्हणून कांहीं असतो ही कल्पनाच शिल्लक उरलेली नाही (पृ. ५७). पुत्रैषणा, दारैषणा, वित्तैषणा या तिहींच्या तडाख्यातून सुटलेला मानवप्राणी विरळाच, आणि आधुनिक युरोपच्या संस्कृतींत तर नाहींच नाहीं (पृ.६९). आज सुधारणेच्या जाहिराती घेऊन चारी खंडात वाटीत सुटणारा पाश्चात्य हा तामसिक पशुस्थितींतून फारसा वर आलेला नाहीं (पृ.८०)." भारतीयामधील तामसी वृत्तीच्या लीला पुढें एका प्रकरणात वाचकास सादर करण्यात येणार आहेत. त्या वेळीं खरा प्रकार वाचकाना कळेलच !

विधायक प्रत्याघात

वरील प्रत्याघात हा शेपटीवर पाय दिल्याने फणा काढून टवकारणाऱ्या नागाच्या फूत्काराच्या स्वरूपाचा होय. तो जहरी असतो पण टिकाऊ नसतो. अधिक परिणामकारक प्रत्याघात म्हणजे आपले गुण प्रतिपक्षास मान्य करावयास लावणे हा होय. चाणक्याच्या मुत्सद्देगिरीवर कळस केव्हा चढला तर प्रतिपक्षी जो अमात्य राक्षस त्याला चाणक्यानें चंद्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारण्यास लावले तेव्हा ! राजकारणात चाणक्यानें हा जो अद्वितीय विजय मिळविला तसा आजच्या काळीं, राजकारणात नव्हे, पण

धर्मकारणात मिळविणारा एक सत्पुत्र भारतीय संस्कृतीला लाभला. तो म्हणजे स्वामी विवेकानंद हा होय.

विजयी पाश्चात्यानीं हिंदु धर्मांतून पुष्कळाना आपल्या कळपात ओढावें ह्यात नवल नाहीं. पण हिंदु धर्मानें आजच्या पडत्या काळात पाश्चात्य राष्ट्रात आपले मठ स्थापावे ही कौतुकास्पद गोष्ट नाहीं काय ? पाश्चात्याचा धर्म हा धर्मांतरास प्रोत्साहन देणारा, त्याच्या धर्मोपदेशकास सरकारचे व साधनाचें भरपूर पाठबळ, आणि ज्याच्यात धर्मांतराची चळवळ करावयाची ते दारिद्र्याने गाजलेले व जेत्यांच्या लखलखाटानें दिपलेले. तेव्हा काहीं भारतीयानीं कृष्णाला सोडून ख्राईस्टच्या पायीं लोटागण घातले तर नवल नाहीं. प्रथम प्रथम तर ख्रिस्ती धर्मोपदेशकाना असें वाटत असे कीं, सर्व भारतवर्ष पुढे मागें आकाशातील बापाच्या कुटुंबात समाविष्ट झाल्याविना राहणार नाहीं. पण हीं सुखस्वप्ने आता फोल ठरलीं असून, दीड दोन शतकाच्या जारीच्या प्रयत्नानंतर सुद्धा चाळीस कोटि लोकसंख्येच्या या अजस्र देशात अर्ध्या कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या ख्रिस्तानुयायी झालेली नाहीं. आणि त्यातहि जुलूमजबरदस्तीने, दारिद्र्याने, अगतिकत्वानें, अज्ञानाने बाप्तिस्मा स्वीकारलेली संख्या थोडी नाहीं हें वेगळेच. उलट, भारतीय संस्कृतीला सरकारचे कोणतेंहि पाठबळ नाहीं. जित राष्ट्राची मृत संस्कृति म्हणून तिच्याकडे पाहाण्याची रूढि पडलेली. अशा प्रातिकूल स्थितींतहि तिने धर्म आणि तत्त्वज्ञान, याच्या क्षेत्रात पाश्चात्यावर आपली छाप बसवावी हें नवल !

अमेरिकेंतील शिकागो या शहरीं १८९३मध्यें भरलेल्या सर्वधर्मपरिषदेमध्ये स्वामी विवेकानंदानीं जेव्हा आपलें पहिलेच अजरामर वक्तृत्व गाजविलें तेव्हाच विधायक प्रत्याघाताची मुहूर्तमेढ रोवली गेली. या प्रसिद्ध परिषदेमध्यें जगातील सर्व प्रसिद्ध राष्ट्रांतील नामांकित धर्मोपदेशक उपस्थित होते व त्यानीं आपापल्या धर्माविषयीं उद्बोधक व्याख्यानें दिलीं. पण परिषदेचें वृत्त प्रसिद्ध करणाऱ्या सर्व अमेरिकन वर्तमानपत्रानीं एकमुखानें निर्णय दिला कीं, त्या परिषदेंत अत्यंत परिणामकारक भाषण असें कोणाचें झालें असेल तर स्वामी विवेकानंदाचें ! विवेकानंदाचें हें संस्मरणीय भाषण म्हणजे उल्कापात होय असें इतर धर्मोपदेशकास वाटलें असल्यास नवल नाहीं.

विवेकानंदाचे चरित्रकार रोमाँ रोलाँ लिहितात कीं, विवेकानंदाचें हें भाषण ऐकल्यावर त्याच्या देशात धर्मोपदेशक पाठविण्याची कल्पना वेडेपणाची भासूं लागली असा शेरा न्यूयार्क हेरल्डने दिला.[1] स्वामीजींचे निष्कलंक चारित्र्य आणि उज्ज्वल बुद्धिवैभव यानीं स्वामीजींच्या भोंवतीं लवकरच एक निष्ठावंत शिष्यमंडळ तयार केलें. आणि तेव्हापासून आतापर्यंत अमेरिकेमध्यें अनेक वेदान्तमठ स्थापन झाले व स्वामीजींच्या अनेक संन्याशी शिष्याना तिकडे मुद्दाम बोलावण्यांत आले.

स्वामीजी अमेरिकेतून इंग्लंडमध्यें गेल्यावर तेथेहि त्याना असेंच अपूर्व यश मिळालें; त्यांचीं एकदोन व्याख्याने ऐकल्यावरच कॅप्टन व मिसेस सेव्हायर या पतिपत्नींनीं त्याचे शिष्यत्व पत्करले, व नंतर स्वामीजींबरोबर हिंदुस्थानात येऊन हिमालयातील मायावती आश्रम स्वतःच्या खर्चानें स्थापन केला व चालविलाहि. अमेरिकेत तर विवेकानदाच्या स्फूर्तीनें वेदान्ताचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्या सर्वांचा परिणाम इतका झाला आहे कीं, काहींना हे एक नवे सकटच अमेरिकेवर येऊं पाहत आहे असें वाटूं लागले आहे. निदान ते तसा बहाणा करीत आहेत. याची प्रतीति पाहावयाची असल्यास 'हिंदु धर्माची अमेरिकेवरील स्वारी'[2] अशा भडक नावाचें डॉ. वेंडेल टॉमस या गृहस्थाने एक पुस्तकच लिहिलें आहे तें नजरेखालीं घालावे. त्याच्या पुस्तकावरून असे दिसून येतें कीं, अमेरिकेंत वेदान्ततत्त्वज्ञानाविषयीं जिज्ञासा तर वाढत आहेच पण हे जिज्ञासू मनाप्रमाणें हातानेहि सढळ आहेत. इतके कीं, वेदान्तोपदेशकाच्या या धंद्यात तोतयेहि उत्पन्न झाले आहेत ! राजे राममहाराज म्हणून असाच कोणी एक अमेरिकन तोतया स्वतःस हिंदु संन्याशी म्हणवून व तिबेटांत आपण वीस वर्षें तपश्चर्या केली वगैरे सागून लोकाकडून पैसे उकळीत आहे असे टॉमस लिहितो. (पा. २१८).

हा ग्रंथकार 'हिंदु स्वारी'च्या या काल्पनिक भीतीने गागरलेला असल्यामुळें लिहितो कीं, "या हिंदु सन्याशाकडे पाहावे तों विवेकानदाप्रमाणें ते

१. Life and Gospel of Vivekananda by, R. Rolland, p. 45.
२. Hinduism Invades America.

सर्व रिक्त हस्तानें येतात आणि येथे येऊन हिंदु धर्माचा प्रसार करितात तो आमच्याच पैशानीं !'' (पा.११४). वेडेलसाहेबानीं चिडून लिहिले असलें तरी त्याचा अर्थ एवढाच कीं, वेदान्ताचा अमेरिकेंत प्रसार होत आहे तो वेदान्ताच्या स्वतःसिद्ध तेजानें होत आहे, सत्तेच्या आणि मत्तेच्या जोरावर नव्हे ! हिंदु संन्याशी अमेरिकेंत जातो तो प्रथम त्यानींच आग्रहाचें निमंत्रण दिल्यावर आणि तेथे गेल्यावरहि उपदेश देतो तो मिशनऱ्याप्रमाणें आपण उठून जाऊन बाजारात व्याख्याने देण्याच्या रीतीनें नव्हे, तर शिष्य समित्पाणी होत्साता गुरूकडे आला पाहिजे या पौर्वात्य भावनेस अनुसरून शिष्य त्याच्या घरीं येईल तेव्हाच. पुनः पैशाच्या बाबतींत विरक्त ! असें असताहि आज अमेरिकेंत न्यू यॉर्क, बोस्टन, पोर्टलॅंड, सॅन-फ्रॅन्सिस्को वगैरे ठिकाणचे मठ हे आर्थिकदृष्ट्या चागल्या सुस्थितींत आहेत.

हा सर्व प्रकार पाहून ख्रिश्चन मिशनरी पाद्यांचा जळफळाट व्हावा नाहीं तर काय व्हावें ?· आपण करावयास आलो एक आणि होत चाललें भलतेच हे पाहून त्याचे डोके भणभणावयास लागल्यास नवल नाहीं. हिंदूंच्या कळपातील कोकरे येशूच्या पाठीमागून येण्याचे बाजूसच राहिलें; उलट युरोपियनाना हिंदूच्या तत्त्वज्ञानाची मोहिनी पडत चालावी यापरते ख्रिस्ती धर्मावर मोठें संकट ते कोणते ओढवायचे राहिलें ? वरील वेडेल-प्रमाणें ह्या सकटाची घोषणा हिंदुस्थानातच वीस-पंचवीस वर्षे घालवि-लेल्या रे. ए. एच्. बोमन यानींहि केली आहे. 'ख्रिस्तमत आणि हिंदु-तत्त्वज्ञान'[1] या नावाच्या पुस्तकात ते लिहितात कीं, ''हिंदुस्थानात बरींच वर्षे काढून इग्लंडात परत आल्यावर मी हिंदुतत्त्वज्ञानाच्या इकडील लोकावर पडत चाललेल्या मोहिनीचे जेव्हा निरीक्षण करू लागलों तेव्हा अमेरिका, जर्मनी व खुद्द इंग्लड या देशातहि ही मोहिनी इतकी दाट पडत चाललेली आढळली कीं, मी आश्चर्यानें दिङ्मूढ झालों ! या भयंकर प्रकारास वेळींच आळा न बसल्यास या पिढीवर नाहीं तरी पुढील पिढीवर मोठें संकट ओढवणार आहे. खरोखर त्याची यथार्थ कल्पना करून देण्यास मजपेक्षा अधिक बुद्धिवंत आणि अधिक कुशल असाच

१. Christian Thought and Hindu Philosophy.

लेखक हवा. पण हें अत्यंत निकडीचे कार्य आहे आणि तें विलंब न करतां केलेच पाहिजे.''[१]

पाद्रीबोवानीं एवढी हाय खाल्ली ती अगदींच निष्कारण नव्हे. कारण हिंदुतत्त्वज्ञानातील काहीं प्रमेयें फारच आकर्षक ठरलीं. उदाहरण म्हणून हिंदुतत्त्वज्ञानातील एक प्रमुख प्रमेय जें पुनर्जन्म त्याचा उल्लेख करता येईल. पुनर्जन्मवाद हा प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यापैकीं पायथागोरस, एम्पीडोक्लीयस् वगैरेंना मान्य होता. ख्रिश्चन धर्माला तो सर्वस्वीं अमान्य. पण हिंदुतत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू झाल्यावर अलीकडे युरोपातील अनेक विचारवंतानीं तो मान्य केला आहे. या विचारवतामध्ये शेलिंग, लायब्निट्झ, शोपेनहाउरसारखे तत्त्वज्ञ व गटे, हर्डर, लेसिंगसारखे कलावंत याचा समावेश होतो हें सांगितलें म्हणजे वरील पाद्रीबोवाच्या तळव्याची आग मस्तकाला का पोंचली ह्याचे मर्म लक्षात येईल. निदान ख्रिश्चन धर्माचार्यांत तरी या पाखंडी मताचा स्वीकार करण्यास कोणी पुढे आला नसावा असे समाधान बोमनसाहेबाना मिळावयास हवें होतें. पण छे ! तेवढेहि सुदैव त्याच्या वाट्यास आले नाहीं. कारण पुनर्जन्म मान्य करणाराचीं वर नावे दिलीं आहेत तीं ज्या ग्रंथातून घेतलीं आहेत तो एका रेव्हरंड डब्लू. आर् आल्जर नावाच्या धर्माचार्यानेच लिहिलेला आहे. 'पुनर्जन्मवादाचा चिकित्सक इतिहास' हा तो ग्रंथ ! आल्जरसाहेबानीं हा ग्रंथ प्रथम १८६० मध्ये लिहिला त्या वेळीं पुनर्जन्मवादाची रेवडी उडविण्याच्या उद्देशानेंच लिहिला, पण पंधरा वर्षांनतरच्या याच ग्रंथाच्या नवीन आवृत्तींत शेवटीं त्यानींच या मताचा उघडपणें स्वीकार केला[२] !

मोठमोठ्या नामांकित ग्रंथकाराचे मत हिंदी धर्म व तत्त्वज्ञान यांकडे झुकूं लागावें हें पाहून काहींना तर सुचेनासे झाले आहे. एच्. जी. वेल्ससारख्या सुप्रसिद्ध ग्रंथकाराच्या एका पुस्तकावर[३] टीका करताना वुइल्यम आर्चर चिडून लिहितो कीं, ग्रंथकाराची व हिंदुस्थानातील धार्मिक प्रवृत्तींची

१. Is India Civilized, by Woodroff, पा. ५८.

२. कित्ता २५५.

३. God the Invisible King

बरीच ओळखीची झालेली दिसते. कारण स्वारीनें या पुस्तकात आशियातील तत्त्वज्ञानालाच युरोपीय भाषेचा पोषाख चढविला आहे. **आशियांतील धार्मिक प्रवृत्तीची मोठी सांथच आतां इकडे पसरणार असें दिसूं लागलें आहे.**[1]

दोन विभूति : टागोर व गांधी

विवेकानंदाच्या जोडीला आणखी दोन महनीय विभूति वाचकाच्या मनश्चक्षूपुढे उभ्या राहतील. त्या म्हणजे कविवर्य टागोर आणि महात्मा गांधी. चालू युगातील एक प्रमुख सांस्कृतिक चळवळ म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील वैमनस्य व गैरसमज दूर करून शांतता प्रस्थापित करणे ही होय. आणि अशा प्रकारचें एकमेकाच्या संस्कृतीचे अध्ययन करण्याचें विद्यापीठ आज जर कोठे असेल तर ते हिंदुस्थानातील रवींद्रबाबूंचे विश्वभारती विद्यापीठ हे होय. राजकीयदृष्ट्या दुबळ्या असलेल्या हिंदुस्थानात हा **संस्कृति-संगममठ** स्थापन व्हावा ही गोष्ट अभिमानास्पद नव्हे काय ? या विश्वभारतीचे पुरोध टागोरबाबू यानीं भारतीय संस्कृतीचा प्रसार जेवढ्या प्रमाणावर केला तेवढा करण्याचे एका व्यक्तीच्या वाट्यास क्वचितच येत असेल. रुबाबदार देहयष्टि, पाणीदार चेहरा, नादगंभीर आवाज, काव्यमय भाषा आणि उत्तुंग विचार यानीं मंडित अशा या भारतीय महर्षीनें आपल्या संस्कृतीची कावड लंडनपासून टोकिओपर्यंत व कोलंबोपासून मास्कोपर्यंत अखिल पृथ्वीतलावर फिरवून आणली आहे. रवींद्रबाबूंचे नाव कानावर आलें नाहीं असा सुशिक्षित माणूस आज जगात कोठेहि आढळणार नाहीं.

या सर्वांपेक्षा अखिल जगाचें लक्ष आपल्याकडे ओढणारी व्यक्ति म्हणजे विद्यमान लोकनायक महात्माजी हे होत. हिंदुधर्म व तत्त्वज्ञान यातील अहिंसा, परसहिष्णुता, सर्वात्मभाव वगैरे तत्त्वांची छाप पाश्चात्य तत्त्वज्ञावर आधींच बसली होती. ख्रिश्चन धर्माचीही उभारणी याच तत्त्वज्ञानावर झालेली आहे. पण हीं तत्त्वे व्यवहारात उतरवून दाखविणारा महापुरुष अलीकडे अवतरला नव्हता. तो अवतरून त्यानें

---

१. Is India Civilised ? p. 276.

आपल्या अहिंसा-तत्त्वाचा प्रयोग पसतीस कोटी लोकसंख्येच्या प्रचंड वेदीवर सुरू केल्यावर अखिल खिश्चन जग स्तिमित व्हावे ह्यात नवल कसलें ? प्रामाणिक खिस्तानुयायावर तर या प्रयोगाचा परिणाम विलक्षण झाला. खिस्ताचीं तत्त्वे पिढ्यानूपिढ्या ते पढत होते; पण तीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याची पाळी आली तेव्हा खिस्तानंतर थोड्याच काळात त्यातून त्याच्या पूर्वजानीं अनेक पळवाटा काढल्या, संहारक लढायार्चे समर्थन केलें व गुलामाच्या व्यापारास पाठिंबा देण्यासहि कमी केले नाहीं. पण ख्राईस्टचीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवणारा असा एक आधुनिक धर्मवीर हिंदुस्थानात अवतीर्ण झालेला पाहून प्रामाणिक खिस्ती त्याना उघडपणे आधुनिक कालातील पुण्यश्लोक पुरुषश्रेष्ठ म्हणावयास तयार झाले. किंबहुना अखिल जगात आजच्या काळीं एकच एक नाव घेण्यासारखी विभूति कोणती असा प्रश्न टाकल्यास ती विभूति महात्माजी होय असें निःसंदिग्ध उत्तर देणारेहि पुष्कळ विचारवंत पाश्चात्यामध्यें सापडतील. मात्र महात्माजींचा हा पाश्चात्याच्याकडून होत असलेला गौरव महात्माजी ख्राइस्टमान्य अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार करीत आहेत या कल्पनेनें मुख्यतः होत आहे हें आपण विसरू नये.

भारतीय सस्कृतीकडे नुसत्या कौतुकानेच नव्हे तर थोड्या आशावादीत्वानें बघण्याचें आणखी एक कारण म्हणजे पाश्चात्य सस्कृतींत शास्त्रीय प्रगतीमुळें उत्पन्न झालेला निस्सीम जडवाद व सामाजिक जीवनात उद्भूत झालेला असतोष हें होय. यात्रिक प्रगतीनें खेडीं उजाड केलीं, शहरें कोदटलीं, बेकारी व दारिद्र्य वाढविले वगैरे प्रकार पाहून आपली खरोखरच प्रगति होत आहे काय याविषयीं पुष्कळाना शंका येऊ लागली. काहीं ह्या देखाव्यानें घाबरून गेले व त्यानीं या सर्व आपत्तीचे खापर भौतिक सुधारणाच्या माथीं मारलें. अशा स्थितींत मनाला शाति कशानें मिळेल याच्या शोधात असता उच्च प्रकारच्या भारतीय तत्त्वज्ञानाकडे त्याची नजर गेली व हरपलेले श्रेय गवसल्याचा आनद त्याना झाला, आणि मग पाश्चात्यानीं भारतीय संस्कृतीचे गोडवे गाण्यास प्रारंभ केला.

जितांचा गौरव !

संस्कृतीच्या संग्रामात जेत्यानीं जिताच्या संस्कृतीचा गुणगौरव करावा

हा देखावा अपूर्वच ! या गुणगौरवाचे श्रेय भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वास आहे हें तर खरेच, पण आनुषंगिकरीत्या नवोदित यांत्रिक भौतिक सुधारणेनेंहि या गुणगौरवास हातभार लावला आहे हे कबूल केले पाहिजे. पाश्चात्यानीं आफ्रिका अमेरिका काबीज केली तेव्हा त्याना तेथे जे नीग्रो व इंडियन लोक आढळले ते पाश्चात्याच्यापेक्षा फारच हलक्या दर्जाचे होते. इतके कीं अगाला रंग फासून नग्न हिंडावे, नाका-कानातून हाडाचे दागिने घालावे व कच्चे मास खाऊन खोपटात वस्ती करावी. आशियाखडहि याच जातीचे असेल अशी अजाणत्या पाश्चात्याची कल्पना असे; व अजूनहि हिंदुस्थानात गाधी व वाघ राहतात एवढीच हिंदुस्थानविषयक माहिती असणारे इसम थोडे नाहींत. अजूनहि हिंदु हा रानटी ही आपली मानीव कल्पना उगाळीत बसण्यात आनंद मानणारीं इंग्रजी मासिके अर्धनग्न भिल्ल-कातकऱ्याची व झाडाला उलटे टागून घेणाऱ्या 'साधूं'चीं चित्रे हिंदूंचे प्रतीक म्हणून कुचेष्टेने नित्यशः छापीत असतात. पण हिंदु संस्कृतीचा अभ्यास सखोल होऊं लागल्यावर कुचेष्टा कोळपली आणि गौरवाची प्रभा फाकू लागली. वॉरन् हेस्टिंगने गीतेचे महत्त्व ओळखून १७८४ मध्ये विल्किन्सने केलेल्या भाषांतराच्या पुरस्कारात लिहिलें कीं, 'ब्रिटिश राजवटीची आठवण देखील बुजून जाईल त्या काळीं हिंदूंचें वाङ्मय टिकून राहील.' रस्किनसारख्या तज्ज्ञानें हिंदु-कलेचा उल्लेख केला तो नुसत्या तुच्छतेनें ! प्रण अजिंठा वगैरे ठिकाणच्या कलेचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर हॉवेलसारख्यानीं जो अभिप्राय दिला त्यानें रस्किनच्या दुष्ट मताचें पुरेपूर उसनें फेडले. अजिंठ्याविषयीं हॉवेल लिहितो कीं, 'अखिल जगातील कलाचा विचार केला तरी असेच म्हटलें पाहिजे कीं चित्र, शिल्प व वास्तु या तिन्ही कलाचा मोहक संवाद अजिंठ्यामध्ये परिणतावस्थेस गेलेला आढळतो तसा तो इतरत्र क्वचित्च पाहावयास सापडतो.'

संस्कृत काव्य व शास्त्रीय वाङ्मय यानीं अनेक सहृदय पाश्चात्यांच्या हृदयाची पकड फार अल्प काळात घेतली. शाकुंतल वाचून गटेनें उद्गार काढले ते सर्व सुशिक्षिताना परिचित आहेत. तो उद्गारला कीं, "अनेक सुखाच्या पक्वान्नाचें ताट एकत्र वाढलेलें मिळाल्यानें जो आनंद होतो तो

मला शाकुंतल वाचल्यानें झाला. नूतन वर्षाच्या तारुण्यागमीं प्रकट होणारे वृक्षलताचे मोहोर व फुलोरे आणि त्याच वर्षाच्या उतारपणात उतरलेले परिपक्व फळाचे घोस व लोगर हीं कधीं एकत्र पाहावयास मिळतील काय ? नेत्राना सौंदर्य, अन्तःकरणाला आनंद, रसिक रसवंतीला मेजवानी, आणि ज्ञानक्षुधेला पौष्टिक अन्न हीं एकाच वेळीं एकाच पदार्थापासून लाभलेलीं कोणाला कोठें कधीं पाहावयास सापडतील काय ! तसेच स्वर्ग आणि पृथ्वी येथे मिळणारीं भिन्न सुखें एकत्र कधीं गवसतील ? पण तीं खरोखरच मला एकत्र गवसलीं. कोठें म्हणून थोडें अश्रद्ध आश्चर्याने तुम्ही विचाराल तर सागतों कीं शाकुंतल नावाचें नाटक आहे ना ? ते वाचा म्हणजे हीं सर्व सुखें तुम्हाला एकत्र आढळतील. या सर्व सुखसंमेलनाचा एकत्र निर्देश करावयाचा तर शाकुंतलाचें नुसतें नाव घेतले म्हणजे पुरें !"

मनुस्मृति वाचून नित्शेचीहि अशीच अवस्था झाली. समाजाला कडक शिस्त लावून देणारा पुरुषश्रेष्ठ हा जो त्याचा आदर्श तो मनूच्या रूपानें भरतखंडात साक्षात् अवतरला होता असें मनुस्मृतीतील वर्णाश्रमधर्माची कडक शिस्त पाहून नित्शेला वाटले. तो लिहितो, "मनुस्मृति वाचून माझा तर असा ग्रह झाला आहे कीं, आमच्याकडील नीतिशास्त्राचे नियम हे भारतीय नियमाची नुसती प्रतिकृति होत, किंवा विकृति म्हटली तरी चालेल. ते वाचून खुद्द ग्रीक प्लेटोदेखील एखाद्या ब्राह्मणाचा चुणचुणीत चेला असावा असे वाटूं लागतें. आणि ज्यू लोकाविषयीं म्हणाल तर मनुस्मृतीच्या अभ्यासकाना ते शुद्ध चाडाळ आहेत असें म्हणावेंसे वाटेल."[१] तो अन्यत्र लिहितो कीं, मनुस्मृतीच्या शेजारीं नवा करार ठेवला म्हणजे तो किती भिकारडा दिसूं लागतो, व ह्या करारांचें एकंदर वातावरण किती कुबटलेलें दिसूं लागते[२] !

दुसऱ्या एका ग्रंथांत तो लिहितो कीं मीं जेव्हा मनुस्मृति हा ग्रंथ वाचला तेव्हा माझ्या मनात ज्या भावना उद्भवल्या त्या बायबलच्या

१. World as Will या ग्रंथाची प्रस्तावना.
२. The Twilight of Idols.

वाचनाच्या अगदीं उलट. हा ग्रंथ इतका उच्च दर्जाचा आणि अलौकिक बुद्धिमत्तेचा दर्शक आहे, कीं त्याचे बायबलच्या बरोबर एका श्वासात नाव उच्चारणें हें देखील तत्त्वाच्या विरुद्ध पाप केल्यासारखें होईल... या ग्रंथात जीवनाबद्दल महान् आदर दर्शविला आहे. ज्या सर्व गोष्टी ख्रिस्ती धर्म गावढळपणे दडपून टाकतो – प्रजोत्पादन, स्त्री, विवाह – त्या सर्वांचें मनुस्मृतींत गभीरपणे विवेचन करण्यात आलें आहे. ... मला तर मनूच्या ग्रथाव्यतिरिक्त दुसरा ग्रंथच माहिती नाहीं, कीं ज्यात स्त्रीविषयीं प्रेमपूर्ण व दाक्षिण्ययुक्त अशीं इतकीं विपुल वचनें पाहावयास सापडतील. या वृद्ध केस पिकलेल्या ऋषिवर्यांना स्त्रियांचें कौतुक करण्याचें असे काहीं कौशल्य आहे कीं त्याला जगात तोडच नाहीं.[1]

शोपेनहाउर या जर्मन तत्त्वज्ञाला उपनिषदाचा पर्शियनमधून लॅटिनमध्ये केलेला तर्जुमा वाचावयास सापडला. तेवढा वाचूनच त्याला हरपलेले श्रेय गवसल्याचा आनंद झाला. त्याने धन्योद्गार काढले कीं "ससारात माझ्या मनाला शाति मिळाली असेल तर उपनिषदानींच, आणि अंतीं मरणकालीं शाति मिळणार असली तर ती त्यानींच मिळेल."[2]

मॅक्समुल्लरचेहि उद्गार असेच उत्कट आहेत. तो लिहितो कीं, "तत्त्वज्ञानाचा अर्थ सुखमय मृत्यूचें साधन असाच असेल तर मला वाटते कीं, ही सिद्धावस्था प्राप्त करून देण्यास वेदान्ताइतके दुसरे कोणतेंच तत्त्वज्ञान समर्थ नाहीं. काळ्याचे पाढरे केस होईपर्यंत मीं अनेक धर्मांचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला परतु इतके तेजस्वी व आत्मारामाला सुखविणारे दुसरे धर्मतत्त्व मला आढळले नाहीं."

संताना मारहाण करण्याकरिता येताना यावे आणि त्याच्या प्रभावानें मोहित होऊन त्याचा अनुग्रह म्हणून माळ घालून परत जावे असे चमत्कार संतचरित्रात आपण वाचतो. तसाच काहींसा प्रकार येथेहि झालेला दिसतो. कुचाळी करण्याकरिता आले आणि कीर्ति गात गेले असा प्रकार भारतीय संस्कृतीच्या निंदकात घडून आला आहे !

---

१. ख्रिस्तातक पृ. १४५, १४७.

२. दासगुप्त : हिंदु तत्त्वज्ञानाचा इतिहास ख. १ पा. ४०.

पण संगमावरील हा देखावा नुसत्या परस्परनिंदास्तुतींच्या उसळत्या लाटांनीं परिपूर्ण होत नाहीं. पाश्चात्यातील काहीं विचारवंत हे अलीकडे स्वतःच्या संस्कृतीची निंदा करूं लागले आहेत ! हे निंदेचे सूर कानीं पडले कीं विचारप्रवाहात भोंवरे उत्पन्न होतात. तिकडे आता नजर देऊं या.

प्रकरण चवथें

विचारांचे भोंवरे

जित आणि जेते यामधील भावनोद्रेकाच्या या विलक्षण आघात-प्रत्याघाताकडे पाहत असता विवेकानें कोणती भूमिका स्वीकारावयाची? आघात-प्रत्याघाताचे हे उलटसुलट तडाखे पाहून साहजिकच मन गोंधळून जातें. सगमावरील या लाटा अवलोकित असता प्रवाह जाणार तरी कोणत्या दिशेला याची कल्पनाच बाधता येईनाशी होते. वर चर्चिलेल्या संगमावर तर अनेक निरनिराळ्या विचारप्रवाहाची गर्दी उसळलेली दिसते. हिंदु संस्कृतीची निंदा करणारे पाश्चात्य आहेत, हिंदु संस्कृतीची निंदा करणारे हिंदुपुत्रहि आहेत, हिंदु संस्कृतीचे पोवाडे गाणारे हिंदुपुत्र आहेत आणि हिंदु संस्कृतीचे पोवाडे गाणारे पाश्चात्यहि आहेत. पाश्चात्य संस्कृतीची निंदा करणारे भारतीय आहेत आणि पाश्चात्य संस्कृतीची निंदा करणारे पाश्चात्यही आहेत. पाश्चात्य संस्कृतीचे गुणगान करणारे पाश्चात्य आहेत आणि पाश्चात्य संस्कृतीचे गुणगान करणारे पौर्वात्यहि आहेत. अशी ही मतमतांची मोठी गल्लत माजलेली आहे.

भारतीय संस्कृति ही एकजात रानटी, सडलेली, बुरसलेली आहे असें मिस् मेयो किंवा विल्यम आर्चरसारखे भाडोत्री लेखक एका बाजूस शिरा ताणून सांगत आहेत तर दुसऱ्या बाजूस गटे, शोपेनहारासारखे कवि आणि तत्त्वज्ञ हिंदी संस्कृतीमधील अमृत पिऊन आपणास अलौकिक समाधान झाल्याची ग्वाही देत आहेत. मानवी संस्कृतीला सध्या पाश्चात्य राष्ट्रात जें स्वरूप आलें आहे तें तिचें उच्चतम स्वरूप असून त्याचा फैलाव सर्व जगभर जितक्या लवकर होईल तितका पृथ्वीवरील

देवाच्या राज्याचा काळ जवळ येईल असे प्रतिपादन करीत पाश्चात्य राष्ट्राचे शेकडो, हजारों धर्मोपदेशक 'रानटी' देशातून फिरत आहेत, तर मॅक्स नॉर्डू, कार्पेंटर, स्पेंग्लरसारखे काहीं पाश्चात्य विद्वान् हे पाश्चात्य संस्कृति ही मरणाचे पंथास लागली आहे असे गंभीरपणें बजावीत आहेत. पाश्चात्यांचें हिंदुस्थानवर राज्य सुरू झालें आणि पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार येथें जारी होऊं लागला ही केवळ त्या दीनवत्सल दयाधन प्रभूची कृपा होय असें काहीं ब्राह्मो व प्रार्थनासमाजी पडित प्रवचन करीत आहेत, तर पाश्चात्य सस्कृति ही केवळ आसुरी व राक्षसी संस्कृति असून तिच्या छायेंतून भारतीय जितके लवकर सुटतील तितका त्याचा माग्योदय नजीक येईल असा मंत्रजागर सनातनी मंदिरातून चालू आहे.

या हेलावणाऱ्या सागरावर भारतीय माग्योदयाचें तारूं हाकारावयाचें तर या परस्परविरुद्ध विचारसरणींच्या खालीं लपलेले खडक पारखून टाळले पाहिजेत आणि वर्धमान मानवी संस्कृतीच्या ध्रुवताऱ्यावर दृष्टि रोखून मार्ग आक्रमण केला पाहिजे.

पाश्चात्य संस्कृतीशीं जी आज आपली गाठ पडली आहे ती, ही संस्कृति आपलें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेणाराची संस्कृति अशा नात्याने पडली आहे. तशी ती पडती ना तर या संस्कृतीची योग्य ती पारख करणें आजच्यापेक्षा पुष्कळच सुलभ झालें असतें. पण आज पाश्चात्य संस्कृति ही जेत्याची म्हणून येथें नादावयास आली असल्याने तिच्या गुणावगुणाची खरी पारख करणें अवघड होऊन बसलें आहे. काहीं नातींच अशीं असतात, कीं त्यामध्यें खुलेपणा, मनमोकळेपणा, उत्पन्न होऊच शकत नाहीं. सासू-सुनेचें नातें व मालक-मजूर हीं नातीं अशींच होत. या दोहोंपेक्षाहि कठीण नातें म्हणजे जित आणि जेते यांचें. या नात्यात दोघांनाहि एकमेकाच्या हृदयाची ओळख होऊं शकत नाहीं. गुलामाच्या दंडाला साखळीचें एक टोक बाधलें गेलें कीं तिचें दुसरे टोंक मालकाच्या मनगटाला बाधलें जातें असें म्हणतात. जित आणि जेते हा संबंधच असा आहे कीं या संबधानें बाधलेल्या दोन्ही पक्षाना स्वतःचा पक्ष व परपक्ष हे दोन्ही विकृत रूपात दिसूं लागतात. अशा वेळीं स्थिर, विवेकी दृष्टीनें निरीक्षण केलें पाहिजे.

जित आणि जेते याच्यामध्यें आघात-प्रत्याघात कसे नानाप्रकारचे होतात तें आपण पाहिलें. पण ते एका बाजूनें निंदा आणि दुसऱ्या बाजूनें त्या निंदेला प्रत्युत्तर अशा स्वरूपाचे असल्यामुळें ते दोन्ही एकमेकावर आदळून फुटून नष्ट होतात. ही निंदा आणि तिची प्रतिक्रिया याच्यामुळें विचारसरणींत भोवरे किंवा आवर्त उत्पन्न होत नाहींत. विजयी पाश्चात्य आपली निंदा करितात तेव्हा त्याचे निंदेचे बोल हे विजयाच्या उन्मादातून निघालेले म्हणूनच उन्मत्ततेचे असतात हें आपण गृहीत धरूनच चालतों. तसेंच याची प्रतिक्रिया म्हणून आपल्या संस्कृतीचा अवास्तव बडेजाव जेव्हा आपण गाऊं लागतो तेव्हा तो उन्मत्त निंदकाच्याही चागला कानात शिरावा म्हणून मुद्दाम तारस्वरात गावा लागतो याची जाणीवहि आपणाला असते. म्हणूनच या परकीय निंदेच्या आणि स्वकीय स्तुतीच्या लाटा कितीहि जोराने उसळल्या तरी त्या एकमेकावर आपटून स्वतःच विलीन होतात.

पण विजयी असे जे परकीय ते जेव्हा आपल्यासारख्या जित संस्कृतीचा गुणगौरव गाऊं लागतात, तेव्हा त्या गुणगौरवाकडे विशेष बारीक दृष्टीनें पाहणें जरूर पडतें. या गौरवापैकीं आपल्या संस्कृतींतील खऱ्या गुणाबद्दल केलेला गौरव निःसंकोचपणें स्वीकारण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं; किंबहुना तो स्वीकारून त्याचा अभिमान न बाळगणें हें करंटेपणाचे ठरेल. उदाहरणार्थ, आपल्या तत्त्वज्ञानातील व ललित-वाङ्मयातील सुंदर स्थलाच्या दर्शनानें मोहित होऊन शोपेनहार व गटे यानीं जे गौरवोद्गार काढले ते निःसंकोचपणें स्वीकारण्यास हरकत नाहीं. पण नीत्शे जेव्हा मनुस्मृतींतील समाजधारणाविषयक नियमाचीं स्तोत्रें गातो त्या वेळीं त्याचा आशय नीट समजून घेणें आवश्यक होतें. नीत्शेनें मनुस्मृतीची वाखाणणी केली ती मनुस्मृतीचे सर्व नियम त्याला पसंत होते म्हणून नव्हे, तर त्या नियमांची कडक अमलबजावणी करण्याबद्दल मनुस्मृतींत जो कटाक्ष दिसून येतो त्याबद्दल व विशेषतः श्रेष्ठ वर्णाचे श्रेष्ठत्व ठासून प्रतिपादन केल्याबद्दल. सर्वच बाबींत नीत्शे हा मनूशीं सहमत आहे म्हणून नव्हे. मनूच्या स्वप्नींहि नसतील अशा कांहीं गोष्टींचा नीत्शेनें उघड पुरस्कार केला आहे. त्यापैकीं एक प्रमुख गोष्ट म्हणजे प्रायोगिक विवाह

किंवा अलीकडच्या भाषेंत सागावयाचें म्हणजे सहवासोत्तर विवाह ही होय. तसेच संस्कृत वाङ्मयाचे माहात्म्य पाश्चात्य पंडित जे गातात तें माहात्म्यहि पुष्कळ वेळा या वाङ्मयाच्या ऐतिहासिक उपयुक्ततेला अनुलक्षून असतें; त्यातील विचारसम्पदा आजच्या काळीं उपयोगी पडणारी आहे या भावनेनें नसते हेंहि ध्यानात वागविले पाहिजे.

भारतीय संस्कृतीच्या या स्तुतीबरोबर पाश्चात्य लेखक जेव्हा स्वतःच्या संस्कृतीची निंदा करूं लागलेले आढळून येतात तेव्हा तर विचारात विलक्षण मोवरे उत्पन्न होतात. वर उल्लेखिलेल्या नीत्शेने नुसते मनूचे गोडवे गाइले आहेत इतकेच नव्हे, तर त्याचा स्वतःचा धर्म जो खिस्ती धर्म त्याची त्याने निंदा केली आहे, आणि तीहि अगदीं गाळीव शेलक्या शब्दात. 'खिस्ती धर्म हा मानवी संस्कृतीवरील एक कलंक होय' हे त्याचे शब्द. नीत्शे लिहितो कीं "खिस्ती धर्म हा नेहमी जे कांहीं दुर्बल, नीच, पंगू असते त्याच्या वतीने बोलतो. बलसपन्न अशा जीविताच्या आत्मसंरक्षक भावनाचा द्वेप करणे हेंच त्याने आपले ध्येय धरलें आहे. ... जे मरणाच्या दारी बसले आहे त्याचे दया ही रक्षण करूं पाहते पण या आमच्या आधुनिक रोगट जीवितात दयेपेक्षा अधिक आरोग्यविघातक असे दुसरे काही नाहीं." (खिस्तातक)

खिस्ती धर्मांतील नीत्शेला वाटणाऱ्या अनेक दोषाचा परामर्श घेऊन खिस्तातक या ग्रंथाच्या शेवटीं खिस्ती धर्माविषयीं आपला निर्णय जाहीर करिताना तो लिहितो कीं "आता हें परीक्षण संपवून मी आपला निकाल जाहीर करतों. माझ्या मतें मनुष्याला जेवढ्या म्हणून भ्रष्टतेच्या प्रकाराची कल्पना करिता येईल त्या सर्वांत हा धर्म अग्रेसर आहे. स्वतःला चिरस्थायी करण्याकरिता या धर्मानें दुःखाच्या अवस्था निर्माण केल्या. उदाहरणार्थ, पाप नामक रोगजंतु. या दुःखाची मानवजातीच्या संपत्तींत भर टाकण्याचें कार्य प्रथम खिस्ती चर्चनें केलें. खिस्ती धर्म हा एकच महाशाप आहे असें मी समजतों. त्याला विषारी साधनें वापरणें व नीच युक्त्या अवलंबणें याबद्दल काहींच दिक्कत वाटत नाहीं. माझें तर मत आहे कीं खिस्ती धर्म हा मनुष्यजातीवरचा कधीं पुसला न जाणारा असा

काळाकुट्ट डाग आहे."[1] असले उद्गार बेतालपणाचे असतात हें सांगावयास नकोच.

पण दुसरे कांहीं गंभीरपणें लिहिणारे तत्त्वज्ञ आहेत त्याचेहि विचार पारखूनच घेतले पाहिजेत. हे ग्रंथकार म्हणजे शे-दीडशे वर्षांपूर्वी अवतीर्ण झालेल्या यांत्रिक व शास्त्रीय युगाविरुद्ध हाकाटी करणारे ग्रंथकार होत. या यांत्रिक युगात शहरात राहणाऱ्या लोकसंख्येची बेसुमार वाढ झाली, त्यातील राहणी गलिच्छ व आरोग्यविघातक झाली, त्यातील नीतिभत्ता खालावली, बेकारी वाढली वगैरे दोष कोणालाहि दिसण्यासारखे आहेत. पण या दोषाचा उगम यंत्रात नसून मनुष्याच्या लोभी मनोवृत्तींत आहे हें विसरून सर्व दोषाचें खापर यंत्राच्या माथ्यावर फोडण्याचेच व्रत या ग्रंथकारानीं स्वीकारलेलें असतें. गिरण्यातील धुराने शहरे काळींकुट्ट झालेलीं पाहून इंग्रज कलाकोविद रस्किन यानें पाऊणशें वर्षांपूर्वीच वैतागाचे उद्गार काढले होते. तथापि याच गिरणींच्या काळ्याकुट्ट धुरातून आर्थिकदृष्ट्या सोन्याचा धूर निघू लागल्यामुळें रस्किनसारख्याच्या तक्रारीकडे कोणीं फारसे लक्ष दिले नाहीं. किंबहुना, पाश्चात्य राष्ट्रे हीं धुरातून प्रकाशाकडे वेगानें आक्रमण करीत आहेत असाच सूर सर्वत्र लावला गेला. पण चौदा सालच्या महायुद्धानें कांहीं विचारवंताना आपला हा सूर विसंवादी आहे याची तीव्र जाणीव झाली. आणि मग लंबक दुसऱ्या टोकास जावा त्याप्रमाणे पश्चात्तापदग्ध स्वरात ते म्हणूं लागले, "प्रगतीच्या पुष्पोद्यानातून आमचा रथ चालला आहे अशा भ्रमात आम्ही होतों, पण अवनतीच्या काट्याकुट्यातून चाललों आहोंत हें आतां जितकें लवकर उमगूं तितकें चांगलें."

हा सूर लावणाऱ्याचा प्रतिनिधि म्हणून इंग्लंडमधील एक नामांकित साहित्यिक व धर्माचार्य डीन ईंग याचा निर्देश करता येईल. पहिल्या महायुद्धापूर्वी ते एक धर्मनिष्ठ गूढवादी म्हणून प्रसिद्ध होते, व त्यांचें लिखाण अध्यात्म व धर्म या विषयाना अनुलक्षूनच असे. यापूर्वी सामाजिक

१. Anti-Christ, मराठा भाषांतर श. रा. राजवाडेकृत ख्रिस्तांतक नांवाचें. पृ. १७३.

जीवनाकडे त्यानीं लक्ष दिलें नव्हतें– देणें त्याना आवश्यक वाटलें नव्हतें. महायुद्धाच्या पूर्वी मानवी संस्कृतीची प्रगति होत आहे अशीच इतराप्रमाणें त्याचीहि भावना होती. पण युद्धानें जेव्हा अनेक कटु सत्ये उघडकीस आलीं तेव्हा आचार्य ईंग हे खडबडून जागे झाले, आणि मग आपल्या समाजाचा रथ मलत्याच मार्गावर जात चालला आहे याकडे लोकाचें लक्ष वेधण्याकरिता त्यानीं दोन तीन वर्षें सतत लेखणी चालविली आणि आपले हे नवे विचार 'निर्भीड बोल'[1] या नावाने दोन खंडामध्ये प्रसिद्ध केले. युद्धातील संहारक हत्यारे व भीषण प्राणहत्या यानीं पूर्वीच्या प्रगतीच्या मानवी कल्पनेला चागलाच धक्का दिला. मनुष्यस्वभावामधील पाशवी अश कोणत्याहि तऱ्हेने कमी झालेला नसून उलट वाढत चाललेला नाहीं ना अशी शंका डिवचू लागली. या सर्व परागतीचें कारण भौतिक शास्त्रांची व यात्रिक कलेची वाढ हे होय असे धर्माचार्य ईंग यानीं प्रतिपादन केले. ते लिहितात कीं, 'यात्रिक शक्तीचा हा रोग समाजशरीराच्या आता अगदीं हाडापर्यंत जाऊन पोहोचला आहे, आणि म्हणूनच कदाचित् तो आता निर्मूलन झालेला पाहावयास सापडेल असे वाटूं लागले आहे. शे-दोनशे वर्षे लागतील या गोष्टीला; पण त्यानतर मात्र आजचीं कोदटलेलीं शहरे नाहींशी होऊन पुन्हा आपले वंशज पूर्वीप्रमाणें शेतीमातीवर निर्वाह करूं लागतील.' याच सुमारास ऑस्टिन् फ्रीमन् याने 'समाजाची अधोगति आणि पुनरुज्जीवन' या नावाचा ग्रथ लिहिला आहे. या फ्रीमननें तर यंत्रनिष्ठ औद्योगिक विकासातील जितके म्हणून दोष दाखविता येतील तितक्याची मोठी थोरली यादीच्या यादी केली आहे. पण या सर्वांवर त्यानें उपाय सुचविला आहे तो मात्र इतकाच कीं, काहीं थोड्या शहाण्या लोकानीं आपली एक संस्था स्थापावी आणि त्यानीं आजच्या औद्योगिक सुधारणेवर कडक बहिष्कार घालून प्राचीन काळातल्याप्रमाणे एकमेकाच्या सर्व गरजा अंगमेहनतीनें कष्ट करून भागविण्याचें ठरवावें ! आचार्य ईंग यानीं यावर असें मत दिलें आहे कीं, खुद्द इंग्लंडमध्ये अशा प्रकारची संस्था आजमितीस चालणें शक्य नाहीं. पण न्होडेशिया, टास्मानिया अशा ठिकाणीं जरूर तेवढी जागा खरेदी करून वरील वृत्तीनें राहणाऱ्या लोकाची वसाहत

१. Outspoken Essays.

स्थापन करण्याचा प्रयोग अवश्य करून पाहावा. ईंगसाहेबांनीं आजच्या अनैसर्गिक राहणीविरुद्ध स्वतः जो उपाय सुचविला आहे तो म्हणजे घरोघरीं चरखा फिरविण्याचा होय. उद्योगी आणि चुणचुणीत जपाननें पाश्चात्याच्या पावलावर पाऊल टाकून त्याच्या तोलाची औद्योगिक सुधारणा आपल्या राष्ट्रात घडवून आणली. या जपानच्या अधःपाताबद्दल आचार्य ईंग याना फार खेद होत आहे. ते लिहितात, 'जपाननें आपली पूर्वीची सुंदर आणि रम्य अशी संस्कृति सोडून देऊन पाश्चात्याच्या अनुकरणानें गलिच्छ आणि पाशवी रूप आपणास प्राप्त करून घेतलेलें आमच्या डोळ्यापुढें दिसत आहे.' पण शास्त्रज्ञाना वश झालेल्या यांत्रिक शक्तीला आता टाकून देणेंहि शक्य नाहीं याची जाणीव ईंगसाहेबाना आहे म्हणूनच या विषयावरील आपल्या निबंधाला 'प्रगतीचें कोडे' असे अन्वर्थक नांव त्यानीं दिले आहे.

दुसरा एक ग्रंथकार एडवर्ड कार्पेंटर यानें अशाच विचारसरणीचा ग्रंथ लिहिला असून, ग्रंथाला नाव दिले आहे तेंच मुळीं 'सुधारणा, तिचें कारण व तीवरील उपचार' असे दिलें आहे. अर्थात् त्याच्या मताप्रमाणें आज ज्याला आपण सुधारलेली संस्कृति म्हणतों ती सुधारणा नसून तो एक प्रकारचा रोग होय. जर्मन इतिहासमीमासक स्पेंग्लर यानें तर चक्क असें भविष्यच वर्तविलें आहे कीं, पाश्चात्य संस्कृति ही आता साफ मृत्यु-पंथाला लागली आहे. त्याच्या ग्रंथाचें प्रमेयच असे आहे कीं, प्रत्येक संस्कृति ही स्थित्यंतरातून जात जात अंतीं नाश पावत असते. स्पेंग्लरच्या मतें युरोपमध्ये यांत्रिक सुधारणा जारी झाली त्याच वेळेला तिच्या शेवटच्या म्हणजे नाशाच्या अवस्थेस प्रारंभ झाला.[1]

पंधरावीस वर्षांपूर्वीचे हे ग्रंथ झाले. अलीकडच्या एखाद्या ग्रंथकाराचा नामनिर्देश करावयाचा झाल्यास रशियन-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सोरोकिन् याचा करता येईल. त्याने सांस्कृतिक परिवर्तनाची मीमासा या नावाचा मानवी संस्कृतीची मीमासा करणारा एक बडा ग्रंथ चार खंडांत अलीकडे दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पाश्चात्य संस्कृती-विषयीं तो लिहितो, "युरोपियन संस्कृतीच्या अंगाखांद्यावरच मी खेळलों

१. Decline of the West.

असल्यामुळे तिच्यातले दोष मला दिसत असले तरी मला तिच्याबद्दल आपुलकी वाटते. पण ती पक्व होत होत तिला आता वास मारू लागला आहे, यामुळें ती कदाचित् अवनतीच्याहि पंथाला लागेल हे कबूल करण्याचीहि माझी तयारी आहे." मात्र तो पुढे लिहितो, "या अवनतीच्या रात्रीनंतर कदाचित् अधिक उज्ज्वल अशा संस्कृतीची प्रभातहि आपणास दिसूं लागेल."[१]

तात्पर्य, पाश्चात्य संस्कृतीचें पुढें काय होणार याविषयींचे भविष्य काहीं असले तरी आज तिच्यात चिंता वाटण्यासारखे दोष उत्पन्न झाले आहेत असें काहीं पाश्चात्य लेखकच आपणास सागत आहेत. हे दोषहि पाश्चात्य संस्कृतींत यांत्रिक व औद्योगिक सुधारणेमुळे निर्माण झालेले आहेत. म्हणजेच पाश्चात्य संस्कृतीच्या ज्या अवस्थेशीं आपली गाठ पडत आहे त्या अवस्थेतच निर्माण झालेले आहेत. तेव्हा या असल्या संस्कृतीशीं आपणास टक्कर द्यावयाची आहे हें पाहिलें म्हणजे विचारात गोंधळ उडून जावा यात नवल काय ?

आमच्या संस्कृतीवर काळे फासण्याचा उपद्व्याप करीत असता पाश्चात्यानीं स्वतःच्या तोंडासच काळें लागलेलें आहे हे कबूल केलेलें पाहिलें म्हणजे आम्हास आमच्या संस्कृतीविषयीं वाजवीपेक्षा फाजील अभिमान वाटू लागण्याचा संभव असतो. त्यात आणखी आमच्या संस्कृतीचीं उघडपणें स्तोत्रें गाणारे पाश्चात्य आढळले म्हणजे तर आम्हाला अभिमानाचे कढावर कढ येऊं लागतात. हा अभिमान अयोग्य नसला तरी त्याच्या लोढ्यांत आमची चिकित्सकबुद्धि पार वाहून जाणार नाहीं याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. आमच्या संस्कृतीची निष्कारण निंदा करणाराविषयीं जसें जपलें पाहिजे तशी स्तुति करणाराची भूमिकाहि पारखून घेतली पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीने दिपून जाऊन आपल्या संस्कृतींतील प्रत्येक गोष्ट चुकीची असें ओरडत सुटणाऱ्या घाबरट मनोवृत्तीस जसें दटावलें पाहिजे तसेंच पाश्चात्यानीं केलेल्या स्तुतीनें हुरळून जाऊन आम्हाला नवें शिकावयाचें असें कांहींच उरलें नाहीं असा फुकटा तोरा मिरविणाऱ्या मिजासखोर वृत्तीलाहि दोन विवेकाचे वळसे दिले पाहिजेत.

१ Social and Cultural Dynamics by P. Sorokin. प्रस्तावना.

जेत्याच्या संस्कृतीतील गुण उचलणें हा प्रश्न एकंदरींत फार नाजुकच असतो ! तो प्रश्नच आज भारतीयाना सोडवावयाचा आहे !

पूर्वग्रहांना गंगार्पण

तो सोडवावयाचा म्हणजे दोन्ही संस्कृतींचें खरें यथार्थ स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति याच्या स्वरूपाविषयीं आज कांहीं छापीव ठशाच्या कल्पना रूढ झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक, व पाश्चात्य ही आधिभौतिक, होय अशी एक कल्पना आज बरीच रूढ आहे. असल्या कल्पना ह्या वर वर्णिलेल्या क्रियाप्रतिक्रियेच्या हेलकाव्यातून निर्माण झालेल्या आहेत. हेलकाव्यात तरंगाच्या पृष्ठभागावर फक्त फेस व पालापाचोळा तेवढा तरगत राहतो. तो बाजूला सारून त्याच्याखालील जलाशयाची परीक्षा केली पाहिजे.

पाश्चात्य संस्कृतीची व आपली घसट सुरू झाली आहे. पाश्चात्यातील अनेक कल्पना, विचार, आचार आपल्या घरींदारीं येऊन स्थिर होऊं लागले आहेत. त्यातील सर्वांवर बहिष्कार घालणे शक्यहि नाहीं व इष्टहि नाहीं. तेव्हा पाश्चात्यातील इष्ट व प्रगतिपर असे आचारविचार तेवढेच आपल्या पचनीं कसे पाडता येतील व ते पाडूनहि आपलें सत्त्व व वैशिष्ट्य कसे शाबूत राखता येईल याचा विचार झाला पाहिजे.

ह्या विचाराला आपल्या मनोभूमीवर योग्य अशी जागा करून द्यावयाची तर त्या मनोभूमीवर दोन्ही संस्कृतींविषयीं माजलेल्या गैरसमजाचीं काटेरी झुडुपें काढून टाकणें अगत्याचें आहे. अनेक झुडुपाना कात्री लावावी लागेल. पैकीं एक काटेरी कल्पना म्हणजे पाश्चात्य संस्कृति आणि भारतीय संस्कृति या सर्वस्वीं भिन्न होत, त्याचें अधिष्ठान वेगळें, त्याची विकास-दिशा वेगळी, किंबहुना त्याचे बीज अथवा मूलभूत प्रकृति हीच भिन्न आहे ही ती कल्पना होय. दुसरी कल्पना म्हणजे भारतीय संस्कृति ही स्वयंपूर्ण एकजिनसी असून तिचीं पानें, फळें, मुळें हीं सर्व भरतखंडाच्या पार्थिव व बौद्धिक मनोभूमींतच रुजलीं आहेत, फुलली आहेत, पुष्ट झालीं आहेत; तिचा विकास आज हजारों वर्षे तिच्यातील आतरजीवनशक्तीनें होत आलेला आहे व पुढें होईल तोहि तिच्या मूलप्रकृतीच्या प्रेरणेनें होईल; तिच्या जीवनशक्तीला धक्का पोंचलेला नसून अन्य संस्कृतीचें आचारविचाररूपी रक्त तिच्यात

संक्रमित करण्याचें काहींच प्रयोजन नाहीं. तिसरी कल्पना म्हणजे भारतीय संस्कृतीची प्रकृतीच आध्यात्मिक असून आज राजकीय दृष्ट्या ती कोळपलेली दिसली तरी तिला पुन्हा दैदीप्यमती करायचा उपाय म्हणजे तिचा आध्यात्मिक स्फुलिंग पुनश्च चेतविणे हाच होय.

ह्या कल्पना रूढ असल्या तरी त्याचा पाया किती भुसमुशीत आहे हें पाहणे अगत्याचें आहे. संस्कृतिसंगमावरील मोक्याच्या बुडून न जाता तरून तीर गाठावयाचें असेल तर असल्या कल्पनाचीं गाठोडीं नीट सोडून, त्यातील अडगळ फेकून देऊन मनाच्या नौकेवरील अनवश्यक असलेलें ओझें हलके केले पाहिजे. याकरिता पुढील प्रकरणातून पूर्वोक्त कल्पना कशा एककल्ली आहेत, भारतीय हे मोक्षवादी व पाश्चात्य हे भोगवादी ही कल्पना कशी उथळ आहे, भारतीय संस्कृति ही एकजिनसी नसून निरनिराळ्या समाजसघातील आचारविचार एकत्र गुफून कशी बनलेली आहे, भारतीय सस्कृतीच्या सत्पुत्रानीं आध्यात्मिक जीवनाची उच्चतम जोपासना केली असली तरी त्याचे ऐहिक भोगवादी जीवन हें इतर राष्ट्राच्यापेक्षा कोणत्याहि तऱ्हेने कसें निराळें नव्हते, तिचा नंदादीप आज हजारो वर्षे तेवत असला तरी त्यावर काजळी कशी धरली आहे व ती मुद्दाम झाडून टाकणे अवश्य कसे आहे, वगैरे प्रश्नाची चर्चा करून मनावरील रूढ पूर्वग्रहाना रजा देण्याची दिशा दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. हे पूर्वग्रह दूर झाले, आपल्या सस्कृतीचे पूर्वचरित्र ध्यानीं ठसलें, तिनें अनेक भिन्न भिन्न आचाराना, विचाराना पूर्वी आपल्या घरीं नादवून घेतले आहे व पुढेंहि नवीनाना समाविष्ट करण्याची तिच्यात धमक आहे असा विश्वास पटला, म्हणजेच पश्चिमेकडील नवोदित शास्त्रीय संस्कृतीतील खरे गुण आपणास आत्मसात् करता येतील. तरी आता पूर्वोक्त मिथ्याग्रहाची गाठ घेऊन त्याना परिस्थिति समजावून सागून आपलें बाडबिऱ्हाड आमच्या मनोभूमीतून हलविण्यास सागण्याच्या प्रयत्नास लागूं या.

जाता जाता पाश्चात्य व भारतीय संस्कृतीतील जे देखावे वाचकाच्या पुढें माडण्यात येणार आहेत ते कोणत्या कालखंडातील व कोणत्या स्थित्यंतरातील ध्यावेत याविषयींहि दोन शब्द लिहिले पाहिजेत.

भारतीय संस्कृतीची आणि पाश्चात्य संस्कृतीची तुलना करताना या

संस्कृतीच्या कोणत्या कालखंडातील स्वरूपाची तुलना करावयाची ? पाश्चात्य संस्कृति ही ग्रीक संस्कृतीतून उदय पावली असल्यामुळें ती दोन तीन हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातून परिणत होत होत आलेली आहे. भारतीय संस्कृतीचीं स्थित्यंतरें तर कमींत कमी पाच-सहा हजार वर्षांवर पसरलेलीं आहेत असे म्हणावयास हरकत नाहीं. आणि एवढ्या प्रदीर्घ कालखंडातून जात असताना या दोन्ही संस्कृतींमध्ये विचार आणि आचार या दोन्हीचींहि अनेक स्थित्यंतरें झालेलीं आढळून येतात. त्यागवृत्तीची, वैराग्याची, कर्मठपणाची लाट दोन्ही संस्कृतींमध्ये येऊन गेली. भोगवादाची, सुखलोलुपतेची, स्वतंत्र विचाराची अशीहि लाट दोन्ही संस्कृतींत येऊन गेली आहे; म्हणूनच या दोन्ही संस्कृति मूलतः भिन्न होत व एकीला दैवी व दुसरीला आसुरी अशीं त्यांना दिलेलीं छापील ठशाचीं विशेषणेहि निर्मूल होत हेच पुढें आपणास पाहावयाचें आहे. कांहीं गुणावगुण, कांहीं वैशिष्ट्ये, या दोन्ही संस्कृतींत उत्पन्न झालेलीं आहेत, त्याचेहि दिग्दर्शन पुढें येईलच. पण ही वैशिष्ट्ये, या दोन्ही संस्कृति मूलतः, स्वरूपतः, प्रकृतितः भिन्न होत यांचीं दर्शक नसून बदलतीं स्थित्यंतरें व बदलती परिस्थिति ह्यांचीं दर्शक होत. ग्रीसच्या भरभराटीच्या काळात विचारस्वातंत्र्य, सौंदर्याची आवड, आशावादित्व या प्रवृत्तींना वसंतकालचा बहर आलेला होता. रोमच्या काळात शिस्त आणि कायदा याची भर त्यात पडली; पण साम्राज्याच्या उत्तरकालीं सुखलोलुपता आणि सामाजिक वैकल्य याचा अतिरेक होऊन अवनतीचे ढग आकाशात फिरूं लागले. पुढें रोमन साम्राज्य नष्ट झाले; वर्षाकाल प्राप्त झाला; स्वतंत्र विचार, स्वतंत्र कल्पना, याचे किरण लोपले आणि कर्मठपणाची, वैराग्याची, नैराश्याची कुंद हवा सर्वत्र पसरली. कित्येक शतकें या दुर्दिनाचा काल टिकला. त्यानंतर पुनश्च ज्ञानवृद्धीचे, स्वतंत्र कल्पनाचे व विचाराचे किरण फाकूं लागले; वर्षाकालचे दुर्दिन संपून शारदीय ज्योत्स्ना पुन्हा मिरवूं लागली. प्रथम ह्या नवीन विज्ञानाचा प्रकाश ज्योत्स्नेच्या प्रकाशाप्रमाणे परावर्तित स्वरूपाचा होता. मधल्या दुर्दिनाच्या कालखंडांत जें ज्ञान लुप्त झाले होतें तेच पुन्हा पुनरुज्जीवित करण्यात येत होतें. तें आत्मसात् झाल्यानंतर आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा सूर्य पाश्चिमात्य संस्कृतीच्या उमाळ्यावर

उदय पावला. अशा निरनिराळ्या अवस्थातून ही संस्कृति गेलेली आहे.

भारतीय संस्कृतीहि अशाच निरनिराळ्या अवस्थातून गेली आहे. वैदिक-काळीं तिच्यामध्यें नैतिकश्रेष्ठतेसमवेतच निःसंकोच ऐश्वर्यलालसा वावरत होती. पुढील काळात तिच्यामधे दुःखवाद व वैराग्य याचा जोर झाला. विचार-स्वातंत्र्यहि वाढलें. कालांतराने विचारस्वातंत्र्य आणि वैराग्य या दोहोंनाहि विकृत अवस्था प्राप्त झाली आणि इस्लामी आक्रमणाच्या प्रारंभीं भारतीय संस्कृतीला स्थिरावस्था प्राप्त झाली. ती साधारणपणें गेलीं हजार वर्षे चालू आहे असे म्हणावयास हरकत नाहीं. या कालखंडानें सास्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे फेरफार पाहिलेले नाहींत. ही शिलावस्था संपून नवीन विचाराची हालचाल तिच्यात अलीकडे सुरू झाली आहे व पाश्चात्य संस्कृतीला जो नवा घाट आला आहे तशाच प्रकारचा घाट आपल्या भारतीय संस्कृती-लाहि येणार आहे. तेव्हा या दोन्ही संस्कृति निरनिराळ्या अवस्थातून गेल्या आहेत व जात आहेत हे ध्यानीं घेतले म्हणजे या दोन्ही संस्कृतींच्या स्वरूपाविषयींच्या दैवी, आसुरी वगैरे रूढ कल्पना कशा निराधार आहेत, किंबहुना या रूढ कल्पना उलटसुलटहि कशा लावून दाखविता येतील, हें समजण्यास अडचण पडणार नाहीं.

तरी आता पाश्चात्य संस्कृतीचें आध्यात्मिक संस्कृति म्हणून कसें वर्णन करता येईल हें पाहू या.

प्रकरण पांचवें

आध्यात्मिक युरोप

संस्कृतीच्या वर्णनातील एक चिररूढ असा वाक्प्रयोग म्हणजे भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक आणि पाश्चात्य ही आधिभौतिक असें प्रतिपादन करणे हा होय. जे जे काहीं आध्यात्मिक, सात्त्विक, दैवी तें सर्व भारतीय; व जे जे काहीं आधिभौतिक, तामसी, आसुरी तें सर्व पाश्चात्य असे वर्णन करण्याची एक रूढि पडून गेली आहे. जणो काहीं ब्रह्मदेवाच्या दरबारीं दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति याचे वाटप झाले तेव्हा पूर्वोक्त सगळेच्या सगळे गुण हे भारतीयाना बहाल करण्यात आले, व उत्तरोक्त सगळेच्या सगळे पश्चिमेकडे धाडण्यात आले. आपल्या पुराणात मोहिनीची कथा प्रसिद्ध आहे. सागरमंथनातून अमृत जेव्हा बाहेर पडले तेव्हा त्याच्या वाटपाविषयीं देव-दानवात तंटा माजला असता विष्णूने मोहिनीचें रूप घेऊन पूर्वेस बसलेल्या देवाच्या पानीं सर्व अमृत वाढलें. चालू काळीं नवीन पुराण रचण्यास कोणी नवपुराणकार बसला तर तो या कथेच्या धर्तीवर आध्यात्मिक व आधिभौतिक प्रवृत्तींच्या या वाटपावर अशीच सुंदर कथा रचू शकेल.

रूढ कल्पनेप्रमाणें दोन्ही संस्कृतींचें मनश्चक्षूंपुढे चित्र रंगवूं लागलों म्हणजे त्या संस्कृति पुढीलप्रमाणें दिसू लागतील: एक शुभ्र वस्त्र ल्यालेली, तर दुसरी छचोरपणें नटलेली; एक धीरगंभीर मुद्रेने, शालीनतेनें पदर सावरीत मंदमंद पावलें टाकीत जाणारी, तर दुसरी खाडखाड बूट वाजवीत हातीं कुत्र्याची सांखळी धरून तोंडीं उर्मटपणें सिगारेटचा धूर सोडीत चाललेली; एक सुप्रभातीं उठून तोंडानें भूपाळी म्हणत सडासंमार्जन करणारी, तर दुसरी पहाटच्या साखरझोपीं चूळ भरूनहि न टाकता

अंथरुणांतच प्रभातचहा पिणारी; एक पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर आरूढ होणारी, तर दुसरी त्याच चितेवर दुसऱ्या लग्नाचे मांडे भाजणारी; एक कंदमुळें-फळें खाऊन उपासतापास करणारी, तर दुसरी मासाशनाचें अजीर्ण रिचविण्याकरिता मद्याचे घट रिक्त करणारी; एक मृत्युलोकच्या दोन घटका सारून टाकण्यास अधीर झालेली, तर दुसरी शेवटची घटका भरत आली असताहि नव्या संसाराचा हव्यास धरणारी ! ...

ही रूढ कल्पना नुसत्या कल्पनासाम्राज्यातच आहे तोंवर ठीक; पण तिच्याकडे जरा धिटाईने पाहून तिचें खरें स्वरूप निरखून पाहूं लागलात तर मात्र पाहता पाहता ढगातील आकृति नाहींशी व्हावी तशी ती विलीन पावेल. वस्तुस्थितीची साक्ष या कल्पनेच्या बाजूनें पडते का हें मुख्यतः पाहिलें पाहिजे. ती साक्षच घेतली तर ज्या लक्षणामुळें भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक असें तिच्या स्वरूपाचें वर्णन केलें जातें त्याच लक्षणानीं पाश्चात्य संस्कृतीचें आध्यात्मिक असें वर्णन करणे मुळींच कठीण नाहीं हें सहज दाखविता येईल.

प्रथम हें सांगितले पाहिजे कीं आध्यात्मिक आणि आधिभौतिक हे शब्द जेव्हा संस्कृतीचे निदर्शक म्हणून वापरले जातात तेव्हा त्या शब्दांनीं सूचित केलेल्या कल्पना स्पष्ट असतात असें नाहीं. तेव्हा भारतीय संस्कृतीं-तील कोणत्या अंगाकडे पाहून आध्यात्मिक हा शब्द योजिला जातो हें सांगणें कठीण आहे. याचें सामान्य लक्षण म्हणून स्थूल मानानें येवढे म्हणता येईल कीं ऐहिक सुखापेक्षा पारलौकिक सुख, भोगापेक्षा त्याग, प्रवृत्तीपेक्षां निवृत्ति यास अधिक महत्त्व देणें व ईश्वराच्या दयालुत्वावर विश्वास ठेवणे हें आध्यात्मिकतेचे चिन्ह होय. आता तुलनेकरिता आध्यात्मिक म्हणजे हव्य-कव्यजपजाप्यादि कर्मकांडाचें प्रस्थ माजविणारी असें समजायचें काय ? आध्यात्मिक म्हणजे धर्मभोळेपणानें मुहूर्त व शकुन पाहिल्याशिवाय पाऊल न टाकणारी असें मानावयाचें काय ? आध्यात्मिक म्हणजे देहदंडन करून वैराग्यवृत्ति स्वीकारणारी असें जाणावयाचें काय ? अथवा आध्यात्मिक म्हणजे साक्षात्कारानें द्वंद्वातीत अशी ब्राह्मी अवस्था प्राप्त करून घेणें हें अंतिम साध्य मानणारी असें उमगावयाचें काय ? यांपैकीं कोणतीहि

कसोटी लावलीत तरी पाश्चात्य संस्कृतीच्या दोन तीन हजार वर्षांच्या चित्रपटात वा सर्व कसोट्यांना उतरणाऱ्या आचार विचाराची भरपूर सामग्री तुम्हास मिळेल. कशी ती पाहा.

कर्मठ युरोप

युरोपियनाचा कर्मठपणा तुम्हास अवलोकन करावयाचा आहे? तर मग रोमन कॅथॉलिक पंथाच्या एखाद्या मंदिरात वा मठागारात सहज फेरी मारून चार प्रहर काढा, म्हणजे कर्मठकाडाच्या समाराचे जेवढे प्रकार तुम्हाला अवगत असतील तेवढे सर्व किंवा अधिकहि तुम्हाला तेथें पाहावयास सापडतील. आपल्याकडील आश्रमात जसे अष्टौप्रहर स्नान-संध्याजपजाप्य चालू असते तसें त्याच्या मठमंदिरात पहाटच्या काकड-घंटेपासून मध्यरात्रीच्या शेजेपर्यंत प्रत्येक प्रहराला प्रार्थना चाललेली आढळून येईल. देवळात मूर्ति नसली तरी तसबिरीपुढें पूजेअर्चेचे सर्व षोडशोपचार तुम्हास आढळून येतील. निराजनाच्या जागीं मेणबत्त्या दिसतील; लहान लहान घंटा-झाजाच्या ऐवजीं मोठी नारोशंकरी घंटा सारखी टाण टाण करीत असलेली आढळेल; व्यासपीठावर बसून पुराण-संकीर्तन चालण्याऐवजीं उभें राहून शुभवर्तमानप्रसार सुरू असलेला दिसेल, येवढाच फरक!

मठातील दिनक्रमहि कडकडीत आढळेल. ब्रह्मचर्य हें या मठवासीयाचें मुख्य व्रत म्हणून समजले जातें. त्याला आवश्यक म्हणून आहार-निद्रा-दिकाविषयीं कटाक्ष ठेवावा लागतो. कनक आणि कांता हीं कलीचीं मुख्य आयुधें होत असें समजण्यात येऊन ब्रह्मचर्य व निष्काचनता यांची शपथच मठवासीयाना घ्यावी लागते. स्त्रीपाविण्यावर एवढी करडी नजर असते, कीं मठातील जोगीण एकदा मठवासी झाली कीं मठाच्या बाहेर ती सूर्याच्याहि नजरेस पडावयाची नाहीं. उपासतापासाची यादी पाहिलीत तर ती हेमाद्रिलाहि कृतकृत्य वाटेल अशी असते. अहोरात्र जपाकरता मोठी थोरली रुद्राक्षाची माळ कमरेला लटकलेली असते आणि धार्मिक वृत्तीला व वैराग्याला पोषक म्हणून मठातील पुरुषाप्रमाणें स्त्रियांचेंहि मुंडन आवश्यक गणलें जातें.

गूढवाद

आता रोजच्या नित्याच्या व्यवहारात हरघडी, पदोपदी नवससायास, शकुनमुहूर्त पाहून पाऊल टाकणे ही धार्मिक वृत्तीची खूण म्हणत असाल तर असल्या समजुतीचे जाळे आपल्यासारखेच पाश्चात्यांच्याहि सर्व व्यवहाराभोवतीं गुंडाळलेलें आढळून येईल. यःकश्चित् जेवायला बसलें असता काटे-चमचे सरळ न ठेवता एकमेकांवर ठेवलेले पाहून, किंवा चमच्यावर घेतलेलें मीठ खालीं पडलेले पाहून पोटात भीतीचा गोळा उठलेला व चर्या घाबरट झालेली आजीबाई तुम्हास घरोघरीं पाहावयास सापडेल. कोणत्याहि एखाद्या सभेत जमलेल्या मंडळींची संख्या चुकून तेरा भरली तर झाला अपशकुन ! देवदेवस्की, कौल लावणे वगैरे प्रकार आपल्यात आहेत ना ! तसेच ते पाश्चात्यातहि तुम्हास भरपूर सापडतील. मन संशयग्रस्त झाले असता अथवा भविष्यकालात वाकून पाहण्याकरिता देवाला कौल लावणे, अंगात आलेल्या अवसराला प्रश्न करणे हें ग्रीस देशात पूर्वी फार जारी होतें व धूर्त लोक लाच देऊन त्याचा फायदाहि घेत असे हिरोडोटस या इतिहासकाराने लिहूनहि ठेवले आहे. कित्येक वेळेला दोन बलिष्ठापैकीं कोणाला जय मिळेल असा पेचप्रश्न उपस्थित झाला असता देवावरहि 'नरो वा कुजरो वा' करण्याची पाळी येई ! Romans the Greek shall conquer ही प्रसिद्ध नरोकुंजरी सुशिक्षिताना सुपरिचितच आहे.

सरकारी कामकाजातहि शकुनमुहूर्त, अरिष्टशांति याचे प्राबल्य आपल्याकडे आढळते तसेच युरोपच्या इतिहासातहि नमूद आहे. आपल्याकडे मंत्रिमंडळात पुरोहिताला बरेंच महत्त्व असे व त्याचीं जीं कामे याज्ञवल्क्य व कौटिल्य यानीं वर्णिलीं आहेत त्यात राजावरील विघ्ने टाळण्याकरिता व दुष्काळ, रोगराई इत्यादि आपत्तींच्या निवारणार्थ होमहवन करणें हीं मुख्य वर्णिलीं आहेत– 'पुरोहितं दैवमानुषीणा आपदां अथर्वभिः उपायैः प्रतिकर्तारं कुर्वीत' (कौ. अ. ९). रोमन दरबारातहि शकुनादिकांचें बंड असेंच होतें. कोठेंहि नुसती वीज पडली कीं खुद्द दरबारचें काम बंद करण्यांत येई. आणि वीज प्रत्यक्ष पडण्याचीहि आवश्यकता नसे. ती पडली एवढी नुसती बातमी कोणीं तरी येऊन

दरबारात सांगितली म्हणजे पुरे होई! ग्रहण लागणे ही सर्व देशात आपत्ति समजली जात असे. रोमन लोकाची समजूत होती की, अशा वेळीं झाजा वाजवून ढोलकें पिटलें असता चंद्राचें बिंब पूर्ववत् तेजस्वी होईल! मेघाचा गडगडाट व विजाचा चमचमाट हा नेहमींच भीतीचा विषय असे. मेघांचा गडगडाट सुरू झाला म्हणजे त्यापासून रक्षण करण्याकरिता ऑगस्टस् हा राजा घाबरून कातडे पाघरून बसत असे आणि कालीगुला हा राजा तर भीतीनें अंथरुणात डोकें खुपसून बसे. वीज डाव्या बाजूला चमकली तर शुभ व उजव्या बाजूला चमकली तर अशुभ अशी समजूत असे. शिवाय 'वाताय कपिला विद्युत्' या आपल्या म्हणींत चार प्रकारच्या विजेचा विचार आहे तर रोमन लोकात विजेचे अकरा प्रकार मानीत; व त्यांची निरनिराळी शुभाशुभ चिन्हें बसविलीं होतीं! धूमकेतु हा तर आकृतीनेच भयानक. ज्यूलियस सीझरच्या मृत्यूनंतर त्याच्या नावाने सार्वजनिक खेळ चालू असता असाच एक धूमकेतु सात दिवस सारखा दिसत असे. त्याला पाहून लोकानीं तो सीझरचा आत्मा समजून त्याच्या गौरवार्थ एक मंदिरहि उभारलें. भूकंपाचे धक्के बसूं लागले म्हणजे परमेश्वरी कोप समजून त्याच्याकरता मोठीं होंम हवनें केलीं जात. आणि ही सर्व माहिती त्या वेळचा बुद्धिमान् असा इतिहासकार जो प्लिनी त्यानेंच लिहून ठेविलेली आहे.

पाश्चात्यातील प्रायश्चित्ताचे बंड पाहावयाचें असल्यास आगरकरांनी 'अथ आचारप्रकरण' या निबंधात उद्धृत केलेलें पुढील अवतरण पाहा: सेंट कोलंबेनस याची अशी आज्ञा आहे की, "जो कोणी मंतरलेला पाव गमावील त्याला एक वर्षाचें प्रायश्चित्त, जो त्यास डोंगळा किंवा मुंगी लागूं देईल त्याला सहा महिन्याचे, जो त्यास लाल होऊं देईल त्यास वीस दिवसाचें, जो त्याला अवमानाने पाण्यात झुगारून देईल त्याला चाळीस दिवसांचें, आणि ज्याकडून तो ओकून पडेल त्याला वीस दिवसाचें! तसेंच जो कोणी आशीर्वचन होत असता 'तथास्तु' म्हणण्यास चुकेल किंवा जो जेवताना बोलेल किंवा जो चमच्यावर क्रूस काढण्यास विसरेल त्याला सहा फटके दिले जातील!"

आधुनिक कर्मठपणा

धर्मभोळेपणा हा रोमच्या काळाइतका प्राचीन काळींच होता असें नव्हे. राजाच्या स्पर्शानें त्वग्रोग बरे होतात ही समजूत इंग्लंडमध्यें खुद्द जॉन्सनच्या वेळेपर्यंत म्हणजे नुकती दोन शतकांपूर्वीपर्यंत जारी होती. इतकी कीं हा राजस्पर्शाचा सुप्रसिद्ध विधि कोणत्या दिवशीं व्हावयाचा हें प्रीव्ही कौन्सिलच्या बैठकीमध्यें ठरविण्यात येई व त्याची वर्दी लोकांना जाहीर करण्यात येई ! या दिवशीं भोळसटाच्या झुंडींच्या झुंडी राजप्रासादाकडे कशा आशाळभूतपणें लोटत याचें मेकॉलेनें आपल्या इतिहासात मोठें सुरस वर्णन केले आहे. धर्मगुरु व महामहोपाध्याय याची या प्रकाराला संमति असेच पण चागले चागले नाणावलेले डॉक्टर लोकहि ह्या फार्सावर आपला विश्वास आहे असे सांगत ! स्पर्शविधीचा देखावा मोठा भव्य करण्यात येई. जाहीर केलेल्या वेळेची घटिका भरताच राजाच्या भोवतीं अनेक धर्मगुरु मडलाकार उभे राहत व तोंडानें मंत्रघोष सुरू करीत नंतर बायबलांतून मत्र वाचण्यात येई व मग राजेसाहेबांच्या हस्तस्पर्शाचा विधि सुरू होई. जनतेचा विश्वास इतका दाडगा होता व या समारभास गर्दी इतकी मनस्वी उसळे, कीं नुसत्या दुसऱ्या चार्ल्स राजाला एकट्यालाच एक लक्ष रोग्यावर स्पर्शाचा अनुग्रह करावा लागला ! आणि एकदा तर रुग्णसंमर्द एवढा चिकार लोटला, कीं त्या गर्दीत सहा सात लोक पायाखालीं चेंगरून मेले असें मेकॉलेने लिहून ठेवलें आहे ![1]

धर्मभोळेपणाची ही प्रथा अद्यापहि अविच्छिन्न चालू आहे. वीसपंचवीस वर्षांपूर्वी सस्कृत भाषापंडित डॉ. गुणे हे युरोपात प्रवास करून आले. त्या प्रवासाचें जे वृत्त त्यानीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले आहे त्यामध्यें पाश्चात्यांच्या धार्मिक विधींचें आणि कर्मकांडाचें अनेक ठिकाणीं वर्णन आलेलें आहे. रोमच्या एका देवळातील त्यानीं पाहिलेल्या लहान मुलाच्या नामकरणविधीचें वर्णन पाहा. ते लिहितात, "दुपारीं जेथें बाप्तिस्मा देतात तें देऊळ जाऊन पाहिलें. मुख्य गामाऱ्याच्या उजव्या हाताला जो एक गामारा होता त्याच्यापुढें 'बाप्तिस्मा करण्याचा झरा' नांवाचें मोठें पवित्र

१. History of England.

पाण्याचें एक उथळ कुड आहे. मी जातों तोंच पांच लहान लहान अर्भकाचा नामकरणविधि चालला होता. प्रथम उपाध्यायानीं मोठी थोरली जळती मेणबत्ती घेऊन ती प्रत्येक मुलापुढे धरून मंत्र म्हटले. मग जवळील बटूनें हातात धरलेल्या पवित्र अंजनाच्या करंड्यातून अंजन घेऊन प्रत्येक मुलाच्या हनुवटीखालीं, कपाळावर व टाळूवर लावलें. नंतर उपाध्येबुवानीं झऱ्याचे झाकण काढून त्याला दिवा दाखविला व गळ्यातील उपरण्यासारख्या ताब्रड्या पट्ट्याचें अपसव्य करून मुलाचें उघडे डोकें झऱ्यावर धरण्यास सांगितलें. मग त्यातले थडगार पवित्र पाणी त्यानीं मुलाच्या डोक्यावर तीन वेळा ओतीत 'इन नोमे पात्रीसी' वगैरे मंत्र म्हटले. शेवटीं डोके पुसून, मूल गुरवाला घ्यावयास सागून त्याच्या आईला मंत्र म्हणत म्हणत जळती मेणबत्ती पुढें धरण्यास लावले."

देवळातील पूजा-अर्चेचा प्रकार पाहावयाचा असल्यास फ्लॉरेन्समधील एका देवळाचें त्यानीं दिलेलें वर्णन पाहा : "मीं पाहिलेल्या कॅथॉलिक देवळात मला असे दिसले कीं, मुख्य गाभाऱ्याशिवाय आणखी एक कोणत्या तरी बाजूचा मेरीचा गाभारा विशेष पुजला जाऊन त्यापुढें गुडघे टेकून जपत बसलेले लोक हमेशा दृष्टीस पडतात. तसेंच ह्या देवळातहि होतें. विशेषतः तो दिवस रविवारचा असल्यामुळें गाभाऱ्यात व समोरील बाकावर बरीच गर्दी जमली होती. वेळ पुजेची होती असें मला वाटतें. म्हणून एक बटु काळा झगा व कमरेपर्यंत पडणारी पांढरी झालर घालून घंटा व बायबल घेऊन गाभाऱ्यात गेला व मंत्रतंत्र मोठ्याने पुटपुटूं लागला. या गुणगुणण्यानेंच माझें लक्ष तिकडे वेधलें. मुंबईला बाबुलनाथच्या देवळात श्रावणी सोमवारीं गेलें असता दर्शन घेणारास दिंडकीचा बेल बळेंच देणारीं गुजराथी भटाचीं मुलें जशीं हेल काढून 'कैलास गौरं' वगैरे श्लोक बडबडत असतात तसा मला प्रथम भास होऊन मी तिकडे वळलो. आधीं तो बटु काहीं म्हणे. मागून भाविक मंडळी री ओढीत. नंतर तो एखादी ओळ हेल काढून म्हटल्यासारखें करी. काहीं वेळानें हातातील घंटा वाजवून बायबलांतील मंत्र वाची. अशी तालीम बराच वेळ चालली होती. मी तितका भाविक नसल्यानें लवकरच तेथून पाय काढला."

आता ईस्टरचा सण रशियातील खेड्यापाड्यातून कसा पाळतात याची प्रो. गुणे यानीं दिलेली पुढील हकीकत वाचा: "रशियात खेड्यापाड्यातून व शहरातूनहि पुनरुज्जीवनाच्या रात्रीं म्हणजे शनिवारीं रात्रीं बारा वाजता देवळात माणसे जमावयास लागतात. आधीं जमलेलीं माणसे मागाहून येणाराना म्हणतात, 'खिस्त मृतातून उठला आहे' त्यावर 'खरेच का तो पुन्हा जिवंत झाला आहे' असा प्रतिसवाल मागाहून येणारे करतात. अशा रीतीने जितकीं माणसे येतील तितक्यागणिक प्रश्नोत्तरे झाल्यावर प्रार्थना व पूजा होते व सर्वजण आपापल्या घरी जातात. दुसऱ्या दिवशीं खेड्यापाड्यातले सर्व लोक माणसागणिक दोन दोन रंगविलेलीं अंडीं घेऊन उपाध्येबुवाच्या झोळींत टाकतात!"

आता आध्यात्मिक वृत्तीचा आणखी एक प्रकार पाहा. अपराधाची शाबिती नाशाबिती करण्याकरिता अपराध्यास दिव्य करण्यास सांगण्याची आपल्याकडे प्रथा होती व त्याचे कांहीं विधि असत. त्याची वर्णनें आपल्याकडील याज्ञवल्क्य वगैरे स्मृतिग्रंथात आढळतात. या दिव्य करण्याच्या आचारात ईश्वरी न्यायावर श्रद्धा अतएव आध्यात्मिकता मानल्यास असले प्रकार पाश्चात्यातहि मध्ययुगांत राजमान्य समजले जात. हातात तापलेल्या लोखंडाचा गज धरणे किंवा पाण्यात बुडून राहणें अशा प्रकारचीं दिव्ये दहाव्या शतकातील अथेल्स्टन राजाच्या कायदेकानूंतच कशीं मान्य केलेलीं होतीं हें इतिहासात वाचावयास सापडेल.[1] भुतेखेते अंगात येणें, अंगात आलेल्याच्या द्वारे मृतात्म्याशीं सुखसंवाद करणे, प्लँचेट नाचविणें वगैरे प्रकार हे पाश्चात्य देशात केवढ्या प्रमाणावर आजहि चालतात हें मुद्दाम सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. भविष्य व गूढविद्या याना आज अमेरिकेंत केवढी तेजी आहे हें मागील एका प्रकरणांत ढोंगी साधुसंन्याशांचें अमेरिकेंत कसें पीक आलें आहे याची जी हकीकत दिली आहे तिवरून कळून आलेंच असेल. हिंदुस्थानात अलीकडे विशेष गाजलेला गूढवादी पंथ जो थिऑसॉफी पंथ त्याचे प्रणेते व प्रवक्ते पाश्चात्यच आहेत. तात्पर्य, ईश्वरी न्यायावर व अदृश्य, अतर्क्य, गूढ शक्तीवर श्रद्धा ठेवणें हें

१. Social History of England by Morgan.

जर आध्यात्मिकतेचें लक्षण मानलें तर युरोप हा हिंदुस्थानच्या मागे आहे असे काहीं तुम्हास म्हणता यावयाचें नाहीं.

देहदंडन व मनोमुंडन

देहदडन व वैराग्य याना आध्यात्मिक पथात महत्त्वाचे स्थान दिलें जातें. जितके देहदडन उग्र तितकी आध्यात्मिक प्रगति उच्च प्रतीची असें समजण्यात येते. हिंदुस्थानात पचाग्निसाधन करणारे, देहाला वस्त्राचा विटाळहि होऊं न देणारे, कनक व कांता याना विष्ठेप्रमाणे टाळणारे, खिळ्याच्या शय्येवर निजणारे, हात उच ठेवून वाळू देणारे, उपासतापासानीं इंद्रियाना मारून काढणारे हठयोगी क्षेत्राच्या ठिकाणीं तुम्हीं पाहिलेच असतील. या पंथातील अतिरेकी विक्षिप्त गोसाव्याचें वर्णन रामदासस्वामींनीं आपल्या 'जनस्वभाव गोसावी' या स्फुटपद्यात 'पहा गोसावी आमचा। गुखाडींत लोळे।' वगैरे मोठे रेखीव केले आहे तें वाचले असेल. भागवतात ऋषभदेवाचें वर्णन आहे, कीं त्यानें जेथें जेवावें तेथेंच मलविसर्जन करावे; व लोमहस जातकात एका यतीचे वर्णन आलें आहे कीं, तो दिवसा भर उन्हात उभा राही, रात्रीं पाण्यात बसे आणि खाई काय तर गाईचे शेण ! अशा प्रकारें विषयवासनाना मारणें ही उग्र तपश्चर्या व आध्यात्मिक जीवनाचे एक प्रमुख अग समजण्यात येई.

ह्या अंगाचीहि जोपासना तुम्हास युरोपमध्ये केलेली आढळेल. पाश्चात्याचा मुख्य धर्मग्रंथ जो बायबल त्यातील वचनें पाहाल तर संन्यास आणि निष्काचन राहणीवर येशूचा फार कटाक्ष असल्याचें तुम्हास तत्काळ आढळून येईल. 'सुईच्या नेढ्यातून एक वेळ उंट आरपार जाईल, पण धनवान् प्राणी हा स्वर्गाच्या दारातून कधींहि आत जाऊं शकणार नाहीं' अशी येशूची मोठी खणखणीत उक्ति आहे. आणि हें नुसतें कोरडें ब्रह्मज्ञान नव्हते, तर येशूचा हा उपदेश तंतोतत जीवनात आणणारे अनेक धर्मपंथहि पाश्चात्याच्या इतिहासात गाजलेले आहेत. पाश्चात्य म्हणजे नुसते भोगाचे उपासक अशी ज्यानीं समजूत करून घेतली असेल त्यानीं जेसुइट पथासारख्या निष्काचन व फकिरी वृत्तीनें राहणाऱ्या पंथाचा इतिहास चाळावा. या पंथाची स्वार्थत्यागी वृत्ति टिळकांना आदर्शभूत वाटून

त्यानीं आपल्या शिक्षणसंस्था या पंथाच्या धर्तीवर चालवाव्या असे प्रतिपादन केले होते. सत्ताधिष्ठित धर्मपंथाला ख्रिस्ताच्या या खऱ्या निष्ठावत अनुयायीपंथाचा निष्काचनपणा सोसवेना, तेव्हा त्यानें त्याचा छळ केला. तरीहि त्याने आपला वैराग्याचा बाणा सोडला नाहीं. वैराग्यप्रधान दुसरा एक प्यूरिटनाचा पंथ होय. त्या पंथाच्या ताब्यात इंग्लंडमधील राजसत्ता काहीं काल आली होती. त्या अमदानींत नाच-तमाशे, गाणे बजावणे वगैरे करमणुकीच्या व चैनीच्या सर्व साधनावर कायद्यानेंच असा कडक बहिष्कार घातला, कीं उभ्या पंधरा वीस वर्षांत देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत कोठेंहि डफ कडाडला नाहीं कीं कोठेंहि तुणतुणें कुचमले नाहीं !

वैराग्य हे आध्यात्मिक संस्कृतीचे लक्षण समजलें तर ह्या वैराग्याचे विवेकी, अविवेकी असे सर्व प्रकार युरोपातहि भरपूर आढळून येतात. 'न जातु कामः कामाना उपभोगेन शाम्यति' म्हणजे विषयतृष्णा ही विषयोपभोगानें कधींच तृप्त होत नाहीं, उलटी वाढतच जाते; अर्थात् सुखाचा खरा खरा मार्ग म्हणजे इंद्रियदमन होय, एवढीच वैराग्याची मूळ कल्पना. पण या कल्पनेचा विकृत विकास झाला म्हणजे इंद्रियदमनाचे देहदंडनात रूपातर होतें आणि मग देहदंडनाचे शोधता येतील तेवढे विक्षिप्त प्रकार शोधून काढण्यात अहमहमिका सुरू होते. या देहदंडनावरून आध्यात्मिकता मापावयाची असल्यास युरोपला आपले माप भरपूर पटवून देता येईल.

युरोपच्या मध्ययुगातील इतिहास चाळला असता भरतखंडात सापडणारा देहदंडाचा कोणता प्रकार युरोपात सापडत नाहीं म्हणून सागावें ? पंचाग्निसाधन आहे, एका पायावर उभे राहणे आहे, एक हात उंच करून वाळूं देणें आहे, घाणींत लोळत राहणे आहे, खिळ्यावर निजणें आहे; सर्व काहीं आहे. या कालात 'वनवासी संत' म्हणून जे संत होऊन गेले त्याचीं चरित्रें त्याच्या भक्तानीं मोठ्या भक्तिभावाने लिहून ठेविलीं आहेत. तीं वाचीत असता तुम्हाला भरतखंडातीलच वैराग्याचें वर्णन आपण वाचीत आहों असे वाटल्यावाचून राहणार नाहीं. सेंट जेरोमने असल्या पुष्कळ साधूंच्याविषयीं लिहून ठेवले आहे. एक म्हणे सतत तीस वर्षे सातू

व गढूळ पाणीच फक्त पीत असे; दुसरा एक भुयारात पडून असे व फक्त पाचच फळे रोज खाई; तिसऱ्यानें अंगावर एकदां कफनी चढविली कीं ती फाटून गळून पडेपर्यंत तो ती बदलीत नसे, मग धुण्याबिण्याची तर गोष्ट बोलावयासच नको ! अलेक्झाड्रिया येथे मसेरियस् नावाचे एक साधु राहत असत. ते नेहमीं दलदलींत राहत आणि तेथील बुभुक्षित डासाना आपल्या अंगाचे चागले चावे घेता यावे म्हणून आपलें अंग उघडे टाकीत ! त्याचा शिष्य युसेबियस् याने देहदंडनास्तव दीड-दीड मणाच्या बेड्या आपल्या पायात ठोकून घेतल्या व अशा स्थितींत तीन वर्षे एका कोरड्या झालेल्या विहिरीच्या तळाशीं राहून घालविलीं ! दुसरे एक साधु कुजलेल्या धान्याशिवाय दुसऱ्या कशाचाहि आपल्या जिव्हेला विटाळ होऊं देत नसत ! दुसरे काहीं आठआठ दिवस कडक उपास करीत व व आठआठ दिवस आलोचन जाग्रणेंहि काढीत. काहींजण जंगलातील हिंस्र पशूंच्या गुहेंत राहत, काहीं श्मशानात वास्तव्य करीत, तर काहीं आटलेल्या विहिरीच्या बुडाशीं ठाण माडीत. जॉन नावाचा साधु तर सतत तीन वर्षे एका खडकाला टेकून उभा होता. या तीन वर्षांत तो एकदाहि बसला नाहीं कीं निजला नाहीं; व रविवारच्या नैवेद्याशिवाय त्यानें काहीं खाल्लेहि नाहीं असें म्हणतात ! मेसापोटेमिया व सिरिया या देशात असे साधु होते कीं ते नेहमीं डोंगरावर मटकत व गुराप्रमाणें फक्त गवत खात !

गलिच्छपणा हा ह्या साधूंचा अत्यंत अभिमानास्पद विषय दिसतो. पुरुष तर हातपाय धुणें हें पाप मानीतच; पण बायकाहि तत्त्वपालनाकरितां म्हणून पाण्यास स्पर्श करीत नसत ! सिव्हिया नावाच्या एका जोगिणीनें साठ वर्षांत हाताशिवाय शरीराचा कोणताहि भाग धुतला नाहीं म्हणे ! त्यामुळें तिला रोग जडले. पण तिनें आपलें व्रत सोडलें नाहीं. ह्या गलिच्छपणाची सीमा कोठपर्यंत जाई याची कल्पना हवी असली तर सेट सायमन स्टाइ-लिटस् याचे चरित्र पाहावें. या साधूनें आपल्या कमरेभोंवतीं एक दोर घट्टपणे आवळून बाधला होता. तो फार घट्ट झाल्यामुळें मासात रुतून तें मास कुजू लागलें होतें तें इतकें, कीं त्याच्याजवळ जाणाऱ्याला उग्र दुर्गंधीचा भपकारा सहन करावा लागे, व तो इकडे तिकडे वळूं लागला कीं त्याच्या कुजणाऱ्या जखमांतून पटापट अळ्या जमिनीवर पडत ! ह्या

अळ्या जमिनीवर पडल्या कीं त्याना पुन्हा उचलून पूर्वीप्रमाणे जखमेंत ठेवाव्या अशी त्याची त्याच्या भक्तगणाना ताकीद होती व त्याप्रमाणें ते त्याना पुन्हा जखमात ठेवीत व साधुवर्य म्हणे कीं, "खा, बाबानो, खा. देवाने दिले आहे तितके खा !"

धनसुतदाराचा मोह सोडणे हाहि प्रकार भरपूर आढळतो. मठात कोणालाहि मठवासी म्हणून प्रवेश मिळण्यापूर्वी त्याने वा तिने आपल्या नाते-वाइकाचे पाश पूर्णपणे तोडून टाकिलेच पाहिजत असा दंडकच असे. थीब येथील एक नागरिक ॲबट सिसोकडे मठवासी होण्याकरिता आला तेव्हा त्याला ॲबट म्हणाला, 'तुझें निकटचें नात्याचें असें कोण आहे ?' 'माझा एक लहानगा मुलगा आहे महाराज.' 'तर मग आधीं परत जा आणि प्रथम त्याला अग्नीस अर्पण कर व मग मठात ये कसा !' ही आज्ञा ऐकताच तो बिचारा खराच परत गेला व त्याने आपल्या मुलास अग्नीस अर्पण करण्याची खरोखरीच तयारी चालविली म्हणे ! एकदा संन्यासाश्रम स्वीकारल्यावर पूर्वाश्रमीची आपली मातोश्री जरी मरणोन्मुख असली तरी तिचेंहि तोंड पाहणें पाप समजले जाई. सेंट मार्क्सवर असा प्रसग आला होता. त्याची आई मृत्युशय्येवर पडली असता तिने मार्क्स ज्या मठात राहत होता त्या मठाधिपतीची विनवणी करून त्याच्याकडून आपणाला भेटण्याविषयीं मार्क्सला आज्ञा करविली. मार्क्सला मोठे संकट पडलें. आज्ञाभग करणेंहि अशक्य व आईचें तोंड पाहण्याचे पाप करणेंहि अशक्य. शेवटीं त्यानें एक शक्कल काढली. त्याने केले वेषान्तर, बाधले डोळे आणि नंतर आईची भेट घेतली. यामुळें आईनें मुलाला ओळखलें नाहीं व मुलानें आईला पाहिलें नाहीं ! इतिहासकारानीं असले अनेक प्रकार वर्णिलेले आहेत.[१]

बाराव्या शतकातील आल्बिजेन्शियन पंथ हा तर एक मोठा कट्टर वैराग्यपंथ होता. शरीर हें सर्व अनर्थांचें मूळ असें मो मानी, आणि आत्महत्या पुण्य समजून काहीं जोगी, कोणी शिरा कापून, कोणी विष-

१. History of European Morals by Lecky The Mediæval Mind by Taylor वगैरे.

प्राशन करून, कोणी प्राणांतोपवास करून, शरिराचा त्याग करीत व आत्म्याला शरिराच्या तुरुंगातून सोडवीत ! ऐहिक सुखाविषयीं दुर्दम तिटकारा हा स्टोइक नावाचा जो प्राचीन काळीं पथ होता त्यातहि भरपूर पाहावयास मिळतो. ह्या पंथाचा संस्थापक डायोजिनस हा वीस वर्षें एका टबात बसून राहिला होता. याच पथातील एपिक्टेटस् हा एका अत्यंत क्रूर, खुनशी धन्याचा गुलाम होता व त्याचे जिणे अत्यत उद्वेगकारक होते. तरीहि त्याची वृत्ति अत्यत शांत होती. त्याचा धनी एकदा त्याला दंडुक्यानें मारूं लागला तेव्हा तो म्हणाला, "असे माराल तर माझा पाय मोडून जाईल." धनी थोडाच ऐकतो ! त्याने पाय मोडलाच. पण त्यावर गुलाम एवढेच शांतपणें बोलला, " मीं नव्हत सांगितल कीं पाय मोडेल म्हणून बर !" या स्टोइकपंथाने सर्व प्रकारच्या ऐहिक तृष्णावर विजय मिळविला होता. आणि येथे कष्ट भोगले तर परलोकात तरी ऐश्वर्य मिळेल अशी आशा न धरिताहि त्यानी वैराग्यवृत्ति अगीं बाणवली होती ही गोष्ट स्याच्या तत्त्वनिष्ठेची द्योतक नव्हे काय ? बाराव्या शतकात धार्मिक व आध्यात्मिक वृत्तीची लाटच उसळली होती. सैनिक व योद्धे याच्यामध्येहि धार्मिक पंथ स्थापन करण्यात आले होते. ख्रिस्ती लोकाची पुण्यभूमि पालेस्टाइन ही गनीमाच्या हातून सोडविण्याकरिता धर्मयुद्धे सुरू होतीं. त्याच्या अनुषंगानें यात्रेकरूचे सरक्षण करणारा 'ऑर्डर ऑफ द टेपल' या नावाचा एक लष्करी पथ स्थापन करण्यात आला. त्याचे विशिष्ट सस्कार व विधि असत. मृगयेचा निषेध असे, मौन स्वीकारावे लागे, गणवेश घालावा लागे वगैरे आचारकाडाचे सागोपाग नियम घालून देणारा बहात्तर अध्यायाचा ग्रंथ तयार करण्यात आला होता.[1]

शहाण्यानें विवाह करूं नये

संसाराविषयींच्या उदासीनतेचें स्वरूप गृहस्थाश्रमाविषयींच्या तिटकाऱ्यात चागलेंच प्रत्ययास येतें. त्याच्या आचरणाचे येथवर दिग्दर्शन केलें. आता त्याच्या विचारसरणीचा एक नमुनेदार मासला म्हणून चौथ्या शतकातील संत थिओफ्रास्ट याचें पुढील प्रवचन ऐका. प्रवचनाचा

१. Mediæval Mind by Taylor I, 547.

विषय शहाण्यानें विवाहाच्या फंदांत पडूं नये असा आहे. थिओफ्रास्ट उवाच :

"तर बापहो ! शहाण्या माणसानें एकंदरींत संसाराच्या फंदामध्ये न पडणेच चागलें. पहिले म्हणजे असें कीं भार्या ही अध्ययनाच्या आड येते. भार्या आणि विद्या या दोघींची सारखीच सेवा करणे कोणालाच शक्य नाहीं. विवाहित स्त्रीला नको काय ? तिला उंची वस्त्रे काय, जडजवाहीर काय, दासदासी काय, पालखी मेणा काय आणि नको काय ? शिवाय रात्रभर तिची पिरपिर सुरूच– 'ती शेजारची ठमाबाई कशी झकपक पोषाक करून मिरविते पाहिलं का ? सगळींजणं तिला वाखाणतात, आणि मला बटकीला मेली मान खालीं घालून बसावं लागतं. तुम्हीहि पण आज त्या बाईकडे का हो निरखून पाहत होता ? आणि इश्श, भोलकरणीशीं काय बोलत बसला होता ? बरं, आज बाजारातून काय आणलंत ? ' वगैरे वगैरे. कोणा मित्राकडे वगैरे जाण्याचीहि सोय नाही. नाहीं तर बाईसाहेबाना संशय आलाच म्हणून समजावें. तिला वाटतें आम्ही तिचा नेहमी द्वेष करतों म्हणून. शहरातल्या एखाद्या चागल्या प्रवचनाला जावें म्हणावें तर हिचा खोडा आहेच. बरें, हिला बरोबर न्यावी म्हणावे तर तिला अक्षराचा नाहीं गंध ! गरिबींत असलो तर हिला पोसायची पंचाईत आणि दोन पैसे बाळगून असलो तर मग हिचे समाधान कधींच व्हावयाचें नाहीं. बरें, बायकोची निवड करावयाची तरी मुभा आहे ? छेः ! जी पदरात पडेल ती पवित्र म्हणून स्वीकारावी लागते. ती कशी आहे हें लग्नाच्या आधीं मुळी कळतच नाहीं. रोगीट आहे कीं मूर्ख आहे कीं कुरूप आहे, काहीं कळावयाचें नाहीं. आणि सुरूप असली किंवा कुरूप असली तरी दोन्हीकडून त्रास. सुरूप असली तर तिच्यावर अनेकाचा डोळा राहिल्यानें तिला नीट ठेवणे कठीण, आणि कुरूप असली तर जिच्याकडे कोणी ढुंकून पाहत नाहीं असले लोढणें बाळगण्याचा नसता उपद्व्याप ! त्यातल्या त्यात विचार केला तर कुरूप असलेलीच बरी म्हणावयाची. कारण सर्वांचा जिच्यावर डोळा आहे अशीला सुरक्षित कशी समजावयाची ? कोणी आपल्या सौंदर्यानें तिच्यावर मोहिनी घालणार, कोणी विद्वत्तेनें, कोणी शहाणपणानें, कोणी औदार्यानें. आणि अशा रीतीनें

किल्ल्याच्या सगळ्या बाजूंनीं हल्ला सुरू झाला, कीं तो केव्हा तरी कोसळावयाचाच ! आणि लग्न करावयाचें तरी कशाकरिता ? घर सांभाळायला, आजारीपणात शुश्रूषा करावयाला आणि हरघडी संगतीला कोणी तरी असावे एवढ्यासाठींच ना ? मग मी म्हणतों की ही सर्व कामे पैका देऊन ठेवलेला नोकरच अधिक चागलीं नि बिनतक्रार करील. बायकोला वाटतें कीं नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध वागलो तरच आपण घराच्या मालकीण खऱ्या ! आता मुलाबाळाकरिता लग्न करावे म्हणाल तर हाहि मूर्खपणाच नाहीं का ? आपला वंश वाढावा, म्हातारपणीं पाणी घालावयास कोणी तरी असावें, म्हणून लग्न करावयाचे असें म्हणता तर असे समजा कीं आपण मेलो जग बुडालें ! आपण मेल्यावर मुलगा आपले नाव चालवितो कीं नाहीं याची नसती चिंता वाहाच कशाला ? आणि म्हातारपणीं तो उपयोगी पडेल याची तरी काय खात्री ! आपल्या देखतच पोरे मरणार नाहीत हें तरी कशावरून ? आणि जगलीं तरी चागली निघतील याची काय खात्री ? तेव्हा वारस म्हणून कोणी हवाच असेल तर मित्रमंडळींतूनच का नित्वडून न घ्या ? उत्तम मार्ग म्हणजे आपल्यामागून कोणाच्या तरी हातीं आपला पैसा ठेवण्यापेक्षा हयातींतच खर्चणे हा होय. साराश, शहाण्याने संसार माडण्याच्या फंदात पडूं नये हें सगळ्यात चागले !"[१]

आध्यात्मिकतेची यापुढची पायरी म्हणजे योगी व साक्षात्कारी ब्रह्मवेत्त्याची. त्याच्या शोधार्थ युरोपकडे वळलात तर सिद्धारूढ विभूतींनीं त्याहि देशाला अलंकृत केलेलें तुम्हास आढळून येईल. "सोळाव्या शतकातील जेसुइट पंथाचा संस्थापक इग्नेशियस लोयोला हा योगमार्गात चागला प्रवीण होता. त्याच्या पंथात देहदडन आणि ध्यानधारणा या दोन्हीवर भर असे. तो रोज स्वतः सात तास प्रार्थनेत घालवी आणि देहदंडनास्तव रोज रात्रीं तीनदा चाबकानें आपल्या देहावर कोरडे ओढून घेत असे ! मठात प्रवेश होताना भिक्षूला एक कफनी मिळे. ती जी एकदा अडकवावयाची ती थडग्यात दफन होईपर्यंत काढावयाची नाहीं ! मग तिला दुर्गधि येवो किंवा तिच्या चिंध्या होवोत. ग्रंथवाचनाची वेळ सोडून भिक्षूनें खोलींत नेहमीं अंधारात बसलें पाहिजे, त्याच्या तोंडावर

१ Life in the Middle Ages Vol.IV, p.23, by Coulton.

हास्य चुकून देखील दिसता कामा नये, कायिक भावना मारण्याकरिता त्याने नेहमीं अंगावर फटके ओढून घेतले पाहिजेत अशा प्रकारचे नियम लोयोलानें घालून दिलेले होते. देहदंडनाऱ्या जोडीला योगमार्गहि त्याने आखला होता. ध्यानधारणेच्या ज्या सात अवस्था त्याने वर्णिल्या आहेत त्या आपल्याकडील यौगिक अवस्थाशी जुळत्या आहेत. दोलायमानता, स्थिरता, ध्यानधारणा, पवित्रता, एकात्मता, एकरूपता, सायुज्यता या त्या अवस्था होत. इतर अनेक धर्मपथाप्रमाणे या पथात उत्तरकालीं अनेक वामाचार शिरले. पण प्रारंभी हा योगमार्गी पथासारखाच पथ होता. पथाचा संस्थापक लोयोला हा प्रथम एक लष्करी सरदार होता. पण एका लढाईत जखमी झाल्यामुळें त्याला उपरति झाली आणि नतर बराच काल तीर्थाटन करून आल्यावर शेवटीं त्याने जेसुइट पंथाची स्थापना केली."[१]

साक्षात्कारी साधुसंत

ब्रह्मसाक्षात्कारी संतसाधूची टीप घेतली तरीहि असेंच आढळून येते कीं, ब्रह्मानंदीं टाळी लागून परमेश्वरस्वरूपीं तल्लीन होण्याचा अनुभव हा काहीं फक्त भारतीयासच बहाल झालेला आहे असें नव्हे. ह्या भागाचा वाटा भारतीयाप्रमाणें पाश्चात्यानाहि लाधलेला आहे. आपल्याकडे जसे ज्ञानेश्वर-तुकारामादि साक्षात्कारी सत होऊन गेले तसे पाश्चात्यातहि प्लोटिनस्, ऑगस्टाइन, सेट फ्रान्सिस वगैरे साक्षात्कारी महात्मे होऊन गेले. श्रीज्ञानेश्वरानीं आपल्या आयुष्यात सोज्ज्वळ साधुत्व आणि घटपटादि तत्त्वज्ञान याचा जसा सुंदर मेळ घालून दाखविला तसाच तो प्लोटिनस् यानेंहि दाखविला. तत्त्वज्ञानाच्या जोडीला ज्ञानेश्वरींत जें सुंदर काव्य विलसत आहे त्याला पाश्चात्यातील तोड तुम्हास पाहावयाची असल्यास इटालियन कवि व तत्त्वज्ञ डाटे याच्या ग्रंथाकडे वळा. ज्ञानेश्वराप्रमाणें जिवत समाधि घेणारा संत वीरहि आढळतो. तो म्हणजे रोमल हा होय. (टेलर १.३९६). आपल्याकडे मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा वगैरे साक्षात्कारी स्त्रिया होऊन गेल्या त्याचे पश्चिमेकडील नमुने अवलोकावयाचे असल्यास नाखुइचची ज्यूलियन, साएनाची कॅथराइन व सेंट टेरेसा यांचीं चरित्रें

१. अध्यात्म पत्रक ९१.

चाळा. जर्मनींतील इलिझाबेथ, हिल्डगार्ड, लिटगार्ड, मेरी वगैरेनीं आपल्या दिव्य अनुभूतींचीं रसभरित वर्णने लिहून ठेवलेलीं आहेत.[1] देवाशी झालेल्या लग्नाची खूण म्हणून कॅथराइन ही मोत्याची आगठी घालीत असे. 'सावधान' शब्द कानावर पडताच सावध होणाऱ्या रामदासाचा पाश्चात्य जोडीदार अवलोकावयाचा असल्यास विवाहाच्या पहिल्या रात्रीच शय्येवरून निघून जाणारा संत अलेक्झिस याचे चरित्र पाहा आणि अस्पृश्य चोखामेळा याच्या पाश्चात्य बधूची गाठ घ्यावयाची असल्यास चांभार भोमच्या घराकडे वळा.

आपल्याकडे साक्षात्कारी साधुसंताचे जे निरनिराळे प्रकार आढळून येतात तसले पाश्चात्यातहि सापडतात. काही संत 'ज्ञानियाचे राजे' जे ज्ञानेश्वर त्याच्याप्रमाणे ज्ञानप्रधान असतात, काही भक्तिमंदिराचे कळस जे तुकोबाराय त्याच्याप्रमाणे भक्तिप्रधान असतात आणि काही समाजाला समर्थ करणाऱ्या समर्थ रामदासाप्रमाणे क्रियाप्रधान असतात. पाश्चात्य साधुसतातहि हे सर्व प्रकार नजरेस येतात. या दृष्टीनें पाहूं गेलें असता तुकारामाच्या अभंगातील हर्षमर्षादि त्या त्या मानसिक अवस्था सुसोमध्ये वाचावयास सापडतात. आणि रामदासाप्रमाणें संघटना, सामर्थ्य, चळवळ याचा खटाटोप उभारणारे साधुश्रेष्ठ पाश्चात्यामध्ये पायथॅगोरस, लोयोला वगैरेंच्या रूपांत आढळून येतात. रामदासानीं जसा आपला एक स्वतंत्र रामदासी पंथ निर्माण केला, तसाच प्रयत्न पायथॅगोरसनेंहि केला. रामदासानीं धर्मकारण आणि राजकारण याचा जसा समन्वय केला तसाच लोयोला यानेहि केला.

या साधुसंताचीं चरित्रे सांडून त्याचा विचार पाहिली तरीहि पौर्वात्य व पाश्चात्य यामध्यें एकच सूर आढळून येतो. आत्मा आणि परमात्मा यांचा संबंध बिंब-प्रतिबिंबाप्रमाणे आपले साधु वर्णन करितात व दोन्हीहि मूलतः एकरूपच आहेत असें प्रतिपादन करितात. तेच प्रमेय पाश्चात्यांतहि आढळतें. उदाहरणार्थ, प्लोटिनस् लिहितो कीं, 'ज्या कोणाला आपण परमात्माशीं एकरूप होऊन गेलों असा साक्षात्कार होईल आणि प्रतिबिंबानें

१. Mediæval Mind by Taylor.

मूळ बिंबात विलीन व्हावें तद्वत् आत्मरूपातून निघून परमात्मरूपात विलीन झाल्याचें मान होईल तर त्यानें आपल्या मुक्कामाचा शेवट गाठला असें होईल.'

साम्यावस्था व द्वंद्वातीत अवस्था याचें आपल्याकडे जे वर्णन आढळतें त्याच्या तोडीचें प्लोटिनस्चे पुढील वर्णन पाहा: "त्या उच्च अवस्थेत गेल्यानंतर अन्तःकरणात कोणतीहि खळबळ उरत नाहीं, बुद्धि किंवा ज्ञान हींहि लयास जातात. फार काय, स्वतःच्या वैयक्तिक अस्तित्वाची जाणीवहि नष्ट होते." नाम-जपावर आपल्याकडे जोर दिला जातो तसाच तो तिकडेहि आढळतो. 'व्हर्चूज ऑफ् दि होली नेम ऑफ् जीझस्'चा कर्ता रोल लिहितो: "प्रभो येशू, तूं जगाला तारलेंस, म्हणून तुझें ते पवित्र येशू नाम. अहाहा! काय जादू त्या नावात आहे! काय त्याचा महिमा! मानवाला मोक्ष मिळायचा असेल तर या नावाच्या जपानेच; दुसऱ्या कशानेहि तो मिळण्याची आशा नाहीं." ध्यानधारणा व साक्षात्कार याच्या मार्गांत असता अनेक सिद्धि प्राप्त होतात, पण परमेश्वरप्राप्तीची हाव बाळगणारानीं या सिद्धींत गुरफटून जाऊं नये असा इशारा जसा आपल्या ग्रथात आढळतो तसाच पाश्चात्य साधुश्रेष्ठाच्याहि ग्रंथी सापडतो. सेंट जॉन ऑफ क्रास म्हणतो, "साधकानें सर्व प्रकारच्या गूढ चमत्कारापासून दूर पळालें पाहिजे. मग ते चमत्कार कल्याणकारक असोत कीं अकल्याणकारक असोत. सिद्धि म्हणजे अज्ञ मुलाचीं खेळणीं होत. त्यात गुरफटून जाऊन उपयोगी नाहीं. माशी एकदा मधाला चिकटली कीं सपले. मग कसची ती त्यातून बाहेर पडते![1]'

आधुनिक तपस्वी

आध्यात्मिकतेचें कोणतेहि अंग तपासलें तरी त्यात पाश्चात्य हे अनाध्यात्मिक ठरत नाहींत हें वरील माहितीवरून लक्षांत आलें असेल. मानवाचें सर्व व्यावहारिक जीवन अदृश्य शक्तींनीं गुरफटलेलें आहे. त्या शक्तींचें स्मरण ठेवून त्याना अनुलक्षून, त्याना कौल लावून, त्याना नवससायास करून, शुभाशुभ मुहूर्त पाहून प्रत्येक पाऊल टाकणें ही वृत्ति जर आध्या-

1 Mysticism in Maharastra by R. D. Ranade.

त्मिक असेल तर ती वृत्ति पाश्चात्यात भरपूर होती व आजहि आहे. आयुष्याचें एकमेव ध्येय परमेश्वरप्राप्ति व त्याचें साधन म्हणून देहदंडन, तपस्या, वैराग्य याची कास धरणें ही जर आध्यात्मिकता असेल तर पाश्चात्याचे मध्ययुगातील वनवासी साधु हे भरतखंडातील प्राचीन तपस्व्याना हार जाणार नाहींत. आजहि रोमन कॅथॉलिक पंथात नैष्ठिक ब्रह्मचर्य व निष्काचनत्व याचा वसा घेऊन आमरणान्त मठात वावरणारे जे स्त्री-पुरुष आढळतात ते भरतखंडातील मठातून आणि गुहातून राहणाऱ्या तडी-तापशापेक्षा कोणत्याहि तऱ्हेनें कमी दर्जाचे लेखता येणार नाहींत.

नवे ऋषिवर्य

पण याहीपेक्षा एक अगदीं निराळा तपस्व्याचा वर्ग पाश्चात्यामध्यें सध्या अवतीर्ण झाला आहे, त्याच्याकडे मुद्दाम लक्ष वेधले पाहिजे. अहर्निश चिंतन, अजस्र उद्योग, ध्येयसाधनासाठीं प्राणाचीहि आहुति देण्याची तयारी हीं जर आध्यात्मिकतेचीं लक्षणें असतील तर तीं या नव-तपोनिष्ठामध्यें तुम्हास अवश्य आढळतील. मग कोणते हे नवे तपोनिष्ठ? तर दुसरे तिसरे कोणते नसून विद्यामंदिरात, प्रयोगशाळेत, वेधशाळेंत, जंगलात आणि गिरिकंदरात ज्ञानविज्ञानाची अव्यभिचारी भक्तीने व निष्ठेनें सेवा करणारे शास्त्रज्ञ! काय तुम्हाला हसू आले? कोठे आजचे पाश्चात्य शास्त्रज्ञ आणि कोठे पूर्वीचे भरतखंडातील तपोनिष्ठ महर्षि! या दोहोंना तुळेपुढें एकत्र उभे करणेच हांस्यास्पद आहे असें तुम्हास वाटतें? होय, वाटेल. कारण पूर्वसंस्कार तसाच जबर आहे. तपोनिष्ठ म्हटला म्हणजे तो गिरिकंदरात जाऊन पद्मासन घालून नासाग्रदृष्टि लावून बसलेला असेच चित्र आपल्या मनःचक्षूपुढे उभें राहतें. प्रयोगशाळेमध्यें तासन् तास अत्यंत एकाग्र चित्ताने एखादे विज्ञानाचें गूढ उकलण्याचा प्रयोग करीत बसणें ही तपश्चर्या आहे ही कल्पनाच मनाला लवकर पटत नाहीं. पण जरा विचार करून सांगा, कीं वाग्देवतामंदिरातील व प्रयोगशाळेंतील तपश्चर्या ही गिरिकदरातील तपश्चर्येपेक्षां कमी उग्र आहे का?

उदाहरणाकरिता फार लांब जावयास नको. भारतीय व युरोपीय संस्कृतीची जी माहिती प्रस्तुत प्रबंधास आधारभूत झाली आहे ती

जमविण्याकरिता पाश्चात्य विद्वानाचे केवढे परिश्रम व केवढी तरी तपश्चर्या खर्ची पडली आहे! अशोकाचे शिलालेख व त्यातील धर्मघोष आज सर्वांना परिचित झाला आहे. पण कित्येक शतकें या लेखाच्या लिपीचे ज्ञानच लुप्त झाले होते. ही रुष्ट झालेली लिपी पुन्हा प्रसन्न होऊन बोलूं लागली ती विद्वानाच्या निरलस उपासनेमुळे. हिला प्रसन्न करण्याचे श्रेय जेम्स प्रिन्सेप याचें आहे. कलकत्त्याच्या सरकारी टाकसाळीवर हा अधिकारी होता. त्या नात्याने दोन भाषात मजकूर असलेलीं पुष्कळ जुनीं ग्रीक नाणीं त्याच्या नजरेखालून गेली होतीं. त्यावरून त्याने काही अनुमाने बांधून ठेवलीं. पुढे सांची येथील स्तूपावरील अक्षरे तपासीत असता त्याला असे आढळून आले कीं, प्रत्येक लेखाचा शेवट दोन अक्षरानीं होई. तेव्हा हा शब्द 'दानम्' हा असावा असा त्याने कयास बांधला मागचा शब्द षष्ठ्यन्त म्हणून तो 'सा' असावा अशी सुरुवात करून व ग्रीक नाण्याचे साहाय्य घेऊन मोठ्या परिश्रमानें व चिकाटीनें त्यानें सर्व लिपी हस्तगत केली. ईजिप्तमधील जुनी चित्रलिपी व असीरियातील कीलाकृति लिपी या उकलण्याकरिता विद्वानानीं वर्षानुवर्षे परिश्रम घेतले म्हणूनच मानवी संस्कृतीचा पुराण इतिहास आज थोडाबहुत रेखाटता येऊं लागला आहे.

कोणत्याहि शास्त्रातील गुंतागुंतीचा एखादा प्रयोग चालू असता किंवा त्याचे गणित चालू असतां मनाची विलक्षण एकाग्रता व्हावी लागते हें सांगावयास का पाहिजे? सुप्रसिद्ध गणिती न्यूटन हा आपल्या गणितामध्यें इतका गर्क असे, कीं शेजारीं टेबलावर आचाऱ्यानें आणून ठेवलेलें भोजनाचें ताट कित्येक तास तसेंच वाट पाहत पडे हें तुम्हास माहीत आहेच. विजेचे दिवे हे आज लहान मुलाचीं खेळणीं झाले आहेत पण या दिव्याच्या आतील प्रकाशणारी नाजुक तार साध्य करण्याकरितां एडिसनला दिव्य करावें लागले होतें. प्रथम ही तार तो कार्बनची बनवी. मोठ्या प्रयासानें ही तार बनवावी आणि ऐनवेळीं ती ठिसूळ ठरून मोडून जावी असें तीन-चारदां झालें. शेवटीं एडिसननें आपणास एका खोलींत कोंडून घेतलें आणि सतत चोवीस तास एकाग्र मनानें खपून प्रयोग सिद्ध झाल्यावरच त्यानें अन्नग्रहण केलें! आर्किमिडिजच्या एकाग्रतेची कथा

प्रसिद्ध आहे. राजाच्या सुवर्णमुकुटातील सुवर्ण अस्सल आहे कीं नकली आहे हें शोधून काढण्याच्या प्रश्नात स्वारी गर्क असताच आंघोळीच्या टबात उतरली आणि प्रश्न सुटताच 'सापडलें ! उत्तर सापडलें !' असें म्हणत टबातून बाहेर पडून नागवीच रस्त्यानें ओरडत सुटली ! अशा प्रकारची देहभान हरपविणारी एकतानता ही योग्याच्या एकतानतेहून निराळी आहे काय ? वेधशाळेंत रात्रीच्या रात्री आलोचन जाग्रणें करून तान्याचे वेध घेत बसणारे ज्योतिषी तुम्हीं पाहिले असतील. दिवसानुदिवस, मासानुमास, वर्षानुवर्ष हे वेध घेण्याचें काम सतत अव्याहत चाललेले असते. गणितावरून नवीन पंचागें तयार करण्याचें काम तर अनेक देशातील वेधशाळातून वाटलेलें असून त्या सर्वांच्या परिश्रमाचें फल एकत्रित करून ते पूर्णत्वास येत असतें. अनेक देशातील विद्वानाच्या परिश्रमाने तयार होणारे व कलाविकलाचाहि दोष राहूं न देणारें हें पंचागकार्य अनेक ऋत्विजाच्या साहाय्याने दीर्घकाळ चालणाऱ्या व पदपदाक्षरा-चीहि चूक न होऊ देण्याइतक्या दक्षतेनें चालविलेल्या मोठ्या यज्ञसत्राच्या तोंडीचेच नाहीं का ? नुसते तारे मोजण्याची गोष्ट घेतली तरी दुर्बिण आणि छायाचित्र याच्या साहाय्यानें लाखो तारे शास्त्रज्ञानीं निरलसपणें मोजले आहेत. पशुपक्षी, कृमिकीटक याचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ घेतले तरी त्याचीहि तपश्चर्या अशीच उग्र आहे. कीटक किती प्रकारचे आहेत असें तुम्हास विचारले तर तुम्ही दहा-पाच किंवा फार तर पाचपन्नास कीटकाचीं नावे सागाल. पण शास्त्रज्ञानी कष्टाळूपणे किती कीटकाची मोजदाद केली आहे असें तुम्हास वाटतें ! शेंपन्नास किंवा दहापाच हजार नव्हे, तर अडीच लाख ! या नुसत्या संख्येवरूनच त्याची चिकाटी, कष्टाळूपणा, ज्ञानलालसा म्हणजेच अर्थात् तपस्या कोणत्या दर्जाची आहे याची कल्पना यावी.

ज्ञानोपासनेच्या पायीं प्राणार्पण करण्याची तयारी असणे यास तरी तप म्हणण्यास तुम्ही तयार आहा काय ? असलात तर कैलास पर्वतावर आरोहण करण्याकरिता प्रतिवर्षी आपल्या प्राणाचे बळी देत आलेल्या नरवीरांचें नुसतें स्मरण करा म्हणजे या नव्या त्यागमूर्तीची योग्यता तुमच्या

ध्यानीं येईल. वैद्यक शास्त्रानें मानवावर अनंत उपकार केलेले आहेत. या शास्त्रांतील ऋषिवर्यांचें उदाहरण पाहिजे असल्यास अमेरिकन गोल्डबर्गर ह्यांचें देता येईल. या संशोधकाने पेलाग्रा नांवाच्या रोगासंबंधी संशोधन करण्यात जीवितहि धोक्यात घातलें. ह्या रोगात त्वचा फाटली जाऊन कात्रे पडतात व कित्येक वेळा रोग्याला वेड लागण्यात त्याचे पर्यवसान होतें. हा रोग संचारी नाहीं हें सिद्ध करण्याकरिता या संशोधकानें रोग्याचें रक्त आपल्या शरीरात टोंचले; आणि एवढ्यानेहि समाधान होईना म्हणून त्याची विष्ठा कोळून सात वेळा प्राशन करण्याचें दिव्य केलें !

ज्ञानोपासनेचें महत्त्व

असली प्राणाचीहि पर्वा न करता ज्ञानाची अखंड उपासना चालू ठेवणारे शास्त्रज्ञ हे मोगवादी आहेत काय हें आपल्या मनास विचारून पाहा. पतीच्या चितेवर आरूढ होणाऱ्या सतीस तुम्ही महासाध्वी मानता, तर विमानविद्या हस्तगत करण्याकरिता प्राण अर्पण करणाऱ्या शास्त्रज्ञाला महान् साधु म्हणावयास का तयार होऊ नये ? विद्येची, ज्ञानाची अव्यभिचारी उपासना हिला तपश्चर्या म्हणावयाचें नाहीं तर कशास म्हणावयाचें ? या प्रश्नाला एकदम निश्चित असें उत्तर आज आपलें मन देत नाहीं. पण त्याचे कारण पूर्वसंस्कार एवढेच होय. तप, तपश्चर्या, आध्यात्मिक जीवन, ध्यानधारणा वगैरे शब्द उच्चारले म्हणजे एक विशिष्ट प्रकारची तपश्चर्या तेवढीच आपल्या डोळ्यापुढें उभी राहते; तितक्याच उग्र स्वरूपाची दुसऱ्या प्रकारची तपस्या असूं शकते याचे आकलनच लवकर होत नाहीं. असा प्रकार संस्कृतीच्या संक्रमणांत नेहमीं घडत असतो. प्राचीन काळीं यज्ञकल्पनेच्या बाबतींत असाच प्रकार नाहीं का झाला ! वैदिक काळीं यज्ञ म्हणजे होमहवनयुक्त यज्ञ, व तोच काय तो स्वर्गप्रद मार्ग अशी कल्पना रूढ होती. कालांतरानें आध्यात्मिक जीवनाचे अनेक मार्ग उगवले आणि तीळ, तांदूळ, तूपदूध अग्नीस समर्पण करणें हें जसें पुण्यकर्म, तसें तें गोरगरिबास दान करणें हेंहि पुण्यकर्म, अशा कल्पना उदयास आल्या. पण या नव्या मार्गांना यज्ञमार्गाचें पुण्यशीलत्व देण्यास रूढ मन प्रथम तयार नसावें. अशा वेळीं सर्व नव्या मार्गांचा समन्वय करण्याचें उत्कृष्ट कार्य करण्यास गीताकार पुढें आले

आणि त्यानीं अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादिलें कीं, "द्रव्ययज्ञाः तपोयज्ञाः योगयज्ञाः तथाऽपरे । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः । सर्वेऽप्येते यज्ञविदः यज्ञक्षपितकल्मषाः ॥" म्हणजे कोणी द्रव्यरूप यज्ञ करितात, कोणी तपोरूप करितात, कोणी योगरूप, तर कोणी स्वाध्यायरूप, तर कोणी ज्ञानरूप यज्ञ करितात, आणि या सर्वच यज्ञवेत्त्याच्या कल्मषाचा अथवा पापाचा क्षय होतो. अर्थात् हे सर्व तपाचेच मार्ग होत. यामध्यें ज्ञानाची उपासना हेहि तप होय असे गीताकारानें प्रतिपादले आहे त्याकडे आपलें लक्ष गेलेच असेल. ज्ञानोपासना ही निःसंशय तपश्चर्याच होय असा गीताकाराचा स्पष्ट अभिप्राय आहे. गीतेसारखाच दुसरा महत्त्वाचा अभिप्राय हवा असल्यास मनुस्मृति उघडा. मनूनेंहि अध्ययन किंवा ज्ञानोपासना हेच ब्राह्मणाचे तप होय असा लख्ख अभिप्राय दिला आहे. तो म्हणतो,

वेदमेव सदाभ्यस्येत्तपस्तप्यन् द्विजोत्तमः ।
वेदाभ्यासो हि विप्रस्य तपः परमिहोच्यते ॥ (अ. २।१६६)

मनूच्या वेळीं सर्वच ज्ञानाचा अंतर्भाव वेदात केला जात असे म्हणून वेदाभ्यास असा शब्द त्यानें वापरला आहे, तर गीताकारानीं ज्ञानयज्ञ असा सर्वव्यापी शब्द योजिला आहे. बौद्धधर्म आणि योगमार्ग या दोहोंनींहि अरण्यात जाऊन देहदंडनादि तपश्चर्या करण्याचा पुरस्कार चालविला होता, अशा वेळीं मनूनें प्रतिपादलें कीं, तपश्चर्येला देहदंडन व अरण्यवास हीं अत्यावश्यक नाहींत तर वेदाचें अध्ययन करणें हेंही तपश्चर्येइतकेंच पुण्यकारक कर्म होय. ध्यानधारणेच्या पाठीमागेंच सर्व विप्र धावले असते तर विप्राचें जें मुख्य सामाजिक कर्तव्य वेदाध्ययन अथवा ज्ञानोपासना तें उत्सन्न झालें असतें. अर्थात् समाजोपकारक कर्में अव्यभिचारी भक्तिभावनेनें करीत राहणें ही तपश्चर्याच होय असाच मनूचा अभिप्राय आहे. आणि गीताकारानें यज्ञमार्ग, योगमार्ग, ज्ञानमार्ग यांच्या जोडीला तुल्यबळ म्हणून दानमार्गाला जें स्थान दिले आहे त्याचाहि हेतु हाच नाहीं का! मनूप्रमाणें श्रीकृष्णाचीहि दृष्टि लोकसंग्राहक होती. म्हणूनच जनसेवारूपी दानमार्ग यज्ञाइतकाच पुण्यप्रद होय असें त्यानें

प्रतिपादले. आजच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांची ज्ञानोपासना ही सुद्धा समाज-हितवर्धक असल्याने अशीच पुण्यप्रद तपश्चर्या नव्हे का ?

तुम्ही म्हणाल " ज्ञानोपासना यातील ज्ञान या पदाचा अर्थ अध्यात्म-ज्ञान एवढाच फक्त घेतला पाहिजे. बाटेल त्या ज्ञानाची उपासना करणा-राला तपस्वी कसे म्हणावे ? उपनिषद्कारांनी सर्व विद्येचे परा आणि अपरा असें वर्गीकरण करून 'अथ परा यया तद् अक्षरं अधिगम्यते' म्हणजे जिनें अक्षर अशा ब्रह्माचे स्वरूप कळते ती परा विद्या होय, बाकी झाडून सर्व विद्या या अपरा अथवा खालच्या प्रतीच्या विद्या होत, असे बजावले आहे ते विसरलात वाटते ?"

नाहीं. विसरलो नाहीं. परा-अपरा विद्येचें वर्गीकरण उपनिषद्कारांनीं केलेलें आहे व यज्ञ आणि सार्वजनिक हिताचीं कामें जीं तलाव, मंदिरें वगैरे बाधणें त्या 'इष्टापूर्ताला' हि हीन लेखलें आहे हे खरे.[1] पण गीताकारानी दान, योग, स्वाध्याय व ज्ञान या सर्वांना तुल्यबल मानले आहे त्यावरून गीता-काराना तरी ज्ञान याचा आध्यात्मिक ज्ञान एवढाच अर्थ अभिप्रेत असेल असें मला वाटत नाहीं. निदान ज्ञानाच्या जोडीला दान बसविल्याने सर्व लोकोपकारक ज्ञान लोकसंग्रहकार गीताकाराला अभिप्रेत असण्याचा जास्त संभव आहे. ब्रह्मज्ञानाला राजविद्या म्हणून गीतेनें विशेष गौरविले असलें तरी समाजहितवर्धक ज्ञानाला ती यज्ञतुल्य मानते. मनूचा अभिप्राय तर निःसंदिग्ध आहे. त्यानें वेदाभ्यास हा शब्द वापरला आहे. आणि त्याचा अर्थ ब्रह्मज्ञान एवढा संकुचित नाहीं. कारण उपनिषद्काराच्या प्रक्रिये-प्रमाणें पाहता वेदाभ्यास हाहि अपरा विद्येचाच प्रकार. त्याच्या मतें वेद-वेदांगें, इतिहासपुराण सर्वच अपरा विद्या. अर्थात् वेदाभ्यास करणें हीच विप्राची तपश्चर्या हा मनूचा अभिप्राय निःसंदिग्ध आहे. तो म्हणजे लोकोपकारक अशा ज्ञानाची उपासना हा होय. नुसत्या परा विद्येची उपा-सना हा नव्हे. या मनूच्या दृष्टीनें पाहिलें असता देहाचीहि तमा न धरिता विद्येची एकनिष्ठपणें उपासना करणाऱ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांना तुम्ही तपस्वी म्हणणार कीं नाहीं ?

---

१. मुण्डकोपनिषद् १.१.५.

आता तुम्ही म्हणाल कीं, पाश्चात्य शास्त्रज्ञाची ज्ञानोपासना मान्य परंतु या ज्ञानाचा उपयोग ते काय करीत आहेत हें नको का पाहायला ? मनुष्यसंहाराचीं अजस्र अशीं साधने निर्माण करणें हेंच ना या त्याच्या तपश्चर्येचें फल ? नाहीं. एवढेच खास नाहीं. शास्त्रज्ञानीं समाजजीवन अनेक मार्गांनीं ऐश्वर्यसंपन्न केले आहे, त्यानीं मानवाचे काबाडकष्ट आणि दुष्काळ, रोगराई वगैरे अनेक आपत्तींचे परिहरण करण्याचीं साधनें निर्माण केलीं आहेत हें विसरूं नका.[1] प्राचीन शास्त्रकारानीं अन्नच्छत्रें घालणें, पाणपोया स्थापन करणे वगैरे समाजाच्या आर्ति दूर करणारीं कामे हीं यज्ञाच्या तोडीचींच मानलीं आहेत. या धर्मदाय कृत्याना पूर्त म्हणत व यज्ञाला इष्टि म्हणत, व हे दोन्ही शब्द इष्टापूर्त या समासात जोडीनें वापरण्यांत येत. अर्थात् समाजाच्या आपत्ति दूर करणाऱ्या व त्याचे जीवन निरामय व सुखमय करणाऱ्या ज्ञानविज्ञानाची उपासना ही तपश्चर्याच नव्हे का ?

आता शास्त्रीय शोधानीं सुखसाधनाची लयलूट करून भोगतृष्णा वाढविली आणि संहारक अस्त्रे निर्माण करून पापाच्या राशी रचल्या; अतएव पाश्चात्य शास्त्रोपासकाना आसुरी म्हणणेच योग्य असा वाद घालाल तर भारतीयानाहि आसुरी हेंच विशेषण तितक्याच यथार्थतेनें तुम्हांस लावावे लागेल. कारण भारतीयानींहि सामाजिक जीवनात आनंद व सुख ओतणाऱ्या व भोगलालसा वाढविणाऱ्या शास्त्रकलाची पाश्चात्याच्या इतक्याच उत्साहाने, जोमाने व हौसेने एके काळीं जोपासना केली होती तेंच आता पुढील प्रकरणीं पाहणें आहे. आणि संहारक शास्त्राबद्दल म्हणाल तर कोणत्याहि विद्येचा जसा सदुपयोग होतो तसा दुरुपयोगहि होत असतो. तो जसा पाश्चात्यात आढळतो तितक्याच प्रमाणात भारतीयातहि आढळतो. अगदीं वेदकाळापर्यंत दृष्टि पोहोंचवलीत तरी अथर्ववेदातील ऋचांपैकीं अर्ध्याअधिक ऋचा जारण, मारण, वशीकरण मंत्रानींच भरलेल्या तुम्हांस आढळतील. आणि अथर्ववेद सोडून सोवळा ऋग्वेद उघडलात तरी 'हे इन्द्रा, आमच्या शत्रूचें निर्दालन कर व त्याचें धन लुटून आम्हास दे'

१. द. के. केळकरकृत 'बादळी बारे' या पुस्तकांतील पहिला लेख पहा.

असल्या प्रार्थना ह्व्या तेवढ्या तुमच्या नजरेस पडतील. तेव्हापासून आतापर्यंत केव्हाहि झालें तरी सुखोपभोगाचा ह्व्यास व सत्ताधीशाचे आसुरी चाळे हे भरतखंडातहि तुम्हास आढळून येतील. ते पाहूनहि पाश्चात्य हा आसुरी आणि भारतीय हा दैवी हे पालुपद कायम ठेवावयाचें असल्यास ठेवा! पण तत्पूर्वी भारतीयाच्या आसुरी लीला आपणापुढें माडतों त्या आधीं थोड्या नजरेखालीं घाला.

प्रकरण सहावें

आसुरी भारत

दैवी संस्कृति आणि आसुरी संस्कृति हे शब्दप्रयोग प्राच्य आणि पाश्चात्य संस्कृतींना अनुलक्षून वापरण्याची रीत पडली आहे ती गैरवाजवी आहे हे दर्शविण्याकरिता पाश्चात्य संस्कृतीला दैवी, सात्त्विक, आध्यात्मिक हीं विशेषणें कशीं लावता येतील हे मागील प्रकरणीं दिग्दर्शित केलें. आता उलट बाजूनें आसुरी संस्कृति हा शब्दप्रयोग हिंदु सस्कृतीलाहि कसा लावता येईल याचीहि थोडी दिशा दाखवितो.

प्रारंभी एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे तो हा कीं, कोणत्याहि संस्कृतीचे मूल्यमापन करताना त्या संस्कृतीने माडलेलीं ध्येये जशीं लक्षात घ्यावीं लागतात त्याप्रमाणेच तिची प्रत्यक्ष व्यावहारिक वर्तणूकहि लक्षात घ्यावी लागते; आणि ही व्यावहारिक वर्तणूक जी लक्षांत घ्यावयाची ती सत्ताधीशाची घेणे हा उत्तम पक्ष. व्यक्तीच्या सात्त्विक, राजस व तामस मनोवृत्तींच्या स्वच्छद आविष्कारास जी अनुकूल परिस्थिति लागते ती सत्ताधीशानाच विशेषतः साध्य असते. ज्याच्या हातीं सत्ता नाहीं त्याची वृत्ति सात्त्विक असली तरी तिला सात्त्विक म्हटली न जाता दुर्बल म्हणवून घेण्याचाच अपमान सोसावा लागतो. तेव्हा तामसी अथवा आसुरी लीला खेळण्याचें सामर्थ्य ज्याच्या मनगटात असते अशा सत्ताधीशानीं, सिंहासनस्थ राजानीं, आपली वृत्ति कशी राखली हें पाहणें महत्त्वाचें आहे. आणि या दृष्टीनें प्राचीन हिंदु राजाच्या लीलाचा चित्रपट पाहूं लागलों तर त्या लीलाना दैवी हे विशेषण उच्चारताना जिभेला लाजच वाटेल.

लटपटीत समर्थन

हिंदुस्थानचे प्राचीन राजे म्हणजे केवळ धर्मावतार, ऋषिमुनींनीं घालून

दिलेल्या धर्माप्रमाणें प्रजापालन करणारे, साक्षात् राजर्षि अशी आपली समजूत असते. आणि जोंपर्यंत आपण रघुवंश, शाकुंतल इत्यादि काव्य-नाटकेंच फक्त वाचीत असतों तोपर्यंत ही समजूत जोमात टिकतेहि. पण या ललितवाङ्मयावरून दृष्टि काढून कौटिल्याच्या अर्थशास्त्रासारख्या व्यावहारिक ग्रंथाचीं पाने उलटूं लागलों, अथवा राजतरंगिणीसारख्या इतिहासग्रंथाची साक्ष पुसूं लागलो, म्हणजे मात्र वरील समजूत पार ठार होऊन जाते. पूर्वसंस्कार एवढे जबर असतात कीं हें कटुसत्य गिळवत नाहीं. यामुळे प्राचीनकालीन राजे हे खरोखरीच राजर्षि होते ही समजूत शक्य तर व शक्य तावर टिकवावी व जेथे न टिकता फाटू लागेल तेथें काहीं तरी लटपटीत समर्थनाचे ठिगळ द्यावें हा मोह आवरत नाहीं. या विषयासंबंधीं भारताचार्य वैद्य याचे उदाहरण देता येईल. महाभारतोपसंहारात ते लिहितात, " मगधाचे जे साम्राज्य सुरू झाले तें परराज्यास नुसतें जिंकूनच नव्हे, तर काशी व कोसल हीं राज्यें खालसा करून ! " आता परकीयाचीं राज्यें खालसा करणें हा प्रकार गैरच. तेव्हा तो आमच्या राजर्षींच्या हातून कसा घडला याची रुखरुख टाळण्यासाठीं भारताचार्य म्हणतात, " हा प्रकार पर्शियन साम्राज्याच्या अनुकरणाने झाला अशी आमची समजूत आहे " (पृ. २८४). तसेच भेदनीति, कणिकनीति ही महाभारतकाळींहि रूढ होती. तेव्हा त्याविषयीं भारताचार्य लिहितात, " परराज्यातील अधिकाऱ्याना लालूच देऊन वश करून घेण्याची युक्ति पूर्वी राजरोस चालू होती ही गोष्ट युद्धिष्ठिरास नारदाने जो प्रश्न केला आहे कीं, 'शत्रुसैन्यातील अग्रणी पुरुषास वश करून घेण्याकरिता रत्नादिकाच्या गुप्तभेटी तूं पाठवितोस ना ?' यावरून स्पष्ट दिसते." यावर भारताचार्योंचा शेरा असा आहे कीं, " मात्र भारतकाळीं हे प्रकार फारच थोडे अपवादादाखल होत असले पाहिजेत " (पृ. ३१८). कणिकनीतीविषयीं तर त्याच्या मनाची द्विधा वृत्ति झाली आहे. ते लिहितात, "कणिकनीतीचीं तत्त्वें भारतीय आर्योंनीं बहुधा ग्रीक लोकापासून उचलली असावीं, किंवा त्याच्यातच अशीं कुटिल राजनीतीचीं तत्त्वें उत्पन्न झालीं, हा प्रश्न सोडविण्यास कठीण आहे. चंद्रगुप्ताच्या वेळेपासून मात्र पूर्वीची सरळ नीति लोपून कुटिल नीति सुरू झाली " (पृ. ३२०). असलें लटपटीत समर्थन

करण्याचा मोह टाळणे हेच एकंदरींत श्रेयस्कर नाही का ?

आपल्या देशाच्या आजच्या अवनतावस्थेमध्ये प्राचीन वैभवाची स्मृति जागविणें हे आवश्यक होऊन बसते हे खरें. पण ही स्मृति ऐतिहासिक सत्यावर जितकी अधिष्ठित असेल तितकीच ती खरी उपकारक आणि उत्साहजनक ठरेल. गतकालचे काल्पनिक चित्र रेखाटून त्यात रंगून जाण्याची सवय एकदा लागली म्हणजे मग ऐतिहासिक सत्याच्या प्रखर प्रकाशाशीं नजर मिडविण्याचें आपले सामर्थ्य नष्ट होईल.

गेलीं चारपांच वर्षें हीं युद्धाच्या ज्वालानीं होरपळलेलीं वर्षें होत. उडते बाब, परमाणु बाब याच्यासारख्या आसुरी शस्त्रसंभारानें भीषण भेसूर झालेली आजची रणभूमि म्हणजे शुद्ध यमपुरी ! युरोपचें राजकारण म्हणजे सर्व आसुरी, तामसी, सैतानी राजकारण ! हें पाहून प्राचीन कालाविषयींचा अभिमान मनात गुणगुणूं लागतो, " आजच्या कालापेक्षा पूर्वीचे राजकारण खात्रीने जास्त सात्त्विक होतें, निदान आपल्या आर्यावर्तात तरी ते तसे खास होते. पूर्वीचे राजे म्हणजे राजर्षि असत. छादोग्य उपनिषत्कारानें राजा अश्वपति याच्या तोंडी आपल्या राज्यकारभाराचे वर्णन घातलें त्यात तो राजा अभिमानाने सागतो कीं, 'माझ्या राज्यात चोर नाहीं, भिकारी नाहीं, दारुबाज नाहीं, अग्नीची उपासना चुकविणारा नाहीं, अविद्वान् नाहीं, स्वैर वागणारा नाहीं. मग स्वैरिणी तर कुठल्या ?[1] तसेच रघुवशातील पुण्यश्लोक राजाचे कालिदासानें काढलेले चित्र किती सात्त्विक आणि विलोभनीय आहे. शैशवात विद्या संपादावी, यौवनामध्यें सुखोपभोग घ्यावा, वार्धक्य आलें म्हणजे मुनिवृत्तीने काळ कंठावा आणि अन्तकाळीं योगबलानें देह ठेवावा असे रघुवंशीय राजर्षींचें जीवनचरित्र असे ! आणि प्रजेशीं वागणूक म्हणजे केवळ प्रेमळ पित्यासारखी– किंबहुना त्याहून मायेची. माता-पितरानीं फक्त जन्म द्यावा पण पुढील शिक्षण, भरण, पोषण ह्या सर्वांची काळजी वाहण्याचें काम राजानें करावें ! हे आदर्श आज राहिले नाहीत. "

पण विवेकाला याची साथ करता येत नाहीं. प्राचीन भारतामध्यें

१. छांदोग्य ५.११.७.

अभिमान बाळगण्यासारखे काहीं राजर्षि होऊन गेले यात शंका नाहीं. त्याचा अभिमान जगविणें हे आपलें कर्तव्य होय. धर्माची ध्वजा अखिल भरतखंडभर फडकवून मानवानाच नव्हे तर पशुपक्ष्यानाहि शोकाचा संपर्क लागूं नये म्हणून पशूंचीं रुग्णालयें स्थापून आपले नाव सार्थ करणारा अशोक याचा अभिमान बाळगावयाचा नाहीं तर कोणाचा? हर्षवर्धन हा दर पांच वर्षांनीं आपली सर्व संपत्ति दान करीत असे ही परक्या चिनी प्रवाशाने लिहून ठेवलेली हकीकत वाचून अभिमानाचे भरतें आले तर नवल कसलें? आणि यवन, पल्हव, कुशाण, शक, हूण आदि परकीयाना देशाबाहेर पिटाळून लावून देशात स्वातंत्र्यदीप तेवत ठेवणाऱ्या मौर्य, आंध्र भारशिव, गुप्त, वर्धन राजकुलाचें स्मरण ही तर भावी स्वातंत्र्यसपादनाची जागती ज्योत. पण या योग्य अभिमानामुळे प्राचीन काळचे भरतखंडातील राजकीय वातावरण हल्लींच्यापेक्षा अधिक शुद्ध व सात्त्विक होतें अशी जर आपण कल्पना करून घेतली तर ती मात्र आपणाला टिकविणें कठीण जाईल. कशी तेच आता पाहू.

ऐतिहासिक ग्रंथाचें अध्ययनच होत नव्हते तोवर धर्मशास्त्रातून किंवा काव्यातून वर्णिलेले राजचरित वाचून प्राचीन राज्ये ही रामराज्यें होतीं अशा समाधानात डुलत राहण्यास जागा होती. चिपळूणकराच्या वेळेपर्यंत ऐतिहासिक ग्रंथ फारसे उपलब्ध नव्हते व त्या ग्रंथाकडे फारसे लक्ष नव्हतें. त्यानीं संस्कृत कविपचकातील बाणभट्ट कवीवरील आपल्या निबंधात चक्क लिहिलें आहे कीं, आपण बाणभट्टाचें हर्षचरित पाहिले नाहीं म्हणून! चाणक्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ तर १९१० मध्यें प्रथमच उपलब्ध झाला. आणि मंजुश्रीमूलकल्प उजेडात आल्याला पधरा वर्षेहि लोटलीं नाहींत. हे अर्धवट ऐतिहासिक ग्रंथ किंवा राजतरंगिणीसारखा केवळ इतिहासाला वाहिलेला ग्रंथ याना पुसले तर प्राचीन राजचरिताविषयीं ते अगदीं निराळीच साक्ष देतील. इतकी कीं ती ऐकून घेतली असता प्राचीन काळातील मानीव रामराज्याविषयीं आपल्या कल्पना साफ बदलाव्या लागतील!

अर्थशास्त्रांतील अघोरी उपाय

या ग्रंथापैकीं अर्थशास्त्र, हर्षचरित आणि राजतरंगिणी या ग्रंथातून राजशाहीचे दृश्य कसें दिसतें तें पाहूं या.

अर्थशास्त्राचा कर्ता चाणक्य याला काल्पनिक आदर्श राजर्षीचें चित्र रेखाटावयाचे नसून प्रत्यक्ष व्यवहारात राजकारण कसें दुष्ट असतें व त्यापासून राजानें स्वतःचे रक्षण कसें करावे हें सांगावयाचे होतें. राजाला सर्वांत मोठे भय दुर्व्यसनी पुत्रापासून. त्याचा बदोबस्त कसा करावा याविषयीं चाणक्यानें अनेक ग्रंथकारांचीं मतें दिलीं आहेत. तीं वाचलीं असता तत्कालीन परिस्थिति आजच्याहून भिन्न नव्हती हे ध्यानीं येण्यास वेळ लागणार नाहीं.

सतराव्या अध्यायाचे नाव 'राजपुत्ररक्षण' असे आहे. त्यात ग्रंथकार लिहितो : "जन्मापासूनच राजपुत्रावर देखरेख करीत असावें. कारण राजपुत्र हे खेकड्याप्रमाणें आपल्या जन्मदात्याचा नाश करितात. भारद्वाज म्हणतो की, राजपुत्राच्या अन्तःकरणात पित्याविषयीं स्नेह उत्पन्न न झाला तर त्याचा गुप्तपणे वध करावा. विशालाक्षाच्या मतें वध करणें राक्षसी असल्याने राजपुत्राला अंतःपुरातील बंदिखान्यात ठेवावा. पाराशरमते अंतःपुरात ठेवणे म्हणजे घरात साप बाळगण्यासारखे असल्याने सरहद्दीवरील किल्ल्यात ठेवावा. वातव्याधी म्हणतो कीं, सर्वांत बिनधोक्याचा मार्ग म्हणजे त्याला क्षुद्र विषयोपभोगाचा नाद लावावा व बदिवासातच सुख वाटेल असे करावे. पण कौटिल्याच्या मतें योग्य उपचार म्हणजे राजपुत्रास चागलें शिक्षण देणें हा होय." शेवटल्या कौटिल्याच्या मतावरून तो उरफाट्या काळजाचा मुत्सद्दी होता ही समजूत नाहींशी होईल; मात्र व्यावहारिक सृष्टीकडे पाठ फिरवून काल्पनिक सृष्टींत रंगणारा तो नव्हता. ज्याना राज्यकारभार यशस्वी रीतीनें हाकावयाचा आहे त्याना लौकिक व्यवहारातील दुष्टपणा आणि निष्ठुरपणा नीट उमगून घ्यावा लागतो व काटा काढावयास काटाच हातीं घ्यावा लागतो. कौटिल्याने ह्या व्यावहारिक दृष्टीनें आपला सर्व ग्रंथ लिहिलेला आहे.

त्याच्या ग्रथातील ९२ वा अध्याय 'कोषसंग्रह' असा आहे. त्यात अनपेक्षित खर्चाचे प्रसंग उपस्थित झाले असता कोषसंग्रह कसा करावा हे सांगितलें आहे. त्यात ग्रंथकार लिहितो, "सोनें, रुपें, हिरे, हत्ती, घोडे याचा व्यापार करणाराकडून उत्पन्नाचा ५० वा भाग परवान्यादाखल कर घ्यावा. वेश्यागृहें चालवणारांनीं राजाच्या नोकरींतील अत्यंत सुंदर व

तरुण वेश्याच्या मदतीनें अपार द्रव्य मिळवावें. कराची मागणी पुन्हा करावयाचा प्रसंग उपस्थित झाला असता. वसुली अधिकाऱ्यानें लोकोपयोगी कार्याची सबब सांगून पौरजनापासून वर्गणी जमवावी. सरकारच्या बगलबच्चानीं सर्वांआधीं खूप मोठ्या रकमा द्याव्या. मग त्याचें उदाहरण दाखवून खुद्द राजानें पुन्हा लोकाच्याजवळ पैशाची याचना करावी. पाखंडी लोकाच्या संघाचे द्रव्य व श्रोत्रियाखेरीज इतराच्या उपयोगाकडे जाणारें देवद्रव्य याचा ज्या माणसाकडे ते ठेवले होतें तो मरून गेला असे सांगून अधिकाऱ्यानीं राजाकरिता अपहार करावा. अथवा रात्रीच्या वेळीं एखादें भूमींतून निघालेले स्वयंभू लिंग निर्माण करून तत्प्रीत्यर्थ यात्रा किंवा उत्सव करण्याच्या निमित्ताने द्रव्य गोळा करावें. तसेंच, साध्वी स्त्रियाचें सोंग घेतलेल्या स्त्रीहेरानीं राजद्रोही माणसास नादीं लावून आपल्या घरीं आणावे व मग त्याच्यावर खोटे आळ घेऊन त्याना सर्वस्व ओकावयास लावावें. मात्र याप्रमाणे राजद्रोही व अधार्मिक लोकाशींच वागावे." कौटिल्याच्या वरील उताऱ्यावरून प्राचीन भारतातील कपटी राजव्यवहाराची सामान्य कल्पना येईल. शांतिपर्वांतर्गत राजधर्मांत अगदीं असेंच वर्णन आलेलें आहे, कीं एखाद्याचा घात करावयाचें ठरले म्हणजे राजे लोक हे विष, वह्नि, शस्त्र व माया अशा अनेक उपायानीं झोपलेला, गुंगलेला, शिंगलेला अशाना कंठस्नान घालीत असतात (अ. १२९).

आता कपटाची आणि विश्वासघाताचीं प्रत्यक्ष ऐतिहासिक उदाहरणे अवलोकन करण्याकरिता आपण बाणभट्टाच्या हर्षचरित या ग्रथाकडे वळूं. हर्षाचा पिता वारल्याची खबर कळताच माळव्याच्या राजाने हर्षाच्या मेहुण्याचा खून केला आणि याचा सूड घेण्याकरिता हर्षाचा बंधु चाल करून गेला असता गौड देशाच्या राजाने त्याला विश्वासघातानें गारद केलें. या दुहेरी दुःखाने व अपमानाने चिडून हर्षानें आपला हस्तिदलावरील सेनापति स्कंदगुप्त यास सैन्य सज्ज करण्यास आज्ञा केली. त्या प्रसंगीं संधि साधून स्कंदगुप्तानें हर्षास सावधगिरीने वागण्याविषयीं विनंति केली व विश्वासघाताचीं पूर्वीचीं उदाहरणें दाखवून दिलीं. यावरून कपट व विश्वासघात कसा होत असे याची कल्पना येईल.

विश्वासघाताचीं ऐतिहासिक उदाहरणें -

स्कंदगुप्त म्हणतो, "गैरसावधपणाचा कसा फायदा घेतला जात असे तो नीट ध्यानीं घ्या. पद्मावतीचा नागसेन याचें अर्धे राज्य त्याच्या मर्त्यानें बळकावले होतें. ते त्याच्या हातून परत घेण्याची मसलत चालली असता ती पिंजऱ्यातल्या सारिकेने ऐकली व सारिकेच्या करवीं मंत्र्याच्या कानावर जाऊन मंत्र्याने राजालाच गारद केले. श्रावस्तीचा राजा श्रुतवर्मा याची हीच हकीकत. त्याची मसलत एका पोपटानें ऐकली आणि या गाफिलपणाबद्दल त्याला राज्य गमवावें लागलें. मृत्तिकावतीचा सुवर्णचूड याचे मरण ओढवले ते तो आपली मसलत स्वप्नात बरळला म्हणून. मथुरेचा राजा बृहद्रथ हा अधाऱ्या रात्रीं कोठें गुप्तधन खणीत असता तेथेच मारला गेला. वत्स देशाचा राजा उदयन याला पकडण्याकरिता अवन्तीच्या चण्डमहासेनाने लाकडी हत्तीचा उपयोग केला. सुमित्र राजा नेहमीं नटामध्ये रमलेला असे. त्याचा फायदा मित्रदेव नावाच्या त्याच्या शत्रूने घेतला. तो असा कीं मित्रदेवानें नटाचे सोग घेतलें आणि संधि साधून एखादं कमळ तोडावे तसें सुमित्राचे शिरकमल कापून काढले. अश्मक देशाचा राजा हा गायनवादनाचा षोकी होता. तेव्हा त्याच्या शत्रूनीं काय केलें, कीं गायकमडळी त्याच्याकडे पाठवून दिली. ह्या मंडळींतील प्रत्येकजण कडवा शिपाई होता व तंबोऱ्याच्या पोकळ दाडींत त्यानीं आपल्या तरवारी गुप्तपणें ठेवल्या होत्या. त्याचा उपयोग कसा केला हे सागावयास नकोच. सेनापति पुष्यमित्र याने राज्य कसे बळकावले, तर राजेसाहेबाना सैन्याची पाहणी करण्याची त्यानें विनंति केली आणि राजा गैरसावध असता त्याचा वध केला. चंडपति राजाला नाद होता जादूचा; तर त्याच्या शत्रूंनीं काय केले, कीं त्याच्या पदरच्या यवन गुलामाकडून एक विमान तयार करविले. मग राजा त्यात आरूढ झाल्यावर विमान जें उडालें तें परत आलेंच नाहीं ! शुंग घराण्याचा शेवटचा देवभूति याला कटिशूलाची व्यथा होती. या मर्माचा फायदा त्याचा अमात्य वसुदेव यानें घेतला व एका सुरूप दासीकरवीं त्याचा खून केला. विदेहाच्या एका राजाला औषधी रसायनांचा छंद होता. हें ओळखून त्याच्या शत्रूंनीं एका वैद्याच्या हस्तें त्याच्या पुत्राला असें रसायन दिलें, कीं त्याला क्षयरोग जडला.

स्त्रीजनावर विश्वास ठेवल्यानें कलिंगेश्वर भद्रसेन हा अंतःपुरातील भिंतींत लपून बसलेल्या भावाच्या तरवारीस बळी पडला. करुण देशचा राजा दध्र यानें एका पुत्राला युवराज करण्याचें ठरविल्यावरून दुसऱ्या पुत्राने आपल्या आईच्या गादीखालीं लपून बसून आपल्या बापाला कंठस्नान घातले. मौखरी राजा क्षत्रवर्मा हा आपल्या स्तुतिपाठक भाटावर फिदा असे. तो शेवटीं एका तोतया भाटाकडूनच मारला गेला. शकपति हा कामिनीसक्त असून चंद्रगुप्ताची भावजय ध्रुवदेवी हिच्यावर आसक्त होता. तेव्हा चंद्रगुप्ताने ध्रुवदेवीचा वेष घेऊन शत्रूच्या गोटात जाऊन शकपतीचा वध केला. वगैरे वगैरे."

बाणभट्टाने दिलेलीं हीं उदाहरणे काल्पनिक नसून परंपरेने ऐतिहासिक म्हणून समजत गेलेलीं अशींच दिलीं आहेत. अन्तःपुरातील खुनासंबंधाने जीं उदाहरणे दिलीं आहेत त्याना मेग्यास्थेनिसचाहि पाठिंबा आहे. तो लिहितो कीं, आपल्यावर गुप्त हल्ला होऊं नये म्हणून राजेलोक रात्रींतून अनेकदा आपला बिछाना बदलत असतात.[1] चंद्रगुप्ताने स्त्रीवेषानें शकपतीचा वध केला ही काल्पनिक कथा असावी असा व्हिन्सेंट स्मिथनें संशय प्रकट केला होता; पण नंतर उपलब्ध झालेल्या नाट्यदर्पण नावाच्या ग्रंथात देवीगुप्त नावाच्या नाटकातील जे उतारे दिले आहेत त्यावरून वरील प्रकार ऐतिहासिक म्हणूनच परंपरेनें चालत आला असावा असे दिसतें. या उदाहरणाप्रमाणे इतरहि ऐतिहासिक असावींत आणि तीं लक्षात घेतली म्हणजे भरतखंडातील पूर्वीचे राज्य हे रामराज्य नसून आजच्यापेक्षा फारसे भिन्न नव्हतें हें लक्षात येईल.

राजतरंगिणींतील राक्षसी मगर

आता राजतरंगिणी या खास इतिहास-ग्रथाकडे वळूं या. संस्कृत वाङ्मयाच्या अफाट विस्तारात खास इतिहासाला वाहिलेले ग्रंथ अत्यल्प आहेत. जे आहेत त्यात राजतरंगिणीचा दर्जा फार मोठा आहे. या ग्रंथाचा कर्ता कल्हण हा अमात्याचा पुत्र असल्यानें त्याला राजकीय व्यवहाराची पूर्ण माहिती होती. पूर्वग्रंथांचा, दंतकथाचा, व शिलालेख, ताम्रपट, शासनें

१. Ancient India by Megasthenes, p. 70.

यांचा त्यानें अभ्यास केला होता. तो लिहितो, कीं जुनीं शासनपत्रें पाहून व भ्रामक समजुती दूर सारून मी हा इतिहास लिहीत आहें.

दृष्टैश्च पूर्वभूमृत्प्रतिष्ठावस्तुशासनैः
प्रशस्तिपट्टैः शास्त्रैश्च शान्तोशेषभ्रमक्रमः ॥ १।१५

याहूनहि विशेष म्हणजे इतिहासकाराच्या अंगीं अवश्य असणाऱ्या निरीक्षण-शक्ति, विवेचकपणा व निःस्पृहता ह्या तिन्ही गुणाचे वास्तव्य त्याच्या ठायीं होतें. यामुळें राजतरंगिणीतील शेवटच्या भागाइतका विश्वसनीय इतिहास संस्कृत वाङ्मयात हाच होय. काश्मीरमध्ये मार्तंडाचे मंदिर विख्यात आहे. त्या जागीं रणादित्य व ललितादित्य यानीं दोन मंदिरे बांधलीं असे कल्हणानें लिहिले आहे. पण आजवर मंदिर तर एक दिसे. तेव्हा कल्हणाचें विधान निराधार असावें असें वाटे. पण उत्खननान्तीं दुसऱ्या मंदिराचा पाया सापडला, व कल्हण खरा ठरला[१] ! त्याच्या या ग्रथात काश्मीरचा इतिहास येट कौरव-पाडवापासून सुरुवात करून बाराव्या शतकापर्यंत आणुन सोडला आहे. पैकीं इ० सनाच्या सहाव्या शतकापूर्वीचा इतिहास दंतकथावर उभारलेला असला तरी नंतरचा ऐतिहासिक साधनावर उभारलेला आहे. तरी ह्या पुढील काळच्या इतिहासपटावरून विहंगदृष्टि टाकू म्हणजे या कालांतील राजे लोकाचे चरित्र ध्यानीं येईल. हें चरित्र म्हणजे वैषयिक आणि तामसी लीलाचें साक्षात् प्रदर्शन होय !

इ. स. ५९९ मध्ये कर्कोटक वंशाचा पहिला प्रतापादित्य हा राजा गादीवर बसला तेथून पुढचा इतिहास विश्वसनीय असा आहे. प्रतापादित्यानंतर त्याचा पुत्र राजा दुर्लभक गादीवर आला. तो आपल्या राज्यातील नोण नांवाच्या सावकाराच्या घरीं एक दिवस मेजवानीस गेला असता सावकाराची लावण्यवती स्त्री नरेंद्रप्रभा हिला पाहून अत्यंत मोहित झाला. पुढें कामकाजावरचें त्याचें लक्ष उडालें व तो मनात झुरूं लागला. सावकाराला ही गोष्ट कळल्यावर त्यानें राजाकडे जाऊन विनंति केली कीं, " महाराज, आपली प्राणांतिक अवस्था झाली असतां धर्माधर्माच्या अडचणी कसल्या घेऊन बसला आहात ? 'न प्राणसंशये जन्तोः अकृत्यं

१. Revealing India's Past, p. 201.

नाम किंचन ॥ ४।३२' हरकत वाटत असली तर नरेंद्रप्रभेस मी नर्तकी म्हणून अर्पण करितो. तेथून तिचा आपण स्वीकार करावा."

यानंतरचा ललितादित्य मोठा पराक्रमी होता. त्यानें अनेक दिग्विजय करून सर्व पृथ्वी जणों सुवर्णमय करून सोडली. पण हा राजा इंद्राहूनहि श्रेष्ठ असता कल्हण लिहितो कीं, त्याच्या हातून एक फार अनुचित गोष्ट घडली. गौड देशाचा राजा हा सर्व सैनिकांसह एकदा शारदेच्या दर्शनास आला होता व ललितादित्याने परिहासकेशवाच्या भव्य मूर्तीच्यापुढे उभे राहून गौड राजाच्या रक्षणाची हमी घेतली होती. पण शेवटी विश्वासघात करून त्यानें गौड राजाला मारेकऱ्याकरवीं ठार केले ! (४।३२३). गौड सैनिकांनीं मात्र मालक मारला गेलेला व परत जाण्याचा मार्ग अतिशय दूर अशा बिकट परिस्थितींतहि शौर्यानें लढून धारातीर्थी देह अर्पण केले. कल्हणाच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे त्याच्यासारख्या स्वामिनिष्ठेचें दुसरे उदाहरण विधात्यालासुद्धा क्वचितच दाखवता आले असते.

यानंतरचा वज्रापीड हा क्रोधी व विषयलंपट होता. त्याच्या अंतःपुरात असख्य स्त्रिया असून त्याच्याशीं तो सारखा रममाण झालेला असे. त्यानें पुष्कळसे लोक धरून गुलाम म्हणून म्लेच्छास विकण्यासहि कमी केले नाहीं ! (४।३९७). पुढे पृथ्व्यापीड व नंतर ललितादित्याचा नातू जयापीड हे सिंहासनारूढ झाले. जयापीड दिग्विजय करीत दूरदेशीं गेला असताना त्याचा शालक जज याने विश्वासघात करून गादी बळकावली. पण तीन वर्षांनीं जज मारला गेल्यावर जयापीडाने पुन्हा राज्यसूत्रें हातीं घेतलीं, विनयादित्य असे नाव धारण केलें व अनेक साहसी पराक्रम करून दिग्विजय केला. पण पुढे, कल्हण सांगतो कीं, प्रजेच्या दुर्भाग्यामुळें तो अनन्वित जुलूम करू लागला. तो इतका लोभी बनला, कीं तीन वर्षेपर्यंत शेतकऱ्यांनीं पैदा केलेली झाडून सारी संपत्ति त्यानें जबरदस्तीनें हरण केली ! या लोभमूर्तीला परस्व हरण करणारे व त्यातील अत्यल्प सरकारात मरणारे नीच कामगार हे हितकर्ते वाटूं लागले. या राजाच्या त्रासाला कंटाळून पुष्कळ ब्राह्मण देशान्तराला निघून गेले व पुष्कळांनीं आक्रोश करून प्राण सोडले ! पण राजाला त्याची फिकीर नव्हती. त्यानें बेपर्वाईनें एवढीच आशा केली कीं नव्याण्णव ब्राह्मण प्राण टाकतील तेव्हा मला वर्दी देत

जावी ! (४।६३३). या विक्षिप्त आज्ञेनें हताश होऊन चंद्रभागा नदीमध्यें अनेक ब्राह्मणानीं जलसमाधि घेतली. शेवटीं इट्टिल नावाच्या ब्राह्मणाच्या ब्रह्मदण्डाला तो बळी पडला.

याच्यानंतर गादीवर बसलेला त्याचा पुत्र ललितापीड हा तर बापसे बेट, सवाई निघाला. बापाने पापकर्माने मिळविलेली सर्व संपत्ति त्यानें वारांगना व नट याच्यावर उधळली. थोड्याशा स्त्रियावर तृप्त राहणाऱ्या आपल्या बापाला तो वेडा लेखी ! उनाड स्त्रियानीं कुरतडलेले केस व त्याच्या नखानीं व्रणित झालेले वक्षस्थळ हे त्याला किरीट-कटकाहूनहि भूषणास्पद वाटे. ग्राम्य थट्टा करण्याची त्याला मोठी दुष्ट खोड होती. तो दरबारात जाताना गणिकाना बरोबर घेऊन जाई व त्याच्यासमोर वृद्ध मंत्र्याना बायकी झगे घालावयास लावी ! (४।६७०).

या राजानंतर सात वर्षे संग्रामपीडाने राज्य केल्यावर ललितादित्याच्या एका नाटकशाळेचा पुत्र बृहस्पति हा गादीवर आला. तो तरुण असताना त्याचे उत्पलादि पाच मामा कारभार पाहत असत. भगिनीच्या सौंदर्य-बळावर केवळ त्याना चैन भोगावयास मिळाली होती. भाचा वयात येताच त्यानीं अभिचार करवून त्याचा प्राण घेतला; व त्यानंतर वज्रादित्य नावाच्या राजकुलातील एकाला उत्पलानें जबरदस्तीनें गादीवर बसविलें. तो नुसता नामधारी राजा असून राज्याचें सारें उत्पन्न उत्पलादि बंधु गडप करीत. कल्हण लिहितो, अरण्यात मरून पडलेल्या वनमहिषाच्या कलेवरावर लाडगे झगडत ताव मारीत असतात तसे ते बंधु राज्याचा फडशा पाडीत होते. (४।६९४).

लवकरच कर्कोटकवंशीय राजे नष्ट होऊन इ. स. ८५५ मध्यें राजा अवंतिवर्मा हा सिंहासनारूढ झाला. येथपासून पुढची हकीकत कल्हणानें सविस्तर व संगतवार वर्णिलेली आहे. या कालखंडातील इतिहासाचीं साधनें भरपूर उपलब्ध होतीं; व शेवटच्या काहीं वर्षांतील घडामोडी तर ग्रंथ-कर्त्यानें आपला पिता अमात्यचंपक याजकडून ऐकलेल्या व काहीं प्रत्यक्ष पाहिलेल्या होत्या. अर्थात् या कालखंडातील इतिहास विश्वसनीय मानण्या-

सारखा आहे. पण तो असा आहे, कीं तो वाचीत असताना आपल्या संस्कृतीच्या अभिमान्याना क्षणोक्षणीं मान खालीं घालावी लागेल !

या तीनशें वर्षांच्या विश्वसनीय इतिहासात पहिला राजा अवंतिवर्मा एवढाच मुख्यतः कर्तबगार व प्रजाहितदक्ष राजा आढळतो. त्याने आपल्या सापत्नबंधूला युवराजाचे अधिकार अर्पण करून कुटुंबातील लोकाना खूष केले. काश्मीर-मडलात विद्येचा प्रसार विच्छिन्न झाला होता, त्याचे यानें पुनरुज्जीवन करून विद्वानाना असे ऐश्वर्य दिले, कीं ते राजेलोकाना योग्य अशा शिबिकातून दरबारात येत. वितस्ता नदीचें व महापद्म सरोवराचें पाणी वाहून पिकाची नासाडी होत असे, त्याची सुय्य नावाच्या एका चतुर कारागिराला हाताशीं धरून त्याने पाट फोडून व्यवस्था केली. अशा रीतीनें अनेक वर्षे राज्य केल्यावर प्राणांतिक रोग झालेला पाहून त्रिपुरेश पहाडावरील जेष्ठेश्वराच्या देवालयात तो जाऊन राहिला व आषाढ शुद्ध तृतीयेच्या दिवशीं त्याने तेथेच आनंदाने देहत्याग केला ! (५।१२६).

यानंतरचा काश्मीरचा इतिहास म्हणजे अन्याय, मत्सर, दुराचार याचाच जणूं इतिहास होय. तो वाचीत असता चाणक्याने वर्णिलेले आसुरी उपाय हे प्रत्यक्ष कसे अंमलात आणले जात याची खात्री पटेल. अवंतिवर्म्याने देह ठेवताच पूर्वीच्या उत्पल घराण्यातील अनेक राजपुत्रानीं गादीसाठीं उचल केली; व एका मंत्र्याने शंकरवर्मा याला गादीवर बसविलें तर दुसऱ्यानें सुखवर्म्याला युवराज केलें. यामुळे राजा व युवराज याच्या-मध्येंच लढाया सुरू झाल्या. शंकरवर्म्यानें लवकरच युवराजाचा पराभव केला व अनेक दिग्विजय केले; पण स्वतःच्या प्रजेसच पिळून काढण्यास मागें पुढें पाहिले नाहीं. कल्हण लिहितो कीं, कीर्तिरूप विमल निर्झरोदकात अवगाहन केलेल्या राजानीं गजाचें अनुकरण करून व्यसनासक्तिरूपी धुळीनें स्वतःला पुनः मलिन करावे हे किती चमत्कारिक ! पण हा चमत्कारच या इतिहासात सर्वत्र भरलेला दिसतो.

शंकरवर्म्यानें नाना तऱ्हेच्या युक्त्या योजून पुष्कळशा देवमंदिरातून पैसे उकळण्याचा सपाटा चालविला. या अधम चोराने दोन नवे कर वसूल करण्याकरिता अट्टपतिभाग व गृहकृत्यभाग नांवाच्या कचेऱ्या स्थापन केल्या. तसेंच देवालयातून लागणाऱ्या धूप, चंदन, तेल वगैरेंच्या किंमती

अन्यायाने वाढवून त्यांच्या विक्रीतून आलेला सर्व नफा आपला राजभाग म्हणून तो स्वतः घेऊ लागला (५।१६८). त्याने चौसष्ट मंदिरें लुबाडलीं व त्याना काहीं नगदी नेमणुका करून दिल्या. तसेंच प्रत्येक गाववाल्याकडून वेठ करविण्याची व त्याच्याऐवजीं नगदी दंड वसूल करण्याची पद्धति या काश्मीर-मंडलात प्रथम त्यानेच सुरू केली. त्याच्यामुळें सर्व गाव दरिद्री झाले. प्रजेला होत असलेलें दुःसह दुःख पाहून युवराज गोपालवर्मा याचे मन फार कळवळलें व तो राजाला म्हणाला, "महाराज, हे नवे कर प्रजेला अत्यंत प्राणहारक होत आहेत; तरी ते महाराजानीं रद्द करावेत असे महाराजाजवळ माझे नम्र मागणे आहे." त्यावर राजाने उत्तर केले, "मी लहान असताना तुझ्याप्रमाणेंच माझेहि अतःकरण दयार्द्र होते. **पण गर्भवासांतील पीडेचा प्राण्याला विसर पडतो त्याचप्रमाणें गादीवर बसतांच राजाला पूर्वीच्या सर्व विचाराचें पार विस्मरण होतें!**

गर्भवासव्यथा जातः शरीरी विस्मरेद्यथा
प्राप्तराज्यः तथा राजा नियतं पूर्वचिन्तितम् (५।२०१).

तेव्हा तूच मला असे वचन दे कीं, तूं गादीवर बसलास म्हणजे प्रजेला मजपेक्षा अधिक त्रास व पीडा देणार नाहींस!" हा राजा उत्तरापथात गावे उध्वस्त करीत चालला असता शेवटीं एका चाडालाने सोडलेल्या तीराला बळी पडला. मन्त्र्यानीं त्याचे सैन्य परकीय देशातून मोठ्या शौर्याने संभाळून परत आणलें. सहाव्या दिवशीं ते आपल्या हद्दीच्या गावीं पोहोचले. तोंपर्यंत त्यानीं राजाच्या मरणाची बातमी युक्तिप्रयुक्तीने गुप्त ठेवली होती. ती अशी कीं, वाटेत माडलिक राजे दर्शनाला येत तेव्हा त्या राजाच्या निर्जीव मस्तकाला दोऱ्या बाधून (यन्त्रसूत्र) वरखालीं करून प्रतिप्रणाम करवीत! राजाच्या मृत्यूची घटका ही त्या कालीं बहुशः बडाळीची मुहूर्तघटिकाच ठरत असे. कल्हणाच्या पूर्वी हजार दीड हजार वर्षे होऊन गेलेल्या चाणक्यानेंहि राजाच्या मृत्युसमयीं अशीच दक्षता बाळगावी असाच इशारा दिला आहे. ९६ व्या अध्यायात तो लिहितो कीं, "राजाचा अन्तकाळ होण्याचा संभव आहे अशी भीति वाटूं लागण्याच्या आधीपासूनच राजाच्या मित्रमंडळास वश करून अशी पद्धति सुरू करावी, कीं

प्रजाजनास राजाची भेट महिन्यातून किंवा दोन महिन्यातून एकदाच होत जाईल. भेटीचा प्रसंगच येईल तेव्हा तोतया राजाचें दर्शन देत जावें. त्याच्याबरोबर संभाषण करण्याचा प्रसंग येऊन पडलाच तर अमात्यमुखानें भाषण करावें." चाणक्याच्या या इशाऱ्यावरून हजार दीड हजार वर्षांत तरी या बाबतींत स्थिति एकच दिसते. असो.

कामांध राजेराण्या

शंकरवर्म्यानंतर त्याचा अल्पवयी पुत्र गोपाळवर्मा गादीवर बसला व त्याची आई राणी सुगंधा ही त्याची पालक म्हणून कारभार पाहूं लागली. ही राणी दुर्वर्तनी असून कोषाध्यक्ष प्रभाकरदेव याच्याशीं लागू होती. त्याच्या चरणीं तिने सर्व संपत्ति अर्पण केली. बालराजाला या गोष्टी कळू लागताच त्यानें चौकशी आरंभिली. पण प्रभाकरदेवाने अभिचार करवून बालराजाला ठार करविलें ! पुढे त्याचाच भाऊ संकटवर्मा याला गादीवर बसविण्यात आले. पण तोहि लवकरच मरण पावल्यामुळे राणी सुगंधा हिनें स्वतः मुकुट धारण केला. लवकरच पुन्हा एकदा आपल्या तंत्रानें वागणाऱ्या निर्जितवर्मा या राजकुमाराला गादीवर बसविण्याचा तिने विचार चालविला. पण मंत्रिमंडळानें निर्जितवर्म्याऐवजीं त्याचा अल्पवयस्क पुत्र पार्थ याला गादीवर बसविले ! अशा रीतीने पितापुत्रातच लढाई जुपली; आणि जयापजयान्वये कधीं पार्थानें राजा व्हावे तर कधीं त्याचा पिता निर्जितवर्मा यानें व्हावें असा लपंडावाचा खेळ सुरू झाला ! शिवाय निर्जितवर्म्याच्या राण्याहि दुर्वर्तनी निघाल्या. कल्हण लिहितो कीं, सुगंधादित्य नावाचा एक मंत्री या राण्याशीं लागू असे. गाढालिंगनाच्या द्वारें तो बप्पटदेवीला खूष करी व तीहि त्याला अगणित द्रव्य पुरवी (५।२८२). दुसरी राणी मृगावती हीहि सुगंधादित्याच्या गळीं पडून त्याची रखेली बनली होती. तो या दोघा राण्याची कामना आळीपाळीनें पुरवीत असे. आपआपल्या पुत्राना राज्य मिळवून देण्याच्या स्पर्धेनें सुगंधादित्याला स्वशरीरभोग व पैसा देण्यात त्या दोघा राण्याची जणों चढाओढ लागली होती. शिवाय निरनिराळ्या मंत्र्यांची चढाओढ असे ती निराळीच. या एकंदर घालमेलीचें वर्णन करतांना कल्हण लिहितो कीं, नर्दीतील तिमी मासा इतर

पतिमींना खातो, त्याला ध्यानी बगळा गट्ट करतो, त्याची शिकार व्याध करतो, असा हा प्रकार होता.

शेवटी बप्पटदेवीचा पुत्र चक्रवर्मा याला गादी मिळाली. दुर्वर्तनी आईचाच मुलगा तो ! त्याच्या विक्षिप्त लीलाचे वर्णन काय करावें ! कल्पनेलाहि न सुचणारे असे गुण याने उधळले. रग नावाच्या एका डोबाच्या हंसी नावाच्या मुलीवर तो इतका फिदा झाला, कीं त्याने तिला पट्टराणी केलें. ही हलकट राणी अग धुतल्यावर आपलीं आर्तवानें अंकित झालेलीं वस्त्रे मंत्र्याना इनाम देई ! व कल्हण सागतो कीं, असलीं गलिच्छ वस्त्रे डौलाने अगावर मिरवून मंत्रीमंडळी राजसभेत येत ! !

ऋतुस्नातार्तवाङ्कानि श्वपाकी स्वाशुकान्यदात्
तदाच्छादनदृष्टेच्छा मंत्रिणः प्राविशन्सभाम् ॥ (५।३९२).

इतकेंच नव्हे तर त्या श्वपाकीचे उष्टे खाण्यासहि ही मंत्रिमडळी तयार असत ! या नतदृष्ट राजाने आपल्या मातंगीगमनाच्या प्रायश्चित्ताबद्दल एकदा विटाचे मत विचारले. त्यावर खुषमस्कऱ्यानीं सांगितलें कीं, हिमानें हिम शमते तसे एका पापाने दुसऱ्या पापाचा परिहार होतो ! हे ऐकताच खूष होऊन राजाने आपल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून महिनाभर उपोषित व व्रती असणाऱ्या एका विप्राच्या पतिव्रता पत्नीवर बलात्कार केला ! (५।४०२). शेवटी हा दैत्य त्या मातगीच्या महालात असतानाच पूर्वी ज्याचा त्यानें विश्वासघात केला होता अशा एकाकडून मारला गेला.

पण काश्मीरचे नष्टचर्य एवढ्यानेच सपले नव्हतें. दुराचाराचे माप पुरेपूर भरलें नव्हते म्हणूनच कीं काय, याच्यानंतर गादीवर बसलेला अवतिवर्मा हा त्याहूनहि क्रूर निघाला. कल्हण लिहितो कीं, या अवंतिवर्म्याच्या पापमय कथेच्या विटाळाची माझ्या काव्यसरस्वतीलाहि भीति पडली आहे; पण तिला एखाद्या बिचकलेल्या घोडीप्रमाणे मी कशी तरी चुचकारून धरीत आहें. पाण्यापासून निघणारा वडवाग्नि पाण्यालाच खातो तसे या राजानें पितृकुलच खाऊन टाकिलें. टकरा मारून, व नाकाने, खाद्यानीं, काखानीं व डोक्याच्या कवचीवर आघात करून सूर काढणाऱ्या हलकट लोकाना त्यानें आपले मंत्रि नेमलें. या मंत्र्यामध्ये ज्या मत्र्यावर राजाची बहाल मर्जी होती तो पर्वगुप्त नावाचा मत्री भरसमेंत कमरेचें सोडून

नागवा नाचे ! ! (५।४२०) या पर्वगुप्ताने राजाकडून आपला पिता पार्थ याचें सर्वस्वहरण करविले व राजकुलातील बहुतेक मंडळींना ठार मारविलें. पुढें राजाच्या विश्वासातील कांहीं मत्र्यांनीं राजपिता पार्थ ज्या विहारात जाऊन राहिला होता त्या विहाराला वेढा देऊन पार्थालाहि मारून टाकिलें. हें वर्तमान ऐकून राजाला फार हर्ष झाला व तो ते दृश्य पाहण्यासाठीं समक्ष तेथे गेला व ते पाहून मोठ्यानें हसला. हा राजा म्हणजे क्रूरपणाची जणू मूर्तिच होती ! कामकरी मजुराची सहनशक्ति अजमविण्यासाठीं तो त्याचे अवयव तोडी, गर्भाची स्थिति पाहण्यासाठी तो गर्भिणीचे पोट चिरून पाही, व निशाणबाजीचा अभ्यास करताना नागड्या-उघड्या स्त्रियाच्या स्तनमध्यभागीं जंब्रियाने निशाण मारी ! ! (५।४४०,४१).

पुढील राजा यशस्कर याच्या कारकीर्दीचीं पहिलीं कांहीं वर्षे प्रजेला सुखाचीं गेलीं. कल्हण लिहितो की, त्याच्या अमदानीत चोराचे नाव नाहींसें झालें; त्याच्या राज्यात विप्रगुरूनी सामगायनप्रसगीं मदिरापान सोडलें; तपस्वी लोकानीं पुत्र, दारा, धनधान्याचा त्याग केला, मूर्ख गुरूंनीं मत्स्या-दिकानीं यज्ञ करणे व स्वतःच प्रक्षिप्त श्लोक रचून परपरागतशास्त्राचे संशोधन करणे सोडून दिले; मोदू गुरूकडून दीक्षा घेतलेल्या गृहिणी स्त्रियानीं स्वतः देवता बनून मस्तक हलवीत आपल्या भर्त्याच्या उज्ज्वल शीलाचा निषेध करणे सोडून दिलें (६।९–१३). पण पुढे अनेक पाप्यानी भ्रष्ट केलेल्या काश्मीरच्या गादीचा गुण याच्यातहि उतरूं लागला. वैद्याने रोग्याला पथ्य सागावे व स्वतः कुपथ्य करावे तद्वत् लोकाचा न्याय करणारा हा राजा स्वतःच अन्यायानें वर्तूं लागला. त्याचा वडील भाऊ एकाएकीं वारला व राजाला हर्ष झाला. यावरून राजाने स्वतः शोधून काढलेल्या विषाचा प्रयोग भावावर झाला असावा अशी विचारवंताना शंका आली. एका वेलावित्ताचे त्याच्या राणीशीं सूत जमले होते त्याच्याकडे डोळेझाक करून उलट त्या वेलावित्ताला त्यानें सचिव केले. तसेच लल्ला नावाच्या एका वेश्येला प्रमुख राणीच्या पदावर बसविलें. या लल्लेचा रात्रीं पहाऱ्यावर असणाऱ्या एका पहारेकऱ्याशीं वाकडा सबध होता या राजाला शेवटी उदर झाले; पण तो लवकर मरेना म्हणून त्याचे राज्य हरण करण्यास उत्सुक झालेल्या त्याच्या आप्तानीं त्याला विष दिलें !

अन्तःपुरांतील अभिचार

पुढील क्षेमगुप्त याच्या लीलाचे वर्णन कल्हणाने असे केलें आहे कीं, तो जवळ राहणाऱ्या वृद्ध लोकाच्या दाढीवर थुंके, त्याना अश्लील शिव्या देई व त्याच्या डोक्यावर थापड्या मारी. स्त्रिया त्याच्याशीं कटिसंघटन करून, शिकारी राना-वनात त्याच्याबरोबर एकटे-दुकटे हिंडून व लबाड विट चावटपणा करून त्याची कृपा संपादीत असत. हे निर्लज्ज विट आपल्या स्त्रियाचा त्या राजाच्या कामवासनेला बळी देऊन कोणाची स्त्री अधिक पसत पडते असे निर्लज्जपणे विचारीत (६।१६५). हा राजा देवीच्या साथीला इ. स. ९५८ सालीं बळी पडल्यावर त्याच्या अल्पवयी मुलाना गादीवर बसविले, तरी खरी सत्ता त्याची राणी दिद्दा हिच्या हातीं गेली. ही दिद्दा राणी म्हणजे काश्मीरच्या भ्रष्ट व आसुरी राज्यश्रीची चालती बोलती मूर्तिच होती. तिने अभिचार व इतर मार्गांनीं आपल्या अधिकाराच्या वाटेतील अनेक मंत्र्याचे काटे दूर केले. तिचा अल्पवयी पुत्र मेल्यावर तिने आपल्या नातवाला गादीवर बसविले. थोड्याच दिवसात त्याला मारून दुसऱ्या एका नातवाला गादीवर आणले. पुढे त्याचाहि गळा चिरून तिसऱ्या एका नातवाला गादी दिली. अभिचार करणे व प्राण घेणे हा तिच्या हातचा मळ होता ! विषप्रयोगनिष्णात रोमन ल्यूक्रीझिया बोर्जिया व आपल्या वल्लभाचा घात करणारी स्कॉटलंडची मेरी याची दिद्दा राणी ही हिंदुस्थानातील प्रतिमा होय. एकदा तुंग नावाच्या गुराख्याला वाड्यात आलेला सहज पाहिल्याबरोबर तिचे त्याच्यावर मन बसले. तत्काळ तिनें त्याला दासीमार्फत गुप्तपणे बोलावून आणले व लवकरच तो तिचा प्रमुख वल्लभ बनला, आणि नंतर मत्रीहि झाला (६।३२१). अनेक राण्याच्या या स्वैरवर्तनाने विटून कल्हण लिहितो कीं, 'मोठ्या कुलात उत्पन्न झालेल्या स्त्रियाची महानद्यासारखी उपजतच नीचगामी प्रवृत्ति असावी याला काय म्हणावे हेच कळत नाहीं ! साऱ्या जलाचा राजा जो सागर त्याच्यापासून निघालेली लक्ष्मी क्षुद्र पल्वलात पैदा झालेल्या कमलाशीं संसक्त होते, तद्वत् उच्चकुलीन स्त्रिया नीचाशीं रममाण होत असतात.' या राणीने पुढें पुष्कळ मठ बाधले व धर्मादायहि केला. पण कल्हण

लिहितो कीं, दुष्ट माणसांचीं धर्मकृत्यें आणि पापाचरण याचा कांहीं ताळ-मेळच घालता येत नाहीं.

ही दिद्दा राणी इ.स.१००३ या वर्षी वारल्यावर तिचा भाचा संग्रामराज हा गादीवर बसला. तो स्वतः ऐषआरामात राहून सर्व कारभार मंत्री तुंग याच्यावर सोपवी. पुढे तुर्कांच्याशीं झालेल्या लढाईत तुंग मारला गेल्यानंतर एका दुष्ट इसमाला त्याने मंत्री नेमलें. या राजाची राणी श्रीलेखा ही स्वैरिणी होती. तिने पति मरताच स्वतःला राज्याभिषेक करविण्याची तयारी करवून ती स्नानालाहि गेली. पण परत येण्यापूर्वीच मंत्रिमंडळानें तिचा अल्पवयी पुत्र अनत याला अभिषेक करूनहि टाकला. अनतदेवानंतर कलश राजा आला. त्यानें एक फिरता तमाशेवाला व अलगुज वाजविण्यात निपुण असणाऱ्या इसमाला मंत्री नेमलें व त्याच्या प्रोत्साहनाने तो निर्लज्ज व मनसोक्त वर्तन करू लागला. कल्हण म्हणतो कीं, याच्या दुर्वर्तनाच्या उच्चारानें जिव्हा विटाळणेंहि योग्य नव्हे, तरी ओघानेंच आलें म्हणून थोडें दिग्दर्शन करणे भाग आहे. या नराधमाने वृद्ध अनंतदेव राजाची बहीण व तिची कन्या असल्या आप्त स्त्रियावरहि हात टाकण्यास कमी केले नाहीं. अश्लील नर्मवाक्ये म्हणजेच विनोद, प्रजापीडन हेच न्याय्यकर्म, निर्लज्जपणा हीच तेजस्विता, अगम्यागनागमन हीच खरी रसिकता व लुचा-लफंग्यानीं दिलेल्या शिव्या निमूटपणे सोसणें म्हणजेच सरळपणा असें मानणाऱ्याला कोणती गोष्ट वाईट व त्याज्य असणार ? (७।३०४). वृद्ध राजा-राणीने सुवर्णतुला करविली व इतरहि रीतीनें दानधर्मांत द्रव्य खर्चिलें हें पाहून त्या नष्ट व पापी कलश राजाने एका रात्रीं त्याच्या वस्तीला आग लाविली. आतील लोक गडबडीने उठून दिगंबरावस्थेंतच बाहेर आले. त्यांना त्या स्थितींत पाहून व अग्नीच्या भयकर ज्वाळा आपल्या गच्चीवरून विलोकून कलश राजा आनदाने टिऱ्या पिटू लागला ! (७।४१२). या राजानें एका विहारातील ताम्रस्वामी नावाची सूर्याची फार प्राचीन ताब्याची मूर्ति होती ती फोडविली व इतरहि अनेक पितळेच्या बुद्धाच्या मूर्ति फोडून टाकिल्या. मासिक दरबार, इंद्रोत्सव व मोठ्या पर्वण्याच्या दिवशीं उत्सव करण्याची पद्धत असे. या उत्सवप्रसंगी द्वंद्वयुद्धाचे खेळ करवून हा राजा पुष्कळ शूर वीराना परस्परकंठस्नान घालवी. कल्हण लिहितो कीं, राज-

वाड्यापुढील पटागणात अशी द्वंद्वयुद्धे होऊन रक्तपात झाला नाही व हाहाःकार उठला नाही असे उत्सवप्रसंग क्वचितच दृष्टीस पडत. उत्सव पाहण्यास आलेल्या पौरजनाना उत्सवसमाप्तीनंतर आपल्या तरण्याबाड शूर नातेवाइकाना जखमी व घायाळ स्थितीतच परत घेऊन जाण्याचा प्रसंग येई. आपला शूर पति राजवाड्यात गेला म्हणजे जिवानिशी परत आलेला पाहीपर्यंत कुलीन स्त्रियाच्या जिवात जीव नसे. त्याने आपल्या सुनापैकी काहींना त्या जणो शत्रूच्या स्त्रिया होत असे मानून भ्रष्ट केले. त्यातील एकीनें सासऱ्याचें प्रेम सपादन केल्यावर नवऱ्याला विष घालण्याचा प्रयत्न केला !

नंदनवनांतील नरक

याच्यानंतर काहीं काळ उत्कर्ष व नंतर हर्ष हा राजा झाला. ह्या हर्ष राजाच्या कारकीर्दीतच कल्हणाचा पिता चपक हा महामंत्री होता. याच्या कारकीर्दीविषयीं कल्हण लिहितो कीं, ती प्रारभींच्या धार्मिक कृत्याच्यामुळें जितकी मनोहर वाटते तितकीच शेवटच्या पापाचरणाच्या अतिरेकामुळें गर्ह्य वाटते. कारकीर्दीच्या प्रारभीं या राजाविषयीं कल्हण वर्णन करितो कीं, त्याला कोणाचा हेवा वाटत नसे. पूर्वीचे चागले रिवाज त्याने कायम राखले; व काहीं नव्याची प्रथा सुरू केली. पूर्वी राजाशिवाय इतर सर्व लोक केश मोकळे सोडीत व डोक्यावर उष्णीश अथवा कानात कुंडले घालीत नसत. पण या राजाने राजोचित वेष सर्वसामान्य सुरू केला. तो स्वतः काव्ये करी व कविजनाना बहुमानपुरःसर वागवी. पण पुढे याच्या बुद्धीला भ्रश होऊन त्यानें अंतःपुरात कसल्या तरी तीनशेसाठ स्त्रिया आणून कोडल्या. सैन्यावर अतोनात खर्च करण्याचे तर त्याला व्यसनच लागले होते. त्यापायीं अनेक मंदिरातील संपत्ति त्याने लुटली व देवताच्या मूर्ति भ्रष्ट केल्या. या मूर्तीवर नग्न भिक्षूच्याकडून तो मलमूत्रविसर्जन करवीत असे, व मलानें भरलेल्या त्या सोन्यारुप्याच्या मूर्ती रस्त्यातून लाकडाच्या ओंड्याप्रमाणें ओढविल्या जात असत ! (७।१०९३) कल्हण म्हणतो, 'साऱ्या जगाला हेवा वाटण्याजोगी संपत्ति प्राप्त झाली असूनहि अधिक मिळविण्याच्या लोभाला बळी पडलेले लोक कोणतेंहि दुष्कर्म कर-

ण्यास कसर करीत नाहींत.' तो प्रजेवर नानाप्रकारचे कर बसवून पैसा उकळी व मूर्ख खुषमस्कऱ्याना वाटेल तसा देई. एका मृदगवादनपटूवर खूष होऊन त्याने त्याला हत्ती हत्तिणीची जोडी बक्षिस दिली. कर्नाटक देशाच्या राजाची अप्रतिम लावण्यखनी अशी चद्रलेखा नावाची राणी होती. तिची तसबीर पाहताच या राजाला मदनबाधा झाली. असल्या उल्लू राजाला लुबाडावयाला काय प्रयास? अर्थात् त्याच्या एका मूर्ख मंत्र्याने या चंद्रलेखेची तसबीर कोठून तरी मिळवून आणून तिच्या जोरावर राजाचा अगणित पैका लुबाडला. या राजाने बल व रूप याच्या प्राप्तीसाठी जे लाजिरवाणे उपाय योजले त्याचे वर्णन करणे किंवा ऐकणें याचीसुद्धा, कल्हण सागतो कीं, भल्या गृहस्थाला इच्छा होणार नाहीं. पुढे काही दिवसानीं त्याला आपल्या अन्तःपुरातील स्त्रियाच्या चारित्र्याचा भ्रष्टाकार दिसून आला तेव्हा त्याने पुष्कळ स्त्रियाना ठार केलें. पण स्वतः मात्र तो आपल्या बालपणीं त्याच्या पित्याच्या ज्या पत्न्यानीं त्याला वाढविले व खेळविले होते त्याच्याशीच रममाण होई (७।११४७). त्याने या बाबतींत आपल्या भगिनीवर्गालाहि कलकित केल्याशिवाय सोडलें नाही. याबद्दल त्याची आतेबहीण त्याला एकदा टाकून बोलली असता त्याने तिलाच पकडून आणून तिच्यावरच बळजबरी केली. रात्रीं उल्हास व जागरण आणि दिवसा निद्रा, क्रौर्य व हलकटपणा असले दुर्गुण या राजाच्या अगी भरपूर होते असे तत्कालीन लोकानी लिहून ठेवले आहे. अंतीं या राजाला चोराप्रमाणे एका खोपटात लपून बसून मारेकऱ्याच्या हातीं इ. स. ११०० मध्ये मरण आले.

धनपिसासू जळवा

यथा राजा तथा प्रजा या न्यायानें व्यापाऱ्यांच्या लीलाही तिरस्करणीय अशाच आढळतात. व्यापाऱ्याविषयीं कल्हण लिहितो कीं 'कपाळ, भोवया, कानाच्या पाळी, उरस्थळ या सहा जागीं चंदनतिलक लावलेला वाणी हा षड्बिंदु विंचवाप्रमाणें तत्काल मारक होत असतो, व तो बारीक छिद्रे असलेल्या तुबडीप्रमाणे समाश रक्तशोषण करतो. नद्यानीं समुद्रात नेऊन टाकलेलें पाणी त्याना मेघाच्या द्वारानें कालातरानें तरी परत मिळतें

पण वाण्याजवळ ठेवलेली ठेव कधींच परत मिळत नाहीं. हे वाणी ठेव परत करण्याच्या वेळीं ज्या अनेक बयादा सागतात त्याचें आठव्या तरंगात कल्हणाने एक मासलेवाईक उदाहरण दिले आहे. ठेव परत मागण्यास आलेल्या गृहस्थाला निरुत्तर करण्यासाठीं रागारागानें कपाळाला सतरा आठ्या घालून व त्याच्या खात्याचा हिशोब त्याच्यापुढे टाकून वाणीबुवा म्हणतात– गिऱ्हाइकबोवा, तुमच्याकडील जमा खपून जाऊन येण्याची रक्कमच वाढली आहे. हे पहा जोडा व चाबूक दुरुस्तीसाठीं चाभाराला दिलेले १०० दिनार, दासीने पायाच्या फोडासाठीं नेलेल्या तुपाचे ५०, मडकीं फुटल्यामुळे रडणाऱ्या कुमारणीला देवविलेले ३०० ते हे पहा भूर्जपत्रावर लिहिलेले आहेत. तसेच पाळीव माजरी व तिचीं पिल्लीं याच्यासाठीं उंदीर, व तुम्ही कृपाळूपणें मत्स्यरस आग्रहाने घेतला त्याचे १००, पायाला लावण्याला लोणी व श्राद्धाचे दिवशीं स्नानासाठीं तादुळाचे पीठ व घृतमाक्षिक घेतले त्याचे ७००, खोकल्याचा त्रास मिटविण्यासाठीं म्हणून तुमच्या लहानशा मुलानीं सुठ व मध नेला त्याचे १००, हट्टाने वृषणोत्पाटन करण्याची भीति घालणाऱ्या भाडखोर भिक्षेकऱ्याला देवविलेले ३००, भट्टपादाना घरी आणल्या वेळीं खर्ची पडलेले प्रथम १०० व पुनः २००, शदामूल, धूप व पलाडू याचेबद्दल २००, वगैरे वगैरे. अशा रीतीने वाणीवर्ग इतराना लुटीत होता.

पण मंत्र्यानीं व राजानीं लुबाडण्याचा जो सपाटा चालविला होता तो विशेषच. काश्मीरात नद्या, सरोवरे व बर्फाच्छादित डोगर असल्यामुळें ओले दुष्काळ अनेक वेळा पडत. पण अशा आपत्तीच्या वेळींही राजे व मंत्री रयतेला पिळून काढण्यास मागे घेत नसत. इ.स. ९१७-३८ या वर्षी असाच एक भयंकर दुष्काळ पडला होता. पावसाळी भाताचे सारे पीक जलप्रलयानें बुडालें होते. एकहारी भाताला १००० दिनार पडू लागले होते. वितस्ता नदीचे पात्र सडलेल्या व फुगलेल्या प्रेताच्या राशींनीं झाकून गेलें होतें व सर्व देश पहावा तों अस्थि पसरलेल्या श्मशानासारखा दिसूं लागला होता! अशा स्थितींतही कल्हण सागतो कीं, मंत्री व तंत्री जवळचे शिल्लक असलेलें धान्य अतिशय महाग दरानें विकून गबरच झाले. आणि राजाविषयीं पहावें तो ह्या निःसत्व स्थितींतल्या प्रजेला पिळून काढून जो मंत्री

जास्तींत जास्त कर वसूल करी त्यालाच राजा मंत्रिपदावर मुक्रर करी. इसवी सन १०९९ या वर्षीही काश्मीर मंडळात सर्व गाव महापुराने बुडाल्यामुळें मोठे दुर्भिक्ष्य पडलें. एकहारी तादूळ ५०० दिनाराला मिळेनात. लवण, मिरें, हिंग वगैरे जिन्नस तर नावाला दृष्टीस पडेनात. नद्याचे पाणी सडलेल्या प्रेतानीं आच्छादले गेले होते. पण कल्हण लिहितो कीं, अशा रीतीनें संक्षय हांत चाललेल्या प्रजेवर नागर ओढून थकलेल्या दुर्बल व वृद्ध वृषभाच्या डोक्यावर मोठीशी धोंडी बसवावी त्याप्रमाणे राजा करांचें ओझें लादीतच होता. त्याने कायस्थ अमलदारामार्फत प्रजेला असे पिळून काढलें कीं पुरग्रामादिकामध्ये कराशिवाय मातीसुद्धा उरूं दिली.

राजतरंगिणीच्या लेखनकालापर्यंतचा म्हणजे पुढील ५० वर्षांचा इतिहास कल्हणाने फारच सविस्तर दिला आहे. पण वाचक हो ! येथवर दिला आहे येवढाच इतिहास वाचून तुम्ही विटला असाल. तेव्हा पुढील भाग देत नाहीं. कोळसा उगाळावा तेवढा काळाच ! प्राचीन भारतातील नररूपाने वावरणाऱ्या महती देवतेचें चित्र हे असे आहे ! ते रेखाटण्यात पदरचा काळा रंग मीं मुळींच भरलेला नाहीं. उलट, चित्र यथार्थ वठावें म्हणून चागला भाग आढळला तोहि दिला आहे. पण चित्र मूळचेच काळें आणि भेसूर आहे त्याला काय करणार ? थोडक्यात सागावयाचें म्हणजे निसर्गाने काश्मीरला नंदनवनाचे सौदर्य दिले पण तेथील क्रूरकर्म्या सत्ताधीशानीं त्याचे नरककुड बनाविले.

बौद्ध ग्रंथांची साक्ष

वर वर्णिलेल्या आसुरी लीलानीं काश्मीरात म्हणजे हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यातच तेवढा नंगा नाच घातला असेहि नव्हे. वर हर्षचरित्रातील उतारा दिला आहे त्यात ज्या राजाच्या लीला वर्णिल्या आहेत ते हिंदुस्थानातील अनेक प्रातातले आहेत. बरें, अमुक एका काळींच या लीलाना ऊत आला होता असेहि नाहीं. चाणक्य-बाणभट्ट-कल्हण याच्या ग्रंथापासून तों पुतण्याच्या खुनाने व नाटकशाळाच्या विलासानें विटलेल्या पेशवाईपर्यंत ह्या लीला तुम्हास अविच्छिन्न थुडगूस घालताना आढळतील.

बौद्ध ग्रंथाना विचाराल तर तेथेहि असलाच प्रकार तुम्हास ऐकावयास

सापडेल. बुद्धाच्या आगे मागें उत्तर हिंदुस्थानात चार मोठीं राज्ये होतीं. त्याच्या राजधान्या मगधात राजगृह, त्याच्या उत्तर-पश्चिमेस श्रावस्ती, त्याच्या दक्षिणेस यमुनातीरावर कोसाबी, आणि त्याच्याहि दक्षिणेस उज्जैन या होत्या. येथील राजाचा एकमेकाशीं शरीरसंबंध असे. उदाहरणार्थ, श्रावस्तीच्या राजाची बहीण कोसलदेवी ही राजगृहाच्या बिंबिसार राजाला दिलेली होती. या बिंबिसाराला त्याच्याच दुसऱ्या एका राणीपासून झालेला पुत्र जो अजातशत्रु यानें अन्न तोडून हाल करून जिवे मारले तेव्हा या अमानुप कृत्याने हाय खाऊन कोसलदेवीने प्राण सोडला ! तिचा भाऊहि सतापला आणि त्याने आपल्या बहिणीच्या चोळी-बागडीकरिता दिलेलें काशी शहर जबरीने परत घेतले. त्यावरून अजातशत्रूची आणि कोसल-देवीचा पिता प्रसेनजित याची, म्हणजे नातू आणि आजा याची, लढाई जुपली ! तीमध्ये नातवाला पूर्णपणे चीत केल्यावर आजाने सोडून दिलें व आपली एक कन्याहि त्याला अर्पण केली. ह्या प्रसेनजित राजाला अशी इच्छा झाली, कीं बुद्धाच्या शाक्य कुळाचा व आपला आप्तसंबंध घडावा. या हेतूने शाक्य कुळातील एका कन्येविषयीं त्यानें मागणी घातली. पण शाक्यानीं राजकन्येऐवजीं एक दासी राजाकडे लावून दिली. तिच्या पोटीं राजाला एक पुत्र झाला. पण त्याला जेव्हा आपले जन्मरहस्य कळून आलें तेव्हा त्यानें आपल्या बापाविरुद्ध बंड उभारले आणि शाक्याच्यावर सूड उगविण्याकरिता त्याच्यावर स्वारी करून अनेकाना बायकामुलासकट कंठस्नान घातले ! दुसरीं दोन राजघराणीं म्हणजे कोसाबी आणि अवंती येथील. त्याचाहि शरीरसंबंध असे, आणि नेहमीं कटकटीहि चालू असत. पैकीं कोसाबीच्या उदयन राजाला अवंतीच्या राजानें खोट्या हत्तीच्या युक्तीनें कसे पकडून बंदिवासात टाकले, व बंदिवासात असता उदयनानें अवंतीपुत्री वासवदत्ता हिचें मन वळवून तो तिच्यासह कसा बंदि-वासातून निसटून गेला ही घाडसी प्रणयकथा सस्कृत वाचकाना सुपरि-चित आहे.

आता बौद्ध जातकांतील नमुना म्हणून महापिंगल नावाच्या राजा-विषयींची पुढील गोष्ट पाहा. जातक लिहितें, "हा राजा अत्यंत जुलमी होता. तो मरण पावला त्या वेळीं वाराणशी शहरांतील सर्व नगरवासीयाना

मोठा आनंद झाला. पण त्या राजवाड्याच्या देवडीवरील द्वाररक्षक मात्र रडू लागला. बोधिसत्त्वाने त्याला विचारले, "तूं का रे बाबा रडतोस?" त्याने उत्तर दिले, "मी रडतो आहें तो राजेसाहेब वारले म्हणून नव्हे; ते ज्या ज्या वेळीं राजवाड्यातून बाहेर जात किंवा बाहेरून परत येत त्या त्या वेळीं माझ्या मस्तकावर घणानीं मारावे तशा जोराने आठ तडाखे देत! आता राजेसाहेब यमलोकीं गेले आहेत म्हणता; तेव्हा तेथें यमाच्या मस्तकावरहि ते असेच तडाखे देतील आणि मग यम ही ब्याद नको म्हणून त्याना पुन्हा परत इहलोकीं पाठवील व माझ्या नशिबीं पुन्हा तडाखे खाण्याचें येईल म्हणून रडतो!" असो.

राजेलोकाच्या विकृत चरित्राचा हा चित्रपट हवा तेवढा लाबविता येईल. पण प्रस्तुत प्रबंधाची भूमिका इतिहासाची नसून विवेचनाची आहे; आणि त्या विवेचनाला उपोद्बलक म्हणून वर दिलेले नमुने पुरेसे आहेत. त्यातहि फार जुना काळ हा पौराणिक काळ म्हणून व अर्वाचीन कालातील मराठ्याचा काळ हा सुपरिचित म्हणून सोडून प्राचीन भारतातील ऐतिहासिक काळ म्हणून जो सबोधिला जातो त्यातीलच उदाहरणें प्रामुख्याने घेतलेलीं आहेत. म्हणूनच एका नागरब्राह्मणाच्या मुलीवर बलात्कार करणारा राघोबा (ऐ. टिपणे भाग १ पृ. १०), बदफैली आनंदराव काशी कोतवाल (इतिहाससंग्रह स्फु. ले. १५), शिरक्याचे शिरकाण करणारा व सावत्रमातेस भिंतीत चिणून मारणारा सभाजी, पुतण्याच्या खुनास जबाबदार असणारा राघोबा, वगैरे अर्वाचीन कालातील असुराच्या लीलानीं पानें अडविलीं नाहींत. अर्वाचीन कालातील इकडचे टोक सोडून प्राचीन काळातील पलीकडचे पौराणिक काळातील टोक घेतलें तर त्यातहि अहल्येला आणि गुरुपत्नीला भ्रष्ट करणारे इंद्र-चंद्र, लाक्षागृहात आपल्याच बाधवाना जाळू पाहणारे कौरव, खाडववन जाळून नाग-तक्षकाची ससेहोलपट करणारे पाडव, आपआपसात प्राणातिक लढा लढून यादवी हा कलंकभूत शब्द भाषेस अर्पण करणारे यादव, मातृघाती परशुराम, निद्रिस्ताना कठस्थान घालणारा अश्वत्थामा, पुराणकाराच्या डोक्यात गदा घालणारा बलराम, सरयू नदीच्या पात्रात लहान बालकें फेकण्याचे खेळ खेळणारा सगरपत्र असमंज वगैरेच्या लीलानाहि स्थळ

दिलेले नाहीं. तसेच वैदिक अथवा प्राग्वैदिक कालातील व अश्वमेधादि यज्ञकृत्यातील लैंगिक नीतीचे इतिहासाचार्य राजवाडे यानीं जे अगदीं फटकळ–किंबहुना नागड्या-उघड्या–मापेत चित्र रेखाटलें आहे, आणि जें वाचकाच्या रोषामुळे मागें 'चित्रमय जगत्'ला एक हप्त्यानंतर बंद करावे लागले, पण जे अलीकडे धुळ्याच्या संशोधन मासिकानें छापलें आहे, त्यातीलहि उतारे घेतलेले नाहींत. राजवाड्यानीं केलेलें वर्णन ज्याना अतिशयोक्त वाटत असेल त्यानीं महामहोपाध्याय पाठकशास्त्री यानीं केलेलें यजुर्वेद सहितेचे भाषान्तर पहावे (अ.२३ शुक्ल माध्यदिन वाजसनेयी सहिता). या सर्वांचा नामनिर्देशहि येथे येवढ्याचकरिता करीत आहे, कीं भरत-खडाच्या प्राचीन वा अर्वाचीन इतिहासातील कोणताहि कालखंड तुम्हीं निरखलात तरी सत्ताधीशाच्या आसुरी लीलाचे ताडव तुम्हास सर्वत्र आढळून येईल हे दिङ्मात्रीत व्हावे !

दारू आणि जुगार

आता या लीला सर्व राजेलोकाच्याच वर्णन केल्या आहेत कारण सैतानी लीला खेळण्याचीं साधने त्यानाच साध्य असत. हे पाहून तुम्ही म्हणाल कीं, राजाचें एक असो पण सामान्य जनतेची नीतिमत्ता तर इतकी आसुरी नव्हती ना ! तर त्याहि बाबतींत मोठी स्पृहणीय स्थिति होती असे नव्हे. या बाबतींत येवढेच सांगितलें म्हणजे पुरे कीं, मद्यपान, वेश्यागमन व जुगार हीं तीन व्यसने वैदिक कालापासून आजतागायत अखंड सुरू आहेत. वैदिक कालातील सोमरस पिणारे इद्रोपासक,– सोमाच्या जोडीला सुराही असे व ती सोमात मिसळली असता मादकपणा वाढे सुरया सोमः सुतः आसुतो मदाय (यजु १९।५)– आणि पोराणिक काळातील माधवीप्राशनाने झिंगून स्त्रियासह जलक्रीडा करणारे बलरामाचे अनुयायी यादव हे वाङ्मयात गाजलेले आहेत. कामशास्त्रात (चतुर्थ अधिकरण) सुगृहिणीचीं जीं कामें वर्णिलीं आहेत त्यात सुरा व आसव याचा संग्रह करावा व त्याच्या क्रयविक्रयावर लक्ष ठेवावे हेंहि काम सांगितलेले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून पाहतां त्याच्या काळीं शहरात दारूगुत्ते असत व त्याना सरकारी मान्यता असे. अबकारी खातें ही एक उत्पन्नाची बाब होती. या खात्याच्या अध्यक्षाला सुराध्यक्ष म्हणत.

मेदक, प्रसन्न-आसव, अरिष्ट, मैरेय, मधु वगैरे दारूचे प्रकार असत. गुरुत्यात निजण्याची सोय असे, आणि तेथे रूपवान् दासीहि असत! कुलधर्माकरिता वगैरे खाजगी दारू तयार करण्यासहि परवानगी मिळे. या दारूस श्वेतसुरा म्हणत (अध्याय ४६). दारू पिऊन झिंगण्याच्या प्रसंगापैकी मर्तिकाचा वा प्रेतयात्रेचा प्रसंग हा मुद्दाम सागण्यासारखा आहे. या प्रसंगीच्या दारूस नैपेचनिक म्हणत व त्याचे शेकडो घट अशा प्रसंगी रिकामे होत. याचा फायदा घेऊन या दारूत मदनरस नावाचे विष मिसळून कलालरूपाने वावरणाऱ्या गुप्त हेरानीं शत्रुसैनिकाचा फडशा पाडावा असे कौटिल्यानें सुचविले आहे– "नैपेचनिकमिति मदनरस युक्तान् कुभान् शतशः प्रयच्छेयुः" (अ. १३५). वामाचारी तांत्रिकानीं धर्मकृत्यात देखील मद्याचा अन्तर्भाव केला होता हें सागावयास नकोच.

बौद्धांच्या जातककथामध्येहि मद्यप्राशनाचे उल्लेख अनेक ठायीं आढळतात. काशीच्या राजाने पाचशे संन्याशाना एकदा एक मोठी भेजवानी दिल्याचें वर्णन **सुरापान जातकांत** आले आहे. या भेजवानीच्या प्रसगीं मद्याच्या नद्या वाहवल्या. उंची मद्य संन्याशाना नेहमीं कोठून मिळणार? म्हणून या भेजवानीच्या प्रसंगी त्यानीं ते मनसोक्त पिऊन घेतले व त्याच्या तोंरत ते गाऊं-नाचू लागले. शुद्धीवर आल्यावर पढील गाथा म्हणू लागले:

अपायिम्ह अनचिम्ह अगायिम्ह रुदिम्ह च।
निसञ्ञकरणीं पीत्वा दिट्ठा ना हुम्म वानराः॥

भरतखंड हा उष्ण देश असल्याने हिंदु धर्माने सुरापानाचा कडक निषेध केला व पेशव्यानीं आपल्या राज्यात सुरापान हा गुन्हा ठरविला हेंही या ठिकाणीं नमूद केले पाहिजे.

मद्यापमाणेंच दुसरे व्यसन द्यूताचे अथवा जुगारीचें. या व्यसनाची फार दाट अशी कृष्णच्छाया प्राचीन भारतीय वाङ्मयावर पडलेली आहे. पुण्यश्लोक नलराजा आणि शातिब्रह्म युधिष्ठिर अशा महात्म्यांनीं या व्यसनापायीं आपलीं राज्ये गमावलीं. 'आहूतो न निवर्तेत द्यूतादपि रणादपि' अशी क्षत्रियांच्यात महाभारतकालीं म्हणच रूढ झाली होती. वैदिक सूक्तापासून तों मृच्छकटिक नाटकापर्यंत या जुगारीचें बंड दिसून येतें. ऋग्वेदातील दहाव्या मंडलात एका पश्चात्तापदग्ध जुगाऱ्याचें एक स्वतंत्र

सूक्तच आहे. कौटिल्याच्या काळीं दारूच्या गुत्त्याप्रमाणें जुगारीच्या अड्ड्यानाहि सरकारी परवाना देण्यात येई व त्यावर सरकारची देखरेख असे. लष्करी छावणींत मात्र जुगारीला बंदी करावी असें कौटिल्यानें मुद्दाम बजावले आहे.

तिसरें व्यसन वेश्यागमनाचे. अर्थशास्त्रात वेश्याव्यवसायाच्या नियंत्रणाची व देखरेखीची व्यवस्था वर्णिलेली आहे. याचें एक स्वतंत्र खातेंच असे व त्यावरील मुख्यास गणिकाध्यक्ष हें नाव असे. हें खातेंहि उत्पन्नाची बाब होती. प्रत्येक गणिकेला महिन्यातून दोन दिवसांचें भोगद्रव्य सरकारात भरावें लागे. या वेश्यापैकीं काहीं गायन-वादन-नृत्यादि कलात निष्णात असत; आणि त्याच्या घरीं श्रीमान् नागरिकाच्या नेहमीं बैठकी होत. त्यांचें वर्णन वात्स्यानयाने आपल्या कामशास्त्रात दिलेले आहे. कामशास्त्रावर अनेक ग्रंथ रचिले जावे यावरूनहि समाजाचा रंगेलपणा अजमावता येईल. वेश्यासंबंधींचा ग्रंथ तर पाटलिपुत्रातील गणिकांच्या खास विनंतीवरून दत्तक नावाच्या आचार्यानें स्वतंत्र लिहिला असें वात्स्यायन सागतो. पण कामशास्त्रातील उतारे आपणास वाचावयास लावण्याचा इरादा नाहीं. भारतीय संस्कृतींतील आसुरी गणला जाईल असा अंश नजरेस यावा याकरितांच या व्यसनाचा उल्लेख केला आहे.

शेवटीं प्राचीन काळच्या काहीं विक्षिप्त यतींविषयीं दशवैकालिक सूत्रावरील चूर्णिकेंतील एक मासलेवाईक उतारा देऊन आटोपतें घेतों.

बोकेसंन्यासी

"यतिमहाराज, तुमच्या कफनीला झोळ फार पडलेला दिसतो?"

"हो, खरें आहे. आणि मासे पकडण्याच्या वेळेला जाळ्यासारखा त्याचा उपयोगहि मला चागला होतो."

"काय म्हणता! तुम्ही मासे खातां?"

"होय. मद्याच्या बरोबर थोडेसे खातों."

"म्हणजे आपण मद्यहि पितां वाटतें?"

"हो. तसें म्हटलें तर पितों थोडेंसें वेश्येच्या घरीं."

" तर मग आपण वेश्येच्याहि घरीं जाता वाटतें ? "

" शत्रूंना झोडपून काढल्यानंतर जातों. "

" म्हणजे आपल्याला शत्रूहि आहेत वाटतें ? "

" तसे फार नाहींत; पण ज्यांचीं मीं घरेंदारें लुटलीं तेवढे मात्र आहेत. "

" तर मग तुम्ही चोरहि दिसता. "

" होय, झालों खरा; पण त्याला कारण जुगारीचा नाद ! "

" भले ! म्हणजे आपण जुगारहि खेळता वाटतें ! "

" अहो बोलूनचालून मी एका हलक्या स्त्रीच्या पोटीं जन्मास आलेला दासीपुत्र ना ! "[१]

भ्रमनिरास

पण केले येवढे उल्लेख वाचून तुम्ही म्हणाल, " काय हो दत्तात्रय केशव केळकर, आपल्या स्वतःच्या संस्कृतीचें असलें हें ओंगळ चित्र रेखाटण्यात भूषण तें काय ? आणि दोषस्थळेंच टिपून घ्यावयाचीं म्हटलीं तर पाश्चात्य संस्कृतीचें नाहीं का असेंच किंवा याहीपेक्षा अधिक ओंगळ असें चित्र रेखाटता येणार ? " मित्र हो, तुमचा मुद्दा अगदीं रास्त आहे. कोणत्याहि संस्कृतीचें असें चित्र रेखटतां येईल; आणि हेंच मला मुख्यतः दाखवावयाचें आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं, पाश्चात्य हे आसुरी आणि भारतीय हे आध्यात्मिक हें समीकरण आपण सोडून दिलें पाहिजे. तें देण्यास मनाची तयारी व्हावी एतदर्थ दोन्ही संस्कृतींचें स्वरूप रूढ समजुतींपेक्षा सर्वस्वीं निराळें असें साधार कसें रेखाटतां येईल हें मुद्दाम दिग्दर्शित केलें आहे. तें करण्यात व विशेषतः स्वतःच्या संस्कृतींतील कलंक-

---

१. संवादाचा मूळ श्लोक रुइया कॉलेजातील अर्धमागधीचे प्राध्यापक डॉ. जगदीश जैन यांनीं काढून दिला तो पुढीलप्रमाणें:—

कन्थाऽचार्याधना ते ननु शफरवधे जालमश्नासि मत्स्यान् ।
ते मे मद्योपदंशात् पिबसि ननु युतो वेश्यया वासि वेश्याम् ।
कृत्वाऽरीणां गलेऽघ्रीं क न तव रिपवो वेषु संधिं छिनत्सि ।
चौरस्त्वं द्यूतहेतोः कितव इति कथं वेन दासीसुतोऽस्मि ॥

भूत भागाकडे लक्ष वेधण्यात फाजील कठोरपणाचा वास क्वचित् येईल. पण ही जी कठोर वृत्ति स्वीकारली आहे ती दोषस्थळे मान्य करूनहि स्वतःच्या संस्कृतींतील अभिमानास्पद कामगिरीची योग्यता पटवून देतां येईल याची खात्री आहे म्हणूनच. तो अभिमान मानीव व फोकळ न होता ऐतिहासिक सत्यावर अधिष्ठित व्हावयाचा असेल तर गुणाप्रमाणें दोषाकडेहि निर्भीड दृष्टीनें पाहण्याची तयारी पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे कीं, सत्ताधीशाच्या आसुरी चाळ्यांचें जें वर्णन वर केलें आहे तें मानवतेच्या दृष्टीनें लज्जास्पद असले तरी, त्यामुळे पाश्चात्य वगैरे परकीयाच्या समोर त्यासाठीं आपणास मान खालीं घालावी लागेल असा मुळींच प्रकार नाहीं. कारण सत्ताधीशाचे वर वर्णिल्यासारखे चाळे हे कमीअधिक प्रमाणात सर्व देशात सर्व काळीं दाखवून देता येतील. मग पाश्चात्याचे असले चाळे दिग्दर्शित न करिता आपलेच तेवढे का केले? तर त्याचें कारण असें कीं, पाश्चात्य हे आसुरी आहेत हें रूढ समजुतीनें गृहीतच धरलेलें आहे. पण आपण भारतीय हे मात्र मोठे धार्मिक व पापभीरू आहोत, निदान होतो, अशी जी समजूत असते ती कशी भोळसटपणाची असते हें ध्यानीं ठसलेलें नसतें. तें एकदा नीट ध्यानीं ठसले म्हणजे मग आपल्या संस्कृतींतील अभिमानास्पद कामगिरीचे खरे मोल पारखण्याची भूमिका तयार होईल.

आणि ही कामगिरी म्हणजे नुसती तत्त्वज्ञानातील अथवा वेदान्तातील नव्हे. ती तर जगन्मान्यच आहे. तर ऐहिक जीवनात रस आणि गोडी उत्पन्न करणारे शास्त्र, साहित्य, कला इत्यादि जे बौद्धिक व्यापार आहेत त्याची निरलसपणें, उत्साहानें, आशावादित्वानें जी जोपासना भारतीयानीं केली तद्विषयक होय. इतिहास कंठरवानें सांगेल कीं, कित्येक शतकें मोठ्या जोमानें आपल्या पूर्वजानीं शास्त्र व कला याची जोपासना केली, विचारस्वातंत्र्य जागविलें, आणि बौद्धिक व व्यावहारिक क्षेत्रात दिग्विजयामागून दिग्विजय संपादन केले. पण आपली संस्कृति ही केवळ आध्यात्मिक होय या भ्रामक कल्पनेचें तिमिर दृष्टीवर आल्यानें आपल्या संस्कृतींतील अभिमानास्पद अशा ऐहिक दिग्विजयाचें आपणाला विस्मरण पडलें आहे. तें तिमिर नाहींसें व्हावें म्हणून आपल्या संस्कृतींतील आसुरी

मागाच्या झोंबऱ्या अंजनाचें बोट, ऐतिहासिक सत्याला धरून पण कठोरपणें फिरवावे लागलें आहे. तें कटु कर्तव्य उरकल्यावर आता आपल्या पूर्वजाच्या ऐहिक व्यापाकडे वळूं या. या व्यापाचा इतिहास येथे द्यावयाचा नाहीं हें सांगावयास नकोच. तर ज्या भागाचें आपणास विस्मरण पडलें आहे त्या भागाकडे लक्ष वेधण्याचे काम मुख्यतः करावयाचें आहे. तें केल्यावर मग पुनश्च आपल्या संस्कृतींत उत्पन्न झालेल्या दोषाकडे वळूं. तरी आता आपल्या पूर्वजानीं शास्त्र-कलादिकाची उत्साहानें जोपासना करून तत्कालीन जगताचे गुरुस्थान कसे मिळविले व आपल्या संस्कृतीचा प्रसार उत्साहाने कसा केला याचें ओझरते दर्शन घेऊं या.

प्रकरण सातवें

भारतीयांची ऐश्वर्योपासना

संस्कृतींच्या वर्णनप्रसंगी पाश्चात्य संस्कृति ही आधिभौतिक, जडवादी, भोगप्रधान, आसुरी आणि भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक, आत्मवादी, त्यागप्रधान, दैवी अशीं विशेषणे या संस्कृतींना उद्देशून प्राच्य व पाश्चात्य अशा दोन्ही लेखकाकडून निरनिराळ्या गर्भित अर्थाने वापरलीं जात असतात. पण दोन्ही संस्कृतींचें हें वर्णन नुसतें वरवरचें व उथळ एवढेंच नव्हे तर असत्य असतें हे दर्शविण्याकरिता पाश्चात्य संस्कृतीला सुद्धा दैवी, त्यागप्रधान व आध्यात्मिक हीं विशेषणे कशीं लावता येतील याचें दिग्दर्शन केले; आणि उलट आसुरी, भोगप्रधान व आधिभौतिक हीं विशेषणे भारतीय संस्कृतीलाहि तशाच अर्थाने कशीं लावता येतील याचीहि कल्पना आणून दिली. आता हिंदु-संस्कृतीचीं दुर्लक्षित अशीं जीं अंगे त्यापैकीं ऐहिक वैभवोपासनेच्या अंगाची ओळख करून घेऊ या.

इतिहासाविषयीं उदासीनता

होय ! ऐहिक दृष्ट्या– नुसत्या आध्यात्मिक दृष्ट्या नव्हे, तर ऐहिक दृष्ट्या– अत्यंत वैभवशाली अशी ऐतिहासिक परंपरा आपल्या या भरतभूमीस लाधलेली आहे ! वस्तुतः ज्यानीं मोठमोठीं साम्राज्ये चालविलीं ते लोक ऐहिक वैभवाचे भोक्ते व उपासक होते हें मुद्दाम सांगण्याचेंहि कारण नाहीं; पण उज्ज्वल इतिहास लाधला असूनहि ज्या देशानें इतिहासलेखनाची फारशी पर्वा बाळगली नाहीं असा एकटा एकच करंटा देश जगाच्या पाठीवर कोठे असला तर तो आपला हा हिंदुस्थान देश होय ! जो काहीं इतिहास सांपडतो तो महाभारत, पुराणें, महावंश, दिव्यावदान, कल्पद्रुमकलिका, मंजुश्रीमूलकल्प, हरगौरीसंवाद, राजतरंगिणी किंवा हर्षचरित,

नवसाहसांकचरित, विक्रमांकचरित, गौडवहो, भोजप्रबंध पृथ्विराजरासा वगैरे चरित्रग्रथातून सापडेल तो. पण राजतरंगिणी हा ग्रंथ, व त्या ग्रथाचाही उत्तरार्ध, सोडला तर वरीलपैकी एकाही ग्रथात निर्भेळ इतिहास आढळणार नाहीं. महाभारतात पुष्कळ ऐतिहासिक कथाचा संग्रह करण्यात आला आहे व पुराणानीं वंशावळी जतन केल्या आहेत हें खरें पण व्याकरण, न्याय, वेदान्त, धर्मशास्त्र या विषयाना शास्त्रीय रेखीव स्वरूप देण्याचा जसा प्रयत्न झाला तसा इतिहासाच्या वाट्यास आला नाहीं. म्हणून भारतीयाच्या प्राचीन ऐहिक वैभवाचे वर्णन करण्यापूर्वी आधीं या अनास्थेची थोडी कल्पना आणून देणे जरूर आहे.

या आपल्या देशात दिगत दिग्विजय करणारे चंद्रगुप्त, अशोक, शातकर्णी, पुलकेशी, समुद्रगुप्त, हर्षवर्धन याच्यासारखे चक्रवर्ती सम्राट् होऊन गेले; कालिदास-भवभूत्यादि जगवंद्य कवींनीं त्यावर ललितवाङ्मयाचीं लेणीं चढविलीं; चरक, सुश्रुत, नागार्जुन, आर्यभट्ट, भास्कराचार्य वगैरेनीं भौतिक शास्त्राच्या अनेक शाखाची जोपासना केली; अजठा-वेरूळसारख्या स्थलीं अप्रतिम कारागिरी करून ठेवणारे कलावंत चमकले. पण यापैकी एका तरी विभूतीचें विश्वसनीय चरित्र उपलब्ध आहे काय ? चरित्र तर राहोच पण त्याच्या नुसत्या कालाचीहि नोंद आमच्या वाङ्मयात नाहीं. कालनिर्णायक जो काही महत्त्वाचा असा पुरावा सापडतो तो मुख्यतः परकीय प्रवाशानीं पुरविलेला ! या परकीय अशा चिनी, ग्रीक, इस्लामी, फिरगी वगैरे प्रवाशानीं आपल्या प्रवासवृत्तात हिंदुस्थानविषयक माहिती देताना ती जितकी तपशीलवार व बारकाईनें दिली आहे त्याच्या चौथ्या हिश्शाने सुद्धा, ती माहिती अभिमानास्पद असताहि, खुद्द आमच्या वाङ्मयात सापडू नये यावरून भारतीयानीं इतिहासाची हेळसाड केली याशिवाय दुसरें काय म्हणावें ? हिंदी लेखक जयचंद्र विद्यालंकार यानीं प्राचीन ग्रंथातील ऐतिहासिक सामग्रीची तरफदारी केली आहे पण उत्तरकालीं ऐतिहासिक बुद्धि मंद झाली हें त्यानींही मान्य केले आहे. ते लिहितात, "एक विशेष समय में आकर ऐतिहासिक बुद्धि मंद हुई है जरूर."[१]

१. भारतीय अितिहास की रूपरेखा १।२४६.

या बाबतींत लो. टिळकासारख्या स्वाभिमानी पुरुषालाहि हीच नाउमेदकारक कबूली द्यावी लागली आहे. ती कबूलीसुद्धा बाणभट्टासारख्या लेखकाच्या बाबतींत आणि हर्षवर्धनासारख्या प्रतापशाली चक्रवर्तीच्या चरित्राला अनुलक्षून ! या चक्रवर्तीच्या राज्यासंबंधीं माहिती आपणाला दोन ठिकाणाहून मिळते. एक या राजाच्या पदरीं असलेला राजकवि जो बाणभट्ट त्याजकडून, व दुसरी या राजानें सन्मानिलेला चिनी यात्रेकरू जो ह्युएनत्संग याच्या प्रवासवृत्तावरून. दोघानींहि वस्तुस्थितीचें वर्णन प्रत्यक्ष पाहून केलें असल्याने एकमेकाना पोषक असेंच तें वर्णन आहे. पण बाणापेक्षा चिनी प्रवाशास ऐतिहासिक दृष्टि अधिक असल्याने या परकीय प्रवाशाचे वृत्त हें स्थानिक चरित्रकारापेक्षा काहींसे अधिक उपयुक्त ठरलें आहे ! राजाच्या चरित्रात त्याचा काल, त्याचे दिग्विजय, त्याचा राज्यविस्तार वगैरेपेक्षा अधिक महत्त्वाची माहिती ती कोणती असणार ? पण बाणकृत हर्षचरित वाचून या ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या बाबींत वाचक अज्ञानातच राहतो. तें अज्ञान दूर करण्यास त्याला शेवटीं चिनी प्रवाशाचा प्रवासदीप उपयोगीं पडतो. एतत्संबंधीं 'बाणभट्ट व श्रीहर्ष' या निबधात टिळक लिहितात, "बाण कवीने आपलें हर्षचरित्र नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें श्लेषादि अनेक अलंकारानीं सुशोभित केले आहे. पण मौज अशी कीं, सबंध हर्षचरित्र वाचलें तरी श्रीहर्ष केव्हा झाला, त्याचे साम्राज्य कोठून कोठपर्यंत होतें, त्याने कोणकोणते राजे जिंकले याबद्दल प्रत्यक्ष अशी हर्षचरित्रात काहीं माहिती मिळत नाहीं. कोठे कोठे राजास जीं विशेषणें दिलीं आहेत त्यातील श्लेषावरून काहीं माहिती मिळते. पण श्लेषावरून इतिहासाचें ज्ञान हर्षाच्या काळीं जरी होत असले तरी ती परंपरा पुढें राहणें अशक्य होते. साराश, ह्युएनत्संग याच्या प्रवासाचें वर्णन जर आपणास मिळालें नसतें तर हे श्लेष समजले नसते; इतकेंच नव्हे तर बाणानें वर्णन केलेला श्रीहर्ष हा सातव्या शतकातील चक्रवर्ती होता हें देखील समजण्याची मारामार पडली असती !" हे टिळकाचे उद्गार. अर्थात् ऐतिहासिक दृष्टीची अनास्था याशिवाय या परिस्थितीचें कोणत्या शब्दानीं वर्णन करावयाचें ?

ज्या राजाचे चरित्र वर्णन करण्याचा सुयोग बाणास लाभला होता तो

राजाहि सामान्य असा तसा नव्हता. त्याच्या कारकीर्दीतील अनेक गोष्टी वर्णिताना भाषेस अभिमानानें स्फुरण चढावें या मोलाच्या त्या गोष्टी होत्या. राज्यात पशूंकरिताहि दवाखाने होते; पाटबंधाऱ्याचें काम उत्तम होतें; शातता व सुरक्षितता चोख होती. पण या माहितीकरिता वाचकाला चिनी प्रवाशाच्या तोंडाकडेच पाहावें लागतें. बाणाच्या ग्रंथात तिचा पत्ता नाहीं. फार काय सागावे ! हा राजा दर पाच वर्षांनीं आपलें बरेंच द्रव्य प्रयाग येथे माडलिक राजासमक्ष ब्राह्मण, बौद्ध आणि गोरगरीब यास वाटून देत असे.[1] ह्या अभिमानास्पद माहितीची सुद्धा बाणभट्टाच्या ग्रंथात 'सकलभुवनकोशश्राग्रजन्मना विभक्तः' या एका विशेषणावरून काय बोध होईल तेवढाच !

परंपरेचें विस्मरण

इतिहासाच्या हेळसाडीचे आणि प्राचीन परंपरेच्या विस्मरणतेचें दुसरें एक इतकेंच महत्त्वाचें उदाहरण म्हणजे प्राचीन भारतीयानीं भरतखंडाबाहेर वसविलेल्या वसाहतींचे. जे आपण आजचे हिंदु लोक समुद्रयान हें शास्त्रनिषिद्ध आहे असें मानतों त्याच आमच्या पूर्वजानीं एके काळीं आफ्रिका, अमेरिका येथवर दर्यावरील मोठमोठ्या सफरी केल्या होत्या. इतकेंच नव्हे तर सयाम, बोर्निओ, जावा, सुमात्रा, बाली वगैरे ठिकाणीं वसाहती स्थापल्या होत्या व त्या थोडीं-थोडकीं नव्हे तर कित्येक शतकें टिकविल्या होत्या. पण आपल्या प्राचीन वाङ्मयात या पराक्रमाचा ठाव-ठिकाणाहि नाहीं. हा सर्व अभिमानास्पद असा इतिहास लिहून ठेवला कोणीं ? तर चिनी प्रवाशानीं ! आणि तो आम्हास उपलब्ध कोणीं करून दिला ? तर या चिनी लेखाचे भाषान्तर करणाऱ्या युरोपियन पंडितानीं !

प्राचीन इतिहासाच्या हेळसाडीचा व अज्ञानाचा आणखी एक असाच मासला म्हणजे प्राचीन भरतखंडातील प्रजासत्ताक राज्याविषयींचें अज्ञान हा होय. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' असा जप करणाऱ्या भरतखंडात अनेक लहानमोठीं प्रजासत्ताक राज्यें होऊन गेलीं व काहीं तर कित्येक शतकें टिकलीं या राजकीय इतिहासाचा निबंधमालाकाराच्याहि वेळेपर्यंत पत्ता

१. Life of Huen Tsang by Beal, p. 83.

नव्हता. वक्तृत्वावरील निबंधात ते लिहितात, 'ग्रीक, रोम वगैरे जुन्या राष्ट्रातून जे जे प्रकार आढळतात ते ते सर्व आमच्या देशात होते. पण नव्हते असे मात्र दोन. एक इतिहास आणि दुसरे वक्तृत्व. आणि वक्तृत्वाच्या अभावाची उपपत्ति अशी कीं, आमच्या देशात राज्याचा प्रकार काय तो साम्राज्याचाच होता. म्हणजे सगळी सत्ता एका राजाच्या हातीं असून सर्व प्रजा त्याची केवळ अंकित. अशीच राज्यरीति अगदीं प्राचीन काळापासून तों आजपर्यंत चालत आलेली आहे. यास्तव वक्तृत्वाची उपपत्ति येथें कधीं झाली नाहीं ती ठीकच.' या शास्त्रीबोवाच्या उद्गारावरून एतद्विषयक अज्ञानाची कल्पना येईल.

इतिहास लिहून ठेवण्याविषयीं प्राचीन भारतीयामध्ये एकंदरीनें उदासीनता होती हा एक प्रकार झाला. दुसराहि एक तितकाच उद्वेगकारक प्रकार आढळतो. तो म्हणजे जुन्या ग्रथाचें रक्षण करण्याबाबतींतील औदासीन्य हा होय. इतिहासाविषयीं प्राचीनानीं जरी आस्था दर्शविली नाहीं तरी निरनिराळ्या शास्त्रकलादिकावर भारतीयानीं प्रचंड वाङ्मय निर्माण केलें. पण संस्कृतीला अवनतावस्था सुरू झाल्यावर धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी अर्थ आणि काम या पुरुषार्थांना वाहिलेल्या ग्रथाची दखलगिरी पंडितानींहि फारशी बाळगिली नाहीं. अर्थशास्त्रावरील केवळ अद्वितीय अशा चाणक्यप्रणीत अर्थशास्त्र ग्रंथाचीच जेथे विस्मृति पडली तेथें इतर वाङ्मयाचा काय पाड? इतक्या अव्वल दर्जाच्या ग्रंथाला पारखें होण्याच्या या विस्मृतीला जगात अन्यत्र क्वचितच तोड सापडेल. चाणक्याचा हा अद्वितीय ग्रथ शतकानुशतके कोठेतरी कोठल्यातरी ग्रंथसंग्रहात कसाबसा जीव धरून कालाची वाट पाहत राहिला होता. 'राजतरंगिणी' या अव्वल इतिहासग्रंथाची हकिकत ही अशीच अरसिकत्वदर्शक आहे. संस्कृत वाङ्मयात इतिहासग्रथ आधींच अल्प. जे हाताच्या बोटावर मोजण्याएवढे आहेत त्यात राजतरंगिणी हा एक अव्वल दर्जाचा इतिहासग्रंथ आहे. या ग्रंथाचा परिचय प्राचीन भारतातील राजे लोकाच्या विक्षिप्त लीला वर्णन करीत असता मागील प्रकरणी झालाच आहे. ह्या ग्रंथाच्या प्रतींपैकीं एका प्रतीचा शोध स्टाइन याला लागला तो केशवराम नावाच्या काश्मिरी पंडिताच्या वाड्यात.

पाहतो तों पोथीचा फक्त तिसरा हिस्साच काय तो या पंडिताच्या बाडात. केशवरामाला तीन पुत्र होते. त्यांनीं पित्याच्या पश्चात् जिंदगीची वाटणी केली तेव्हा राजतरंगिणी ग्रंथ तिघात समसमान वाटून घेतला ! या तिन्ही भावाच्याकडचे तीन भाग एकत्र केले तेव्हा समग्र ग्रथ तयार झाला. वाटणींत काहीं पानें खराबहि झालीं होतीं हें सागावयास नकोच. हस्त-लिखिताना जबर किंमत पडत असल्यानें आर्थिकदृष्ट्या वाटणी चूक नव्हती. पण उरलेला दोनतृतीयाश भाग लिहून काढला नाहीं यावरून ग्रंथाच्या ग्राथिक मौल्याची विशेष पारख नसावी असेच दिसते.

या असल्या अनास्थेमुळे प्राचीन भारतीय संस्कृतीच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान लोपून गेले. म्हणूनच ससार सुखाचा करण्याकरिता आपल्या पूर्वजानीं जे आस्थापूर्वक परिश्रम केले त्याची मुद्दाम ओळख करून घेण्याचा प्रसंग आला आहे. व्याकरण, वेदान्त, रामायण, भारत, भागवत, काव्य, नाटके यापलीकडील वाङ्मयाशीं पंडिताचाच संबंध दुरावला आणि प्राचीन भारतीयाच्या अनेक उलाढालींचे, अचाट उद्योगाचे, ऐहिक वैभव व विलास याना पोषक अशा शास्त्रकलावरील परिश्रमाचे स्मरण पार बुजाले ! नाना प्रकारच्या उपयुक्त व ललितकलात भारतीयानीं स्वतंत्र व प्रौढ प्रगति केलेली होती हे पटवून देण्याकरिता आगरकराना 'वेद व स्मृति' या ग्रंथातून अनेक कलाची मोठी यादीच सादर करावी लागली होती. पण तेहि लिहितात की, 'ग्रीस व रोमन लोकाच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक, उत्साहजनक नाहीं हे कबूल केले पाहिजे.'

खुद्द आमचीच ही गत तर परकीयानीं आम्हाला या बाबतींत हिणवावें यात नवल कसलें ? मॅक्स मुल्लरचें हिंदुसंस्कृतीविषयीं एकदरीने अनुकूल मत होतें पण ते तिच्या तत्त्वज्ञानाच्या उचीबद्दल; तिच्या ऐहिक वैभवा-विषयीं नव्हे. तो लिहितो, हिंदु लोक म्हणजे नुसते तत्त्वज्ञ. ते तत्त्व-ज्ञानात इतके गढून गेलेले असत, कीं **ज्या व्यावहारिक गुणांनीं राष्ट्राचा दर्जा वाढतो त्या गुणांची जोपासना करण्याकडे त्यांनीं कधीं लक्षच दिलें नाहीं.**[1] दुसऱ्या एकाने तर लिहिलें आहे कीं,

१. मागें पृ. ८ पहा.

हिंदूंचा तत्त्वज्ञानातील आनंद हाहि अळणीच. उर्कुहार्ट हा आपल्या उपनिषदावरील ग्रंथात लिहितो, 'उपनिषदात आनंदमीमांसा आढळते हे खरें पण हिंदु लोकाचा हा आनंद खिश्चन लोकाच्या आनंदासारखा मात्र नव्हे हो ! हिंदूंचा आनंद निराळा, खिश्चनाचा निराळा. खिश्चनाचा भावनात्मक तर हिंदूंचा केवळ नकारात्मक !'[१] म्हणजे हिंदु लोकांना आनंद या भावनेची खरी कल्पनाच नाहीं इतके हिंदु लोक हे विटलेल्या वृत्तीचे अशी या पाश्चात्य पंडिताची कल्पना.

अलीकडील पन्नास-पाऊणशें वर्षांत हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें सशोधन हे शिलालेख, ताम्रपट, नाणीं, लुप्त ग्रंथ, परकीय प्रवासी-वृत्त, उत्खनन वगैरे अनेक अगानीं सुरू आहे आणि त्याच्या पोटीं प्राचीन भारतीयाच्या ऐहिक व्यापाचा व वैभवाचा उज्ज्वल संभार प्रकट झाला आहे. तो परकीयास न दिसो वा ते न पाहोत; पण तो आपला आहे तो आपण पाहूं या, अभिमानाने पाहू या. तो पाहिला असता आपल्या पूर्वजाना ऐहिक ऐश्वर्याची, वैभवाची किमत कधींच कळली नव्हती हे मत यापुढे कोणी ठोकून देईल तर ते फक्त दुराग्रहच देऊ शकेल याविषयीं संशय राहणार नाही.

जाता जाता हेही सागितले पाहिजे कीं प्राचीन भारतीय इतिहासाचीं अनेक अंगोपागे सजविण्यात ज्याचे श्रम खर्ची पडले आहेत त्यात पाश्चात्य पडिताचा वाटा फार मोठा आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे जरूर आहे. त्यापैकीं सर्वांचीच दृष्टि मात्र निर्मळ नसते. प्राचीन भारतीय संस्कृतीचे वर्णन हे युरोपियन संस्कृतीच्या श्रेष्ठतेची पार्श्वभूमि म्हणून करण्याचा मोह काहींना आवरत नाही. उदाहरणार्थ, इलियटचा इतिहास पहा. याने परशियन तवारिखाचीं इंग्रजी भाषान्तरें करून हिंदुस्थानच्या इतिहासाचे खंडच्या खड प्रसिद्ध करण्याचा मोठा दीर्घोद्योग केला, पण आपली भूमिका स्पष्ट करिताना तो प्रस्तावनेत लिहितो, "ज्या तवारिखाचे पुढें भाषान्तर दिलें आहे त्या बहुतांशीं उथळ, अज्ञानग्रस्त, रूक्ष अशा आहेत पण त्याच्या वाचनानें आमच्या ब्रिटिश अमलाखालीं जी समता आणि शाति लाभत आहे त्याची आमच्या प्रजेला खरी किंमत

१. Constructive Survey of the Upanishads—by R D. Ranade.

कळूं लागेल आणि देशभक्तीच्या बाता मारणाऱ्या बाबूंची तोंडे बंद होतील !'[1]

थेट वैदिक कालापासून तों मुसलमानी अमदानीच्या सुरवातीपर्यंतच्या चार पाच हजार वर्षांतील भारतीयाच्या विविध वाङ्मयावर, नुसत्या धार्मिक नव्हे तर अर्थशास्त्र, कामशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, गणित, रसायन, नाट्यशास्त्र, वार्ताशास्त्र, काव्यशास्त्र, संगीतशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे वाङ्मयावर नजर टाकली तर असें आढळेल, की भारतीयांनी कोणत्याहि काळीं सर्वस्वीं आध्यात्मिक जीवनात गुरफटून जाऊन ऐहिक वैभवाकडे पाठ फिरवली नव्हती. भारतीयाचे प्राचीनातील प्राचीन वाङ्मय म्हणजे जे वेद ते उघडून वाचा. हो, उघडून वाचा. मंत्रजागराच्या वेळीं म्हटलेलें नुसतें अर्थशून्य मनानें ऐकू नका, तर डोळे उघडून वाचा म्हणजे तुम्हास आढळून येईल कीं, वेद हे प्रपंच नेटका करण्याविषयीं हव्यास बाळगणाऱ्या, विजिगीषु, आक्रमणशील, अचाट उत्साही आणि उद्योगी अशा आपल्या पूर्वजांचें वाङ्मय होय. अनार्यांशीं झुंजून त्यांना जिंकून, दास करून वा गिरिकंदरात पिटाळून लावून 'कृण्वंतो विश्वमार्यं' असा जयघोष करीत वसाहती स्थापन करीत चाललेल्याच्या व 'पृथिव्याः समुद्रपर्यंतायाः एकराट्' होण्याची मनीषा बाळगणाराच्या उत्साहाने रसरसलेलें असे ते वाङ्मय आहे. ते होम करीत, हवन करीत, इंद्रादि देवाना प्रार्थना करीत. पण त्या प्रार्थनाचा सूर उपनिषदें सोडलीं असता हे इंद्रावरुणानो, आम्हास नीतीचा आणि सत्याचा मार्ग दाखवा व आमच्या शत्रूंचा नायनाट करा व त्यांची अपार संपत्ति लुटून आम्हास द्या[2] असा असे. क्वचित् एखादा नासदीयसूक्तकारासारखा ऋषि तत्त्वज्ञानातही गढलेला असे. पण बाकीचे सर्व, यज्ञानीं देवाना संतुष्ट करून त्याच्याकरवीं ऐहिक जीवन सुखी कसें करतां येईल याविषयींच्या उद्योगात चूर असत.

राजेलोक शस्त्रास्त्रानीं लढत आणि त्याचे पुरोहित ऋषि मंत्रतंत्राच्या योगानें देवतांना प्रार्थना करून त्याना साहाय्य करीत. शत्रूंचें निर्दालन

---

१. History of India—by Elliot and Dowson Vol. I. Preface.
२. ऋ. ७।१०४, १०।८७ वगैरे.

झालें म्हणजे मोठमोठे यज्ञ करीत. यज्ञकुंड पेटलेलीं असता मंत्रघोष चालू असे. पण सर्व कशासाठीं ? तर आम्हाला धन मिळूं दे, सुंदर स्त्रिया मिळूं देत, उत्तम अश्व लाभूं देत, वीर्यशाली पुत्र होऊ देत यासाठीं ! या बाबतींत सुप्रसिद्ध असा जो रुद्र, कीं ज्याची अकरा आवर्तनें पाठ म्हणून एकादशणी करण्याचा प्रघात आहे, त्या रुद्राध्यायाची साक्ष पुरेशी आहे. या रुद्राचे किंवा शतरुद्रीयाचे नमक आणि चमक असे दोन भाग असून त्यानीं शुक्लयजुर्वेदीय माध्यंदिन वाजसनेयी संहितेचे अध्याय सोळा आणि अठरा व्यापिले आहेत. पैकीं सोळाव्यात रुद्राला जे नमन आहे त्या नमनाचा रोख रुद्राचा रोष आपणावर न व्हावा व ज्याच्यापासून आपणास त्रास पोचण्याचा संभव आहे अशा सर्वांपासून रुद्राने आपलें रक्षण करावें हा आहे. सुरुवात आहे तीच 'नमस्ते रुद्र मन्यवे उतो ते इषवे नमः' म्हणजे हे रुद्रा, तुझ्या रोषाला (मन्यु) व तुझ्या बाणाना नमस्कार असो अशी आहे. रक्षणावर भर असल्याने या अध्यायातील ६६ मंत्रापैकीं अर्ध्या मंत्रात रुद्राच्या धनुष्याचा व बाणाचा उल्लेख आहे. या अध्यायाचा एकंदर थाट आहे तो असा कीं हे रुद्रा, सर्प वगैरे हिंस्र प्राण्याना गारद करून यातुधानाना (राक्षसाना) आमच्यापासून दूर घालवून दे (५), हे भगवन्, तुझ्या धनुष्याची दोरी सोडून टाक आणि बाणहि पण फेकून दे कसे ! (९). हे रुद्रा, आमच्या कोवळ्या मुलाबाळाचा, आमच्या वृद्ध मातापितराचा, आमच्या गायी-घोड्याचा नाश करूं नकोस. आम्ही यज्ञात तुला नेहमीं हवी देत आलेले आहोत (१५, १६). चोर, लुटारू, खड्गधारी तसेंच रथकार, कुंभार, लोहार, शिकारी या सर्वांवर ज्या तुझें आधिपत्य आहे त्या तुला नमन असो (२०, २७). ऊन, पाऊस, विजा, विहिरी, तळीं या सर्वांत वास करणाऱ्या रुद्रा, तुला नमन असो (३८). हे जटाधारी रुद्रा, ही पहा आम्हीं आमची बुद्धि तुझ्या स्वाधीन केली तर आमच्या गावातील माणसें आणि गुरेंढोरें सर्व निरोगी आणि धष्टपुष्ट होवोत (४८). वगैरे. येणेंप्रमाणें नमकाध्यायात रक्षणाची प्रार्थना केल्यावर पुढील चमकाध्यायांत आपल्या यज्ञानें तुष्ट होऊन रुद्रानें आपणास काय काय द्यावें हें 'हें मला मिळो, हें मला मिळो' अशा शब्दानीं वर्णिलेलें आहे. त्याचा एकंदर सूर असा आहे कीं, माझ्या यज्ञाच्या योगानें मला उत्तम अन्न,

सुदृढ शरीर, दीर्घायुष्य (१, ३), राजयक्ष्मादि रोग, भय, शत्रू यापासून अलिप्तता; सर्व प्रकारचें सुख, गाढ झोप येईल अशी शय्या, उत्साहवर्धक पहाट आणि आनंदात जाईल असा सर्व दिवस (सुखं च मे शयनं च मे सूषाश्च मे सुदिनं च मे) (६), तांदूळ, जवस, उडीद, तीळ, मूग, चणे वगैरे धान्यें, व सोनें, रुपें, पोलाद, लोखंड, शिसें, कथील, पाषाण, मृत्तिका वगैरे खनिज पदार्थ (१२, १३), गायी, कालवडी, खोंड, बैल (२६,२७) हीं सर्व मला मिळोत.[1]

याच संहितेच्या पुढील बाविसाव्या अध्यायामध्यें अश्वमेध यज्ञाचे मंत्र आहेत. त्यापैकीं एकात सुखी जीवनाकरिता पुढील गोष्टी प्राप्त होवोत अशी पार्थना आहे. 'हे ब्रह्मदेवा, आमच्या राष्ट्रात वेदाध्ययन करणारे ब्राह्मण उत्पन्न होवोत. शत्रूचा नायनाट करणारे शूर क्षत्रिय उत्पन्न होवोत. दुभत्या गाई, बलिष्ठ बैल, वेगवान् अश्व, रूपगुणसंपन्न स्त्रिया, वीर पुत्र, यथाकाम पर्जन्य, फलानीं डवरलेले वृक्ष ही सर्व उत्पन्न होवोत व आमचा योगक्षेम उत्तम चालो (२२.२२).

वेदकालीन व्यापव्यवहार

वैदिक काळातील भारतीयाच्या उद्योगआकांक्षा, विद्या याचें यथार्थ स्वरूप लक्षात घ्यावयाचें तर ऋग्वेदाच्या व यजुर्वेदाच्या जोडीला अथर्ववेदाकडेहि दृष्टि टाकली पाहिजे. आणि या वेदाचे दोन भाग असून एकात, म्हणजे अथर्वसूक्तात, शांति, पुष्टि वगैरेंचे शुभकारक मंत्र असून, दुसऱ्यात जारणमारणादि अभिचार व घोर असे मंत्र आहेत. अर्थात् या दोन्ही अंगानीं सजलेला अथर्ववेद म्हणजे भारतीयाच्या त्या काळच्या अनेक सुष्टदुष्ट उद्योगउपद्व्यापाचा कोशच म्हणावयास हरकत नाहीं. या कोशात काय काय चिजा आहेत हें पाहावयाचें असेल तर या वेदातील

१. यज्ञेन मे कल्पन्ताम् याचें यज्ञानें मला मिळोत असें म. म. पाठकशास्त्री यांनीं भाषान्तर केलें आहे. केसरीकारांनी यज्ञेन कल्पतां वाचा अर्थ यज्ञाकडे त्याचा विनियोग होवो असा सुचविला आहे तो मार्मिक आहे. पण वैदिक काळांतील प्रार्थनांचा एकंदर सूर पाहिला तर यज्ञामुळें मला या वस्तु मिळोत असा अर्थ करणें मूलग्राह्य सोडून होणार नाहीं.

विषयाची कौशिक सूत्रकारानें जी जंत्री दिली आहे ती उघडून पाहा. अथर्ववेदातील मंत्राच्या योगाने काय काय गोष्टी साध्य होतात याची कौशिक सूत्रकारानें जी यादी दिली आहे तींत पुढील प्रकार आहेतः— या मंत्रानीं काय साध्य होईल ? तर बुद्धि तरतरीत होईल. ब्रह्मचाऱ्याचे गुण अंगीं येतील. ग्राम, नगर, दुर्ग, राज्य, धनधान्य, दारासुत, राजअश्वरथादिकाची प्राप्ति होईल. जनतेंत एकमत्य व संतोष नादेल. शत्रूच्या हत्तींना उधळून लावता येईल. शस्त्रास्त्राचें निवारण करता येईल. युद्धात जय मिळेल, स्वतः सैन्याचे रक्षण व उत्साहवर्धन करता येईल. युद्धाचें भविष्य वर्तविता येईल. शत्रूच्या सैन्यास दिङ्मूढ करणें, घाबरून सोडणें आणि नायनाट करणें साधेल. शत्रूच्या गोटात मंतरलेली तरवार अथवा पाश टाकिता येईल. रणदुंदुभि मंतरता येतील. राज्याभिषेकाचा विधि कळेल. पापाचें प्रायश्चित्त समजेल. शाप देता येईल. गोर्वधन व धनधान्यादींची समृद्धि करणाऱ्या तत्रताइताचें ज्ञान होईल. जन्मातर्गत पाप नाहींसें होईल. असाध्य अशा रोगाची चिकित्सापद्धति कळेल. ताप, हगवण, मधुमेह हे रोग बरे करता येतील. शस्त्रानें झालेला रक्तस्राव थाबविता येईल. भूतपिशाचादिकानीं झपाटलेल्यांची सुटका करता येईल. वात, पित्त, कफ, तसेंच क्षय, जलोदर, व गाई, घोडे याच्या पोटातील जंतु व निरनिराळी विषें यांचें निवारण करतां येईल. ब्राह्मणाचा शाप आणि राजाचा कोप घालविता येईल. व्यापारात अमूप नफा मिळेल. युद्धात, वादात, द्यूतात जय मिळेल. स्त्रियाची कुलक्षणे थाबविता येतील. निषिद्ध दान घेतल्याचें किंवा निषिद्धाचें पौरोहित्य केल्याचें पाप धुऊन टाकता येईल. अशुभ स्वप्नें, अशुभ ग्रह, अशुभ लक्षणें याची शाति करता येईल. शत्रूचे अभिचारमंत्र उलटविता येतील. नामकरण, चौल वगैरे संस्काराची माहिती पटेल. सूर्यचंद्रादिकाचीं ग्रहणें, धूमकेतु, भूकंप इत्यादि अरिष्टाची शांति करतां येईल. वगैरे वगैरे...

वरील यादीवरून भारतीयांच्या इच्छा, आकाक्षा व संसाराकडे पाहण्याची दृष्टि याची चांगली कल्पना येईल.

वैदिक कालाच्या शेवटीं आरण्यककालीं व उपनिषत्कालीं भारतीयांची विजिगीषु इच्छा मंदावलेली दिसते. मुलूखगिरी आणि यश यांची एक

प्रकारची सागडच होती. यज्ञात होणाऱ्या पशूंच्या अपरिमित संहारामुळें शेती व तीवर जगणारा बहुजनसमाज याचे नुकसान होत असले पाहिजे. यामुळें उपनिषत्कालीं यज्ञावरचा विश्वास उडत चालला आणि विजिगीषु वृत्ति थडावून अरण्यात जाऊन सन्यासी वृत्तीने राहण्याची प्रथा सुरू झाली. ही प्रवृत्ति ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन्ही जातींत बळावली. क्षत्रियात थोडी आधीं बळावली म्हटली तर चालेल कारण आत्मविद्येचे रहस्य समजावून घेण्याकरिता काहीं ब्राह्मण तत्त्वजिज्ञासु क्षत्रिय तत्त्ववेत्त्याच्याकडे जाताना उपनिषदात आढळतात. बौद्ध धर्म आणि जैन धर्म हेहि याच प्रवृत्तींतून उद्भूत झाले. ह्या काळात तत्त्वज्ञानाला उज्ज्वल बहर आला.

पण राष्ट्रातील अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता केवळ तत्त्वज्ञानात गुरफटून जावी किंवा राजेलोकानीं रणागण सोडून अरण्यात चालते व्हावें ही परिस्थिति समाजाच्या स्थैर्याला व उत्कर्षाला सर्वथैव प्रतिकूल होती. म्हणून या प्रवृत्तीविरुद्ध मन्वादिस्मृतिकारानीं जोराने व नेटानें चळवळ केली. त्यानीं मुख्य प्रमेय माडलें तें हें, कीं माणूस जन्माला येतो तो तीन ऋणें घेऊनच येतो. या ऋणाचें अपाकारण केल्याशिवाय, गृहस्थाश्रम यथासाग पार पाडल्याशिवाय, मोक्षमार्गाला लागणें हें पाप होय.[१] गीतेनेंही कोणींही आपले कर्तव्यकर्म सोडता कामा नये, क्षत्रियानें रणागण सोडणें अनार्यजुष्ट होय, असा कर्तव्यपरिपालनाचा गदारोळ केला. ह्या चळवळीचा इष्ट परिणाम झाला असावा. कारण उपनिषत्कालानंतरच्या काळात तत्त्वज्ञानाच्या जोडीला ऐहिक जीवन सुखमय, ऐश्वर्यमय करणाऱ्या अनेक शास्त्रविद्याकला याची जोपासना झाली. अर्थशास्त्र, कामशास्त्र, शिल्प, आलेख्य, वास्तु, सगीत, नृत्य, नाट्य वगैरे अनेक विषयात भारतीयाची बुद्धि या कालात रममाण होऊन गेली. तत्त्वज्ञानामध्येंहि स्वतंत्र प्रतिभा जागृत राहिली. तिनें अनेक दर्शनाना जन्म दिला. याच काळात ग्रीक, पार्थियन, शक, कुशाण, हूण वगैरे परकीयांनीं काहीं काळ धुमाकूळ

१. ऋणानि त्रीणि अपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत ।
अनपाकृत्य मोक्ष तु सेवमानो व्रजति अधः ॥ मनुस्मृति ६।३५.

घातला पण शेवटीं त्यांना हाकून लावून यज्ञकुंडे धडाडू लागलीं आणि दिग्विजयाकरिता अश्वमेधाचा घोडा चारी दिशाना पळू लागला. गुप्ताच्या काळीं या वैभवाचा कळस झाला आणि पुढेहि काहीं शतकें टिकला.

कलाकौशल्य

या कालातील भारतीय कलाच्याकडे नजर फिरविली तर भारतीयानीं ससारोपयोगी हरएक कलाची जोपासना केलेली आढळून येईल. त्याच्या चौदा विद्या व चौसष्ट कलाची यादी प्रसिद्धच आहे. त्यात जीवन सुखमय करणाऱ्या, संसाराच्या वनाचे उपवन करणाऱ्या व ऐहिक व्यवहारातील कटकाचे रोमाचात रूपातर करणाऱ्या अनेक कलाचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. या कलापैकी भगुर, नाशवत साधनाचा उपयोग करणाऱ्या काहीं कला आज स्मृतिशेष झाल्या असल्या तरी त्याचें वर्णन ग्रंथातरी टिकून आहे; आणि पाषाणासारखें अभंग साधन वापरणाऱ्या तर मदसोर येथील यशोधर्म्याच्या शिलास्तभावरील लेखात म्हटल्याप्रमाणें चद्रबिंबावर आपला उत्कर्षलेख लिहिण्याकरिता पृथिवीने आपले बाहूच वर उच केले आहेत कीं काय अशा थाटांत साक्षात् उभ्या आहेत !

ससारोपयोगी कलातील एक अति प्राचीन व महत्त्वाची कला म्हणजे विणण्याची कला ही होय. या वस्त्रें विणण्याच्या कामात भरतखंडाइतका कोणताच देश प्राचीन काळीं पुढारलेला नव्हता. मिसर देशात थडग्यात पुरलेल्या प्रेतामोंवती वस्त्रें गुंडाळलेलीं जीं आज उपलब्ध झालीं आहेत तीं भरतखंडातलीं असून पन्नास-साठ नबरच्या सुतार्ची आहेत असे म्हणतात. सर्व देशाना कापसाचीं, रेशमाचीं व लोकरीचीं तलम वस्त्रे पुरविण्याचें काम प्राचीन काळीं भरतखंडातील कारागीरच करीत. या वस्त्राच्या तलमपणाविषयीं अनेक आख्यायिका व साक्षी आहेत. नवव्या शतकातील सुलेमान व्यापाऱ्यानें लिहिलें आहे कीं, येथील वस्त्रें इतकीं तलम असतात, कीं मोहोरेच्या अंगठीतून एक सबंध वस्त्र जावें ! हंटर वर्णन करितो कीं, कलिंग देशच्या राजानें औंधच्या राजाला एक रेशमी वस्त्र पाठविलें होतें तें इतकें तलम होतें, कीं राज-

कन्येनें जेव्हा तें परिधान केलें तेव्हा ती नग्नावस्थेत आहे कीं काय याचा संशय पडला. रोममध्यें हिंदुस्थानातून जाणारीं रेशमी वस्त्रें इतकी तलम होतीं कीं तीं पेहरणे अशिष्ट होय असा टायबेरियस सीझर याला कायदा करावा लागला.[१] डाकाच्या मलमलीची प्रसिद्धि तर सर्वश्रुत आहे. १८४६ सालीं टेलर नावाच्या साहेबानें एक सूत पाहिले तें १३४९ वार लाब होतें पण वजनात २२ ग्रेनच भरलें म्हणजे आजच्या हिशेबानें त्या सुताचा नंबर चारशेंच्या वर लागतो![२] (गणेशशर्मा खादीका इतिहास) काश्मीरच्या शालीची एवढी ख्याति आहे कीं १८४६ साल्च्या तहात एक कलम असें घातलेलें आहे, कीं काश्मीर दरबारनें दरवर्षी इंग्लंडच्या राजाला एक शाल नजर करावी. या शालीची किंमत सुमारें आठ हजार असते.

शिल्प व धातूचें ओतकाम याची साक्ष घ्यावयास तर वाङ्मयाचे जुने रुमालहि सोडावयास नकोत. त्याचे अवशेष ठिकठिकाणीं अद्यापहि उभे आहेत व ते व्यासाप्रमाणें हात वर करून आक्रोश करीत आहेत कीं, 'भारतीय कलावैभव आम्हाला विचारा.' अशा प्रकारचे असंख्य अवशेष ठिकठिकाणीं दऱ्याखोऱ्यातून विखुरलेले आहेत. म्हैसूर संस्थानामध्ये श्रवण बेळगोळा येथील एका गिरिशिखरावर उभा ठाकलेला ६० फूट उंचीचा भव्य पुतळा; दिल्ली, उज्जैनी येथील वेधशाळेतील प्रचंड शिलायंत्रें; दिल्ली येथील लोहस्तंभ; नालंद, सारनाथ, सांची येथील स्तूप; अजिंठा, वेरूळ, कालें येथील भव्य लेणीं हीं भारतीयाच्या अजस्र व्यापाचीं स्मारकें आजहि उभीं आहेत.

चित्रकलेचें जीवित शिल्पाप्रमाणें टिकाऊ नव्हे; तरीहि या बाबतींत भारतीयानीं चुन्याच्या ओल्या गिलाव्यावर आलेख काढण्याची जी युक्ति योजिली होती व टिकाऊ रंग कमविण्यात जी आश्चर्यकारक प्रगति केली होती त्यामुळें दोन हजार वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजानीं आपल्या हातांनी काढलेलीं चित्रें जणों काल काढलेल्या चित्रासारख्या टवटवीत रंगात आजहि आपणांस अजिंठा दाखवीत आहे.

---

१. Economic History of Ancient India by S. K. Das, p.206.

२. ८४० वार्डाच्या धाग्याला हँक असें म्हणतात, व एक रत्तल वजनाच्या सुताचे जितके हँक भरतील तितका त्या सुताचा नंबर मानतात.

कलांचे जे विशेष नष्ट होण्यासारखे होते ते इस्लामी रांगडेपणाला बळी पडले त्याची साक्ष संस्कृत ग्रंथातून व परकीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनातून काढण्यासारखी आहे.

हिंदूंच्या क्षेत्रातील घाट व तीर्थकुंड ह्यांची उत्कृष्ट रचना पाहून अल्बेरुणी लिहितो कीं, 'आमचे लोक (मुसलमान) जेव्हा ही कारागिरी पाहतात तेव्हा ते इतके आश्चर्यमूढ होतात, कीं तिचे वर्णन कसें करावे हेहि त्याना समजत नाहीं ! असलीं कामें प्रत्यक्ष करण्याची तर गोष्टच नको. या कुंडातून सर्व बाजूंनीं खालवर उंतरत गेलेल्या इतक्या पायऱ्या असतात, कीं असंख्य लोक स्नानाकरिता उतरले तरी गर्दी होत नाहीं' (प्र.५६). भारतीयाचें नगररचनाकौशल्य पाहाल तर त्यात सुखसोयी, आरोग्य व सौंदर्यदृष्टि याचा कसा सुंदर मिलाफ आढळून येईल. ह्यूएनत्संग कनोजचें वर्णन करितो कीं, 'शहर पाच मैल लाब व मैलभर रुंद असून त्यात ठिकठिकाणीं रम्य उपवनें, स्वच्छ पाण्याच्या टाक्या व पदार्थसंग्रहालये आहेत.'[1] फा हियेननें दक्षिणेंतील एका सघारामाचें वर्णन केलें आहे. त्याची इमारत एका प्रचंड पर्वतशिलाखंडातून खोदून बनविलेली होती. इमारत एकंदर पाचमजली होती आणि प्रत्येक मजल्याला निरनिराळा आकार दिलेला होता. तळमजला हत्तीच्या आकाराचा असून त्यांत ५०० दालनें होतीं, दुसऱ्या सिंहाकृतींत ४००, तिसऱ्या अश्वाकृतींत ३००, चवथ्या वृषभाकृतींत २०० व शेवटच्या हंसाकृतींत १०० दालनें होतीं ! इमारतीच्या माथ्यावर एक वाहता झरा असून त्याचें पाणी पाचही मजल्यातून खेळवीत आणून तळमजल्याच्या द्वारातून बाहेर सोडून दिलेले होतें ![2]

कैलास लेण्यास तर तोड सापडणार नाहीं. पर्वताच्या अखंड शिलाखंडांतून हें लेणें ज्यानें खोदून काढलें असेल त्या कारागिराची केवढी प्रतिभा आणि कर्तबगारी ! बडोदें येथें सापडलेल्या एका दानपत्रात याचें वर्णन केलें आहे कीं हें लेणें निर्माण झाल्यावर देव विमानांतून त्याच्याकडे

१. मध्ययुगीन भारत १।५९ वैद्य.

२. Beal ch. 68.

पाहून थक्क झाले आणि आपआपसात म्हणूं लागले कीं हें लेणें मूळपासून स्वयंभूच असले पाहिजे; असली कारागिरी मानवाची नव्हे ! स्वतः वास्तुकारहि आपल्या अतुल कृतीने भेदरून गेला व म्हणाला कीं, छे ! असली कृति पुन्हा माझ्या हातून वठणे अशक्य आहे ![1]

विजयानगर वैभवाने तळपत होतें त्या काळाचे परकीय प्रवाशानीं लिहून ठेवलेले वर्णन पाहता, तेव्हा त्याची लोकसंख्या तीस लाख असावी. हे नगर तुगभद्रेच्या काठीं वसलेलें असून त्याची लांबी १४ मैल व रुंदी १० मैल होती. [illegible], राजवाडे, पाण्याचे कालवे, देवालयें, विद्यामंदिरें, शृंगारलेले तंबू, बाजार, क्रीडाभवने, सभागृहे, दिवाणखाने इत्यादीमुळें शहराचा हा भव्य विस्तार गजबजून गेलेला होता.

वास्तुशिल्प व नगरशृंगार यांप्रमाणेच जीवन हें आनंद, उत्साह व रमणीयता यानीं भारून टाकणाऱ्या ज्या दुसऱ्या ललितकला म्हणजे गायन, वादन, नृत्य, नाट्य, काव्य त्याकडे भारतीयानीं उपेक्षा बुद्धीनें तर पाहिले नाहींच पण या सर्वांची अनन्यभावाने, उत्सुकतेने, हौसेने जोपासनाच केली. भारतीयाच्या वैभवकाळीं या सर्व कलाबद्दल लोकामध्यें फार आदर वसत असला पाहिजे. राजा भर्तृहरीचें वचन सुप्रसिद्ध आहे कीं, 'साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः' साहित्य-संगीताची ज्याला गोडी नाहीं त्याच्यांत आणि पशूंत अंतर असेलच तर त्याला शिंग आणि शेपूट नसतें एवढेंच, बाकी तो साक्षात् पशुच ! पुरुषच नव्हे तर स्त्रियाहि नृत्य, संगीत वगैरेंत निष्णात असत. कविकुलगुरु कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रा'त राजस्त्रियाना शिकविण्याकरिता गणदास नांवाच्या एका नाट्याचार्याची नेमणूक केलेली होती असें वर्णन आहे. या गणदासाच्या नेतृत्वाखालीं 'छलित' नावाचें नृत्य बसविण्याचें काम सुरू होतें आणि त्यात मालविका, इरावती वगैरेसारख्या तरुण मुली काम करणार होत्या. गणदासानें मालविकेला अभिनय व त्याचीं पांच उपांगें हीं सर्व शिकविलीं होतीं व मालविकेनें तीं कितपत आत्मसात् केलीं होतीं याची परीक्षा राजाराणी व कौशीतकी नावाची पोक्त विद्वान् बाई याच्या-

१. History of the Deccan पा. १०९. by R. G. Bhandarkar.

समोर घेतली जाणार होती असे एकंदर वर्णन आलेलें आहे. कुलीन स्त्रियानीं नृत्य करणें व पोक्त स्त्रियानी ते निःसंकोच मनाने पाहणें यावरून त्या काळच्या लोकरुचीची कल्पना येईल. नाटकात स्त्रियाची भूमिका बहुधा स्त्रिया करीत. नाट्यशास्त्राच्या ३५ व्या अध्यायात[1] भरताने कोणत्या भूमिका कोणीं कराव्यात याविषयीं विवेचन केले आहे त्यात तो सांगतो की 'भूमिक सुकुमार च नित्य स्त्रिभिरनुष्ठितम्।' सुकुमार अशा भूमिका स्त्रियाच घेत आलेल्या आहेत. स्वर्गातील नाट्यात रंभा, उर्वशी वगैरे भूमिका करीत. त्यास अनुसरून राजाच्या अन्तःपुरातील स्त्रियानाहि भूमिका वठविण्याचे शिक्षण द्यावे. विशेषतः शृंगाररसाविर्भाव-प्रसगी तर स्त्रियाच्या भूमिका स्त्रियानाच द्याव्यात (२१–२४). पतजलींची साक्ष याच प्रकारची आहे. महाभाष्याच्या तिसऱ्या आन्हिकात 'नटाना स्त्रियः रगं गताः' असा त्याने स्पष्ट उल्लेख केला आहे. नृत्याविषयी त्या काळचे मत कालिदासाने नाट्याचार्य गणदासाच्या तोंडून वदविले आहे. गणदास म्हणतो, 'ज्याला त्याला आपल्या विद्येचा अभिमान असतो पण माझा अभिमान यथार्थ आहे.' नाट्याविषयीं भरत-मुनीचेच असे वचन आहे कीं, 'भिन्न भिन्न रुचीच्या व्यक्तींना सारखेच रिझविण्याचें कोणते एक उत्कृष्ट साधन असेल तर तें नाट्य हें होय.' या अद्वितीय साधनाची भारतीयानीं कसून सेवा केली होती. या विषया-वरील मौलीभूत ग्रथ जो भरतमुनीचा नाट्यशास्त्र तो एक प्रचंड नाट्य-कोश असून त्यात नाट्य, नृत्य, अभिनय, नाट्यगृह वगैरे नाट्याच्या हरएक अगोपागाचे मोठे सविस्तर व सागोपाग विवेचन केलेले आहे.

नाट्याशीं सबंध असलेल्या गायन आणि नृत्य या कलाना भारती-यानीं फार उज्ज्वल स्वरूप आणले होते. रामायणात रावण हा गायन-वादनात कुशल असा वर्णिलेला आहे. त्याने शंकराला संतुष्ट केले तें आपल्या गायनानेंच केले ही कथा गायनाची थोरवीच वर्णन करणारी आहे. कृष्णाच्या मुरलीरवाचे वर्णन हे भागवतपंथीय कवींनीं मुक्तकठानें गायिलें आहे. मृच्छकटिकातल्या चारुदत्तासारख्या दारिद्र्य प्राप्त झालेल्या-च्या घरींहि वीणादि वाद्याचा इतका संभार होता, कीं आपण चुकून

१. काशी प्रत.

नाटकवाल्याच्या घरात तर शिरलो नाहीं ना अशी शर्विलक चोराला शंका आली ! गायन-नाट्यादि ललितकलाचे मुख्य आश्रयस्थान म्हणजे राजेलोक. या राजेलोकापैकीं काहीं स्वतः जातीने नृत्यनाट्य-गायनादिकलात प्रवीण होते. भासाच्या नाटकातील सुप्रसिद्ध उदयन राजा, कालिदासाचा अग्निमित्र, तसेंच इतिहासप्रसिद्ध समुद्रगुप्त, भोजराज, रत्नावली नाटकाचा कर्ता श्रीहर्ष वगैरे राजे हे ललितकलाचे नुसते भोक्तेच नव्हे तर उपासक म्हणून प्रसिद्ध आहेत. राजाप्रमाणें पट्टाभिषिक्त राण्याहि गायन नृत्यादि कलात प्रवीण असत इतकेंच नव्हे तर उघड समाजात बसून आपले कौशल्य प्रकट करण्यातहि त्याना वावगे वाटत नसे ! याविषयीं एका दानपत्राच्या आधारे डॉ. भाडारकर लिहितात कीं, 'इसवी सनाच्या बाराव्या शतकातील सोम नावाच्या राजाची राणी सबलदेवी ही गायनात अत्यत निपुण होती. एके प्रसंगीं भर माठ्या सभेमध्ये अनेक गायनवादनकुशलाच्यासमोर राजाच्या समक्ष तिने इतके उत्कृष्ट गायन केले, कीं राजा अतिशय खूप होऊन तिच्या इच्छेप्रमाणे त्याने तिला जमीन इनाम दिली (जर्नल मु. ए. सो. १८९२). गायनकलेचा अभ्यास वैदिककालातील सोमगायनापासून हजारों वर्षे चालू होता. गायनाचे आर्चिक, गाथिक, सामिक आणि स्वरातर असे चार भेद असून तीव्र, कोमल सुराच्या मिश्रणाने बनणाऱ्या रागरागिण्याचे अनेक प्रकार बाधून वर्षाच्या कोणत्या ऋतूंत व दिवसाच्या कोणत्या प्रहरीं कोणता राग म्हणावा याचेहि सूक्ष्म नियम बसविलेले होते.

संगीताचे नृत्य व अभिनय याशीं साहचर्य आहे. या नृत्य-अभिनयाचीहि भारतीयानीं कसोशीने जोपासना केली होती. वैदिककालात अतिरात्र व महाव्रताचा प्रसग या यज्ञाच्या प्रसगीं नृत्य करण्याचा प्रघात होता. शंकराचे ताडवनृत्य अनेक कथात विख्यात असून शकराला नटराज ही पदवी आहे. कृष्णाची रासक्रीडा हीसुद्धा नृत्याचीच आवड दर्शविते. रासक्रीडेवर आध्यात्मिक रूपकाचीं अनेक पुटे देण्याचा प्रयत्न भागवतादि पुराणकारानीं केला असला, तरी अनेक उपपत्त्या त्याना माडाव्या लागल्या यावरूनच मूळ ही रासक्रीडा म्हणजे स्त्रीपुरुषाच्या स्वैर गाठीभेटीचा प्रकार असावा असेंच वाटू लागतें. गायनाप्रमाणे नृत्यातहि राजघराण्यातील स्त्रिया

प्रवीण असत. रुद्रायण राजा साथ करीत असता चंद्रावती राणीनें नृत्य केलें, सिंहलदेशचा राजा जो पराक्रमबाहू त्याची राणी रूपावती नृत्यकुशल होती, राजा शिलादित्य यानें जीमूतवाहन काव्य संगीताच्या चालीवर बसवून नृत्यप्रयोग करविला, अशा प्रकारचे उल्लेख सापडतात.[1] अकराव्या शतकातील चोल राजा राजराज याने तंजावरच्या राजेश्वर मंदिरास चारशे नर्तिका लावून दिल्या होत्या. नृत्यात शरिराच्या त्या त्या अवयवाच्या विक्षेपाचा सूक्ष्म विचार केला असून हाताच्या बोटानी भ्रमरमुख, हंसवदन, अर्धचंद्र, उत्फुल्लपद्म वगैरेसारख्या अनेक मुद्रा कशा दर्शवाव्या वगैरेचा खोल विचार केलेला होता. निरनिराळ्या चलनवलनानीं शरिराच्या होणाऱ्या स्थितींचे १०८ प्रकार कल्पिले आहेत. या १०८ पैकीं ९३ करणाचीं चित्रें चिदंबर देवालयाच्या सभामंडपातील कनकसभेच्या दालनात कोरलेलीं आहेत.[2] या सर्वांचे वर्णन नाट्यशास्त्रात आले आहे.

या लुप्त झालेल्या कलेचा उदयशंकर या गुजराथी कलावंताने अलीकडे उद्धार केला असून पाश्चात्यानाहि त्याने मोहून सोडले आहे. विख्यात रशियन नर्तकी पावलोव्हा व अमेरिकन नर्तकी रागिणीदेवी यानीं भारतीय नृत्य आत्मसात् केले असून युरोप-अमेरिकेत त्याचा प्रसार केला आहे. सर्व शरिरात मार्दव व चपलता निर्माण करून शरिरात आनंदाच्या लहरी उसळविणारी अशी ही कला आहे; 'आयुष्य विषाचा प्याला' असें रडगाणें गाणाराची व परलोकाकडे दृष्टि लावून बसणाराची नव्हे.

शृंगारप्रधान काव्य

आता काव्यकलेकडे नजर द्या व मग सांगा कीं, प्राचीन भारतीय हे नुसती अध्यात्माचीच कास धरीत कीं ऐहिक व्यवहारातील अनेक सुख-दुःखाचे रंग वाङ्मयात भरीत तें. अध्यात्माची वाङ्मयावर छाप बसली ती बाराव्या शतकानंतर, म्हणजे भारतीय संस्कृतीच्या पडत्या काळीं. त्या काळाच्या पूर्वीच्या वाङ्मयाकडे आपण नजर टाका व मग भारतीय वाङ्मयाचें वैशिष्ट्य ठरवा. या कालानंतरहि फरक झाला तो प्राकृत वाङ्म-

१. Rastrakutas by Dr. Altekar, p. 295

२. South Indian Inscriptions No. 66 by Hultsh.

यात. संस्कृत वाङ्मयात पूर्वीचीच प्रणालिका चालू राहिली. ती व पूर्वीचें वाङ्मय याचा सूर पाहिला असता त्यात टाळ, मृदग व वीणा याचा सूर न आढळता तरुणींच्या हास्यलहरी व नूपुराची रुणझुण हीच आढळून येईल. वेदान्तावर मोठमोठीं भाष्ये अस्तित्वात आलीं पण तीं विद्वानाच्याकरिता होत. काव्यनाटकादि बहुजनसमाजाच्या तोडीं खेळणारें व भिन्नरुचीचे आराधन करणारे वाङ्मय हे त्या काळीं वेदान्ताची साथ करीत नव्हते.

या वाङ्मयाचें ध्येय व स्वरूप काय होते याची कल्पना काव्यशास्त्रावरूनहि चागली येते. थोडक्यात सागावयाचे म्हणजे मोक्षमार्गाची व ललितवाङ्मयाची इतकी फारकत झाली होती, कीं वाङ्मयाचा आत्मा जो रस त्या रसाच्या विविध स्वरूपात ससाराविषयी विरक्ति उत्पन्न करणारा रस जो शातरस त्याचा अंतर्भाव करण्यासच कित्येक काव्यमीमासक तयार नव्हते; उलट सर्व रसात मुख्य मानाचा नारळ शृगारालाच देण्यात येई व काही तर शृंगाराव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याच भावनेला रसाची पदवी देण्यास तयार नव्हते. ज्याना इतर रस मान्य होते त्यानींहि उत्तम काव्यार्ची म्हणून उदाहरणे दिलीं आहेत तीं एकजात शृंगारिक; आणि त्यातील पुष्कळ तर पति पत्नीविषयक नसून परस्त्रीविषयक !

संस्कृत वाङ्मयात अलीकडील काळातल्यासारखे संसाराचे वास्तविक चित्र रेखाटण्याचा सप्रदाय नव्हता. बहुतेक काव्य-नाटके पौराणिक, ऐतिहासिक किंवा काल्पनिक अद्भुत स्वरूपाचींच असत. विद्वान् लोकाना आश्रय मिळे तो राजेलोकाकडून. त्यामुळे दरबारी लोकाना आवडेल अशा प्रकारचे वाङ्मय निर्माण होई. या लोकाना मुख्य आवड शृगार व वीर या दोन रसाचीच. बाणभट्टाने कादंबरीमध्ये हिमालयातील गंधर्वलोकात वस्ती करणाऱ्या महाश्वेता, कादंबरी अशा अलौकिक स्त्रिया निर्माण केल्या आहेत. पण त्याच्या आयुष्यातील मुख्य सूत्र कोणते म्हणाल तर ते प्रेमविह्वलता ! पुंडरीकासारखा तपोधनहि कामविकारानें इतका वेडा होतो, कीं युवतीचे कटाक्षबाण हृदयात रुतल्यापासून काहीं घटिकाचे अवधींत त्याचे प्राण त्याला सोडून जातात. हाच शृंगाराचा सूर सर्वत्र ऐकूं येतो. कालिदासाचा ऋतुसंहार घेतला तर सर्व ऋतूंचें जे वर्णन दिलें आहे तें म्हणजे

निरनिराळ्या ऋतूंत कामीजनावर काय परिणाम होतात त्याचे ! जणों काहीं कामीजन हा एवढाच काय तो काव्यविषय होऊ शकतो ! पाश्चात्यातहि शृंगार हाच काव्याचा मुख्य विषय आहे; पण भारतीयाच्याइतका तो एकच एक विषय त्यानीं घोटलेला नाही. कालिदासाचे ऋतुसंहार व इंग्लिश कवि टॉमसन् याचें ऋतुसंहार (Seasons) हीं एकाच विषयाला वाहिलेलीं भारतीय व पाश्चात्य अशीं दोन काव्ये पाहा म्हणजे भारतीय कवीला शृंगार सर्वत्र कसा सुचलो ते कळून येईल.

बहुतेक कवि राजेलोकाच्या आश्रयाने काव्य करीत हे वर लिहिले आहे. हे राजेलोक म्हणजे पट्टीचे विलासी असत. राजाच्या भोवतीं नेहमीं सुंदर तरुण स्त्रियाचा गराडा असावयाचा. मग राजा अंतःपुरात असो वा मृगया करीत असो. राष्ट्रकूटाचे राजे दरसाल एकदा दरबारी मिरवणूक काढीत. त्या मिरवणुकीत राजाच्या भोवतीं स्त्रियाचा गराडा असे. कालिदासाचा दुष्यंत मृगयावेषाने रंगभूमीवर प्रविष्ट होतो तो यवनीभिर्दत्तहस्तः असाच येतो. ' पौर्णिमेसि तारागणिं जसा बाई चंद्र उदेला । मध्यभागीं आपुण भोवत्या नाटकशाला ' हे होनाजीकृत बाजीरावर्णन प्राचीन राजाना सामान्यतः लागू करण्यास हरकत नाहीं. राजाचे छत्र, झारी, पंखा धारण करणाऱ्या व त्याच्या शिबिका व रथ याच्याबरोबर असणाऱ्या स्त्रिया रूपसंपन्न गणिका असत (अर्थशास्त्र अ. ४८). सौंदर्य विटले म्हणजे त्याना दाई म्हणून ठेवाव्या असे चाणक्य सांगतो. बाराव्या शतकातील राजा सोमेश्वर याच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या मानसोल्लास नावाच्या ग्रंथात राजाने दिवसाच्या काठीं कोणकोणते भोग भोगावे याचे तपशीलवार वर्णन दिले आहे. ते भोग म्हणजे गृहोपभोग, स्नानभोग, पादुकाभोग, ताम्बूलभोग, विलेपनभोग, वस्त्रापभोग, माल्योपभोग, भूषोपभोग, आसनोपभोग, चामरभोग, आस्थानभोग, पुत्रभोग अन्नभोग, पानीयभोग, पादाभ्यंगभोग, यानोपभोग, छत्रभोग, शय्याभोग, धूपभोग, व योषिद्भोग हे होत (विंशति ३). योषिद् म्हणजे स्त्रिया. याची संख्या जेवढी मोठी असेल तेवढे राजाचे वैभव अधिक. राजाचे भाट ही संख्या फुगवून सांगण्यात एकमेकावर ताण करीत. सर्वांवर कडी जैन ग्रंथकाराची. त्यापैकीं श्रीकाललोकप्रकाशकारानें चक्रवर्तीला किती

स्त्रिया असाव्यात याचे गणित करून असा निर्णय दिला आहे, की चक्रवर्तीच्या अन्तःपुरात सर्व ऋतूंत सुखस्पर्श अशा एकंदर एक लक्ष ब्याण्णव हजार स्त्रिया असाव्यात![1]

हौशी नागरिकाचें जीवन

हे झाले राजेलोकाविषयीं. आता प्राचीन कालच्या ऐश्वर्यसपन्न नागरिकाचे गृहजीवन आणि दिनचर्या कशा प्रकारची असेल याची कल्पना वात्स्यायनाने चौथ्या अध्यायामध्यें 'नागरकवृत्तम्' या मथळ्याखालीं जी वर्णिली आहे त्यावरून येईल. या नागरकाचे घर म्हणजे एक प्रशस्त वाडा असे. त्यात सर्व प्रकारच्या सुखसोयी असत. मागे एक प्रशस्त अंगण, अंगणामध्ये विहीर किंवा पुष्करिणी व तिच्यामोवतीं सुदर फुलझाडाची बाग व पाटीमागच्या परसूत भाजीपाला, औषधि वनस्पति अशी एकंदर माडणी असे. प्रातःकाळीं उटून मुखमार्जन झाल्यानतर नागरकाने चंदनाची किंवा तशाच दुसऱ्या सुवासिक सुगधि द्रव्याची उटि अंगाला चर्चावी. नतर सुगधि धूपाने धूपविलेलीं वस्त्रे अगावर घ्यावीं, गळ्यात पुष्पाच्या माळा घालाव्या, डोळ्यात अजन घालावे, ओठ अलक्तक रगाने ताबडेलाल रंगवावे, हातात अगठ्या घालाव्या आणि नतर वेषभूषा नीट साधली कीं नाहीं हें दर्पणात पाहून बाहेर पडावे. कामधाम पाहून परत आल्यावर स्नानगृहात जावे. त्याच्या आधीं दर दिवसाआड अंगमर्दन करून घ्यावे. दर तीन दिवसानीं स्नान करताना अंगाला फेनक किंवा साबू लावावा. दर चार दिवसानीं 'आयुष्यकम्' अथवा श्मश्रू करावी. हाताचीं नखे नेहमीं स्वच्छ ठेवावीं व तीं कातरून त्याना निरनिराळे आकार द्यावे. दुपारीं भोजनोत्तर थोडीशी वामकुक्षी करावी. नतर पिजऱ्यातील शुकसारिकाचीं गोड भाषणें ऐकावींत किंवा कोंबड्याची व एडक्याची झुज लावून गंमत पाहावी. सायकाळीं मित्रमडळीसह क्लबात जावें. या क्लबाना 'गोष्ठी' किंवा 'समाज' असे म्हणत. गावात सरस्वतीचे मंदिर असे. तेथें दर पंधरवड्याला नेमलेल्या तिथींस गावातील सर्व हौशी नागरक एकत्र जमत आणि गायनवादनाच्या मैफलींचा आस्वाद घेत. गोष्ठी म्हणून जो प्रकार असे

१. कोसबी– 'हिदु सस्कृति' पा. ९८.

त्याच्या बैठका बहुधा गणिकाच्या घरीं भरत. या गणिका निरनिराळ्या शास्त्रकलादिकात चागल्या पारंगत आणि अस्खलित सस्कृत बोलण्यात व काव्यसमस्या करण्यात मोठ्या पटाईत असत. असल्या बैठकींमध्ये चटकदार विनोद व विद्वत्तापूर्ण संभाषणाची मोठी स्पर्धा चाले. ह्या सभेत मानाचे स्थान मिळायचे तर शीघ्रकवित्व, समस्यापूरण, अनेक प्रातीय भाषाचे ज्ञान, अनेकार्थी शब्दाचा कोष, निरनिराळीं वृत्ते, अलंकार वगैरेचें ज्ञान नागरकास असावे लागे. असे अनेक व्युत्पन्न नागरक एके ठायीं जमले असताना संभाषणात कसा रग भरत असेल, कोटि-प्रतिकोटींच्या कशा चकमकी झडत असतील आणि विनोदाची आतषबाजी कशी चमकत असेल याची वाचकाना सहज कल्पना करता येईल. कवितेच्या भड्या लावण्याचाहि नाद तर या लोकाना फार असे. वात्स्यायनकाळी या भड्याना प्रतिमाला असे म्हणत असत. शिवाय असल्या बैठकींत चित्रकलेतील व गायनकलेतील सामने होत. समाज व गोष्ठी याशिवाय पानमडळे आणि उद्यानयात्रा असत. गावाच्या बाहेर मोठमोठीं उद्याने असत. त्या ठिकाणीं नागरकजन मधून मधून सहल करण्याकरिता जात. सकाळीं उठून उत्तम पोषाक करून, घोड्यावर बसून, बरोबर नोकरचाकर व जिवलग मैतरिणी घेऊन उद्यानात जावे; किंवा जलक्रीडा करावयाची असल्यास सरोवराकाठीं जावे. दुपारचे भोजन तेथेच करावे. भोजनोत्तर निरनिराळे खेळ खेळावेत, आणि संध्याकाळीं सावल्या फिरल्या म्हणजे उद्यानातील पुष्पाचे गुच्छ हातात घेऊन नगरात परत यावे! असा हा सुखवस्तु हौशी घरंदाजाचा जीवितक्रम कामशास्त्रकार वात्स्यायनाच्या काळी होता.

तुम्ही विचाराल प्राचीनकाळीं सर्वच नागरकाचा जीवनक्रम असा होता कीं काय? अध्यात्मचिंतनात व व्रतवैकल्यात गढून गेलेले पुण्यात्मे त्या कालीं नव्हते कीं काय? होते तर! वात्सायनकालीहि होते. पण भारतीय संस्कृतीचे आख्यान सुरू झाले कीं सामान्य जनसमूहाचा ऐहिक जीवनपट गुंडाळून ठेवण्यात येतो. त्याचें दर्शन घडावें म्हणून तो येथें मुद्दाम उलगडून माडला आहे.

रंगेल व विलासी अशा कलाची उपासना एकीकडे चालू असता ज्या

कलेवर विश्वास टाकून विलास भोगावयाचा तो युद्धकलाहि भारतीयांनी जागती राखलेली होती. सैन्यरचनेचे व्यूह, हत्यारे यासंबधी विपुल माहिती चाणक्याने दिली आहे. भारतीय संस्कृतीतील अग्नि धगधगत होता तोंवर या युद्धकलेत भारतीयानीं केवढी सिद्धि प्राप्त केली होती ह्याची साक्ष शिकंदराच्या शिपायानींच बोलून ठेवली आहे. पारसी साम्राज्य धुळीस मिळविणाऱ्या या जगज्जेत्याच्या सैनिकानीं कोणापुढे कच खाल्ली असेल तर भारतीय सैनिकापुढेच. पोरस राजाचा पराभव झाला खरा पण त्यानंतर शिकंदराला लवकरच येथून परत फिरावें लागले हेहि तितकेच खरे आहे. एरियन या ग्रथकाराने लिहून ठेवले आहे कीं, बियास नदीच्या काठीं आल्यावर तीपलीकडील भारतीयाच्या प्रचड सैनेस तोड द्यावे लागेल या कल्पनेने शिकंदराचे सैन्य गारठले आणि आपण साफ पुढे पाऊल टाकणार नाही असे त्यानीं शिकंदरास कळविले. ग्रीक, शक, कुशान, हूण वगैरे परकीयानी स्वाऱ्या करून काहीं काल सत्ताहि गाजविली; पण त्यांना पिटाळून लावणारेहि प्रतापी राजे निघाले व आठव्या शतकापासून इस्लामी टोळधाडी येऊ लागल्या त्यानाहि तीन शतके सीमेवर थोपवून धरण्यात आले. युद्धकलेतील आणि राजकारणातील हे प्राबीण्य पुढे लोपले. आचारविचारात भोगळपणा शिरला हे सागावयास नकोच. ते लोपले नसते तर आजचा आपला इतिहास निराळाच झाला असता. तें असो. येथे हे मुख्यतः दाखवून द्यावयाचे आहे की, आत्म्याच्या उन्नतीवर लक्ष दिल्याने आम्ही व्यवहाराला पारखे झालो असे जे काहीं पाश्चात्य पडित आम्हास सागतात ते खरे नव्हे.

सस्कृतीची जागृताव्यवस्था होती तोंवर राजकारणाच्या हरएक अंगोपागाची चोख उपासना आपल्या पूर्वजानीं केली. ती किती कसोशीने केली हे दाखवून देण्यास महाभारत, चाणक्याचा अर्थशास्त्र, कामंदकाचा नीतिसार, शुक्राचा नीतिसार, सोमेश्वराचा मानसोल्लास वगैरे अनेक ग्रथ सज्ज आहेत. हत्ती आणि घोडे हीं सैन्याचीं प्रमुख अगें त्या काळी असत; तर हत्ती व घोड्याच्या निरनिराळ्या जाती, त्याना पकडण्याचे प्रकार, त्याचे रोग व औषधोपचार यावरहि पालकाव्य शालिहोत्र वगैरेनीं स्वतत्र वाङ्मय निर्माण केले. व्यापार व कृषिविषयक शास्त्राला वार्ता हें संस्कृत

नाव आहे. या वार्ताशास्त्रावरहि बहुमोल वाङ्मय अस्तित्वात आलें. याच्याचबरोबर गणित, खगोल, रसायन, वैद्यक वगैरे श्रेष्ठ शास्त्रातहि भारतीय प्रज्ञा रममाण झालेली होती. या भौतिकशास्त्राच्या उपासनेकडे थोडे विशेष लक्ष देऊ या.

भौतिक शास्त्रांची जोपासना

प्राचीन भारतात शास्त्र व कला याची अशी एकहि शाखा नव्हती की नीत भारतीय हे त्या काळच्या राष्ट्राच्या अग्रश्रेणीत नव्हते. सर्व शाखात अत्यत रेखीव असे शास्त्र जे गणितशास्त्र त्यातील त्याचे शोध हे त्याच्या कुशाग्रबुद्धीचे अक्षय्य स्मारक होत. अंकगणिताचा मूलाधार जो अंक व त्याची दशममानपद्धति ही भारतीय गणितज्ञाची विजयपताका होत. भारतीयानीं योजलेले अकच आज सर्वत्र योजिले जात आहेत. सॅरेसिन अरबानीं ते हिंदूंपासून उचलले व युरोपियनानीं अरबापासून ग्रहण केले. तत्पूर्वी ते जे अंक वापरीत ते रोमन अंक होत. ते घड्याळावर अजूनहि पाहावयास सापडतात. भारतीयाचे नवे सुटसुटीत अंक मिळताच जुने बोजड रोमन अंक साहजिकच मागें पडले. दशममानपद्धति हा तर अंकगणितातील एक अव्वल दर्जाचा शोध होय. इसवी सनाच्या पाचव्या शतकापूर्वी ती रूढ झालेली असली पाहिजे.[1] त्या शतकातील आर्यभट्टानें एका अकाआड खूण करून वर्गमूळ काढण्याची रीति दिली आहे. ही दशममानपद्धति आज आपल्या इतकी अगवळणीं पडली आहे, कीं त्या पद्धतीनें संख्यागणन करण्यात केवढी क्रांति एके काळीं केली असली पाहिजे ह्याची आपणास कल्पना करणें देखील कठीण झालें आहे. आकड्याचीं नुसतीं स्थानें बदलून केवळ दहा आकड्यानीं लक्ष, कोटि, अब्ज अशा प्रचंड संख्याचें दिग्दर्शन करणें हा अव्वल दर्जाचा शोध होय. ही पद्धति पुढे सर्व राष्ट्रानीं उचलली. चिनी लोक पूर्वी आपले अंक वरून खालीं लिहीत ते भारतीय पद्धतीचा परिचय झाल्यावर डावीकडून उजवीकडे असे लिहूं लागले. दशममानपद्धतीविषयीं प्रसिद्ध ज्योतिर्विद ला प्लास यानें लिहिलें आहे कीं, "आर्किमिडीज् व अपोलोनियस् अशा अव्वल

१. Legacy of India, p. 359.

दर्जाच्या गणितज्ञाच्या बुद्धीलाहि स्फुरला नाहीं असा हा महत्तम दशम-पद्धतीचा शोध ज्यानीं लावला त्या भारतीयाचे आपण किती म्हणून धन्य-बाद गावे !"[१]

आठव्या शतकातील खलीफ वलिदाच्या कारकीर्दीपर्यंतहि सारासिनाना आकडे माहीत नव्हते. यापूर्वी ते आकड्याऐवजीं अक्षरेच वापरीत. या शतकाच्या अर्ती सिंधमधून काहीं शास्त्रज्ञ मनसुराच्या दरबारीं गेले व त्यानीं प्रथम भारतीय गणितपद्धति व सारण्या अरबाना शिकविल्या व त्यावरून पुढे खलीफ मामुन याच्या पदरीं असलेला इब्न मुसा यानें गणित-ग्रंथ तयार केले. अरबानीं पुढें स्पेन जिंकलें व दहाव्या शतकात युरोपि-यनाना भारतीय गणितपद्धतीची प्रथय तोंडओळख झाली.

बीजगणितात भारतीयानीं द्विघातसमीकरण सोडविलें होतें; व त्याच्याहि वरील घाताचीं समीकरणे सोडविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच ज्या समीकरणात अनेक अज्ञाते धरावीं लागतात असलींहि समीकरणें चवथ्या शतकातल्या आर्यभट्टाने सोडविलीं होतीं. त्याच काळचा ग्रीक गणिती डायोफॅटस याची आणि आर्यभट्टाची तुलना करून कोलब्रुक लिहितो कीं, डायोफॅटस हा भारतीय गणितज्ञाच्या पुष्कळच मागें होता (निबंध-खड २). भूमितीची सुरुवात तर वेदाच्या काळापासूनच दिसून येते. बौद्धायन व आपस्तंभ याच्या शुल्वसूत्रात यज्ञाची वेदी बाधण्याच्या कामीं भूमितीच्या सिद्धान्ताचा प्रथम उपयोग केलेला आढळतो. भूमितीमध्यें वर्तुळाच्या व्यासाचें त्रिज्येशीं प्रमाण बसविणें हें एक अत्यंत कठीण कोडें मानण्यात आलें आहे. या प्रमाणास युरोपीय गणितात ग्रीक अक्षर पाय् या नावानें संबोधतात व त्याची संख्या ३.१४१६ अशी आजच्या गणितज्ञांनीं ठर-विलेली आहे. पाचव्या शतकातील आर्यभट्टानें हीच संख्या दिलेली आहे. ती काढण्याकरतां त्यानें वर्तुळामध्ये ३८४ समभुजाची एक आकृति काढली व त्यावरून 'पाय्'ची किंमत ३.१४१६ हीच म्हणजे तंतोतंत आजच्याइतकी बसविली ! युरोपियन लोक पाययागोरसचा सिद्धान्त म्हणून ज्याला संबोधतात तो काटकोन त्रिकोणाच्या बाजूंवरील चौरसाचा सिद्धान्त भारतीयांना पूर्ण अवगत होता इतकेंच नव्हे तर भास्करा-

१. Number the Science of Language by Danzig.

चार्यांने तो सिद्ध करण्याच्या एक सोडून दोन पद्धती दिल्या आहेत. त्यातील दुसरी ही सोळाव्या शतकापर्यंत युरोपीयास माहिती नव्हती. कोन, सिलिंडर वगैरेंचें घनफळ काढणेंहि त्याना अवगत होतें. त्रिकोणमितींतील त्याची प्रगति इंग्रजी Sine हा शब्दच सागेल. हा शब्द पाश्चात्यानीं अरबापासून घेतला पण अरबानीं तो संस्कृत 'शिंजिनी' या शब्दावरून उचलला. काहींच्या मते ज्या किंवा जीव याचे अरेबियन जैब त्यावरून लाटिन सायनस बनला असावा.[1]

त्याच्या ज्योतिर्गणितावरून गोल त्रिकोणामितीचे सिद्धान्त त्याना अवगत होते हें स्पष्ट दिसून येतें. सॉलिड जॉमेट्रीचा जनक युरोपियन लोक सतराव्या शतकातला डेकार्ट हा मानतात पण आठव्या शतकातील नव्यायिक वाचस्पति यानें आकाशातील स्थान मोजण्याकरिता तीन आस घेऊन मोजण्याची कल्पना माडली आहे. एक आस क्षितिजावरील सूर्योदयबिंदूपासून सूर्यास्तापर्यंत जाणारी रेषा, दुसरी पहिलीशीं काटकोन करणारी आडवी समपातळींतील रेषा व तिसरी त्याच्या छेदबिंदूपासून सूर्याच्या मेरीडियनपर्यंत. भास्कराचार्योनीं प्रतिक्षण बदलणारी तात्कालिक गति मानली आहे. 'यदा आसन्नः तिथ्यंतः तदा तात्कालिकया गत्या तिथिसाधनं कर्तुं युज्यते ।' यावरून सतराव्या शतकातल्या न्यूटनच्या पूर्वी पाच शतकें होऊन गेलेल्या भास्कराचार्योना शून्यलब्धीची कल्पना होती असें दिसतें.

खगोलविद्येंत प्राचीन सर्व राष्ट्राची प्रगति दिसून येते त्यात भारतीयांचा क्रमाक फार वरचा आहे. पाचव्या शतकातील आर्यभट्टानें पृथ्वी स्वतःच्या आसामोंवतीं भ्रमण करते असें प्रतिपादन केलें असून ग्रहणाची शास्त्रीय मीमासा बिनचूक दिली आहे. ग्रहाच्या गति, संपाताची गति, संपातार्चे चलन वगैरे विषयात त्यानीं चांगली प्रगति केली होती. या विषयाची तपशीलवार माहिती जिज्ञासूंना दीक्षितकृत 'भारतीय ज्योतिष शास्त्राचा इतिहास' या बहुमोल ग्रंथांत सापडेल. त्यांतील धूमकेतूसंबंधानें चार वाक्यें वानगीदाखल उद्धृत करतों. पांच वर्षांपूर्वी एक धूमकेतु आकाशात साध्या

१. Legacy of India पा. ३६६.

डोळ्यानी दिसत असे. तरी आपल्या पूर्वजानीं धूमकेतूंचे वेध घेतले होते व अनेकाचा भ्रमणकाल ठरविला होता हे वाचून कौतुक वाटेल. वराहमिहिराच्या बृहत्संहितेवरील टीकाकार उत्पल याने धूमकेतूविषयी पराशर, देवल वगैरे प्राचीन ग्रंथकाराचीं वचने दिलीं आहेत त्यात तो लिहितो, "पैतामहकेतु एकदा दिसल्यावर ५०० वर्षांनी पुन्हा उदय पावतो. उद्दालककेतु ११० वर्षे प्रवास करून उदय पावतो. शूलाग्रासारखी शिखा धारण करणारा काश्यपश्वेतकेतु १५०० वर्षे प्रवास केल्यावर पूर्वदिशेस उदय पावून ध्रुव व सप्तर्षि यास स्पर्श करून अपसव्यमार्गे जातो. विश्वावसूचा रश्मिकेतु हा १०० वर्षे प्रवास करून आवर्तकेतूच्या मार्गाहून कृतिका नक्षत्रीं उदय पावतो." (दीक्षित, पृ. ३४२.)

पदार्थविज्ञानशास्त्रातील परमाणूची कल्पना न्यायायिक वैशेषिकानी माडलेली आढळते. आणि परमाणूचे मापन करण्यास सूक्ष्म उपकरणें उपलब्ध नसताहि त्यानीं जीं मापे दिलीं आहेत तीं निव्वळ आश्चर्यकारक होत. भास्कराचार्यांच्या सिद्धान्तशिरोमणींतील कोष्टकाप्रमाणे कालाचा अत्यंत सूक्ष्म भाग जो त्रुति तो सेकदाचा $\frac{१}{३३७५०}$ होतो व वराहमिहिर याच्या गणनेने सूर्याच्या किरणात दिसणाऱ्या सूक्ष्म त्रसरेणूंची जाडी इंचाच्या $\frac{१}{३४१५२५}$ इतकी भरते.[१] लोहचुबक, विद्युत्, लेन्स, नादलहरी वगैरे पदार्थविज्ञानशास्त्रातल्या हरएक बाबतींत त्यांचें ज्ञान तत्कालीन इतर राष्ट्रापेक्षा कोणत्याहि तऱ्हेने कमी नव्हतें. काचसामानाविषयीं तर त्याची ख्याति होती. प्लिनीनें लिहिले आहे कीं, काच तयार करावी तर हिंदूंनीं. होकायंत्राचा शोधहि त्याच्या बुद्धीनें लावलेला होता. नौकानयनाचा इतिहास लिहिणारे राधाकुमुद मुकर्जी लिहितात, कीं ख्रिस्ती शतकाच्या आरंभीं जावा बेटाकडे सफरी करणाऱ्या एका जहाजावर होकायंत्र होतें असा उल्लेख आढळतो. हें होकायंत्र म्हणजे लोखंडाचा एक मत्स्य असे व तो तैलपात्रात पोहत राहून दिशा दाखवी. त्यास मत्स्ययंत्र असें म्हणत.

रसायनशास्त्रात भारतीयाची धातुशोधनमारणविद्या प्रसिद्ध आहे. सहाव्या शतकात ही विद्या त्यानीं चांगली कमावली होती. पाऱ्याविषयीं

१. Positive Sciences of the Hindus by B. Seal.

भारतीयांनी विशेष संशोधन केलेलें होतें. इतकें कीं, चौदाव्या शतकातल्या माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहात रसेश्वरदर्शन म्हणून एक स्वतंत्र दर्शनाची पदवी पारदाभ्यासास प्राप्त झालेली आहे. सहाव्या शतकांतच त्यांना पाऱ्याच्या घनीभवनाची विद्या साध्य झाली होती. लोहविद्येमध्यें त्यांची किती प्रगति होती हें सुलतानगंज येथील साडेसात फूट उंचीची बुद्धाची ताम्रमूर्ति व दिल्ली येथील प्रचंड लोहस्तंभ सदैव सागत उभे आहेत. हा लोहस्तंभ शुद्ध लोहाचा असून १५०० वर्षें झालीं तरी त्याला गंज माहीत नाहीं; आणि त्यावर खोदलेला लेख तर काल खोदावा असा स्पष्ट व सुवाच्य आहे. सहा टन वजनाचा व २३ फूट ८ इंच उंचीचा येवढा स्तंभ ओतणें ही गोष्ट आजहि कौतुकास्पद वाटावी अशीच आहे.

या रसायनशास्त्रात अनेक तज्ज्ञांची बुद्धि व श्रम खर्ची पडले होते. 'रस-रत्नसमुच्चया'च्या कर्त्यानें आपल्या ग्रंथात २७ सिद्धाना नमन केलें आहे. या विद्येची तपस्या केवळ्या अनन्यभावानें केली जात असे हें नागार्जुना-च्या उद्गारावरून कळून येतें. तो लिहितो कीं, "हे देवी सरस्वती, तुझ्या मंदिरात मी सतत बारा वर्षें तुझी आराधना करीत आहें. तूं संतुष्ट झाली असलीस तर रसायनाचें ज्ञान मला लाभूं दे.[१]"

रसायनशास्त्राशीं संबंध असलेलें शास्त्र जें वैद्यक त्यातहि भारतीयाचें बुद्धिवैभव चमकलेलें आहे. चरक भाणि सुश्रुत हीं नावें औषधिविज्ञान व शस्त्रविज्ञान याच्या इतिहासात अजरामर आहेत. सारासिन वैद्यांनीं चरकसुश्रुताचा अभ्यास केला व त्यांचेपासून युरोपियनानीं बरींच औषधें उचललीं. प्रसिद्ध त्रिफळा हें औषध ग्रीकांच्या निघंटूमध्यें Tryphera perva या नावानें समाविष्ट झालेलें आढळतें. सारासिनाची गांठ पडेपर्यंत युरोपियन वैद्य खनिज पदार्थ हे मुख्यतः बाह्योपचार म्हणून वापरीत. आठव्या शतकांत सिरापियन हा सारासिनामध्यें पहिला मोठा निघंटुकार होऊन गेला. त्यानें चरकाचा उल्लेख केला आहे. दहाव्या अकराव्या शतकात सझेज व अवीसिना हे बगदादमध्यें प्रख्यात वैद्य होऊन गेले.

१. Hindu Chemistry by P. Ray, Vol. II.

त्यांनीं चरकसुश्रुताचे उल्लेख केलेले आहेत. जळवा लावण्याची मोठी नामी युक्ति ते भारतीयापासूनच शिकले.[१] पान्याचा आतरउपयोग करून पाहण्याचें धाडस व कल्पकता प्रथमतः भारतीयानींच दर्शविली खनिज पदार्थ विश्वास-पूर्वक पोटात देण्याचे त्याचें धाडस पाहून सारासिनांनीं तोंडात बोट घातलें. पाश्चात्याचा आद्य वैद्यराज जो खिस्तपूर्व चवथ्या शतकातला हिप्पोक्रेटस त्यालाहि भारतीय औषधें माहीत होतीं. सुंठ, वेलदोडा, मिरीं वगैरे औषधे तो योजीत असे. पण खनिज पदार्थांचा औषधी उपयोग सोळाव्या इंतकापासून पुढें तेवढा सर्रास होऊ लागला. उलट भारतीय ग्रंथात हीं द्रव्यें सहाव्या शतकापासून बिनधोक सागितलेलीं आढळतात. पाश्चात्यात रुग्णालयें स्थापन करण्याची कल्पना निघाली ती प्रथम खिस्ती शतकाच्या चौथ्या शतकात. भरतखडामध्यें अशोकाच्या वेळेला म्हणजे तत्पूर्वी सातशें वर्षे रुग्णालय ही संस्था बद्धमूल झालेली होती, आणि त्यात परिचर्येचें काम स्त्रिया करीत. शिवाय अशोकाने रुग्णालयें स्थापिलीं तीं नुसतीं माणसा-करिताच नसून पशूंकरिताहि होतीं. दुसऱ्या क्रमाकाच्या शिलालेखात प्रजे-करिता आपण काय काय केलें हे सागताना तो लिहितो कीं, "सर्वत्र मनुष्यचिकित्सा व पशुचिकित्सा सुरू केली. मनुष्याकरिता व पशूकरिता उपयोगी पडणाऱ्या औषधी वनस्पति, फळें, मुळें जेथ मिळालीं तेथून आणून त्याची लागवड केली. रस्त्याच्या बाजूने विहिरी खणल्या, झाडे लावलीं अशाकरिता कीं मनुष्ये व पशू अशा दोघानाही त्याचे सुख मिळावे."

•

शस्त्रविद्येतील त्याचें कौशल्यहि अजब होतें. बौद्धग्रंथात आलेल्या शस्त्रक्रियाचातुर्यांच्या काहीं गोष्टी फारच आश्चर्यकारक आहेत. शल्य-तंत्रांत एकंदर १२७ शस्त्राचीं वर्णनें सापडतात. या शस्त्राच्या साहा-य्यानें मृतखडा काढणें, मृत गर्भ सोडविणें असले अवघड शस्त्रप्रयोगही ते करीत. मेंदूवरहि शस्त्रक्रिया करीत. नाक-कानावर शस्त्रक्रिया करून तीं सरळ व नीटस करण्याचेंहि त्यानीं साध्य केलें होतें. शस्त्रक्रियेला आवश्यक छेदनानें साक्षात् मिळविलेलें शारीरज्ञान अवश्य आहे. या साक्षाज्ज्ञाना-

१: Royle's Ancient Hindu Medicine, p 38.

विषयीं सुश्रुतकार कटाक्षाने लिहितो : 'शरीरे चैव शास्त्रे च दृष्टार्थः स्यात् विशारदः । दृष्टश्च ताभ्या संदेहं अपोह्य आचरेत् क्रियाः ॥' रुधिराभिसरण हें पाश्चात्याना सतराव्या शतकातील हार्वेपर्यंत माहीत नव्हतें. तत्पूर्वी त्याची कल्पना रुधिराची गति ही पुढेंमागे असावी अशी होती. ही गति चक्राकार आहे हें भारतीयाना माहीत होतें. मेदु व मज्जाततुमंडळ या-विषयीं भारतीयात तांत्रिक व योगी जे होऊन गेले, त्यानीं शोध लावून मेरुदंड, इडापिंगळा, षट्चक्रें वगैरे महत्त्वाचे ज्ञान संपादले.

भौतिक शास्त्रात प्रयोगाचें महत्त्व पाश्चात्यानाच तेवढे कळते अशी पाश्चात्य घमेंड मारीत असतात. आजचें त्याचे प्रयोगविज्ञान गेल्या दोन शतकातलेंच आहे. भारतीय शास्त्रज्ञाना प्रयोगाचे महत्त्व यथातथ्य आकलन झालें नव्हते असे नव्हे. तेराव्या शतकातला रसेंद्रचिंतामणिकार रामचंद्र लिहितो कीं, " पूर्वाचार्यांनीं सांगितलेल्या ज्या सिद्धान्ताचा पडताळा प्रयोगानें मीं स्वतः घेतलेला नाहीं असा कोणताहि सिद्धान्त मीं माझ्या ग्रंथात लिहिला नाहीं. ज्याना प्रयोग करता येत नाहीं ते रससिद्ध नसून नुसते नट होत. " तसेच 'रसप्रकाशसुधाकरा'चा कर्ता यशोधर लिहितो कीं, " या ग्रंथात वर्णिलेल्या एकूणएक रासायनिक क्रिया मीं स्वहस्ते प्रयोग करून पाहिल्या व नंतरच वर्णिलेल्या आहेत. नुसती ऐकीव क्रिया यात लेशहि नाहीं. 'स्वहस्तेन कृतं सम्यक् जारण न श्रुतं मया ।' "

तीच गोष्ट दृक्प्रत्ययनिष्ठ ज्योतिषशास्त्रातली. संपातबिंदूना चलन आहे व त्यामुळे सपातकालीं सूर्य ज्या नक्षत्रीं असतो तीं हळूहळू बदलत असतात हें दृक्प्रत्ययसिद्ध आहे. म्हणून फार प्राचीन काळीं वसंतसंपात व शरत्संपात हे आश्लेषा आणि धनिष्ठा या नक्षत्रीं होते ते पाचव्या शतकातील वराह-मिहिर या ज्योतिर्विदाच्या काळीं पुनर्वसु व रेवती या नक्षत्रीं पडूं लागले. तेव्हा पूर्वाचार्यांच्या विरुद्ध आपण लिहीत असलो तरी दृग्प्रत्ययावरून आपण लिहीत असून कोणीहि प्रत्यक्ष पाहून खात्री करून घ्यावी असें त्यानें आवर्जून लिहिलें आहे.[1]

१. बृहत्संहिता ३. २. Orion by Tilak p 36 " उक्ताभावः विकृतेः प्रत्य-क्षपरीक्षणेः व्यक्तिः । "

संस्कृत वाङ्मयात पडलेलें आपल्या पूर्वजाच्या जीवनाचें हें प्रतिबिंब पाहिल्यावर आपले पूर्वज हे केवळ आशाळभूतपणें आकाशाकडे पाहत बसणारे व ऐहिक संसाराविषयीं उदासीन असणारे असे आबटतोंडचे, हिरमुसलेले लोक होते ही जी कल्पना काहीं पाश्चात्य पंडित आपणापुढें माडीत आहेत व जिचा उल्लेख मागे केला आहे ती किती धादान्त मिथ्या आहे हें आता सागावयास पाहिजे काय ?

परकीयानाच दोष द्यावयास नको. खुद्द आपणालाच आपल्या पूर्वजाच्या पराक्रमाचे विस्मरण पडलें आहे. अतएव, आठवण करून देण्याकरिता म्हणून आपल्या संस्कृतींतील दुर्लक्षित झालेल्या आणखी काहीं घटना पुढील एक दोन प्रकरणात आपणापुढे माडतों. पैकीं प्रथम प्राचीन भारतात लोकशाही पद्धतीचीं राज्ये काहीं काल काहीं प्रातात कशीं नादलीं होती हें दाखवून नंतर समुद्रावर सफरी करणें हें पाप होय अशी ज्या आपल्या देशात अलीकडे समजूत रूढ झाली आहे त्याच आपल्या देशातल्या आपल्या पूर्वजांनीं सर्व जगभर मुशाफरी कशा केल्या होत्या व आपल्या संस्कृतीचा कसा प्रसार केला होता या अभिमानास्पद मागाकडे वळतों.

प्रकरण आठवें

प्राचीन भारतांतील लोकशाही

मागील प्रकरणातील आपल्या पूर्वजाच्या ऐश्वर्योपासनेचे वर्णन मीं लिहून पुरें केलें नसेल तोंच शेजारच्या मंदिरातून मंत्रपुष्पाचा घोष माझ्या कानावर आदळूं लागला. गंभीरपणे व अत्यंत तारस्वरात 'ॐ स्वस्ति साम्राज, भौज्यं, स्वाराज, वैराज्यं' असा मंत्रघोष वैदिकवृंद करीत होता. आपण परमेश्वराच्या ऐश्वर्याचें वर्णन करीत आहों, व अनतकोटिब्रह्माडनायक अशा प्रभूचे वर्णन करावयाचें तर सूर कितीहि चढविला तरी थोडाच, या भावनेनें 'आविक्षितस्य कामप्रेः विश्वदेवा समासद इति' हा शेवटचा भाग उच्चारताना भाविक जन आपल्या स्वराच्या उत्तानतेची पराकाष्ठा करीत होते. हा मंत्रघोष अहर्निश हजारों मंदिरातून आज हजारो वर्षें अव्याहत सुरू आहे. श्रद्धेनें डोळे मिटून परमेश्वराचे ध्यान करून त्याच्या स्तुतिपर वा प्रार्थनापर हा मंत्र आहे अशा भावनेनें तो गायिला जात असतो. पण तुमच्यापैकीं वैदिक मंत्राचा अर्थ उमगणारे थोडे सोडले तर बाकीच्याना अशी शका तरी आली असेल का, कीं ऐतरेय ब्राह्मणातील या मंत्रात अविक्षितपुत्र मरुत्त या राजाच्या वैभवाचे वर्णन आहे आणि मंत्रात येणारीं साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य ही पदे निरनिराळ्या राज्यपद्धतीचीं द्योतक आहेत म्हणून ? कशी येणार ? सर्व धार्मिक कृत्ये, सर्व संस्कार आपण वेदमंत्रानीं करतो ते या मंत्रांत काहीं गूढ शक्ति आहे व तिनें आपलें मंगल होईल या आपल्या कल्पनेनें. यामुळे या मंत्राचा अर्थ पाहिला तर त्या मंत्राच्या जोडीला ज्या क्रिया आपण करतों त्याशीं तो विसंगत आहे कीं काय हेंहि आपणास कळत नाहीं पाळण्याला बाशिंग बांधून लग्नें लावीत असता तोंडानें मंत्र प्रौढ विवाहालाच शोभतील असे आपण म्हणत होतोंच कीं नाहीं ? तसाच प्रकार या मंत्रपुष्पाच्या मंत्राचा

झाला आहे. या मंत्राच्या अर्थाकडे लक्ष दिले तर आपणास कळण्यास वेळ लागणार नाही, कीं या मंत्रातलें साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य वगैरे शब्द हे निरनिराळ्या राज्यपद्धतींचे दर्शक आहेत म्हणून? पण परंपरेच्या विस्मरणामुळे राजशाही ही एकच राज्यपद्धति आपल्या देशात अविच्छिन्न नादत होती अशी आपली सामान्यतः समजूत असते. ती कशी निराधार आहे हें आपण इतिहासाकडून समजावून घेतले पाहिजे. आज आपण लोकशाहीची पद्धति ही पाश्चात्य राष्ट्राच्या अनुकरणाने आपल्या देशात सुरू करीत आहो हे खरेच कारण अलीकडे कित्येक शतके ती आपल्या देशात नामशेष झाली होती; किंबहुना नामहि राहिले नव्हते; पण त्या च्या-पूर्वी लोकशाहीची पद्धति आपणात कधीच नादली नव्हती हे खरें नव्हे. आपल्या संस्कृतीची ऐतिहासिक परंपरा सुदीर्घ कालाची आहे. या अवकाशात राजकारणातील लोकशाहीचा प्रयोगहि बराच काळ नादला होता.

युरोपियन विद्वान् ऐट मारीत कीं लोकशाहीचे तत्त्व कोठे उदय पावले असेल आणि नादले असेल तर फक्त युरोप खडात! समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही त्रयी कोठे विजयी झाली असेल तर ती युरोपच्या भूमीत! युरोपच्या बाहेर असलेल्या राष्ट्रातील राजकीय वातावरण हे समतेच्या व स्वतंत्रतेच्या मोकळ्या हवेला खेळण्यास सर्वतोपरी प्रतिकूल! पण इंग्लडमध्ये रोमन कॅथॉलिक लोकाना फार काळ मतदानाचा अधिकार नसे हें आपण विसरता कामा नये. आणि ज्यू लोकाच्यावरील जाचक निर्बंध आणि छळ तर परवापर्यंत होता ना! काहीनीं तर असेहि प्रतिपादन केलें कीं, लोकशाहीची वल्ली ही थंड हवेतच तेवढी जोमात वाढू शकते; भरतखंडासारख्या उष्ण प्रदेशातील हवा ही तिच्या वाढीस प्रतिकूल होय. परक्या जित राष्ट्रातील लोकाकडे तुच्छतेने पाहणाऱ्या युरोपियन विद्वानानीं असलीं मतें प्रसृत करावीं हें ठीक! पण भरतखंडात प्राचीन काळीं अनेक प्रांतात लोकशाही नादत होती ह्याची खुद्द आम्हा भारतवासीयानाच गाढ विस्मृति पडावी हे इतिहासविषयक उदासीनतेचें एक मासलेवाईक कटु फल होय. विष्णुशास्त्री चिपळूणकराच्या काळात प्राचीन प्रजासत्ताक राज्याची स्मृति पार लोपून गेली होती. त्यानीं लिहिले आहे कीं, लोकशाहीची कल्पना ही आपणास सर्वस्वीं नवी आहे व ती आपणास पाश्चात्यापासून शिकावयाची आहे.

प्राचीन गणराज्यें

सुदैवानें आपल्या प्राचीन संस्कृतीविषयींचे हे अज्ञान दूर होत चाललें आहे. विष्णुशास्त्र्याच्या नंतरच्या गेल्या पन्नास साठ वर्षांच्या काळांत जुन्या संस्कृत ग्रथाचे जे सूक्ष्म व चिकित्सापूर्वक अध्ययन झालें आहे, त्यावरून असे निष्पन्न झाले आहे कीं, प्राचीन भरतखडात लोकशाहीचे, अथवा अगदीं काटेकोरपणे बोलावयाचें तर **महाजनशाहीचें**, तत्त्व पूर्ण अवगत होतें इतकेंच नव्हे तर ख्रिस्तपूर्व ६०० पासून तो ख्रिस्तोत्तर ५०० येवढ्या प्रदीर्घ कालखडात अनेक लहानमोठीं प्रजासत्ताक किंवा महाजनसत्ताक राज्ये होऊन गेल्याचे प्राचीन वाङ्मयात नमूद आहे. यापैकीं काहीं प्रजासत्ताक राज्ये शेकडो वर्षे आजूबाजूच्या राजसत्तेला टकरा देत तगून राहिलेलीं आढळून येतात. ज्या प्रजासत्ताक राज्यात भगवान् बुद्धाचा जन्म झाला ते शाक्य लोकाचे राज्य जवळ जवळ हजार वर्षें कधीं शेजारच्या सम्राटाचें माडलिकत्व स्वीकारून तर कधीं स्वतत्र म्हणून लोकशाहीच्या स्वरूपात नादत असलेलें आढळून येते. भगवान् बुद्धाचा पिता यशोधर हा ह्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष होता. अध्यक्षाला राजा ही पदवी असे. ह्या प्रजासत्ताक राज्याना प्राचीन कालीं 'गण' व 'संघ' अशा सज्ञा होत्या. बुद्धाचा पिता ज्या गणाचा अध्यक्ष होता त्या लिच्छवी गणाची राज्यपद्धति लोकशाही स्वरूपाची होती. प्राचीन काळीं ग्रीस देशात लोकशाही पद्धतीचीं जीं नगरराज्यें होतीं त्याच्यातहि एका वरिष्ठ अधिकाऱ्याला राजा ही पदवी असे. अथेन्स नगरात लोकशाही राज्य होतें तरी मताधिकार फक्त नागरिकाना असे; दासाना नसे. दासाचीं सख्या ही दोन लाख पसतीस हजार लोकसख्यत एक लाखायेवढी असे. तेव्हा ज्या अर्थाने अथेन्सच्या राज्यपद्धतीला लोकशाही पद्धति हें नाव लावण्यात येतें त्या अर्थी हिंदुस्थानातील प्राचीन गणराज्याना ते निर्विवाद लावता येईल.

समूहवाचक अनेक संज्ञा प्राचीन भारतीय ग्रथात योजिलेल्या आढळतात. त्या म्हणजे श्रेणी, पूग, निगम, गण, संघ ह्या होत. पैकीं गण, संघ ह्या संज्ञा राजकीय समूहवाचक असून श्रेणी, पूग या सज्ञा व्यापारी व शिल्पी याच्या समूहाच्या निदर्शक होत. दोन अथवा अधिक गणराज्याचा संघही असे. या संस्थापैकीं व्यापाऱ्याच्या संघाची स्मृति उत्तरकालीन

वाङ्मयांत कायम राहिली पण गणराज्याची मात्र नष्ट झाली; इतकी कीं लोकशाही स्वरूपाच्या शासनसंस्था प्राचीन काळीं भरतखंडात नादत होत्या या घटनेचा पुसट उल्लेखही धर्मशास्त्रविषयक ग्रंथात आढळत नाहीं. शासनपद्धतींपैकीं राजसत्ताक पद्धतीचाच तेवढा स्मृतिकारांनीं पुरस्कार केलेला आढळतो. राजाने प्रजेला न्याय्य बुद्धीनें वागवावें असें जरी ते प्रतिपादन करीत तरी राजा ही महतीदेवता होय हें प्रजेच्या मनात बिंबावें अशीच त्याच्या एकदर विचाराची मांडणी आहे. यामुळें गण हा शब्द मनुस्मृतींत आला असता त्याचा लोकसत्ताक राज्य असा अर्थ टीकाकार करीत नाहींत, तर व्यापारी वगैरेंचा संघ असा करितात.[1]

व्यापाऱ्याचे संघ होते व ते चांगले बलिष्ठ व सुसंघटित होते हें स्मृतिकाराना मान्य होतें. व्यापारी संघाविषयीं प्राचीन शिलालेखही उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, नाशिक लेण्यातील उपवदाताच्या शिलालेखात[2] उल्लेख आहे कीं (इ. स. १२०) त्याने भिक्षूच्या योगक्षेमाकरिता म्हणून एका कोष्ट्याच्या संघाजवळ दोन हजार कार्षापण दरमहा दरशेंकडा एक टका व्याजाने ठेव म्हणून ठेवून दिले होते. म्हणजे हे संघ प्रतिष्ठित पेढ्याचा व्यवहार करीत व त्याच्याजवळ ठेवलेल्या ठेवी सुरक्षित समजल्या जात. धामधुमीच्या काळात या संघाना आपल्या जिंदगीच्या सुरक्षिततेकरिता सैन्यही पदरीं बाळगावें लागत असावे. विशेषतः लमाणाच्या द्वारा लांब दूरवर व्यापार करणाऱ्यांना तर चोराचिलटाचा त्रास चुकविण्याकरिता सैन्य ठेवणें अवश्यच असावें. यामुळें या संघाच्या हातीं पैसा आणि सैन्य या दोहोंचीही सत्ता एकवटली जाई. अर्वाचीन काळीं ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं अशीच सत्ता असे. आपल्या व्यापारीचे रक्षण करण्याकरिता म्हणून ती सैन्य ठेवी. तें सैन्य चांगलें बलिष्ठ असल्यानें राजकारणाचे खेळ खेळण्याच्याही तें कामी येई. प्राचीन काळींही कांहीं व्यापारी संघ वा अन्य तऱ्हेचे संघ असेच बलिष्ठ होऊन स्वतंत्र राज्यें स्थापन करिते झाले असावे. त्यांचा अन्तर्गत कारभार लोकशाही पद्धतीचा असे. बलिष्ठ साम्राटाशीं प्रसंग आला असता

१. मनु. १.११८ वरील कुल्लूकाची टीका.
२. Epigraphia Indica Vol. VIII.

ते काहीं काल माडलिकत्व मान्य करीत, पण एरवीं हीं लोकशाही संस्थानें स्वतंत्र असत.

पण लोकशाहीची स्मृति इतकी अजीबात बुजून गेली आहे कीं तद्विषयक जो पुरावा आहे तो पुरेसा आहे असें मान्य करणें कांहींना जड जाऊं लागलें. उदाहरणार्थ, प्रो. वेणीप्रसाद याना पुरावा भरपूर आहे असें वाटत नाहीं.[1] पण एतद्विषयक अनेक उल्लेख निरखून पाहिले असता लोकशाही स्वरूपाचीं राज्यें प्राचीन भरतखंडात नादत होतीं याबिषयीं सशय राहू नये असें मला वाटतें.

पहिला उल्लेख या प्रकरणाच्या सुरवातीला स्वाराज्य, वैराज्य, भौज्य वगैरे मत्रपुष्पातील मंत्र ज्या ग्रंथातला आहे त्या ऐतरेय ब्राह्मणातला. या ग्रंथामध्यें त्या त्या दिशेला कोणत्या प्रकारचीं राज्यें आहेत हें सागताना इतर ठिकाणीं राजांना अभिषेक होतो असे शब्द असून हिमालयापलीकडील उत्तर कुरु व उत्तर मद्र या देशामध्ये **जनपदांना** अभिषेक होतो असे शब्द आहेत; त्या अर्थी येथील राज्यपद्धति ही राजसत्ताक पद्धतीपेक्षा वेगळी असली पाहिजे हें स्पष्ट होय.[2] दुसरा उल्लेख जैन वाङ्मयातील आचारागसूत्राचा[3] त्या सूत्रात जैन यतींनी कोणते देश टाळावे हे सागताना अरायाणि, गणरायाणि, युवरायाणि वगैरे शब्द आहेत. या शब्दावरून गणराज्य हा शब्द शासनपद्धतीचा दर्शक होता हें स्पष्ट होईल. कारण या सूत्रामध्ये निरनिराळ्या शासनपद्धतींचाच उल्लेख आहे. तिसरा उल्लेख पाणिनीच्या सूत्राचा. सूत्रात चार पाच ठिकाणीं गण व संघ याचा उल्लेख आहे. पैकीं एक सूत्र (४।१।१६०) अण् प्रत्ययानें वंशज दाखविले जातात हें सागताना 'जनपदशब्दात् क्षत्रियात् अण्' म्हणजे क्षत्रियत्ववाची आणि जनपदवाची शब्द असेल– उदाहरणार्थ पाचाल– तर त्यापुढें अण् हा प्रत्यय लावला

१. State in Ancient India, p 499, by Veni Prasad.

२. य के च प्राच्याना **राजान**: साम्राज्यायैव तेऽभिषिच्यन्ते ।...ये के च परेण हिमवन्त **जनपदा** उत्तरकुरव उत्तरमद्रा इति वैराज्या यैव तेऽभिषिच्यन्ते ऐ. ब्रा. ७।३।१४,

३. अयाराग सुत्त २।३।१।१०. Hindu Polity by K. P. Jayaswal.

असता वंशजदर्शक होतो. या सूत्रावर कात्यायनाचें वार्तिक आहे तें चालू विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचें आहे. मूळ सूत्रात क्षत्रियात् येवढाच शब्द आहे त्याचा खुलासा करिताना वार्तिककार लिहितो, 'क्षत्रियात् एकराजात् संघप्रतिषेधार्थम्' म्हणजे अण् प्रत्यय वंशजदर्शक होतो तो एकराज म्हणजे राजसत्ताक क्षत्रिय जाति असेल त्या ठिकाणी; जेथे क्षत्रियाचा संघ असेल तेथे नव्हे. अर्थात् एकराज पद्धतीपेक्षा भिन्न अशी संघराज पद्धति वार्तिककाराला माहीत होती हे यावरून स्पष्ट होते.[1] कौटिल्यालाही संघ हे राजकीय समूह म्हणून माहीत होते अर्थशास्त्र ग्रथातील अकरावें संघ अधिकरण या संघविषयाला वाहिलेले असून तो चौथा पुरावा होय. या अधिकरणात् काम्बोजसुराष्ट्रक्षत्रियश्रेण्यादयः वार्ताशस्त्रोपजीविनः । लिच्छविकव्रात्यिकमल्लकमद्रककुकुरकुरुपाचालादयः राजशब्दोपजीविनः ॥ अशा अनेक संघाचा उल्लेख आहे. यापैकी काम्बोजादि हे वार्ता म्हणजे कृषिवाणिज्य आणि शस्त्र म्हणजे शिपाईगिरीचा धंदा करणाराचे संघ असून लिच्छविकादि हे राजशब्दोपजीवी होते असे वर्णिले आहे. राजशब्दोपजीवी याचा अर्थ तितकासा स्पष्ट नाही. पण वरीलपैकी लिच्छवी संघाची राजधानी वैशाली येथील राज्यपद्धतीचे वर्णन करिताना ललितविस्ताराचा लेखक थट्टेच्या स्वरात जे लिहितो त्यावरून तो अर्थ स्पष्ट होईल. विस्तारकार लिहितो की या वैशालीच्या लोकामध्ये वृद्ध आणि ज्येष्ठ अशाना मान देण्याची काहींच चाल नाही. जो उठला तो म्हणतो की 'मी राजा' 'मी राजा' 'एकैक एव मन्यते अहं राजा अह राजा.' यावरून कौटिल्याचे राजशब्दोपजीवी हे वर्णन जेथे अनेक अथवा सर्वच राजे आहेत अशा स्थळींच्या शासनपद्धतीला लागू पडतें असें मानण्यास हरकत दिसत नाही. पाचवा उल्लेख महाभारतात सापडतो. शांतिपर्वातील एक उपपर्व राजधर्माला वाहिलेले आहे. त्या राजधर्मपर्वामध्ये १०७व्या अध्यायात भीष्मानीं गण पद्धतीचे गुणदोष खुलासेवार सांगितले आहेत. राजधर्मांतर्गत हा अध्याय असल्याने या ठिकाणचा गण हा शब्द स्मृतिकार वापरतात तसा व्यापार संघाचा दर्शक नसून राज्यपद्धतीचा दर्शक म्हणून योजिला असला पाहिजे हें उघड होय.

१. Carmichael Lectures, 1918, by D. R. Bhandarkar, P. 147.

वरील सर्वांपेक्षा अधिक निःसंदिग्ध असा एक उल्लेख सापडतो व त्यावरून गण ही संज्ञा शासनपद्धतीची दर्शक होती व ती राजसत्ताक पद्धतीहून भिन्न होती या दोन्ही गोष्टी स्पष्ट होतात. हा उल्लेख खिस्तपूर्व पहिल्या शतकातील 'अवदानशतक' या बौद्ध ग्रंथातील होय. या ग्रंथातील ८८ व्या अवदानामध्ये मध्यदेशातून दक्षिण देशात गेलेल्या व्यापाऱ्याची कथा दिलेली आहे. दक्षिण देशच्या राजानें त्याना विचारलें कीं तुम्ही आलात कोठून ? तुमच्या देशावर राजा कोण आहे ? त्यावर व्यापाऱ्यानीं दिलेले उत्तर लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, 'आम्ही निरनिराळ्या प्रदेशातून आलो आहो. त्यापैकीं काहींच्यावर राजाची सत्ता आहे व काहीवर गणाची सत्ता आहे 'केचित् देशाः राजाधीनाः केचित् गणाधीनाः'[1] हा उल्लेख अगदीं स्पष्टार्थबोधक असा आहे. अर्थात् स्मृतिग्रथामध्ये लोकशाही राज्यपद्धतीचा उल्लेख नाहीं येवढ्यावरून या पद्धतीच्या अस्तित्वाचा पुरावा बळकट नाहीं असे म्हणणे रास्त नव्हे हें आता आपणास मान्य होईल.

अशा प्रकारचीं लोकशाही राज्ये प्राचीन काळीं नादत होतीं याविषयीं आणखीहि अन्य तऱ्हेचा पुरावा उपलब्ध आहे. पैकीं एक म्हणजे गणराज्ये स्वतःच्या नावाची नाणीं पाडीत हा होय. त्यापैकीं मालव, यौधेय, वृष्णी, राजन्य वगैरे दहा बारा गणाचीं नाणीं उपलब्ध आहेत. त्या नाण्यावर राजाचे नाव नसून गणाचें आहे मालवाच्या नाण्यावर 'मालवाना जयः' 'मालवगणस्य जयः' असे लेख आहेत. दुसरे म्हणजे या गणराज्यापैकीं काहीं शौर्यविक्रमामध्ये अत्यत नावाजलेलीं होतीं. यौधेयगण हा त्याच्या नावाप्रमाणेच युद्धप्रवीण होता. इतका कीं, गिरनार येथील रुद्रदामनच्या शिलालेखात या यौधेयाचा[2] 'सर्वक्षत्राविष्कृतवीरशब्दजातोत्सेकाविधेयाना यौधेयानाम्' असा गौरवपूर्वक उल्लेख आहे. हा दुसऱ्या शतकातील उल्लेख होय. याच यौधेयाचा पुन्हा चौथ्या शतकातील स्कंदगुप्ताच्या अलाहाबाद शिलास्तभ लेखात उल्लेख आहे. समुद्रगुप्त हा मोठा दिग्विजयी सम्राट् होता. त्याने जिंकलेल्या

१. Carmichael Lectures, 1918, by D R. Bhandarkar, P. 147.
२. Epigraphia India Vol. VIII

राजाचीं नावें देत असताना यौधेयाचा उल्लेख केला आहे. त्यांत इतर ठिकाणीं राजा, नृपति वगैरे उल्लेख असून मालव, यौधेय वगैरेंच्या पुढें मात्र राज शब्द नाहीं. मालव, यौधेय वगैरे नुसते व्यापाऱ्याचे संघ असते तर त्याच्याकडून माडलिकत्व कबूल करून घेण्यात समुद्रगुप्तासारख्या सम्राटाला विशेष भूषण तें कोणतें वाटलें असते? व त्यानें राजाच्या समवेत या गणाचा उल्लेख तरी कशास केला असता? पण स्वतःला प्रचंडशासन म्हणवून घेणाऱ्या या सम्राटानें दक्षणापथाचे सर्व राजे, आटविक अरण्य-प्रदेशींचे राजे, प्रत्यंत म्हणजे सरहद्दीवरील राजे याच्या जोडीला 'मालव, आर्जुनायन, यौधय, माद्रक, आभीर, प्रार्जुन, सनकानीक, काक, खर-परिखादिभिश्च सर्वकरपरितोषितप्रचण्डशासनस्य' अशा बिरुदानें अनेक गणराज्याचा उल्लेख केला आहे.[1]

आणखी भरीस भर पुरावा म्हणजे ग्रीक इतिहासकाराचा. यांच्या पुराव्याचें महत्त्व हें कीं या ग्रीक लेखकानीं लोकसत्ताक राज्यें पाहिलेलीं होतीं. तेव्हा त्यानीं वापरलेल्या संज्ञा संदिग्धार्थी वापरल्या जाण्याचा संभव फार थोडा. मेग्यास्थेनीस हा तर हिंदुस्थानात दरबारवकील म्हणून प्रत्यक्ष वावरलेला. तो लिहितो कीं, 'हिराक्लियसच्या पश्चात् बरींच शतकें लोटल्यावर अनेक नगरानीं लोकशाही राज्यें स्थापन केलीं.'[2] शिकंदराच्या स्वारीची हकीकत लिहिणाऱ्या ग्रीक इतिहासकारानींही शिकंदराशीं सामना देणाऱ्या कठ, अरिष्ठ, सौभूति, क्षुद्रक, मालव, शिबी, ब्राह्मण, पटल वगैरे अनेक लोकसत्ताक राज्याचीं वर्णनें केलीं आहेत.

वरील अनेक प्रकारच्या पुराव्यावरून प्राचीन कालीं भारतखंडात लोक-सत्ताक राज्यें चागलीं नादत होतीं याविषयीं कसलाहि अंदेशा राहण्याचें कारण नाहीं.

गणसंघ

या लोकसत्ताक राज्याचें स्वरूपच आता थोडें अधिक न्याहाळून पाहूं या. तें पाहताना प्रथमच सागून टाकलें पाहिजे कीं भगवान्

१ Select Inscriptions by D. C. Sircar, P. 258

२. "Most cities adopted the democratic form of Government." Mc Crindle. P. 37-38.

श्रीकृष्ण हा राजा नसून लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष होता! दोन तीन गणराज्यें एकत्र झालीं म्हणजे त्याला संघ अशी अधिक व्यापक संज्ञा वापरण्यात येई. त्रिगर्तसंघामध्ये सहा व वज्जीसंघात आठ राज्यें होतीं. अशा संघाचें एक अतिप्रसिद्ध उदाहरण म्हणजे भगवान् श्रीकृष्ण हा ज्या संघामध्यें होता त्या अंधकवृष्णीसंघाचे होय. श्रीकृष्ण हा राजा होता असें पुराणात वर्णन येतें. त्या ठिकाणीं राजा याचा वास्तविक अर्थ अध्यक्ष असा असतो. पण पूर्वीच्या लोकशाहीची स्मृति पार लोपून गेल्यामुळे यादवांचें राज्य हे राजसत्ताक पद्धतीचें होतें अशी आपली समजूत होते. पण महाभारतांतील शांतिपर्वामध्ये [1]अंधकवृष्णीसंघाचें जे वर्णन दिलें आहे त्यावरून हा संघ प्रजासत्ताक पद्धतीचा होता हे स्पष्ट होतें. हा संघ दोन गणाचा मिळून झालेला असल्यामुळें दोन्ही संघ आपापला एक एक अध्यक्ष निवडून देत, व ह्या अध्यक्षद्वयाच्या संमतीनें सर्व कारभार चाले. **भगवान् कृष्ण हा त्या वेळेचा वृष्णींनीं निवडून दिलेला अध्यक्ष होता.** तो राजा नसून लोकनियुक्त अध्यक्ष असल्यामुळें विरुद्ध पक्षाची टीकाहि त्याला सोसावी लागे. ही अध्यक्षाची जागा मोठ्या मानाची असली तरी सर्वस्वीं सुखदायकच होती असें नव्हे कारण अध्यक्ष हा उच्च आसनावर अधिष्ठित झालेला असला तरी तो लोकांनीं निवडून दिला असल्यामुळें एका अर्थाने लोकांचें दास्यच त्याला स्वीकारावें लागे. भगवान् कृष्णानेंहि आपला अनुभव नारदऋषींजवळ अशाच शब्दानें व्यक्त केला आहे. तो म्हणतो, "तुम्ही मला मोठा ऐश्वर्यवान् समजता पण माझ्या ह्या ऐश्वर्याचें खरे स्वरूप म्हणजे मी माझ्या ज्ञातिबांधवांचें दास्य पत्करलें आहे हेच होय. संयुक्त अध्यक्ष म्हणून मला काहीं सुखसवलती मिळतात. पण त्याच्याबरोबरच लोकाची दुरुक्तीहि ऐकून घ्यावी लागते." ' दास्यं ऐश्वर्यवादेन ज्ञातिना वै करोम्यहम् । अर्धभोक्ताऽस्मि भोगानां वाग्दुरुक्तानि च क्षमे ' । अध्यक्ष लोकनियुक्त असल्यानें त्याला गोड बोलूनच कार्यभाग साधावा लागे. याबाबत समा जिंकण्याला उत्तम शस्त्र कोणतें असें श्रीकृष्णानें नारदास विचारलें असता नारदानें जें उत्तर दिलें तें मोठें मार्मिक आहे. नारद म्हणाले, " समा जिंकण्याला कठोर

१. अ. ८१.

पोलादी शस्त्राचा मुळींच उपयोग नाहीं. त्यापेक्षा फुलाप्रमाणें कोमल पण अमोघ असें एक शस्त्र तुला सागतो. तें म्हणजे दुसरें तिसरें कोणतेंहि नसून मिष्टास भाषण हे होय." राजशासन पद्धतीतील एकमुखीसत्ताधिष्ठित राजाला असल्या गोष्टींची पर्वा करण्याचें कारण नाहीं. तत्कालीन राजमंडलामध्यें श्रीकृष्ण हा राजा म्हणून ओळखला जात नसे हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान देणें अयोग्य होय हे प्रतिपादन करिताना शिशुपाल सागतो कीं अराजा असा जो दाशार्ह श्रीकृष्ण त्याची पूजा अनुचित होय. "नैव ऋत्विज् नैव चाचार्यो न राजा मधुसूदन।" (सभापर्व अ. ३७)

सभापर्वामध्यें अनेक संघराज्याचा उल्लेख आलेला आहे. त्यात किरात, दरद, औदुंबर, पारद, बाल्हिक, शिबि, त्रिगर्त, यौधेय, केकय, अम्बष्ट, क्षुद्रक, मालव, पौण्ड्र, अंग, वग अशा चागल्या पधरा संघराज्याचा उल्लेख आहे.[1] याना श्रेणीमंत व शस्त्रधारी असें म्हटले आहे. यापैकीं पुष्कळाचीं नाणीं उपलब्ध आहेत.

ग्रीकांनीं वर्णिलेलीं गणराज्यें

महाभारताप्रमाणे अलेक्झाडरच्या काळच्या ग्रीक ग्रंथकारानीं प्राचीन भरतखंडाची जी माहिती लिहून ठेवली आहे तीमध्येंहि प्राचीन प्रजासत्ताक राज्याचें वर्णन आलेलें आहे.[2] ह्या ग्रथकारापैकीं मेग्यास्थेनिस हा चंद्रगुप्ताच्या दरबारीं वकील म्हणून कित्येक वर्षे राहिलेला होता. तो लिहितो कीं, "लोक आपल्या तक्रारी जेथे राजा असतो तेथें राजाच्या पुढें माडतात; आणि जेथे लोक स्वयशासित असतात तेथें न्यायाधीशाच्यापुढे माडतात." ह्या ग्रीक ग्रथकारानीं कठ, आरिष्ट, सौभूति, शूद्रक, मालव, अबष्ठ, पाताल, अशा अनेक गणाचीं वर्णनें दिलीं आहेत. अलेक्झाडरला आपल्या स्वारीमध्यें अनेक प्रजासत्ताक राज्याशीं झगडावें लागलें. त्यापैकीं काहीं चागलींच बलाढ्य होतीं असें ग्रीक ग्रंथकाराच्या वर्णनावरून दिसतें. बियास नदीच्या काठीं वसलेलें राज्य फारच प्रबल असावें. कारण याच्या

१. अ. ५२.

२. Hindu Polity by Jayaswal.

प्रबल सेनेपुढे आपला टिकाव लागणार नाहीं या कल्पनेनें अलेक्झाडरचें सैन्य भेदरूनच गेले. आणि हें पाहून अलेक्झाडरने आपला दिग्विजयाचा पुढील कार्यक्रम रद्द करून परत स्वदेशाची वाट धरली. ह्या प्रजासत्ताक राज्याचें नाव ग्रीक ग्रंथकारानीं नमूद केलेले नाहीं. पण त्याचे वैभव मात्र मुक्तकंठानें गायिलेलें आहे. ह्या राज्यातील लोक कृषिविद्या आणि धनुर्विद्या ह्या दोन्हीतहि सारखेच निष्णात होते असे त्यानीं लिहून ठेवले आहे. त्याच्या राज्यपद्धतीला महाजनपद्धति असें नाव दिलेलें असून त्याच्या विधिमंडळात ५००० सभासद असत, व प्रत्येक सभासद सरकारला सभासदत्वाची फी म्हणून एक हत्ती पुरवीत असे असें ग्रीक ग्रंथकारानीं लिहून ठेविलें आहे.

ग्रीकानीं वर्णिलेल्या या गणराज्यापैकीं कठगण हा एक सुप्रसिद्ध गण होय. उपनिषद्ब्राह्मणामध्यें कठोपनिषद् म्हणून एक छोटें उपनिषद् असून त्यातील नचिकेताची सुंदर कथा तुम्हीं वाचली असेलच. यज्ञामध्यें आपला पिता माकड गायी देऊन टाकीत आहे याबद्दल विषाद् वाटून बाल नचिकेतानें विचारले, 'बाबा, मला कोणाला देणार? तेव्हा पिता संतापून बोलला, 'तुला मृत्यूला देऊन टाकतों.' नंतर नचिकेत यमलोकीं गेला व त्यानें यमाला संतुष्ट केलें. असला हा मृत्यूशीं धिटाईनें सवाद करणारा बाल नचिकेत याच कठगणातला. या लोकाची यजुर्वेदीय काठक संहिता फार प्रसिद्ध असून तिचा पाठ घरोघरीं चाले असे पतंजलि सागतो. या गणांविषयीं ग्रीकानीं लिहिलें आहे कीं, ह्या राज्यातील लोक कडवे लढवय्ये असून रणागणावर शकटव्यूह रचण्यात मोठे तरबेज होते. अलेक्झाडरच्या पूर्वी त्यानीं पोरस राजाचा पराभव केलेला होता. त्याच्यातील स्त्रीपुरुष शारीरिक सौंदर्याला फार मान देत आणि विवाह स्वयंवरपद्धतीनें करीत. याच्यातील एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे स्पार्टन लोकाप्रमाणें मुलें जन्मास आल्याबरोबर सरकारी अंमलदाराच्या तीं हवालीं करण्यात येत व त्यापैकीं अशक्त व दुर्बल मुलांची हत्या करण्यात येऊन सशक्त मुलेंच फक्त वाढविण्यात येत. तसेंच स्त्रिया पतिनिधनानंतर सती जात. ह्यामुळेच या राज्यांतील लोकाना मृत्यूचें भय कसलें तें उरलें नव्हतें. ह्या लोकातूनच मृत्यूच्या डोळ्याशीं डोळा भिडवून त्याच्याशीं धिटाईनें वेदान्तविषयक

तात्त्विक चर्चा करणारा सुप्रसिद्ध नाचिकेत निघावा हें अगदीं स्वाभाविक नाहीं काय ?

ग्रीक ग्रंथकारानीं ज्याचें वैभव गायिलेले आहे असें एक दुसरें प्रजासत्ताक राज्य म्हणजे क्षुद्रक-मालव संघाचे. क्षुद्रक व मालव मिळून दोन राज्याचा हा संघ होता. ग्रीक ग्रंथकार लिहितात कीं ह्याच्याजवळ एक लाख सैन्य तयार होतें. ह्याहि सैन्यास तोंड देण्यास अलेक्झाडरचे शिपाई तयार नव्हते. म्हणून अलेक्झाडरनें त्याच्याशीं तह ठरविला. त्या तहातील अटींची वाटाघाट करण्याकरिता क्षुद्रक-मालव संघानें शंभर प्रतिनिधि पाठविले होते. ह्या संख्येवरूनहि त्याच्या लोकशाहीचें स्वरूप लक्षात येईल. ग्रीक ग्रथकार वर्णन करितात कीं, हे सर्वच शंभर प्रतिनिधि दिसण्यात भव्य आणि रुबाबदार असून त्यानीं उंची भरजरी पोषाक घातले होते, आणि ते सर्व रथात बसून आले होते. अलेक्झाडरनें त्याना एक बडी मेजवानी दिली. ह्या मेजवानीकरिता सुंदर शामियाना उभारण्यात आला होता. चहूबाजूना भरजरी पडदे सोडलेले होते, आणि ह्या प्रतिनिधींना बसण्याकरिता शंभर सुवर्णआसनें मांडलीं होतीं.

अलेक्झाडरला त्याच्या स्वारींत भेटलेलीं आणखी दोन महत्त्वाचीं प्रजासत्ताक राज्ये म्हणजे अग्रश्रेणी व अंबष्ठ हीं होत. पहिल्याजवळ चाळीस हजार पायदळ व तीन हजार घोडदळ आणि दुसऱ्याजवळ साठ हजार पायदळ, सहा हजार घोडदळ आणि पाचशें रथ एवढें सैन्य होतें. दोन्ही राज्यातील लोक फार शौर्यानें लढत व पराभव होणार अशी खात्री झाली कीं अग्रश्रेणींतील सैनिक आपल्या स्त्रियांचा रजपुतांप्रमाणे जोहार करीत. अंबष्ठाची राज्यपद्धति ही लोकशाही स्वरूपाची होती. ते सेनापतीहि निवडून देत. अलेक्झाडरशीं सामना देण्याकरितां आपणांतील तीन शूर योद्धयाना त्यानीं सेनापति निवडले होतें.

ग्रीक ग्रंथकारानीं वर्णिलेल्या अनेक प्रजासत्ताक राज्यापैकीं आणखी एकाचा उल्लेख केला म्हणजे पुरे. तें राज्य म्हणजे ब्राह्मणजनपद हें होय. अलेक्झाडरचा चरित्रकार प्लुटार्क लिहितो कीं ह्या ब्राह्मणी तत्त्वज्ञानींहि अलेक्झाडरला इतराच्यापेक्षा काहीं कमी त्रास दिला नाहीं. कारण आजूबाजूचे राजे अलेक्झाडरशीं नमतें घेत त्यांची हे तत्त्वज्ञ चांगलीच

निर्मर्त्सना करीत आणि पुनश्च चढाईला चिथावून देत. आणि यामुळेंच ह्या ब्राह्मणापैकीं पुष्कळांना अलेक्झांडरने चिडून फासावर टांगलें !

बौद्ध वाङ्मयांतील उल्लेख

परकीय ग्रथकारांनीं केलेल्या प्रजासत्ताक वर्णनाशीं जुळते असे अनेक उल्लेख बौद्ध वाङ्मयात सापडतात. जातक ग्रंथामध्ये लिच्छवी राज्याचें बरेंच सविस्तर वर्णन सापडतें. त्याचे चार मुख्य अधिकारी असत. ते सर्व निवडले जात. हे अधिकारी म्हणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेनापति आणि खजिनदार हे होत. पैकीं अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार ह्यांना राजा, उपराजा आणि भंडागारिक अशा सज्ञा असत. त्याची राजधानी वैशाली ह्या गावीं होती. एकंदर राज्यातील लोकसंख्या १६८००० असून विधिमडळात एकंदर ७७०७ सभासद असत व त्या सर्वांनाच राजा किंवा राजक ही संज्ञा असे. सर्वांना राज्याभिषेक होई. ज्या पुष्करणीच्या जलाने स्नान करीत ती अत्यत पवित्र समजली जाई. तिचा उल्लेख जातकात 'गणराजकुलाना अभिषेकमंगलपोक्खरणी' असा केला जाई. उत्तरकालीं लिहिलेल्या 'ललितविस्तार' ह्या ग्रंथामध्यें ह्या सवग राजुकाची थट्टाहि केलेली आढळून येते याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यात लिहिले आहे की त्या वैशालीच्या लोकामध्ये वृद्ध आणि ज्येष्ठ अशाना मानसन्मान दर्शविण्याची काहींच चाल नाहीं. कोणी कोणाचे शिष्यत्व पत्करण्यास तयार नाहीं. जो उठला तो म्हणतो कीं 'मी राजा', 'मी राजा', "एकैक एवं मन्यते अहं राजा अहं राजा" इति। ही थट्टा असली तरी त्यावरून तेथे लोकशाही नादत होती हें स्पष्ट आहे. शातिपर्वातर्गत राजधर्मांत गणराजपद्धतीचें वर्णन आहे, त्यात 'जात्या च सदृशाः सर्वे कुलेन सदृशाः तथा' म्हणजे गणराज्यातील सर्व लोक हे कुलानें व जातीनें एकाच समान दर्जाचे असतात असेंच म्हटलें आहे.

आता या प्रजासत्ताक राज्याच्या विधिमंडळांतील कारभार आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वाला धरून कसा चाले हें पाहूं या. याची माहिती बौद्ध

ग्रंथातून मिळते. ती मुख्यतः धार्मिक संघातील कारभारासंबंधी मिळते हें खरें तथापि राजकीय संघातील कारभाराविषयीं अटकळ बांधण्यास ती अनुपयोगी नाहीं. खास राजकीय संघांतील कारभार कोणत्या तऱ्हेनें चाले याची माहिती देणाराहि एक उल्लेख आढळतो तो आधीं पाहूं. शाक्यांच्या राजधानीला एकदा कोसल देशच्या बलाढ्य राजानें वेढा घातला. शाक्यांना आपल्या राजधानीचें रक्षण करणें अशक्यच होतें, म्हणून कोसलाधिपतीनें वेढ्यात सापडलेल्या लोकास निरोप पाठविला कीं तुम्ही शरण येऊन आपणहून नगराचे दरवाजे खोलावे हें बरें ! निरोप पोंचताच लोक म्हणाले कीं आपण सर्वजण एकत्र गोळा होऊन दरवाजे उघडणें इष्ट आहे कीं अनिष्ट आहे हें सर्वांच्या मतें ठरवूं या. सगळेजण म्हणजे परिषदेचे पांचशें समासद मोळा झाले. पण कांहींजण म्हणाले दरवाजे उघडावे, दुसरे म्हणू लागले उघडूं नये ! वादविवादानें निकाल लागेना तेव्हा शेवटीं असें ठरलें कीं जमलेल्या सर्व लोकांचीं मतें मोजून बहुमतानें होईल तो निर्णय मान्य करावा.[1]

गुप्तमतदानपद्धति

अधिक तपशीलात शिरावयाचें तर समा भरली असता मताची मोजणी कशी करीत, मतें देताना हल्लींच्या प्रमाणें गुप्तमतदानाची पद्धति कित्येक वेळीं कशी अवलंबिली जात असे, मतें नोंदण्याकरिता समासदाना एकेक शलाका कशी दिली जात असे, समा कायदेशीर होण्याकरितां उपस्थित असणाऱ्या समासदाची किमान मर्यादा कशी पाळावी लागे, ठराव कोणत्या पद्धतीनें मांडले जात, त्यांचें त्रिवार वाचन कसें होई, व नंतर ते एकमतानें वा बहुमतानें पास वा नापास कसे केले जात, ह्याची सविस्तर व मोठी मनोरंजक माहिती बौद्ध ग्रंथांतून आढळते. मत आणि ठराव याना ह्या प्राचीन वाङ्मयात छंद आणि प्रतिज्ञा असे पर्यायशब्द होते. बौद्ध वाङ्मयात हे शब्द जेथें वापरले आहेत तेथें त्यांचे अर्थ, व्याख्या किंवा लक्षणें कांहींच सांगितलेलीं नाहींत; यावरून या संज्ञा पूर्वापार रूढ झालेल्या व लोकाच्या

1. Life of Buddha p. 199 by Rock Hill.

चागल्या परिचयाच्या असल्या पाहिजेत. बुद्धाच्यापूर्वी धार्मिक संघ अस्तित्वात नसून बुद्धानें या संज्ञा राजकीय संघातूनच उचलल्या असल्या पाहिजेत असें जयस्वाल यानीं प्रतिपादिलें आहे.[1] नवा अध्यक्ष नेमण्याच्या वेळेला सर्व नागरिकाचें मत घेण्याचाहि रिवाज असावा असे दिसते. एका जातकामध्यें वर्णन आढळतें कीं, अध्यक्षाच्या किंवा राजाच्या निवडणुकीकरिता सर्व नागरिकाची सभा बोलावण्यात आली व त्यानीं एकमतानें (एकछंदा भूत्वा) राजाची निवडणूक केली. या ठिकाणीं नुसत्या विधिमंडळाची सभा बोलाविली असा उल्लेख नसून सर्व नागरिकाची सभा बोलाविली असा उल्लेख असल्यानें रिफरेंडमची किंवा सर्व जनतेचा कुल कौल घेण्याची पद्धतीहि प्रसंगविशेषीं अवलंबिली जात असे असें दिसते.

विधिमंडळाच्या सभातून कामकाज कोणत्या पद्धतीनें चाले याची कल्पना बौद्धाच्या धार्मिक संघांतील एतद्विषयक पद्धतीवरून चागली बाधता येते. बौद्ध वाङ्मयातील विनयपिटक ह्या ग्रंथामध्यें बौद्ध संघातील कामकाजाविषयीं तपशीलवार माहिती दिलेली आहे. त्यातून एकदोन उदाहरणें दिलीं तरीहि त्या वेळच्या सभा चालविण्याच्या पद्धतीची कल्पना येईल.

एकदा संघातील ऊवाल नावाच्या भिक्षूच्या हातून काहीं आगळीक घडली आणि ती तो बऱ्या बोलानें कबूलही करीना; तेव्हा त्याच्याविरुद्ध संघाच्या बैठकींत ठराव माडून त्याला शिक्षा करणें प्राप्त झालें. त्या वेळचें वर्णन सापडते तें असें : सर्व सभासद उपस्थित झाल्यावर एका भिक्षूनें सर्वांना उद्देशून पुढील भाषण केलें:– "सभ्य हो, ऐका. या ऊवाल नावाच्या भिक्षूच्या हातून आगळीक घडलेली आहे, आणि संघामध्यें आम्ही त्याची चौकशी करूं लागलों तेव्हा तो मलमलतें खोटेंनाटें सागूं लागला. म्हणून मी म्हणतों कीं या गोष्टीचा विचार करण्याचा योग्य समय प्राप्त झाला आहे असें संघाला वाटत असेल तर संघानें 'तस्य पापीय शिक्षाकर्म' याची अंमलबजावणी करण्यास तयार व्हावें. सभ्य हो, माझी ही सूचना ज्याना मान्य असेल त्यानी स्वस्थ राहावें,

१. Hindu Polity by Jayaswal.

ज्याना मान्य नसेल त्यानीं विरुद्ध बाजू माडावी." क्षणभरानें कोणी विरुद्ध बोलत नाहीं असे पाहून तो भिक्षू पुन्हा म्हणाला, " मी माझी सूचना पुन्हा एकदा सर्वांच्यापुढें माडतो; ज्याचे मत विरुद्ध असेल त्यानीं बोलून दाखवावे. " शेवटीं कोणीच बोलत नाहीं असे पाहून तो भिक्षू पुनश्च म्हणाला, " मी आपली सूचना आता तिसऱ्यादा संघापुढे माडीत आहे. विरुद्ध कोणी असेल त्याने बोलावे. सभ्य हो ! तुमच्यापैकीं कोणीच बोलत नाही, त्यावरून मी असे समजतो कीं ह्या ऊवाल भिक्षूला शिक्षा करण्याची माझी सूचना सर्व संघाला मान्य आहे."

प्रत्येक सूचनेचा किंवा ठरावाचा त्रिवार उच्चार करावाच लागे आणि तसा न केल्यास ती गैरशिस्त समजली जाई. प्रत्येक सभेला सर्वच भिक्षूंना हजर राहता येई असे नव्हे. आजारामुळे किंवा अन्य काहीं कारणामुळें काही भिक्षूना सभेला जाता येत नसे. अशा वेळीं मतमोजणी सशास्त्र व्हावी व गैरहजर सभासदाना अन्याय होऊं नये म्हणून गैरहजर सभासदाचींहि मते मागविण्यात येत. मतमोजणीकरिता भिन्न भिन्न रगाच्या शलाका भिक्षूना देण्यात येत. नतर शलाकाग्राहक म्हणून अधिकारी असे तो शलाका गोळा करी आणि **भूयसी पद्धतीनें** म्हणजेच बहुमताने ठरावाच्या बाजूने किंवा विरुद्ध निकाल देण्यात येई. मतें देण्याच्या तीन पद्धतींचे वर्णन आढळते. पहिली[1] उघड. हीमध्ये सभासद आपलें मत उघड बोलून दाखवीत. दुसरी[2] कर्णज्ञापक. हीमध्ये सभासद आपलें मत अधिकाऱ्याचे कानात हळूच सागत. आणि तिसरी[3] गूढ म्हणजे गुप्तदान-पद्धति. हीमध्ये भिन्न भिन्न रगाच्या शलकाचा उपयोग करीत. एखादे वेळीं कायद्याचा किंवा शास्त्रार्थाचा प्रश्न निघाला आणि त्यावर गैर-माहितगाराकडून निष्कारण वाद माजतो आहे असें आढळून आलें तर त्या विषयातील तज्ज्ञाची पोटकमिटी स्थापून त्या कमिटीचे मत माग-विण्यात येई. सभेंत जें कामकाज चाले त्याची तपशीलवार लेखी नोंद ठेव-ण्याचीहि व्यवस्था असे.

बौद्धाच्या धार्मिक संघातील ही सर्व पद्धति त्यानीं त्याच्यापूर्वीच रूढ असलेल्या गणसंघ किंवा लोकशाही स्वरूपाच्या संस्थांतील पद्धतीवरून उचललेली असावी. ह्या मताला पोषक असें खुद्द बुद्धाचेंच एक वचन

सांपडतें. एकदा बरेचसे भिक्षु आसपासच्या गावात भिक्षा मागण्यास गेले असता एका गृहस्थानें त्यांना विचारले, " अहो, तुम्ही एकहर आहात कितीजण ! " भिक्षु गोंधळले. त्यांना नक्की सख्या सांगता येईना. ग्रामस्थांना चमत्कारिक वाटले व त्यांनीं सर्व हकीकत भगवान बुद्धाच्या कानावर घातली. त्या वेळीं बुद्धानें सर्व भिक्षूंना बजावलें कीं, " गणामध्ये ज्याप्रमाणे शलाका घेऊन सभासदांची शिरगणती करितात त्याप्रमाणें तुम्हीहि पण दर उपवासाच्या दिवशीं आपली शिरगणती नक्की करीत जा. " बुद्धाच्या ह्या वचनातील " गणामध्ये करितात त्याप्रमाणे " हे शब्द महत्त्वाचे आहेत. ह्यावरून बुद्धानें ही पद्धति नवी निर्माण केली नसून पूर्वी गण संस्थामध्ये रूढ असलेल्या पद्धतीचा त्यानें आपल्या धार्मिक संघात अवलंब केला होता असें दिसते.

लोकशाहीचा लोप

साम्राज्यशाहीच्या विकासाबरोबर वर वर्णिलेल्या लोकशाही स्वरूपाच्या संस्था कालचक्राच्या परिवर्तनात मागें पडल्या या पद्धतींतील बहुतेक राज्ये हीं लहान आकाराचीं व लहान प्रमाणाचीं होतीं. कांहींचे संघ असत हें खरे. तरीहि बलाढ्य अशा साम्राज्यसत्तेशीं तीं टक्कर देऊ शकत नाहींत हे लक्षात आल्यानंतर राजशाही आणि साम्राज्यशाही याचाच पुरस्कार बेथून पुढे करण्यात येऊ लागला. लोकशाही राज्यांपैकीं कांही थोडीं राज्ये बरींच बलिष्ठ अशीं होतीं. कांहींतील प्रजेचा तर लढाई करणे हाच मुख्य पेशा होता. तरीही अशीं राज्यें बलाढ्य सम्राटापुढे टिकाव धरू शकत नाहींत असाच अनुभव आला. लोकशाही पद्धतींत निरनिराळे पक्ष उत्पन्न होत, त्याच्यात चुरस माजे, फाटाफूट होई व त्यामुळे एकसूत्रीपणाच्या अभावीं तीं एकंदरींत निर्बल ठरत. 'भेदमूलो विनाशो हि गणाना उपलक्षये' असा महाभारतकारानें शेरा मारला आहे. ह्यामुळे प्राचीन ग्रथात उल्लेखिलेल्या अनेक प्रजासत्ताक राज्यांपैकीं बहुतेक सर्व नष्ट झालीं; आणि राजशाहीचा आणि साम्राज्यशाहीचा पुरस्कार इतक्या जोरानें आणि उत्साहाने करण्यात आला कीं प्रजासत्ताक राज्यपद्धति भरतखंडात एके काळीं मोठ्या प्रमाणावर नादत होती ह्याची स्मृतिहि नष्ट झाली. साम्राज्यशाहीच्या

प्रसारानतरहि टिकून राहिलेलें एक महत्त्वाचे असें प्रजासत्ताक राज्य म्हणजे लिच्छवी गणाचे तेवढे आढळतें. हे राज्य बुद्धाच्या पूर्वी म्हणजे खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्याहि पूर्वीपासून अस्तित्वात असून गुप्ताच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे खिस्तोत्तर पाचव्या सहाव्या शतकापर्यंत लोकशाही स्वरूपात टिकून होते. बाकीचीं बहुतेक प्रजासत्ताक राज्यें साम्राज्यशाहीच्या पुरात वाहून गेलीं.

स्थानिक स्वराज्य

प्रजासत्ताक राज्यपद्धतीप्रमाणे स्थानिक स्वराज्याची कल्पनाही प्राचीन-भारतीयाना अज्ञात नव्हती. भरतखडाच्या दक्षिणभागात तर स्थानिक-स्वराज्य सस्था चागल्या प्रौढपणें वावरताना आढळतात स्थानिक स्वराज्यासबधी दक्षिणेकडील गंगपल्लव, चालुक्य वगैरे राजवटींतील लेख उपलब्ध झाले आहेत त्यावरून प्राचीन भारतातील स्थानिक-स्वराज्याची कल्पना सुस्पष्ट होते. अशा एका लेखातील पुढील मजकूर पाहिला असता स्थानिक स्वराज्याचें स्वरूप कसे होते व त्याच्या निवड-णुकी कशा होत वगैरे लक्षात येईल. लेख पुढीलप्रमाणे : "चोल देशातील उत्तर मल्लूर गावचे आम्ही रहिवाशी राजाज्ञेप्रमाणे एक वर्षाकरिता वार्षिक समिति, उद्यानसमिति, तडागसमिति यावर सभासद निवडण्याकरिता पुढील योजना सुचवितो : गावाचे एकंदर तीस विभाग करावे. या प्रत्येक भागात सभा बोलावून ३५ ते ७० या दरम्यान वयाचे, स्वतःचे घर असलेले, एकचतुर्थांशापेक्षा जास्त सारा भरणारे, मंत्रब्राह्मण कठगत असणारे व व्यवहारजाणते आणि सचोटीचे असतील अशांचीं नावे चिठ्ठ्यावर लिहून तीं एका घटात घालावी. तीसहि विभागातील असे घट आले म्हणजे सर्व ग्रामस्थांची सभा बोलावून एखाद्या अजाणत्या मुलाला एकेक घट हालवून त्यातून सहज हातीं येईल ती चिठ्ठी घेण्यास सागावे. त्या चिठ्ठीवरचे नाव मध्यस्थाने सर्वांना ऐकू येईल असें मोठ्यानें वाचावें. अशा रीतीनें तीस सभासदाची निवड झाली म्हणजे त्यातून ज्यानीं पूर्वी उद्यान व तडाग समितीवर काम केलेले असेल व जे पोक्त असतील अशा बारा जणाची वार्षिक समिती नेमावी. उरलेल्या १८ पैकीं १२ ची उद्यानसमिति व सहाची तडागसमिति करावी. या सभासदाचा अधिकार पूर्ण ३६०

दिवस चालावा....अशा रीतीनें आमच्या गावाची भरभराट व्हावी म्हणून आम्ही राजाज्ञेला अनुसरून आज वरीलप्रमाणे करार करीत [1]आहेत." दक्षिणेंतील उक्कल येथील विष्णूच्या देवळात नऊ, दहा, अकरा या शतकातील चौदा लेख कोरलेले आहेत. त्यात तेथील ग्रामसस्था सर्व व्यवस्था कशी पाहत असे हे स्पष्ट दिसून येते. या देवळाच्या व्यवस्थेकरिता देणग्या देऊ केल्या जात तेव्हा ग्रामस्थांची सभा बोलवून त्याच्या समतीनें देणगीच्या अटी ठरवीत व मध्यस्त त्या लिहून काढी. कोणी ब्राह्मणभोजनाकरिता रोकड रक्कम देई, कोणी नैवेद्याकरिता शेत लावून देई, कोणी विहीर बाधून देई आणि तिच्या व्यवस्थेकरिता शेतहि इनाम देई. पाणीपुरवठासमितीहि विड्यांची पाने विकणारावर कर बसवी वगैरे.[2]

सर्वच प्रातातील ग्रामसंस्था अशा पद्धतशीर निवडणुकीच्या धर्तीच्या नव्हत्या.

तामीळ देशातील ग्रामसंस्थापेक्षा कर्नाटक, गुजराथ आणि महाराष्ट्र यातील संस्था थोड्या निराळ्या प्रकारच्या असाव्यात. तामीळ ग्रामसभेमध्ये वीस पचवीस ग्रामपित्यांची (पेरुमक्कल) निवडणूक होई. कर्नाटकातील ग्रामसभेमध्ये गावातील सर्वच कुटुंबाचे चालक लोक भाग घेत असावेत असे डॉ. अळतेकर म्हणतात.[3] धारवाड व विजापूर जिल्ह्यातील अकराव्या बाराव्या शतकातील ब्राह्मणाना अग्रहार गावें दिल्याच्या लेखामध्यें गावच्या सर्व हजार व दोन महाजनानीं अग्रहाराच्या सनदेप्रमाणे वर्तावें असे उल्लेख आहेत. निवडलेली समिति असती तर त्या समितीचा उल्लेख असता. तेव्हा सर्व ग्रामस्थांची मिळूनच ग्रामसभा मानली जात असावी. महाराष्ट्र व गुजरात या प्रातात ग्रामसभासदाना महत्तर अशी सज्ञा असे. कार्यकारिणी समितीच्या सभासदाना महत्तराधिकारी असें म्हणत असत.

१. ॲंक इ. सर्वे रिपोर्ट १९०४-५.

२. Corporate Life in Ancient India by R. C. Majumdar p. 157.

३. Rashtrakutas and Their Times by Dr. A. S. Altekar p. 199.

इतर राज्यपद्धति

राज्यपद्धतीचे इतर अनेक प्रकारहि प्राचीन भारतीयानीं करून पाहिले होते. मंत्रपुष्पातील स्वाराज्य, वैराज्य वगैरेचा प्रारंभी उल्लेख केलाच आहे. स्वाराज्य पद्धतींतील अध्यक्षाला स्वराट् म्हणत. तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें स्वाराज्य या संज्ञेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. त्या ब्राह्मणात असें वचन आहे कीं, "जो कोणी विद्वान् वाजपेय नावाचा यज्ञ करील त्याला स्वाराज्याची प्राप्ति होईल. तो आपल्या बरोबरीच्या माणसाच्या पुढे जाईल आणि सर्वजण त्याला ज्येष्ठ म्हणून मान देतील." य एव विद्वान् वाजपेयेन यजति गच्छति स्वाराज्यं अयं समानाना पर्येति तिष्ठन्तेऽस्मै जैष्ठ्याय। ऐतरेय ब्राह्मणावरून असे कळते कीं, या प्रकारची स्वाराज्य पद्धति ही सिंधु नदीच्या मुखाजवळील भागात प्रचलित होती. वैराज्य नावाची जी राज्यपद्धति होती ती सर्वस्वीं लोकशाही स्वरूपाची होती. ह्या राज्यपद्धतीमध्यें कोणीहि एक व्यक्ति राजा किंवा अध्यक्ष म्हणून निवडली जात नसे, तर सर्वच सभासदाना राज्याभिषेक करण्यात येई, सर्वच राजे असत आणि सर्वांच्याच संमतीनें राज्यकारभार चाले. लोकशाहीच्या तत्त्वाचा विसर पडल्यामुळे प्राचीन संस्कृत टीकाकाराना वैराज्य या शब्दाचा नीट अर्थच लावता येतनासा झाला होता; आणि म्हणून ते वैराज्य म्हणजे विशेष प्रकाशमान असणारे (विशेषेण राजते !) असा काहीं तरी गुळमुळीत अर्थ करीत. बऱ्याच उत्तरकालीं लिहिलेल्या शुक्रनीतीमध्यें सामंत, माडलिक, राजा, महाराजा, स्वराट्, सम्राट्, विराट्, सार्वभौम अशी चढती श्रेणी दिली आहे, त्यात विराटाचें वैराज्य हे लोकशाही राज्य नसून राजशाही आहे. चाणक्याच्या अर्थशास्त्रामध्येहि जेथें हा वैराज्य शब्द येतो (८।२) तेथेंहि जुना टीकाकार माधवयज्वामिश्र हा त्याचा अर्थ परकीय सरकार असा देतो व आधुनिक टीकाकार गणपतिशास्त्री हेहि त्याचा अनुवाद करितात. पण जयस्वाल याच्या मतें तो अर्थ चुकीचा असून वैराज्य म्हणजे राजविरहित म्हणजेच प्रजासत्ताक राज्य असा त्याचा अर्थ केला पाहिजे. जयस्वालाचा हा अर्थ चाणक्यापुरता संशयित आहे असें मला वाटतें. पण वैराज्यराज्यपद्धति ही नुसती काल्पनिक नसून अशा प्रकारची पद्धति उत्तर कुरु व मद्र देशामध्यें अंम-

लात होती असें ऐतरेय ब्राह्मणात लिहिलेलं आहे व ज्याचा उल्लेख मागें केला आहे तेथे लोकशाही हा अर्थ संभवनीय आहे.

प्राचीनभारतीयानीं राजकारणात केलेल्या अनेक प्रयोगापैकीं एक अभिनव प्रयोग म्हणजे द्वैराज्यपद्धति हा होय. ह्या पद्धतीमध्यें एकाच वेळीं दोन राजे सिंहासनावर बसत व दोघांचाही अमल एकाच काळीं चालू राही. अशा प्रकारची राज्यपद्धति अवंति येथें अमलात होती व विंदु आणि अनुविंदु असे दोन राजे एकाच वेळीं संयुक्तपद्धतीनें राज्यकारभार हाकीत होते असे महाभारतावरून दिसते. तसेच दुसरा कनिष्क व हुविष्क हे राजेहि एकाच वेळीं राज्य करीत होते. खिस्तपूर्व आठव्या शतकात स्पार्टामध्येही असेच दोन राजे एकाच वेळीं गादीवर असत ! दोन राज्यांचा मिळून संघ निर्माण होईल त्या वेळींहि दोन्ही राज्यांतील लोकनियुक्त अध्यक्ष संयुक्त पद्धतीने राज्यकारभार हाकीत. अंधकवृष्णी संघाचा वर उल्लेख आलाच आहे. या संघामध्ये वृष्णीच्या बाजूनें श्रीकृष्ण आणि अंधकाच्या बाजूने बभ्रु असे दोन अध्यक्ष एकाच वेळीं राज्यकारभार पाहात.

वैराज्य, द्वैराज्य ह्याप्रमाणे शासनपद्धतीचा आणखी एक प्रयोग म्हणजे अराजकपद्धति हा होय. ह्या पद्धतींत राजा तर नसेच पण राज्यकारभार चालविण्यासाठीं अध्यक्ष किंवा कोणी पुढारीहि लोकांनीं निवडून दिलेला नसे. सर्व व्यवहार लोकांनीं आपण होऊनच स्वतंत्रपणे पाहावयाचे. त्यांच्यावर शासन अथवा नियमन असे कोणाचेंच नसे. ही पद्धति केवळ काल्पनिक म्हणून ग्रंथातून वर्णिलेली नसून तिचा अनुभव भारतीयानीं प्रत्यक्ष घेऊन पाहिलेला होता किंवा कसे हें सांगणे कठीण आहे. जैनांच्या आचारांग सूत्रामध्ये अरायाणि, गणरायाणि, युवरायाणि, दोराजानि, वैराज्यानि, विरुद्धराजानि अशा भिन्न भिन्न राज्यपद्धतींचा एकत्र उल्लेख आला आहे. त्यातील गणराज्य व युवराज्य याप्रमाणे अराज्य किंवा अराजकराज्य हेहि काल्पनिक नसून खरीखुरी अस्तित्वात असलेली राज्य-पद्धति असावी असें मानणे अगदींच अशक्य नाहीं. वर दिलेल्यापैकीं कोणतीहि राज्यपद्धति जेथे अस्तित्वात आहे अशा कोणत्याहि देशात जैन यतींनीं प्रवेश करूं नये, कारण अशा ठिकाणीं गेल्यास हेर म्हणून

त्यांची विटंबना होण्याचा संभव आहे, असें त्या सूत्रात सांगितलें आहे. ही राज्यपद्धति चिरकाल टिकणें हे अशक्यच होतें. लोक सुखासुखी गुण्यागोविंदानें नांदतील इतक्या उच्च पदवीला मानव अद्यापि पोंचलेला नाहीं; त्यामुळें ही पद्धति टिकू शकली नाहीं.

वर वर्णिलेल्या सर्वच पद्धति शास्त्रसंमत असून त्या सर्वांमध्यें राज्याभिषेकाचा विधि यथासांग करण्यात येई. राजा आणि युवराज यांचाच तेवढा राज्याभिषेक होई असें नव्हे तर लोकनियुक्त असा जो अध्यक्ष त्याच्या बाबतीतही राज्याभिषेकाचा विधि होई; इतकेच नव्हे तर विधिमंडळाच्या सर्व सभासदांना अभिषेक करावा लागे ! लिच्छवी आणि मल्ल अशा दोन राज्यामध्ये असले अभिषेकसमारंभ प्रत्यक्ष होत असत असे उल्लेख आढळतात. कालांतरानें द्वैराज्य, वैराज्य, गणराज्य वगैरे सर्वच पद्धति सामराज्यपद्धतींत बुडून गेल्या.

पाश्चात्य राष्ट्रांच्या इतिहासातहि असाच प्रकार आढळतो. त्यामध्येंहि प्राचीन काळीं ग्रीसमध्यें लहान लहान एकेक शहराच्या आकाराचीं लोकशाही स्वरूपाचीं अथवा महाजनस्वरूपाचीं राज्यें होतीं. कांहीं काल तीं चांगलीं नांदलीं. पण शकपूर्व चवथ्या शतकात मॅसिडोनियातील राजशाही पद्धतीशीं झुंजण्याचा प्रसंग प्राप्त झाला तेव्हां तीं निर्बल ठरलीं. त्यानंतर युरोपमध्यें लोकशाही पद्धति जी एकदा गाडली गेली ती अठराव्या शतकात फ्रान्समध्यें लोकांनीं बॅस्टाइल नावाचा तुरुंग फोडून तिला गुदमरलेली बाहेर काढीपर्यंत दृष्टीस पडली नाहीं. त्यानंतर मात्र लोकशाहीच्या तत्त्वानें मूळ धरलें आणि युरोपचे पाऊल पुढें पडत चाललें. फ्रान्समधील क्रांतीनंतर प्रतिक्रांत्या अनेक वेळा झाल्या पण लोकशाहीचें तत्त्व अन्तीं त्यांना पुरून उरलें. आजहि झोटिंगशहानीं लोकशाहीची गळचेपी केल्याचें दिसत असलें तरी या झोटिंगशहाच्या पाठीशीं मोठें लोकमत असतें हे विसरता येत नाहीं.

मध्ययुगात बाळून गेलेल्या लोकशाहीच्या वहीला युरोपांत जशी नवी पालवी फुटली तशी आपल्या देशातहि प्राचीन काळीं टवटवीत असलेली पण मध्यंतरीं बदून गेलेली या लोकशाहीची वही पुनश्च

आजच्या काळीं संस्कृतिसंगमावर दिसूं लागणार हें निश्चित होय. अशा समयीं प्राचीन भारतातील लोकशाहीची आठवण पुनश्च पल्लवित करणें आपलें कर्तव्य नव्हे काय !

लोकशाहीचे जसे विस्मरण पडलें तसें आणखी एका ऐतिहासिक घडामोडीचें विस्मरण आपणास पडलें आहे. ही घडामोड अत्यत अभिमानास्पद अशी आहे. ती म्हणजे भारतीयाचा विश्वसंचार ही होय. तरी आता तिकडे वळू.

प्रकरण नववें

भारतीयांचा विश्वसंचार

भरतखंडात प्राचीन काळीं लोकशाही नादत होती याची स्मृति जशी पार लोपली तशीच आपल्या पूर्वजाच्या ठिकाणीं प्राचीन काळीं दर्यावरील मुशाफरीची व द्वीपांतरीं वसाहत वसाविण्याची धाडसी वीरवृत्ति नादत होती याचीहि स्मृति पार लोपली आहे. म्हणून ती स्मृति जागृत करण्याकडे आता वळू या. प्राचीन भारतावरील संकलित असा इतिहासाचा पहिला नामवत ग्रथ म्हणजे स्मिथ याचा १९०४ मधील प्राचीन भारताचा इतिहास हा होय.[1] पंधरा वर्षांनीं याच स्मिथनें आक्स्फोर्डविद्यापीठपुरस्कृत हिंदुस्थानचा इतिहास नावाचा दुसरा ग्रंथ लिहिला. या दोन्ही ग्रथात भारतीयाच्या वसाहतीकरणाचा उल्लेख नाहीं. यामुळें शाळा-कॉलेजातील पाठ्य पुस्तकातून या विषयाचा योग्य पुरस्कार केला गेला नाही. अलीकडे ही परिस्थिति सुदैवानें पालटत चालली आहे. नाहीं तर भारतीय सस्कृतीचा अभ्यास करण्यासाठीं शिष्यवृत्तीनें आलेल्या फा हियान, युवान च्वाग, इत्सिंग वगैरे परकीय मुशाफीर व यात्रेकरू याचीं नावें आम्हास पाठ असावीं पण भरतखडातून धर्माचार्य या गौरवपूर्ण नात्याने चीन, मलाया द्वीपकल्प वगैरे देशात जाणाऱ्या काश्यप, कुमारजीव, कौंडिण्य वगैरे आपल्या धाडसी आणि कर्तबगार पूर्वजाची आठवण पार बुजावी ही नामुष्कीची प्रथा अशीच चालत राहती. या प्रथेची मुख्य जबाबदारी आपल्या पूर्वजानीं केलेल्या इतिहासाच्या अवहेलनेवरच पडते. आजही हा वसाहतीकरणाचा इतिहास उपलब्ध झाला आहे तो चिनी प्रवाशाचीं वृत्तें व त्या त्या देशातील

१. Early History of India by V. Smith.

पुराणसंशोधन खात्यानें केलेलें उत्खनन यातून झाला तोच. त्याच्यावरून आता ओझरती नजर टाकूं या.

आक्रमणशीलत्वाला आपण आज इतके पारखे झालो आहों कीं प्राचीन काळीं आपले पूर्वज हे सर्व जगभर व्यापाराकरिता, मुलुखगिरीकरिता, धर्मप्रसाराकरितां हिंडत असत असे कोणी मुद्दाम ओरडून सांगितलें तरी ते खरें न वाटावें ! दीडदोनशें वर्षांपूर्वी मराठे गडी उत्तरेकडे अटकेपर्यंत दौडत जात त्याची आठवण आपणाला आहे. तेव्हा अटकहीच आपली पराक्रमाची अटक वा मर्यादा होती. पण हिंदुस्थानच्या नैसर्गिक भौगोलिक मर्यादा ओलांडून समुद्रावरील लाववरच्या सफरी आपण करीत होतो ही कल्पना देखील आज असंभाव्य वाटते. आणि का न वाटावी ? 'द्विजस्याब्धौतु नौयातुः शोधितस्यापि सग्रहः' म्हणजे द्विजानें समुद्रयान केलें तर त्याचा शुद्धिसंस्कारानेहि पुनश्च पूर्वजातींत समावेश करणें हे कलिवर्ज्य होय असा आदित्यपुराणाच्या आधारें हेमाद्रीने स्वच्छ शेरा मारिला आहे. आणि हा शेरा नुसत्या शास्त्रातच न राहता त्याची अमलबजावणीहि होई. फार वर्षांपूर्वीची गोष्ट नव्हे. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी म्हणजे १९१० सालीं श्रीक्षेत्र काशी येथील रहिवासी व अगरवाल वैश्य जातीतील एक सुशिक्षित सद्गृहस्थ बाबू लक्ष्मीचंद ह्यांनीं उच्च शिक्षणाकरिता विलायतची यात्रा केली तेव्हा या पापाबद्दल त्याना जातिबहिष्कृत करण्यात आले होतें. आणि या बहिष्कारातून त्याची सुटका झाली ती त्यानीं अलाहाबाद हायकोर्टात बहिष्कारबाद्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद केली व समुद्रयान हे शास्त्रनिषिद्ध नव्हे असा निवाडा न्यायासनावरून करून घेतला तेव्हा !

आम्हालाच जेथें इतकी भूल पडली तेथें परकीयाना त्याच्या मतें फुरंगट्या वृत्तीचे आम्ही जे भारतीय लोक ते लाबलाबच्या मुशाफरी करीत असूं हें खरें कसें वाटावें ? सुमारें चाळीस वर्षांपूर्वी लिहिताना पाली पंडित रिहसडेव्हिडसचा तरी यावर विश्वास बसेना. अशोकाच्या शिलालेखाचा त्यानें अभ्यास केला होता. या शिलालेखापैकीं १३ व्या लेखात [1]लिहिलें आहे कीं, "प्रियदर्शनानें दयाधर्माचा सर्वत्र प्रसार केला आहे. सहाशें योजनें

१. Select Inscriptions by D. C. Sircar, p. 37.

दूर, जेथ यवनांचा राजा अँटिओक राहतो तेथपर्यंत, व तेथून त्याच्या उत्तरेला तुरमयो, मक, अंतिकिनी व अलिकसुंदरो हे चार राजे राहतात तेथवरहि केला आहे." अशोकाच्या या लेखावरून भरतखंडाबाहेर इजिप्त व ग्रीसपर्यंत त्याचे धर्मोपदेशक गेले होते हें स्पष्टच आहे. पण 'बुद्धकालीन भारत' या आपल्या ग्रंथामध्यें व्हिसडेव्हिज लिहितो कीं, "ग्रीकाचा हा उल्लेख म्हणजे नुसती पोकळ बादशाही फुशारकी असावी. त्याचे धर्मोपदेशक खरोखरच ग्रीसमध्यें गेले असतील असा संभव फार थोडा." (पृ.२१८).

सागरविक्रमाचा पुरावा

पण अलीकडे भारतीयाच्या दर्यावर्दीपणाबद्दल इतका भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे कीं तो आधळ्यालाहि दिसावा. हा पुरावा वाङ्मय, शिल्प, नाणीं यात ग्रथित असून तो थेट वैदिक काळापासून उपलब्ध होतो! प्राचीन वाङ्मयात दर्यावरील मुशाफरीचे उल्लेख सर्वत्र विखुरलेले आहेत. रामायण, बृहत्संहिता, मनुस्मृति, बौद्ध जातके, रत्नावली, दशकुमार अशा भिन्न वाङ्मयप्रकाराची याबाबत साक्ष काढलीत तर सर्वांची साक्ष अशीच पडेल कीं, भारतीय लोक हे दर्यावर्दीपणांत निष्णात होते. समुद्रयान निषिद्ध ठरलें गेलें तें फार उत्तरकालीं. सर्व धार्मिक वाङ्मयाचें मूलस्थान जें वैदिक वाङ्मय त्यात समुद्रयानाचा निषेध मुळींच नाहीं; उलट, ऐतरेय ब्राह्मण यामध्यें अमुक भूमि पवित्र आणि अमुक अपवित्र असें न सागता सर्व पृथ्वी हींच वेदीप्रमाणें पवित्र होय असें वर्णन आलें आहे. एष उर्वी एव स भूम्यन्तः यद् वेद्यन्तः । (१।५।१०). खुद्द ऋग्वेदांत तर ७ व्या मंडलामध्यें वशिष्ठ व वरुण हे नावेंत बसून चालले आहेत अशा प्रकारचे उल्लेख आहेत. वशिष्ठं ह वरुणो नाध्याघात् । ऋषिं चकारस्वपामहोभिः । (सूक्त ८८). तसेंच ऋग्वेदामध्यें तुर्गोचा पुत्र भुज्जू याचें जहाज फुटलें तेव्हां शंभर वल्ह्यांनीं युक्त असलेल्या नावेमध्यें अश्विनानीं त्याला उचलून घेतलें असें वर्णन आहे. उपनिषदांतील 'प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः' हा नावेचा दृष्टान्त प्रसिद्ध आहे. फुटलेल्या नावेचे असले दृष्टान्त महाभारत, रामायण, मनुस्मृति वगैरे ग्रंथांतही आढळतात. रत्नावली नाटकांतील नायिका ही सोलोनची राजकन्या असून ती जहाजांतून सफर करीत असतां

जहाज फुटलें व काहीं व्यापाऱ्यांनीं तिला आपल्या जहाजातून मरतखंडात आणलें असा त्या नाटकाचा कथाभाग आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ४९ वा अध्याय हा नावाध्यक्षाच्या कामगिरीला वाहिलेला आहे व त्यात प्रारंभींच समुद्रावरील जहाजावर देखरेख ठेवावी असें सांगितलें आहे. दशकुमारचरितांत समुद्रावरील सफरीच्या अनेक गोष्टी आहेत. आंध्र लोकांत दर्यावर्दीपणा विशेष पुढारलेला होता. त्याच्या कित्येक नाण्यावर जहाजांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. वसिष्ठीपुत्र पुलुमायी याच्या नाण्यावर दोन डोलकाठ्यांचें चित्र आहे. (सन १३०).

जातककथामध्यें दर्यावर्दीपणाचे उल्लेख अनेक आहेत. बावेरू जातक नावाच्या जातकात हिंदी व्यापारी बावेरूला मोर घेऊन चालले आहेत असें वर्णन आहे. बुल्हरच्या मतें बवेरू म्हणजे बाबिलोनिया होय. यावरून इराणी आखातात व्यापारी जहाजें जात असावींत. किनाऱ्याच्या लगतचा प्रवास चालू असता दिशाकाकांचा (कावळ्याचा) उपयोगहि करीत असत. लसक जातक, दधिवहन जातक यामध्यें समुद्रात जहाजें बुडल्याचा उल्लेख आहे. सुप्पारक जातकामध्यें एक आधळ्या दर्यासारंगाची कथा आहे. भरुकच्छच्या श्रेष्ठींनीं त्याला आपल्या जहाजाचा कप्तान नेमलें होतें या जहाजावर सातशें माणसाची सोय होती ! समुद्रवनिज जातकामध्यें सांगितलें आहे कीं वाराणशीच्या कांहीं सुताराच्याजवळ कर्ज वारण्यास पैसे नव्हते म्हणून त्यानीं एक मोठें जहाज बांधलें व आपल्या बायकामुलांसह त्यातून प्रयाण केलें.

नौकाबंधन

दर्यावरील या मुशाफरी भरतखंडात बांधलेल्या नौकातूनच होत. या नौका कशा बांधीत, केवळ्या बांधीत, याची तपशीलवार माहिती देणारा एक ग्रंथहि अलीकडे छापून प्रसिद्ध झाला आहे; तो म्हणजे अकराव्या शतकातील भोज नृपतीच्या नांवावर असलेला 'युक्तिकल्पतरु' हा होय. या ग्रंथांत नौकांस लाकूड कोणतें वापरावें, समुद्रतळाच्या लोहकान्तानें ओढले जाण्याचा धोका असल्यामुळें लोखंडी खिळ्याचा उपयोग कसा टाळावा, जहाज शृंगारण्याकरितां सुवर्ण, रजत व ताम्र या धातूंचाच कां उपयोग करावा, त्याच्या मुखाला सिंह, गज, सर्प, व्याघ्र असे आकार कसे द्यावे,

जहाजाना एकपासून चारपर्यंत शिडें असतील त्याप्रमाणें त्यांना निळा, पिवळा, तांबडा व पांढरा हे रंग कसे द्यावे, राजाचा झेंडा व खजिना नेण्याकरिता 'सर्वमंदिरा' म्हणजे सर्व छावलेली, जलविहाराकरिता 'मध्यमंदिरा' व लढाईकरिता 'अग्रमंदिरा' नौका कशी वापरीत वगैरे प्रकारची माहिती दिलेली आहे. नौकाचे नदीवरील व समुद्रावरील सफरीच्या अनुरोधानें सामान्य व विशेष भेद करून त्याच्या लांबी, रुंदी, उंचीचीं प्रमाणेंहि दिलेलीं आहेत. या नौकाना नावे दिलेलीं आहेत तींहि चपला, गर्भरा, मथरा, लोला, प्लाविनी अशी अभिजात अभिरुचीचीं निदर्शक आहेत :

क्षुद्राश्च मध्यमा भीमा चपला पटलाऽभया ।
दीर्घा पत्रपुटाचैव गर्भरा मंथरा तथा ।
नौकादशकमित्युक्तं राजहस्तैरनुक्रमम् ॥८१॥

ग्रंथातील वर्णनाशीं सवादी अशीं नौकाचीं चित्रेंहि सापडतात. अंजिठा लेण्यातील कुमारविजय हा सिंहलद्वीपात नौकेतून जात आहे हे चित्र सुप्रसिद्ध आहे. याच लेण्यात अग्रमंदिरा व मध्यमंदिरा पद्धतीच्या नौकाचीं दोन चित्रें आढळतात. सांची येथील स्तूप व कान्हेरी लेणीं येथेंहि नौकाचीं चित्रे खोदलेलीं आहेत. जगन्नाथपुरीच्या देवळात मध्यमदिरा पद्धतीची नाव शिलेवर खोदलेली आहे. या प्रकारचा समुद्रयानाचा व नौकाबंधनाचा पुरावा वाङ्मय, शिल्प, नाणीं यावरून पुष्कळच देण्यासारखा आहे. पण येवढा वानगीदाखल पुरे.

समुद्रनिषेधाचा नियम बऱ्याच उत्तरकालीं रूढ झाला असावा.

मनुस्मृतीचा नवव्या शतकातील सुप्रसिद्ध टीकाकार मेधातिथि याच्या काळापर्यंत तरी परदेशगमननिषेधाची पकड भारतीयाच्या मनावर बसलेली दिसत नाहीं. मनुस्मृतीमध्यें मनु प्रतिपादन करतो कीं, हिमालय आणि विंध्य याच्यामधला प्रदेश तो आर्यावर्त होय. तसेंच कृष्णसार हरिण ज्या प्रदेशात स्वभावतः विहरतो तो यज्ञीय देश होय. त्या देशातच द्विजातानीं शक्यतोपर वस्ती करावी. या मर्यादेबाहेरील देश तो म्लेच्छदेश होय. यज्ञीयदेशाचाच आश्रय द्विजातींनीं शक्यतों करावा.[1] यावर मेधातिथि लिहितो

१. अध्याय २ श्लोक २२–२४.

कीं, मनूच्या आर्यावर्ताच्या वरील मर्यादा भावार्थानेंच घेतल्या पाहिजेत. कारण एखाद्या आर्यराजानें म्लेच्छांचा पराभव करून तेथें चातुर्वर्ण्य सुरू केले व तेथील म्लेच्छांना चंडाळाच्या हीन स्थितिप्रत आणून सोडलें तर तो देशहि यज्ञदेश होईल. कारण कोणताहि प्रदेश मूलतः यज्ञीय किंवा अयज्ञीय असा नसतो. त्या प्रदेशावर ज्याचें राज्य असेल त्याच्या आचाराप्रमाणे तो यज्ञीय किंवा अयज्ञीय ठरेल. यदि कश्चिद् क्षत्रियः द्विजातियः राजा म्लेच्छान् पराजयेत्। चातुर्वर्ण्यं वासयेत् म्लेच्छाश्च आर्यावर्ते इव चाण्डालान् व्यवस्थापयेत् तदा सोऽपि स्यात् यज्ञीयो देशः।

धर्मशास्त्रकारांनीं पुढील कालात नौकानयनाच्या निषेधाचा जो नियम घालून दिला आहे तो मुख्यतः ब्राह्मणापुरताच असावा. पण हळूहळू नौकानयन ही विद्या इस्लामीयाच्या हातात गेली. शिवाजीचें मात्र आरमाराकडे दुर्लक्ष नव्हतें. त्यानें विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, अशा ठिकाणी गोद्या तयार करून स्वतंत्र आरमाराची उभारणी केली होती. मराठ्यांच्या आरमारात आंग्रे आणि धुळप यानीं अव्वल दर्जाचा पराक्रम गाजविलेला प्रसिद्ध आहे. या आरमाराकरितां लागणारीं निरनिराळीं जहाजें ही सर्व येथल्या येथेंच बांधलीं जात असत आणि तें बांधकाम इतकें खबीर व टिकाऊ असे कीं **इंग्रज लोकहि एके काळीं आपलीं जहाजें सुरत व मुंबई येथून बांधवून घेत!**

१७२५ च्या सुमारास मुंबईस चांगलीशी गोदी नव्हती. तेव्हा जहाजें सुरतेहून बांधून आणीत. सुरतला त्या वेळीं धनजीमाई नांवाचे एक पारशी गृहस्थ या कामात तरबेज होते. यांच्याच कारखान्यातील मुख्य कारागीर लवजी नसरवानजी यास मुंबईच्या त्या वेळच्या गव्हर्नरनें मोठी मनधरणी करून बोलावून घेतलें व त्यानेंच नंतर मुंबईस येऊन मुंबईच्या दोन तीन गोद्या बांधल्या. लवजी १७७४ मध्यें मृत्यु पावला. पण त्याच्या मागून त्याच्या कारखान्याची भरभराट वाढतच गेली. पुढें ह्या कारखान्यात कॉर्नवॉलिस नांवाचें पन्नास तोफांचें लढाऊ जहाज इतकें अुत्तम बांधलें गेलें कीं १८०२ मध्यें इंग्लंडमधील आरमार खात्याच्या प्रधान-

मंडळानें असें ठरविलें कीं, खुद्द इंग्लंडमधील लढाऊ जहाजेंहि मुंबई येथेंच बाधावींत ! हा कारखाना १८२९ पर्यंत चागलाच भरभराटींत होता. १८२९ मध्यें मुंबई येथें पहिली वाफेची आगबोट येऊन दाखल झाली. या यात्रिक सुधारणेपुढें आपलीं जुनीं जहाजें टिकाव धरणार नाहींत हें हेरून वा कारखान्यानें १८३८ मध्यें दोन तरुणाना नवी विद्या साध्य करण्याकरितां विलायतेस पाठाविलें. पण पुढें हें गाडें पालटलें आणि जहाजें बाधण्याची कला लवकरच नामशेष झाली ! (इतिहास-सग्रह.)

आता मेघातिथिपूर्वकालीन भारतीयाच्या विश्वसंचाराच्या इतिहासाकडे वळूं या.

या संचाराची हकीकत हा भारतीय इतिहासाचा एक पराक्रमी भाग होय. पण त्याची स्मृति त्रोटक अुल्लेखापेक्षा अधिक विस्तारानें भारतीय वाङ्मयानें जागवूं नये हें दुर्दैव होय. परकीय प्रवाश्यानीं या संस्कृति-प्रसाराचें वर्णन केलें नसते, व तत्तद्देशीय वाङ्मयातून व शिलालेखातून त्याचें स्वरूप नजरेस न पडतें तर भारतीय लोक हे दिग्विजयार्थ व संस्कृति-प्रसारार्थ समुद्र ओलाडीत व द्वीपातरीं वसाहत करीत ही कल्पनाहि मनाला शिवली नसती. सुदैवानें अलीकडे या विक्रमाची तपशीलवार माहिती उपलब्ध झाली आहे. तिची भूळभेट आता घेऊं या.

पूर्वद्वीपांतील संचार

भरतखंडाचे भूगोलावरील ठाणमाण पाहिलेंत तर असें दिसेल कीं, हा भारतपुरुष हिंदीमहासागरातून उतरून कमरेपर्यंत पाण्यात उभा राहिलेला आहे, दोन्ही हात त्यानें पसरलेले आहेत, उजव्या हातानें तो अरबी समुद्राला थोपटीत आहे, डाव्या हातानें बंगालच्या उपसागराचें आस्कालन करीत आहे व अशा पवित्र्यांत उभा राहून आपले दोन्ही हात लाब पसरून तो जणूं कांहीं आपल्या सुपुत्रांना आशीर्वादयुक्त सांगत आहे कीं 'वत्सांनो, जा आणि पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशाकडे पसरलेल्या अथांग दर्यावर हवा तसा निर्भयपणें संचार करा.' आणि त्याच्या सागीप्रमाणें प्राचीन काळीं त्याचे सुपुत्र दूरवर संचार करीत आणि आपल्या संस्कृतीचे ठसे सर्वत्र वठवीत.

हिंदुस्थानच्या आजच्या देशमर्यादा पाहिल्या तर पश्चिमेकडे सिंध, पूर्वेकडे बंगाल व उत्तरेकडे हिमालय अशा आहेत. आज या मर्यादाच्या आंतच भारतीयाचें स्वातंत्र्य लोपल्यानें ते उफळून बाहेर जाण्याची शक्यता तूर्त रोखली गेली आहे. पण प्राचीन काळीं आपल्या पूर्वजानीं भरतखंडाच्या भोंवतीं असलेल्या अनेक देशावर आपलें वर्चस्व स्थापिलें होतें असें इतिहास सागतो.

त्याचें विहंगमावलोकन करण्याकरिता आपण प्रथम पूर्वेकडून बाहेर पडून सभोवार वळसा घालून येऊ या. पूर्वेच्या वेशींतून बाहेर पडलें कीं आपण ब्रह्मदेशात येतों. तो ओलाडून त्याचा दक्षिणेस गेलेला द्वीपकल्पाचा जो भाग आहे त्यात पूर्वेस अनाम, पश्चिमेस सयाम व दक्षिणेस कंबोडिया असे प्रदेश लागतात. सयामचेंच एक दक्षिण टोक लाबवर समुद्रात गेलें असून त्याला मलाया द्वीपकल्प असें नाव आहे. या द्वीपकल्पाच्या पूर्वेस व पश्चिमेस बोर्नियो व सुमात्रा हीं मलीं मोठीं बेटें असून सुमात्राच्या पायथ्याशीं चिंचोळें लाबट जावा बेट व त्याच्याच शेजारीं छोटेखानी बाली बेट अशीं समुद्रात पसरलेलीं आहेत. बोर्नियोंतून उत्तरेकडे चालले म्हणजे फिलिपाइन्स बेटें लागतात. हा सर्व प्रदेश आज त्या त्या युरोपियन राष्ट्राच्या ताब्यात आहे. काहीं काल यापैकीं काहीं प्रदेशावर मुसलमानांचा अंमल होता. पण तत्पूर्वी म्हणजे इसवी सनाच्या सुरवातीपासून हजार बाराशें वर्षे पर्यंत या सर्व प्रदेशावर भारतीयाच्या वसाहती होत्या, व बऱ्याच ठिकाणीं त्यांचीं राज्यें होतीं.

तरी आता ब्रह्मदेशापासून सुरवात करून या प्रदेशात फेरी मारून येऊं या. ब्रह्मदेशात आजहि बुद्ध धर्माचें प्राबल्य आहे हें सर्वांना परिचितच आहे. तेथें जें उत्खनन झालेलें आहे त्यात प्राचीन स्तूप व पाली भाषेतील बौद्धधर्मीय ग्रंथांचीं हस्तलिखितें सापडलेलीं आहेत. त्या सर्वांवरून ब्रह्मदेशाची राजधानी जी प्रोम तेथें इसवी सनाच्या सहाव्या शतकांत वंशानें म्हणा किंवा संस्कृतीनें म्हणा भारतीय अशीं राजघराणीं नांदत होतीं, व त्या राजांचीं नांवें विक्रमान्त किंवा वर्मान्त होतीं हें सिद्ध झालेलें आहे. त्या वेळचें जें शिल्प उपलब्ध झालें आहे त्यावरून येथें येणारे कसबी लोक हे उत्तरेकडील गुप्तराजांच्या परंपरेतील व दक्षिणच्या

पल्लवशिल्पपरंपरेतले असे दोन्ही प्रातातून आलेले असावेत असें दिसते. देवनागरी लिपींतील व संस्कृत भाषेतील लेख असलेल्या काही विटा सांपडल्या आहेत त्यावर ११ व्या शतकातील अनवृत (सस्कृतमध्ये अनुरुद्ध देव) या राजाचें नाव आहे. पेगन येथील १२ व्या शतकात बाधलेलें महाबोधी मंदीर आहे तें बुद्धगयेच्या मंदिराच्या धर्तीवर बाधलेलें आहे.

ब्रह्मदेश सोडला कीं आपण सयाममध्ये येतो. हल्लीं याच प्रदेशाला थायलँड म्हणूं लागले आहेत. येथील सातव्या आठव्या शतकातील द्वारावती राज्य, आठ ते बारा शतकातील श्रीविजय राज्य, बारा-तेरा मधील हरिपुंजय राज्य व तेरा ते सोळा मधील सुखोदय राज्य यातील अनेक लेख उपलब्ध आहेत. काहीं लेख सस्कृत व पाली भाषात असून काहीं तत्रस्थ मॉन व ख्मेर या भाषात आहेत. द्वारावती येथील राजे हीनयान पंथाचे अनुयायी असून त्या वेळच्या बुद्धाच्या मूर्तीचे ध्यान सारनाथ व अजंठा येथील वळणावर आहे. हरिपुंजय येथें स्तूप आणि मदिरे याची रेलचेल आहे. दहा ते तेरा या शतकात सयामवर दक्षिणेकडील कंबडिया-प्रांतियाचा अंमल होता व त्यामध्यें वैदिक व बौद्ध अशा दोन्ही धर्मांची चलती होती. वीस वर्षांपूर्वी गादीवर असलेल्या राजाचे नाव सहावा राम, त्यानंतरचा प्रजादीपक. विधिमंडळाचें नाव राजपाडीय सभा. यावरून येथील भारतीय परंपरा आजवर कशी अविच्छिन्न राहिली आहे हें लक्षात येईल.

सयामच्या पूर्वेच्या भागाला हल्लीं अनाम म्हणतात. प्राचीन काळीं याचें नाव चंपादेश असे होतें. नगराचीं नावें चंपापुरी, इंद्रपूर अशीं होतीं. या प्रदेशात दुसऱ्या तिसऱ्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत हिंदूंचें राज्य होतें व त्याचे संस्कृत भाषेतील अनेक लेख व वैदिक देवतांचीं आणि बौद्धांचीं अनेक मंदिरें सापडलेलीं आहेत.[1]

सयाम आणि अनाम या दोहोंच्या दक्षिणभागीं असलेल्या प्रदेशाला कंबोडिया म्हणतात. त्याचें पूर्वीचें नांव कम्बुजदेश. दंतकथेप्रमाणें ह्या देशांत कौंडिण्य नावाच्या ब्राह्मणानें पहिल्या शतकांत प्रथम आपला अंमल बसविला. इ. स. ४०० च्या सुमारास दुसऱ्या एका कौंडिण्य नांवाच्याच

१. Champa by R. C. Majumdar.

राजानें तो अंमल दृढ केला. तेथपासून तों सोळाव्या शतकापर्यंत हा देश भारतीय संस्कृतीच्या राजाच्या अंमलाखालीं होता. त्या कालातील संस्कृत लेख व हिंदी शिल्प याचे अनेक नमुने सापडले आहेत. लेखातील राजांचीं नावें जयवर्मा, सूर्यवर्मा, धरणीद्रवर्मा, रुद्रवर्मा अशा प्रकारचीं असून पाचव्या शतकातील गुणवर्मा नावाच्या राजानें विष्णुपदाची स्थापना केल्याचा एक लेख आहे. या प्रदेशातिल अंकोर हे मुख्य ठाणें असून त्याच्या आसपास शैव, वैष्णव व बौद्ध अशा तिन्ही पंथाचीं अनेक मदिरें व स्तूप विखुरलेले आहेत. ईश्वरवर्मा नावाच्या एका राजाच्या लेखात त्याचा ब्राह्मण प्रधान विद्याविशेष हा सांख्य, वैशेषिक, न्याय, बौद्ध या दर्शनात निष्णात होता असा उल्लेख आहे. त्यावरून येथील भारतीय संस्कृतीच्या जोपासनेची कल्पना येईल.[1] मदिरातील शिल्पांत समुद्रमथन, कौरवपाडवयुद्ध, शेषशायी विष्णु, गोवर्धनपर्वतधारी कृष्ण असले नमुने प्रामुख्याने आढळतात.

कम्बोडिया सोडून सयामच्या दक्षिणेकडे समुद्रात लाबवर पसरलेल्या निमुळत्या भागात आपण आलो म्हणजे मलाया द्वीपकल्पात येऊन हजर होतों. पाचव्यापासून पंधराव्या शतकापर्यंत येथे भारतीय राजे राज्य करीत होते. शैलेंद्र राजवटीत तर सर्व द्वीपकल्प एकछत्री अमलाखालीं होतें. येथें चौथ्या शतकातील एक स्तभ आढळला असून त्यावरील लेखात तो उभारणारा बुधगुप्त यानें स्वतःस महानाविक म्हणून सबोधिलें आहे. मलायाच्या पश्चिमेस सुमात्रा हे महाद्वीप पसरलेले आहे या बेटाची राजधानी श्रीविजय ही असून चीन व भरतखंड याच्यामधील व्यापाराची ती मोठी उतारपेठ होती असे चिनी प्रवासी इत्सिंग यानें लिहिलें आहे. या बेटात शिव, विष्णु, बुद्ध, लोकेश्वर, मैत्रेय याच्या मूर्ति सापडल्या आहेत.

सुमात्राच्या दक्षिण टोकाकडून समुद्रात निघालें कीं नजीकच जावा बेट लागतें. याचें प्राचीन नाव यवद्वीप. दुसऱ्या शतकात येथें देववर्मा नावाचा राजा राज्य करीत होता. पाचव्या शतकात चिनी प्रवासी फाहियान हा येथे आला तेव्हा ब्राह्मण धर्म येथें अंमल गाजवीत असलेला

[1]. Progress Indic Studies p. 293. Edited by Dr. R. N. Dandekar.

त्याला आढळला. या बेटात संस्कृत लेख तर सापडले आहेतच पण रामायण, महाभारत, ब्रह्माडपुराण, हरिवंश, नीतिसार, स्मरदहन, इंद्रविजय-काव्य, पार्थयज्ञकाव्य, सुमनसातककाव्य (पुष्पमालेनें इंदुमतीचे प्राणहरण) असले ग्रंथहि उपलब्ध झाले आहेत.[1] चौथ्या किंवा पाचव्या शतकातील मूलवर्मा राजाने उभारलेले तीन यूपस्तंभ सापडले आहेत. ते दगडी असून त्यावर लेख आहेत. येथील शिल्पापैकी बराबुदुरचा स्तूप हा विख्यात आहे. या स्तूपाच्या सर्व बाजूनीं शिल्प असून त्यात ललितविस्तारासारख्या बौद्ध ग्रथातील प्रसंग वठविलेले आहेत. बेटातील मध्यभागात शिवाचीं व गणेशाचीं मंदिरें असून त्यातील भिंतींवर रामायणातील कथाप्रसंग कोरलेले आहेत. काहीं देवळाना अर्जुन, भीम, घटोत्कच, शिखंडी याचीं नावें दिलेलीं आहेत. वसाहतींत गेलेलें लोक तेथील गावाना, डोंगराना, नद्याना मायदेशातील नावें ठेवीत असतात. तेव्हा जावा बेटातील एका नदीचें नाव चंद्रभागा आहे हें ऐकून आपणास मौज वाटेल. या नदीचा ओघ राजधानीकडे वळवून नंतर पुन्हा तिला समुद्रगामिनी करण्याचा उद्योग राजाधिराज गुरु नावाच्या राजानें घडवून आणला. त्यासंबंधींच्या शिलालेखात म्हटले आहे: 'पुरा राजाधिराजेन गुरुणा पीनबाहुना। खाता ख्याता पुरीं प्रायः चंद्रभागार्णवं ययौ।' येथील नगरींचीं नावें अयोध्या, मथुरा, काचीं अशीं आहेत. राजाचीं नावें इंद्रवर्मा, दिलीप, माधाता अशा थाटाचीं. धार्मिक बाबींत तर जावा ही केवळ मातृभूमीची प्रतिकृति होय. शिवाय मुनिश्रेष्ठ अगस्त्य याचीं मंदिरें स्थापून त्या आद्य वसाहतकाराची स्मृति जागृत ठेवली आहे.

जावाच्या शेजारचें बेट बलि हे होय. येथें हिंदुसंस्कृतीची परंपरा आजवर अविच्छिन्न राहिलेली आहे. येथेंहि संस्कृत भाषेतील शिलालेख व ताम्रपट सापडलेले आहेत. शिवाय नारायण अथर्वशीर्ष, उपनिषद्, स्तोत्रें, रामायण वगैरे ग्रंथहि उपलब्ध झाले[2] आहेत. बुद्धाला शिवाचा धाकटा भाऊ कल्पून वैदिक व बौद्ध धर्माची सागडहि येथें उत्तम घातली गेली आहे.

१ Suvarnadwip Vol. II. p 67-77 by R. C Majumdar.

२. गायकवाडमाला न. ६७.

बलि बेट टाकून उत्तरेकडे आपण निघालों म्हणजे बोर्निओ हें बेट लागतें. बोर्नियोला जावा येथील जुन्या लेखांत तंजुगनगर व बकुलपूर अशीं नावें आहेत. येथें चवथ्या शतकातील मूलवर्मा राजानें उभारलेले चार यूप सापडले आहेत. या राजानें वप्रकेश्वर येथें बहुसुवर्णक नांवाचा यज्ञ केला व त्याच्याकरिता उभारलेल्या शिलायूपावर लेख कोरून ठेविले. श्रीमूलवर्मराजेंद्रो यष्ट्वा बहुसुवर्णकम् । तस्य यज्ञस्य युपोऽय द्विजेन्द्रैरसंग्रकल्पितः ॥ एका गुहेमध्यें हिंदु व बौद्ध अशा देवताच्या अनेक मूर्ति एकत्र आढळल्या त्यात महादेव, नंदी, कार्तिकेय, गणेश अशा हिंदु देवताच्या मूर्ति आहेत.[1]

बोर्नियो सोडून उत्तरेकडे चाललों म्हणजे फिलिपाइन द्वीपसमूहांत आपण येऊन पोहोंचतों. खिस्तीशकापूर्वी काहीं शतकें जावा, सुमात्रा, बोर्निओ या बेटातून बरेच वसाहतकार या फिलिपाइन बेटांत येऊन स्थायिक झाले असावेत, व त्याच्याच सागातीं हिंदु संस्कृति येथें येऊन पोचली असावी. हा द्वीपसमूह काहीं काल सुमात्रातील श्रीविजय येथील राजाच्या ताब्यात होता, व नंतर काहीं काल जावा येथील राजाच्या ताब्यात होता. उत्तरकालात येथें इस्लामी व ख्रिश्चन या दोन्ही धर्मांचें वर्चस्व झाले तरी दिवसाच्या निरनिराळ्या प्रहरांना महेश्वर, काल, श्री, ब्रह्मा व विष्णु अशींच नावें वापरलीं जात. हीं बेटें स्पॅनिश लोकाच्या हातीं असताना फिलिपिनोंचा देशभक्त डॉन पाडों तवेरा हा तेथील राजवटीला कंटाळून पारीसमध्यें जाऊन राहिला व तेथें त्याने फिलिपाइन बेटात सर्वत्र संचार असलेली भाषा जी तगलॉग त्या भाषेंत संस्कृत भाषेतील कोणकोणते शब्द सापडतात त्याची यादी प्रसिद्ध केली (१८८७). त्यात अन्तर, अष्टकोण, वायु, मंडल, मनुष्य, मोक्ष, नाग, पाप, करुणा, कथा, कोश, दुःख, गज, गणित, सूर्य, लाभ, मन, चंदन, संसार, शील वगैरे अनेक संस्कृत शब्द तगलॉग भाषेमध्यें संस्कृतमधून जवळ जवळ जसेच्या तसे (अतरचे अंतल, वाणीचे बनी वगैरे) घेतलेले दिले आहेत.[2]

१. Suvarnadwipa by R C. Majumdar
२. India and the Pacific World p 82-83. by Kalidas Nag.

या द्वीपसमूहातून आपण उत्तरेकडे तारू हाकारलें म्हणजे आपण जपान-मध्यें येतों, व तेथून पश्चिमेकडे वळलें म्हणजे कोरिया, मांचुरिया, मंगोलिया, चीन या प्रांतात अनुक्रमें येतों. या सर्व प्रदेशात आजहि बौद्ध धर्माचाच प्रचार आहे. जपानात आठव्या शतकात बांधलेला एक मठ असून त्यात बौद्धधर्मग्रंथातील सुवर्णप्रभास, महावैपुल्य, ब्रह्मजाल वगैरे सूत्रांचीं पांच हजार लिखितें सांपडलेलीं आहेत. हे लेख चटयांवर कोरलेले आहेत. या सर्वांपेक्षा चीनमधील बौद्ध धर्माच्या प्रसाराची हकीकत अधिक मनोरंजक असल्याने तिकडेच आता वळू या. मात्र तत्पूर्वी सयाम, अनाम, कंबोडिया, मलाया, सुमात्रा, जावा, बलि, बोर्नियो वगैरे ज्या भागातून आपण आतापर्यंत हिंडलों त्या भागातील संस्कृतिप्रसाराच्या कार्याचे महत्त्व नीट ध्यानीं ठसवून घेण्याकरिता कांहीं मुद्याकडे विशेष लक्ष देऊ या.

पूर्वद्वीपांचें सिंहावलोकन

या वसाहती ज्याला पूर्वेकडील द्वीपकल्प म्हणतात त्या व त्याच्या आसपासचा प्रदेश व बेटे यातील वसाहती होत. या सर्व भागाला प्राचीन काळीं सुवर्णद्वीप ही संज्ञा होती. त्यातील अनेक राज्यांना एका छत्राखालीं आणण्याचा पराक्रमही कलिंग प्रांतातील शैलेंद्र नांव धारण करणाऱ्या राजानीं केला होता. त्याचें साम्राज्य ७ ते १४ शतकापर्यंत टिकलें. चौदाव्या शतकानंतर हा प्रदेश कांहीं काल इस्लामी संस्कृतीच्या अमलाखालीं होता व अलीकडे खिस्ती युरोपियन अमलाखालीं आला आहे. यामुळें एके काळीं तेथें हिंदी संस्कृति नादत असेल अशी शंकाही येण्याचें कारण नव्हतें. पण बाह्यतः नष्टप्राय झालेली ही जुनी संस्कृति शिलालेख, वाङ्मय व रीतिभाती यात दडून कसाबसा काळ कठीत जिवंत राहिलेली होती. प्रभु रामचंद्राच्या आगमनाकडे दृष्टि लावून बसलेल्या अहल्येप्रमाणें ती शिलाबद्ध झालेली होती. सूक्ष्म दृष्टीच्या पंडिताचा रामस्पर्श होताच तिचें शिलारूप जाऊन ती मूळच्या वैभवात आता दिसूं लागली आहे. अद्याप तेथें पुनश्च पूर्वीच्या ऐश्वर्यानें नादण्याचे दिवस आले नसले तरी अल्लाउद्दिनाला पद्मिनीचें रूप आरशांत देखता आलें तसें तिचें पूर्व ऐश्वर्य शिलालेख व वाङ्मय यांच्या दर्पणांत स्पष्ट उमटलेलें आज पाहावयास

सापडत आहे. काहीं अवशेष तर आजहि टिकून आहेत. कंबोडियात राजाला अभिषेक होतो तो आजहि जुन्या वैदिक पद्धतीप्रमाणे होतो. बाकू नावाचे लोक आजहि आपणास ब्राह्मण लोकाचे वशज म्हणवितात. सयाममधील संस्कृति ही ब्राह्मणी संस्कृति म्हणूनच ओळखली जाते. सयामच्या दक्षिणेस असलेल्या कम्बोडियात धार्मिक संस्कार अद्यापिहि ब्राह्मण करतात. गावाची नावे आजहि अयोध्यापूर, कांचीपुरी, धर्मनगरी अशा स्वरूपात आढळतात.

पण वैदिक सनातनीयानी वसाविलेल्या या वसाहतींचें खरे स्वरूप मुख्यतः वाङ्मय व शिलालेख याच्या तोडूनच समजून घेतले पाहिजे. सयामच्या राष्ट्रीय वाचनालयात पाच हजार संस्कृत ग्रथ आहेत म्हणे ! यावरून साधनवैपुल्याची कल्पना येईल. हे वसाहतीकरण हा प्राचीन भारतीय इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग होय. या वसाहतीकरणाचा व आक्रमणाचा मुख्य विशेष म्हणजे हे आक्रमण, तारतम्याने बोलावयाचें तर, सांस्कृतिक आक्रमण होते हा होय. पूर्वेकडील बेटात व द्वीकल्पात वैदिक आर्यांनीं वसाहत केल्यानंतर या वसाहतींचा व मायभूमि जी भरत-भूमि याचा फारसा संबंध उरला नाहीं. इतर देशातील वसाहतीकरण पाहिले असता त्याचे पर्यवसान मुख्यतः मायदेशाला पोसण्यात होत आलेले दिसून येते. दुसऱ्या देशात जावे, तेथील मूळ रहिवाशाना समूळ नष्ट करावे किंवा गुलाम करून सोडावे व व्यापारी रीत्या देश धुऊन लुटून न्यावा ही आजच्या पाश्चात्य वसाहतीकरणाची रीत होय. पण प्रस्तुतच्या वसाहतीकरणाचा प्रकार हा सामान्यतः कन्या सासरी जाऊन नादती होण्यासारखा होता. कन्या सासरी नादत असलेली पाहण्यातच आई-बापास आनंद होत असतो. तिच्यापासून ते काहीं अपेक्षा ठेवीत नाहींत. तिचा संबंध उरतो तो ती होऊन कधींमधीं माहेरी येईल व आपल्या भावंडाना खाऊ देईल तेवढाच. असाच प्रकार येथें होता. वसाहतींतील काहीं राजेंद्रानीं मायभूमींत काही धर्मादाय केलेला आढळतो. कडार किंवा श्रीमोज येथील अकराव्या शतकातील चूडामणिवर्मन् यानें चोल राजाच्या परवानगीनें नेगापट्टण येथें एक विहार बाधला व त्याचा पुत्र मार विजयोत्तुंगवर्मन् यानें दोन गावें विकत घेऊन विहाराला लावून दिलीं

असा तामीळ वाङ्मयात उल्लेख सापडतो. तसेंच नालंद येथील सुप्रसिद्ध विद्यापीठास चंपाधीशानें कांहीं गांवें लावून दिलीं होतीं अशाविषयीं बंगालचा राजा बालादित्य याचा शिलालेख उपलब्ध आहे. चंपा-देशचा एक राजा गंगाराज यानें राजपदाचा त्याग करून मायभूमीस येऊन गंगातटाकीं देह ठेविला अशाविषयीं चंपा येथील लेख साक्ष देत आहे.

भरतखंडातून या वसाहतींत मधून मधून विद्वान् ब्राह्मण व व्यापारी जात व त्याच्याकरवीं दोन देशांतील दळणवळण चालू राही. हजार दीड हजार वर्षे हे दळणवळण सुरू होते. एवढ्या दीर्घ कालात नेहमींच व्यवहार सुरळीत चालणे अशक्यच. अर्थात् एकदोनदा खटके उडालेले दिसतात. वसाहतीचा हा प्रदेश एकीकडे बंगाल व दुसरीकडे मद्रास या प्रांतांशीं निकट आहे. यामुळें या दोन प्रदेशांशीं त्याचा संबंध विशेष येई. त्याचा परिणाम म्हणून कांहीं कटकटी उत्पन्न होत असाव्यात. उदाहरणार्थ, नेगा-पट्टण येथें विहार बांधणाऱ्या श्रीभोज देशच्या राजाचा वर उल्लेख केला, त्याच्या पुत्रावर दक्षिणेंतील चोलराजा राजेंद्र यानें स्वारी केल्याचें तामीळ ग्रंथीं नमूद आहे. उलट बंगालमध्ये दिनापूर जिल्ह्यातील एका मंदिर लेखात (सन ९६६) कन्नोजाधिप गौड राजानें चंद्रमौलीचें मंदिर बांधलें असा मजकूर आहे. त्यावरून कंबोडियाच्या राजानें बंगालचा पूर्वोत्तर भाग जिंकला असावा असे अनुमान काढलें जाते. तसेच कलिंगांतून मलायात जाऊन साम्राज्य स्थापन केलेल्या शैलेंद्रावर दक्षिणेकडील चोल राजानें १०१७ मध्यें स्वारी केली. असले प्रसंग सोडले तर मायलेकींचे संबंध नीट असा-वेत असे दिसतें. मधून मधून विद्वान् ब्राह्मण या वसाहतींत जात व कधीं कधीं वसाहतीकडून भरतखंडात वकीलहि येत; पण भरतखंडातील राजे-लोकांनीं या वसाहतीकरणाकडे फारसें लक्ष दिलेलें नाहीं. तिसऱ्या शतकात कंबोडियाचा राजा चंद्रवर्मा याच्या कारकीर्दीत भरतखंडातून एक व्यापारी तेथें गेला होता. त्याच्या तोंडून भरतखंडाचें वैभवशाली वर्णन ऐकून चंद्रवर्म्यानें आपला एक वकील भरतखंडास पाठवून दिला. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानात मुरुंड नावाचे राजे राज्य करीत होते. वकील त्या राजाच्या दरबारीं पोहोचल्यावर त्यानें आपल्या देशात भारतीय संस्कृतीची कशी जोपासना केली जाते याचें सविस्तर वर्णन केलें. मुरुंड राजाला ही

स्थिति अपरिचित होती म्हणून, चिनी बखरकार लिहितो कीं, राजा उद्-गारला, 'समुद्राच्या पैलतीरीं असले आपले लोक राहतात तर !' यावरून राजे लोकानीं या वसाहतींची विशेष दखलगिरी बाळगलेली दिसत नाहीं. वसाहतकारहि वसाहतींतच कायमचे स्थिर झाले. असें असताहि तेथें त्यानीं भारतीय संस्कृतीच्या सर्व अंगोपागांचा प्रसार केला व तो देश भारतमय करून सोडला.

एतद्विषयक प्रथम दोन गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत त्या ह्या कीं, भरतखंडांतून येऊन तेथील राज्यसंस्थापक स्थिर झाल्यावर त्याना मायभूमीकडून कुमक वगैरे तर मिळाली नाहींच, पण तिचा फारसा संबंधहि उरला नाहीं. अशा स्थितींत सामान्यपणें जेतेच बहुधा जितामध्यें विरून जातात. यांचीं कनिष्कादि काहीं उदाहरणें पुढील एका प्रकरणांत येतील. पण सुवर्णद्वीपात तसे घडलें नाहीं. या द्वीपकल्पातील वसाहत-वाल्याविषयीं दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, त्यानीं आपल्या संस्कृतीचा प्रसार जो केला तो दुसऱ्या एका संस्कृतीशीं लढून, तीवर मात करून, केला ही होय. ज्या प्रदेशात त्यानीं वसाहती वसाविल्या त्या प्रदेशातील मूळ रहिवाशाची संस्कृति अगदींच खालच्या दर्जाची नव्हती. पण त्याहीपेक्षा विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंडोचायनातील भारतीय वसाहतवाल्याना तेथें आधींच घुसण्याचा प्रयत्न करीत असणाऱ्या चिनी संस्कृतीशींहि टक्कर द्यावी लागली. काहीं काल या प्रदेशात दोन्ही संस्कृतींचा लढा सुरू होता; पण चीनला हा प्रदेश जवळ असताहि म्हणजे मायदेशाची मदत हरघडी मिळण्यासारखी असताहि व उलटपक्षीं भारती-याना बाहेरून समुद्र ओलांडून यावे लागत असताहि या द्वीपकल्पातील या संस्कृतियुद्धात विजयश्रीनें भारतीय वसाहतवाल्याच्याच गळ्यात माळ घातली व तेणेंकरून भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची पताका उभवून धरली !

चिनी लोकाशीं युद्धाचा प्रसग असल्यानें भारतीयाचें चिनी द्वीपकल्पां-तील वसाहतीकरण अगदींच सामोपचारानें झालें असें म्हणता येत नाहीं. काहीं प्रदेशात तरी त्याना आपल्या प्रभावशाली शूळाचा उपयोग करावाच लागला असावा. कम्बुज किंवा कम्बोडिया येथें कौंडिण्य नावाच्या वीरानें प्रथम वसाहत कशी केली याविषयीं चंपा (अनाम) येथील सातव्या

शतकातल्या एका लेखात जी हकीकत आली आहे तिजवरून वरीलसारखें अनुमान निघते. शिलालेखकार लिहितो कीं, तत्र स्थापितवान् शूलं कौंडिण्यस्तद् द्विजर्षभः । अश्वत्थाम्नो द्विजश्रेष्ठात् द्रोणपुत्रात् अवाप्यतम् ॥ कौंडिण्य हा प्रथम येथें आला व त्याने द्रोणपुत्र अश्वत्थाम्यापासून मिळालेला शूळ येथे रोवला. सहाव्या शतकातल्या चिनी ग्रथामध्यें फुनान-(अनामचा एक भाग)विषयीं अशीच कथा आहे. या कथेप्रमाणे फुनानवर राणी राज्य करीत असता प्रुएन्टीन (कौंडिण्य) नावाचा एक राजपुत्र जहाजातून तेथे आला. ते पाहताच राणीने सैन्याचा जमाव करून युद्धाची तयारी चालविली; पण बदरावर जमाव जमत असता कौंडिण्याने एक तीर सोडून तीरावरील एक सैनिक मारला. ताबडतोब बदरावर गोधळ माजला. यावरून तीराचा उपयोग तेथील लोकाना माहीत नसावा असे दिसतें. कारण युरोपियनाची बंदूक पाहून नीग्रोची जशी गाळण उडाली तशीच कौंडिण्याच्या शरसधानानें राणीच्या सैन्याची गाळण उडाली. अर्थात् राणीने ताबडतोब कौंडिण्याचे वर्चस्व मान्य केले आणि कौंडिण्याने तिच्याशीं विवाह करून स्नेहग्रथी दृढ केली ! या कथावरून येथें भारतीय संस्कृति आली ती काहीं प्रसगीं पाठीशीं बाणाचे तूणीर बाधल्याशिवाय आली नाहीं असा तर्क सहजच निघतो. मात्र एकदा पाय रोवल्यावर तेथल्या लोकाशीं स्नेहसंबध जोडण्याचा उपक्रम अवलबिलेला दिसतो तो दोन तऱ्हानीं. एक म्हणजे तेथील प्राचीन राजवशातील राजकन्याशीं विवाह करणें; व दुसरा म्हणजे राजशासनाचा व्यवहार सस्कृतप्रमाणेंच तेथील ख्मेर भाषेत करणे ह्या होत.

परमुलखांत संस्कृतीची जोपासना

विवाह व भाषा अशा दोन्ही रीतींनीं ख्मेरसंस्कृति भारतीय संस्कृतीत घुसत असता भारतीय संस्कृतीचीं सर्व अगोपागें या वसाहतवाल्यानीं हजार वर्षेपर्यंत मूळच्या अविकृत स्वरूपात राखलीं हें आश्चर्य होय. देवदेवतें, व्रतनियम, भाषा, पोषाक, कायदेकानू, समाजरचना हीं जीं संस्कृतीचीं अनेक अगें त्या सर्वांत भारतीय वळण दहा शतकें कायम राहिलें. पहिली गोष्ट म्हणजे संस्कृत भाषेची निष्ठापूर्वक जोपासना चालू राहिली. ख्मेर भाषेशीं नित्य संबंध असताहि व राजशासनें दोन्ही भाषातून प्रसृत कर-

ग्याची परिपाठी असताहि या वसाहतवाल्यानीं संस्कृत भाषेची आराधना मोठ्या श्रद्धेने चालू ठेवली. चंपा वसाहतीत संस्कृत भाषेत लिहिलेले अनेक शिलालेख उपलब्ध झाले आहेत. त्यातील काहीं मजमुदार यानीं आपल्या 'चंपा' या ग्रथात उद्धृत केले आहेत. त्याची भाषा मोठी प्रौढ व अलंकारिक आहे. वर कौडिण्यविषयक श्लोक दिला आहे. दुसरा एक श्लोक पाहा. हा एका देवीच्या देवळावर कोरलेला असून त्यात देवीच्या स्थापनेची हकीकत आहे. तो श्लोक असा:—

व्योमाब्धुराशितनुगे शकराजकाले देवीमिमा भगवतीं कलधौतदेहाम्।
एकादशेहनि शुचेरसितेर्कवारे सोऽतिष्ठिपद्भुवनमंडलकीर्तिकाक्षी ॥

या मदीर बाधणाऱ्या राजाचे नाव इंद्रवर्मा असें आहे. इतर राजाचीं नावें दिलीप, माधाता, पाडुरग, यशोवर्मा, राजेंद्रवर्मा अशीच भारतीय वळणाचीं आहेत. संस्कृत वाङ्मयातील सर्व प्रतिष्ठित ग्रंथाचे येथें अध्ययन होई. खुद्द राजे लोक वाङ्मयाचे भोक्ते किती प्रमाणात होते हे वरील इद्रवर्म्याच्याच उदाहरणावरून लक्षात येईल. त्याच्या वर्णनपर खालील श्लोक पाहा :

मीमासापट्तर्कजिनेद्रसूर्भिः सकाशिकाव्याकरणोदकौघः।
आख्यानशैवोत्तरकल्पमीनः पठिष्ठ एवेष्विति सत्कवीनाम् ॥

यावरून या राजाने मीमासादि षट्शास्त्रें, बौद्धजैन मतें, व्याकरण, आख्यानें, काव्ये वगैरे सर्व विषयाचें अध्ययन केलें होतें असें दिसतें. चपामध्ये वैदिक धर्माचा विशेष जोर होता. मधून मधून भरतखंडातील विद्वत्परिषदेच्या धर्तीवर शास्त्रसभा होत व त्यात स्त्रियाहि भाग घेत. दैवतें सगळीं भरतखंडातीलच. शिव हें प्रमुख दैवत. त्याचीं देवळें सर्वांत अधिक. शिवाय गणेश, कार्तिकेय, ब्रह्मा यांचीहि देवळें होतीं. उमा, सरस्वती, गंगा, लक्ष्मी या देवींचीहि आराधना होई. पण या वसाहतकाराचा उल्लेखनीय विशेष हा कीं नवीन मंदिरें स्थापितांना त्यांनीं मूळचीं ख्मेर लोकांचीं देवस्थानें नष्ट करून नवीन भारतीय देवस्थानें स्थापन केलीं नाहींत, तर मूळच्या ख्मेर दैवतांनाच भारतीय वळणाचीं नांवें दिलीं गेलीं. शंकराचें नांव देणें सर्वांत सुलभ. कश्याच्याहि पुढें ईश्वर, ईश हीं उपपदें लावलीं कीं काम भागतें. याचा

फायदा घेऊन भ्रातकेश्वर, जलागेश्वर वगैरे जुन्या देवस्थानाचें नवीन संस्करण करण्यात आलें. देवताप्रमाणें व्रतवैकल्येंहि या वसाहतवाल्यानीं कायम टिकविलीं. महाभारत-रामायणाचा नित्यपाठ पुष्कळ मंदिरातून नित्य चालू ठेवला. मधून महाहोम, लक्षहोम, कोटिहोमहि करण्यांत येत.

भारतीयाचा समाजरचनेचा एक प्रमुख विशेष जी वर्णसंस्था ती अर्थात् येथें रूढ होतीच. चातुर्वर्ण्याचे शुद्ध स्वरूप कायम टिकविणें परमुलखांत फार कठीण असतें. त्यातून परजातीय लोकाच्या कन्याशीं विवाह करण्याचा परिपाठ राजे लोकानींच घालून दिलेला होता. अर्थात् चातुर्वर्ण्यांत बराच घोटाळा उत्पन्न होत असला पाहिजे. पण चातुर्वर्ण्याची संस्था टिकविण्याची इच्छा प्रबल होती म्हणून कंबोडियांतील पाचवा जयवर्मा याच्या कारकीर्दीत व सूर्यवर्मा याच्या कारकीर्दीत पुन्हां एकदा अशी चातुर्वर्ण्याची दोनदा पुनर्घटना करण्यात आली असे उल्लेख आढळतात. एक दोन बाबींत कांहीं थोडें नावीन्य उत्पन्न झालेलें आढळतें. क्षत्रियाना एकंदरींत ब्राह्मणापेक्षांहि अधिक मान मिळे. चंपा येथील एका शिलालेखात राजाचें वर्णन आहे तें ब्राह्मणपुरोहिताग्रासनक्षत्रान्यनरपतिवृंदजुष्टचरणारविंदः म्हणजे इतर राजानीं व ब्राह्मण पुरोहित वगैरेंनीं ज्याचें पादसेवन केलें आहे असा हा राजा असें आहे. मरतखंडातही बौद्धधर्म हा ब्राह्मणापेक्षा क्षत्रियाना वरिष्ठ मानीत असेच. त्याचाच प्रभाव येथेंही पडलेला असावा. देवालयात पोषाक घालून जाण्याचा अधिकार फक्त राजाचा. देवाला देवालयसंस्थापकाचें किंवा ज्याच्या स्मरणार्थ देवालय बांधलें त्या राजाचें नाव देणें हा एक दुसरा प्रकार आढळतो. उदाहरणार्थ, कम्बुजातील यशोवर्मा राजानें बांधलेल्या दोन देवळांतील मूर्तीना आपला पिता व प्रपिता याचीं नावें इंद्रवर्मेश्वर व महापतीश्वर अशीं दिलेलीं आहेत. दक्षिण मारतातही हा प्रकार रूढ होता. चंपा वसाहतींतील राजे दक्षिणेंतून आले असल्यानें (वर्मा हें नांव दक्षिणेंतील राजाचें असतें) दाक्षिणात्यांची मागिनेय वारसाची चाल चंपा येथें चालू होती. मरतखंडांतील सर्व मतमतांतरांकडे लक्ष पुरविलें

जाई. मायभूमीशीं थोडाबहुत व्यापार चालूच असावा व कांहीं विद्वान् ब्राह्मण व श्रमण हेहि मधून मधून वसाहतींत जात. तिसऱ्या शतकात फुनान (अनामचा माऊ) राजाचा वकील गंगाकाठीं आला होता. त्याला यायला वर्ष लागलें. प्रवास फार लांबचा. तरी मधून मधून ये-जा असावीच. पाचव्या शतकात चंपा येथील राजा गंगाराज हा गादी सोडून गंगाकाठीं देह ठेवण्याकरिता भरतखंडात आला. उलट आठव्या शतकात अगस्त्य, दहाव्यात दिवाकर, बाराव्यात हृषिकेश, चौदाव्यात सर्वज्ञस्वामी असे विद्वान् वसाहतींत गेल्याचें आढळतें. या विद्वानाच्या द्वारें संस्कृतीची ज्योत पुन्हा पुन्हा प्रज्वलित होत असावी. कांहीं वेळा तर वसाहतींनीं मायभूमीला धडा द्यावा अशा तोलाचें धर्मग्रंथाचें अध्ययन वसाहतीमध्ये चालू असे. सुवर्णद्वीप अथवा सुमात्रा ह्या वसाहतीनें अकराव्या शतकात असेंच महनीय पद मिळविलें होतें. कारण विक्रमशिला विश्वविद्यालयातील प्रसिद्ध आचार्य अतीश हा बौद्ध ग्रंथाचें अध्ययन करण्याकरिता सुवर्णद्वीपातील आचार्य धर्मकीर्ति याजकडे जाऊन बारा वर्षें राहिला होता. इतक्या आस्थेनें तेथें संस्कृतीचें जतन करण्यात येत होतें.

भरतखंडातील कहाण्या, आख्यायिका, समजुती याहि सुमात्रात रूढ झाल्या होत्या. कंबुजाचा संस्थापक जो कौंडिण्य म्हणून मागें उल्लेखिलेला आहे त्याची कथा रामायणातील कथेच्या व अर्जुनाच्या कथेच्या धर्तीवर रचलेली आहे. इंद्रप्रस्थाचा राजा आदित्यवंश यानें आपल्या मुलाला वनवासास पाठविलें. भटकता भटकतां तो राजपुत्र काकमोक येथे आला व तेथील राजाचा त्यानें पराभव केला. एके दिवशीं संध्याकाळीं समुद्रकिनाऱ्यावर तो भटकत असता समुद्राला भरती येऊन तो चोहींकडून वेष्टिला गेला. पण नागराजानें त्याच्यावर कृपा करून समुद्र पिऊन टाकला, तेथें कंबोजवन निर्माण केलें व आपली कन्या राजपुत्रला अर्पण केली. दुसरी एक कहाणी अशी आहे कीं, सौरिवंग व वोरवंग असे दोन राजपुत्र होते. त्याच्या सावत्र आईनें राजाचे कान भरून त्याना फांशीची शिक्षा फर्माविली; पण मारेकऱ्यानीं दया करून त्याना राज्याबाहेर नेऊन सोडलें. पुढें ते भटकत भटकत दैववशात् दुसऱ्या राज्यात आले. तेथील राजा निपुत्रिक होता; व नवा राजा ठरविण्याचा समारंभ चालू होता. हे राजपुत्र

तेथें जाताच हत्तिणीनें त्याच्या गळ्यात माळ घातली व ते गजे झाले. देवालयात चित्रे काढीत तीं भरतखंडाप्रमाणे कालियामर्दन, सीताशुद्धि, मारीच मृग, गोवर्धनपर्वत वगैरेचीं; वाद्ये वाजवींत तीं मृदग, शख, भेरी वगैरे भारतीय.

भिन्न भिन्न धर्ममताची सागड घालण्याची भारतीयाची सहिष्णु व समन्वयाची वृत्तीहि वसाहतवाल्यानीं कायम राखली. वर इद्रवर्म्याचे वर्णन आले आहे त्यात मीमासादि दर्शनाप्रमाणे त्यानें जिनेद्रमुनीच्या मतांचेंहि अध्ययन केले होते असे आलेच आहे. तसेच जुनीं देवस्थाने नष्ट न करता त्याना नवीं नावें देण्यात येत याचाही उल्लेख वर केलाच आहे. शैववैष्णवातील भाडणे मिटविण्याकरिता हरिहराच्या मूर्तीची जी कल्पना भरतखंडात निघाली तीहि येथे सापडते. येथे हरिहराची मूर्ति करीत व हरिहराच्या नावानें लिंगहि स्थापीत. शकर-नारायण असे जोडदैवतहि मानीत. गयेला विष्णुपद आहे, सीलोनमध्ये बुद्धपाद आहे, त्याच्या धर्तीवर कंबोडियामध्यें शिवपदाची स्थापना करण्यात आली. तेथील राजाच्या अभिषेकाचे वेळीं येथील ब्राह्मण बाकू राजाचे डोक्यावर अभिषेक करतात व बौद्ध श्रमण प्रार्थना करतात.

दानधर्माची भारतीय परंपरा येथेंहि नजरेस पडते. देवालयाच्या शासनलेखावरून देवालयातील व्यवस्था व दातृत्व हे लक्षात येतें. कम्बुजातील बाराव्या शतकातील जयवर्मा हा मोठा बुद्धभक्त होता. त्यानें एक विहार बांधला. त्याला ३१४० गावें लावून दिलीं होतीं. या विहारात ९७९ स्नातक विद्यार्थी असून सेवेकऱ्याची संख्या ६६,६२५ अशी दिली आहे. याच राजानें १०२ आरोग्यशाला व ७९० मंदिरें बाधलीं व त्याच्या उत्पन्नाकरिता ८३८ गावें लावून दिलीं. नवव्या शतकातील यशोवर्म्यानें एक आश्रम बाधून गणेशाला अर्पण केला. त्याबाबत त्यानें जें शासनपत्र करून दिलें त्यावरून मंदिराच्या व्यवस्थेची कल्पना येते. शासनातील काहीं महत्त्वाचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत : राजा यशोवर्म्यानें या देवालयास देऊं केलेलीं मोत्यें, सोनें, गायी, अश्व, गज, दास, दासी वगैरेचा कोणीं अपहार करूं नये; अनाथांना अन्नवस्त्र द्यावें; धारातीर्थी पडलेल्यांचे

नावें पिंड द्यावे; शरणागताला आश्रय द्यावा; विद्यार्थ्यांना शाई, भूर्जपत्रें द्यावींत; वगैरे.[1] असो.

वरील सर्व हकीकतीवरून पूर्वद्वीपकल्पातील भारतीय संस्कृतीच्या जोपासनेची कल्पना येईल. या जोपासनेविषयीं हेंही आपल्या लक्षात येऊन चुकलेंच असेल कीं या संस्कृतिप्रसारात आणि जोपासनेंत वसाहतकाराची वृत्ति एकंदरीनें सहिष्णुतेची व संग्राहकतेची होती आणि बौद्धधर्मीयाच्या जोडीनें वैदिकधर्मीयानींहि महत्त्वाचा वाटा उचलला होता.

आता मागें सूचित केल्याप्रमाणें या प्रदेशातून बाहेर पडून प्रदक्षिणा घालीत चीनमध्यें प्रवेश करूंया.

चीनमधील धर्मप्रसार

आपल्या पूर्वजाच्या चीनमधील या संस्कृतिप्रसाराच्या कार्यावर नजर फिरविणें मोठें उद्बोधक आहे. हे संस्कृतिप्रसारक दोन तऱ्हेचे होते. एक धर्मप्रसारक व दुसरे वसाहत करून स्थायिक होणारे नागरिक वा व्यापारी. बौद्धधर्म शिकविण्याकरितां हिंदुस्थानची सफर करणाऱ्या चिनी प्रवाशांचीं नावें सर्वांच्या परिचयाचीं झालीं आहेत. पण बौद्धधर्माचा प्रसार करण्याकरिता हिंदुस्थानातून चीनमध्यें जाणाऱ्या धर्मप्रसारकाच्या नावाना पुरेशी प्रसिद्धि मिळालेली नाहीं. म्हणून प्रथम चीनमधील ह्या धर्मप्रसारकांचेंच कार्य पाहूं. चिनी ग्रंथकारानीं यासंबंधीं विस्तृत माहिती लिहून ठेवून आपणांवर मोठे उपकार केले आहेत. त्यानीं ह्या धर्मप्रसारकासंबंधानें जी माहिती लिहून ठेविली आहे ती पाहता उगीच चार दोन धर्मप्रसारक चीनमध्यें गेले असें नसून या धर्मप्रसारकाचा एक अखंड प्रवाह सुमारें दहा शतकें अव्याहत वाहत होता असे आढळून येतें ! या प्रवाहास सुरुवात इसवी सनाच्या सुरुवातीस झाली, व तो दहाव्या शतकापर्यंत अखंड वाहतांना दिसतो. त्यानंतर बौद्धधर्माची मायभूमि जी हिंदुस्थान तेथेंच बौद्धधर्म वठूं लागला व त्याच शाखाविस्तार इतरत्र होणें बंद पडलें.

हे धर्मप्रसारक चीनमध्यें प्रथम गेले तोही प्रकार अभिमानास्पद आहे. ते गेले ते तेथील राजाच्या विनंतीवरून व सन्मानपूर्वक निमंत्रणावरून

१. Cambodia by Chatergi.

गेले. त्याचा कार असा झाला कीं, इसवी सनाच्या पहिल्या शतकातील चीनचा राजा मिंग याला एके रात्रीं एक चमत्कारिक स्वप्न पडलें. त्या स्वप्नात त्यानें एक उंच, धिप्पाड व सुवर्ण-कांतिमान् असा पुरुष आकाशमार्गानें संचार करीत आपल्या प्रासादात शिरत आहे असें पाहिलें. सकाळ होताच राजानें आपल्या प्रधानास विचारलें, "या प्रकाराचा अर्थ काय ?" त्यावर प्रधानानें सांगितलें कीं, भारतवर्षात फो नावाचा एक सिद्ध पुरुष जन्मास आला आहे. त्याचा देह अंतरिक्षात संचार करीत असता आपण पाहिला असला पाहिजे." प्रधानाचें हें उत्तर ऐकून राजाला बुद्धधर्माचा अभ्यास करण्याची उत्कंठा लागली, व त्यानें ताबडतोब आपल्या पदरच्या काहीं पंडिताना बौद्ध-धर्माचा अभ्यास करावयास भारतवर्षात रवाना केलें. या पंडिताच्या विनंतीवरूनच बौद्ध धर्मोपदेशक चीनमध्यें जाण्यास प्रारंभ झाला. ही हकीकत अशाच स्वरूपांत निरनिराळ्या तेरा चिनी ग्रंथात आढळते असें तज्ज्ञानीं लिहिलें आहे.

पहिला बुद्धधर्मप्रचारक काश्यप

चिनी राजाचें निमंत्रण स्वीकारून धर्मप्रसारार्थ चीनमध्यें जाणारा पहिला धाडसी धर्मोपदेशक काश्यप मातंग हा होय. तो मग-प्रदेशवासी श्रमण असून चीनच्या राजाचें निमंत्रण आलें तेव्हां गांधारांत म्हणजे आधुनिक अफगाणिस्थानच्या प्रदेशांत राहत होता. चीनच्या राजाचें निमत्रण स्वीका-रून अफगाणिस्थान-तिबेटमार्गे चीनकडे प्रवास करणें हें त्या काळीं धाडसा-चेंच कृत्य होतें. प्रवासाचीं साधनें त्या काळीं हल्लींच्या मानानें अगदी अल्प. ज्या मार्गानें प्रवास करावयाचा तो मार्ग अर्धवट निर्जल ! दहाबारा मंडळी मिळून निघाली तर मुक्कामास पोंचेपर्यंत त्यांपैकीं अर्धी मृत्युमुखीं पडत असें अनेक चिनी प्रवाशानीं लिहून ठेवलेल्या वृत्तान्तावरून दिसतें. डोंगर चढावे लागत, दऱ्या ओलांडाव्या लागत, नद्याना पूल नसत, निरनिराळ्या हवामानाचे तडाखे सोसावे लागत. पण काश्यप डगमगला नाहीं. त्यानें हा अवघड प्रवास मोठ्या खुषीनें स्वीकारला व चिनांत बौद्धधर्माचा प्रसार करण्याचा पहिला मान मिळविला ! राजानें त्याचा यथोचित मानसन्मान

केला. त्याला राहण्याला एक स्वतंत्र मठ बाधून दिला व अनेक पंडितांना त्याचें शिष्यत्व स्वीकारण्यास सांगितलें.

ज्या देशात धर्मप्रसार करावयाचा त्या देशाची भाषा हस्तगत करणें ही धर्मप्रसारकाच्या कार्यांतील महत्त्वाची व अवघड कामगिरी होय. त्यांत पुन्हा चिनी भाषा ही सोपी नाहीं असे म्हणतात. पण काश्यपानें थोड-क्याच कालात ती हस्तगत केली व बौद्धग्रंथातील काहीं भागाचें चिनीमध्यें भाषांतर करण्यास जोरात सुरुवात केली. हें काम करीत अनेक वर्षे तो तेथे राहिला व शेवटी उतारवयात बौद्ध धर्माची घडी नीट बसलेली अव-लोकून सुखासमाधानानें तेथेंच त्याने देह ठेविला !

काश्यपाच्या मागे प्रसाराचे काम त्याच्याबरोबरच तेथें गेलेला धर्मरक्ष यानें चालू ठेविलें. याची धर्मप्रसारलालसा मोठी तीव्र होती. कारण तो चिनात गेला तोच मुळीं, ज्या राजाच्या पदरीं तो होता, त्याच्या मर्जी-विरुद्ध ! राजाची अनुमति मिळविता येत नाहीं असें आढळून आल्यावर त्याने गुप्त रीतीनें राजधानी सोडली, चीनचा रस्ता धरला व आपली धर्म-प्रसाराची मनीषा पूर्ण करून घेतली. काश्यप आणि धर्मरक्ष यानीं चीन-मध्ये जी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्यामुळें बुद्धधर्मानें तेथें कायमचें मूळ धरलें व भारतवर्षांतील बौद्धधर्मप्रचारकाना चीनच्या राजाकडून वारंवार निमंत्रणे येत गेलीं. त्या निमंत्रणानुरूप चीनमध्यें जाणारा एक अखंड प्रवाह सुमारे दहा शतकें अव्याहत राहिला.

काश्यप व धर्मरक्ष हे चीनमध्यें गेले ते मिंग राजाच्या कारकीर्दीत म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकात. त्यानंतर तिबेटी ग्रंथावरून पाहतां दुसऱ्या शतकात आर्यकाल, सुविनय, धर्मकाल, महाबल वगैरे अनेक प्रचारकानीं चीनची यात्रा केलेली आढळते. हिंदुस्थानप्रमाणें तिबेटमधूनहि चीनमध्यें उपदेशक जात, त्यात एक उपदेशक तेथील प्रधानाचा पुत्र होता. खुद्द राज्यपदावर लाथ मारून श्रमण होणारेहि क्वचित् चमकतात. त्यांत काश्मिरातील गुणवर्मा याचें नाव घेता येईल.

हे उपदेशक चीनमध्यें जाण्यापूर्वी म्हणजे बुद्धधर्माचा चीनमध्यें संस्था-पक होण्यापूर्वी तेथें कनफ्यूशियसचा जुना धर्म प्रचलित होताच. त्या धर्माच्या आचार्यांना या परदेशांतून येऊन मोठ्या मान्यतेस पावलेल्या

उपरी बौद्धश्रमणाविषयीं मत्सर वाटावा हें अस्वाभाविक नव्हतें. खुद्द राजघराण्यातहि दोन तट असत. कधीं जुन्या धर्माचा अभिमानी राजा तख्तनशीन असे, तर कधीं बौद्धधर्मानुयायी सिंहासनावर असे. अर्थात् सनातनी राजा गादीवर आरूढ झाला कीं बौद्ध गुरूंची राज्यातून हकालपट्टी होई; व त्यांना पुनश्च राज्यक्रांतीची वाट पाहत आजूबाजूच्या प्रदेशात कष्टानें कालकंठन करावें लागे. म्हणजे हिंदुस्थानातून जाताना कित्येकांना मानसन्मानानें जाण्याचें भाग्य लाभे. तरी तो मानसन्मान कायम टिकेल याविषयीं खात्री नसे. चीनमध्ये राज्यक्रांत्याहि वरचेवर होत. अशा वेळीं परदेशात मोठ्या मानखंडनेने जीवित कठण्याचा प्रसंग येई. एकदा चीनमध्यें गेल्यानंतर परत मायभूमीस यावयाचें तरी परवानगी लागे. अशी परवानगी न मिळाल्यामुळें वैतागून बिगरपरवाना निघालेल्या धर्मक्षेम नावाच्या आचार्याचा खून करण्यात आला. अर्थात् हे जे बौद्धश्रमण चीनमध्यें जात ते त्यांची धर्मश्रद्धा जाज्वल्य होती म्हणून जात; आणि याच कारणाने वरील परिस्थितीची जाणीव असताहि एकामागून एक जाणाऱ्या प्रवाशाची परंपरा अखंड राहिली.

या उपदेशकात जे काहीं विशेष बुद्धिमान् व कर्तबगार होते त्यात चौथ्या शतकातील **कुमारजीव** (३४४ ते ४१३ सन) याची गणना होते. हा चीनमध्यें गेला तो मोठ्या अकल्पित दैवघटनेनें. झाले असें कीं, मध्यआशियातील खोतान प्रातात तो राहत असता चीनच्या राजानें त्या प्रातावर स्वारी केली व तो प्रदेश जिंकून अनेक बंदिवान् धरून चीनला नेले. राजाला कल्पनाहि नसेल कीं या बंदिवानात एक असा बंदिवान होता कीं जो आपणासच आपल्या धर्मप्रेमानें बंदिवान करून सोडील ! हा बंदिवान म्हणजे प्रख्यात पंडित कुमारजीव हा होय. याच्या उपदेशाची पद्धत इतकी मोहक होती कीं थोड्याच काळात त्याची शिष्यसंख्या हजारावर गेली ! प्रसिद्ध चिनी प्रवासी फाहियान हा याच्या शिष्यांपैकींच एक होय. कुमारजीवानें चिनी भाषेवर इतकें अप्रतिम प्रभुत्व मिळविलें कीं, खुद्द चिनी ग्रंथकार लिहितात कीं प्रसिद्ध चिनी भाषांतरकार युवानच्वाग यांच्याहीपेक्षां कुमारजीवाचीं भाषांतरें सरस होत.

वर उल्लेख केलेला काश्मीरचा गुणवर्मा हाही याच शतकात चीनमध्यें

गेला. काश्मीरचा राजा निपुत्रिक निवर्तल्यावर राजाचा नातेवाईक म्हणून गादीवर बसण्याविषयीं प्रधानमंडळानें गुणवर्म्याला विनंति केली. पण आलेली राज्यलक्ष्मी लाथाडून त्यानें श्रमणवृत्तीचा अंगीकार केला. तो चित्रकारही होता. तो प्रथम सीलोनमध्ये गेला. तेथून जावा बेटाकडे त्यानें प्रयाण केलें. जावातील त्याच्या कामगिरीची कीर्ति ऐकून चीनच्या राजानें त्याला आणण्याकरिता काहीं श्रमणांचें एक शिष्टमंडळ जावाकडे रवाना केलें. हे शिष्टमंडळ जावाला पोचण्यापूर्वीच गुणवर्म्यानें जावा सोडून दुसरीकडे प्रयाण माडले होतें. पण दैववशात् त्याची नौका तुफानात सापडून भरकटली ती नेमकी चीनच्या किनाऱ्यालाच लागली ! चीनमध्यें त्यानें एक नवीन उपक्रम सुरू केला. तो म्हणजे भिक्षुणींचा संघ स्थापणे हा होय. त्यानें धर्मप्रसारकाचें काम करीत सर्व शेष आयुष्य तेथेंच वेचले.

याच्यामागून धर्मरुचि, रत्नमति, बुद्धशान्त वगैरे अनेक श्रमण चीनमध्ये गेल्याचा दाखला आढळतो; व हें प्रमाण अकराव्या शतकापर्यंत अखड चालू होतें. पहिल्या शतकात सुरू झालेल्या व अकराव्या शतकापर्यंत अविछिन्न चालू राहिलेल्या या धर्मयात्रेंत जे अनेक धर्मोपदेशक निरनिराळ्या शतकात सामील झाले त्यापैकीं काहीं प्रमुखांचीं नावें फणींद्र बोस[1] यानीं दिलीं आहेत; त्यांची संख्याच साठाच्या वर गेली आहे ! असो.

मध्य आशिया

चीन ओलांडून पश्चिमेकडे तोंड करून आपण चालूं लागलों कीं मध्य-आशियातील कडक थंडीच्या रेताडरणात आपणास रखडावे लागते. याही प्रदेशात भारतीयाच्या वसाहती एकेकाळीं नांदल्या होत्या. हा सर्व प्रदेश आज बहुतेक उजाड ओसाड झालेला आहे. पण हजार बाराशे वर्षांपूर्वी तो वसतीस योग्य असा होता. आणि त्या काळचे अवशेष जे सापडले आहेत त्यावरून तेथेंहि भारतीयानीं वसाहती वसविल्या होत्या असें निदर्शनास आलेलें आहे. आठव्या शतकानंतर येथील जलाशय काहीं कारणाने आटूं लागले व तेथील लोक घरे, देवळें, राजवाडे व चीजवस्त जेथल्या तेथें सोडून देऊन वाट फुटेल तिकडे प्राणरक्षणार्थ पांगले असावे. पाणी

१. Indian Teachers in China.

आटून गेल्यावर जिकडेतिकडे नुसते रेतीचे रण माजून राहिले. अशा प्रदेशात वादळी वारे सुटून रेती उडू लागली की रेतीचीं छोटीं छोटीं टेकाडें बनतात. अशा टेकाडाखालीं पूर्वीचीं शहरे पार गाडून गेलीं. पण रेतीनें खच्चून भरून दडपून गेल्यामुळे खालच्या खालच्या थरातील इमला व चीजवस्त हीं हवापाण्याच्या तडाख्यातून वाचून आयतीं बरींचशी शाबूत राहिलीं ! बाराशे वर्षांनंतर या योगसमाधींतून आधुनिक उत्खननविशारदांनी तिला आता बाहेर काढलें आहे. हे जुन्या शहराचे अवशेष सध्याच्या खोतानच्या आसपास विखुरलेले आहेत. त्यात बौद्ध स्तूप असून एका ठिकाणीं अजठ्यातील लेण्याप्रमाणे भितीवर काढलेलीं चित्रेहि सापडलेलीं आहेत. हिमप्रदेश असल्याने चित्रातील बुद्धाच्या अगात लोकरी कफनी आहे ! कुबेर व त्रिमुख याचे ठसे असलेल्या मुद्रा आढळल्या आहेत. एके ठिकाणीं वाहनावर बसलेल्या हिंदु देवताच्या मूर्ति आहेत. अधिक महत्त्वाची वस्तु म्हणजे सस्कृत व प्राकृत भाषातील ग्रथ सापडले आहेत ही होय. कविवर्य अश्वघोषाचीं तीन नाटकेंहि सापडली आहेत तीं याच प्रदेशात येथील लिखाण काहीं कागदावर, काहीं कातड्यावर व काहीं लाकडावर लिहिलेले असें आहे. चिनी यात्रेकरू याच मार्गाने पूर्वी हिंदुस्थानात येत जात व परत जाताना संस्कृत ग्रंथ घेऊन जात. तेव्हा संस्कृत ग्रंथाच्या उपलब्धीवरूनच केवळ येथें भारतीयाची वसाहत होती असे म्हणता आले नसते. पण धर्मग्रंथाच्या जोडीला राजशासने, खतपत्रे सापडलेलीं आहेत. त्याची भाषा संस्कृत व प्राकृत असून राजाचीं नावे भारतीय आहेत हें विशेष. पत्राच्या आरंभीं आज आपण राजश्रियाविराजित असे लिहितो तसे या पत्रात 'देवमनुष्यसंपूजित', 'प्रियदर्शन'[१] वगैरे गौरवाची भाषा आढळते. पत्राचा लखोटाही मोठा मजेचा असे. चिपळ्याच्या आकाराच्या दोन लाकडी फळ्या घेत. त्यावर आतील बाजूनें पत्र लिहीत. मग त्या एकावर एक बसवून फळ्यात पाडलेल्या भोंकातून दोरी घेऊन घट्ट आवळीत. शेवटीं दोरीच्या गाठीवर चिकणमाती थापून त्यात मोहोर करीत व वरील बाजूला पत्ता खोदीत ! असें हें त्या वेळचे टपाल असे. असल्या अनेक खतावरून इसवीशकापूर्वी दोन शतकें तक्षशिलेतील हिंदूंनीं येथें वसाहत स्थापन केली

१. Select Inscriptions p. 237 by D. C. Sircar.

असावी असें विद्वानांचें मत आहे.[1] या वसाहती सातव्या आठव्या शतकापर्यंत म्हणजे चागल्या एक हजार वर्षेपर्यंत नादल्या. त्यानंतर सृष्टिप्रकोपामुळे हा प्रांत उजाड झाला हें वर सांगितलेंच.

मध्यआशियाकडून म्हणजे उत्तरेकडून पुढे पश्चिमेकडे वळले म्हणजे अफगाणिस्थान, बलुचिस्थान याकडे आपण येऊन पोहोचतों.

अफगाणिस्थान, बलुचिस्थान व त्यालगतचा प्रदेश हे आज परकी वाटत असले तरी ते एके काळीं हिंदुस्थानाचेच प्रांत समजण्यात येत. चंद्रगुप्त व अशोक यांच्या राज्यात ते साक्षात् अंतर्भूतहि होते. तेव्हा तेथील संस्कृति ही हिंदी असल्यास नवल नाहीं. मात्र आज ते परके म्हणजे इस्लामी बनल्याने त्यांच्या पूर्वचरितांची आठवण गाडलेल्या अवशेषांच्या रूपाने उकरून काढावी लागत आहे. ही बुजलेली आठवण उकरून काढण्याचें काम फ्रेंच पुराणसंशोधकानीं काळजीपूर्वक बजावलें आहे. यानीं केलेल्या उत्खननात शेकडो स्तूप व बुद्धाच्या मोठमोठ्या प्रचंड उंचीच्या प्रतिमा व खरोष्टी लिपींतील धम्मपदाची प्रत अशा बहुमोल चिजा संशोधकाना सापडल्या आहेत. चिनी प्रवासी याच मार्गाने हिंदुस्थानात येत. त्यानींहि लिहून ठेवलें आहे कीं, वाटेंत अफगाणिस्थानात त्याना अनेक स्तूप, विहार आढळले म्हणून. सातव्या शतकात चेनसियांग या चिनी प्रवाश्यानें अफगाणिस्थान, तुर्कस्थान व इराण या प्रदेशात प्रवास केला. त्यांच्या प्रवासात त्याला बरेच स्तूप आढळले. आजही अफगाणिस्थानच्या डोंगरात अशा पुष्कळ प्रचंड शिला सापडतात, कीं ज्यावर बुद्ध यात्रेकरूंनीं आपले लेख कोरून ठेवले आहेत. लेणीं व गुहा तर शेकडों आढळतात. एकट्या बमियानच्या डोंगरात दोन हजार गुहा सापडल्या आहेत. अबुल फाजलने 'ऐने अकबरी'मध्यें लिहिलें आहे कीं अफगाणिस्थानातील पहाडात चागलीं बारा हजार लेणीं कोरलेलीं आहेत !

पुढें पश्चिमेकडे चालूं लागले म्हणजे आशिया मायनरचा प्रांत लागतो. तेथे अनेक ठिकाणीं लेख खोदलेल्या जुन्या विटा उपलब्ध झाल्या आहेत. त्या लेखात हिटाटी व मिटानी या दोन राष्ट्रांतील तह नोंदलेल्या काहीं

१. Sand-buried Cities of Khotan by M. A. Stein.

विटा आहेत. त्या तहात जी देवतांची नांवे आहेत त्यात मित्र, वरुण, इंद्र, नासत्या ही वैदिक देवताची नावें आहेत. तसेच संख्यावाचक एक, त्री, पंच या सज्ञाहि आलेल्या आहेत. हे लेख खिस्तपूर्व १४ व्या शतकातले आहेत. त्याच्यावरून या काळी वैदिक संस्कृति येथवर घसरली होती हे दिसून येतें.

आफ्रिकेतील संचार

आफ्रिका व अमेरिका या खंडात भारतीयानीं मुशाफरी व वसाहती केल्याचाहि पुरावा गोळा करण्यात आला आहे. प्रथम आफ्रिकेच्या उत्तरभागातील ईजिप्तकडे दृष्टि वळविली तर हिंदूंनीं ईजिप्तवर राज्यच केलें असावें असें वाडेल नावाच्या एका पंडिताचे मत ऐकावयास सापडेल. सगराच्या साठ हजार पुत्रानीं समुद्र ओलाडून ईजिप्तमध्यें राज्य स्थापलें असावें व पहिला फारोह अथवा प्रभु अश्वमंज हा खिस्तपूर्व २७०४ मध्यें ईजिप्तच्या गादीवर बसला असावा असें तो म्हणतो (ईजिप्शियन सिव्हिलिझेशन). खुद्द आफ्रिका खंडाशीं प्राचीन कालापासून दळणवळण दाट होतें. 'आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्याचा छोटा इतिहास' या ग्रंथामध्यें ग्रंथकार हॉलिंग्स्वर्थ यानें त्याची माहिती दिली असून तो लिहितो कीं, 'हिंदूचें आफ्रिकेशीं नुसते व्यापारी दळणवळणच नव्हतें तर ते पूर्वकिनाऱ्यावर वसाहती करून राहिले होते.' ग्रीक पेरिप्लस या नावाच्या ग्रथात इसवी सनाच्या पहिल्या शतकातील सफरीचे वर्णन आहे. त्यात आफ्रिकेच्या मोंबासा बंदराचें वर्णन करताना लिहिलें आहे कीं, 'ह्या महासागराच्या पलीकडे असलेल्या हिंदुस्थानच्या पश्चिमकिनाऱ्यावरील मालानें भरलेलीं गलबतें येथें हमेश येत असतात व त्यातून लोखंड, कापड, गहूं, तादूळ, तूप व साखर हे पदार्थ येथील किनाऱ्यावर उतरविले जातात.' तेराव्या शतकातील मार्को पोलो या सुप्रसिद्ध प्रवाशानेंही मोबासाचें वर्णन करिताना हिंदु व्यापाऱ्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे.

नुसतीं व्यापारी बंदरेंच नव्हे तर आफ्रिकेच्या आतील भागही हिंदूंना परिचित होता; व त्यांचें वर्णन पुराणात आलेलें आहे. याविषयीं पूर्व-आफ्रिकेची पाहणी करण्याकरितां दहा-बारा वर्षांपूर्वी नेमलेल्या हिल्टन यंग कमिशननें आपल्या अहवालांत लिहिलें आहे कीं, 'हिंदुस्थान व पूर्व-

आफ्रिका याचा संबंध अत्यंत प्राचीन आहे. पुराणातील उल्लेखावरून असें स्पष्ट दिसतें कीं, प्राचीन हिंदु लोकाना येथील भूप्रदेशाची व त्यात राहणाऱ्या लोकाची बिनचूक माहिती होती.' नाईल नदीच्या उगमाचा संशोधक स्पेक लिहितो कीं, 'पूर्वआफ्रिकेच्या ह्या भागातील नद्या, तळीं इत्यादि जलाशयासंबंधीं माझें पूर्वीचें सर्व ज्ञान प्राचीन हिंदूंकडून प्राप्त झालें होतें. उलट खुद्द इजिप्शियन लोकाचें या त्याना पवित्र असणाऱ्या नदीच्या उगमाचे ज्ञान निव्वळ काल्पनिक थापेबाजी होती.' हिंदु लोक आफ्रिकेंत बराच काळ वसाहती करून राहिले असले पाहिजेत याला आफ्रिकेंतील स्वाहिली भाषेचाहि पुरावा देण्यात आला आहे. या भाषेवर सस्कृत भाषेचा पुष्कळ परिणाम झालेला असावा. स्वाहिलींतील पुष्कळ शब्दाचें संस्कृत शब्दाशीं विलक्षण साम्य दिसून येतें. उदाहरणार्थ, सस्कृत शुक, सिंह, कुक्कुट, तुंड व त्याच अर्थाचे स्वाहिली कुसुकु, सिंबा, कुकु, टुंबो हे शब्द पाहा. आफ्रिकेंत वसाहती करणारे हे लोक प्राचीन काळीं वाडेबुली या नावानें ओळखले जात व ते डेबुली म्हणजे दाभोळ बंदरचे राहिवासी असावेत. त्यानीं नारळी पोफळींचीं झाडे आफ्रिकेंत नेलीं असावींत असें हॉलिंग्स्वर्थ म्हणतो.[1]

अमेरिकेंतील भारतीय

आता शेवटीं वसाहतीकरणाच्या या प्रयोगातील अतिदूरवरच्या प्रदेशाचा उल्लेख करावयाचा राहिला तो अमेरिका खंडाचा होय. प्राचीनभारतीय लोक हे व्यापाराकरिता व वसाहत करून स्थायिक होण्याकरिता अमेरिकेसारख्या पृथ्वीच्या दुसऱ्या टोकास असलेल्या खंडातहि गेले होते याविषयीं तर्क चालविण्याइतका पुरावा संशोधकानीं गोळा केला आहे. अमेरिकेंत मध्य-अमेरिका, मेक्सिको व पेरू हीं संस्कृतीचीं तीन मोठीं केंद्रें होतीं. आपल्या पुराणांतून या अमेरिका खंडाला किंवा, सबध खंडाला म्हणण्यापेक्षां, अमेरिकेच्या पश्चिमकिनाऱ्यावरील कोकणपट्टीसारखा जो भाग आहे त्या भागाला, पाताळ असे नाव दिलेलें असावें. पुराणात केवळ दह्यादुधाचे सागर वर्णिलेले आहेत म्हणून त्यातील सर्व भौगोलिक वर्णन हें काल्पनिक व

१. ग. श. गोखले, महाड, सह्याद्रि, एप्रिल १९३७.

कुचकामाचे होय अशी एके काळीं त्याची कुचाळी केली जात असे. पण पुराणाचा सखोल अभ्यास होऊं लागल्यावर ही कुचाळीची वृत्ति मावळली आहे, व पुराणातील भौगोलिक वर्णनें हीं कल्पनेने पुष्कळसा रंग भरलेलीं असलीं तरी त्या वर्णनाची मूळ उभारणी सत्यसृष्टीवर व साक्षात ज्ञानावर केली आहे हे संशोधकाच्या ध्यानीं येऊ लागलें आहे. दुधाचे व दह्याचे सागर म्हणजे दुधाप्रमाणें व दह्याप्रमाणें दिसणारे अशा अर्थाने हे शब्द घेतले पाहिजेत. ताम्रडा समुद्र, पीतसमुद्र हे शब्द असेच नाहीं का वापरीत ?

पुराणातील पाताळाच्या वर्णनात तो प्रदेश नागाचा होय असे वर्णन येते आणि अमेरिकेच्या मेक्सिको वगैरे भागातहि सर्प फार प्रमाणावर आजहि आढळतात. मेक्सिकोंत राहणाऱ्या या मूळच्या लोकाचा स्पॅनिश लोकानीं नायनाट केला, ग्रंथ जाळून टाकले, देवळें उध्वस्त केलीं, तरी त्याच्या संस्कृतीच्या अनेक खुणा आजच्या त्याच्या सामाजिक व धार्मिक जीवनात आणि पुराणवस्तु खात्याने जमाविलेल्या प्राचीन अवशेषात आजहि आढळून येतात. युरोपियन लोकाचे पाय अमेरिकेस लागण्यापूर्वी तेथील मूळचे जे राहिवासी होते त्याना त्यानीं ताम्रभारतीय (रेड इंडियन्स) असें नाव दिले. यातील भारतीय हा शब्द देताना यदृच्छेने दिला गेला असला तरी सशोधनाने तो आता परमार्थी खरा असल्याचें ठरविले आहे. कोलंबसाने पंधराव्या शतकात अमेरिकेचा शोध लावला त्या वेळीं तो मूळ भरतखंडाच्या शोधासाठी निघाला असल्यामुळें अमेरिका खंड दृष्टीस पडताच भरतखंडच आपणास सापडले या भ्रमानें त्या खंडातील ज्या भागात तो उतरला त्या भागाला हिंदुदेश असेच त्यानें नाव दिलें. पुढे चूक कळून आल्यावर याच प्रदेशाला 'पश्चिम' हे विशेषण जोडून पश्चिम हिंदुदेश म्हणूं लागले. कोलंबसाच्या हातून नामकरणाबाबत काकतालीय न्यायाने जी गोष्ट घडली ती आज संशोधनानें सत्यकथा ठरविली आहे. त्याचबरोबर असेंहि सिद्ध झालें आहे कीं, अमेरिका खंड आधुनिक कालात शोधून काढण्याचे श्रेय कोलंबसाचें असलें तरी प्राचीन काळीं तें खंड शोधून काढण्याचें श्रेय भारतीयांचें आहे व त्यांनीं हा शोध ख्रिस्ती शतकापूर्वी कित्येक हजार वर्षे लावला असावा.

यासंबंधीं अमेरिकेंतील मेक्सिकन सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्यानें मानवी संस्कृतीच्या प्राचीनतम स्वरूपाचा अभ्यास करणाऱ्या हेविट, मॅकेन्झी वगैरे पाश्चात्य विद्वानानीं जो पुरावा गोळा केला आहे त्यावरून भारतीयानीं फार प्राचीन काळीं अमेरिकेंत येऊन वस्ती केली असली पाहिजे, व आज अमेरिकेमध्यें ताम्रभारतीय म्हणून ओळखले जाणारे लोक हे या प्राचीन भारतीयाचेच वंशज असावेत असे मेक्सिकन पुराण-संशोधन खात्याचें मत आहे.[1]

तीस-पस्तीस वर्षांपूर्वीच रावबहादूर चिंतामणराव वैद्य यांनीं 'रामायणाचें गूढ' या नावाचा जो इंग्रजी ग्रंथ लिहिला होता त्यामध्यें लंकेतील राक्षस आणि अमेरिकेतील मेक्सिको प्रदेशातील रहिवासी हे एकाच वंशाचे असावेत असे मत माडले होते. रामायणात रावणाची वंशावळ देताना सालकटकटा या नावाच्या राक्षसीशीं विद्युत्केशाचा विवाह होऊन सुकेश, सुकेशापासून सुमालि, पुढे कैकसी व रावण अशी वंशावळ दिली आहे. यातील सालकटंकटा हा शब्द संस्कृत भाषेतील नसून परभाषेतील असावा व मेक्सिकोच्या प्राचीन इतिहासात ज्या अर्थी या शब्दाशीं समान असा सीकोटेंकटल असा शब्द आढळतो त्या अर्थी लंकेंतील राक्षस आणि मेक्सिकोतील रहिवासी हे एकाच वंशाचे असावे असे अनुमान वैद्य यानीं बाधले होतें. हे अनुमान अयथार्थ नव्हतें हें ठरविणारा बराच पुरावा आता उपलब्ध झालेला असून त्यावरून नुसत्या लंकेतीलच नव्हे तर भरतखंडातील लोक मुशाफरी करीत करीत लाब दूरवर अमेरिकेपर्यंत व्यापार वगैरे निमित्तानें जात असत असे मानण्याला आधार मिळाला आहे.

स्पॅनिश लोकानीं जेव्हा अमेरिकेंतील रहिवाशाचा नायनाट केला तेव्हा मेक्सिको प्राताचा शेवटला राजा मॅटेझूमा यानें स्पॅनिश सेनापति कार्टेझ याला जी स्वतःच्या वंशासंबंधीं हकिकत सागितली तीमध्यें आपण या देशींचे मूळचे स्थायिक नसून बाहेरून उत्तरेकडून पूर्वेकडून येऊन येथें स्थायिक झालेले आहों असें सागितलें पण नक्की कोठून तें मात्र

१. Hindu America by Chamanalal.

सांगितलें नाहीं. मग सातासमुद्रापलीकडे राहणारे व शेकडों वर्षें ज्यांचें दळणवळण साफ तुटलेलें आहे असे भारतीय व अमेरिकेतील ताम्र-भारतीय हे एकमेकांचे जातभाई होत हें कशावरून ठरविण्यात येतें ? तर असलें एकजातीयत्व ठरविण्याचे साधन म्हटलें म्हणजे या दोन जातींचे आचारविचार, धर्मसमजुती, शास्त्रकला, यांतील बेधक साम्य हें होय. या साम्यांपैकीं कांहीं बाबी अशा असतात, कीं त्या दोन्ही ठिकाणीं स्वतंत्रपणें निर्माण झाल्या असाव्या अशी उपपत्ति त्याच्याविषयीं मांडता येते. पण दुसऱ्या कांहीं बाबी अशा असतात कीं वरील उपपत्तीनें समाधान होत नाहीं. अमेरिकेमधील ताम्रभारतीयामध्यें भरतखंडातल्या-प्रमाणें प्रेताचें दहन करण्याची व सतीची चाल होती. चारशें वर्षांपूर्वी शेवटच्या इंका राजाच्या सर्व बायका सती गेल्या. तेथील विद्यार्थीहि आपल्याकडील गुरुकुलाच्या धर्तीवर गुरुगृहीं बरींच वर्षें राहून गुरूची सेवा करीत. त्याची व्यापारी पेठ वसविण्याची पद्धतहि आपल्यासारखीच असे. गळ्यात घालण्याचे सुवर्णाचे हार आपल्याइकडील हारासारखेच असत. खाणें-पिणें आपणाप्रमाणेंच डाळ, चपाती. आता हे प्रकार स्वतंत्र रीतीनें उद्भवणारच नाहींत असा आग्रह धरणे वाजवी होणार नाहीं वरील-पेक्षा अधिक निर्णायक पुरावा म्हणजे दैवतविषयक होय. तो पुरावा म्हणजे अमेरिकेतील ताम्रभारतीयामध्यें गणेश[1] व इंद्र हीं दैवतें सापडतात हा होय. आपल्याप्रमाणें ते चार युगेंहि मानीत व त्या चार युगाचे मान-लेले श्वेत, रक्त, पीत आणि कृष्ण हे वर्णहि त्याचे आमचे ततोतंत जुळतात. त्याच्या शिल्पात आढळणारा पुरावा तर वरीलपेक्षाहि बळकट आहे. तो पुरावा म्हणजे त्याच्या शिल्पात हत्तीच्या प्रतिमा सापडतात हा होय. या बाबतींत विशेष लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे हत्ती हा प्राणी अमेरिकेंत मुळींच सापडत नाहीं ही होय. तेव्हा त्याची प्रतिमा करण्याची कल्पना कोठून तरी बाहेरूनच आली असली पाहिजे हें उघड आहे. बाहेर हत्ती सापडतात ते दोन ठिकाणीं. एक म्हणजे

---

१. गणेशपंथाचा प्रसार भरतखंडाच्या आजुबाजूला फार दूरवर झाल्याचा वृत्तान्त 'पुरुषार्थ' मासिकाच्या एका गणेश विशेषांकांत आला आहे तो जिज्ञासूंनी पाहावा.

आफ्रिकेमध्यें आणि दुसरे हिंदुस्थानात. पण हे दोन्ही ठिकाणचे हत्ती एकाच जातीचे नसून त्याच्या शरीराच्या ठेवणींत काहीं फरक आहेत. त्यातील मेक्सिकोंतील शिल्पात जो हत्ती सापडतो तो आफ्रिकेंतल्या जातीचा नसून हिंदुस्थानातल्या जातीचा आहे असें सागतात.

पण एवढ्या दूरवर लोक जात असतील कशाला व कसे ? तसेच कांहीं तरी घबाड सापडत असल्याशिवाय इतक्या लाब कोण प्रवास करील ? तर तसें घबाड होतेंहि पण. ज्या घबाडावर पुढें पंधराव्या शतकात युरोपियन लोकाच्या उड्या पडल्या तें घबाड म्हणजे सुवर्णाच्या खाणी हे होय. भरतखंडातील निरनिराळ्या व्यापारी चिजा तेथे नेऊन भारी किंमतीस विकावयाच्या व तेथील सुवर्ण परत स्वदेशीं आणावयाचें असा प्रकार असावा. अमेरिकेच्या पश्चिमभागातील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशाचें हवामानही भरतखंडातील हवामानासारखेंच असल्यानें पुष्कळाना तेथें स्थायिक व्हावें असेंहि वाटलें असेल.

आता हे लोक इतक्या दूरवर गेले असावेत तरी कसे याविषयीं तुम्हास अचंबा वाटेल. तेव्हा हे सागितले पाहिजे कीं ते आजच्यासारखे महासागर सर्व ओलाडून जात नसत; तर ब्रह्मदेशातून बाहेर पडून चीन ओलाडून सैबेरियापर्यंत खुष्कीने जावयाचे व तेथून पुढे पॅसिफिक महासागरातून अमेरिकेतील पश्चिम किनाऱ्यावर उतरावयाचे असा हा मार्ग होता. येथें महासागर या शब्दालाही बिचकण्याचें कारण नाहीं. कारण सैबेरियापासून कॅनडापर्यंत हा मार्ग पसरला आहे त्यात शेकडों बेटें विखुरलेलीं आहेत आणि या बेटाच्या आश्रयानें एका बेटावरून दुसऱ्या बेटावर असें करीत जावयाचें म्हटलें तर साध्या होडग्यातून जाणेंहि अशक्य नाहीं. दुसरा मार्ग म्हणजे मलाया द्वीपकल्पापर्यंत खुष्कीच्या मार्गानें जावयाचें व तेथून पुढें पॅसिफिक महासागर ओलाडण्यास आरंभ करावयाचा. ह्याहि मागात प्राचीन कालीं अनेक बेटें अस्तित्वात होतीं. अलीकडच्या काळीं मात्र त्यातलीं बरींचशीं पाण्याखालीं खचलीं आहेत.

साराश ब्रह्मदेश, इंडोचायना, सुमात्रा, जावा, फिलिपाइन्स, जपान, चीन, मध्य एशिया, अफगाणिस्थान, इराण, ग्रीस, रोम, इजिप्त, अमे-

रिका वगैरे त्रिखंड पालथें घालणारे होते आपले पूर्वज ! त्यांनीं आध्यात्मिक जग जसें धुंडाळलें होतें तसेंच ऐहिक जगाचाहि कानाकोपरा तपासला होता. परलोकावर लक्ष रोखल्यानें व्यवहाराला ते पारखे झाले होते ही समजूत कशी निराधार आहे हें पटण्यास आता प्रत्यवाय येणार नाहीं.

जगभर हिंडणाऱ्या लोकाचा अनेकाशीं संबंध येतो त्याची संकुचित वृत्ति नष्ट होते आणि मग साहजीकच कोठें ते परक्यांना आपली विद्या देतात तर कोठें परक्याची घेतात. अशा रीतीनें संस्कृतींचा संगम प्राचीन काळीं जो झाला त्याकडे आता वळूं या.

प्रकरण दहावें

प्राचीन संगमावरील देवाण-घेवाण

मागील प्रकरणीं पाहिल्याप्रमाणे जगभर संचार करणारे आपले पूर्वज हे कूपमंडूकवृत्तीचे नव्हते हें आता सांगावयास नकोच. त्यानीं बाह्यांना आपली विद्या दिली आणि जरूर तेथें त्याची उचललीहि. मात्र हें प्रारंभींच अभिमानाने सांगितले पाहिजे कीं, या देवघेवींत देकाराचा माग फार मोठा असून घेकाराचा अत्यल्प आहे. कारण आज युरोप खंडाला अखिल जगाच्या वर्धमान संस्कृतीचें केंद्र म्हणून जें स्थान प्राप्त झालें आहे तेंच गौरवाचे, अभिमानाचें स्थान एके काळीं हिंदुस्थानास लाभलें होतें. नव्या कल्पना, नवे प्रयोग, नवे आचार, नवे विचार, नवी राहणीसाहणी हीं सर्व आज प्रथम युरोपात जन्मास येतात आणि मग सर्व जगभर पसरतात. तीच स्थिति एके काळीं हिंदुस्थान अनुभवीत होतें. शास्त्र, कला, वाङ्मय, तत्त्वज्ञान या सर्वांचे केंद्र ही भरतभूमि होती. आज उच्च शिक्षणाकरिता जगाच्या सर्व भागातून विद्यार्थी युरोपमध्यें जातात तसे ते पूर्वी हिंदुस्थानात येत असत. बुद्धाच्या मायभूमीचें दर्शन घेण्याकरिता व धर्मग्रंथाचा अभ्यास व संग्रह करण्याकरिता आलेल्या युवान च्वंग, फा हियान वगैरे चिनी प्रवाशाचीं नावे सर्वविश्रुतच आहेत. आणि बुद्ध गया येथील पाच चिनी लेख दहाव्या शतकात आलेल्या काहीं प्रवाशाची स्मृति नित्य ताजी राखण्याची कामगिरी बजावीत आहेत. पण पूर्वेकडील चीनाप्रमाणें पश्चिमेकडील ग्रीस, इराण, बगदाद येथूनहि विद्यार्जनाकरितां ज्ञानभिक्षु येथें येत हें आर्जवून सांगितलें पाहिजे.

मागील प्रकरणीं धर्म, व्यापार, राजकारण यांच्या उद्देशानें भारतीयांनीं जग कसें पालथें घातलें याचें दिग्दर्शन झालें. त्यात आफ्रिका, अमेरिका वगैरे दूरच्या प्रदेशावर भारतीयानीं आपल्या संस्कृतीचा ठसा कसा उमट-

हा परिणाम तीन निरनिराळ्या काळीं घडून आलेला दिसून येतो पहिला म्हणजे प्राचीन ग्रीसच्या भरभराटीच्या काळीं- प्लेटो, ॲरिस्टॉटल, पायथागोरस याच्या वेळीं. तदनंतर ग्रीस व रोमच्या नाशोत्तर युरोपांत कांहीं काल तमोयुग जें अवतरले त्याच्या शेवटीं फिरून ज्ञानाचा उदय झाला तो सारासिनाच्या करवीं. पण हे सारासीन नुसते ज्ञानवाहक असून ज्या ज्ञानगंगेतील उदक ते नेत होते ती गंगा भरतखंडात वाहत होती. या सारासिनानीं भारतीयाचें हरविषयातील ज्ञान भरभरून आपल्या देशात नेलें आणि पुढे युरोपात त्याचा प्रसार केला. सारासिनांच्या हस्तें युरोपमध्यें भारतीयाच्या शास्त्रकलाचा प्रसार होण्याचा काल हा दुसरा काल होय. आणि तिसरा म्हणजे शें-दीडशे वर्षांपूर्वी संस्कृत भाषेचें मानवी संस्कृतीच्या इतिहासांतील मौलिक महत्त्व युरोपियनाना कळून आलें तेव्हा सुरू झाला तो. हा तिसरा काळ अद्याप चालूच आहे.

राजकीय घसट

पहिल्या म्हणजे ख्रिस्ती शकपूर्वकालासंबंधीं प्रथम हे सांगितलें पाहिजे कीं, फार प्राचीन काळापासून भरतखंडाचें ग्रीस, ईजिप्त आणि बाबिलोनिया या प्रांताशीं दळणवळण सर्रास सुरू होते. ग्रीकाचा भारतीयाशीं संबंध आला तो शिकंदराच्या स्वारीच्या वेळींच प्रथम आला असें नव्हे; त्याच्यापूर्वीहि त्याची चागली जानपछान होती. व्यापारानिमित्तानें इराणी आखातातून दर्यानें आणि अफगाणिस्थानातून खुष्कीनें भारतीयांची ये-जा नेहमीं सुरू असे. वेदात ज्याचा उल्लेख येतो ते पणी हे फिनीशियन व्यापारी असून त्याचा सिंधुकाठ, इराणी आखात व भूमध्यसमुद्रकाठचे देश येथें सचार असे. बाबेरू उर्फ बाबिलोनिया येथें व्यापारास्तव जाणाऱ्या सौदागराचा उल्लेख गेल्या प्रकरणीं आलाच आहे. शकपूर्व ९७५ मध्यें टायरच्या हिराम राजानें हस्तिदंत, माकडें व मोर हे आणण्याकरितां हिंदुस्थानच्या ऑफिर बंदरीं जहाजांचा तांडा पाठविला होता असाहि उल्लेख आढळतो. ऑफिर हें मुंबईनजीकचें सोपारा हें असावें. शिवाय एकीकडे ग्रीस व दुसरीकडे हिंदुस्थान या दोहोंना एकत्र आणणारी एक विशेष

राजकीय घटना म्हणजे पारसी साम्राज्याच्या पंखाखालीं ह्या दोन्ही देशाचा काहीं भाग एके काळीं आला होता ही होय. शकपूर्व ५१० च्या सुमारास इराणात सम्राट् दरायस हा सिंहासनावर बसला त्या काळीं सिंधु नदीच्या आसपासचा प्रदेश हा त्याने जिंकून आपल्या साम्राज्यास जोडला होता. श. पू. ४८० मध्ये त्यानें ग्रीसवर स्वारी केली तेव्हा तर त्याच्या लष्करांत भारतीय सैनिक लढत होते.[1] उलट ग्रीसमधूनही लष्करी आणि मुलकी अधिकारी म्हणून पुष्कळ लोक हिंदुस्थानात येत. त्यात आशिया-मायनरमधील आयोनिया येथील प्रमुख असत. या आयोनियातील ग्रीकांनाच संस्कृत भाषेंत यवन किंवा प्राकृत भाषेंत योन ही संज्ञा पडली होती. आणि अष्टाध्यायींत यवनानी हा शब्द असल्याने ती पाणिनीच्या काळाइतकी म्हणजे शिकंदराच्या पूर्वी चागलीं चारपाच शतके रूढ झालेली होती. या काळातील सुप्रसिद्ध ग्रीक इतिहासकार हिरोडोटस याला हिंदुस्थानची पुष्कळ माहिती होती. शिकंदराच्या स्वारीनंतर भारतीयाचा आणि ग्रीकाचा हा संबध अधिकच बळावला. शिकदर जेता म्हणून मिरवला तरी शिकंदराचा वारसदार सेल्युकस याला चंद्रगुप्ताशीं खिस्तपूर्व ३०५ या वर्षी नमतें घ्यावें लागलें आणि भारतीयाशीं स्नेहसबंध जोडावा लागला. त्यानें आपली एक कन्या चंद्रगुप्ताला दिली होती व त्याचा वकील मेग्यास्थेनिस ह्या पाटलिपुत्र येथें चंद्रगुप्ताच्या दरबारीं पुष्कळ वर्षे होता हें सुशिक्षिताना सांगावयास नकोच. चंद्रगुप्ताच्या नंतर त्याचा पुत्र बिंदुसार हा राज्यारूढ झाला. याच्याहि दरबारीं ग्रीक राजा पहिला ॲटिओक याच्याकडून वकील अनेक वेळां आला होता. या वकिलाचें नाव डायमॅक. या वकिलामार्फत बिंदुसाराचा व ॲटिओकचा मजेचा पत्रव्यवहार चाले. बिंदुसारानें लिहिलें होतें म्हणे कीं आम्हाला ग्रीसमधील उंची मद्य, सुकीं द्राक्षें आणि वाद-कुशल असा एक सोफिस्ट पंडित पाठवून द्यावा. त्यावर ग्रीक राजानें उत्तर धाडलें कीं, आपल्या विनंतीप्रमाणें द्राक्षें आणि द्राक्षकन्या पाठवून देतों; पण सोफिस्ट पंडितांना पाठवून देणें हें आमच्या चालीरीतीस शोभण्या-सारखें नाहीं ! याच ॲटिओक राजाच्या देशात बिंदुसाराचा पुत्र अशो-

१. 'India in European Literature and Thought' article by H. G. Rawlinson in 'Legacy of India'.

कानें आपले धर्मोपदेशक पाठविण्याचा उल्लेख मागील प्रकरणीं आलाच आहे. याच काळीं अलेक्झाड्रियाचा टॉलमी फिलाडेल्फस याने डायोनिसस यास हिंदुस्थानात पाठविले होते. अशोकानंतर भारतीय साम्राज्य कांहीं काळ दुबळे झालें आणि बॅकट्रियातील ग्रीक राजाने भरतखंडाचा बराच भाग काबीज केला. इसवी शकपूर्व १८० च्या सुमारास डेमिट्रियस यानें सिंध व काठेवाड हे प्रांत बळकावले. तो किंवा त्याच्यानंतर वीस वर्षांनीं येणारा मिनँडर यानें आपल्या राजाची सरहद्द थेट अयोध्येपर्यंत भिडविली होती. त्याच्यानंतर दोन शतकानीं ग्रीक मागें पडून भरतखंडाच्या राजकीय पटावर कुशाण हे परके राजे वावरूं लागले. असो. राजकीय घडामोडींचा हा त्रोटक उल्लेख भारतीयाच्या आणि ग्रीक, सिथियन वगैरे परकीयाच्या या कालात आलेल्या दाट संबधाची पार्श्वभूमि म्हणून करीत आहें. येथें चालू मुद्दा म्हणजे या दाट संबधाचा परिणाम म्हणून भारतीयाच्यापासून कोणत्या गोष्टी परकीयानीं उचलल्या हे दाखविणे हा होय.

पाश्चात्यानीं भारतीयापासून स्वीकारलेल्या गोष्टींत पहिले स्थान धर्म व तत्त्वज्ञान याना दिले पाहिजे. पैकीं भरतखंडातील धर्म हा खुद्द परकीय विजेत्या राजापैकीं कांहींनीं स्वीकारला. यापैकीं कुशाण कनिष्क, व ग्रीक मिनँडर, याचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. कुशाण राजा 'महाराज राजातिराज देवपुत्र' कनिष्क यानें बुद्धधर्माचा नुसता स्वीकारच केला असें नव्हे तर इ. स. १२० मध्यें त्याने बौद्ध भिक्षूंची मोठी परिषद् भरवून बुद्धधर्माला संघटित स्वरूप दिलें. या परकीय राजानें बौद्धधर्माच्या इतिहासात अशोकाच्या खालोखाल स्थान मिळविलें आहे. तत्पूर्वी ग्रीक राजा मिनँडर यानेंहि असाच बौद्ध धर्म स्वीकारला आणि बौद्धाचार्यांनींहि त्याचें ऋण स्मरून 'मिलिन्दपन्ह' नावाचा ग्रंथ रचून त्याचें नांव बौद्धवाङ्मयात अजरामर करून ठेविलें. मिलिन्दपन्हात मिनँडरचें नांव गोवलें गेलें येवढ्यावरूनच बौद्धधर्माची मोठी मोहिनी मिनँडरवर पडली होती असें मानण्याचें फारसें कारण नाहीं अशी शंका एका इतिहासकारानें काढली आहे.[1] पण दुसराहि पुरावा उपलब्ध आहे, तो प्लुटार्क या

१. Study of History by Toynbee Vol. V. p. 132.

ग्रंथकाराचा. मिनँडरच्या मृत्यूनंतर त्याच्या अस्थि कोणाला मिळाव्या याविषयीं तंटा माजला तेव्हा शेवटीं सर्वांनीं सारखा वाटा घ्यावा व त्यावर स्मारकें उभारावीं असे ठरले असें या ग्रंथकाराने जे वर्णन केले आहे तें बुद्धाच्या स्तूप उभारण्याच्या पद्धतीशीं जुळतें आहे. यावरून बौद्धानीं मिनँडरला गौरविलें ते निष्कारण नसावें.

वैष्णव धर्माची दीक्षा घेणारेहि काहीं निघाले. त्यापैकीं एकाने आपल्या नावें गरुडस्तंभ उभारून व त्यावर लेख कोरून आपल्या धर्मांतराचे अखंड स्मरण राहील अशी व्यवस्था करून ठेविली आहे. हा स्तंभ ग्वाल्हेर संस्थानातील भिलसा या गावीं आजहि उभा असून तळाला अष्टकोनी, मध्याला षोडशकोनी व टोकाला बत्तीसकोनी अशा थाटाचा एका अखंड शिलेचा कोरलेला आहे. शतकानुशतकें या स्तंभापुढें किंवा 'खा बाबा' पुढें मोठी यात्रा भरत आलेली आहे ! पण यावरील लेखाची भाषा व मोल हे यात्रेकरूंना समजण्यासारखे नसल्याने त्यानीं शेंदराच्या सहस्रपुटानीं तो माखून काढलेला होता. अशाच स्थितींत तो रहाता तर त्यावरील लेख आणि त्या लेखात निविष्ट केलेले स्तंभ उभारणारांचें नाव हीं शेंदूर खाल्ल्यानें मुकींच राहिली असतीं ! पण हीं पुटे मोकळीं करताच त्यावरील लेखाला तत्काळ वाचा फुटली कीं, 'देवदेवस वासुदेवस गरुडध्वजे अय कारिते हेलिओदोरेण भागवतेन योनदूतेन...[1] हा गरुडध्वज देवाचा देव वासुदेव याच्या प्रीत्यर्थ तक्षशिलेचा राहिवासी व ग्रीस राजा अँटिआल्सीडियस याचेतर्फे राजा भागभद्र याचे दरबारीं वकील म्हणून राहिलेल्या हेलिओदोरस नांवाच्या भागवतानें उभारला आहे.' याच स्तंभानजीक देवदत्तपंत भांडारकर याना शिक्का असलेल्या सव्वीस विटा सापडल्या. त्यापैकीं एकावर तिमित्र हें नांव आहे, तें ग्रीक डेमिट्रियस याचें रूपांतर असावें व त्यानें यज्ञ केला असावा असा भांडारकराचा तर्क आहे. कार्ले व नाशिक येथील लेण्यातील लेखात क्षत्रप नहपान याचा जामात ऋषभदत्त यानें ब्राह्मणाना अनेक दानें दिल्याचें वर्णिलें आहे. नाशिक येथील एक लेणें इंद्राग्निदत्त योनक याचें आहे.

---

१. Select Inscriptions by D. C. Sircar p. 90.

जेत्या राजानीं जिताचा धर्म स्वीकारण्यात धार्मिक भावनेच्या जोडीला, किंबहुना क्वचित् अधिकहि, राजकीय धोरणाची दृष्टि असू शकते हें नाकारण्याचे कारण नाहीं. पण असा प्रकार जेथें घडतो तेथें जिताचा धर्म हा प्रबल व जिवट असतो हे मान्य करण्यास तरी आडकाठी नसावी. आतां जेथें येवढीहि सूट घालण्याचें कारण नाहीं असाहि भारतीय धर्म व तत्त्वज्ञानाचा विजय दाखविता येईल. तो म्हणजे स्वतंत्र अशा ग्रीस देशांत भारतीय धर्माचा व तत्त्वज्ञानाचा झालेला प्रसार हा होय.

ग्रीसमध्यें हिंदुधर्म

मागे 'आध्यात्मिक युरोप' या प्रकरणात युरोपांतील कॅथॉलिकपंथीय मठ, त्यांतील सन्यासी, जोगिनी, त्यांचें ब्रह्मचर्य, वैराग्य, देहदंडन, त्यांची आरती, धूपारती, माळ, जपजाप्य, उपासतापास वगैरेंचें वर्णन केलें आहे. प्रस्तुत या सर्वांविषयीं असें सागावयाचे आहे कीं, हे सर्व प्रकार मूळ युरोपियन धर्माशीं म्हणजे होमरच्या वेळच्या व जुन्या करारातल्या धर्माशीं विसंगत असून ते सर्व भरतखंडातून ग्रीसमध्ये व अलेक्झाड्रियामध्यें आले असावे असे पाश्चात्य विद्वानानींच प्रतिपादिलें आहे. असे प्रतिपादन करण्यात संसाराकडे उदासीन दृष्टीनें पाहण्याची दृष्टि ही एकंदरींत विकृत दृष्टि होय व म्हणून ती मूळची युरोपियनाची नसून बाहेरून आलेली असावी असें मानण्याची अहंकाराची गर्भित भावना असणें अशक्य नाहीं. तें कसेंहि असले तरी वर उल्लेखिलेल्या कल्पनानीं कित्येक शतके युरोपियन मनावर स्वामित्व गाजवलें होतें ही गोष्ट त्याना मान्य आहे; आणि तत्पोषक उल्लेखहि आढळतात. चौथ्या शतकातला युसेबियस याने ॲरिस्टॉटलच्या शिष्यापासून चालत आलेली एक दंतकथा दिलेली आहे ती अशी कीं, 'एकदा एका भारतीय तत्त्ववेत्त्याची अथेन्स येथें सॉक्रेटिसाशीं गाठ पडली. तेव्हा सॉक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाची एकंदर फलश्रुति काय असा प्रश्न निघाला असता सॉक्रेटिस म्हणाला कीं, मानवी व्यवहाराचे गूढ उकलणें ह्याविषयीं माझा प्रयत्न आहे. त्यावर तो भारतीय मोठ्यानें हसला व म्हणाला कीं, दैवी सूत्राचे आकलन जोंवर झालें नाहीं तोंवर आपणांस मानवी व्यवहाराचें गूढ कधीं उकलेल का!' ही नुसती दंतकथा असली तरी ही

भरतखंडातून विद्वान् वेदान्ती ग्रीसमध्ये जात येत असत व आपली छाप तेथें पाडीत असत अशी चौथ्या शतकात समजूत रूढ होती येवढे दर्शविण्यास तर ती पुरेशी आहे.

तत्त्वज्ञानामध्ये पुनर्जन्माची कल्पना ही एक प्रमुख भारतीय कल्पना होय. ही पायथागोरस व प्लेटो वगैरेनीं भारतीय तत्त्वज्ञानातून स्वीकारली असली पाहिजे हें कीथसारखे काहीं पंडित सोडले तर बहुतेक पाश्चात्य विद्वानांना– गार्बे, विंटरनिट्झ्, हॉपकिन्स, मॅक्डोनेल वगैरेना– मान्य आहे. खिस्तपूर्व ५८० मध्ये जन्मलेल्या पायथागोरसच्या एकंदर पथाविषयीं रॉलिन्सन हा लिहितो कीं, 'धर्म, वेदान्त, गणित वगैरेमध्ये पायथागोरसने जीं जीं मतें प्रतिपादन केलेलीं आहेत तीं तीं सर्व मतें हिंदुस्थानात शकपूर्व सहाव्या शतकात आधींच प्रचलित होतीं. पायथागोरसला पुनर्जन्माचा सिद्धान्त मान्य होता येवढेंच नव्हे तर आपणास पूर्वजन्माचे स्मरण असून ट्रोजन युद्धात आपण लढलों होतों असेंही तो म्हणे. आणि मते सोडून आचारकांड पाहिले तरीहि पायथागोरस व हिंदु, जैन, बुद्ध याच्यात विलक्षण साम्य सापडते. जीवजीवाणूंचीहि हिंसा न करणे, मांसाशन निषिद्ध मानणे, बाटाणे खाणें वर्ज्य समजणे अशासारख्या बाबीहि दोन्हीकडे सारख्याच सापडतात. यावरून पायथागोरसच्या विचारसरणीवर मिसरी तत्त्वज्ञानापेक्षा हिंदी तत्त्वज्ञानाचीच अधिक छाप पडलेली दिसते.'[1] मिसर देशाचा उल्लेख येथे आला आहे त्याचे मर्म असे आहे कीं, इलियट, स्मिथ, पेरी वगैरे काहीं विद्वानांचा असा ठाम सिद्धान्त आहे की, मानवी संस्कृतीचीं सर्व अंगोपांगे उदय पावलीं ती प्रथम मिसर देशात उदय पावलीं व नंतर तेथून सर्वत्र पसरलीं. पण मिसरी संस्कृतीच्या अभ्यासकातील एक प्रमुख तज्ज्ञ सर फ्लिंडर्स पेट्री ह्यानेंहि रॉलिन्सनसारखाच अभिप्राय दिला आहे. तो लिहितो कीं, 'ग्रीकाब्ररोबरच्या युद्धात इराणी सैन्यात भारतीय सैनिक होते यावरून पश्चिमेचें व हिंदुस्थानचें दळणवळण सिद्ध झाले असता संन्यासपथ हा पश्चिमेकडे आला तो हिंदुस्थानातून आला असला पाहिजे असें मानावयास कोणताच प्रत्यवाय दिसत नाहीं.' ('इजिप्त व इस्त्राएल').

---

१. Legacy of India, p. 5.

आतां हें खरें कीं सारख्या कल्पना, सारखे विचार भिन्न देशात उद्भवणें अशक्य आहे असें मुळींच नाहीं. पण एखाद्या देशात पूर्वविचाराशीं असंबद्ध अशा कल्पना अगदीं अभावितपणे एकदम उठून उभ्या राहिलेल्या आढळूं लागल्या व त्याच्या तोंडावळ्यासारख्या कल्पना ज्या देशाशीं दळणवळण आहे अशा दुसऱ्या देशात आधींच नादत असलेल्या आढळून आल्या तर अशा कल्पना त्या दुसऱ्या देशातून पाहुण्या आल्या असाव्या असे मानणे फारसे तर्कास सोडून होत नाहीं. पुनर्जन्म, मोक्ष, परमात्म्याशी सायुज्यता, वैराग्य, देहदडन, या कल्पनाचा उदय पश्चिमेकडे असाच अभावित दिसतो. म्हणूनच पायथागोरसने त्या पूर्वेकडून उचलल्या असाव्या असें म्हणणें क्रमप्राप्त येते. शिवाय त्याच्या चरित्रकारानें लिहून ठेवले आहे कीं पायथागोरसने प्रवास फार केला असून असीरिया, ईजिप्त व हिंदुस्थान यात तो येऊन गेला होता. ऑरफियस या नादब्रह्म निर्माण करणाऱ्या तत्त्ववेत्त्याच्या पथातहि पुनर्जन्म, समाधि, आत्म्याची बद्धावस्था, मोक्षावस्था व अमरत्व, ब्रह्माड, संसारचक्र वगैरे एकच नव्हे तर अनेक कल्पना आढळतात. त्या सर्वांतील व भारतीय तत्त्वज्ञानातील विलक्षण सादृश्य हे केवळ काकतालीय न्यायाने उद्भवलें असे म्हणणे म्हणजे शेकेखोरपणा वाजवीपेक्षा अधिक ताणणे होय. ऑरफियस व पायथागोरस याच्या पथातील भारतीय ऋण मान्य केले म्हणजे ग्रीसमधील एक प्रमुख तत्त्ववेत्ता व अव्वल दर्जाचा साहित्यिक जो प्लेटो याविषयीं निराळे सागावयास नको. तो पायथागोरसचा शिष्य होता येवढें सागितलें म्हणजे पुरे. त्याच्या लोकशाहीवरील सुप्रसिद्ध ग्रंथासंबंधानें प्रो. अरविक लिहितात कीं, त्यातील बहुतेक कल्पना प्लेटोने भारतीयापासून घेतलेल्या असाव्यात.[१] चातुर्वर्ण्याची कल्पना व ऋषीनीं अपरिग्रहवृत्तीनें राहण्याची कल्पना या दोन कल्पना उदाहरणादाखल देता येतील. आणि ग्रंथाच्या शेवटची पुनर्जन्माची कल्पना तर थेट भारतीय वळणावर.

शिकंदराला उत्तरकालीन अकबराप्रमाणे सर्व धर्मांचें एकीकरण करण्याचा छंद होता. त्यानें आपला वंसिक्रिटस नावाचा एक विद्वान् तक्ष-

१. 'The Message of Plato' by Urwick.

शिलेला बुद्धया पाठविला होता व त्यानें तेथून एक यती आपल्याबरोबर शिकंदराकडे आणला होता असें स्ट्रॅबो लिहितो. तसेंच महावंश या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, शकपूर्व १५७ या वर्षी राजा दुत्तगामिनी यानें एक भव्य स्तूप बाधला त्या प्रसंगी अलेक्झाड्रिया येथील यवनाचा मुख्य धर्माध्यक्ष आपल्या तीस हजार उपदेशकासह (आकड्याचा भावार्थ घेण्यास हरकत नाही) हजर होता.[1]

रोमन अमदानींत रोम आणि हिंदुस्थान यामधील दळणवळण जोरात सुरू होतें व हिंदु लोक हे तत्त्वज्ञानात निष्णात असल्याची रोममध्यें या काळीं मोठी ख्याति होती. हें तत्त्वज्ञान साक्षात् गुरूच्या मुखातून ऐकण्याकरिता पाश्चात्य जिज्ञासु भरतभूमीची यात्रा करीत. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांतील लुशियनने लिहिले आहे कीं, डेमिट्रियस नावाच्या एका ग्रीक वेदान्त्यानें वृद्धापकाळीं आपली सर्व जिंदगी वांटून टाकली व उर्वरित आयुष्य ब्राह्मणांच्या संगतींत व्यतीत करण्याकरिता तो हिंदुस्थानास निघून गेला ! हिंदुस्थानातील भिन्न भिन्न धर्मपंथाचीहि पाश्चात्याना माहिती होती. तिसऱ्या शतकातील क्लेमंटला वैदिक धर्म व बौद्धधर्म यातील भेदाभेद माहीत होता. शिवाय पायथागोरसविषयीं त्यानें लिहून ठेवलें आहे कीं, त्यानें ज्या अनेक विद्वानापासून ज्ञान संपादन केले त्यात ब्राह्मणहि होते. चवथ्या शतकातील सेंट जेरोमनें बुद्धाचा नावाने उल्लेख केला आहे व त्याच्या मातेच्या कौमार्याची कथाहि दिली आहे. तिसऱ्या शतकातला नवप्लेटोपंथाचा संस्थापक प्लोटिनस हा हिंदुतत्त्वज्ञानाचा अभ्यास करता यावा म्हणून इराणावर स्वारी करणाऱ्या सेनेसवे तिकडे निघाला होता. पण सेनापतीच्या मृत्यूमुळें त्याला वाटेतूनच परत यावें लागलें. या प्लोटिनसच्या वेदांताचा मासला 'आध्यात्मिक युरोप' या प्रकरणीं मागें दिला आहे त्यावरून त्याच्या तत्त्वज्ञानाचें भारतीय वेदाताशीं साम्य लक्षात येईल. नोस्टिक पंथावरही वेदाताची छाप स्पष्ट होती. तो पंथ पुनर्जन्म मानी.[2]

---

१. 'Select Asokan Inscriptions' Preface by Bhattacharya.

२. 'Eastern Religion and Western Thought' by Radhakrishna.

बायबलांतील बुद्धकथा

संस्कृतीच्या देवाणघेवाणींत बुद्धधर्मांतील बऱ्याच धर्मकथा व अद्भुत कथा ख्रिस्तानुयायानीं उचलल्या असाव्यात असे पुष्कळ विद्वानाचें मत आहे. ख्राइस्टचा चेला संत पीटर ख्राइस्टवर श्रद्धा ठेवून पाण्यावरून चालतो हा प्रकार व जातकामध्यें (क्रमांक १९०) वर्णिलेला अशाच प्रकारचा चमत्कार यामध्यें इतके विलक्षण साम्य आहे कीं या दोन्ही कथा स्वतंत्रपणें उद्भवल्या असतील असे मानणे जड जावे. दोन्ही कथामध्यें ईश्वरावर श्रद्धा असेपर्यंत पाण्यावरून सहज चालता यावे व अंतःकरणातली श्रद्धा डळमळली कीं अश्रद्ध पाण्यात बुडू लागावा याचें एकाच पद्धतीचें वर्णन आहे. जातकग्रंथामध्ये अशाच प्रकारच्या चमत्काराच्या कथा पुष्कळच आहेत. पण बायबलामध्यें मात्र मॅथ्यूच्या पुस्तकातील चौदाव्या अध्यायामध्यें एकदाच काय ती पाण्यावरून चालत जाणाऱ्या पीटरची कथा आहे. यावरून जातकातूनच ती बायबलमध्ये गेली असण्याचा समव मोठा आहे.

विंटरनिट्झच्या[1] मते बायबलातील ज्या भागावर बौद्धग्रथाचा ढळढळीत परिणाम झाला असल्याबद्दल पाश्चात्य विद्वानाचे सामान्यतः ऐकमत्य आहे तो भाग म्हणजे बायबलात दुसऱ्या व तिसऱ्या शतकामध्यें मागाहून घुसडून दिलेला प्रक्षिप्त भाग हा होय. या भागामध्ये ख्रिस्ताच्या ज्या कथा वर्णिलेल्या आहेत त्या बोधिसतत्त्वाच्या कथेशीं विलक्षण रीतीनें जुळत्या आहेत. एके ठिकाणीं असें वर्णिलें आहे कीं, येशूची माता मेरी तान्ह्या येशूला घेऊन हिंडत असताना तहानेनें व्याकुळ झाली. येशूने तत्काळ आपले चिमुकले हात डोक्यावर असलेल्या ताडवृक्षाकडे पसरले, व चमत्कार असा कीं, त्या ताडवृक्षानें आपलीं फळे नेमकीं मेरीच्या हातात टाकलीं. अशा प्रकारचे अद्भुत चमत्कार जे बायबलात आढळतात ते सर्व बौद्ध ग्रंथातून घेतले असावेत याविषयीं कट्टर ख्रिस्ती विद्वानानाहि संशय नाहीं.

बायबल सोडून मध्ययुगात रचिल्या गेलेल्या ख्रिश्चन साधु-संतांच्या कथाकडे आपण वळलों तर तेथेंहि बौद्धग्रंथाचें ऋण अनेक ठिकाणीं दिसून

---

१. History of Sanskrit Literature Vol. I.

येईल. या संताच्या तपश्चर्येचा भंग करण्याकरिता सैतान नाना प्रकारचीं रूपें धारण करी. त्यात काहीं वेळा तो येशू खिस्ताचेच रूप धारण करून या संताचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करी. हा प्रकार गार्बेच्या मते बौद्ध-ग्रंथावरूनच उचलला असला पाहिजे. गार्बेची विचारसरणी मात्र पूर्वग्रह-दूषित आहे. वरील प्रकारचे बॅलेन्स या सताचे एकच एक उदाहरण देऊन गार्बे लिहितो कीं, सैतानाने देवाचे रूप घ्यावे असली राक्षसी कल्पना खिस्ती वाङ्मयात बॅलेन्सच्या कथेमध्येच तेवढी सापडत असल्यामुळे ती बाहेरूनच आली असली पाहिजे. गार्बेच्या लिहिण्याचा झोक असा कीं, त्याच्या मते असल्या आसुरी कल्पना खिस्तानुयायाच्या दैवी भेदूंतून कधींच निघावयाच्या नाहींत, तेव्हा बॅलेन्सच्या कथेत एकाच ठिकाणीं ही कल्पना आढळते ती बौद्धग्रंथातून घेतली असली पाहिजे. पण दुसरा एक पंडित गुटर याने असे दाखवून दिले आहे की, गार्बे ज्याला राक्षसी किंवा आसुरी कल्पना म्हणतो ती सैतानाने देवाचे सोग घेण्याची कल्पना बॅलेन्सच्या एकुलत्या एक कथेत दिसून येत नसून दुसऱ्याहि पुष्कळ सोवळ्या खिस्ती कथामध्ये आढळून येते !

मध्ययुगीन काळात सर्व खिस्ती जगात मान्यता पावलेली व लोकप्रिय झालेली दुसरी जी एक कथा आहे, ती ललितविस्तार या बौद्ध ग्रंथावरून घेतली असली पाहिजे याविषयीं विद्वानाना तिळमात्र शंकाही नाहीं. ती कथा म्हणजे बार्लाम व [१]जोसाफत याची होय. या कथेचें सर्व वातावरणच बुद्धमय आहे. बुद्धाप्रमाणेच या कथेचा नायक जोसाफत हा राजपुत्र असून विपत्तींच्या दर्शनाने विरक्त होऊन जोगी बनतो. मूळ बुद्धकथेचें मातब्या शतकात पल्हवींत भाषांतर झाले. तेथून अरेबिक, नंतर ग्रीक व तदनंतर युरोपातील बहुतेक भाषाचे वेष या कथेनें पेहेरले आणि शेवटीं ही कथा इतकी लोकप्रिय झाली कीं या कथेंत ज्याचें चरित्र वर्णिलेलें आहे ते बार्लाम व जोसाफत हे कोणी मोठे खिश्चन साधुसंतच होऊन गेले असावेत असें मानण्यात येऊन सोळाव्या शतकात कॅथॉलिक पंथाच्या संतमालिकेंत ते गोविले गेले ! या तोतया खिस्ती

१. Barlaam and Josaphat.

संताविषयी विंटरनिट्झ आपल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात लिहितो की, या कथेतील जोसाफत म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून भरतखंडातील बोधिसत्त्व होय ! जोसाफतचे अरबी भाषेतलें नाव जुडासफ असें आढळतें आणि जुडासफ म्हणजे बुडासफ म्हणजे बोधिसत्त्व होय ! !

लोककथांचा प्रसार

धार्मिक कथाप्रमाणे उपदेशपर अशा लोककथाहि भरतखंडाने परकीयाना पुरविल्या असाव्यात असे विद्वानाचे मत आहे. भारतीय व ग्रीक वाङ्मयातील काहीं लोककथामध्ये इतके विलक्षण साम्य आहे कीं कोणत्या तरी एका राष्ट्राने ह्या बाबतींत उसनवारी केली असली पाहिजे असें मानणे प्राप्त होतें. भारतीय व ग्रीक ह्या दोघानींहि तिसऱ्या कोणाची उसनवारी केली असण्याचा तिसराहि एक विकल्प उरतोच, पण जोवर ह्या विकल्पाविषयी निश्चित पुरावा उपलब्ध होत नाहीं तोवर भारतीय वाङ्मयातील कथा जेथे कालदृष्ट्या ग्रीक कथाच्यापेक्षा प्राचीन आहेत असें निश्चित म्हणता येते त्या स्थलीं त्या कथा संस्कृत वाङ्मयातून ग्रीक वाङ्मयात गेल्या असाव्यात असें मानणे तर्कास सोडून नाहीं.

ज्या कथासंग्रहाचा युरोपात प्रवेश झाला असा जुना कथासंग्रह जातकसंग्रह हा होय. आज इसापनीतींत आढळणाऱ्या गोष्टींपैकीं काहीं गोष्टी या जातककथातून बहुधा आल्या असाव्यात. विशेषतः इसापच्या गोष्टींतील सिंह आणि कोल्हा याचा जो संबध दर्शविला आहे त्याची कल्पना ग्रीस देशाच्या बाहेरून आली असावी असें म्हणतात. या कथा शकपूर्व ६ व्या शतकातच आशियामायनरपर्यंत पोचल्या होत्या. जातककथापैकीं महासुपिन जातकातील सोळा स्वप्ने पडणाऱ्या राजाची कथा, विरोचन-जातकातील सिंहाशीं स्पर्धा करणाऱ्या कोल्ह्याची कथा, इल्लीस जातकातील अतिधनाढ्य पण अतिकृपण अशा इल्लीसाची कथा, सुवण्णहंस जातकातील सोन्याचीं पिसें असलेला हंस व सर्व पिसे एकदम हातीं लागावीं म्हणून हावरेपणाने मारूं पाहणारी ब्राह्मणी याची कथा, सीहचम्म जातकातील सिंहाच्या चर्माचें पाघरूण घातलेल्या गर्दभाची कथा अशा प्रकारच्या कित्येक जातककथा युरोपियन कथावाङ्मयात हिंदुस्थानातून प्रविष्ट झाल्या

असाव्यात.[1] या कथातून येणारे सिंह, कोल्हा, हत्ती, मोर वगैरे पशू हे भरतखंडातील होत हें पाहिले असता कोणी कोणाचें उसनें घेतलें या-विषयीं संशय राहत नाहीं. भारतीय कथासाहित्यापैकीं पंचतंत्र किंवा त्याचें प्राचीनतम स्वरूप जें तंत्राख्यायिका त्याचे सहाव्या शतकात पेहेलवीमध्यें भाषांतर झाले. नंतर अरबीमध्यें व अकराव्या शतकात ग्रीकमध्यें होऊन या ग्रंथातील कथा सर्व युरोपभर पसरल्या. पंचतंत्रातील करटक आणि दमनक हीं कोल्ह्याचीं नावे प्रसिद्ध आहेत. त्यावरूनच पंचतंत्राच्या अरबी भाषांतराला नाव दिलें तेच 'कालिलाग व दिम्नाग' असे.

बाजारकट्ट्यावरील देवघेव

धर्म, तत्त्वज्ञान, लोककथा वगैरेसारख्या नुसत्या मानसिक गरजाच तेवढ्या भरतखंडातून पुरविल्या जात असत असें नव्हे तर सांसारिक गरजांचाहि ठेकेदार प्राचीन काळीं आपला भारतवर्षच होता; इतक्या प्रमाणावर कीं आज पाश्चात्यानीं सर्व जगातील व्यापारपेठा काबीज केल्यामुळें त्याच्या राष्ट्रात जसा सुवर्णाचा प्रवाह सर्व दिशानीं अखंड वाहत येत आहे तसा पूर्वी भरतखंडात ग्रीस, रोम वगैरेमधून येत असे.

हिंदुस्थानचा युरोपखंडाशीं असलेला हा व्यापार फार प्राचीन कालापासून चालत आलेला आहे. एका जर्मन शोधकास ट्रॉय येथे एक शिसवीचें कोरीव लाकूड सापडले; व तें हिंदुस्थानचे असावें असें त्याचें म्हणणे आहे. म्हणजे ख्रिस्ती शकाप्रमाणें सुमारें हजारों वर्षे आम्ही भूमध्य समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावरील शहराशीं व्यापार करू लागलों होतों असें अनुमान निघतें. खल्डिया प्रांतातील ऊर येथील जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यात हिंदुस्थानच्या सागाच्या तुळया सापडल्या आहेत. व त्यासंबंधीं वाद निघाला तो एवढाच कीं, या तुळया हें देऊळ प्रथम बांधलें त्या वेळच्या म्हणजे ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षांच्या आहेत, किंवा या देवळाचा जीर्णोद्धार केला त्या वेळच्या म्हणजे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील आहेत ! ख्रिस्ती शतकाच्या पूर्वी अठराव्या शतकात ईजिप्त देशात ज्या घराण्यातील राजे राज्य करीत होते त्याच्या थडग्यात हिंदुस्थानातील नीळ, कापूर व

१. प्रो. चिं. वि. जोशी– 'जातककथा.'

चिंचेच्या पेट्या सांपडल्या आहेत. हिंदुस्थानातील मोर हा पक्षी सॉलोमनच्या वेळीं खिस्तपूर्व दहाव्या शतकात युरोपात गेला असावा. या पक्ष्याचें तामीळ भाषेतील मूळचें नाव जे टोक्की तें अपभ्रशाने निरनिराळय युरोपियन भाषात आढळतें म्हणतात. याच सालोमनचा राजवाडा शृंगारण्याकरितां हिराम राजाने हस्तिदंत, माकडे व मोर आणले असे बायबलाच्या जुन्या करारात लिहिलें आहे. शक १३० मध्यें जन्मलेला ॲप्युडियस हा ग्रथकार आपल्या फ्लॉरिडा नावाच्या ग्रंथात लिहितो कीं, हिंदुस्थानातून युरोपात हस्तिदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गठ्ठे आणि सोन्यारुप्याचे डागच्याडाग येत असत. तसेंच पहिल्या शतकातील पेरिप्लस् नावाच्या ग्रंथात असें म्हटले आहे कीं, केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानातून तादूळ, तूप, तीळ, साखर, सुती कापड, रेशमी कापड वगैरे आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यातील लोक हिंदुस्थानचे केशर, हळद, निळे कापड, शेवरीचा कापूस, मलमल, रेशमी कापड आणि अरबी तऱ्हेचे पेहेराव घेऊन जात. इराणात हिंदुस्थानातून साग, शिसवी, शिंगें वगैरेंचे कोरीव सामान जात असे. बार्बरी संस्थानातील लोक कराचीशीं व्यापार करीत आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानातून उत्तम तऱ्हेचें सुती कापड, नाना तऱ्हेचे अबर, स्फटिकादि मौल्यवान् पाषाण, काचेचीं भांडीं व रुप्याचीं ताटें व तबकें नेत.

युरोपखंडातील ग्रीस व रोम येथें भारतीय हे अशोकच्या वेळेपासून व तत्पूर्वीहि जात असत याचा उल्लेख वर आलाच आहे. ज्यूलिअस सीझरच्या मागून गादीवर बसलेल्या ऑगस्टस् राजाच्या कारकीर्दीत भरतखंडातून येणाऱ्या चैनीच्या वस्तूंना विशेष मागणी होती असें दिसतें. मोसमाचे दिवस आले कीं व्हेनिस बंदरांतून अनेक गलबतें त्या काळीं हिंदुस्थानात येत आणि येथून मसाले, हस्तिदंत, हिरे, माणके, मोर, पोपट, हत्ती, सिंह, गेंडे, सर्प असे अनेक पदार्थ घेऊन जात. ते फार चढ्या भावानें विकीत असल्याने रोमच्या सुवर्णाला गळती लागली होती; ती इतकी कीं, रोमन सेनेटमध्ये या विषयावर मोठे वाद माजत. काहीं बादशहानीं या चैनीच्या पदार्थांवर बहिष्कार घालण्याचा प्रयत्न केला पण तोहि निष्फळ झाला. यामुळें ऑगस्टस्पासून

नीरोपर्यंतच्या बादशहांचीं अनेक सुवर्णनाणीं हिंदुस्थानात अव्याहत येत राहिलीं. नुसत्या टायबेरस या बादशहाचींच हजारावर नाणीं सापडलेलीं आहेत. आणखी भूमींत किती दडून असतील हरि जाणे.

चैनीचे पदार्थ सोडून नित्योपयोगी पदार्थांविषयीं पाहता तुरटीच्या मदतीने मंजिष्ठादिकाचे बनविलेले पक्के रंग, निळीचा रंग व पोलाद या वस्तूंविषयीं प्राचीन भारताची विशेष ख्याति होती असें सील यानें प्रतिपादन केलें आहे.[1]

बगदादमध्यें हिंदु वैद्यराज

आता दुसऱ्या कालखंडाकडे वळूं या. रोमच्या नाशानंतर युरोपात काहीं शतकें तमोयुग पसरले होते. त्याच्या शेवटीं युरोपात अरबानीं ज्या विद्येचा प्रसार केला ती विद्या त्यानीं मुख्यतः भरतखंडातून नेली होती. आज युरोपखंडाला व्यावहारिक शास्त्रीय विद्येच्या प्रातांत सर्व जगाच्या आदिपीठाचें जे स्थान मिळालें आहे तेच विलोभनीय स्थान प्राचीन काळीं या भरतखंडास मिळाले होतें. बुद्धधर्माचा अभ्यास त्या धर्माच्या मायभूमींत येऊन करण्याकरिता चिनी प्रवासी येथें येत हे सुशिक्षितास सामान्यतः अवगत असतें, पण व्यावहारिक शास्त्रें शिकण्याकरिताही परकीय लोक हे भारतीय ग्रंथ आणि भारतीय गुरु याजकडे वळत हें मुद्दाम सांगितले पाहिजे. आज हिंदुस्थानात एखादे नवें रुग्णालय उघडावयाचे असल्यास प्रारंभीं तरी युरोप-अमेरिकेहून एखाद्या प्रख्यात डॉक्टराला बोलावले जातें. नेमकें हेंच स्पृहणीय पद पूर्वी भरतखंडातील वैद्यराजाना मिळे. त्यापैकीं एक ऐतिहासिक उदाहरण मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखें आहे. बगदादचा खलीफा हरुन-अल्-रशीद (इ. स. ७८६–८०८) याचें नाव प्रख्यात आहे. हा एकदा फार बिमार झाला. त्याच्या काळीं भारतीय भिषजाची कीर्ति सर्वत्र दुमदुमत होती. तेव्हा त्यानें भरतखंडातून एका वैद्यराजाला मुद्दाम पाचारण केलें. या वैद्यराजाच्या हाताला यशहि उत्तम आलें. त्यावर हरूनची इतकी भक्ति बसली कीं त्यानें त्याला आपल्या सरकारी इस्पितळाचा मुख्य अधिकारी

१. 'Positive Sciences of the Hindus' by B. Seal, p. 64.

नेमले ![1] ही आठव्या शतकातील गोष्ट. आणखी पाच-सहा शतकात मात्र ही स्थिति सर्वथैव पालटली व पुढें जहागीर, औरंगजेब, माधवराव पेशवे याना औषध देण्याला युरोपियन डॉक्टराची मदत घेण्याची पाळी आली ! तो प्रकार पुढें पाहूं.

हरूनच्या पूर्वीचा खलीफा मन्सूर याच्या कारकीर्दीत अरबाचा आणि हिंदुस्थानचा प्रथम राजकीय संबंध आला. याच कारकीर्दीत महमद बिन कासीमनें सिंध प्रांत काबीज केला. पण परत जाताना या जेत्याने आपल्याबरोबर येथून काहीं हिंदु पंडित नेले व त्यानीं खलीफाच्या आज्ञेनेंच गणित आणि वैद्यक यावरील अनेक प्रमुख ग्रंथाचीं भाषांतरे केलीं असे दहाव्या शतकातील 'किताब अल् फिरिस्त' या ग्रंथाचा कर्ता अबुल फरज यानेच लिहून ठेवले आहे. अरबानीं नंतर या शास्त्राचा युरोपभर प्रचार केला. वैद्यक आणि रसायन पूर्वी एकत्रच अभ्यासलीं जात असत. यामुळें भरतखंडातील रसायनशास्त्राचेहि अरबानीं परिशीलन केलें. रसायनशास्त्राचा इतिहास लिहिताना युरोपियन विद्वान् अरबांच्या परिश्रमाचा सामार उल्लेख करतात; पण अरबानीं रसायन व वैद्यकशास्त्र भारतीयापासून उचललें याचा उल्लेख मात्र करीत नसत. 'हिंदु रसायनाचा इतिहास' लिहिणारे प्रफुल्लचंद्र रे लिहितात कीं, 'आरब विद्वान् हे भारतीयाचे ऋणी होते याविषयीं युरोपियनानीं एक शब्द लिहिला असेल तर शपथ !' गझनीच्या महमुदाबरोबर हिंदुस्थानात आलेला सुप्रसिद्ध इस्लामी विद्वान् अल्बेरुणी याच्या ग्रंथाचें भाषांतर करणाऱ्या साचौ यानें तेवढें मात्र हिंदूंचें ऋण मोकळेपणाने मान्य केले आहे.

जर्मन ब्राह्मण

आता मध्ययुग सोडून अर्वाचीन युगाकडे वळूं. या काळात भारतीय संस्कृतीचा परिणाम युरोपियनाच्यावर होण्यास प्रारंभ झाला तो संस्कृत वाङ्मयाच्या मोहिनीमुळें. युरोपातील अर्वाचीन तुलनात्मक भाषा-

१. या वैद्यराजाचें नांव कंक किंवा माणिक्क असें होतें. Elliot's History of India Vol. I. p. 446.

शास्त्र, दैवतशास्त्र वगैरे शास्त्रें निर्माण झालीं तीं मुख्यतः संस्कृत वाङ्मयाच्या अध्ययनाच्या पोटीं निर्माण झालीं येवढ्याचा नुसता निर्देश केला तरी या परिणामाचे स्वरूप लक्षात येईल. इग्रजाचा हिंदूंशीं संबध हा विशेष निकटचा होता. तेव्हा त्यांचें संस्कृतकडे लक्ष वळणे स्वाभाविकच होते. वॉरन् हेस्टिंग्ज्च्या वेळेपासूनच संस्कृत ग्रंथाचीं इग्रजींत भाषांतरें होण्यास सुरवात झाली. पैकीं पहिला भाषांतरित ग्रथ सुप्रसिद्ध भगवद्गीता हा होय. त्याचे भाषांतर १७८५ सालींच हेस्टिंगज्चा एक मित्र विल्किन्स यानें केलें. पुढें चारच वर्षांनीं म्हणजे फ्रेंच राज्यक्राति झाली त्याच सालीं जोन्सने शकुंतलेला इग्रजी वेषभूषेने सजविले.

येथून पुढे मात्र संस्कृत ग्रंथाचे खरे आस्थेवाईक परिशीलन कोणीं केलें असेल तर ते जर्मन पडितानीं. त्यात प्रारभीं अग्रपूजेचा मान श्लेजेल-बंधूंनीं मिळविला. "१८०८ सालीं या बंधूंनीं आपल्या देशबंधूंना संस्कृतमधील अनेक ग्रंथाची ओळख करून दिली व सस्कृत वृत्तात जर्मन श्लोकहि रचून दाखविले ! या बंधूच्या नंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य वाङ्मयाचे एकीकरण करणारा रूकर्ट नावाचा जर्मन पडित होऊन गेला. याला **'जर्मन ब्राह्मण'** अशी संज्ञा देतात. त्याने सस्कृत वाङ्मय जर्मन भाषेत ओतण्याचा प्रयत्न जन्मभर केला. त्याच्या ग्रथात भारत, रामायण, हितोपदेश, पचतंत्र, कथासरित्सागर, रघुवश, कुमारसंभव, उपनिषदें, पुराणें, भागवत वगैरेतील अनेक उतारे आढळतात. याशिवाय चाद्रायण-व्रत, पंचतपःप्रयोग, चिंतामणीचा सर्वार्थसिद्धकता हा गुण, चद्रकमल व सूर्यकमल याचे धर्म वगैरे अनेक संस्कृत कल्पनाचा उपयोग त्याच्या स्वतंत्र ग्रंथातून केलेला सापडतो. रूकर्टनें संस्कृतमधील पाद म्हणजे पाय व किरण, बक म्हणजे बगळा व मौंदू, द्विज म्हणजे ब्राह्मण, पक्षी, दात, असल्या अनेकार्थी शब्दावरील कोट्याहि जर्मन भाषेत उतरविल्या आहेत. तसेंच संस्कृत हिमालय व जर्मन Himmel, संस्कृत माया व जर्मन Magie या शब्दावर श्लेष करण्याचेंहि त्यानें धाडस केलें आहे. दुसरा एक संस्कृत कविकल्पनात गढून गेलेला जर्मन कवि म्हणजे हेनरिक हाइन हा होय. चंद्रकमळावर त्यानें एक स्वतंत्र काव्यच केलें असून इतर काव्यांत गगातीर, मृगांचे कळप, तमालराजी, मयूर, कोकिळा, वसंत,

गंधर्व वगैरे भारतीय कल्पना पेरून दिल्या आहेत."[१] संस्कृत वाङ्मयानें भारून गेलेल्या गटे, नीत्शे याचा उल्लेख मागें एका प्रकरणीं आलाच आहे.

संस्कृत वाङ्मयाची ही मोहिनी अद्यापही चालू आहे. हिंदु तत्त्वज्ञान, योगमार्ग, बुद्धधर्म, बुद्धचरित्र यानीं अर्वाचीन काळातहि पुष्कळ युरोपियनाचीं अंतःकरणें काबीज केलीं आहेत. अमेरिकेंत विवेकानंदानीं स्थापिलेल्या मठाचें वाढतें वैभव– मत्सर वाटण्याइतके वैभव– व हिंदु योगी म्हणून मिरविल्याने पैसा मिळतो हे पाहून निर्माण झालेले तोतये योगी याचा निर्देश मागे तिसऱ्या प्रकरणात आलाच आहे. इंग्लंड-अमेरिकेतील बड्या साहित्यिकाचा उल्लेख करावयाचा तर कार्लाईल, इमर्सन व शेली अशाचा करता येईल. कार्लाईलने भगवद्गीतेचें परिशीलन केलें होतें. आणि इमर्सन अमेरिकेहून त्याच्याकडे पाहुणा म्हणून आला होता तेव्हा कार्लाईलने त्याला आवडती भेट म्हणून दिली ती भगवद्गीता ! इमर्सनवर तिची किती छाप बसली हे इमर्सनें आपल्या एका कवितेचें नाव 'ब्रह्म' हें ठेवले यावरून कळून येईल. तसेच शेलीच्या " Life like a dome of many coloured glass, Stains the white radiance of eternity" आणि वर्डस्वर्थच्या "Our birth is but a sleep and a forgetting" या उक्तींतील वेदान्ती प्रतिबिंब आम्ल सुशिक्षिताना दाखवायला नकोच. संस्कृत वाङ्मयाच्या प्रसारामुळें आजच्या पाश्चात्य वाङ्मयात ब्रह्म, माया, कर्म, यज्ञ, ब्राह्मण, अवतार असे अनेक शब्द सराइताप्रमाणे वावरूं लागले आहेत. त्यापैकीं संस्कृतज्ञ असा पाश्चात्य भाषाशास्त्रज्ञाच्या 'गुण', 'वृद्धि' असल्या पारिभाषिक अपरिचित भारतीय शब्दानीं तर पाश्चात्य सनातनी वय्याकरण्याचें प्रारंभीं माथें फिरून टाकले होते असे एकानें लिहिलें आहे ![२]

बुद्धाचें अलौकिक चरित्र व उपदेश यांनीं तर अनेकाना मोहिलें आहे.

---

१. समग्र केळकर ११–६५.

२. 'Study of Language' by Jesperson p.66.

एड्विन आर्नोल्डनें आशियाचा धर्मदीप म्हणून जे बुद्धचरित्रपर महाकाव्य लिहिलें तें कल्पनेबाहेर लोकप्रिय झालें. त्याच्या किती आवृत्त्या इंग्लंडमध्यें निघाल्या असतील असें तुम्हास वाटतें! दहा-पाच ! छे! छे! थोड्याथोडक्या नव्हे चागल्या साठ आवृत्त्या निघाल्या ! आणि अमेरिकेंत तर आवृत्त्याच्या संख्येनें शतकाची मर्यादाहि ओलाडली ! बुद्धचरित्रावर नाटके रचण्याची स्फूर्तीहि काहींना झाली आणि अशा एका नाटकाचा प्रयोग जर्मनींतील म्यूनिक शहरीं सन १९०० मध्ये प्रत्यक्ष करून दाखविला. शोपेनहौर या जर्मन तत्त्वज्ञान्याला उपनिषदातील वेदान्तानें कसे मारून टाकलें होते याचा उल्लेख मागें आलाच आहे. बौद्ध तत्त्वज्ञानानें असेच ज्याला मारून टाकिलें होतें अशा एका प्रसिद्ध जर्मन व्यक्तीचा उल्लेख करावयाचा तर संगीतकोविद रिचर्ड वॅग्नर याचा करिता येईल. १८५९ मध्यें त्यानें आपल्या एका मित्राला लिहिलें कीं, "काय झालें, कसे झालें, कुणाला ठाऊक; पण मी बौद्ध बनलों आहे खरा!" दुसऱ्या एका मित्राला त्याने लिहिलें कीं, " खरे सागूं का ? बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा विचार केल्यानंतर बाकीचे सर्व धर्मपथ मला क्षुद्र व अपुरे वाटू लागले आहेत." वॅग्नरच्या यापुढील आयुष्यात त्याने जीं जीं पद्यें वगैरे रचलीं त्या सर्वांवर बौद्धिक तत्त्वज्ञानाची दाट छाया पडलेली आढळते. जर्मन वॅग्नरप्रमाणेंच डेन्मार्क देशातील कवि जेलर्प यानेंहि बुद्धचरित्रावर एक नाटक व एक काव्य लिहिले आहे. इटालीकडे नजर फेकली तर सॉलि यानें १९२४ मध्यें लिहिलेले बुद्धचरित्र पाहावयास सापडेल. १९३३ मध्यें विंटरनिट्झच्या संस्कृत वाङ्मयेतिहासाच्या इंग्रजी भाषातराचा दुसरा खंड प्रसिद्ध झाला. त्यांत वॅग्नर वगैरेंची वरील हकीकत देऊन तो लिहितो कीं,"अद्यापहि बौद्ध वाङ्मयात असा पुष्कळ भाग आहे कीं जो युरोपिअन मार्गात अवतरला जाऊन जागतिक वाङ्मयाचा भाग होण्यास लायक आहे. (पान ४२३).

इराणचें ऋण

येथवर भारतीयांनीं जगाला काय दिलें तें पाहिलें. आता त्यानीं इतरांपासून काय घेतलें हेंहि थोडें पाहूं या. प्राचीन भारतीयानीं बाहेरील

जगाला अनेक चिजा पुरविल्या तशा थोड्या बाहेरून स्वीकारल्या, आणि परकीयांचें ऋण मोकळ्या मनाने मान्यहि केलें. हिंदुस्थानच्या इतिहासावर व संस्कृतीवर ज्या अनेक परकीय संस्कृतींचा परिणाम झाला त्यात ऐतिहासिक कालात इराणचे स्थान कालक्रमानें पहिलें होय. इराणवर इस्लामी चाद सातव्या शतकात फडकूं लागल्यावर पुष्कळ पारसी कुटुंबे संजाणा बंदरावर आश्रयास आलीं हीं गोष्ट विश्रुत आहे. पण इराण व हिंदुस्थान याचा संबंध यापेक्षा फार प्राचीन असून इसवी शकापूर्वी सहाव्या शतकात इराणचा प्रख्यात सम्राट् दरायस याने हिंदुस्थानवर स्वारी केली होती हें ग्रीक इतिहासकार हिगेडोट्स यानें लिहून ठेवल्यामुळे प्रसिद्धच आहे. शिवाय दरायसचा बेहिस्तानचा लेख उपलब्ध झाला आहे, त्यात त्याच्या ताब्यात असलेल्या तेवीस प्रातामध्ये गाधार किंवा पेशावर-रावळपिंडीच्या प्रदेशाचा उल्लेख आहे.[1]

इराणचा हिंदुस्थानशीं अनेक शतके हा जो संबंध आला त्याची आठवण कायम राहील अशा काहीं खुणा राहून गेल्या आहेत. या विषयासबंधीं डॉ. केतकर यानीं 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथात पुढीलप्रमाणें अनुमाने माडलीं आहेत: इराणी लोकानीं मथुरेजवळच्या भागावर जेव्हा अधिराज्य स्थापन केले तेव्हा त्यानीं येथील मूळ भाषा जी शूरसेनी तिच्यावर आपल्या पारसी भाषेचे आक्रमण करून एक नवीन भाषा निर्माण केली तींच 'पैशाची' भाषा होय. याच प्रदेशामध्यें पुढें मुसलमानानीं अशीच मिश्रभाषा उर्दू निर्माण केली हे अर्वाचीन इतिहासात प्रसिद्ध आहे. इराण्याच्या या पैशाची भाषेला येवढे वैभव व महत्त्व प्राप्त झाले कीं एके काळीं महत्त्वाचे ग्रंथ पैशाचींत लिहिले जात असावेत. निदान असा एक थोर महत्त्वाचा ग्रंथ या भाषेत लिहिला गेला तो 'बृहत्कथा' हा ग्रथ होय. गुणाढ्यानें पैशाचीमध्यें लिहिलेला हा ग्रंथ आज फक्त सस्कृत रूपातरांत उपलब्ध आहे; पण तो मूळ पैशाची भाषेंत होता असे उल्लेख आहेत. इराण्याचे धर्मगुरु जे 'मग' ते तर हिंदुस्थानात फार पूर्वीपासून म्हणजे कदाचित् वेदपूर्वकालापासून असावेत. मगध देशात त्यांची मुख्य वस्ती

१. Select Inscriptions p. 5 by D. C. Sirkar.

असावी. जरासंध असुर हा मगधातलाच. असुर शब्दावरून तो सुद्धा बाहेरचा असावा. मगाच्या भिन्न संस्कृतीमुळें वैदिकाचे व त्याचें पटत नसावें. यामुळें मगधात ताप जावो असा उल्लेख अथर्ववेदात आहे. पुढे या लोकाना प्रतिष्ठा मिळाली असावी. नतर ते **शाकद्वीपी ब्राह्मण** म्हणून पुढे प्रसिद्धि पावले व ज्योतिषी, मूर्तिकार व वैद्य म्हणून समाजात स्थिर झाले. मगाच्या अनेक टोळ्या निरनिराळ्या काळीं हिंदुस्थानात आल्या असाव्यात. पैकीं एकीला सन्मानपूर्वक मुद्दाम बोलावून आणलें होतें याविषयीं भविष्यपुराणातील कृष्णपुत्र साब याची कथा साक्ष देण्यास उभी आहे. या कथेंत असें वर्णिले आहे कीं साबाच्या रूपावर कृष्णस्त्रिया भाळल्या व त्यामुळें कृष्णास राग येऊन त्यानें साबास तू कुष्ठरोगी होऊन विरूप होशील असा शाप दिला. हा रोग बरा करण्यात मग ब्राह्मणाचा हातखंडा असल्याची त्या काळी कीर्ति असावी. म्हणून साब्राने शाकद्वीपाहून मगाना मुद्दाम बोलावून आणले व त्याना गावे इनाम लावून दिलीं.

शाकद्वीपं मया गत्वा आनीता मगपुंगवाः
सत्कृत्य पूजयित्वा तु पुरं तेषा समर्पितम् ॥

या मग ब्राह्मणानीं साबाचा कुष्ठरोग बरा केला. त्यामुळे त्याना यादवाच्या मुली देऊन त्याचे हिंदुस्थानात बस्तान बसवून दिलें. शाकद्वीपाहून आलेल्या ब्राह्मणात तीन जाती होत्या. त्या मग, भोजक व सोमक या होत. शाकद्वीप म्हणजेच शकस्थान व इराण मिळून होणारा प्रदेश. शकस्थान अथवा सिथिया हा शकलोकाचा प्रदेश इराणच्या उत्तरेस आहे व त्यातील बल्क शहर हे एके काळीं इराणी साम्राज्याचेंहि प्रमुख स्थान होते. मग हे उपाध्याय इराणी लोक व शकलोक या दोघाचेंहि उपाध्येपण करीत. उदेपूरचा राणा हा शकवंशीय असावा व त्याचेबरोबर आलेले मग लोक हे पुढें श्रीमाळी ब्राह्मण या नावाने ओळखले जाऊं लागले असावे. आपणास शाकद्वीपी ब्राह्मण म्हणणारा वर्ग उत्तर हिंदुस्थान व गुजराथ-कच्छ या ठिकाणीं आहे. मगानीं भोज अगर भोयी लोकाच्या कन्या केल्या तेव्हां मगांस भोजक हें नाव प्राप्त झालें असावें. अंगिरस ब्राह्मण म्हणूनहि हे काहीं ठिकाणीं ओळखले जातात. वैद्यक, भविष्य व मूर्तिशिल्प हा

त्याच्या धंद्याचा वर उल्लेख केलाच आहे. नटवर्गातहि यांचा प्रवेश असावा. भरतकृत नाट्यशास्त्रात ज्या पूर्वाचार्यांचीं नावे आहेत त्यात एक नाव कृशाश्व असे आहे. हे नाव केरशास्य या नावाचें संस्कृत रूप असावें. हा तर्क खरा असल्यास हिंदुस्थानात आलेल्या इराणी लोकानीं भारतीय नाट्यकलेवरहि परिणाम केला असावा असें म्हणावे लागेल. भोजक नावाचा ज्योतिषीवर्ग हा मूळ मगच होय याविषयीं हर्षचरिताचा (चतुर्थ उल्लास) टीकाकार शंकरभट्ट याची साक्ष आहे. तो लिहितो, "भोजका रविमर्चयित्वा पूजका हि भूयसा गणका भवन्ति ये मगाः इति प्रसिद्धाः।"

अशा प्रकारे डॉ. केतकर यानीं आपले तर्क माडले आहेत. शाकद्वीप म्हणजे नक्की कोणता प्रदेश हे सागणें कठीण आहे. म्हणून केतकराचे तर्क हे संभाव्य तर्क या नात्याने नमूद करण्यासारखे तेवढे आहेत.

पंजाबातील खरोष्ठ्र लिपि आणि शिल्पकलेतील सिंहशीर्षक या गोष्टीहि इराणातून आल्या असाव्यात असे पाटलिपुत्राचें उत्खनन करणारे डॉ. स्पूनर याचें मत आहे.

ग्रीकांचें ऋण

इराणी लोकाच्याप्रमाणे ग्रीक लोकाचाहि हिंदुस्थानवर काहीं काल अमल होता. शिकंदराची हिंदुस्थानवरची स्वारी प्रसिद्धच आहे. ह्या स्वारीत हिंदूंचा राजा पोरस याचा पराभव झाला तरी सिंधू नदीच्या अलीकडे फारसे दूरवर शिकंदराला येता आलें नाहीं. पोरसाचा पराभव झाला तरी इतर अनेक लहानसहान पण शूर व लढवय्या लोकाचीं राज्यें या प्रांतात होतीं व त्या सर्वांशीं लढण्याच्या कल्पनेने शिकंदराच्या सैन्यानें हातपाय गाळले व त्यामुळे त्याला सिंधुतटावरूनच काढता पाय घ्यावा लागला, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. शिकंदराच्या नंतर दुसरी महत्त्वाची यवनाची स्वारी मिनँडर याची. शिकंदराच्या स्वारीचा उल्लेख भारतीय वाङ्मयात सापडत नाहीं. पण मिनँडरच्या स्वारीचा उल्लेख खुद्द पंतजलीच्या महाभाष्यातच आलेला आहे, तो 'अरुणत् साकेतं यवनः'[1] म्हणजे यवन राजाने साकेत अथवा अयोध्या

१. पाणिनी ३.२.३. भाष्य.

या नगरीला वेढा घातला अशा स्वरूपाचा आहे. या उल्लेखातील यवन राजा हा मिॅनडर असावा असे सामान्यपणें मानण्यात येतें. काहींच्या मतें (रायचौधरी) तो डिमिट्रियस असावा. कोणीहि असला तरी मथुरेला वेढा देण्याइतके यवन आंतवर आले होते हे स्पष्ट आहे. या ग्रीक अमदानीच्या कालात ग्रीक लोकाचा आणि भारतीयाचा निकट सनिकर्ष झाल्यावर दोन्ही संस्कृतींत जी देवाण-घेवाण झाली तिच्यासबंधीं युरोपियन ग्रंथकारानीं प्रथम प्रथम तरी अट्टाहासानें असें प्रतिपादन केले आहे कीं, येथें भारतीय सस्कृतीनेच सर्वतोपरी उसनवारी केली असली पाहिजे; शास्त्र-विद्या, कला वगैरेपैकीं कोणतेहि क्षेत्र घेतले तरी ग्रीक हे धनको आणि भारतीय हे ऋणको असाच या दोहोचा सबध असावा; धर्मतत्त्वज्ञान, दैवते येथपासून तो वैद्यक, गणित, ज्योतिष, व्याकरण वगैरे शास्त्रे व काव्य, नाटक, वास्तुशिल्प, मूर्तिशिल्प, नाणीं इत्यादि कलापर्यंत सर्व विषय शिकण्यास भारतीय हेच ग्रीकाच्या पाठशालात धूळपाटी घेऊन गेले असावे. पुराणवस्तुखात्याने प्रथम प्रथम उत्खनन केले तेहि पेशावर, गाधार या बाजूला म्हणजे ग्रीक लोकाचा अम्मल ज्या प्रदेशावर जास्तींत जास्त कालावर होता त्या भागात. हेतु हा कीं, ग्रीकाचें म्हणजे युरोपियन सस्कृतीचें वर्चस्व दाखवून आपल्या प्राचीन संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान जागविणाऱ्या भारतीयाना हिणविता आले तर पाहावे.[1]

उलट प्रतिक्रिया म्हणून येशू ख्रिस्त हा तामिळी होता; गुजराथ हा एकेकाळीं द्रविड देशाचा भाग असून तेथील पालीठाण्यावरून पालेस्टाइन हें नाव दिलें असावे; इंग्लंडातील हेराड हे मूळचे हिंदुस्थानातील रेड्डी असावे असे एम्. एस्. रामस्वामी यानीं,[2] व इंग्लंडमधील जुना ड्रुइडपथ व तामीळ प्रातातील शैवपंथ यात लिंगपूजादि विषयात साम्य असल्याने इंग्लंडमधील जुने रहिवासी हे तामीळ प्रातातले असावे असें गोपाळ चेट्टी

१. यांपैकीं बहुतेक क्षेत्रातील भारतीयांची उसनवारी ही कशी काल्पनिक व असत्य आहे हें गौरांगनाथ बानर्जी यांनीं आपल्या Hellenism in Ancient India या पुस्तकात सविस्तर दाखवून दिलें आहे.

२. Was Christ a Tamilian ?

यानीं,[1] आणि ग्रीकानीं आपली सर्व संस्कृति भारतीयापासून घेतली असें पोकॉक यानें प्रतिपादलें आहे. पोकॉकने तर ग्रीक संस्कृति ही भारतीय संस्कृतीची कन्या होय हे मत 'इंडिया इन् ग्रीस' या पुस्तकात मोठ्या आवेशानें माडले आहे. कृष्णाचा बंधु बलराम हा हिमालयात निघून जाऊन बेपत्ता झाला तो नंतर बहुधा ग्रीसमध्ये गेला असावा असें तो म्हणतो. ग्रीकाचा सूर्य देव अपोलो हा दुसरा कोणी नसून त्याच्यामते पाडव असावा. कारण अपोलोला (Kynthius) कायंथियस असें म्हटले आहे. आणि कायंथियस म्हणजे कोण ? तर कौतेय पाडव ! आणि ग्रीक वाङ्मयांत Lacman आणि Lughman हीं नावे येतात तीं रामाचा बंधु जो लक्ष्मण त्याच्याच नावाचे अपभ्रंश होत. स्कॅंडिनेव्हिया म्हणजे नॉर्वे व स्वीडन या प्रातातहि भारतीय क्षत्रिय वीर गेले होते. कारण स्कँडनेव्हिया म्हणजे स्कदनाभि ! असे पोकाकचे सिद्धान्त आहेत. काल्पनिक भाषा-साम्याच्या ठिसूळ पायावर उभारलेलीं असलीं मतें केवळ मौजेचा विषय म्हणून ऐकून ठेवावयाचीं असतात हें सागावयास नकोच.

असले तर्क सोडले तर नाणीं पाडण्याची कला, पुतळे करण्याची कला व ज्योतिषविद्या या क्षेत्रामध्ये भारतीयानीं ग्रीकाच्यापासून काहीं गोष्टी उचललेल्या आहेत हे मान्य केले पाहिजे. या तिन्ही विद्यात ग्रीकाचा संबध येण्यापूर्वी भारतीयाची गति नव्हती असें नव्हे. या तिन्ही विद्यात त्यानीं प्रगति केलेली होती, पण ग्रीक लोकाच्यापासून या विद्यात शिकण्यासारखे आहे असें पटल्यावर संग्राहक वृत्तीने भारतीयानीं ग्रीकाच्या विद्येतील उपकारक भाग आत्मसात् केला. ग्रीक व रोमन लोकाचा संबंध येण्यापूर्वी हिंदुस्थानात रुप्याच्या व सोन्याच्या नाण्यांचा प्रसार होता; पण त्याचा आकार, त्यावरील चित्रें व लेख हीं ओबडधोबड असत. ग्रीक व रोमन नाण्याचा प्रचार हिंदुस्थानात सुरू झाल्यावर मात्र हिंदुस्थानातहि त्या तन्हेचीं सुंदर गोलदार नाणीं पाडण्यात येऊं लागलीं. ग्रीकाचा अंमल हिंदुस्थानांतून नष्ट झाल्यावरहि पुढें शेदोनशे वर्षें हिंदुस्थानात जीं नाणीं पाडीत त्यावरहि ग्रीक लिपींत लेख असत यावरून एतद्विषयक ऋण

१. Saivism, the religion of the Ancient Britons

लक्षात येईल. खुद्द ग्रीक अंमलामध्यें एका बाजूला ग्रीक लेख व दुसऱ्या बाजूला हिंदु दैवत् जे शिव त्याची प्रतिमा अशा प्रकारचीं नाणीं पाडीत असत. अशीं पुष्कळ नाणीं उपलब्ध झालीं आहेत.

नाणककलेच्या जोडीला दुसरी कला म्हणजे मूर्तिकला. या कलेंतील ग्रीक लोकाचे प्रावीण्य त्या वेळच्या जगात अव्वल दर्जाचे होतें. हिंदु शिल्पकलेचा गाधारशिल्प म्हणून जो एक पंथ आहे त्या पंथाने निर्माण केलेल्या बुद्धाच्या प्रतिमा या ह्या ग्रीक शिल्पाच्या अनुकरणाने तयार झाल्या आहेत असे सामान्यतः मानण्यात येते. विशेषतः प्रतिमामध्यें वस्त्राच्या चुण्या हुबेहूब दाखविण्यात जे कौशल्य लागते तें ग्रीक शिल्पाच्या अनुकरणानें आपल्यात आले असावे याविषयीं साधारण एकमत आहे. या गाधारशिल्पाचा विशेष प्रसार मात्र झाला नाहीं. अखिल भरतखंडात सर्वत्र ज्याचा प्रसार झाला ते शिल्प मथुरेचें होय. बुद्धाच्या प्रतिमेवरहि ग्रीकाचा परिणाम झाला नसावा व ती सर्वस्वीं भारतीयच असावी असे आनंद-कुमारस्वामींनीं प्रतिपादिलें आहे.[1] सारनाथ येथील सुप्रसिद्ध बुद्धाच्या मूर्तीविषयीं स्मिथहि म्हणतो कीं हिचा घाट ग्रीक नसून अगदीं स्वतंत्र आहे.[2] अर्थात् ग्रीक शिल्पाचा भारतीय मूर्तिशिल्पावर परिणाम झाला तो मर्यादित स्थलकालींच तेवढा झाला आहे असें म्हटले पाहिजे.

हिंदूंच्या वास्तुविद्येवरहि ग्रीकाच्या शिल्पाचा परिणाम झाला असावा असें पाटलिपुत्राचें उत्खनन करणारे डॉ. स्पूनर याचे मत आहे. पाटलिपुत्र येथें उत्खननात अवशेष सापडले आहेत त्यावरून तेथल्या इमारतींत पूर्वी अनेक खाब असलेला मोठा दिवाणखाना असावा व तो पर्सिपोलिस येथील शतस्तंभी दिवाणखान्याच्या धर्तीवर असावा असें स्पूनरचें म्हणणें आहे. खाबामधील अंतरहि दोन्ही ठिकाणीं एकच म्हणजे दहा दहा क्युबिटाचेंच आहे.

---

१. Am. O Journal June 1926.

२. History of Fine Art p.170.

ग्रीक ज्योतिष

ग्रीकाच्या ऋणातील तिसरी व अधिक महत्त्वाची गोष्ट ही ज्योतिषशास्त्रातील होय. या शास्त्रातील काही कल्पना भारतीयानीं ग्रीकाच्याकडून घेतल्या हें खुद्द भारतीयानींच प्राजलपणें लिहून ठेवले आहे. पण या प्राजलपणाचा गैरफायदा घेऊन कांहीं पाश्चात्यानीं असा सिद्धान्त ठोकून दिला होता कीं ज्योतिषशास्त्रच भारतीयानीं ग्रीकाच्यापासून उसने घेतलें असलें पाहिजे ! मागे दुसऱ्या प्रकरणात सूर्यसिद्धाताचा भाषातरकार व्हिट्ने याचा अभिप्राय उद्धृत केला आहे त्यात अवलोकनाची व शुद्ध तार्किक विचारसरणीची सवय नसलेल्या भारतीयाच्या मेंदूतून ज्योतिषशास्त्र निघणेंच अशक्य आहे असलीं मुक्ताफळे आलेलींच आहेत. सस्कृत वाङ्मयाचा इतिहासकार वेबरहि लिहितो कीं, " भारतीय ज्योतिषात खरा जोम उत्पन्न झाला असेल तर तो ग्रीकाशीं सबंध आल्यावरच; आणि याविषयीं त्यानींच कबुली दिली असल्यानें बाकीच्या शास्त्राचीहि हीच स्थिति असावी." (पृ. २५१)

पण या बाबतींत व्हिटने, बर्जेस, थिबो वगैरे अनेक पाश्चात्य विद्वानाचे मताचे परीक्षण करून 'भारतीय ज्योतिषशास्त्र' या आपल्या बहुमोल ग्रथात दीक्षित लिहितात कीं, ' ग्रीकापासून आम्हीं काहीं घेतले असेल तर तें टालमी व हिपार्कस याच्यापूर्वीच घेतले असले पाहिजे. पण यांच्यापूर्वी ग्रीकाचे होते काय ? रविचद्रस्पष्टीकरण आणि पंचग्रहस्पष्टीकरण ही काय ती ज्योतिषात महत्त्वाची गोष्ट. हिचे ज्ञान हिपार्कसच्या पूर्वी पाश्चात्यांस मुळींच नव्हतें असें सर्व युरोपियन कबूल करतात' (पृ. ५१२). येथें ज्योतिषशास्त्राची स्थापना मूळची हिंदूंचीच येवढें दाखविण्याचा दीक्षिताचा मानस आहे. भारतीयाच्या ज्योतिषशास्त्रात ग्रीकाच्या व इतराच्या ज्योतिषाने काहींच भर टाकली नाहीं असे त्याना म्हणावयाचे नाहीं. उदाहरणार्थ, ताजिक हें यवनापासून घेतले असें त्यानींच लिहिलें असून त्यास पुरावा म्हणून 'यवनाचार्येण पारसीकमाषया प्रणीतं ज्योतिःशास्त्रैकदेशरूपं ताजिकशब्दवाच्यं' व 'गर्गाद्यैः यवनैश्च रोमकमुखैः सत्यादिभिः कीर्तितं शास्त्रं ताजिकसंज्ञितं ' ॥ अशीं अनुक्रमें हायनरत्न व ताजिक-

भूषणपद्धति या सोळाव्या सतराव्या शतकातील ग्रंथातील वचनें उद्धृत केलीं आहेत (पृ. ४९०). तसेच सात वारासबंधीं ते लिहितात कीं, " सर्व गोष्टींचा विचार करता मला असे वाटते कीं, सात वार हे मूळचे आमचे नसून खाल्डियातून आमचेकडे आले " (पृ. १३८). शामशास्त्री याना हें मान्य नाही. त्याचें असे म्हणणे आहे कीं, सप्तग्रह व त्याशीं सबद्ध असलेलीं सप्तवाराचीं नावे मूळचीं आमचींच होत. याचे कारण ते असे देतात कीं, ग्रह हा शब्द पूर्वी सोमपात्राला लावीत असत व गणपतीचें प्रतीक म्हणून जशी आपण सुपारीची स्थापना करतो तशी ग्रहाचीं प्रतीके म्हणून सोमपात्राची स्थापना करीत असत. हे गृह व त्याशीं सबद्ध असलेले सप्तवार हेहि आमचेच असावेत.[1]

म्लेच्छ ऋषि ?

ते कसेंहि असो, मूळ ज्योतिषशास्त्र आमचे स्वतत्र असले तरी काहीं काल ग्रीक ज्योतिषाचें अध्ययन भारतीय पंडित करीत असत याविषयीं या पंडितानींच लिहून ठेवले आहे. उदाहरणार्थ, त्याच्या दोन सिद्धान्तग्रंथास नावें आहेत तींच मुळीं रोमक सिद्धान्त व पौलिश सिद्धान्त अशीं आहेत. तसेच पचसिद्धातिकेत एके स्थळीं यवनपुरापासून उज्जयिनीचे अतर सागितलें आहे; आणि सूर्यसिद्धाताच्या काहीं पोथ्यात तर रोमकनगरात म्लेच्छावतारूपाने तुला ज्योतिषज्ञान देईन असे सूर्यानें मयास सागितलें अशा अर्थाचा श्लोक आला आहे. 'मदंशः पुरुषोऽयं ते निःशेषं कथयिष्यति । रोमके नगरे ब्रह्मशापान्म्लेच्छावतारधृक् ।' (दीक्षित, पृ. १७८)[2] तसेंच आपल्या जातकग्रथात अनेक यावनी सज्ञा आढळतात त्यावरूनही आपल्या जातकाच्या जोडीला यावनी जातकाचीहि एके काळीं आपल्या देशात

---

१. Bhandarkar Annals Vol. IV.

२. ज्योतिर्विद रा. पटवर्धन याच्या सूर्यसिद्धाताच्या आवृत्तीत रोमक नगराचा उल्लेख नाहीं. पण मय या असुराचा आहे. त्यावरून असीरियातूनहि या विद्येतील कांहीं भाग भारतीयांनी घेतला असावा असें अनुमान निघतें. पटवर्धनांनीं मात्र असुरांनींच ही विद्या भारतीयाच्यापासून हस्तगत केली असावी असें अनुमान

चलती होती हें स्पष्ट दिसून येतें. बृहज्जातकात सुमारे छत्तीस ग्रीक संज्ञांचा उल्लेख आहे असे दीक्षित लिहितात. त्या म्हणजे क्रिय, तावुरी, जितूम, कुलीर, लेप, पाथेन, जूक, कौर्य, तौक्षिक, आकोकेर, हृद्रोग व डत्थम या राशींच्या संज्ञा; रिफ्फ, द्यून, केंद्र, पणफर, अपोक्लीम, हिबुक, यामित्र, त्रिकोण, भेषूरण, वेशि ह्या कुंडलींतील स्थलाच्या सज्ञा; होलि, हेम्न, आर, कोण, आस्फुजित् या ग्रहाच्या संज्ञा; तसेच होरा, द्रेष्काण हे राश्यंश; सुनफा, अनफा, दुरुधर, केमद्रुम हे चद्रापासून ग्रहाचे योग; लिह्या म्हणजे कला आणि ज्यौ व द्युत या होत. या छत्तीसापैकीं मेषादि बारा राशी, सप्तग्रह व कुंडलींतील बारा स्थानें याना पर्यायशब्द सस्कृतमध्ये आहेत. पण ग्रीक ज्योतिषाची चलती असल्यामुळे संस्कृत शब्दाच्या जोडीला ग्रीक शब्दही दिलेले आहेत. होरा, द्रेष्काण, सुनफा, अनफा, दुरुधर, केमद्रुम "यास मात्र संस्कृत पर्यायशब्द नाहींत हे सर्व शब्द मुख्यतः जातकस्कंधात येतात. यावरून ग्रीक ज्योतिषाचें जे ऋण आहे ते मुख्यतः फलज्योतिषासबधीं आहे असे दिसतें." आपल्या पूर्वजानीं ग्रीक जातकाचे हे ऋण ज्या निःसकोच वृत्तीनें मान्य केले आहे त्यावरून त्याची उदारदृष्टि स्पष्टपणें नजरेत भरते. यासबधी वराहमिहिरानें आपल्या बृहत्सहितेंत गर्गाचार्योचा एक श्लोक उद्धृत केला आहे त्यात गर्गाचार्य लिहितात :

काढलें आहे. पण तें प्रशस्त वाटत नाही. एखाद्या भारतीय ज्योतिर्विदाजवळ मयानें या विद्येचे अध्ययन केलें असते तर त्या ज्योतिर्विदाचे नाव प्रामुख्याने उल्लेखिलें गेलें पाहिजे होतें. मयानें तें सूर्यापासून आत्मसात् केलें हें सागण्यात स्वारस्य नाही. ग्रंथाच्या आरंभींच हा श्लोक आला आहे. तेथें मूळ आचार्याचें नाव न देता त्याच्या परकीय शिष्याचा उल्लेख प्रामुख्याने येण्याचे कारणच नाही. मयाच्या तपानें सतुष्ट होऊन सूर्य म्हणाला माझाच अश ज्याच्यात आहे असा हा पुरुष तुला सर्व काहीं कथन करील. 'मदशः पुरुषोऽयं त निःशेषं कथयिष्यति' या उक्तींत हा पुरुष भारतीय आहे याविषयींही कोणताच उल्लेख नाही. मयाचा मात्र महा असुर असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून अनुमान काढावयाचें तर ते असीरियातून ह्या विद्येचा कांहीं भाग भरतखंडांत आला असावा असेंच निघत नाही काय ?

म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रं इदं स्थितम्
ऋषिवत् तेऽपि पूज्याः स्युः किं पुनर्दैववित् द्विजाः ॥

म्हणजे म्लेच्छ जे यवन त्यांच्यामध्ये हें शास्त्र चांगलें सुप्रतिष्ठित असल्यानें तेहि ऋषिवत् पूज्य होत ! गर्गाच्या या उक्तीचें मर्म पूर्णपणें लक्षांत येण्यास हें आणखी सांगितलें पाहिजे कीं, यवनानीं भरतखंडावर स्वारी करून अयोध्येपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेतला असताहि गर्गानें वरील उद्गार काढलेले आहेत. परक्यानीं आपल्यावर आक्रमण करावें याबद्दल गर्गाला खेद वाटत नव्हता असेंहि नव्हे. कारण या आक्रमणशील परकी यवनांबद्दल दुष्ट असा शब्द त्यानें वापरला आहे. 'यवनाः दुष्टविक्रान्ताः प्राप्स्यन्ति कुसुमध्वजम्।'[१] यवनाप्रमाणें शक नावाच्या परक्यानींहि हिंदुस्थानावर आक्रमण केलें होतें आणि त्याच्या राजाचीहि संभावना गर्गानें दुष्ट, पापी, लोभी अशा शब्दांनींच केली आहे. 'शकाना च ततो राजाह्यर्थलुब्धो महाबलः। दुष्टभावश्च पापश्च विनाशे समुपस्थिते ॥ कलिंगं शतराज्यार्थे विनाश वै गमिष्यति। ५३. अर्थात् परकीयाच्या लोभमूलक आक्रमणाबद्दल तिरस्कार वागवूनहि त्यांची विद्या आत्मसात् करण्याविषयीं जागरूकता राखली पाहिजे हें धोरण गर्गानें स्वीकारलें होतें. आणि ते आजहि उपयोगी ठरण्यासारखें होतें. हें धोरण कालांतरानें ढिलें झालें. 'आप्तोपदेशः शब्दः' असें न्यायसूत्र आहे त्यावर पाचव्या शतकातील भाष्यकार वात्स्यायनानें 'आर्याना म्लेच्छाना समानं लक्षणम्' असें लिहिलें आहे. पण उत्तरकालीन विश्वनाथाच्या वृत्तींत म्लेच्छ शब्द गाळलेला आहे. (चौखंबा सीरीज पान २६). पुढे पुढें मोंवतालच्या जगांत चाललेल्या चळवळीकडे नजर ठेवण्याची जागरूकता लोपली, स्वतःच्या सामर्थ्याविषयीं भलत्या कल्पना उद्भवल्या आणि त्यामुळें परकीयाच्या आक्रमणाला तोंड देण्यास असमर्थ होऊन जगाच्या मागें आपण कसे मागें पडलों तें पुढें यथावकाश पाहूं.

प्राचीन भारतीयांनीं परकीयांच्या संस्कृतींतून कोणत्या विद्या, कला उचलल्या हें आतापर्यंत पाहिलें. असल्या किरकोळ परकीय उसनवारीनें

१. गर्गसंहिता श्लो. ३२ (B. O. R. S. 1928).

संस्कृतीच्या प्रकृतींत बदल होत नाहीं. तेव्हा आता अशा भागाकडे वळूं या, की जेथें भारतीय संस्कृतीच्या अंतरंगांतील खळबळ दिसूं लागून ती संस्कृति अनेक वंशविचाराचार यांच्या मिश्रणानें कशी गंगाजमनी स्वरूपाची बनलेली आहे हें उमगू लागेल; आणि हें मिश्रस्वरूप बनत असता तिच्यात कोणते गुणविशेष आणि दोषविशेष उद्भूत झाले याचीहि कल्पना येईल.

प्रकरण अकरावें

भारतीय संस्कृतीचें गंगाजमनी स्वरूप

गेल्या प्रकरणीं आपण पाहिलें कीं, आपले पूर्वज विद्येच्या बाबतींत संग्राहक वृत्तीचे होते. असीरिया, इराण, ग्रीस वगैरे देशातील जी विद्या ग्रहणयोग्य वाटली ती त्यानीं मोकळ्या मनानें स्वीकारली. आता या प्रकरणात आपली संस्कृति ही आज वर वर दिसते तशी एकजिनसी, अखंड नसून अनेक ठिकाणच्या मालमसाल्यानीं आपल्या पूर्वजानीं ती कशी बनवीत आणलेली आहे हें पाहावयाचें आहे. आणि हें पाहणें फार अगत्याचें आहे. कारण आज आपल्यापुढें प्रश्न आहे तो बदलत्या युगधर्मानुरूप कोणकोणत्या कल्पना आपल्या संस्कृतींत नवीन रुजवावयाच्या अथवा पूर्वीच्यापैकीं कोणत्यांचा जीर्णोद्धार करावयाचा व तिला बळकट आणि जोरकस करावयाची हें पाहण्याचा आहे. आता नव्या कल्पनाचें किंवा जुन्याच पण आठवण बुजलेल्या कल्पनाचें स्वागत करण्याचा प्रसंग आला कीं अपरात्रीं दार उघडताना मन कचरतें तसा प्रसंग ! अशा ठिकाणीं पूर्वदाखला मनाला धीर देतो. तेव्हा इतिहासाला विचारूं या.

तो सांगेल कीं, "आज तुम्ही सर्व हिंदुस्थानची मिळून एक संस्कृति अशी भाषा बोलता ना ! पण प्रथम मी तुम्हाला असें सांगतों कीं, आजचा काशीपासून रामेश्वरापर्यंतचा हा सर्व प्रचंड देश फार प्राचीन काळीं सर्वच्या सर्व एका संस्कृतीखालीं नव्हताच मुळीं. कित्येक शतकांच्या संस्कृतीकरणप्रक्रियेनें त्याचे अनेक भाग एकसंध बनत बनत आलेले आहेत. आणि या अफाट देशातील लोक ! तेहि एक प्रकारचे नव्हत. म्हणजे हिंदूंमध्यें अठरापगड जाती आहेत येवढ्याच अर्थी नाहीं मी हें म्हणत, तर आजच्या हिंदुसमाजांत नाना प्रकारच्या वंशाचें रक्त खेळत आहे त्याला उद्देशून.

आणि आजचे सर्व धार्मिक आणि लौकिक आचारविचारहि तुम्ही वैदिक समजतां ना ? तर तेहि खऱ्या स्वरूपानें वर्णन करावयाचें म्हणजे वैदिक व अवैदिक याचे मिळून बनलेले आहेत. पूर्वी क्षत्रिय राजे उपाध्यायांचीं गोत्रें लावीत असत; तसें आपली संस्कृति आज आपलें गोत्र वैदिक म्हणून सागते हें खरें. पण तिचा व्यवहार पाहिला तर तो वैदिक आर्यांच्या बाहेरील द्रविडादिकाच्या आचारविचारानीं भरपूर भरलेला आढलेल. शिवाय या संस्कृतीवर इराणी, ग्रीक, मोगली या संस्कृतींचाहि थोडाफार परिणाम झाला आहे तो निराळाच. हा सर्व गोतावळा लक्षांत घेतलात म्हणजे आजच्या तुमच्या संस्कृतीचें मिश्र स्वरूप तुमच्या लक्षात येईल. आणि त्याचें वर्णन तुमच्या गंगाजमनी या रूढ शब्दानेंच उत्तम होतें. गंगेचें शुभ्र जल आणि यमुनेचें नील जल या दोहोंच्या मिलाफानें निष्पन्न होणारें विविधरंगी स्वरूप गंगाजमनी शब्दानें सूचित केलें जातें. तोच प्रकार हिंदुसस्कृतीचा होय. आजच्या या संस्कृतींतील मुख्य एकरूप झालेले दोन प्रवाह म्हणजे श्वेतवर्ण आर्य आणि घनश्याम द्रविड यांच्या कामागिरींचें होय. म्हणूनच तुमची संस्कृति गंगाजमनी होय."

आपल्या संस्कृतीचें हेंच मिश्रस्वरूप आता थोडें न्याहाळून पाहूं या.

देशाच्या वाढत्या मर्यादा

आजची अखिलभारतीय संस्कृति हा अनेक शतकाचा परिपाक होय. वैदिक आर्य प्राचीन काळीं केव्हा तरी पंजाबात राहत असत. सिंधूच्या पूर्वेकडील सरस्वती नदीचा परिसर हा संहिताकाळीं वैदिकाचा पवित्र देश होता. सरस्वतीला ते नदीतमा, अंबितमा वगैरे विशेषणांनीं गौरवीत. 'पावका नः सरस्वती'(ऋ. १–३–१०). तेथून ते पुढें गंगायमुनाच्या काठीं सरकले. शतपथब्राह्मणकाळीं ते सदानीरा नदीच्या पलीकडे कोसल विदेहापर्यंत म्हणजे बिहारपर्यंत पसरले. ही भौगोलिक माहिती शतपथब्राह्मण या ग्रंथानें एका रूपककथेनें नमूद केली आहे. ती अशी: 'विदेघमाधव नावाचा पुरुष तोंडांत वैश्वानर अग्नि बाळगीत असे. तो अग्नि एकदा त्याच्या मुखांतून खालीं पृथ्वीवर पडला. त्या वेळीं विदेघमाधव हा सरस्वतीच्या तीरावर होता. त्याच्या मुखातून निघालेल्या अग्नीनें सर्व नदीच्या काठचा प्रदेश

जाळून काढला. तो अग्नि जो धावत सुटला तो उत्तरगिरीपासून उगम पावणाऱ्या सदानीरेच्या तीरावर येऊन थाबला. त्याच्या पूर्वी या नदीपलीकडच्या प्रदेशात ब्राह्मण लोक जात नसत. कारण ती भूमि अग्नीनें अदग्ध व स्नावितर म्हणजे दलदलीची असल्यानें अक्षेत्रतर होती. पण विदेघमाधव तेथें गेल्यापासून आता सदानीरेच्या पूर्वेकडे कोसलविदेहापर्यंत लोक जाऊं लागले.'[1] सदानीरेच्या अथवा गंडकीच्या पूर्वेचा प्रदेश अग्नीनें अदग्ध होता याचा अर्थ तेथें वसाहत होऊन यज्ञ होण्यास प्रारंभ झाला नव्हता किंवा प्रदेश दलदलीचा असून अग्निसंस्काराने तो वसतियोग्य केला गेला नव्हता असा असावा.

याच शतपथब्राह्मणामध्यें सोमवल्लीच्या निरनिराळ्या प्रतिनिधि म्हणून ज्या वल्ली सागण्यात आल्या आहेत त्यावरूनही आर्यांच्या[2] पर्यटनाची कल्पना येते. हिमालयाच्या पायथ्यापासून आर्य जसजसे दूर जाऊं लागले तसतसें सोम मिळणें कठीण होऊं लागलें व सोमाच्या ऐवजीं दुसऱ्या वनस्पतींवर निर्वाह करावा लागूं लागला. त्याबाबत ब्राह्मणकार लिहितो कीं, 'सोम न मिळाल्यास अरुणपुष्पें घ्यावीं, तीं न मिळाल्यास श्येनहृत घ्यावें, त्याच्या अभावीं आदार घ्यावें, तेंहि न मिळालें तर अरुणदूर्वा घ्याव्यात, आणि दुसरें काहींच न मिळेल तर हिरवे दर्भ घ्यावेत.

होतां होतां हिमालयापासून विंध्यपर्वतापर्यंत त्यानीं आपला संसार थाटला. बरीच शतकेंपर्यंत विंध्यपर्वत हीच आर्य संस्कृतीची दक्षिणेकडील अभेद्य सीमारेषा कायम राहिली. त्याच्यापलीकडील दक्षिणापथ या सामान्य नावानें उल्लेखिला जात असलेला प्रदेश हा अरण्यव्याप्त घोर राक्षसाचा प्रदेश म्हणून गणला जाई. गौतमबुद्धाच्या व पाणिनीच्या काळापर्यंत सामान्यतः हीच स्थिति होती असें दिसतें. त्या वेळेला जीं सोळा महाजनपदें किंवा राज्यें होतीं म्हणून बौद्धग्रंथात (विनयपिटकादि) वर्णन आहे त्यांत विंध्याच्या दक्षिणेकडील एकहि नाहीं. पाणिनीच्या ग्रंथातहि अश्मकाखेरीज दक्षिण-

१. शतपथब्राह्मण १।४।१।१०.

२. शतपथब्राह्मण ४।५।१०.

प्रदेशाचा उल्लेख नाहीं. (४।१।१७३). याचा अर्थ विंध्याची मर्यादा ओलांडून कोणीच पलीकडे जात नसत असा नव्हे. ऐतरेयब्राह्मणात वऱ्हाडच्या भीम नावाच्या राजाचा उल्लेख आहे व विश्वामित्राच्या पुत्रांची संतति आंध्र, पुलिंद, शबर वगैरे वर्णिली आहे त्यावरून या काळीं दक्षिणप्रदेशाची ओळख दिसून येते. शूर, धाडसी व वसाहत करण्याची धमक असलेल्या लोकांनीं या मान उंच व ताठ करून वाट रोखून बसलेल्या विंध्याची पर्वा केली नाहीं. या धाडसी वसाहतकारापैकीं आद्य-वसाहतकार अगस्तिमुनि हा होय. त्यानें विंध्यापलीकडील अज्ञात घनदाट अरण्यात प्रवेश केला आणि वातापि, इल्वल वगैरे राक्षसाचा निःपात करून वसाहत केली. प्राचीन तामिळ ग्रंथात वर्णन आहे कीं, विंध्य ओलांडल्यावर अगस्त्यमुनि गुजरायेंत द्वारकेस गेले व तेथून अठरा राजघराण्यां-तील राजपुत्र बरोबर घेऊन दक्षिणेंत प्रवेश करिते झाले. त्याना बारा शिष्य असून प्रत्येकानें तामिळ भाषेचें व्याकरण रचिलें.[1] या ऋषिवर्याचा पराक्रम पुढे राष्ट्राला मान्य झाल्यावर त्यानें विंध्यपर्वताला आपणापुढें दंडवत घालावयास लावलें अशी काव्यमय आख्यायिका पुराणकारानीं रचिली. आणि त्याहीपेक्षा या धाडसी आद्य वसाहतकाराची स्मृति अक्षय अखंड टिकावी म्हणून दक्षिणेकडील एका अत्यंत तेजस्वी अशा ठळक ताऱ्याला त्याचें नांव दिलें !

बराच काल हा दक्षिणेकडील सर्व प्रदेश, त्याचप्रमाणें गंडकीच्या पूर्वेकडील दूरचा प्रदेशहि वैदिक संस्कृतीच्या प्राकाराच्या बाहेर होता. या प्रदेशावर वैदिक यज्ञकुंडातून निघणाऱ्या ज्वालाचा प्रकाश सर्रास पडत नसे. अशा प्रदेशात जाऊन येणें हें सुद्धा प्रायश्चित्ताईं समजलें जाई. त्या त्या स्मृतीमध्यें ह्या कल्पना स्पष्ट उमटलेल्या आहेत. एके काळीं फक्त गंगा आणि यमुना यांच्यामधील जो दुआब तेवढाच प्रदेश आर्यावर्त म्हणून गणला जाई. त्या वेळची आर्यावर्ताची संस्कृति ही येवढ्या प्रदेशावर नांदणारी तेवढीच. या पूण्यभूमीच्या पलीकडे प्रवास करणारास प्रायश्चित्त

१. 'Racial Synthesis' by S. V. Viswanath.

ध्यावे लागे. बौद्धायनानें एक जुनी गाथा उद्धृत केली आहे कीं, कलिंगाला जाणारा हा पायानीं पाप करीत असतो. 'पद्भ्या स कुरुते पापं यः कालिंगान् प्रपद्यते ।'.[1] पुढे आर्यांचा अग्नि जसा अधिकाधिक प्रदेश व्यापूं लागला तसतशी आर्यावर्ताची मर्यादा वाढू लागली.

मनुस्मृतीमध्यें चार निरनिराळ्या प्रदेशाचा उल्लेख आहे त्यावरून हा विस्तार कसकसा झाला हे दिसून येतें. मनूनें उल्लेखिलेला पहिला प्रदेश म्हणजे सरस्वती व दृषद्वती या दोन नद्याच्या मधील प्रदेश. हा खास देवनिर्मित असून त्याला ब्रह्मावर्त म्हणत. दुसरा प्रदेश कुरुक्षेत्राच्या आसपासचा; याला ब्रह्मर्षिदेश म्हणत. तिसरा हिमालय व विंध्य याच्यामधील, पण फार पूर्वेकडील व फार पश्चिमेकडील भाग सोडून उरलेला; याला मध्यदेश म्हणत. आणि चौथा म्हणजे हिमालय आणि विंध्य यामधील व पूर्वेसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत पसरलेला सर्व प्रदेश. हा आर्यावर्त होय. एके काळीं गंगा आणि यमुना यामधील अरुद पट्टीसच आर्यावर्त म्हणत असत असें बौद्धायनानें जुनें वचन दिलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे ह्या आर्यवर्त संज्ञेचा विकास क्रमाक्रमानें झाला हे स्पष्ट होतें. आर्यांच्या वसाहती जसजशा वाढू लागल्या तसतशी यज्ञीय भूमीची व्याप्ति वाढूं लागली. तथापि बराच कालपर्यंत विंध्यपर्वत हीच यज्ञीय भूमीची दक्षिणसीमा होती व आपला महाराष्ट्र (दक्षिणापथ) हा या संस्कृतीच्या बाहेरील होता. हा सर्व प्रदेश दंडकारण्यानें व्यापृत असा होता. दाशरथी रामासारख्या धाडसी वीरानीं या प्रदेशात संचार केला होता व अगस्तीसारख्या मुनींनीं ठिकठिकाणीं आपले आश्रम स्थापिले होते. पण आर्यसंस्था येथें मनुस्मृतीच्या कालापर्यंत मनूसारख्या सनातन्यांच्या दृष्टीनें तरी अद्याप पक्क्या रुजलेल्या नसाव्या.

पुढें दक्षिणेकडे अनेक प्रतापी राजे निर्माण झाले आणि दक्षिणापथ हा आर्यांच्या दृष्टीनें मागासलेला न राहता आर्यावर्ताच्या तोडीनें सुधारला, तेव्हां दक्षिणसमुद्रापर्यंतचा सर्व देश हा एक अखंड देश म्हणून ओळखला जाऊं लागला. पाणिनीचा वार्तिककार कात्यायन व अर्थशास्त्रकार चाणक्य यांच्या काळीं अखिल भरतखंडाचा उल्लेख होऊं लागला. कात्यायन हा चेर,

१. बौधायनधर्मसूत्र पश्न १ अ. १.

पाण्ड्य, चोल याचा उल्लेख करतो व चाणक्य सिलोनच्या ताम्रपर्णीचा उल्लेख करतो. शिवाय चाणक्य चक्रवर्तिक्षेत्राची मर्यादा 'हिमवत्समुद्रान्तरम्' अशी देतो. येथून पुढे उत्तरेकडील गंगा-यमुना या नद्याप्रमाणें दक्षिणेकडील नर्मदा-कावेरी या नद्यानाहि पावित्र्य प्राप्त झालें. त्याच्या परिसरात जाणारानां पाप लागते ही प्राचीन कल्पना लोपून त्याचा स्नानाच्या पवित्र मंत्रात उल्लेख येऊं लागला. साहित्यामध्यें भूमिवर्णनान 'समुद्रशना' हा समास रूढ झाला. तीर्थयात्रेमध्ये काशीइतकेंच रामेश्वराचें माहात्म्य वाढलें. वसाहतकार मायदेशातील नावें नव्या प्रदेशात चालवितात. या दृष्टीने उत्तरेकडील मथुरेचें नाव दक्षिणेकडील मदुरा रूपानें रूढ केलें. चार धामें, बारा ज्योतिर्लिंगे, सप्तपुरी या सर्वांचा समावेश करणारा व उत्तरेस हिमालयापासून खालीं दक्षिणसागरापर्यंत पसरलेला हा अफाट प्रदेश एकदेश मानण्यात येऊं लागला. पण हा सर्व अफाट देश एका संस्कृतीच्या सूत्रात गोविला गेला तें अनेक शतकाच्या एकीकरणाच्या प्रक्रियेचें फल होय.

देशाचा जसजसा विस्तार होत गेला तसतसा वैदिक आर्यांच्या समाजातहि येथल्या मूळच्या वर्णांच्या लोकाचा प्रवेश होऊन तो समाज शबल स्वरूपाचा बनत चालला. शिवाय या प्रदीर्घ कालात या भरतभूमींत बाहेरून येऊन अनेक लोक व वंश स्थायिक झाले व येथील पूर्वी स्थायिक झालेल्या लोकात पूर्णपणें मिसळून गेले. बाहेरून येणाऱ्या या लोकांपैकीं प्रत्येकाबरोबर त्याच्या त्याच्या कला, शास्त्रें, धर्म, आचार, रूढी वगैरे या देशीं येऊन दाखल होत. बाहेरून येणारे लोक बहुधा जेते म्हणून येत. प्रथम प्रथम त्याचा दरारा व बोलबाला असे. कालातरानें काहीं पुन्हा बाहेर हुसकले जात. पुष्कळसे येथील लोकात मिसळून जात. पण ते मिसळत असता त्याच्या संस्कृतीचे कांहीं विशेष मूळच्या संस्कृतींत मिसळत व प्रत्येक वेळीं मूळ संस्कृतीचें स्वरूप थोडथोडें पालटत जाई. मात्र या बाह्यांची छाप फारच थोडी बसली. संस्कृतीचें अंतरंग जे धार्मिक व लौकिक आचारविचार, त्यांच्यात ज्या गंगाजमनी छटा उत्पन्न झाल्या त्या भरतखंडांतीलच आधींच स्थायिक झालेल्या निरनिराळ्या वंशांच्या लोकांच्या संघर्षामुळें उत्पन्न झाल्या. त्याच आतां पाहूं या.

भारतीय संस्कृति ही संमिश्र आहे या प्रश्नाचे ऐतिहासिक धागेदोरे थेट वैदिक कालात जाऊन पोंचतात. कारण आजच्या भारतीय संस्कृतीवर ज्या वैदिक संस्कृतीची छाप आहे त्या वैदिक सस्कृतीचे पुरस्कर्ते जे वेदसूक्त-कार आर्य लोक तेच मुळीं अत्रत्य कीं बाहेरून आलेले या प्रश्नापासूनच या **संस्कृति-संगमा**च्या प्रश्नाला तोंड लागतें. वैदिक आर्य हे मूळचे हिंदु-स्थानचे रहिवासी होते असें प्रतिपादन करणारे काहीं विद्वान् आहेत. त्याच्या मतें इराण-आशियामायनर ते थेट उत्तरध्रुवापर्यंत त्यानीं वसाहती केल्या व हिमयुग सुरू झाल्यावर तिकडे वस्ती करणे अशक्य होऊन त्याच्या काहीं टोळ्या फिरून हिंदुस्थानात परत आल्या. पण हें मत समर्पक वाटत नाहीं. कारण वैदिक वाङ्मयात आर्यांचें जें दर्शन होतें तें हे लोक कृष्णवर्णाच्या, चपट्या नाकाच्या, शिश्नपूजकाच्या टोळ्याशीं झगडत असलेले अशा अवस्थेत होते. वैदिक वाङ्मयनिर्मितीच्या पूर्वीच काहीं शतके ते येथें असते तर त्याचा मिलाफ पूर्वीच होता. यावरून वैदिक आर्य हे हिंदुस्थानाबाहेरून कोठून तरी आलेले असावे; मग ते थेट उत्तरध्रुवापासून येवोत किंवा मध्यआशिया वा कॉकेशस पर्वत येथून येवोत. ते आले ते एकाच काळीं आले व एकाच मार्गाने आले कीं त्याच्या भिन्न टोळ्या भिन्न काळीं भिन्न मार्गांनीं आल्या याविषयीं वाद आहे. पण या मतमतांतराच्या जंगलात आपणास येथें शिरावयाचें कारण नाहीं. तें कसेंहि असो. या आर्यांचा आर्येतराशीं शेंकडों वर्षें झगडा होऊनच या वैदिक आर्यांचा संचार सर्वत्र झाला येवढें स्पष्ट आहे.

ज्या लोकाशीं वैदिक आर्यांचा संग्राम झाला ते लोक कोण होते ? ते लोक अनेक प्रकारचे होते. त्यापैकीं असुर, दास किंवा दस्यु हे प्रमुख असावेत असें दिसते. ऋग्वेदाच्या एका ऋचेंत शंबर दासाचा व वर्चि असुराचा उल्लेख आहे. पहिल्याची नवनवति पुरे आणि दुसऱ्याचे शतसहस्र योद्धे हे इंद्राविष्णूंनो ! तुम्ही मारून टाका अशी तेथें प्रार्थना आहे. (७।९९।५). या दोहोंपैकीं असुर जे होते त्यानींच सिंधु-नदीच्या मुखाजवळील प्रौढनागर संस्कृति निर्माण केली असणें संभव नीय आहे.

सिंधु संस्कृति व असुर

मोहेंजोदारो व हराप्पा येथें हजारों वर्षें पुरून राहिलेलीं जुनीं शहरें सापडलीं आहेत. त्या ठिकाणीं जें उत्खनन झालें आहे त्यावरून तज्ज्ञांनीं असें अनुमान काढलेलें आहे कीं, हीं शहरें पाच हजार वर्षांइतकीं जुनीं असून येथील संस्कृति ही तत्कालीन मिसरी व सुमेरी संस्कृतीशीं संलग्न पण तिच्यापेक्षा वरिष्ट दर्जाची असावी. मार्शलच्या मतें ही सिंधु संस्कृति वैदिक संस्कृतीहून अगदीं अलग संस्कृति असावी. वेदातील वर्णन केलेला समाज हा अर्धवट धनगर, अर्धवट शेतकरी अशा प्रकारची राहणी खेड्यांतली, घरेदारें साधीं झोपडीवजा बाबूचीं असा त्याचा थाट! उलट मोहेंजोदारो व हराप्पा येथे पाहावें तों दाट वस्तीचीं शहरे, त्यात मोठमोठ्या हवेल्या आणि स्नानगृहें वगैरे सर्व सुखसोयी, असा प्रकार आढळून येतो. यजुर्वेदामध्यें लोखंडाचा उल्लेख येतो पण सिंधुतटींच्या शहरात लोखडाचा मागमूसहि नाहीं. लढाऊ शस्त्रामध्यें वैदिक आणि सिंधुवासी हे दोन्हीहि धनुष्यबाण, परशु, माला हीं वापरीत. पण सिंधुवासी गदाहि वापरीत आणि त्याना शिरस्त्राण व चिलखत हीं माहीत नसावींत. वैदिकाना माहीत होतीं. वैदिकामध्यें अश्वाचें माहात्म्य फार! पण सिंधुवासीयाना तो माहीतहि असलेला दिसत नाहीं. वैदिकाना मासाशन प्रिय, तर सिंधुवासीयाना मत्स्याशन. वैदिकाना गोमाता प्रिय, तर सिंधुवासीयाची भक्ति नंदीवर. वैदिक मूर्तिपूजेविरुद्ध, तर सिंधुसस्कृतींत मूर्तींचा सुळसुळाट. वाघाचा उल्लेख वेदात नाहीं पण सिंधुवासीयाना तो परिचित. वैदिकामध्यें देवीचें माहात्म्य नाहीं; पण सिंधुवासीयामध्यें देवी व शंकर याचें माहात्म्य बडें. वेदामध्यें अग्निपूजा मुख्य पण मोहेंजोदारात अग्निकुड अभावानेंच प्रख्यात आहे. वैदिकाना लिंगपूजा गर्ह्य वाटे पण सिंधुवासीयात तिचा फार प्रचार![1]

मार्शलनें दाखविलेलें हें वैषम्य अतिरंजित आहे. पुरांचा उल्लेख घेतला तरी वैदिक वाङ्मयाला शहरी जीवन अवगत होतें हें लक्षात येईल. शिवाय रथ, दासदासी वगैरे ऐश्वर्याचे उल्लेख आहेत ते वेगळेच. उदा-

१. Indus Civilisation, Vol. I, p. 110.

हरणार्थ, दिवोदासाकडून कोणत्या देणग्या मिळाल्या हे सागतांना गर्ग गातो कीं, 'दशअश्वान् दशकोशान् दशवस्त्रा अधिमोजनाः । दशो हिरण्यपिण्डान् दिवोदासात् असानिषम् ॥' (ऋ. ६।४७।२३). यावरून दोन्ही संस्कृति प्रौढ व नागर होत्या असें दिसून येईल.

'असुर इण्डिया' या ग्रथाचे कर्ते अनंतप्रसाद बानर्जी शास्त्री याच्या मतें सिंधु सस्कृतीचे लोक हे सुमेरियन असून ते भरतखंडात इराणच्या आखातातून जलमार्गाने सिंधु नदीच्या मुखातून आत आलेले असावे. वेदात असुर म्हणून ज्याचा उल्लेख अनेक ठिकाणीं येतो ते हेच लोक असावेत. शब्दाचे अर्थ कसे बदलतात याचे एक सुप्रसिद्ध उदाहरण म्हणून असुर हा शब्द वैदिक वाङ्मयात गाजलेला आहे. उत्तरकाली असुर हे सर्वत्र राक्षस, दानव याच्या बरोबरीनें वैदिक आर्यांचे शत्रु म्हणून उल्लेखिले जातात. पण ऋग्वेदात असुर हा शब्द मोठा सन्मान-दर्शक असून तो अग्नि, वरुण, इंद्र अशा देवतांना लावला जातो ! उदाहरणार्थ, 'त्वमग्ने रुद्रो असुरो महोदिवस्त्वं शर्धो मारुत पृक्ष ईशिषे' (२–१–६). दुसऱ्या एका सूक्तांचें पालूपदच 'महद्देवाना असुरत्वं एकं' (३।५५) असें आहे. इराणी लोकाचा देव जो अहुरमज्द त्यातील अहुर हें असुराचेच इराणी रूप. पुढें वैदिक आर्य व इराणी आर्य याचे तंटे सुरू झाल्यावर इराण्याचा असुर हा वैदिकाचा राक्षस बनला. शतपथ-ब्राह्मणाच्या काळीं असुर हे खोटें बोलणारे म्हणून त्याची निंदा होऊं लागली. ब्राह्मणकार लिहितो, 'देव असुर हे दोघेही प्रजापतीचीच प्रजा पण देवांनीं सत्य घेतलें, असुरानीं अनृत घेतलें. त्यामुळें अंतीं असुराचा नाश झाला (९।५।१). बानर्जी शास्त्र्याच्या मतें ऋग्वेदातील सुप्रसिद्ध दाशराज्ञ युद्ध हें देव आणि असुर याच्यामध्यें लढलें गेलें असावें. सुदास, दिवोदास हे वैदिक आर्य असून त्याचे प्रतिस्पर्धी पुरुतृत्सु हे असुर असावेत. शतपथब्राह्मणात (६।८।१।१४) पुरूंना असुर म्हटले आहे. हे असुर दर्यावर्दीपणात निष्णात होते. यदु व तुर्वशु याना फार लाबून समुद्रावरून आणलें असा ऋग्वेदात उल्लेख आहे. य आनयत् परावतः सुनीती तुर्वशं यदुम् । (६।४५।१). वरुण हा त्याचा देव, विश्वामित्र हा पुरोहित. या युद्धांत असुरांचा पराभव झाला. तरी त्यांनीं भरतखंडांत पुढें अनेक दिग्विजय

केले असावे असें बलि, जरासंध, बाणासुर वगैरेंच्या कथावरून दिसतें. पूर्वेकडील अग, वंग, पुंड्र, सुह्म, कलिंग या देशाना बालेय क्षेत्र म्हटलें आहे. ते बलीच्या पुत्रानीं वसविले. त्याचे ब्राह्मण ते बालेय ब्राह्मण होत.

येथें एक गोष्ट विशेष लक्षात घेण्यासारखी आहे कीं, वैदिक आर्योनीं दास आणि दस्यु याचें जसे कुरूप म्हणून वर्णन केलेलें आहे तसें असुराचें केलेलें नाही. असुर हे 'मृध्रवाचः' (ऋ. ७·१८·१३) होते म्हणजे त्याची भाषा वैदिक आर्योना कळत नव्हती असें वर्णन केले जाई. पण ते कुरूप होते असें वर्णन नाहीं. बाणासुराची मुलगी उषा ही सुरूप असून कृष्णपौत्र अनिरुद्धाशीं तिचा विवाह झाला ही कथा पुराणात नावाजलेली आहे. उलट भीमानें हिडिंबेशी विवाह केलेला असला तरी हिडिंबा ही सुस्वरूप होती असें भारतकार म्हणत नाहींत. आणि तिच्या पोटीं झालेल्या घटोत्कचाविषयीं तर कृष्णाची भावना अशी होती कीं, तो भारतीय युद्धात मृत्यु पावला तेव्हा कृष्णानें उद्‌गार काढले कीं, ' हा आपल्या मरणानें मेला नसता तर मी आपल्या हातानें त्याचा वध केला असता. ' तात्पर्य, असुर आणि अनार्य दस्यु अशा ज्या दोन प्रबल शत्रूंशीं वैदिक आर्योना लढावें लागलें ते दोघे भिन्न होते. राजकारणात व धार्मिक सस्काराच्या प्रातात वैदिक आर्यांचा विजय झाला हे खरे पण व्यावहारिक कलाकौशल्याच्या अनेक प्रातात या असुराचे चागलेंच नाव चमकलें. शिल्पकलेमध्यें असुरानीं केवढा लौकिक संपादन केला होता हे मयासुराच्या नावावरून लक्षात येईल. युधिष्ठिराच्या यज्ञाचा मडप उभारण्याची कामगिरी त्याच्यावरच सोंपविली होती. शिल्पकलेचा आद्य प्रणेता म्हणूनही त्याचेच नाव शिल्पशास्त्रावरील ग्रंथाना देण्याचा सप्रदाय आहे. छंदःशास्त्रातही त्याची कामअसावी. शुक्लयजुर्वेदात गायत्री आसुरी, पंक्ती आसुरी अशा सात छंदाचीं नावें दिलेलीं आहेत. याहींपेक्षां अधिक महत्त्वाची कामगिरी त्यांच्या नाशावर नमूद आहे, व ती हिंदुसमाजरचनेशीं निगडित अशी आहे. हिंदुसमाजरचनेचा विशेष म्हणून उल्लेखण्यांत येतो तो म्हणजे वर्णाश्रमधर्म होय. पैकीं आश्रमधर्माची स्थापना केली ती प्रल्हादपुत्र कपिलासुर यानें केली असें बौधायन लिहितो (२–६–३०).

दासदस्यूंच्या संस्कृतींचा स्वीकार

वेदामध्यें वैदिक आर्यांचे दुष्मन् म्हणून ज्याचा विशेष प्रामुख्यानें उल्लेख येतो ते लोक दास किंवा दस्यु हे होत. इंद्राला दस्युहा हें विशेषण अनेक ठिकाणीं लावलेलें आहे. या लोकाची निनाके (अनासा), काळे-रोम (कृष्णत्वच्), लिंगपूजक (शिश्नदेव), अशा शेलक्या विशेषणानीं हेटाळणी केल्याचें आढळतें. पण ते सधन असून त्यांचीं मोठमोठीं शहरें होतीं, अनेक प्रकारच्या कलाकौशल्यात ते निष्णात होते, हें त्याच्याच उद्‌गारावरून सिद्ध होतें. शंबर नावाच्या दैत्यांचीं नवनवति अश्ममयी पुरें होतीं. या लोकाची प्रथम प्रथम वैदिक आर्यांनीं दाणादाण केली तरी पुढें आर्यांच्याच भिन्न भिन्न टोळ्यात जेव्हा भांडणें होऊं लागलीं तेव्हा या अनार्यांची मदत घेण्यासही त्यानीं कमी केलें नाहीं. ऋग्वेदात दाश-राज्ञ युद्ध म्हणून जें प्रसिद्ध युद्ध आहे त्यात लढणारात पक्थ, शिव, भलानस, अलीनस, विषणी असे अनेक अनार्य होते (७ वें मंडळ).

आजच्या भारतीय किंवा हिंदु संस्कृतीत या आर्येतर वा अनार्य संस्कृतीचा भाग थोडाथोडका नाहीं.

आर्यांनीं आपलें घोडदळ, युद्धप्रावीण्य व उच्चतर समाजसंघटन यानीं आर्येतराना जिंकलें असलें तरी पुढें आर्य आणि आर्येतर याची जी मिश्र-संस्कृति जन्मास आली तींत आर्येतर संस्कृतीचीं अनेक अंगोपांगें समा-विष्ट केलीं गेलीं. किंबहुना या मिश्र संस्कृतीचें जोतें व पाया आर्येतर द्राविडादि संस्कृति असून त्या जोत्यावर आर्यांनीं आपल्या वैदिक वेदीची स्थापना केली असें म्हणतां येईल. या वेदींतील होमहवन व बसाहतीकरणाचीं क्षात्रवृत्ति या दोन गोष्टींवरच आर्यांची मिस्त होती. बाकी कृषि, गोरक्षण, कलाकौशल्य, उद्यम, वाणिज्य ह्या व्यव-हाराच्या सर्व बाबी त्यानीं आर्येतरावरच सोपाविलेल्या होत्या. समाजाच्या पोषणार्थ अत्यंत उपयुक्त असे जे अनेक उत्पादक धंदे होते ते अनार्यच संभाळीत असत.

दुसरें असें कीं प्रथम प्रथम 'नकटे, काळकुटे' म्हणून कितीहि शिडकारलें तरी शेवटीं जीवनकलहाच्या रेट्यांत विजयी होण्याकरितां त्यांच्याचीं

शरीरसंबंध करून आर्यांना आपला वंशविस्तार करावा लागला व आपल्या पक्षाचे बळ वाढवावें लागलें. येथें अर्जुन आणि उलुपी, भीम आणि हिडिंबा, पराशर आणि मत्स्यगंधा, वसिष्ठ आणि अरुंधती (अरुंधती ही अधमयोनिजा असून तिचे पूर्वाश्रमींचे नाव अक्षमाला होते) या जोड्यांचा नुसता उल्लेख केला तरी पुरे. महाभारतातील वनपर्वांतर्गत नहुष-युधिष्ठिर-संवादावरून पाहता या सर्वांचा परिणाम म्हणून एके काळीं संकर येवढ्या प्रमाणावर झाला होता, कीं जाति ओळखणेंच कठीण झालें होते. 'जातिरत्र महाभाग मनुष्यत्वे महामते। संकरत्वात् सर्ववर्णाना दुष्परीक्ष्येति मे मतिः।' (अ.१८२).

या संकरीकरणात राजे व लष्करी पेशाचे सरदार याचा वाटा फार मोठा असतो. जिंकलेल्या शत्रूच्या पट्टराणीशीं लग्न लावणें हा विजयी राजाचा एक अधिकारच आहे असें मानले जाई; मग शत्रु कोणत्याहि जातीचा का असेना. राजकारण साधण्याकरिता शरीरसंबंध करण्याचीहि वहिवाट असे. यामुळे क्षत्रियात संकर फार. चंद्रगुप्ताची एक राणी ग्रीक होती याचा उल्लेख मागे आलाच आहे. समुद्रगुप्ताच्या अलाहाबादे-जवळील लेखात अनेक जातींच्या राजाकडून कन्याचा नजराणा पाठविण्यात येत असे असे वर्णन आहे. 'शकमुरुंडैः सैंहलकादिभिश्च आत्मनिवेदनकन्योपायनदान' वगैरे. मनुस्मृतीच्या काळापर्यंत ब्राह्मणवर्गाला कामतः का होईना पण चारहि वर्गांच्या स्त्रिया विहित मानल्या जात. पुढें याज्ञवल्क्यानें शूद्रामार्यांचा स्पष्ट शब्दात निषेध केला तरीहि ही प्रथा बाणभट्टाच्या काळापर्यंत चालूच होती. कारण बाणभट्टानें आपल्या पारशव बंधूंचा उल्लेख केला आहे. अर्थात् आजच्या हिंदूंतील लोकसंख्येत आर्य-अनार्य रक्ताची मेसळ पुष्कळच झाली आहे हें सागणें नकोच. अनार्यांच्या स्त्रियाच तेवढ्या स्वीकारल्या असें नव्हे तर त्यांचीं दैवतें, कुलाचार, तत्त्वज्ञान यातील काहीं भागही समावून घेतला. याचें दिग्दर्शन पुढें होईलच.

यक्ष, गंधर्व, किन्नर

आपल्या प्राचीन वाङ्मयात आर्यांचा ज्या निरनिराळ्या लोकसंघाशीं संबंध आला व झगडे झाले अशा अनेकांचीं वर्णनें आलीं आहेत. वेदां-

तील असुराचा व दस्यूचा वर उल्लेख केला पण त्याखेरीज पुराणग्रंथात ज्यांची वर्णने येतात ते **यक्ष, गंधर्व, किन्नर, नाग, वानर, गरुड, राक्षस, पिशाच** ह्यासुद्धां काल्पनिक योनि नसून त्या त्या नांवांचे ते भिन्न भिन्न लोकसमाजच होते.

पुराणकारानाही याची काहींशी जाणीव होती. वरील लोकाच्यासंबंधी वामनपुराणकारानें ११ व्या अध्यायात (श्लोक १५-१८) पुढीलप्रमाणें उद्बोधक माहिती दिली आहे. पुराणकार लिहितो : देव, दैत्य, गंधर्व वगैरेचा स्वभाव, वागणूक कोणती तें ऐका. यज्ञादि क्रिया करणारे व विष्णुपूजक ते देव, मत्सरी, युद्धप्रिय आणि शिवभक्त ते दैत्य होत. सिद्ध हे ब्रह्मज्ञानी व शिव-विष्णूंचे उपासक, गंधर्व हे सरस्वतीचे उपासक व नृत्यवाद्यकुशल, विद्याधर हे भवानीचे भक्त व विज्ञानाचे उपासक, किंपुरुष हे सूर्योपासक व सर्व-शिल्पकुशल, पितृ हे योगाभ्यासी व सर्वसचारी, ऋषि हे ब्रह्मश्वर्य, सत्य इत्यादींचे पालन करणारे, मानव हे शंकर भास्कर व देवी याचे भक्त आणि दया. अहिंसागुणानीं युक्त. गुह्यक हे धनपति, भोगलोलुप व शंकरभक्त, राक्षस हे परदारावमर्शी व त्र्यंबकाचे भक्त. नि पिशाच हे ओंगळ आणि मांसलोलुप. अशा प्रकारच्या या द्वादशयोनि होत.[1]

या प्रत्येक समाजातून उचललेल्या वा घुसलेल्या काहीं ना काहीं गोष्टी हिंदुसंस्कृतींत कायम गोवल्या गेलेल्या आहेत. उदाहरणार्थ, गंधर्व आणि राक्षस या दोन समाजात रूढ असलेल्या विवाहपद्धतींवरून स्मृतिग्रथात उल्लेखिलेल्या अष्टपद्धतींतील दोन विवाहपद्धतींना नावेंच पडलीं आहेत. नाग व यक्ष हे चित्र व शिल्पकलेमध्यें प्रवीण होते. पिशाच हाहि एक लोकसमुदायच होता. त्या समाजात जी भाषा रूढ होती तिला पैशाची भाषा म्हणत. त्या भाषेंत अनेक अद्भूत कथाचा ज्यांत संग्रह आहे तो गुणाढ्यकृत 'बृहत्कथा' हा ग्रंथ लिहिला गेला होता हें मागें आलेंच आहे. वानराचा समाजहि चांगला पुढारलेला होता हें रामायणातील सुग्रीव व वाली याची राजधानी जी किष्किंधा तिच्या वर्णनावरून दिसून येते.

१ श्री. गु. काळेकृत रामायणनिरीक्षण यांतील उतारा.

हें झाले आर्यांच्या पूर्वीच येथें स्थायिक होऊन बसलेल्या लोकासंबंधाने ! आर्यांच्या नंतरहि अनेक निरनिराळ्या वर्णांचे लोक मुलुखगिरी व व्यापार करण्याकरिता येत होतेच. विश्वामित्र वसिष्ठाच्या गायींचें हरण करू लागला तेव्हा तिने जे सैनिक निर्माण केले त्यात पल्लव, द्रविड, शक, यवन, खस, त्रिबुक, पुलिंद, शबर, पौंड्र, चीन, किरात, सिंहल, बर्बर, हूण, केरल असे अठरापगड होते म्हणून महाभारतात वर्णिलें आहे. त्यात अत्रत्य व परस्थ अशा अनेक लोकाचा उल्लेख आहे. यापैकीं परकीय अनेक लोक येथे स्थायिक झाले व हिंदुसमाजात मिसळून गेले. जातिभेदाच्या नियमनामुळे यापैकीं पुष्कळाच्या स्वतंत्र जाति बनल्या. पण अशा अनेक लोकाशीं नित्य दळणवळण येत असल्यामुळें व यापैकीं काहींच्या पाठीमागे राजसत्तेचें पाठबळ असल्यानें त्याच्या आचारविचाराचा काहीं ठसा आपल्या संस्कृतीवर अस्पष्ट का होईना कसा उमटला आहे हें आपण मागे पाहिलेंच आहे.

परकीय सत्राजित

डॉ. केतकर याच्या मतें काहीं भारतीय म्हणून समजले गेलेले ऐतिहासिक पुरुष इराणी असावेत असा संशय घेण्यास जागा आहे. असा एक राजा सत्यभामेचा पिता सत्राजित होय. हा परकी असावा असा संशय घेण्याचीं केतकरानीं पुढीलप्रमाणे कारणें दिलीं आहेत. सत्राजित याचा संस्कृतमध्यें नीटसा अर्थच होत नाहीं. कोण्या परकी शब्दाचे हें संस्कृत रूप असावें. या शब्दाचे पुढें अधिक चागलें शुद्धीकरण हरिवंशाने करून त्याला सत्राजित असें रूप दिलें. महाभारतात अनेक कथाचा संग्रह केला आहे पण त्यामध्यें सत्राजिताची कथा नाहीं. ती हरिवंशात आहे (अध्याय ३८). या सत्राजितास स्यमंतक मणि कोठून मिळाला याविषयीं दोन कथा एकामागुन एक दिलेल्या आहेत. पहिलींत तो समुद्रापासून मिळाला असें वर्णिलें असून दुसरींत सूर्यापासून मिळाला असें वर्णिले आहे. भविष्यपुराणात सत्राजिताचें आख्यान आलें आहे तें साब व मग यांच्या संदर्भातच आलें आहे. साबास कुष्ठरोगनिवार्णार्थ सुर्योपासनेचीं व्रते व फल नारद सांगतो व त्यांतच सत्राजितानें सूर्योपासनेनें कसें ऐश्वर्य प्राप्त करून घेतलें याचें

वर्णन करतो. या वर्णनात मग-वंशीय मोजकाचीहि स्तुति आहे. या सर्व संदर्भावरून सत्राजित हा सूर्योपासक इराणी राजा असावा असा संशय उत्पन्न होतो असें केतकर प्रतिपादतात.

श्रीरामचंद्राचा इक्ष्वाकु वंश हाहि इराणातून आला असल्याचा संभव आहे असें डॉ. केतकर म्हणतात. या वंशात बृहदश्व, हर्यश्व अशीं नावें आढळतात व तीं इराणी नावाशीं जुळतात. रामाची आई कैकेयी ही इराणी असावी. कारण कै हे पूर्वपद कैकोबाद कैखुश्रु अशा इराणी नावात आढळतें, व मथरा या नावात मथ्र शब्दाची चेष्टा असूं शकेल अशीं त्यानीं प्रमाणें दिलीं आहेत.[1] पण हीं खबीर दिसत नाहींत. अश्वान्त नावें वेदातहि सापडतात असें केतकरच लिहितात. आणि आर्यजन हे भरतखंडाच्या बाहेरून येथें आले व येण्यापूर्वी इराणातील पारशाचा व त्याचा दाट संबंध होता ही उपपत्ति लक्षात घेतली असता इक्ष्वाकु वंशात अश्वाना नावें येणें अस्वाभाविक नव्हे. कैकेयीविषयीं म्हणाल तर चद्रगुप्ताची एक राणी ग्रीक होती तशी दशरथाची कैकेयी ही इराणी असूं शकेल, आणि इक्ष्वाकु वंश जर इराणातून आला असेल तर तो मथरा या पात्रात आपल्या मायभूमीच्या प्रथाची थट्टा कशी करील? अर्थात् वरील प्रमाणे हीं रामचंद्राचें कुळ इराणातून आलें हें सिद्ध करण्यास पुरेशीं नाहींत.

येथें हें स्पष्ट सागितलें पाहिजे, कीं राम किंवा पूज्य मानली गेलेली दुसरी कोणतीही अवतारी व्यक्ति हिचें कुल बाहेरून कोठून तरी– इराण, ग्रीस, ईजिप्त, खाल्डिया वगैरेंतून– भरतखंडात आलें असें उद्या संशोधनानें सिद्ध झालें तर त्यामुळें आपल्या संस्कृतीला मोठा कमीपणा आला असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. रामचंद्रासारख्या अवतारी विभूतीचें कुल मूळ बाहेरून कोठून आलें असें उद्या शहाजोग पुराव्यानें सिद्ध झालें तर तें मोकळ्या वृत्तीनें मान्य करण्यास कचरण्याचें कारण नाहीं. कारण रामाचे पूर्वज मूळ बाहेरून आले असें क्षणभर मानलें तरी रामचंद्राचें सर्व अवतारकृत्य भरतखंडातच घडलें ना? अयोध्येपासून लंकेपर्यंतचा भरतखंडाचा दीर्घ उभा पट्टा रामचंद्राच्या चरणांनीं पावन झाला आहे ही गोष्ट जोंवर सिद्ध

१. प्राचीन महाराष्ट्र.

आहेच तोंवर रामचरित्र हा भारतीय संस्कृतीचाच भाग होय हे काय सांगावयास पाहिजे? आणि रामचद्राच्या चारित्र्याचा आणि पराक्रमाचा अभिमान आपण बाळगावयाचा नाहीं तर कोणीं परकीयानीं बाळगावयाचा? मुधोळची फारसी बखर ही विश्वसनीय असेल तर छत्रपति शिवाजीनें ज्या वंशाला अलंकृत केलें तो वश मूळ राजपुतान्यातून महाराष्ट्रात आला आहे हें मान्य करावे लागेल. पण तसें ते केलें तरी त्यामुळें शिवाजीचा उज्ज्वल पराक्रम हा रजपूत संस्कृतीचा भाग ठरत नाहीं. रायगडच्या सिंहासनावर महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची स्थापना करणारा पुण्यश्लोक शिवाजी हा महाराष्ट्राचाच पुढारी होय. मग त्याचे पूर्वज मागे केव्हा कोठूनही आलेले असोत, राजपुतान्यातून आलेले असोत, किंवा मूळ रजपूतच भरतखंडाबाहेरून आले हें मत स्वीकारल्यास आणखी कोणत्या दूरच्या स्थानापासून आलेले असोत. तोच न्याय बाजीरावादि पराक्रमी वीराना लागू. बाजीराव ज्या चित्पावन जातीला पावन करिता झाला ती जात कोणी म्हणतात त्याप्रमाणें ईजिप्तमधून आलेली असली तरी अखिल भरतखंडात ब्राह्मणी दौलतीचा दरारा उत्पन्न करणारा बाजीरावाचा पराक्रम हा ईजिप्त देशाच्या इतिहासाचा भाग ठरत नाहीं. तो हिंदुस्थानच्या इतिहासाचा, महाराष्ट्राच्या इतिहासाचा, कोकणस्थ जातीच्या इतिहासाचा भाग होय. असो.

आदि-द्रविड

आजच्या भरतखंडातील भिन्न भिन्न वर्णांचा उल्लेख प्रस्तुत आहे. तों आटोपता घेण्यापूर्वी आता फक्त अत्यंत प्राचीनतम लोकाचा उल्लेख करतों. हे लोक म्हणजे आदि-द्रविड होत. आर्य हिंदुस्थानात आले त्या काळच्या आर्येतर अशा सर्वांना द्रविड या नावानें संबोधलें तर हे द्रविडहि येथें येण्यापूर्वी जे लोक येथें नांदत होते त्यांना आदि-द्रविड म्हणतां येईल. या लोकांसंबंधीं विद्वानाची अशी कल्पना आहे कीं, हे भरतखंडांतील लोक, पूर्वद्वीपकल्पांतील लोक व ऑस्ट्रेलियांतील लोक या सर्वांचें फार प्राचीन काळीं एकमेकांशीं दळणवळण असावें. त्यांच्या माथा

एकाच वृक्षाच्या शाखा असाव्यात. या भाषावृक्षाला ऑस्ट्रोएशियाटिक असें संबोधता येईल. या ऑस्ट्रोएशियाटिक भाषेमधून भरतखंडानें जी उसनवारी केली ती आजहि दाखविता येण्यासारखी आहे. शिलाखंडांत सापडून प्रस्तरमय झालेले जुने अवशेष जसे हजारों वर्षें अविकल स्वरूपात कायम राहतात तसेच दुसरे कोठे ते राहत असतील तर ते भाषेतच. तसे ते आस्ट्रोएशियाटिक प्राचीन भाषेतील काहीं अवशेष संस्कृत भाषेंत राहून गेले आहेत असें भाषाशास्त्रज्ञाचे मत आहे. संस्कृत ग्रंथात कोसल तोसल, अंग वंग, कलिंग त्रिलिंग, पुलिंद कुलिंद अशा शब्दाच्या जोड्या सापडतात. या जोड्यामध्यें दोन शब्दात जो फरक आहे तो शब्दाच्या पूर्वी लावलेल्या आगमात झालेला आहे. या बाबतींत विद्वानाचें असे मत आहे कीं, शब्दाच्या पूर्वभागात फरक करून अर्थभेद दाखविणें ही क्रिया आर्य किंवा द्रविड यापैकीं कोणत्याच भाषेच्या प्रकृतींत ज्या अर्थी सापडत नाहीं व ज्या अर्थी ती हिंदुस्थानातील मुंडा भाषेंत व मलायातील मॉन-ख्मेर भाषात मात्र सापडते, त्या अर्थी हिंदुस्थानात ही प्राक्रिया मलाया-तून आली असली पाहिजे. भाषेत नवी प्रक्रिया घुसते ती बराच दाट संबंध आल्याविना घुसत नाहीं. अर्थात् भरतखडातील या प्राचीनतम रहि-वाशाचा ऑस्ट्रेलिया खडातील लोकाशीं व्यापारनिमित्तानें वा अन्य कारणाकरिता पण दाट परिचय असावा, व या दोघाची भाषा एकाच गोत्रातील असावी. या दाट संबंधात अनेक वस्तु बाहेरून आल्या असा-व्यात. पैकीं हरएक धार्मिक विधींत आवश्यक होऊन बसलेले जिन्नस जे नारळ व सुपारी ते मलायातून आले असावेत ! कदली, लागल, लागूल, जनक, सीता, बाण, कार्पास असे अत्यंत रूढ झालेले शब्द बाहेरून आले असावेत. हे जाडे संस्कृत शब्द सोडून रोजच्या व्यवहारातील शब्द पाहिले तरी अगदीं प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांच्या तोंडीं असणारें एक कोष्टकहि असेंच पुरातनकालापासून रूढ असावें. तें कोणतें तर 'चार कवड्या म्हणजे एक गंडा' हें सुप्रसिद्ध कोष्टक होय.[1]

---

१. Pre-Arayan and Pre-Dravidan Antiquities by Levi and Bagchi.

द्रविडांची उच्च कामगिरी

हे अतिप्राचीन लोक सोडले तर, आर्यबाह्यात द्रविड लोक हे सर्वांत प्रमुख होत. याचा तर भारतीय संस्कृतीवर फार मोठा ठसा उमटलेला आहे. इतका कीं, **आजच्या हिंदुसंस्कृतीला आर्यसंस्कृति म्हणण्यापेक्षां आर्यद्रविडसंस्कृति म्हणणेंच अधिक अन्वर्थक ठरेल.** हा ठसा व्यावहारिक व धार्मिक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे. आधुनिक कालात हिंदूंचे दर्यावरील प्रभुत्व नष्ट झालें हें सर्वश्रुत आहे. इतकें कीं, समुद्रयान हे पापकर्म समजण्यात येऊं लागलें. पण ही संकुचित वृत्ति स्थिर होण्यापूर्वी शेंकडों वर्षे भारतीय लोक स्वच्छंदपणे सागराच्या पृष्ठभागावर स्वैरसंचार करीत होते; त्यानीं नौकानयनाच्या जोरावर व्यापार थाटला होता; व पूर्वेकडील द्वीपकल्पात वसाहती केल्या होत्या हे आपण मागें पाहिलेंच आहे. यासंबंधीं प्रस्तुत हें आवर्जून सांगितले पाहिजे कीं वसाहतीकरणामध्यें व एकंदर नौकानयनामध्यें हे दाक्षिणात्य द्रविड लोक अग्रेसर होते. पूर्वेकडील जावा, सुमात्रा, बोर्नियो ह्यामधील संस्कृतिप्रसार मुख्यतः ह्या द्रविड लोकानीं केला. दुसऱ्या एका प्रकरणात मागें लोकशाहीची हकीकत दिली आहे तेथें दक्षिणभारतात म्हणजे द्रविड देशांतहि लोकशाही संस्था नादत होत्या हें दर्शविलें आहेच. पैकीं ग्रामपंचायती या तर दक्षिणेकडेच अधिक बद्धमूल होत्या.

धार्मिक बाबतींतील त्याची कामगिरी अशीच भरीव आहे. ती किती व कशी भरीव आहे हें शंकराचार्य, मंडनमिश्र, कुमारिलभट्ट, रामानुजाचार्य हे सर्व धर्ममार्तंड द्रविड देशातील होते एवढा नुसता उल्लेख केला असतांहि ध्यानात येईल. बौद्ध, जैन वगैरेंच्या हल्ल्यानीं वैदिक धर्म जेव्हां जर्जर झाला होता तेव्हा त्याचें पुनरुज्जीवन करणारे हे सर्व आचार्य द्रविड प्रांतांतूनच निर्माण झाले. यापूर्वीच्या कालात आर्य व द्रविड यांच्या रक्तांत इतकी भेसळ झाली होती कीं वरील थोर पुरुष हे रक्तानें आर्य का अनार्य होते हें सांगणें मुष्कील आहे. ते दाक्षिणात्य होते येवढें निश्चित आहे. फिरून पुन्हां इस्लामी धर्माचा चाद उत्तरहिंदुस्थानांत फडकूं लागल्यावर भारतीय संस्कृतीचें रक्षण करणारी राजकीय सत्ता व सायण-

माधवरूपानें प्रकट झालेली सर्वगामी विद्वत्ता ही द्रविड देशातील विजयानगरमध्यें चमकली. अशा रीतीने आजच्या हिंदु संस्कृतींत आर्यांच्या बरोबरीनें द्रविडाचाहि भाग आहे.

आर्य-द्रविडसंगमावरील पुण्यक्षेत्र महाराष्ट्र

आता उत्तरेकडील आर्य व दक्षिणेकडील द्रविड या दोन्ही संस्कृतींच्या मिलाफाचे चालतेबोलते स्वरूप तुम्हास पाहावयाचें असेल तर आपल्या महाराष्ट्राकडेच वळा. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थानच असे आहे कीं, तेथें उत्तर आणि दक्षिण अशा दोन्हीकडील विचार व आचार याचा संगम व्हावा. उत्तर हिंदुस्थानात आर्यांची सद्दी, तर दक्षिणेत द्रविडाचा जोर, अशी सर्वसामान्य स्थिति आहे. वंशशुद्धि, भाषा, दैवतें, कुलाचार, राहणी या सर्व दृष्टींनीं उत्तर हिंदुस्थानात आर्यांचा पगडा आहे, तर त्याच सर्व बाबतींत दक्षिणेत द्रविडाचा आहे. पण उत्तर व दक्षिण याच्या मध्यभागावर राहणारें जें आपले महाराष्ट्राचें पठार त्या पठारावर आर्य व द्रविड यांचा मनोहर मिलाफ झालेला आहे. महाराष्ट्रातील पवित्र नदी जी गोदावरी ती एके काळीं आर्य व द्रविड याच्या प्रांतातील सरहद्द असावी व तिच्या उत्तर दक्षिण तीरावरून आर्य व द्रविड एकमेकांशीं लढले असावेत. या लढ्याचे अवशेष लोकाचारात आजहि तगून राहिले आहेत. गोदेच्या उत्तरतीरावर नाशिक असून दक्षिणेस पंचवटी आहे. नागपंचमीच्या दिवशीं अजूनहि या दोन्ही गावच्या अशिक्षित स्त्रिया आपआपल्या नदीकाठावरून परतीराच्याना शिव्या देण्याचा समारंभ साजरा करीत असतात. मात्र प्रथम प्रथम आर्य व द्रविड याच्या झटापटी झाल्या असल्या तरी पुढें गोदेच्या काठींच त्यांचें पूर्ण ऐक्य झालें.

आजच्या महाराष्ट्रात आर्य व द्रविड या दोन्ही संस्कृतींचा मिलाफ झालेला आहे. त्यांतहि वांटप असें झालें आहे कीं, तारतम्यानें पाहता पुरुषवर्गानें आर्यपरंपरा चालविलेली आहे व स्त्रियानीं द्रविडपरंपरा राखली आहे. हें वांटप स्वाभाविकच आहे. कारण उत्तरेकडून दक्षिणेकडे वसाहत करण्यास येणाऱ्या लढाऊ आर्यांत पुरुषांचें प्रमाण फार मोठें असावें व त्यांनी बायका केल्या त्या बहुतेक द्रविडांच्या असाव्यात. या प्रकारामुळें

आजच्या महाराष्ट्रीय कुटुंबात पुरुषानीं आणलेली उत्तरेकडील आर्यपरंपरा व बायकानीं आणलेली दक्षिणेकडील द्रविडपरंपरा अशा दोन परंपराचा गंगा-जमनी संगम झालेला आहे.[1]

बायकाच्या सौभाग्यालंकाराचा प्रकार हा विशेष लक्षात घेण्यासारखा आहे. महाराष्ट्रातील मुख्य सौभाग्य-अलंकार मंगळसूत्र हा आहे. हातांतील बागड्या, कपाळावरील कुंकू वगैरेंचाहि सौभाग्य-अलंकारांत समावेश करतात; पण हे अलंकार कुमारीहि वापरतात. खालच्या वर्गांच्या बायका नेहमीं कुंकू लावतातच असें नाहीं. तेव्हा सौभाग्याचें असामान्य चिन्ह म्हणजे मगळसूत्र हेंच उरतें. ही चाल द्रविडाची आहे. उत्तर हिंदुस्थानांत मुख्य सौभाग्य-अलंकार हातातील चुडा अथवा बागड्या हा होय. मंगल-सूत्राला जें महत्त्व महाराष्ट्रात आहे तेंच महत्त्व उत्तरेकडे चुड्याला आहे. बंगालमध्यें चुडा लोखंडाचा घालतात व त्याचीं टोकें पक्कीं करून वज्रलेप करितात. पतिनिधनानंतर तो चुडा तोडूनच काढावा लागतो इतका तो वज्रचुडा असतो. आपल्यामध्यें चुड्याच्या या माहात्म्याची आठवण राहिली आहे ती फक्त मघेमध्यें. पतीला जीवदान द्या या अर्थी मंगलसूत्रदान द्या असें न म्हणता 'चुडेदान द्या' असाच वाक्संप्रदाय रूढ आहे. पण त्या चुड्याचें महत्त्वाचें स्थान महाराष्ट्रात मंगलसूत्रानें पटकाविलें आहे. स्त्रियानीं उत्तरेकडील आर्यांतील जे रिवाज उचलले त्यात भागांत सेंदूर घासणें व डोकीवर पदर घेणें हे प्रमुख होत. हें प्रकार द्रविडांना परके असून ते उत्तरेकडून आलेले आहेत.

मराठ्यांचीं जीं प्रख्यात कुलदैवतें आहेत त्यांत आर्य व द्रविड अशा दोहींनाहि सारखेंच महत्त्व आहे. मराठ्यांचीं दोन प्रसिद्ध देवस्थानें जोतिबा व खंडोबा हीं होत. पैकीं जोतिबा आर्य असून खंडोबा द्रविड

१. या विषयाचें उद्बोधक विवेचन भास्करराव जाधव यांनीं विविधज्ञानविस्तारांत (१९३१) 'मराठे आणि त्यांची भाषा' या निबंधांत केलें आहे.

आहे. जोतिबा हें शिंद्यांचें दैवत. तें दैवत घेऊनच शिंदे उत्तरेकडून म्हणजे सिंधमधून महाराष्ट्रात आले असें कऱ्हाड येथील शिंद्यांच्या कोरीव लेखावरून दिसतें. जोतिबाच्या जयजयकारात 'चाम मला' असा घोष करतात, तर सिंधमध्ये ' चंगामला ' हें ' कसें काय, ठीक आहे ना ? ' या अर्थी दोन माणसें भेटलीं असतां एकमेकाना नमस्कार करताना म्हणतात. जोतिबा म्हणजे ज्योतीचा देव. सिंधमध्यें प्राचीन मंदिरात देवाच्या स्थानीं ज्योतच असे, मूर्ति नसे. अहोरात्र ज्योत जळत असावयाची व तेंच देवाचें प्रतीक होय. सिंधमधून आलेल्या आर्योनीं आपल्याबरोबर आणलें तें हें ज्योतीचेंच दैवत असावें. त्याचें नाव जोतिबा पडलें. ज्याचेबरोबर तें आलें ते सिंधमधून आले म्हणून त्याचें नाव शिंदे पडलें असावें असें मास्कररांव जाधव यानीं प्रतिपादिले आहे पुढें जोतिबाच्या मंदिरांत मूर्ति स्थापन होऊन दिव्याचें रूपातर नंदादीपात झाले. दीपपूजेचा प्रकार आपल्यात आजहि दिव्याच्या अवसेच्या रूपानें शिल्लक आहे.

एवंच, जोतिबा हे उत्तरेकडून आले असावेत. खंडोबा दक्षिणेकडून आले असावेत. कारण खंडोबा किंवा स्कंद याचा संप्रदाय उत्तरेकडे मुळींच नाहीं आणि दक्षिणेंत जारी आहे. जेजुरीचा खंडोबा व द्रविडातील 'सुब्रह्मण्यम्' हीं दैवतें एकच असावींत. खंडोबा म्हणजे स्कंदपिता अर्थात् शंकर होय. व तो वैदिक होय असें चिंतामणराव वैद्याचें म्हणणें आहे. पण हा शब्दच्छल दिसतो. खंडोबा या शब्दातील बा याचा अर्थ पिता असाच घेतला पाहिजे असें नाहीं. चिंतोबा या शब्दातील 'बा'प्रमाणें तो नुसता सन्मानदर्शक असा घेतला म्हणजे झालें. शिवाय खंडोबाची तळी उचलतांना ज्या शब्दाचा गजर केला जातो तो शब्द 'येळकोट' आपण जशाचा तशा द्रविडापासून घेतला आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. दोन्ही दैवतांतील आणखी एक साम्य म्हणजे दोन्हींच्या परिचारिका वेश्या आहेत हें होय. सुब्रह्मण्याला ज्यांनीं द्रविडदेशातून महाराष्ट्रात आणला त्यांनीं त्याची देवदासी पद्धतीहि इकडे आणली व तिला येथें मुरळीचें रूप दिलें. कार्तिकेय हा स्त्रीजातीचा द्वेष्टा असला तरी सेनापति असल्यानें देवसेना ही त्याची पत्नी मानण्यांत आली होती. यामुळें

सुब्रह्मण्याचा उल्लेख 'वल्लीदेवसेनासमेतसुब्रह्मण्याय नमः' असा करतात.[१] येणेंप्रमाणें महाराष्ट्रात आर्यद्रविडाचा संगम झालेला आहे.

आपल्या संस्कृतीचें स्वरूप असें मिश्र असताहि आपण तिला वैदिक आर्य-संस्कृति म्हणूनच समजतों. संस्कृतीचा प्रवाह हा नदीच्या प्रवाहाप्रमाणे होय. कडेकपारींतून उगम पावून समुद्रास जाऊन मिळेपर्यंत नदी एकरूप दिसली तरी या नदीला अंतराअंतरावर अनेक नद्या, ओढे, नाले मिळत असतात. तीच स्थिति संस्कृतिगंगेची होय. अनेक लहानमोठ्या नद्यांची मिळून एक महानदी होत असताहि फार दूर प्रदेशातून येणाऱ्या एका नदीचेंच अभिधान तिला प्राप्त होते. आपल्या किंवा कोणत्याहि संस्कृतिगंगेची अशीच स्थिति आहे. आज भारतीय संस्कृति ही वैदिक संस्कृति होय अशी आपणामध्यें भावना आहे ती याच अर्थानें. कारण पाच हजार वर्षें होऊन गेलीं तरीहि आजचे लोक, निदान ब्राह्मण, हे आपले कांहीं संस्कार पाच हजार वर्षांपूर्वी जसे करीत तसे आजहि करीत आहेत. इतकेंच नव्हे तर मुखोद्गत वेदपद्धतीमुळें त्या संस्कारप्रसंगीं म्हटले जाणारे मंत्र हेहि जवळ जवळ जसेच्या तसेच म्हटले जात आहेत.[२] आणि ब्राह्मणेतरांत जेथें संस्कार पौराणिक पद्धतीनें होतात तेथेंहि पुराणें हीं वेदाचें उपबृंहण करणारीं आहेत अशी समजूत कायम आहे. यामुळें धार्मिक संस्काराबाबत वैदिक संस्कृतीची छाप सर्व समाजावर कायम आहे. वैदिक यज्ञाचा नभोमंडलव्यापी धूमधडाका नष्ट झाला असला तरी अग्निहोत्र्याच्या वेदींत वैदिक अग्नि अजूनहि अल्प प्रमाणात धुमसत आहे. असली पाच सात हजार वर्षांची अखंड परंपरा अन्य संस्कृतींना लाभलेली नाहीं. इराकमध्यें इष्टिकालेख सापडले पण तें वाङ्मय मुखोद्गत असणारे तर नव्हेच पण जाणणारेहि लोक आज नामशेष आहेत. क्रीटमध्यें लेख सापडले आहेत त्यांची तर भाषाहि अद्याप नीट समजली नाहीं. ईजिप्तमध्यें पुरातन संस्कृति

१. Original Inhabitants of India p. 16 by G. Oppert.

२. प्राचीन काळीं वेदांच्या ज्या अनेक शाखा झाल्या त्यांत पाठांतरें निर्माण झालीं. पण पुढें जटाघन वैगेरे प्रकारांनी बांधून टाकल्यावर नवीं पाठांतरें उत्पन्न होण्याचें बंद झालें.

होती पण तिचे अविच्छिन्न परंपरेचे वारसदार आज कोणी नाहींत. पण पांच सात हजार वर्षांपूर्वीचे वेद मुखोद्‌गत असणारे व वैदिक संस्कार-अखंड परंपरेनें चालविणारे ब्राह्मण हिंदुस्थानात आहेत. तात्पर्य, मिश्र असूनहि अखंड अशी ही भारतीय संस्कृति आहे. हें अखंडत्व कोणत्या प्रक्रियेनें आपल्या पूर्वजांनीं साधलें हें पुढील प्रकरणीं बघूं.

प्रकरण बारावें

एकीकरणाची प्रक्रिया : सहिष्णुता व संग्राहकता

भारतीय संस्कृतीच्या इमल्यावर वैदिक संस्कृतीचा चुन्याच्या हात बाहेरून सर्वत्र दिलेला असला व त्यामुळें ती एकजिनसी दिसत असली तरी तिचें अंतरंग पाहूं गेलें असता ती अनेक स्थलींच्या मालमसाल्यानें बनविलेली आढळून येते हें मागील प्रकरणीं आपण पाहिलें. आता हा मालमसाला कोणत्या प्रक्रियेनें एकरूप, एकसंध साधला गेला हेहि थोडें पाहूं या; म्हणजे आपल्या संस्कृतिसंघटनाच्या प्रयोगाचें अंतरंग अधिक स्पष्ट होईल. या प्रक्रियेचें स्वरूप प्रारंभींच सूत्ररूपाने सागावयाचें म्हणजे **सहिष्णुता व संग्राहकता** या दोन वृत्ति या ह्या प्रक्रियेच्या विणींतील ताणा आणि बाणा होत येवढें सागितलें म्हणजे पुरे. या ताणा-बाण्याचीं सूत्रेंच आता इतिहासाच्या हस्तानें उकलून पाहूं या.

या दोन्ही प्रवृत्ति थेट सिंधु संस्कृतिकाल व वैदिक कालापासून थोड्याफार प्रमाणात दिसून येतात. प्रथम प्रथम कटकटी थोड्या झाल्या नाहींत. वैदिक वाङ्मय हें तर आर्य व अनार्य याच्यातील लढ्याच्या खणखणाटानें सर्वत्र दुमदुमलेलें आहे. पण कालान्तरानें वरील प्रकारच्या प्रवृत्तीच्या जोरावरच भरतखंडासारख्या अफाट देशावर एकजिनसी संस्कृतीचा ठसा आपले पूर्वज उमटवूं शकले. परकीयांचे हल्ले चालू असता, आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें उपलब्ध नसता, देश भिन्न भिन्न बोलींनीं विभागला असता, जैन, बौद्ध, तांत्रिक, नास्तिक, शाक्त वगैरे अनेक पंथानीं धार्मिक बुद्धीला अनेक पंथ फुटले असतां, आसेतुहिमाचल एकच संस्कृतीचें छत्र उभारण्यास भारतीयाची सहिष्णुता व संग्राहकता हीच कारणीभूत झाली. आणि याच जोडगोळीच्या जोरावर

आचार-विचाराच्या भिन्न भिन्न प्रातात मतभेद व हितविरोध याना पायबंद घालण्याचा त्यानीं प्रयत्न केला. हा त्याचा प्रयत्न सर्वच क्षेत्रात पूर्ण निर्दोषी ठरला नसला तरी खंडतुल्य भरतखडात काहीं बाबतींत एकरूपत्व उत्पन्न करण्याइतके श्रेय त्याने संपादन केले येवढे सर्वमान्य होण्यासारखे आहे.

प्रथम सहिष्णुतेचा आविष्कार पाहू या. सहिष्णुतेच्या कसोटीचे मर्मस्थान धर्म हे होय.

या धर्माच्या प्रातातच सहिष्णुतेला तिलाजलि देणारी तामसी प्रवृत्ति सर्वांत तीव्रतम आढळावी हा एक आश्चर्यकारक प्रकार होय. मनाच्या तामसी स्वैरवृत्तीचे दमन करण्याकरिता ज्या मानवी सस्थानीं श्रेष्ठ कामगिरी बजावली आहे त्या सस्थात धर्मसस्थेचे स्थान अग्रपूजेचे आहे. पण मनाच्या वृत्ति मारू जाता त्या मारल्या न जाता फक्त दडून बसतात हा जो मानसशास्त्राचा सिद्धान्त आहे तो या धर्माच्या प्रातात उत्तम प्रत्ययास येतो. तामसी वृत्ति ही एकीकडे मारून टाकण्याचा प्रयत्न करता करता, ती एका प्रातात नष्ट झालेली दिसली तरी दुसरीकडे कोठें तरी उमटतेच. आणि काहीं वेळा अशी जोराने उसळी मारते कीं ज्याचें नाव तें ! धार्मिक वृत्तीचा कर्मठ माणूस तामसी व कोपिष्ट असावा हा अनुभव दुर्मिळ नाहीं. उपासतापास, व्रतेवैकल्यें, देहदडन तो अनेक सोशील पण त्या सोशीत राहता राहता त्याची वृत्ति अशी चिडखोर बनत असते कीं त्याच्या कर्मठपणाच्या रेखीव आयुष्यक्रमात थोडासा कोठे व्यत्यय आला तरी त्याचें माथें भणाणल्याशिवाय रहात नाहीं. तिन्ही त्रिकाळ आणि बारा मास दडपून ठेवलेल्या मानसिक वृत्ति अशा वेळीं जणों एकदम धडाक्यानें पेट घेतात.

हीच स्थिति समाजाचीहि दिसते. धर्माने घालून दिलेली नीति-अनीतीची व सत्यासत्यतेची शिस्त समाज पाळतो तो स्वार्थी व सुखलोलुप भावनाना दटावून दडपून पाळीत असतो. पण ही शिस्त पाळीत असता त्या शिस्तीविषयींच असा एक दुर्दम अभिनिवेश समाजामध्ये उत्पन्न होतो कीं त्या शिस्तीच्या फ्लीकडे कोणीं पाऊल टाकलें कीं त्याला ठार करण्याच्या वेळीं आपण सोसलेल्या सर्व बंधनाचा जणूं तो सूडच

उगवूं लागतो. व्यक्ति वा समाज शिस्तीचें जूं मानेवर वागवितो तो होसेनें नव्हे तर नाइलाज म्हणून. जोपर्यंत आपणाबरोबर इतराच्याहि मानेला रग लागलेली आहे असे त्याला दिसत असतें तोपर्यंत तो फारशी कुरकुर करीत नाहीं. पण कोणा चुकारानें शिस्तीचे जूं मानेवरून जरा फेकून दिलेले त्याला दिसले कीं त्याचे माथे फिरलेच ! मग त्याच्या स्वतःच्या मानेला लागलेल्या रगीचा सर्व राग त्या बोशिस्तावर उगवून घेणें हा आपला हक्क आहे असे तो प्रतिपादन करतो. इतकेच काय पण पाखंडाना शिक्षा करणें ही देवाची सेवा, भक्ताचें पवित्र कर्तव्य, पुण्याची जोड असेहि बरळण्यास तो कमी करीत नाहीं !

मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच असल्याने सहिष्णुतेचें आख्यान या अध्यायात लावावयाचे असले तरीहि हे आधींच सागून टाकतों कीं धार्मिक छळाचे प्रकार हिंदुस्थानातहि अगदींच घडले नाहींत असे नाहीं. पण इतर देशातील घोर प्रकार ध्यानीं घेतले असता हिंदुस्थानातील प्रकार काहींच नव्हत असे वाटावे असा मात्र प्रकार आहे.

धर्मच्छलाचीं तुरळक उदाहरणें

इतिहासाला मुद्दाम खोदून खोदून विचारलेत तर हिंदुस्थानच्या इतिहासातील धर्मच्छलाचीं काहीं थोडीं उदाहरणें तो तुम्हाला सागणार नाहीं असे नाहीं. अगदीं सत्ययुगामधील रामावताराचा काळ घेतला तरी त्या काळात तपश्चर्या करणाऱ्या शंबुकाचा रामाने कसा वध केला ही कथा आपणा सर्वांना माहीत आहे. त्या कथेंत धार्मिक जुलमाचा पुरावा आहे असें मानणे काहीं चूक होणार नाहीं. तसेंच बौद्ध, जैन आणि वैदिक ह्या धर्मांची चढाओढ सुरू झाल्यावर व त्या त्या धर्मांना उचलून धरण्याला राजे मिळाल्यावर जुलूमजबरदस्ती कोठेच झाली नसती तर तो एक चमत्कारच ठरला असता. या जुलमाचीं काहीं उदाहरणे इतिहासांत नमूदही आहेत. पण तीं फार थोडीं हाच खरा चमत्कार ! कालिदासकृत 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकातील नायक जो अग्निमित्र त्याचा बाप पुष्यमित्र हा शकपूर्व दुसऱ्या शतकातील मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. याच्या राज्यांत बौद्धाचा छळ झाला असल्याचें वाङ्मयात नमूद आहे.

त्यानें यवनांचा पराभव केला आणि आपलें सार्वभौमत्व जगजाहीर करण्याकरिता अश्वमेध यज्ञ केला. अशा यज्ञामध्ये अनेक पशूचा संहार होई. व त्यावर बौद्धजैनाचा कटाक्ष असल्यामुळें यज्ञविधीच्या ते सर्वस्वीं विरुद्ध असत. अश्वमेधासारख्या प्रसगीं या विरोधाला तीव्र स्वरूप येत असावें व उलट बाजूनें तीव्र प्रतिकारहि होत असावा. पुष्यमित्राच्या हातूनहि ह्या प्रसंगीं बौद्धाचा छळ झाला असावा असे 'मजुश्रीमूलकल्प' व 'दिव्यावदान' ग्रंथावरून दिसतें. मंजुश्रीकार लिहितो कीं, 'नाशायिष्यते तदा मूढः विहारान्धातुवरास्तथा' (श्लोक ५३१). तारानाथाच्या 'दिव्यावदान' ह्या ग्रंथाप्रमाणें वर्णन करावयाचें म्हणजे तर पुष्यमित्राने बौद्धाचा अगदीं आसुरी सूड उगविला, मगधापासून पजाबपर्यंत मठ जाळले, आणि श्रमणाची कत्तल केली, असे वर्णन केलें पाहिजे. तारानाथाचा ग्रथ अद्भूत-रसावर उभारलेल्या भारूड कथानीं बराच भरलेला असल्यामुळे वरील वर्णनात अतिशयोक्तीबद्दल फार मोठा आकडा बाद चालावा लागेल. पण तो घातला म्हणजे पिकल्याशिवाय विकत नाहीं या न्यायाने या छळाच्या हकीकतींतहि काहीं सत्याचा भाग असावा असें इतिहासकार स्मिथप्रमाणें[1] कोणीहि म्हणेल. याच तारानाथानें मारवाडच्या कोणा हर्ष राजानें केलेल्या जुलमाविषयीं लिहून ठेवलें आहे कीं, त्यानें मुलतानजवळ एक लाकडी हवेली बाधली, तीमध्यें बारा हजार विधर्मीयाना फूस लावून आणलें, व मग त्या लाकडी हवेलीला आग लावून आतील बारा हजार लोक व त्याचे धर्मग्रंथ याना अग्नीस अर्पण केले. हा अत्याचार सहाव्या शतकात घडला असावा. पुढील शतकात बगालचा राजा शशाक यानेंहि आसुरी वृत्ति प्रकट केल्याचें दिसतें. हा राजा शैव असून बौद्ध धर्माचा द्वेष्टा होता. यानें बुद्धगयेंतील परमपवित्र मानला गेलेला वृक्ष उपटून टाकिला, पाटलिपुत्रातील बुद्धाच्या पादुका फोडून टाकिल्या, नेपाळच्या हद्दीपर्यंत अनेक मठ उद्ध्वस्त केले, व भिक्षूंना देशोधडीस लावलें. याच शतकात दक्षिणेकडेहि छळाची वावटळ उमटलेली दिसते. पाड्यांचा राजा नेदु-मारण हा जैन असून त्यानें शिवभक्त चोलराजाच्या कन्येशीं विवाह केला. पुढें राणीच्या वजनानें राजाने जैनधर्म टाकून शैवधर्म. स्वीकारला. पण

१. Early History of India by V. Smith.

धर्मांतर करणाऱ्याच्या अंगात नवधर्माविषयी जो अतिरिक्त अभिमान उत्पन्न होतो तसा त्याचे ठिकाणी उत्पन्न होऊन त्यानें आपल्या पूर्वधर्मीयांवर शस्त्र धरलें; आणि थोडयाथोडक्या नव्हे तर आठ हजार जैनाना सुळावर चढविले. आणि या भीषण घटनेची स्मृति नष्ट होऊ नये म्हणूनच जणू ज्या ठिकाणी हा अनन्वित प्रकार घडला त्या मदुरेच्या मीनाक्षी मंदिरातील हैमपद्म सरोवराचे गिल मंडपाच्या भिंतीवर तिरुज्ञान संबदर याच्या प्रोत्साहनानें या प्रसंगाची चित्रें काढलेली आहेत; आणि मदिरात होणाऱ्या वार्षिक बारा उत्सवापैकी पाच उत्सवात या धर्मच्छळाचें नाटक करण्यात येते.[1]

अग्निकुलोत्पन्न रजपुतानींहि बौद्धाचा छळ केला असावा असे दिसतें. भविष्यपुराणातील प्रतिसर्गपर्वात म्हटलें आहे कीं चार लाख बौद्धाना दिव्यास्त्रानीं हाणून काढण्यात आले. 'अशोकं स्ववश चक्रुः सर्वे बौद्धा विनाशिताः। चतुर्लक्षाः स्मृताः दिव्यशस्त्रैः प्रहारिताः ॥'

युरोपमधील धर्मच्छळ

धर्मच्छलाचा इतिहास मुद्दाम पाहू लागले तर आणखी अशाच प्रकारची काहीं थोडकी उदाहरणें सापडतील; पण तीं एकंदरींत तुरळकच. युरोपमधील धर्मच्छलाचा वणवा पाहिला, इन्क्विझिशन किंवा अन्वीक्षामंडळ या धार्मिक संस्थेनें घातलेला धुडगुस अवलोकिला, या सस्थेचा उत्पादक तिसरा इनोसंट (किती सात्त्विक नाव !) याच्या एकट्याच्याच हुकुमानें सत्तावीस हजार पाखंड्याना कंठस्नान घालण्यात आलें हें ध्यानीं घेतलें, म्हणजे हिंदुस्थानचे लोक धार्मिक बाबतींत इतकें मिळतें कसें घेत याचेंच परकीयाना आश्चर्य वाटे. अन्वीक्षामंडळानें तर पाखंडी हुडकून काढून त्याला ठेचून काढावयाचें कंकणच बाधलें होतें. आणि पाखड सिद्ध कसें करावयाचें ! तर कोणीही दोन उपटसुंभानीं तशी साक्ष दिली कीं झालें सिद्ध ! त्या दोन माणसाचीं नावेंसुद्धा कळवावयाचीं नाहींत. त्यानीं साक्ष गुप्तपणें द्यावयाची. इनसाफ करणाऱ्या न्याया-

१. Studies in South Indian Jainism by Ayyangar & Rao, p.79.

धिशाचीं तोंडें दिसू नयेत म्हणून तेही बुरखा घालून बसत. आरोपीला दहशत बसावी म्हणून हाल हाल करणारीं हत्यारे कोर्टांत समोर माडून ठेवीत. आणि झटपटीने इनसाफ होऊन हजारो पाखडयाची यमलोकीं रवानगी होई. खुनशीपणा तर इतक्या थराला गेला होता कीं चौकशी चालू असता मृतापैकीं कोणी पाखडी होता असें आढळून आलें तर त्याचें प्रेत उकरून त्यास सुळावर चढवून दिले जाई ! यमाला देखील या पाखड्याची सोय लावणे अवघड गेले असेल. कारण त्याची संख्या निरनिराळ्या इतिहासकाराप्रमाणे पाहिले असता पन्नास हजार ते तीन लाखपर्यंत होती. आणि हे पाखंडी कोण ? खिश्चन धर्माच्या बाहेरचे ? छे ! ते सर्व येशूच्याच कळपातले येशूचेच निष्ठावंत भक्त ! म्हणजे असें कीं जो पथ सत्ताधिष्ठित असेल तो सत्पथ आणि त्याशिवाय बाकी सर्व पाखंडी ! अशा रीतीनें मानिकियन, आरियन, प्रिस्कीलियन, पालीयन, बोगोमाईल्, काथुरी, वाल्डेन्शियन, आल्बिजेन्शियन, लोलार्ड, हुझाईट वगैरे जे अनेक पंथ खिश्चन धर्मामध्येंच उदयास आले त्या सर्वांवर सत्ताधिष्ठित रोमन कॅथॉलिक पंथाने शतकानुशतकें तरवार धरली होती. त्यातही मौज अशी कीं या पाखड्यांचीं मते पाहिलीं तर त्याचा मुख्य गुन्हा कोणता म्हणाल तर त्यांचीं मते सत्ताधीश पोपमहाराजापेक्षा येशूच्या शिकवणीला अधिक धरून होतीं हा होय ! पोपमहाराज हे ऐश्वर्यसंपन्न प्रासादात नृत्यागनाच्या परिवारात विलासी रीतीने आयुःक्रमण करीत तर हे भोळसट पाखंडी ब्रह्मचर्य आणि वैराग्य याची कास धरीत ![1] अन्वीक्षामंडळाची स्पेनमधील कामगिरी खुद्द सैतानाला लाजवील अशी होती. या मंडळाचा अध्यक्ष तार्कीमीदा या एकट्यानेंच आठ हजार आठशे पाखंड्याना चितेवर चढविले म्हणतात. कोणी पाखडी पळून गेलेच तर त्याच्या निदान प्रतिमा करून तरी तो जाळी. तशा प्रतिमा तार्कीमीदानें साडेसहा हजार करून जाळल्या आणि नव्वद हजाराना निरानिराळी प्रायश्चित्ते लावून दिलीं. यानेच ज्यू लोकावर देश सोडून जाण्याचा हुकूम काढला आणि त्या हुकुमान्वयें तीन लाख ज्यूंना हद्दपार केलें. परलोकात गेलेले पाखंडीही याच्या हातून सुटले नाहींत. कारण.

१. 'The Horrors of Inquisition' by Joseph McCabe.

मेलेल्या पाखंड्याचा– दोन दोन, तीन तीन पिढ्यापूर्वी मेलेल्या पाखंड्याचाही– इन्साफ होई, व त्यांचीं प्रेतें उकरून काढून त्याना जाळीत आणि बापजाद्याच्या काल्पनिक पापाबद्दल मुलानातवंडाची जिंदगी जप्त करून त्याना देशोधडीस लावीत.[1]

युरोपातील धर्मच्छलाचे हें तारागण पाहिलें म्हणजे सहिष्णुतेचेच शिफारसपत्र ग्रीक भेग्यास्थेनिस, चिनी फाहीयेन, मुसलमानी अल्बेरुणी आणि युरोपियन स्मिथ या सर्वांनीं एकमुखाने हिंदूना का दिलें आहे हें लक्षात येईल.

भरतखंडात वैदिक, बौद्ध, जैन, लिंगायत, मानभाव, शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त वगैरे अनेक धर्मपथ होऊन गेले. या पथामध्यें चुरस, मत्सरही नादत नव्हता असें नाही; पण त्या त्या काळीं राजसत्तेचें पाठबळ असताहि या मत्सराग्नीने युरोपातील प्रचंड वणव्याचे स्वरूप धारण केले नाहीं, ह्यावरून सहिष्णुतेची वृत्ति भारतीय संस्कृतींत उत्पन्न झाली होती याशिवाय दुसरें अनुमान काय निघेल ?

नुसत्या एकाच धर्मातील अनेक देवताचे एकीकरण करून ईश्वरैक्याची कल्पना स्थापणें ही गोष्टहि किती अवघड आहे हे परकीय इतिहासाकडे पाहिले असता लक्षात येईल. ईजिप्तमध्ये व पॅलेस्टाइनमध्ये हिंदुस्थानातल्याप्रमाणे एकेश्वरी कल्पना अमलात आली होती. पण तिच्याकरिता जुलमाचे अस्त्र पाजळण्यात आले होते. याविषयी डायमेन लिहितो कीं, " पॅलेस्टाइन म्हणजे ज्यू लोकाच्या देशात देवताचे एकीकरण घडवून आणलें खरे; पण तें कसें घडवून आणले ? तर आपला देव जो जेहोवा त्याशिवाय इतर देवतावर कडकडीत बहिष्कार घालून आणि इतर देवतोपासकाचा भयकर छळ करून ! परतु हिंदुस्थानात एकेश्वरत्व नसलें तरी अद्वैत हें अधिक सात्त्विक अशा तत्त्वज्ञानविचाराच्या मार्गानें म्हणजे नानात्वाच्या शिरशिरीत पडण्यातून त्यापलीकडे असणारें एकत्व पाहून वैदिक ऋषींनीं सिद्ध केलें.[2]

---

१. 'Torquemada and the Spanish Inquisition' by Clement Wood.

२. समग्र केळकर–१२-६२५.

आता हिंदुस्थानात धार्मिक सहिष्णुता कशी नादत होती हें छळ करण्याची सत्ता व साधनें ज्या राजे लोकांनीं भिन्नधर्मीयांनासुद्धा आपला उदार आश्रय कसा दिला यावरून पाहूं.

सहिष्णुतेची जोपासना

सहिष्णुतेच्या पुरस्कर्त्यांच्या गणनाप्रसंगीं अगदीं प्रथम कोणा सम्राटाचें स्मरण होईल तर ते अशोकाचे. धार्मिक समतेचा पूर्णावतार कोठें झाला असेल तर तो अशोकामध्येच.

त्याच्या राज्यात धर्माचरणानें भेरीघोष मागें पडून धर्मघोष दुमदुमूं लागला. 'भेरीघोसो अहो धमघोसो।'[1]

अशोकानें आपलीं धर्मतत्त्वें आणि नीतितत्त्वे याचा सार्वत्रिक प्रसार करण्याकरिता देशाच्या चारी दिशाना शिलालेख खोदून ठेवले. असे लेख पश्चिमेस ठाण्याजवळील सोपारे, काठेवाडातील गिरनार, उत्तरेस सीमाप्रातात मन्सेरा व शाहबाजगढी, डेहराडून जिल्ह्यात कालसी, पूर्वेस जगन्नाथपुरी जिल्ह्यात धौली व कर्नूळ जिल्ह्यांत येरगुडी, म्हैसूरजवळ मस्की वगैरे अनेक स्थलीं सापडले आहेत. हे सर्व लेख अशोकाची सहिष्णुवृत्ति जगाला पुकारीत ऊन पाणी खात आज शेंकडो वर्षें निष्ठेने उभे आहेत. नमुन्याकरिता त्याचा बारावा शिलालेख (जहाबाजगढ प्रत) वाचा. त्यात अशोक सागतो कीं 'देवाचा लाडका प्रियदर्शी राजा हा सर्व धर्मपंथाच्या गृहस्थाचा आणि संन्याश्याचा सत्कार करितो. हा सत्कार दान व पूजा यानीं पूर्ण होतो असें तो मानीत नाहीं. तर जेणेंकरून सर्व धर्मपंथाची सारवृद्धि होईल, उत्कर्ष होईल तो खरा सत्कार असें त्याचे मत आहे. उत्कर्ष बहुविध असतो. पण त्या सगळ्याचें मूळ म्हणजे वाक्संयम हें होय. का ? तर वाक्संयमाच्या योगानें आपल्या पंथाचा गौरव व परपंथाची गर्हणा करण्यास निष्कारण कोणी सहसा प्रवृत्त होणार नाहीं. प्रसंगविशेषीं किंचिन्मात्र वाग्दोष घडेल तेवढाच. म्हणून नानाप्रकारांनीं

---

१. चवथा प्रस्तारलेख (गिरनार)-(Select Inscriptions by Sirkar, p. 21.)

परपंथीयांचा गौरव करीत जावा कारण असें केल्यानें आपल्या पंथाची वृद्धि होते. त्याच्या उलट वागण्यानें आपला पंथ क्षीण होतो आणि परपंथाला अपकार होतो. जो कोणी स्वपंथाचा गौरव व परपथाची गर्हणा करितो तो स्वपंथावरील भक्तीनेंच करितो. का कीं असें केल्यानें स्वपथाला मी तेजस्वी करीत आहें अशीच त्याची भावना असते. पण वस्तुतः ह्या वागणुकीनें तो आपल्या पंथाचा उपहास मात्र करीत असतो. तात्पर्य,संयम हाच श्रेष्ठ. एवच सर्वपथीयांनीं परस्पराचीं धर्ममतें लक्षपूर्वक ऐकावीं व एकमेकाची सेवा करावी आणि त्यामुळें सर्व पंथाचे उपासक बहुश्रुत व उदारबुद्धि व्हावे अशी देवाना प्रिय असलेल्या या राजाची इच्छा आहे....'[1]

पुढच्या शतकातला कलिंगराज खाखेल हाही आपणास 'सवपासंड-पूजको सवदेवायतनसकारकारकः' असें म्हणून घेतो.[2] इसवी सनाच्या प्रारंभी राज्य करणारे शातवाहन राजे हे वैदिक धर्माचे अनुयायी होते. त्याच्यातील गौतमीपुत्र हा ब्राह्मणाचा रक्षणकर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. पण या राजाच्या कारकीर्दीतहि बौद्ध यतींचा योगक्षेम नीट चाले. त्याची साक्ष देण्यास आपल्या महाराष्ट्रातीलच कार्ले, भाजें वगैरे ठिकाणचीं लेणीं अद्यापहि उभीं आहेत. दुसऱ्या शतकातील या राजानीं अश्वमेध व गवामयन यज्ञ केले यावरून त्याची वैदिक धर्मनिष्ठा स्पष्ट दिसून येते. पण त्यानीं बुद्धभिक्षूकरिता लेणीं बाधलीं व त्याना नव्या कफन्या दरवर्षी देण्याकरिता एका श्रेणीला कायमचा मक्ताहि दिला होता. मलबार-च्या प्राचीन राजानीं याच कालात ख्रिस्त्यास व यहुद्यांस आपल्या धर्मा-प्रमाणें वागण्यास परवानगी दिली व तद्विषयक ताम्रपट दिले. पुढें सहाव्या शतकातील चालुक्य राजे हेहि वैदिकधर्माभिमानीच होते. या घराण्यांतील सुप्रसिद्ध पुलकेशीयानें तर अश्वमेध यज्ञ केला. पण याच घराण्यांतील दुसऱ्या विक्रमादित्यानें एका जैन मंदिराचा जीर्णोद्धार करून जैनपंडिताला देणगी दिली असेंहि इतिहास सागतो. मगधाचे गुप्त राजे वैदिक धर्माचे अभिमानी असून समुद्रगुप्तानें अश्वमेधहि केले. ते स्वतःला परममागवत

१. Select Inscriptions, p. 33.

२. हाथी गुफा लेख- Select Inscriptions, p. 211.

म्हणवीत. पण दुसरा कुमारगुप्त आणि बुधगुप्त यांनीं सारनाथ येथें बुद्धाच्या मूर्ति स्थापल्या.[1] ठाणेश्वराचा हर्षवर्धन हा म्हातारपणीं तरी बौद्ध होण्याच्या बेतात आला होता. तरी या दोन राजवटींत हिंदुस्थानात येऊन गेलेल्या चिनी प्रवाश्यानीं लिहिलेल्या हकीकतीवरून पाहता दोन्ही रियासतींत धर्मच्छल कोणत्याच पंथाला सोसावा लागत नव्हता. फाहीयेन आणि युवानच्वंग हे चिनी प्रवासी अनुक्रमें चद्रगुप्त व हर्षवर्धन याच्या कारकीर्दीत भरतभूमीची तीर्थयात्रा करून गेले. पण दोघानाहि वैदिक धर्म आणि बौद्धधर्म गुण्यागोविंदाने शेजारीं शेजारीं नादत असताना आढळले. गुप्तघराणे वैदिक धर्माभिमानी असताहि या घराण्यातील नरसिंहगुप्तानें नालद येथे बौद्धमठ बाधला. हर्षवर्धनाच्या कारकीर्दीत जनतेमध्यें वैदिक आणि बौद्ध या पंथात थोडा मत्सर असे. बौद्धधर्मीय युवानच्वंगचा हर्षानें केलेला गौरव वैदिकाना आवडला नाहीं, तरीहि खुद्द राजा हर्ष यानें दोन्ही पथाविषयीं समतोल वृत्ति राखली होती. हर्षाचा चरित्रकार बाणभट्ट हा वैदिकधर्मीय असून त्यानेंहि बौद्धांविषयीं अनुदार उद्गार कोठेच काढलेले नाहींत. उलट हर्षचरितातील दिवाकरमित्राच्या आश्रमात मोठा मेळा जमला होता, त्यात भिक्षु, भागवत, केशलुंचक, कापालिक, लोकायतिक असे नानापंथी लोक होते असें त्यानें वर्णन केलें आहे. असल्या याद्या संग्राहक स्वरूपाच्या असतात हें खरें पण त्यातहि सहिष्णुवृत्ति दिसून येतेच.

खुद्द हर्षाच्या कुटुंबात धार्मिक सहिष्णुता फार उच्च दर्जाला गेलेली आढळते. हर्षाच्या कुटुंबात कोणीं कोणत्या देवतेला भजावें किंवा कोणीं कोणत्या धर्माची दीक्षा घ्यावी याविषयीं पूर्ण स्वतंत्रता होती. हर्षाच्या पूर्वीच्या तीन पिढ्यात उपास्यदैवत आदित्य होतें तर खुद्द हर्ष आपणास परममाहेश्वर म्हणजे शिवभक्त म्हणवीत असे आणि हर्षाची बहीण राज्यश्री ही बुद्धसंघांत सामील झाली होती ! युवानच्वंगानें वर्णिलेल्या एका प्रसंगावरून तर हर्षाच्या राज्यातील धर्मसहिष्णुतेचें स्वरूप ठळक रीतीनें नजरेस येतें. सम्राट् हर्ष हा आपल्या अलोट संपत्तीचा दर पांच वर्षांनीं दानधर्म करी. याचा उल्लेख मागें आलाच आहे. (पृ. १२०). या विश्वजित् यज्ञ-

१. History of the Guptas by Dr. R. N. Dandekar, p. 190.

प्रसगीं संपत्ति वाटण्यात येई ती धार्मिक पंथापथामध्यें कोणताहि भेदभाव न करता वाटण्यात येई. चिनी यात्रेकरू हजर होता तो हर्षाच्या कारकीर्दीतील सहावा प्रसंग होता (इ. स. ६४३). त्याने लिहून ठेवलेलें या उत्सवाचें वर्णन हें साक्षात् सहिष्णुतादेवीच्या उत्सवाचेच वर्णन होय ! या महोत्सवाकरिता प्रयाग येथे विस्तीर्ण मंडप घातला होता. एकंदर कार्यक्रम ७५ दिवस चालू होता. सुमारे चार पाच लाखाचा मेळा जमला होता. त्यात सर्व धर्मांचे, सर्व पंथाचे लोक उपस्थित होते. उत्सवातील कार्यक्रमहि सर्वधर्मसग्राहक असाच होता. पहिल्या दिवशीं मंडपात अग्रभागीं बुद्धाची प्रतिमा स्थापण्यात आली, दुसऱ्या दिवशीं अग्रभागीं सूर्याची प्रतिमा ठेवण्यात आली, आणि तिसऱ्या दिवशीं मुख्य मान देण्यात आला ती प्रतिमा शिवाची होती ! चौथा दिवस बुद्धभिक्षूच्या दानसंतर्पणाकरिता राखून ठेवला असून पुढें वीस दिवस ब्राह्मणाची संभावना करण्यात आली. यानंतर निरानिराळ्या बारीकसारीक पंथाच्या भक्तांना मुक्तद्वार ठेवण्यात आले, आणि शेवटीं अनाथ, अपंग अशाचाहि योग्य परामर्श घेण्यात आला.[1] धार्मिक सहिष्णुतेचा हा एकंदर प्रकार अपूर्व नाहीं असें कोण म्हणेल ?

राष्ट्रकूटानीं हीच परंपरा चालविली. पहिला अमोघवर्ष हा जैन धर्मानुयायी असताही राज्यात पसरलेली रोगाची साथ घालविण्याकरितां महालक्ष्मी देवीला आपली करंगळी त्यानें कापून अर्पण केली. सौदत्तीच्या रट्ट घराण्यात हीच सहिष्णु वृत्ति दिसून येते. महासामत पृथ्वीराम याने ८१५ मध्यें जैन मंदिर बाधले. त्याचा नातू जैन; पण नातवाचा नातू वैदिक धर्माभिमानी होता. १०२२ मधील बेलूर येथील लेखात लिहिले आहे कीं, अक्कादेवी नावाच्या स्त्रीनें एक त्रिपुरुषाचें देऊळ बाधलें व ती जैन, बौद्ध व वैदिक अशा तिन्ही धर्मांतील व्रतवैकल्यें करीत असे. कनोजच्या गढवाल घराण्यातील गोविंदचंद्र हा स्वतः शैव होता पण बौद्धधर्मी कुमारदेवीशीं त्यानें विवाह केला, आणि बौद्धभिक्षूंच्या चरितार्थाकरितां सहा गावें लावून दिलीं. उलट बंगालचा महानंदपाल हा स्वतः बौद्ध असूनही त्यानें

१. Life of Hieun Tsang by Beal, p. 83.

राणी चित्रमतिकेला पुराण सागणाऱ्या ब्राह्मणाला गाव बक्षिस दिला.[1]

अलीकडच्या कालातील विजयनगरच्या राज्याकडे वळलें तरी तेथेंहि सिंहासनाधिष्ठित राजानीं सहिष्णुवृत्तिच जागविलेली आढळते. इ. स. १३६८ मध्यें राज्यात वैष्णव व जैन याच्यामध्यें पंचमहावाद्याचा व कलशाचा उपयोग करण्याचा हक्क जैनाना आहे कीं नाहीं यावरून तंटा उपस्थित झाला तेव्हा राजानें जाहीर केलें कीं, 'वैष्णव पंथ आणि जैन पंथ यात काहींच फरक नाहीं. एकाचें जे नुकसान तेंच दुसऱ्याचें; म्हणून सर्वत्र वैष्णवानीं असें शासन सुरू करावे, कारण यावच्चंद्रदिवाकरौ वैष्णव-पंथ जैनाचें संरक्षण करील.'[2]

सहिष्णुतेची ही परंपरा शिवाजी व पेशवे याच्यापर्यंत अखंड चालू होती. कुराण, मशीद व स्त्रिया याचा मान राखण्याविषयीं शिवाजीनें सक्त नियमच केला होता असें आपल्या बखरकारानींच नव्हे तर काफीखान या इस्लामी इतिहासकारानेंही लिहून ठेवलें आहे.[3] या नियमाचें मर्म त्याच काळीं औरंगजेबानें जो धुडगूस माजविला होता त्यावरून विशेषच उठून दिसतें. औरंगजेबाचा परधर्मद्वेष इतिहासात प्रसिद्ध आहे. ओरिसाच्या सुभेदाराला मंदिरें उद्ध्वस्त करण्याविषयीं त्याने हुकूम पाठविला त्याअन्वयें त्या सुभेदारानें खालील अंमलदाराना फर्मान काढलें कीं फर्मान हातीं पडताच तिलक्कुट्टी येथील मंदिर ताबडतोब जमीनदोस्त करावें, तसेंच विलंब न करितां गेल्या बारा वर्षांत जीं जीं मंदिरें बाधलीं असतील तीं तीं सर्व उद्ध्वस्त करावीं, आणि तसें केल्याबद्दलचे अहवाल काझीच्या सहीशिक्क्यानिशीं व थोर शैखाच्या साक्षीसह दरबारकडे पाठवून द्यावे. शिवाय जुन्या मंदिरांच्या जीर्णोद्धारासही मनाई करावी. १६७० मध्यें तर सर्वच प्रांतांच्या सुभेदाराना काफिराचीं मंदिरें आणि पाठशाळा उद्ध्वस्त करण्याबद्दल हुकूम धाडण्यांत आले असें हुगळी येथील द ग्राफ या फ्रेंचानें लिहून ठेवलें आहे. असला हुकूम हातांत पडताच प्रातोप्रातींच्या सुभेदारांना भलतें

१. Rashtrakutas p. 374, by Dr. Altekar.

२. त्रिशतसांवत्सरिक ग्रंथ पृ. ५२९.

३ Elliot and Dowson VII, p. 260.

अवसान चढलें आणि मंदिरें उद्ध्वस्त केल्याच्या पुण्यकृत्याचे अहवाल दरबारकडे झपाट्यानें रवाना होऊं लागले. या उद्ध्वंसनाच्या होमकुंडांत काशीचें विश्वेश्वरमंदिर, मथुरेतील लाखो रुपये खर्च करून उभारलेलें केशवरायमंदिर, गोवर्धन येथील वल्लभाचार्यांचें मठमंदिर, हरद्वार, अयोध्या, सोमनाथ येथील मंदिरें, गुजरात येथील अनेक मंदिरे यांची आहुति देण्यात आली. जयपुरात त्रेसष्ट मंदिराचा बळी देण्यात आला व एकट्या उदेपूर संस्थानात तरें २६३ मंदिरें जमीनदोस्त करण्यात आलीं. यावरून या विध्वंसक प्रकाराच्या भीषणतेची कल्पना येईल. जोधपुरांत खान इ जहान याला या कामगिरीवर खास पाठविण्यात आलें होतें. त्यानें तेथील अनेक मंदिरें पाडून टाकलीं व आपली पुण्याई मिरविण्याकरितां फोडलेल्या तोडलेल्या मूर्तीचे गाडेच्या गाडे भरून दिल्लीस आणले![1]

उलट शिवाजीनें असल्या प्रकारांबाबत औरंगजेबास लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे त्यात तो लिहितो, "वाईट अथवा चागला असो हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहेत. त्यास कोणाचे धर्मास विरोध करणे हें आपले धर्मापासून सुटणें व ईश्वराचे लिहिले रद्द करून त्यावर दोष ठेवणें होय."[2] माधवराव पेशवे हे असेच उदार होते. त्यानीं फिरंग्यास देवळें बांधण्यास परवानगी दिल्याचीं चार पत्रें इतिहाससंग्रहातील ऐतिहासिक टिपणात छापलीं आहेत.

सहिष्णुतेची अमर पताका

सहिष्णुतेचे, सक्रिय सहिष्णुतेचे, असले आणखी पुष्कळ मासले इतिहासाचीं दप्तरें धुंडाळाल तर सांपडतील. पण केवळ इतिहासाच्या बाडात गाडले गेलेले हे दाखले नष्ट होण्याचाहि संभव फार. खुद्द हर्षराजाचें वरील वर्णन हेंहि चिनी प्रवाश्यानें लिहून ठेवलें म्हणून आज आपणांस अवगत होत आहे. आणि तेंहि चिनी जाणणाऱ्या

१. 'Religious Policy of the Mughal Emperors' by Sri Ram Sharma.

२. ऐतिहासिक पत्रबोध पृ. १५. गो. स. सरदेसाई.

पंडितानीं आमच्या भावेंत आणलें तेव्हा ! पण साध्या मुशाफराच्या नजरेलाहि सहज दिसण्यासारखें हिंदु सहिष्णुतेचें चित्र आजहि तुम्हांस अवलोकण्यास हवें काय ? हवें असलें तर तुम्हास लांब जावयास नको. आपल्या या महाराष्ट्रातच तें तुम्हांस आढळेल; आणि तेंहि चिरकाल टिकेल अशा स्वरूपात. तें म्हणजे वेरूळचीं लेणीं हीं होत ! हीं लेणीं म्हणजे भारतीय सहिष्णुतेची अमर पताकाच होय. हीं लेणीं पुष्कळ असून त्यानीं एक अर्धवर्तुळाकार अशी सबंध टेकडी व्यापली आहे. या टेकडीकडे म्हणजे लेण्याकडे तोंड करून उभे राहिलात व उजव्या हातास प्रारंभ करून डावीकडे लेणीं पाहत जाऊं लागलात तर पहिल्या काहीं लेण्यांत तुम्हास बुद्धाच्या प्रतिमा आढळतील. तीं संपलीं कीं पुढचीं काहीं लेणीं वैदिकधर्मीयांचीं आढळतील. यातील सर्वांत मोठ्या लेण्यालाच कैलास हें नाव आहे. आणि तेथून पुढें पाहत गेलात म्हणजे उरलेल्या लेण्यातून जैनाच्या तीर्थंकरांचें दर्शन घडेल. व्यापक हिंदु धर्माच्या या तिन्ही शाखा एकत्र गुण्यगोविंदानें कशा नादत होत्या ह्याचें हें चिरकालिक स्मारकच होय. या बाबतींत मंदिरें उद्ध्वस्त करून मशिदी उभारणाऱ्या मुसलमानांची वृत्ति ध्यानांत आणा म्हणजे हीं तिन्ही लेणीं एकाच डोंगरात शेजारीं शेजारीं नांदविणाऱ्या उदार सहिष्णुतेचें मर्म लक्ष्यांत येईल. मुसलमानाची मशीद उठावयाची म्हणजे ती हिन्दूंचें देऊळ पाडून त्याच्या उरावर पाय देऊन उठावयाची. समूळ जमीनदोस्त करण्यास सवडच सापडली नाहीं तरी निदान छिन्नविच्छिन्न विद्रूप तरी करून सोडावयाचें ही रीत. पण वेरूळचीं लेणीं खोदविणाऱ्या वैदिक, बौद्ध व जैन राजांना ह्या विघातक वृत्तीचा स्पर्शहि झालेला दिसून येत नाहीं; म्हणूनच इतिहासाचे कागदपत्रं नष्ट झाले तरी वेरूळची काळ्या कपारीची अभेद्य टेकडी जोंवर धरणीवर उभी आहे तोंवर ती आपल्या अनेक लेण्यांच्या मुखांनीं सर्व जगाला ओरडून सांगेल कीं, सहिष्णुता हा हिंदुधर्माचा प्राण होय !

भारतीयाच्या सहिष्णुतेबद्दलची ख्याति जगभर पसरलेली होती, ती जाणूनच चौथ्या शतकांत इराणांत सस्सानिद राजांनीं ख्रिस्त्यांना धारेवर धरलें तेव्हां त्यांनीं तेथून पळ काढून कोठला किनारा गांठला असेल तर तो हिंदुस्थानचा किनारा ! आणि पुढें आठव्या शतकांत इराणांत मुसलमानी

अंमलात पारशाना वाईट दिवस आले तेव्हा तेहि कोणत्या देशाकडे वळले असतील तर हिंदुस्थानाकडेच !

सहिष्णुतेचा खून सर्वांत कोठें पडत असेल तर तो धार्मिक क्षेत्रांत. म्हणून त्याचें थोडें विस्ताराने दिग्दर्शन केलें. सामाजिक क्षेत्रातील मारती-यांच्या सहिष्णुवृत्तीला अस्पृश्याविषयीं हीन भावना हा मोठाच काळिमा होय. पण तो सोडला असता पाश्चात्यांशीं तुलना केली असता मारती-याच्या सहिष्णुतेचा प्रत्यय आणून देण्यास भरतखंडातील गुलामगिरीच्या संस्थेच्या अतिसौम्य स्वरूपाकडे अगुलिनिर्देश केला म्हणजे पुरे. माणसें विकणें–विकत घेणें, दान करणें, नजराणा देणें या स्वरूपांत गुलामगिरी हिंदुस्थानात अपरिचित नाहीं. ती वैदिक कालापासून पेशवाई अखेरपर्यंत रूढ होती. दास-दासींचे नजराणे दिल्याचे उल्लेख वेद, रामायण वगैरे प्राचीन ग्रंथापासून पेशवेदप्तरापर्यंत सर्वत्र आढळून येतात. त्रदस्यूनें पुरो-हिताला पन्नास तरुण दासी दिल्या. (ऋ.८.१९.३६). वैन्यानें अत्रीस एक हजार दासी नजर केल्या (वनपर्व १८५.३४). असले अनेक उल्लेख आढळतात. पण या दासाची पाश्चात्यांच्या प्राचीन रोममधील गुलामाशीं किंवा अर्वाचीन अमेरिकेंतील निग्रोंशीं किंवा रबराच्या मळ्यातील मुदत-बंद मजुराशींही कोणतीच तुलना नाहीं. हिंदुस्थानातील दास-दासींची जीवयात्रा व दर्जा सामान्य पगारी नोकराच्या तोलाचाच असे. दासाना गुरांप्रमाणें साखळीनें बाधून ठेवणें, पाठीवर चाबूक ओढणें, खुणेकरता तापलेल्या लोखंडानें डागणें असले पाश्चात्य प्रकार येथें आढळत नाहींत. येथें असले प्रकार दिसले नाहींत म्हणूनच प्राचीन काळीं मेग्यास्थेनिसनें लिहिलें कीं हिंदुस्थानांत गुलामगिरी माहीत नाहीं. उत्तर-कालीं ठग, पेंढारी वगैरे धंदेवाईक दरोडेखोर मुलांमाणसांना पकडून विकीत व मुसलमान आणि अरब व्यापारी मडोचच्या बंदरातून गुलामांची आवक-जावक करीत. ब्रिटिशानीं गुलामगिरी कायद्यानें बंद केली ती ह्या प्रका-राची. हिंदूंच्यापुरतें पाहिलें तर त्यांच्यांत दाससंस्था फारच सौम्य प्रमा-णांत होती. म्हणूनच प्राचीनकाळीं मेग्यास्थेनिसनें जो अभिप्राय दिला तसाच ब्रिटिश अंमलाच्या सुरवातीला कोलब्रुक व मॅकनॉटन यांनीही दिला आहे. ते लिहितात कीं, 'गुलाम व नोकर यांच्यामध्यें हिंदुस्थानांस

नावापेक्षा कोणताच फरक नाहीं.' काहीं वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या 'ब्रिटिश अमलातील गुलामगिरी'[1] या नावाच्या पुस्तकात त्याच्या लेखकाने प्रतिपादन केले आहे की वरील साहेबमजकुराचा अभिप्राय हा बगालपुरताच असून तोही एकंदरींत फाजील सौम्यपणाने प्रकट केला आहे. कारण मलबार, मुंबई, मद्रास या ठिकाणीं गुलामगिरी उग्र स्वरूपात होती असे त्याचे म्हणणे आहे. पण सर्व हिंदुस्थानात ती तशी होती असे मोठें सशोधन करूनही त्याला दाखविता आलेले नाहीं. त्याची मुबई म्हणजेही मुख्यतः मुंबई बदरच घेतले पाहिजे. महाराष्ट्रात दाससंस्था नांवालाच होती. गुलामगिरी रद्द करण्याचा कायदा करण्यापूर्वी गुलामगिरीची माहिती निरनिराळ्या संस्थानातून इग्रजानीं मुद्दाम मागविली होती व त्याकरिता मोठी प्रश्नपत्रिका तयार केली होती. तिला दिलेलें उत्तर पेशवेदप्तरामध्ये प्रसिद्ध झालेले आहे त्यात लिहिले आहेः— 'बहुतकरून या प्रातीं पुरुषास गुलामगिरी प्राप्त होत नाहीं. लुटीचे समईं बायकामुलीस धरून कुणबीण म्हणून आणून विकतात. असल्या कुणबिणीचे काम दळणकाडण असलें असतें.' (खंड ४२).

संग्राहक वृत्ति

या सहिष्णुतेच्या जोडीला दुसरें डोळ्यात भरण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे संग्राहकपणा हे होय. नुसती सहिष्णुताच हिंदुसमाजात वावरत असती तर भिन्न भिन्न समाज एकमेकाशेजारीं नादत राहिले असते एवढेच, पण त्या सर्वांचें सास्कृतिक एकीकरण झालें नसतें. तसें एकीकरण राजकीय क्षेत्रांत नाहीं तरी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात तरी झालें ही कामगिरी क्षुल्लक नव्हे. त्यातहि हें एकीकरण त्या त्या पंथाचें आणि समाजाचें वैशिष्ट्य कायम ठेवून करण्यात आलें हे विशेष होय.

सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात हें एकीकरण कसें करण्यात आलें याचें धावतें दर्शन घेणेंहि मनोरंजक आहे. हिंदुस्थानातील अनेक भिन्न-भिन्न रक्तांच्या समाजाना एका सूत्रात गोवणें ही क्रिया फारच जिकीरीची होती. खुद्द भारतीय आर्यांच्या टोळ्या हिंदुस्थानांत आल्या त्याच्यापूर्वीच

१. 'Slavery in British India' by Banaji.

येथें द्रविड सुप्रतिष्ठित झाले होते. त्याच्याहि आधीं येथें मूळचे राहिवासी होते. त्याना आदिद्रविड म्हणता येईल. आर्यांच्या वसाहतीनंतर पर्शु, यवन, पल्हव, शक, कुषाण, हूण, गुर्जर वगैरे अनेक परकीय लोक भरतखडात आले व येथल्या अफाट समूहात मिसळून गेले. शिवाय प्रथमपासून आर्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून असुर, नाग, राक्षस, दस्यु, वानर वगैरे भिन्न समाज येथे स्थायिक झालेले होतेच. या सर्वांचा उल्लेख मागील प्रकरणीं आलाच आहे या सर्वांना एका समाजसूत्रात गोवून त्यांची परस्परस्थाने एका व्यापक समाजात निश्चित करणे हें काम व्यापक व संग्राहक बुद्धिविना अशक्यच होतें. ही समाजघटना नयार करण्यात आर्यांनीं जी वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था निर्माण केली ती त्याच्या समाजसघटनकौशल्याची द्योतक होय. कालान्तरानें ही जाति-संस्था उपयुक्त राहिली नाहीं, किबहुना विघातकही ठरली; कारण तिच्या तळाशीं असणारें गुणकर्माचे अधिष्ठान लोपून ती उत्तरकालीं जन्मावर उभारली जाऊन वज्रलेप बनविली गेली.

आर्येतर गटाना समाजघटनेत प्रविष्ट करण्यात प्रथम प्रथम ही जाति-संस्था फार सोयीची ठरली असावी. म्हणजे एखादा बाहेरील गटच्या गट भारतीय समाजघटनेत समाविष्ट केला म्हणजे त्याला रूढ जातींपैकी ज्या जातीशीं तो गुणकर्मानें जवळचा असेल त्या जातींत त्याला स्थान दिलें जाई. शिवाय मोठा गटच्या गट प्रविष्ट झाल्यानें त्याची एक पोटजात बने व त्यामुळें त्याच्या विवाह व अन्नोदक या व्यवहारात पुरेसें क्षेत्र मिळे. उच्चवर्णीयात परकीयाना समाविष्ट करून घेतलेल्याचे उदाहरण म्हणजे मागील प्रकरणीं उल्लेखिलेल्या पारशी मग लोकांचें. हे लोक इराणातून हिंदुस्थानात येऊन मिश्र देवतेच्या उपासनामार्गाचा फैलाव करते झाले. याचा आचार पुजारीवर्गासारखा असल्याने त्याना शकद्वीपाहून आलेले ब्राह्मण असें लेखून त्याचा प्रवेश येथील ब्राह्मणवर्णात करण्यात आला. आता मग हे पुजारी म्हणून धंद्याने ब्राह्मण जातीचे ठरले तरी रक्ताने, भाषेने, धर्मानें परकीय; तेव्हा त्याच्याशीं विवाहसंबंध होणें कठीण होतें. यामुळें त्याची पोटजात बनली. तशी ती प्रारंभी बनणें हेंच स्वाभाविक. पण कालांतरानें या पोटजाति इतर बहुसंख्याक जातीशीं एकरूप होतात त्या वेळीं पुन्हा शरीरसंबंध

सुरू केला पाहिजे ही क्रिया मात्र झाली नाहीं. जाती वाढत जाण्याची क्रिया सुरू राहिली पण त्या मोडण्याचा स्थगित झाली हे मात्र योग्य झाले नाहीं.

व्रात्यस्तोम

परकीय समाजातील गटच्या गट आपल्या समाजात समाविष्ट करून घेण्याचा वैदिक काळातील सुप्रसिद्ध प्रयोग म्हणजे व्रात्यस्तोम विधि हा होय. आपल्या मराठी भाषेत व्रात्य हा शब्द आता फक्त खोडकर या अर्थी रूढ होऊन बसला आहे. पण तो वैदिकसहिताकाळीं भरतखंडाच्या पूर्वभागातील म्हणजे प्राचीन मगध किंवा हल्लींच्या उत्तर बिहार प्रांत यात राहणाऱ्या आर्येतर लोकाचा वाचक असावा. ब्राह्मणकाळीं या शब्दाचा विस्तार होऊन व्रात्याच्या प्रांतात जाऊन राहणारे वैदिक किंवा आर्य संस्कार ज्याच्यात लुप्त झाले आहेत अशा सर्वांना लावण्यात येऊं लागला व पुढे धर्मशास्त्राच्या काळीं व्रात्य हा शब्द एकेकाळीं प्रादेशिक लोकवाचक होता याचे स्मरण नष्ट होऊन तो संस्कारलुप्त अशा सर्वांना लावण्यात येऊ लागला. पण व्रात्य व व्रात्यस्तोमविधि याचे ताण्ड्यमहाब्राह्मण व लाट्यायनसूत्र यात जे वर्णन आलेले आहे त्यावरून आर्येतर गटच्या गट आर्यांत समाविष्ट करून घेण्याकरिता या व्रात्यस्तोमविधीचा प्रयोग बसविण्यात आला होता असे स्पष्ट दिसते. ताण्ड्यमहाब्राह्मणाच्या सतराव्या अध्यायातील पहिले चार खंड या व्रात्यस्तोमविधीला वाहिलेले आहेत. ब्राह्मणकार लिहितो कीं, "देव जेव्हा स्वर्गलोकाला गेले तेव्हा त्याचे काहीं अनुयायी व्रात्याच्या प्रदेशात राहून गेले. हे अनुयायी नंतर स्वर्गाला जाण्याच्या इच्छेनें देव जेथून स्वर्गाला गेले त्या प्रदेशीं आले, पण देवाचा मंत्र आणि त्याचा छंद माहीत नसल्याने गोंधळले. ते पाहून देवाना त्याची दया आली व त्यानीं मरुताना सांगितलें कीं या व्रात्याना तुम्ही षोडशमंत्र व अनुष्टुभ छंद हीं शिकवा कीं ज्याच्या साहाय्याने त्याना स्वर्गाला येता येईल" ब्राह्मण ग्रंथातील या वचनाचा ऐतिहासिक अर्थ असा असावा कीं देव किंवा आर्य हे मध्यदेशातून पूर्वेकडे जसजसे स्वाऱ्या करूं लागले[1] तसतसे या स्वारीपैकीं पुष्कळ लोक व्रात्याच्या

१. पृ. २३९ वरील विदेघमाधवाची कथा पहा.

प्रातात राहूं लागल्यानें त्याचे वैदिक संस्कार लोपले असावेत. ते परत मध्यदेशात आल्यावर त्याना व्रात्यस्तोमविधि करून शुद्ध करून घेत असावेत. याच विधीने पुढे व्रात्यापैकी ज्याना वैदिक धर्मात येण्याची इच्छा असे त्यानाही व्रात्यस्तोमविधीनें वैदिक धर्मात घेण्यात येई व लाट्यायन-सूत्रकार लिहितो कीं, 'या विधीनतर या व्रात्याना द्विजत्वाचा दर्जा प्राप्त होई व मग त्याना वेदपाठनाचा, यज्ञविधीचा व ब्राह्मणाना दान देण्याचा अधिकार प्राप्त होई आणि ब्राह्मण त्याच्याशीं अन्नोदकव्यवहारही करीत. (८।६).

या व्रात्याची माहिती जी ब्राह्मणावरून मिळते तीवरून त्याच्यात काहीं अगदीं मागासलेले वन्य व काहीं चागले पुढारलेले असे वर्ग आढळून येतात. ब्राह्मणकार लिहितो, "व्रात्याच्या प्रातात जे जाऊन राहातात ते त्याच्याप्रमाणेंच हीन होतात. ते ब्राह्मणाचीं कर्मे करीत नाहींत[1] आणि कृषि-वाणिज्यही करीत नाहींत. पण 'अधाहींद्र' या विषम छदातील मंत्रानें ते सर्व व्रात्यसम होऊन जातात. या प्रसंगीं द्यौतान साम म्हणावे. कारण द्युतान हा व्रात्य-देवाचा गृहपति होय. व्रात्याच्यापैकी काहींना गरगिर (विषखादक)[2] म्हणत'त. ते ब्राह्मणाचे अन्न खातात आणि दीक्षा न घेताच दीक्षिताप्रमाणें भाषा बोलतात. पण षोडशस्तोममंत्रानें त्याचें पाप नष्ट होतें." ब्राह्मणकार पुढें लिहितो कीं ज्या व्रात्याच्या गृहपतीला व्रात्यस्तोम विधि करावयाचा असेल त्यानें मुंडास पराणी, धनुकली, छकडा, काळ्या दशा असलेली घोंगडी, कातड्याचीं काबरुणें, चादीचा निष्क अशी सर्व सामग्री जुळवावी व त्याच्या अनुयायानीं तावडे रंगाची दशा असलेलीं काबरुणें, कातड्याचीं काबरुणें, पायताणे वगैरे जिनसा जमवाव्या. हे सगळें धन देऊन टाकलें म्हणजे ज्यांना तें दान केलें जातें त्याच्याकडे त्याचें पाप धुवून जातें (एतद् वै व्रात्यधन यस्मा एतद्ददाति तस्मिन्नेव मृजाना यन्ति ।). हा विधि करणाऱ्या गृहपतीबरोबर तेहतीस तेहतीस अनुयायी असावे." हा भाग प्रथम-खंडात आला आहे. द्वितीय व तृतीय खंड हे निर्दितव्रात्य आणि कनिष्ठव्रात्य

१. न हि ब्रह्मचर्यं चरति याचा सायणाने केलेला अर्थ.

२. वैराग्यामध्ये सोमल व बचनाग खाणारे आजही आढळतात म्हणे.

याच्यासंबंधी असून चतुर्थखण्डात 'शमनीचमेदृ' म्हणजे ज्यांचें तारुण्य नष्ट झालें आहे अशा वृद्धाच्या करिता विधि सांगितला आहे. या वृद्धाचा कुषीतक ऋषि गृहपति होता असे वर्णन आहे. त्यावरून म्हातारपणीही काहीं व्रात्य वैदिक धर्मात येण्याची इच्छा धरीत असावेत.[1]

लाट्यायन सागतो कीं, व्रात्यस्तोमाचा विधि संपल्यावर शुद्ध झालेल्यानीं नवीं वस्त्रें धारण करावींत व जुनीं इतर व्रात्यांना किंवा मगधातील ब्रह्मबंधूना देऊन टाकावींत.

अनार्यांना आर्य करून घेण्याचा दुसरा मोठा प्रयत्न रजपुताच्या काळीं झालेला भविष्यपुराणात नमूद आहे. या पुराणाच्या प्रतिसर्ग पर्वातील प्रथमखंडात लिहिलें आहे कीं कान्यकुब्जातील कोणा द्विजोत्तमानें आबुर्द शिखरावर (अबूच्या पहाडावर) येऊन ब्रह्महोम केला. त्या यज्ञातील दिव्यमंत्राच्या प्रभावानें प्रमर चपहानि वगैरे चार क्षत्रिय उत्पन्न झाले. यानाच अग्निवंशीय क्षत्रियकुले हें नामाभिधान प्राप्त झालें. या चारात काहीं परकीय म्लेच्छ असणें शक्य आहे. कारण तिसऱ्या खंडात अग्निवंशाच्या विस्तारकालाचें वर्णन करताना ' आर्यधर्मकराः म्लेच्छाः बभूवुः सर्वतोमुखाः ' व ' मत्पुत्राश्च स्मृताः म्लेच्छा आर्यधर्मत्वमागताः ' (मत्पुत्र म्हणजे कलीचे पुत्र) असें वर्णन आलेले आहे. राजपुतान्यामध्ये चपहानीनें राज्य केले यावरून रजपूत हे मूळचे वैदिकेतर होते असें अनुमान काढणे अवास्तव होणार नाहीं.

समाजसंघटेनचा आणखी एक प्रयोग म्हणजे कल्पित वंशावळी तयार करणें हा होय. ऐतरेय ब्राह्मणातील विश्वामित्राची कथा ह्या बाबतींत बोधप्रद आहे. या कथेमध्यें विश्वामित्रानें बळी देण्यास आणलेल्या शुनःशेपास दत्तक घेऊन ज्येष्ठ पुत्र मानले. तें त्याच्या ज्येष्ठ पुत्राना रुचलें नाहीं. तेव्हा विश्वामित्रानें त्याना शाप दिला कीं आंध्र, पुण्ड्र, शबर, पुलिंद, मूतिब वगैरे पाचपन्नास आर्येतर जातीच्या लोकाची तुमची संतति होईल. (७।१८).

१. डॉ. दे. भाडारकर यांचे मतें हे लोक नीचमेदृ देवतेचे उपासक असावत. -Aspects of Ancient Indian Culture p.44.

सघटनेची आणखी दिशा म्हणजे त्या त्या प्रदेशांतील वा संघातील लोकाच्या चालीरीतींना मान्यता देणे ही होय. न्यायनिवाडा करीत असता देशधर्म, जातिधर्म, कुलधर्म, पाषडधर्म हे सर्व लक्षात घेऊन निवाडा करावा असे मनूनें सांगितले आहे (मनु. १.११८). ही पद्धत विवाहाचे गांधर्व, आसुर, पैशाच इत्यादि अष्टप्रकार कायदेशीर म्हणून मान्य करण्यातही दिसून येते. या अष्टप्रकारांपैकीं कांहीं प्रकारच प्रशस्त मानले गेले असले तरी बाकीचे बेकायदेशीर गणले जात नसत याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. इतर देशात राजमान्य विवाहपद्धतींशिवाय इतर पद्धति मान्य करीत नसत हे पाहिले म्हणजे भारतीयाच्या संग्राहक सहिष्णुतेचे मर्म लक्षात येईल. उदाहरणार्थ, रोमन साम्राज्यात गुलामांचीं लग्ने कायदा मानीत नसे.

धार्मिक संग्राहकपणा

संग्राहकपणाची खळखळ कोणत्या प्रांतात सर्वांत अधिक असेल तर ती धर्माच्या प्रांतात. या प्रांतात संग्राहकपणाचा एखादा नवा प्रयोग सुरू झाला कीं प्रथम प्रथम कटकटी होतच. वेदांतील निरानिराळ्या शाखांमध्यें शैववैष्णवांमध्ये, वैदिक व बौद्ध यांमध्यें अशा कटकटी झाल्या नाहींत असें नाहीं. पण त्या सर्वांना पुरून उरून शेवटीं हिंदूंचा संग्राहकपणाच शेवटीं विजयी ठरला असें इतिहास सांगतो.

हें धार्मिक संग्राहकपणाचें धोरण थेट वैदिक कालापासूनच अवलंबिलेलें आढळून येते. वैदिक कालामध्ये अवैदिकाना यज्ञ करू द्यावयाचा कीं नाहीं हा मोठा महत्त्वाचा प्रश्न गाजला होता. यज्ञ करणें हे आर्यत्वाचें मुख्य लक्षण त्या काळीं गणले जाई. आपल्या शत्रूना आर्य नेहमीं यज्ञाचे शत्रु म्हणून संबोधीत; पण पुढे कांहीं निषादासारखे अनार्य जेव्हा मित्र बनले व आर्यांचे आचारविचार उचलण्याची मनीषा बाळगू लागले तेव्हा आर्यांचा श्रेष्ठतम धर्म जो यज्ञ तो करण्याची अनार्यांना परवानगी द्यावी कीं नाहीं याविषयीं चळवळ होऊन अंतीं रथकार व निषादस्थपतींना रौद्रइष्टि करण्याचा अधिकार देण्यात आला. ताण्डयमहाब्राह्मणांत तर प्रतिपादन केलें आहे कीं विश्वजित यज्ञ करणारानें तीन दिवस

निषादाच्यामध्यें वसति करावी (१६·६·७). खुद्द वैदिक अभिमान्यातही कालातराने त्या त्या चार वेदाच्या अभिमान्यांमध्ये एकीकरणाची जरूरी उत्पन्न झाली होती. चार वेदाना मान्यताहि कालातराने मिळाली. वेदाचा उल्लेख त्रयीनेच केला जाई. म्हणजे अथर्ववेद बाटगाच समजला जाई वेदाच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या स्थळीं सुरू झाल्या होत्या. मंत्रतत्राक्रिया भिन्न भिन्न झाल्या होत्या. प्रथम यज्ञ लहान प्रमाणावर होत असत; व जो तो आपापल्या शाखेप्रमाणे विधि करी. या निरनिराळ्या शाखाच्या एकीकरणाचा प्रयत्न हा महिनानुमहिने, वर्षानुवर्षे चालणारीं महान् सत्रे होत त्यात करण्यात आला. हीं मोठमोठीं सत्रे वैदिक काळची अत्यंत महत्त्वाची संस्था होती. या सत्रात होता, पोता, अध्वर्यु, ब्रह्मा वगैरे अनेक उपाध्याय लागत. ते निरनिराळ्या वेदाचे असावेत असे ठरवून त्या त्या वेदाच्या अनुयायाचें एकीकरण करण्यात आले. इतकेच नव्हे तर ज्या अथर्ववेदाला तुच्छतेनें लेखण्यात येई त्या अथर्ववेत्याला सर्व यज्ञविधीवर देखरेख करण्याचे ब्रह्मयाचें महापद देण्यात आले. सोमयागात ऋत्विजाच्या एकीकरणाचा एक विधिच सागितलेला आहे. तो तानूनप्त्र हा होय. या विधीप्रमाणे प्रारंभी सर्व ऋत्विज एकदिलाने वागण्याची शपथ घेत, व यागसमाप्तीच्या वेळीं सख्य-विसर्जनविधि करीत. हीं सत्रें वर्षानुवर्षें चालत, अनेक ठिकाणचे विद्वान् एकत्र येत, वादविवाद चालत, फावल्या वेळीं नृत्य, गायन, नाट्य, कथाश्रवण वगैरे चाले. उदाहरणार्थ, तानूनप्त्र विधीचें महत्त्व बिंबविण्याकरिता देवात फूट पडली तेव्हा त्याचा पराभव झाला ही कथा वर्णिली जाई. या प्रसगीं होणाऱ्या विद्वच्चर्चेतूनच हिंदूंचीं शास्त्रोपशास्त्रे व विद्योपविद्या निर्माण झाल्या.

कालान्तराने यज्ञविधि फार मानगडीचे झाले, खर्चाचे झाले आणि शेतकीच्या जनावराच्या संहारामुळें अप्रिय झाले. तेव्हा अग्नीची उपासनाच नष्ट होण्याचा प्रसंग आला असता गार्हस्पत्याग्नि ज्यानें त्यानें आपआपल्या घरीं बाळगावा व काहींनीं अग्निहोत्र स्वीकारावें अशी कलृप्ति काढून अग्नीची पूजा रक्षण केली गेली.

पुढें उपनिषत्कालीं अग्नीच्या पूजेचें प्रयोजन काय अशी सर्वसाधारण

कर्मकाडावरच शंका घेण्यात येऊ लागली. यज्ञ हे फुटक्या नावेप्रमाणें बेभरंवशाचे आहेत हे न जाणता त्याच्या साहाय्याने जरा-मृत्यूच्या पलीकडे जाण्याची इच्छा धरणारे मूर्ख होत (मुंडकोपनिषद् १.२.७) असें प्रतिपादन सुरू झाले, आणि अंतिम निःश्रेयसाला कर्मकाडाची आवश्यकताच नाहीं असा उपनिषद्कारांनीं सिद्धान्त माडला. अशा वेळीं पूर्वीच सुप्रतिष्ठित होऊन बसलेला यज्ञादि कर्ममार्ग आणि नवोदित औपनिषदिक ज्ञानमार्ग याची सागड कशी घालावयाची असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावर अशी तोड काढली कीं, 'ज्ञानान्मोक्षः' हा सिद्धान्त मान्य केला तरी ज्ञानालाहि चित्तशुद्धि अवश्य असते आणि ती कर्ममार्गाने मिळते असें मानावे ! यज्ञ शब्दही लोकप्रिय झालेला होता तो कायम ठेवून जपयज्ञ, दानयज्ञ, अशीं नवीं रूपे कल्पिण्यात आली. नारायणीय उपनिषदात तर ब्रह्मज्ञान झालेल्याचे सर्व जीवनच यज्ञरूपी असते असे रूपक केलें आहे 'तस्यैव विदुषः यज्ञस्य आत्मा यजमानः' वगैरे.

पुढें तत्त्वज्ञानात अनेक पथ उत्पन्न झाले. त्याचाहि मिलाफ करणे प्राप्त झाले. त्या सर्वांचा समन्वय आपल्या पूर्वजानीं दोन सुंदर समर्पक तत्त्वानीं केला. तीं तत्त्वे म्हणजे **अधिकारभेद** आणि **अवस्थाभेद** हीं होत. या दोन सूत्रानीं शेंदूर फासलेल्या दगडाच्या म्हसोबापासून तो 'यत्र वाचो निवर्तन्ते' अशा अनिर्वाच्य ब्रह्मापर्यंत सर्वांना एकत्र गुंफण्यात आले. हिंदुसमाजाच्या विराट् देहात सस्कृतीच्या निरनिराळ्या पायऱ्यावर उभे असलेले अनेक समाजघटक होते. त्या सर्वांच्या धार्मिक कल्पना एकसूत्रात गोवावयाच्या तर सर्वांना एकच दैवत आणि एकच धर्मग्रथ लागू करणे यासारखें अप्रयोजक दुसरें काहींच झाले नसते. तेव्हा सामाजिक बाबतींत विवाहाचे भिन्न भिन्न प्रकार कायदेशीर मानून जे सग्राहक उदारपणाचे धोरण स्वीकारलें तसेच धार्मिक बाबतींत हरतऱ्हेचीं देवदैवते व देवस्की वगैरे प्रकाराना मान्यता देण्यात दाखविले गेले. वटपौर्णिमा, नागपचमी, वसुबारस, पोळा हे खेडुताचे सण स्वीकारण्यात आले, व वृक्षपूजा, नागपूजा वगैरे जे प्रकार रूढ होते त्यानाहि अव्हेरिलें नाहीं. इतकेंच नाहीं तर, या सर्वांचा समावेश केला तोहि नाकें मुरडत, नाइलाजाने, उपकार करण्याच्या आव्यतेने नव्हे तर तो करीत असता एका मोठ्या उदार

तत्त्वाची प्राणप्रतिष्ठा करून. ते तत्त्व म्हणजे **जेथें जेथें म्हणून कसल्याहि प्रकारचा तेजस्वीपणा चमकला असेल तें तें सर्व ईश्वरांचेंच प्रतीक होय** यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम्॥ हे सुप्रसिद्ध भगवद्गीतोक्त तत्त्व होय. या तत्त्वानें वृक्षपूजा, पाषाणपूजा, पशुपक्षिपूजा, मानुषपूजा या सर्वांनाच प्रतिष्ठित अशा तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिली.

ही भगवद्गीता ज्या ग्रथात अन्तर्भूत आहे तो महाभारत ग्रथ हा संग्रहतेचा सर्वश्रेष्ठ ग्रथ होय. शैव, शाक्त, गाणपत्य, सौर, पाचरात्र वगैरे धर्मपथ व साख्ययोग वगैरे तत्त्वज्ञानपंथ याचा समन्वय करण्याच्या प्रयत्नाचे ठळक प्रतिबिंब महाभारत आणि भगवद्गीता या दोहोमध्यें स्पष्ट उमटलेले आहे. "साख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः" या सुप्रसिद्ध भगवदुक्तीची या ठिकाणीं वाचकाना सहजच आठवण होईल. गीता ही या संग्राहक समन्वय-पद्धतीची उज्ज्वल निशाणीच होय. साख्य आणि योग, कर्ममार्ग, भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग, द्वैत, अद्वैत या सर्वांचा समन्वय करण्याचा गीतेनें प्रयत्न केला आहे. आणि यातच सर्व पथाना गीता सारखीच आदरणीय वाटत आली आहे याचें बीज आहे. योगवासिष्ठकारानेंहि असाच समन्वय केला आहे, कीं साख्याचा पुरुष, योग्याचा ईश्वर, शैवाचा शिव, काल हे सर्व एकच होत. 'पुरुषः साख्यदृष्टीना ईश्वरो योगवादिनाम्। शिवः शशिकलाकाना कालः कालैकवादिनाम्॥' ब्रह्मा विष्णु-महेश याना सृष्टीच्या उत्पत्ति, स्थिति व लय याच्या देवता कल्पून विष्णु-पुराणकारानें असेंच ऐक्य साधले आहे. तो लिहितो कीं, 'सृष्टि स्थित्यंतकरणीं ब्रह्माविष्णुशिवाभिधाम्। स संज्ञा याति भगवान् एक एव जनार्दनः॥' वेदातील पवित्र अक्षर ॐ यातील घटक जे अ, उ, म ते ब्रह्मा, विष्णु, शिव याचे प्रतीक होत असें मानण्यातहि हीच ऐक्यभावना दिसून येते.

समाजातील अनेक गटाच्या धार्मिक संस्कारमंत्रानाहि एकत्र गोवण्यात आलें. त्याचें अगदीं सहज वर वर पाहणाराच्याहि लक्षात येणारें सूत्र म्हणजे नित्याच्या संकल्पातील 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हें होय. हें सूत्र सांगतें कीं काहीं आचार श्रुतिप्रणीत आहेत, कांहीं स्मृतिप्रणीत आहेत, आणि कांहीं

पुराणोक्त आहेत. वैदिक आर्य आपले विधि वैदिक मंत्रानीं करीत. अवैदिकाना वैदिक मंत्र वापरूं देण्यास ते तयार नव्हते. पण त्याना मंत्र तर हवेत तेव्हा त्याचे कार्य पौराणिक मत्रानीं साधण्यांत येई. आज सुप्रतिष्ठित असलेले कांहीं धर्मपंथहि प्रारंभीं वेदबाह्य होते. कालान्तराने त्याचा वैदिक धर्मांत स्वीकार करण्यात आला. उदाहरणार्थ, पाचरात्र व पाशुपत म्हणजेच भागवत आणि शैव हे पथ आज आपण सनातनी म्हणून ओळखतो तेहि एके काळीं वेदबाह्य गणले जात होते. शैवाची थट्टाही केली जाई. भागवतात 'नष्टशौचा मुधधियो जटाभस्माग्निधारिणः। विशतु शिवदीक्षाया यत्र दैवं सुरासवं॥ असे शैवाचें वर्णन केलें आहे (४।२). शिव हे दानवाचें दैवत होय अशीं वचनेहि सापडतात. 'देवाना दैवतं विष्णुः दानवाना त्रिशूल धृक्।' मनूचा प्राचीन टीकाकार मेधातिथि याचे एतद्विषयीं स्पष्ट विधान आहे. तो म्हणतो, 'एव सर्वे एव **बाह्याः** भोजकपाचरात्रिकनिर्ग्रंथपाशुपतप्रभृतयः स्वसिद्धान्ताना प्रणेतृन् पुरुषातिशयान् प्रत्यक्षतदर्थदर्शिनः अभ्युपपन्ति **न वेदमूलमम् अपि धर्मं अभिमन्यते**।' (मनु अ. २ श्लो. ६). यात उल्लेखिलेल्या निर्ग्रंथ म्हणजे जैनाना सनातनधर्मात पूर्ण प्रविष्ट करता आलें नाहीं, त्याच्याविषयीं आदराची भावना राजे लोक बाळगीत हें मागे आलेंच आहे. पाचरात्र हें अवैदिक समजलें जात असे असें वृद्धहारीतहि सागतो. शाडिल्य ऋषीने ते प्रथम प्रवर्तित केले तेव्हा ते अवैदिक होते. 'स तु धर्मप्रसंगेन विष्णोराराधनं प्रति। अवैदिकेनैव विधिना कृतवान् धर्मसंहिताम् (वृद्धहारीत सहिता ११।१८१). पुढें या विधीचें वैदिकीकरण झाले. त्यात कपाळावर ऊर्ध्व पुण्ड्र चिन्ह व बाहुमूलावर चन्द्र चिन्ह हीं चिन्हे वैदिक म्हणून स्वीकारण्यात आलीं. श्रौतैन विधिना चक्रं धृत्वा वै बाहुमूल्योः। धृतोर्ध्वपुण्ड्रः शुद्धात्मा विधितैवार्चयेद्धरीम्। (वृ. हा. ११।१९४).

सर्वसंग्राहक महाभारत

तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून गीता, योगवासिष्ठादींनीं जें कार्य साधलें तेंच कार्य महाभारतानें मोठ्या प्रमाणांत कथानकांच्या रूपानें साधलें. सौतीचें भारताचें महाभारत जेव्हां बनविलें तेव्हां त्याच्या

काळीं जे निरनिराळे धर्मपंथ वावरत होते त्या सर्वांची जेणेकरून एकवाक्यता होईल व ते सर्व एकत्र नांदतील अशा प्रकारच्या कथांचा आपल्या ग्रंथात संग्रह केला, किंवा क्वचित् नव्या बनवून घातल्या. शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं दीर्घ प्रकरणे प्रमाणाबाहेर फुगलीं आहेत तीं या संग्राहक बुद्धीनें. शैव आणि वैष्णव हे जे दोन प्रमुख पंथ त्यांच्यातील विरोध काढून टाकण्याकरिता अनुशासनपर्वांत उपमन्यूचें आख्यान घातलें आहे. त्यात शंकराची स्तुति खुद्द श्रीकृष्णाच्या तोंडूनच वदविली आहे, आणि विष्णुसहस्रनामाच्या धर्तीवर शिवसहस्रनामही या आख्यानात गोवलें आहे. अर्जुनानें शंकरापासून पाशुपत अस्त्र मिळविलें ही कथा किरातार्जुनाच्या वाचकास परिचित आहेच पण द्रोणपर्वांत जयद्रथवधाची प्रतिज्ञा पुरी करण्याकरिता श्रीकृष्णानेंच खुद्द अर्जुनास शंकरापासून पाशुपतास्त्र मिळविण्यास सांगितलें असें दाखविलें आहे. मोक्षपर्वांतील नारायणीय उपाख्यान हें एक शैव-वैष्णव ऐक्यवर्धक प्रयत्नाचे मोठें रोचक उदाहरण आहे. त्यात असें दाखविलें आहे कीं, नारायण व शंकर याच्या युद्धात कोणाचाच पराभव होईना तेव्हा ब्रह्मदेवानें शंकराला विनंति केली कीं, तूं नारायणाचा भक्त हो. तेव्हा नारायण शंकराला म्हणाला, " जो तुझा भक्त तो माझा भक्त. तुझ्या व माझ्यामध्यें कांहीएक भेद नाहीं. तुझ्या शूलाचे चिन्ह माझ्या वक्षःस्थलावर उमटलेलें असल्यानें मला श्रीवत्स असे म्हणतील आणि माझ्या हाताचें चिन्ह तुझ्या कंठावर उमटलेलें असल्याने तुला श्रीकंठ म्हणतील ! " याचप्रमाणें देवीच्या उपासकाना संतुष्ट करण्याकरिता पांडव विराट नगरींत शिरले त्या प्रसंगीं त्याच्या तोंडीं देवीची स्तुतीही घातली आहे.

महाभारताच्या कालानंतरहि शैववैष्णवाना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरूच होते. त्यापैकीं एक विशेष लक्षात भरण्यासारखा म्हणजे दत्तसंप्रदायाची स्थापना हा होय. दत्तात्रेयाच्या मूर्तीत ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तिन्ही देवतांचा एकत्र मिलाफ केला आहे. याच प्रकारचा दुसरा प्रयत्न हरिहराच्या मूर्तीचा होय. शिव-विष्णूची मूर्ति एकत्र करण्याचें एक ऐतिहासिक उदाहरण वैद्यानीं दिलें आहे तें बंगालच्या विजयसेन राजाचें. त्यानें देवालयाला प्रद्युम्नेश्वर असें नांव देऊन त्यांत शिवविष्णूची

संमिश्र मूर्ति बसविली.[1] आणखी एक प्रयत्न शंकराचार्यांनी केला. तो शिव, विष्णु, सूर्य, देवी व गजानन याच्या पंचायतनपूजेचा. या प्रयत्नांनी समाजाच्या फुटीर प्रवृत्तीला आळा घालून भिन्न पंथाना एकत्र नादणें सुकर केले. हीच प्रथा पुढे संतसाधूंनी कायम राखिली. महाराष्ट्रातील वारकरी पंथ हा विठ्ठलाचा म्हणजे विष्णूचा उपासक. पण त्यानेहि शिव-विष्णूचें ऐक्यच प्रतिपादिले आहे.

वैदिक धर्माला खरे सामर्थ्यवान् प्रतिस्पर्धी म्हणजे बौद्ध व जैन हे धर्म होत. पैकी बौद्धपंथ हिंदुस्थानातून नामशेष झाला तरी हिंदुधर्मात त्याने महत्त्वाचा फरक घडवून आणला. तो इतका, कीं बुद्धाला दशावतारात कायमचें स्थान देण्यात आलें. रामायणात अयोध्याकाडात (१०९। ३४) ज्या बुद्धाला चोर म्हटले आहे ('यथा हि बुद्धः स तथा हि चोरः') त्याच बुद्धाला गीत-गोविंदात ' केशवधृत बुद्धशरीर जय जगदीश ' अशा शब्दांनी गौरविलें आहे. व भागवतात विष्णूच्या अवतारात बुद्धाची गणना केली आहे (१-३ २४). हा विरोध लक्षात घेतला असता अंतिम समन्वयाचे मर्म लक्षात येईल. उत्तरकालीं तर सर्व संकल्पाची सुरुवातच 'कलियुगे बौद्धावतारे' अशी होऊ लागली. शंकराचार्यांनी तत्त्वज्ञानात या पक्षाशीं इतकें मिळतें घेतलें कीं प्रछन्नबौद्ध हे विशेषण त्याना लावण्यात आलें. उलट बौद्धधर्म हिंदुस्थानात बऱ्याच कालपर्यंत नादूं शकला तोहि त्यानें वैदिक धर्मातील बऱ्याच भागाचा स्वीकार केला म्हणून. बौद्धधर्मात हीनयान आणि महायान असे दोन पंथ आहेत. त्यातील दुसरा पंथ जो महायान पंथ त्यानें मूळ बौद्धधर्मातील दुःखवाद काढून टाकला व वैदिक धर्मातील बऱ्याच गोष्टींचा स्वीकार करूनच आपलें आसन स्थिर केलें. पुढें हिंदुस्थानाबाहेर चीन-जपानमध्यें ज्या धर्माचा प्रसार झाला तो या पंथाचाच.

जैनाविषयीं बोलावयाचें तर त्यानीं वर्णव्यवस्थेंत ब्राह्मणांना महत्त्वाचें स्थान दिलें आणि कृष्ण, बलराम, देवकी हीं आपल्या तीर्थंकरात समाविष्ट केलीं. जैनधर्माचा आणि वैदिक धर्माचा विरोध हा काहीं ठिकाणीं

१. मध्ययुगीन भारत ३।६१९.

दोहोंच्याहि उपाध्यायाचा एकाच मन्त्रात समावेश करून कादून टाकिला. याचें एक उदाहरण म्हणजे कोकणातील देवस्कीचे मन्त्र. या मन्त्रात जैना-ब्राह्मणाचा असा नेहमी सजोड उल्लेख असतो. यापेक्षा अगदीं नित्याचा व आपणा सर्वांच्या परिचयाचा दाखला म्हणजे मुले धुळाक्षरे प्रथम शिकतात त्या वेळीं त्या धुळाक्षराची सुरुवात करितात तो. ही सुरुवात श्रीगणेशाय नमः ओं नमः सिद्धम् अशी असते. म्हणजे प्रथम वैदिकाच्या गणपतीला नमन व नंतर लगेच जैनाच्या सिद्धाला नमन अशी सजोड सुरुवात असते !

बौद्धात कालातरानें जेव्हा तन्त्रपथाचा उदय झाला तेव्हा वैदिक धर्मात तंत्रपंथातील काहीं गोष्टीचाहि समावेश करण्यात आला. तो इतक्या प्रमाणात कीं, ब्राह्मणाच्या नित्यकर्मातील सध्येत न्यास, अस्त्रायफट् वगैरे तात्रिक गोष्टी कायम रूढ होऊन बसल्या. हा तात्रिकाचा पथ महाचीन अथवा तिबेट येथून हिंदुस्थानात आला असावा असे नगेद्र चौधरी म्हणतात. साधनमालेंतील 'आर्यनागार्जुनपादैः मोटेषु उद्धृतम्' म्हणजे नार्गाजुनाने भूतानातून ही उपासना आणली हे वचन त्यानीं उद्धृत केलें आहे. या पथातील एकजटादेवीला महाचीनतारा असेंहि नाव आहे. शिवाय या पंथाचा मुख्य प्रसार तिबेटाला नजीक असलेल्या आसाम, बंगाल व काश्मीर या प्रातीं विशेष आहे. त्याचीं मुख्य पीठेंहि तेथेंच आहेत.[१] तारातत्र नावाच्या तात्त्विक ग्रथातील वर्णन वरील मताला पोषक असेच आहे. तेथे लिहिले आहे कीं, महर्षि वशिष्ठानीं एकदा मोठे उग्र तप सुरू केलें. पण त्याना आढळून आलें कीं देहदडन हें निष्फळ होय. नंतर वशिष्ठाने देवी बुद्धेश्वरीची आराधना आरंभली. तेव्हा देवी प्रकट होऊन म्हणाली, तुझी उपासना चुकलेली आहे. ती वेदाना अज्ञात आहे. ती तुला शिकावयाची असेल तर महाचीनात विष्णूने बुद्धाचा अवतार घेतला आहे तिकडे गेले पाहिजे. वशिष्ठाने तिकडे प्रयाण केलें. येथें युवतींच्या मेळयात बुद्ध सुरा पीत बसलेला त्याला आढळला ![२]

१. मॉडर्न रिव्हयू, ऑगस्ट १९३४.

२. गौडरत्नमाला

इस्लामचें ऋण

मुसलमानाच्या संघर्षणानतर त्याच्याहि काहीं गोष्टी स्वीकारण्यात आल्या. त्या धर्मातील काहीं गोष्टींचें हिंदुधर्मावर कलम करून जो एक नवीनच पंथ स्थापन करण्यात आला तो शीखधर्म म्हणून प्रसिद्धच आहे. सर्व धर्मांचे एकीकरण करण्याचा अकबरानें प्रयत्न केला होता. पण अशा प्रयत्नास आवश्यक असलेली सहिष्णुता व संग्राहकता मुसलमानाच्या अंगीं परंपरेनें रुजली नसल्यामुळे अकबराचा प्रयत्न वाया गेला. उलट शतकानुशतकाच्या परंपरेमुळे हिंदूंच्या रक्तात सहिष्णुता भिनली असल्यानें, शीख धर्म मुसलमानी प्रतिकाराच्या झंझावाताला तोड देऊन बुद्धमूलहि झाला. शीख धर्माच्या संस्थापकानीं हिंदु धर्मातील पुनर्जन्म व कर्मगति या तात्त्विक कल्पना कायम ठेवल्या, पण मुसलमानी धर्माला तोड देण्याकरिता अवतारवाद, मूर्तिपूजा आणि जातिभेद याचे उच्चाटन केलें आणि अशा रीतीनें एक नवीन संग्राहक धर्म बनविला.[1] शीखपथाचा संस्थापक गुरु नानक याच्या अंत्यविधीसंबधीं अशी दंतकथा आहे कीं, त्याच्या मृतदेहाचे दफन करावें कीं दहन करावे याविषयीं त्याच्या हिंदु व मुसलमान भक्तवृंदामध्यें तंटा पडला; आणि तंट्याचा निकाल लागेना तेव्हा असा चमत्कार झाला की, मृतदेहच एकाएकीं अंतर्धान पावला. या दंतकथेवरून दोन्ही समाजाचीं अंतःकरणें नानकानें सारखींच आकर्षिलीं होतीं एवढे अनुमान काढण्यास हरकत नाहीं. मुसलमानी धर्माशीं नित्य संघटन सुरू झाल्यावर सामान्य हिंदु लोक मुसलमानी पीरानाहि मजूं लागले; इतकेच नव्हे तर मुसलमानी देवता हिंदूंच्या पुराणातहि येऊं लागल्या. बंगाली साहित्य-परिषदेनें सतराव्या शतकातलें काहीं काव्य प्रसिद्ध केलें आहे. त्यात रामेश्वर, कृपाराम यासारखे काहीं ग्रंथकार आपल्या ग्रथाच्या आरंभीं हिंदु देवताबरोबर मुसलमानी देवतानाहि नमन करताना आढळून येतात; तसेंच सत्यनारायणाच्या काहीं कथांमधून सत्यनारायण हा सत्यपीर या मुसलमानी स्वरूपातहि वर्णिलेला आढळून येतो.

१. History of the Sikhas by J. D. Cunningham Ch. 2.

जुन्या उपनिषदाच्या धर्तीवर एक अल्लोपनिषदहि लिहिले गेलें होतें हें बहुश्रुत वाचकाना अवगत असेलच.

सहिष्णु हिंदूच्या सहवासाने मुसलमानही हिंदूच्या देवताना भजू लागले होते. बेदरच्या बादशहाच्या हाताचा फोड नृसिंहसरस्वतीच्या अनुग्रहाने बरा झाला व त्यामुळें बादशहा दत्तभक्त बनला ही कथा गुरुचरित्राच्या वाचकास परिचित आहे. टिपू हा हिंदूंचा छळ करी त्याच्यासंबंधी गोविंदपत पत्री लिहितो कीं, 'टिपू सावनूर प्रांतीं येऊन महदरिष्ट त्यानें केलें. ब्राह्मण बाटविले, बायकाना बाटविलें, विरूपकरण केले.[1] पण याच टिपूवर १७९१ त इंग्रज, मराठे व निजाम असे तिघे चालून गेले तेव्हा घाबरून त्यानें काय केले त्यासंबंधीं हरिपत फडके लिहितात कीं, 'रंगनाथ स्वामीपाशी ब्राह्मण अनुष्ठानास घालून प्रयोग चालविले आहेत ! एक ब्राह्मण जलात मस्तक ठेवून दोन अडीच प्रहर वरते पाय करून अनुष्ठान करीत आहे. शृंगेरीकरस्वामी यास तेथें नेलें आहे. चाळीस सहस्राचा शिधा ब्राह्मणभोजनाकरिता देविला.''[2] उलट हिंदु मुसलमानाच्या पिरास भजत. पुण्यातील शनवारवाडा बाधावयाचा मुहूर्त केला तेव्हा देव व पीर याजपुढे चार आणे दक्षिणा ठेवली. सदाशिवरावभाऊ यास लहानपणीं देवी आल्या तेव्हा सैदसादत पीर कसबे पुणे यास कदोरीचा नवस केला. पेशव्यानीं मिरजेच्या किल्ल्यास वेढा घातला तेव्हा आत अडकलेल्या गोविंद हरि पटवर्धनानें पीरास नवस केला.[3]

याप्रमाणे अठराव्या शतकाच्या अंतीं हिंदु व मुसलमान यामधील तेढ नाहींशी होत चालली होती. मुसलमानातील बहुसख्य हे मूळचे हिंदुच होते. शिवाय दिल्लीच्या बादशहाना दक्षिणेंतील मुसलमानी संस्थानेंही परकीय वाटूं लागलीं होतीं व त्यापैकीं विजापूर व गोवळकोडा हीं औरंगजेबानेंच बुडविलीं. दक्षिणेंतील मुसलमानाच्या पदरीं शहाजीसारखे जहागीरदार प्रतिराजे शोभावे अशा ऐश्वर्यास चढले होते. या सर्व कारणामुळें

१. ऐ. ले. खंड ४ वा. कृ भावेकृत पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ३९७.

२. इतिहाससंग्रह–पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ३८०.

३. पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ३९७.

इंग्रजाचें आक्रमण आकस्मिक रीत्या हिंदुस्थानवर न होतें तर हिंदु व मुसलमान या दोहोंचें मिळून अखंड हिंदुस्थानचें एकराष्ट्र बनण्याच्या मार्गांत होतें असें मानण्यास जागा आहे.

संस्कृत भाषेची कामगिरी

अखंड भारताच्या सांस्कृतिक एकीकरणातील आणखी एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे संस्कृत भाषेची अखिलभारतीय व बृहत्तरभारतीय विद्वत्तेची सार्वत्रिक भाषा म्हणून प्रसार व उपासना ही होय. बोलभाषा या कालाच्या ओघात बदलत असतात तशा त्या भरतखंडात बदलल्या आणि देशाचा विस्तार मोठा असल्यानें संस्कृत भाषा ही बोलींतून मागे पडून तिची जागा अनेक प्राकृत भाषांनीं व कालांतराने अर्वाचीन बोलींनीं घेतली. व्यवहाराच्या भाषा जरी अशा रीतीने बदलल्या तरी देशांतल्या भिन्न भिन्न प्रांतांतील विद्वानांना विचारविनिमयाकरिता व विद्यासंवर्धनाकरिता एक अखिलभारतीय भाषा प्रचारात असण्याचे अगत्य होते. त्या स्थानीं संस्कृत या भाषेचे स्थान अढळ राखण्यात आले व शास्त्रीय आणि उच्च दर्जाचें सर्व वाङ्मय गीर्वाण भाषेंत रचिलें गेलें. या भाषेची सेवा विद्वानांनीं इतक्या निष्ठेनें केली कीं व तिला येवढें महनीय पद प्राप्त करून दिलें कीं, बौद्ध व जैन या धर्मपंथानीं धर्मप्रचाराकरिता पाली व अर्धमागधी या भाषाचा प्रारंभीं अवलंब केला तरी त्या पंथातील विद्वानानाही आपल्या शास्त्रीय ग्रंथाकरिता संस्कृत भाषेचा आश्रय करणें उत्तरोत्तर आवश्यक वाटूं लागलें. यामुळे संस्कृत भाषा ही भिन्न भिन्न प्रांतीयाच्या विचारविनिमयाचें व म्हणूनच सर्वांना एकसूत्रात गोवणारें एक मोठे प्रभावी साधन होऊन बसलें.

हे साधन शाश्वत आणि टिकाऊ बनवावयाचें तर तें शिस्तीच्या नियमानीं बांधून वज्रलेप करणें अवश्यक ठरतें. यामुळें पाणिनीनें या भाषेचें जें व्याकरण एकदा बांधून टाकलें ते (कात्यायनाच्या वार्तिकाचा त्यात समावेश करून) कायमचें बंधनकारक म्हणून सर्व प्रांतींच्या व सर्व कालच्या विद्वानानीं मान्य केलें. संस्कृत भाषेचा विकास हा त्या

त्या प्रातावर सोपविला असता तर दोन चार शतकात एकाची संस्कृत भाषा दुसऱ्याला दुर्बोध झाली असती. अर्थात् या अखिलभारतीय भाषेच्या स्वैरविकासाला नियंत्रण घालणे हे सांस्कृतिक ऐक्यसंवर्धनाच्या दृष्टीने अगत्याचे होते. या नियंत्रणाच्या प्रक्रियेने ती बोलभाषेतून निसटली पण बंदिस्त, अभंग आणि अमर झाली. पण तशी ती झाली म्हणूनच इसवी सनापूर्वी कित्येक शतके होऊन गेलेला वाल्मीकि व त्यानंतर दोन हजार वर्षांनी झालेला जगन्नाथ, तसेंच दाक्षिणात्य अद्वैतवादी शंकराचार्य आणि काश्मिरातील प्रत्यभिज्ञावादी अभिनवगुप्त याचे ग्रंथ एकाच भाषेत लिहिलेले आपणास मिळू शकतात. सांस्कृतिक एकीकरणाच्या दृष्टीने ही क्रिया महत्त्वाची नव्हे काय ? या क्रियेमुळेच त्या त्या प्रातात होऊन गेलेल्या थोर ग्रथकाराविषयी भरतखडातील सर्वच प्राताना सारखाच अभिमान वाटतो व व्यास, वाल्मीकि, मनु, याज्ञवल्क्य, कालिदास, भवभूति, शंकराचार्य, भास्कराचार्य या सर्वाविषयी सारखाच अभिमान, सारखाच आदर व सारखीच आपुलकी वाटते. आयुर्वेदाचार्यापैकी पजाबचा चरक, बनारसचा सश्रुत, सिंधचा वाग्भट, महाराष्ट्राचा वृंद, बगालचा चक्रपाणी, राजपुतान्यातील शारङ्गधर याच्या ग्रंथाचा आसेतुहिमाचल प्रसार होऊं शकला तो सस्कृत या सर्वमान्य भाषेमुळे. आणि कर्नाटकातील एका पंडिताने लिहिलेली याज्ञयल्क्यस्मृतीवरील टीका मिताक्षरा ही उत्तरहिंदुस्थानात प्रमाणभूत मानली जावी, किंवा बुंदेलखंडाच्या राजाच्या पदरी असलेल्या बनारसी पंडिताने लिहिलेला मयूख हा धर्मशास्त्रीय ग्रंथ गुजरातमध्ये प्रतिष्ठा पावावा हा संस्कृत भाषेनें वृद्धिंगत केलेल्या संस्कृतीच्या ऐक्यीकरणाचाच परिणाम होय. तेव्हा सस्कृत भाषा ही व्याकरणनियमबद्ध केली गेली ती अवश्यक अशीच क्रिया झाली. या नियमबद्धतेमुळे ती मृत तर झाली नाहींच, पण उलट ती अमर झाली !

या नियमबद्ध करण्याच्या क्रियेतही बारिक दृष्टीनें पाहिलेंत तर तुम्हास भारतीय सस्कृतीतील सग्राहकता आढळून येईल. पाठशाळेंत शिकत असताना संस्कृत व्याकरणातील अनेकविध रूपे घोकून तुम्ही मेटाकुटीस आलां असाल. 'हा' या धातूचीं आज्ञार्थी द्वितीयपुरुषाचीं रूपें जहाहि जहिहि जहीहि अशीं तीन; अस्मद्, युष्मद् यांचीं अस्मान् नः, युष्मान्

वः अशीं दोन दोन; मति, धेनु यांचीं मतये मत्यै, धेनोः धेन्वाः अशीं दोन दोन– असे अनेक प्रकार. हीं रूपें घोकताना वाटते कीं हे जंजाळ आहे काय ! पण हें जजाळ पाणिनीनें तुम्हाआम्हाला त्रास देण्याकरिता निर्माण केलेले नाहीं तर अखिल भारताची एक भाषा व्हावी या सदिच्छेनें व सहिष्णुता व संग्राहकता या तत्त्वाच्या अनुरोधाने त्यानें केले आहे. म्हणजे असे कीं, त्या त्या प्रातीं तीं तीं रूपे लोकाच्या तोंडीं रूळलेलीं होतीं म्हणून अखिल भरतखडात एकच एक अशी सर्वमान्य भाषा हवी असेल तर एकाच रूपाचा आग्रह न धरता विरूढ झालेलीं दोन दोन किंवा तीन तीन रूपे ही सर्वमान्य समजलीं जावी असा दंडक त्यानें घालून दिला. त्यात त्याची सहिष्णु व संग्राहक वृत्तिच प्रकट होत आहे.

अखिलभारतीय तीर्थक्षेत्रें

या संग्राहक प्रवृत्तीचे आणखी एक व्यापक स्वरूप म्हणजे भिन्न भिन्न प्रातातील पवित्र स्थाने एका सार्वदेशिक क्षेत्रमालिकेत गुफणे व त्या सर्वांची यात्रा करणे हे पुण्यप्रद ठरविणे हे होय. सप्तपुऱ्या, बारा ज्योतिर्लिंगें, चार धाम वगैरेच्या रूपाने हिंदुसग्राहकबुद्धीने हरिद्वारपासून रामेश्वर-पर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत आडव्या-उभ्या देशातील सर्व क्षेत्रे पवित्र स्थाने म्हणून आदरणीय ठरविलीं. ह्या क्षेत्रात पुन्हा विशेष हा आहे कीं, एकच क्षेत्र हिंदु आणि बौद्ध अशा भिन्न पथाना सारखेच पूज्य व्हावे ! क्षेत्रातील क्षेत्र अशी जी काशी ती हिंदूंना पूज्य तशीच जवळील बुद्धाच्या पदरजानी पवित्र झालेली सारनाथाची भूमि ही बौद्धाना पूज्य. गया हे तीर्थक्षेत्र बुद्धाची जन्मभूमि म्हणून बौद्धाना जसे परमपवित्र, तसे पूर्वजाना पिंड अर्पण करण्याचे स्थान म्हणून हिंदूना पवित्र. गिरनार हें जैन बौद्ध वैदिक या सर्वांना पवित्र. सीलोनमधील आदामचे शिखर या नावाने जे स्थान सध्या ओळखले जाते ते हिंदु, बौद्ध व मुसलमान या सर्वांना सारखेच पवित्र आहे. तेथें विष्णुपदहि आहे आणि बुद्धपदही आहे. राजगृह हें जसें तेथील सप्तपर्णीगुहा वगैरेमुळें बौद्धाना आदरणीय आहे तसेंच तें जरासंधाची भूमि म्हणून हिंदूंनाहि कौतुकभूमि आहे.

उग्रमंगल महादेव

संग्राहकबुद्धीची सर्वांत कठीण कामगिरी म्हणजे परकीय दैवते स्वीकारणे ही होय. आर्य आणि अनार्य एकत्र नादूं लागल्यावर अनार्यांचीं दैवतें स्वीकारण्याचा प्रश्न आर्यांपुढे प्रामुख्याने असला पाहिजे. अनार्यांचा प्रमुख देव शिव व त्याचे प्रतीक लिंग. या देवाच्या उपासकाचा ऋग्वेदकाळीं शिश्नदेव म्हणून उपहास करण्यात येत असे. पण उत्तरकालीं त्याचा वेदांतील रुद्रदेवतेशीं ऐक्य कल्पून स्वीकार करण्यात आला. शिश्नदेव म्हणजे ब्रह्मचर्य न पाळणारे असा दुसरा अर्थ शक्य असला तरी लकुलीशाच्या ऊर्ध्वमेढ्र प्रतिमा सापडतात त्यावरून मेढ्र हे प्रतीक होते हें स्पष्ट आहे. पण दोन्ही समाजाना एकत्र नादणे अपरिहार्य ठरल्यावर व विशेषतः आर्यांनीं अनार्य स्त्रियाशीं विवाह करण्याचा उपक्रम सुरू केल्यावर अनार्यांच्या दैवताची पूजा घरातच शिरली असली पाहिजे. मात्र एकेकाळीं या देवतेविषयीं वैदिक आर्यांची काय भावना होती व तिचा स्वीकार करण्यास काय खळखळ माजली असली पाहिजे याचे चित्र दक्षयज्ञाच्या कथेत स्पष्ट वठलेलें आढळते. दक्षाने यज्ञ केला त्या प्रसंगीं सर्व देवाना हविर्भाग घेण्यास आवाहन केले. फक्त शिवाला मात्र मुद्दाम टाळले हे शिवाला कळले तेव्हा तो रागाने संतप्त होऊन दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस करण्यास निघाला. इकडे दक्ष हरिणाचें रूप धारण करून पळूं लागला. शिव पाठीमागे धावला. धावताना मध्ये आलेल्या सवित्याचे त्याने हात उपटले, पूषाचे थोबाड फोडले, भगाचे डोळे काढले; असा मोठा उच्छेद माडला. अंतीं दक्षाला शिवास हविर्भाव देण्याचे कबूल करून संतुष्ट करावे लागले ! एकदा या दैवताला प्रवेश मिळाल्यावर पुढे तर त्यानें एवढे स्थान पटकाविलें कीं तो देवाचा देव, सर्वश्रेष्ठ महादेव होऊन बसला ! महाभारतात शिवसहस्रनाम आलें आहे त्यात या देवतेचीं चरुचेली, मिलीमिली अशीं अनार्य नावेंहि स्वीकारण्यात आलीं. आणि सर्वांत म्हणजे शिवाची पूजा करण्याच्या वृत्तीचा अधिकार अनार्य गुरव यास आहे हेंहि मान्य करण्यात आले. कुलाचारही स्वीकारले. ज्याची कुलदेवता एकवीरा देवी आहे अशा कऱ्हाडे ब्राह्मणात कुळधर्माच्या दिवशीं शूद्र स्त्री सुवासिनी म्हणून जेवावयास घालण्याचा प्रचार आहे. रेणुका व एकवीरा याचा पुजारीहि ब्राह्मण नसतो. श्रीशैल

पर्वतावर तर अशी रूढि आहे कीं पारिया नावाच्या निकृष्ट गणल्या गेलेल्या लोकानीं प्रथम पूजा केल्यावरच मग ब्राह्मणादिकानीं देवालयात प्रवेश करावयाचा.

अनार्यांच्या शिवदेवतेचा स्वीकार करण्यात आला तो अथर्ववेदकाळींच करण्यात आला. मगधातील व्रात्य लोकाचा व्रात्यस्तोम विधीनें आर्य लोकात कसा समावेश करण्यात आला हे सामवेदाच्या ताण्ड्यब्राह्मणाच्या आधारे मागें दाखविलें आहे. या व्रात्य नावाच्या लोकाचाच तेवढा समावेश केला असे नव्हे तर त्याचे दैवत जे 'एकव्रात्य' त्याचाहि स्वीकार करण्यात आला. हे आता अधिक सांगितले पाहिजे. वैदिकधर्मीयानीं त्याचे स्वरूप सौम्य केले पण त्याला महादेव म्हणून मान्य केला. वैदिक व अवैदिक याच्या संगमामध्ये वैदिक देव जे इंद्र, वरुण, सूर्य ते मागें पडले आणि वेदबाह्याचे देव प्रमुख ठरले. ऋग्वेदामध्ये देवाधिदेव हें स्थान इंद्राचे होतें. तें त्याचे स्थान नाहींसे होऊन अथर्ववेदामध्येंच वेदबाह्याचें दैवत जो शिव त्याला महादेवाचे स्थान मिळाले. या दैवताचें मुख्य प्रतीक जे वेदबाह्याच्यामध्ये ऊर्ध्वमेढ्र रूपाने होतें त्याच्या आकृतीला सौम्य रूप देऊन शाळुंका व पिंडी या रूपाने पुढें मान्य करण्यात आलें. शिवाच्या मूर्ति करण्याचाही प्रचार असे. युवानच्वंग याने काशीच्या मंदिरात शिवाची मोठी मूर्ति असल्याचे वर्णन केले आहे. मोहेंजोदारो येथें सापडलेल्या मुद्रावर शिवाची मूर्ति आहे ती त्रिमुख, ऊर्ध्वमेढ्र, शिरोवेष्टनांकित असून भोवतीं पशूंच्या आकृति आहेत. यावरून त्या काळीं शिव पशुपति म्हणून पूजिला जात असे. पूर्वेकडे बंगालमध्ये लकुलीश या शिवाच्या अवताराच्या स्वरूपाच्या नग्न व ऊर्ध्वमेढ्र प्रतिमाच्या पूजेचा प्रचार जो दिसतो त्यावरून वेदबाह्याचा प्रमुख देव जो शिव त्याची विविध रूपे एकत्र होऊन व वेदामधील रुद्रदेवतेचा त्याच्याशी संगम होऊन हिंदुधर्मातील महादेव हे दैवत सिद्ध झालें आहे. ऋग्वेदामध्यें रुद्र ही देवता बलिष्ठ पण उग्र अशी आहे. यर्जुवेदातील शतरुद्रीयात ती उग्र आणि शिव अशा द्विविधरूपानें प्रार्थिली आहे. आणि अथर्ववेदांत तिला महादेवत्व प्राप्त झालें आहे. अथर्ववेदात व्रात्याचा देव जो एकव्रात्य त्याला महादेवाचें स्थान दिलें आहे. वैदिकांनीं हें दैवत स्वीकारताना

त्याच्याशीं निगडित असणाऱ्या पुश्चली व मागध याचाही वैदिक रूपें देऊन स्वीकार केला आहे. अथर्ववेदाचें गद्यात लिहिलेलें पंधरावे काण्ड हें सर्व एकव्रात्याच्या वर्णनाला वाहिलेलें आहे. त्यात वर्णन आहे कीं, "व्रात्य एकदा रस्त्याने जात असता त्याने प्रजापतीला डिवचलें. प्रजापतीनें सुवर्ण निर्माण केले व तेच ब्रह्म झालें. व्रात्य मोठा होऊन महादेव बनला. तो सर्व देवांचा अधिपति ईशान झाला. तो एकव्रात्य झाला. तो पूर्व-दिशेला निघाला. आदित्यादि सर्व देव त्याच्या पाठोपाठ निघाले.[1] पूर्वदेशात श्रद्धा ही त्याची पुंश्चली बनली व मित्र हा त्याचा मागध बनला. याप्रमाणें दक्षिण, पश्चिम, उत्तर अशा सर्व देशात तो हिंडला व त्या त्या देशात त्याची पुश्चली व मागध हींही भिन्न भिन्न झालीं." पुंश्चली व मागध याच्याखेरीज त्याचे उष्णीश अथवा मुंडासें आणि विपथ अथवा छकडा याचाही या सूक्तात उल्लेख आहे. ताण्ड्यब्राह्मणा-तील व्रात्याच्या वर्णनातही उष्णीश व विपथ हीं आलेलीं आहेत. यावरून पाहता व्रात्याचे दैवत वैदिकानीं कसें स्वीकारले, त्याला अधिक उदात्त स्वरूप कसे दिले व देवाधिदेव महादेव म्हणून त्याला उच्च स्थान कसें दिलें हें सर्व दिसून येईल. अथर्ववेदाचे प्रवक्ते अनार्यांशीं फार मिसळत असावेत व त्याच्यातून त्यानीं अभिचारमंत्र घेतले असावेत. यामुळें त्रैविद्य हे अथर्ववेदाला हलका समजत असत. अभिचारमंत्राना त्रैविद्यानीं उचलून धरलें नाहीं हे योग्यच झाले पण अथर्ववेदाचा व त्यातील एकव्रात्या-सारखा दैवताचा त्यानीं स्वीकार केलाच. सिंधु संस्कृतीतील लोकाचेही पशुपति शिव हेच दैवत होते. यामुळें वैदिक आर्यांच्या बाहेरील बहुजन-समाजाचें जें प्रमुख दैवत तेच महादेव म्हणून लोकप्रिय होऊन वैदिक देव हे वैदिक मंत्राच्या बाहेर लुप्त झाले. आणि वैदिक मंत्राही फक्त संस्कारापुरतेच उरले. बाकीचा धर्माचार विविधरूपाचा झाला.

---

१. सोऽवर्धत स महादेवोऽभवत्। स एकव्रात्योऽभवत्। स प्राचीं दिश-मनुव्यचलत्। त विश्वदेवा अनुव्यचलन्। तस्य श्रद्धा पुश्चली मित्रो मागधः मनो विपथम्। स सर्वान् अन्तर्दिशान् अनुव्यचलत्। ते प्रजापतिश्च परमेष्ठी च अनुव्यचलन्।

समारोप

असो. वरील घांवत्या वर्णनावरून आजच्या आपल्या संस्कृतींत भिन्न भिन्न वंशाच्या समाजाचे आचारविचार, देवदैवते, शास्त्रविद्या याचा कसा मिलाफ करण्यात आलेला आहे, व तो करीत असता संग्राहकता व सहिष्णुता या वृत्ति कशा रुजल्या आहेत, हे लक्षात येईल. खंडतुल्य अशा या आपल्या देशातील अफाट समाजाला एका सूत्रात गोवण्याची ही कामगिरी सहजसाध्य नव्हती. प्रारंभी सरस्वतीच्या काठचा व नंतर गंगायमुनेच्या मधला चिमुकला दोआब येवढीच काय ती पवित्र भूमि मानली जाई. येथून सुरुवात करून अंतीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा सर्व देश हा पवित्र होय असे ठरविण्यात आले; येवढेंच नव्हे तर ती कल्पना मनात रुजावी म्हणून व देशाची प्रत्यक्ष ओळख व्हावी म्हणून यात्रेमध्यें भिन्न भिन्न स्थलींच्या सप्तपुरी, बारा ज्योतिर्लिंगे वगैरे गोवून दिल्या. भिन्न भिन्न समाजाना कधीं विश्वामित्राचे पुत्र म्हणून, कधीं व्रात्य म्हणून, कधीं संकरोत्पन्न म्हणून एकसमाजसूत्रात ओवण्यात आलें. देवदेवताच्या बाबतींत तुलसी, अश्वत्थ यासारख्या वृक्षदेवता; नाग, गायत्री यासारख्या पशुदेवता असल्याचा समावेश केला. अधिकारभेदाच्या प्रमेयाने भिन्न तत्त्वज्ञानपथाचे एकीकरण केले. प्रांतोप्रांतीं निरनिराळ्या भाषा चालू असताहि अखिल भरतखंडातील सुशिक्षितांची नागरभाषा म्हणून संस्कृत भाषेची निष्ठेने जोपासना करण्यात आली. आणि हा एकीकरणाचा प्रयोग चालू असता समाजधारणेचे एक श्रेष्ठ तत्त्व जे सहिष्णुता ती सहिष्णुतावृत्ति जगात अन्यत्र कोठेंही नसेल अशी खोल रुजविण्यात आली. ही कामगिरी बिनमोल होय. पण...

होय. जीभ अडखळते खरी. काय असेल ते असो, निर्भेळ सद्गुण असा जगात आढळत नाहीं. आढळते ते गुणावगुणाचें नेहमीं मिश्रण झालेलें आढळते. एखाद्या गुणाचे संवर्धन करीत असता त्याच्याशीं संलग्न असलेल्या दुर्गुणाचेहि संवर्धन न कळत केले जावे ही मोठी मनाला टोचणारी गोष्ट होय. आपणामध्यें सहिष्णुतावृत्तीची योग्य जोपासना कर-

ण्यात आली हे खरे; पण त्याबरोबरच सत्याचा आग्रह धरण्याची वृत्ति नरमावली हें कटुसत्य मान्य केलें पाहिजे. असत्याचा आग्रह अयोग्य असेल; पण अंतःकरणाला पूर्णपणे पटलेल्या सत्याचा आग्रह धरणे, त्याच्याकरिता जननिंदा सोसण्याची किंवा सर्वस्व अर्पण करण्याची तयारी असणे या वृत्तीनें समाजाची प्रगति होत असते. सहिष्णुतेने समाजातील जाचक घर्षण नाहींसे होते, पण या सहिष्णुतेच्या वृत्तीला सत्याग्रही वृत्तीची जोड नसेल तर समाजाला स्थिरावस्था प्राप्त होते. आणि तीच अवस्था उत्तर-कालीं आपल्या संस्कृतीला प्राप्त झाली. पूर्वाचार्यांनीं अगदीं परस्परविरुद्ध मते प्रतिपादिलीं असलीं तरी त्या सर्वांचा कसा तरी समन्वय करावयाचा हा दंडक पडून गेला. धर्मशास्त्र आणि कला याच्या क्षेत्रातील द्रष्टे पूर्वीच होऊन गेले; त्यानीं घालून दिलेले नियम पाळणे एवढेच आपले काम अशी वृत्ति बळावू लागली. राजपद हें पूर्वसुकृताचे फळ मानले जाऊन सामान्य जनता राजकारणाविषयीं उदासीन झाली. संग्राहकवृत्तीमुळे भिन्न भिन्न समाज एकत्र नादू शकले हे जितके खरे तितकेच हेहि खरे कीं ते एकत्र नादले ते एकमेकाशीं समरस होऊन नादले असे नव्हे. भिन्न समाज एकत्र येतात तेव्हा ते तत्काळ एकरूप होणे अशक्यच असते. कांहीं काल ते स्वतंत्र जातीच्या रूपाने रोटीबंद, बेटीबंद असेच राहणे स्वाभाविक असतें. मात्र कालांतराने परस्पर-सहवासाने त्याच्या आचारविचारातील अंतर कमी होत जाऊन ते एकरूप व्हावयास पाहिजेत. पण जातीची जन्माशीं सांगड घातली गेल्याने ही एकीकरणाची क्रिया कायमची स्थगित झाली. अशा समाजातील विविध गट शेजारीं शेजारी सहिष्णुतेनें नादले तरी त्या समाजात जुटीची पिळदार भावना निर्माण होत नाहीं, विद्या आणि कला या आपल्या गटातच राखून ठेवण्याची वृत्ति माजल्यानें ज्ञानाचा विकास थांबतो, सांस्कृतिक चैतन्याला मरगळ येते आणि तर-तरीत वृत्तीच्या परकीयाशीं प्रसंग आला असता हा समाज दुर्बल ठरतो. या बाबतींत ब्राह्मणाच्या संग्राहक वृत्तीची मुक्तकंठाने स्तुति करणारे डॉ. केतकर यानाहि असाच अभिप्राय द्यावा लागला आहे. ते लिहितातः 'वीस कोटि हिंदु प्रजेस एका छत्राखालीं आणणें ही क्रिया करणाराचें समाज-शास्त्र जगातील सर्व समाजशास्त्रापेक्षां श्रेष्ठ होय असें समजण्यास हरकत

नाहीं...(पण) व्यापकतेच्या दृष्टीने जे समाजशास्त्र बलवान् ठरले तें समाजशास्त्र दाढर्याच्या दृष्टीने अगदीं दुर्बल ठरले आहे हे देखील त्याबरोबरच कबूल केलें पाहिजे[1].'

आपल्या समाजाला ही ग्लानीची अवस्था कशी प्राप्त झाली हेंच आता पुढील प्रकरणीं पाहूं. म्हणजे पूर्वीची उत्साही वृत्ति पुनः फुलविणें कसें आवश्यक आहे हे स्पष्ट होऊ लागेल.

---

१ ज्ञानकोश हिंदुस्थान खंड पृ. ४२१–२२ व प्राचीन महाराष्ट्र पृ. २८४.

प्रकरण तेरावे

संस्कृतीचा राजकीय तट कोसळूं लागला



आतापर्यंत आपल्या पूर्वजांची ऐश्वर्योपासना, त्याचा विश्वसंचार, त्याची लोकशाही, त्याची सग्राहक व सहिष्णुवृत्ति याचे जें वर्णन केलें तें पूर्वजाच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन पोकळ अभिमानाचें भरतें आणण्याकरिता नव्हे हें ध्यानीं आले असेलच. तर हा पराक्रम उत्तरकाळीं झाकळून गेल्याने त्याची स्मृति जागृत करावी व तो पुन्हा स्वतेजानें झळकूं लागेल याची मनोभूमिका तयार व्हावी म्हणून. याच कारणास्तव इतिहासाला विचारांत ज्या पद्धतीने आपण आतापर्यंत स्वाभिमानाला स्फुरण देणाऱ्या कार्यक्षेत्रातून धावता संचार केला त्याच पद्धतीनें आता उत्तरकालीन पडत्या कालच्या क्षेत्राची धूळभेट घेऊ या. म्हणजे एके काळीं जगताचे विद्यापीठ म्हणून मिरविणारी आपली मायभूमि आज हीन का झाली व पाश्चात्य संस्कृतीशीं टक्कर द्यावयाची असल्यास आपणातील पूर्वीचे कोणते गुण तिने पुन्हा उजळले पाहिजेत ह्याचा काहींसा उमज पडेल.

या विषयाकडे वळताना अगदीं प्रथमच लक्ष वेधले जाते ते संस्कृतीच्या राजकीय अंगाकडे. आजच्या आपल्या दुर्बलावस्थेतील मनाला टोचणारें प्रमुख शल्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्याचा अथवा स्वराज्याचा अभाव हें होय. कोणत्याहि संस्कृतीचें व समाजघटनेचें राजकारण हें संरक्षक कवच होय. ते शाबूत नसेल तर आतील भागाना नेहमीं टोचा सहन कराव्या लागतील. संस्कृतीचा प्रवाह सथ व निर्मल वाहत राहावयाचा असल्यास तिचा संरक्षक तट जें राजकारण तें कणखर अभेद्य राहिलें पाहिजे, कोसळून उपयोगी नाहीं. तें कसें कोसळूं लागलें इकडेच आतां प्रथम वळू या.

प्रथमच हें सांगितले पाहिजे कीं, कोणत्याहि कालखंडाकडे नजर टाकली तरी शौर्याचा लोप झाला होता असे आढळत नाहीं; शौर्य भरपूर होतें पण शौर्याच्या बाफेला स्वाभिमान, शिस्त, सयम, जागरूकता, मुत्सद्देगिरी यांनीं सुमर्यादित केल्याने प्रचंड शक्ति निर्माण होत असते. हें करण्याचें तत्र मात्र शिथिल होत चालले होते.

या शैथिल्यावस्थेचा काल गेल्या सुमारे हजार वर्षांचा मानता येईल.. येवढ्या दीर्घ कालखंडात आपल्या संस्कृतीची अवस्था शेवाळलेल्या जलाशयाप्रमाणें झालेली आहे. या स्थिरावस्थेला प्रारभ आठव्या शतकापासून सामान्यपणे झाला असे मानण्यास हरकत नाहीं. या कालखडातील हर्षापासून मुसलमानी अमल स्थिर होण्याच्या कालापर्यंत कनोजचा मिहिरभोज ब धारचा पडितराज भोज वगैरे काहीं प्रथितयश राजे होऊन गेले.. भोजाच्या दरबारीं वाङ्मयकलादींना चागलाच बहर आला. याच्या कालात अनेक रजपूत घराणीं उदायास आलीं. त्याची हातावर शिर घेऊन लढण्याची धाडसी व त्यागी वृत्ति इतिहासात अमर होऊन राहिलेली आहे. हे शौर्य वाया गेले असेंहि नव्हे. युरोपात सर्वत्र अप्रतिहत सचार करणाऱ्या मुसलमानाच्या टोळधाडीला सिंधू नदीवर काहीं काळ तरी थोपाविण्यात आलें ते या रजपुती शौर्यामुळेंच. हा काळहि थोडाथोडका नव्हे तर चागला चार पाच शतकाचा काळ होय. हिंदुस्थानावर मुसलमानाची पहिली स्वारी झाली ती सिंधमधील महंमद बिन कासीमची इ. स. ७१२ मधील होय. आणि पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव होऊन मुसलमानाचे पाय हिंदभूमींत कायमचे रोवले गेले ते इ. स. ११९२ मध्ये. एवढ्या मोठ्या म्हणजे सुमारे पावणेपाचशे वर्षांच्या काळात मुसलमानी हल्ल्याना अव्याहत तोंड कोणीं दिलें असेल तर ते बाप्पा रावळ याच्या शूर बचानीं. पण चारशे वर्षें झगडून का होईना इस्लामी चांद मरतभूमींत रोवला गेला आणि रजपुती शौर्य त्याच्यासमोर गाडलें गेलें तें गेलेच !

पाश्चात्यांची घमेंड

परकी हल्ले परतून लावण्याची धमक व कला हिंदूना पूर्वी अवगत नव्हती असें नव्हे. यवन, शक, हूण वगैरे परकीयानीं भरतभूमीवर पूर्वी अनेक हल्ले चढविले होते. काहींनीं येथें काहीं राज्येंहि केलीं. पण भारतीय संस्कृतीचा प्रवाह स्थिर व मंद होण्याइतकी त्याची पकड कधींच घट्ट बसली नाहीं. काहींचे हल्ले तत्काळ परतविले गेले व काहीं परकीय राजाना आपल्या संस्कृतींत जिरविले गेले. युरोपियनाच्या आक्रमणास तोड देण्याची धमक भारतीयामध्ये प्राचीन काळींही नव्हती असें काहीं युरोपियन इतिहासकार प्रतिपादन करितात तेही निराधार होय. शिकंदराच्या दिग्विजयाचा नसता बडेजाव करून स्मिथ लिहितो कीं, 'हिमालयाच्या पायथ्यापासून तो समुद्रापर्यंतचा (सिंधूच्या मुखापर्यंतचा) शिकंदराचा अप्रतिहत विजयी सचार हेच दाखवितो की युरोपियन कौशल्य आणि शिस्त यासी सामना देण्याचा प्रसंग आला असता आशियातील बलिष्ठातील बलिष्ठ असे सैन्यहि स्वाभाविकपणेंच दुर्बल ठरते.'[1] हें विधान म्हणजे युरोपियनाच्या अहकाराचा एक मासला होय. वस्तुस्थिति अशी कीं शिकंदरानें ज्याना पराभूत केलें तीं छोटीं संस्थाने होतीं. भरतखडात त्या वेळीं बलिष्ठ साम्राज्य होते तें मगधातील नंद राजाचे. याच्या सेनेशीं दोन हात करण्याचा शिकदरास प्रसगच आला नाहीं. शिकंदाराचा तसा बेत होता. पण सिंधुतीरावरील झटापटीने त्याचे सैन्य इतकें कटाळले होते कीं आपली महत्त्वाकाक्षा बाजूस सारून देवतेचा कौल घेण्याचे नाटक करून त्यास परतीचा मार्ग स्वीकारावा लागला. आतां युरोपियन कौशल्य व शिस्त हीं निसर्गतःच श्रेष्ठ असतीं तर शिकंदराच्या मागून त्याचें आशिया खंडातील राज्य बळकावणारा त्याचा सेनापति सेल्युकस याला तरी शिकंदराचें भरतखंड जिंकण्याचें स्वप्न व्यवहारात उतरविता यावयास हवें होतें. त्यानें शिकंदराचा कित्ता गिरवून पंजाबावर स्वारीही केली. पण त्या स्वारीचा अंत काय झाला हें इतिहासात चागलेंच नमूद आहे. तें हें कीं चंद्रगुप्तानें त्याच्या स्वारीचा असा धुव्वा उडविला कीं पंजाबचें तर त्यानें नाव सोंडलेच पण

१. Early History of India by V. Smith 3rd edition p. 112

उलट पाचशें हत्ती व काबूल, कंदाहार, हिरात ही प्रमुख शहरें असलेला सर्व प्रदेश चंद्रगुप्तास देऊन टाकून कसेंबसें त्याला संकटातून निसटावें लागलें ! तात्पर्य, जय कधीं युरोपियनाना मिळे, कधीं भारतीयाना मिळे. त्यामुळें एकाच्या आगिक श्रेष्ठपणाचे किंवा दुसऱ्याच्या आगिक दुर्बळपणाचे अनुमान काढणे रास्त नव्हे. सोळाव्या सतराव्या शतकापासून भरतखंड युरोपच्या मागें पडूं लागले. पण तत्पूर्वी ते केव्हाही युरोपच्या मागे नव्हतें. पंजाब व सीमाप्रातावर परकीयाच्या अनेक स्वाऱ्या झाल्या. त्यात कधीं परकीयाचा तर कधीं भारतीयाचा जय होई. यामुळे भारतीय हे मूळचेच हीन आणि दुर्बल होते हे विधान इतिहासास मान्य होण्यासारखे नाहीं. युरोपियन शिस्तीचेही अवडंबर माजाविण्यात दशील नाहीं. शिकंदर निवर्तल्यावर त्याचा आशियातील मुलूख त्याचा सेनापति सेल्युकस यानें बळकावला. पुढें त्याच्या वशजाच्या राज्यातील बॅक्ट्रिया या प्राताच्या प्राताधिपानें स्वतंत्र राज्य स्थापले. त्याचा पुत्र दिमित्र यानें हिंदुस्थानवर स्वारी करून पश्चिमेकडील काहीं भाग काबीज केला (इ.स. पूर्व १९०). पण दिमित्र हा हिंदुस्थानात विजय सपादन करीत असता त्याचा मूळचा बॅक्ट्रिया हा प्रांत युक्रेताइदने हिसकावून घेतला व दिमित्राला तो परत जिंकता आला नाहीं. इकडे युक्रेताइदलाही राज्य पचलें नाहीं. कारण त्याच्या मुलानेच त्याला कठस्नान घालून राज्य हिसकले. अशी ही अंतर्गत शिस्त होती ! ग्रीक किंवा त्याच्यामागून येणारे पार्थियन, शक, कुशाण, हूण, गुर्जर या सर्वांनीं काहीं काल हिंदुस्थानाच्या उत्तर व पश्चिम भागात राज्ये स्थापलीं असलीं तरी हिंदुस्थानातील राज्ये त्याच्यापेक्षा दुर्बल होतीं असें ठरत नाहीं. कारण काहीं काल परक्याचा जय झाला तरी पण त्याना पिटाळून लावणारे प्रतापी राजेही पुढें येत. काठेवाड–माळव्यात पाय रोवून बसलेल्या शक-क्षत्रपानीं महाराष्ट्रातील नाशिक शहरापर्यंत आपली हद्द भिडवली तेव्हा महाराष्ट्राचा त्या वेळचा सम्राट् गौतमीपुत्र शातकर्णी (दुसरें शतक) याने त्याचा खरपूस समाचार घेऊन महाराष्ट्रातून तर त्याना पिटाळलेंच पण गुजरात आणि काठेवाड यातीलही काहीं भाग त्याना सोडावयास लावला. पुढें हूणाचा पराभव यशोधर्मा यानें व हर्षवर्धन

यानीं केला.[1] साराश, असा हा चढउतारीचा इतिहास आहे. तो भारतीयात शौर्य कमी होतें असें मुळींच दाखवीत नाहीं.

हर्षाने जो हूणाचा हल्ला परतविला त्यानतर मात्र परकीयाचा जोर जो वाढत गेला तो परत रेटण्याची धमक दिवसेंदिवस क्षीण होत गेली. बाराव्या शतकापर्यंत रजपुतानीं चार पाच शतके टकरा दिल्या; पण अंतीं त्याची धमक बोथट ठरली. रजपुतानंतर सतराव्या अठराव्या शतकात मराठ्यानी पुनश्च नेटाचा प्रयत्न केला व मुसलमानी अंमल बहुतेक झुगारूनहि दिला. आणि हा लढा मराठे व मोगल यामध्येच राहता तर कदाचित् मराठ्याचे साम्राज्य अखिल भरतखंडभर पसरले असतें. पण ही क्रिया अर्धीमुर्धी होते न होते तोच त्याची अशा जबरदस्त शत्रूशीं गाठ पडली कीं त्याच्यापुढे मराठे शतक अर्धशतकही टिकाव धरू शकले नाहींत. पौर्णिमेच्या रात्रीं चद्रबिंब क्षितिजावर भिरवूं लागले न लागले तोच त्याचा ग्रस व्हावा असा प्रकार झाला !

ही दुर्बल अवस्था, हे तमोयुग, अशा रीतीने चागले दहा बारा शतकावर पसरलेलें आढळतें. या अंधकारात मधून मधून काहीं नरवीर, काहीं पंडित, काहीं महात्मे, चमकताना आढळतात. पण त्याच्या चमकण्यानें सभोवतीं दाट पसरलेल्या अधकाराची जाणीव मात्र तीव्र होते. महमद गझनीच्या स्वाऱ्या सुरू होण्यापूर्वी सिंध व गुजरात या सरहद्दप्रातावरील मुसलमानाच्या स्वाऱ्या सोडल्या असता बाकीच्या भरतखंडाला सुमारें पाच शतकें पूर्ण शातता लाभलेली होती. हूणाच्या मिहिरगुलाचा पराभव इ. स. ५२८ मध्यें झाला व महमद गझनीच्या स्वाऱ्या अकराव्या शतकात सुरू झाल्या. या मधल्या शततेच्या काळात मध्यभरतभूमीला परकीयाचा उपसर्ग मुळींच पोंचला नाहीं. पण या शाततेच्या काळात राजकीय संघटना दृढ होण्याऐवजीं शैथिल्यच माजलें. सम्राट् हर्षवर्धनासारखा प्रतापी राजा लुप्त झाल्यानंतर सर्वत्र लहान लहान राज्यें शिरजोर झालीं, व त्याची नेहमींची एकमेकां-

१. नाशिक लेण्यातील लेखांत शातकर्णीचें वर्णन 'क्षहरातवशनिरवशेषकरस्य' असें व यशोधर्म्याच्या मंदसोरस्तंभलेखांत त्याचें स्वत.चें वर्णन 'मिहिरकुलनृपेणार्चित-पादयुग्म' असें आहे.— Select Inscriptions p. 199, 395.

तील यादवी सुरू झाली. येथून पुढे चार पाच शतकें रजपूत वीर परकीयांशीं झुंजत राहिल्यानें सिंध व गुजरात या सरहद्दीवरील प्रदेशापलीकडे इस्लामी चाद पोंचलेला नव्हता. बाकीच्या मध्यभारतात परकीय उपसर्ग मुळींच पोंचत नव्हता. तथापि ह्या काळात राजकीय संघटना करण्याइतका मोठा सम्राट् कोणी झाला नाहीं. पुढे मुसलमानी स्वाऱ्याचे प्रथम हल्ले व नंतर स्थिर सत्ता सुरू झाल्यावर चौदाव्या शतकात विजयानगर येथें व सतराव्या शतकात महाराष्ट्रामध्यें स्वराज्यसंस्थापनेचे यशस्वी उद्योग झाले. पण विजेची कोर दिसते न दिसते तोच अंतर्धान पावावी तसा प्रकार या दोन्ही ठिकाणीं झाला.

ही अद्भुत घटना घडून आली कशी !

अवनतीचीं चिन्हें

शतकानुशतकें वैभवाच्या शिखरावर असलेले आपले पूर्वज हे अकराव्या शतकात मुसलमानाच्यापुढें व पुन्हा एकोणिसाव्या शतकात इंग्रजापुढे हतबल कसे झाले हा प्रश्न जितका कुतूहलोत्पादक तितकाच अवघडहि आहे. तो अवघड असला तरी पाश्चात्यांची मगरमिठी जोवर मानेभोंवतीं काचत आहे तोंवर कोणत्या दोषामुळे आपण हतप्रभ झालो व कोणत्या गुणामुळें पाश्चात्य विजयी झाले याची जमेल तितकी मीमासा करणे हें संस्कृति-संगमावरील विवेचनाचे एक अपरिहार्य अंग होऊन बसतें. या प्रश्नाचें उत्तर कोणत्या एखाद्या विशिष्ट उपपत्तीनें अथवा एखाद्या सूत्रमय कल्पनेनें देणे कठीण आहे. राष्ट्राचे उत्कर्षापकर्ष हे क्षणिक, तात्कालिक घटनानीं ठरत नसून त्याचीं पाळेंमुळे भोंवतालच्या परिस्थितींतील स्थलकालात दूरवर रुजलेलीं असतात. तीं उकलून पाहावयाचीं म्हणजे प्रत्यक्ष रणागणावर चमकणारी क्षात्रसंपत्ति जशी पारखावी लागते तसेंच त्या क्षात्रसंपत्तीला जिवंत ठेवणारी सामाजिक घटना, आर्थिक व्यवहार व धर्मकल्पना ह्याही पारखाव्या लागतात. शिवाय प्रतिभावान् आणि कर्तृत्ववान् समाजनेत्याची उपस्थिति वा अनुपस्थिति व जागतिक परिस्थितींतील अनुकूल व प्रतिकूल घटनाचा संघात याकडेही लक्ष पुरवावें लागतें.

या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केला, व तो करूनही पुन्हा आजच्या काळच्या कल्पना पूर्वीच्या काळीं लावण्याची चूक न करण्याविषयीं सावधगिरी बाळगली, तरच राष्ट्राच्या किंवा संस्कृतीच्या उन्नति अवनतीची काहीं स्थूल उपपत्ति बसविता येईल. पैकीं दुसरी गोष्ट कठीण आहे हे कबूल केले पाहिजे. कारण प्राचीन इतिहासाकडे पाहतानाहि आजच्या कल्पना आपण सर्वस्वीं विसरूं शकत नाहीं. यामुळे कोणी कोणी तर असें प्रतिपादन करितात कीं, पूर्वजांचीं कृत्ये तेवढीं जशींच्या तशीं नुसतीं वर्णन करावी, त्याच्या गुणदोषमीमांसेंत शिरू नये. पण नुसत्या कोरड्या निर्लेप घटनाच वर्णावयाच्या तर असला अळणी इतिहास लिहावयाचा कशाला व वाचावयाचा तरी कशाला ? मागल्यास ठेच पुढचा शहाणा असा काहीं हेतु इतिहासाच्या परिशीलनात गृहीत धरलेलाच असतो. तरी आपल्या संस्कृतींत उत्पन्न झालेले दोष म्हणून जे आज आपणांस भासतात त्याची चर्चा करण्यास कचरण्याचें कारण नाहीं.

राजकीय स्वातंत्र्य हे संस्कृतीचे संरक्षक कवच असल्याने प्रथम त्याकडे लक्ष देऊं या.

भारतीय संस्कृतीविषयीं विपर्यस्त कल्पनानीं घेरल्यामुळे पाश्चात्य पंडित केव्हा केव्हा मोठीं चमत्कारिक अनुमानें बाधीत असतात. सिंधमधील उत्खननात प्राचीन शहराचे जे अवशेष आढळले आहेत त्यात शहरामोंवतीं तटबंटी आढळली नाहीं त्यावरून गोल्ड नावाच्या एकानें अनुमान काढलें कीं याच्यामध्यें युद्धें कधीं होतच नसावींत ! पण हें तर मनुष्यस्वभावाशीं विसंगत दिसतें; तेव्हा पुढें तर्क असा चालविला कीं, फार प्राचीन कालींच या लोकानीं अशी काहीं युगत शोधून काढली असावी कीं, हिंसा म्हटली कीं मनाला स्वाभाविक अन्तःप्रेरणेनेच शिसारी वाटावी. आपणा आधुनिकामध्यें आपपरभाव व व्यक्तिमत्व ह्याची अतिरिक्त वाढ झाली आहे; पण भारतीय मनाची घडी अशी बसली होती कीं त्यात आपपरभावच लुप्त झाला होता. मग कोणीं कोणाविरुद्ध लढावें ![1] हिंदुस्थानविषयक विचित्र कल्पनाचा नमुना येवढीच या तर्कप्रणालीची किंमत.

१. Story of Indian Civilisation by Joad p.105.

अधिक उत्खननानंतर तटबंदीचे अवशेषहि उपलब्ध झाले आहेत एवढें सांगितलें म्हणजे पुरे.[1]

क्षात्रवृत्ति ही भारतीयाच्या रक्तामध्येच नाहीं असे प्रतिपादन करण्याचा बरच्यासारख्याचा एकंदरीने रोख असतो. पण क्षात्रवृत्तिच हिंदूंमध्यें कमी दर्जाची होती हे कारण मुळींच टिकण्यासारखे नाहीं. जिवाची बेपर्वा आणि सर्वस्वाचा त्याग हीं जीं अव्वल दर्जाच्या क्षात्रवृत्तीचीं लक्षणें तीं रजपुताच्या कोणत्याहि लढाईत उत्कटत्वाने पाहावयास मिळतील. किंबहुना, शेवटीं रजपुताना हार खावी लागली असली तरी त्यानीं सतत पाचशें वर्षें मुसलमानाचे अनेक हल्ले परतविले व अनेक वेळा त्यानां दातीं तृण धरावयास लावलें याची इतिहासाला चागलीच दखलगिरी आहे. इस्लामची पहिली धाड हिंदुस्थानवर आदळली ती इस्लामी धर्माचें रक्त ऐन ताजें होतें त्या वेळीं. महंमद पैगंबर मक्केहून जिवानिशीं पळून मदिना येथें आला तेव्हापासून म्हणजे इ स. ६२२ पासून अरबाच्यामध्ये नवतेज संचरूं लागलें. या तेजानें बेहोष होऊन आणि लुटीच्या लालसेनें हपापून त्यानीं हजारो मैल प्रदेश जिंकला व अवघ्या एका शतकात म्हणजे इ. स. ७१२ मध्ये महंमद कासीमनें सिंधवर स्वारी केली. पण इ. स. ११९२ मध्यें महंमद घोर याने पृथ्वीराजाचा निःपात केल्यानंतरच मुसलमानाचा अंमल पक्का झाला. मध्यंतरीच्या काळात स्वारी करणाऱ्या जुनैदानें हिंदुस्थानात दूरवर सैन्यें पाठविलीं. पण उज्जनीकडे जाणाऱ्या सैन्याला प्रतिहारांच्या नागभट्टानें धूळ चारली, आणि गुजरातेंतील मोहिमेचा बदामीच्या चालुक्याचा माडलिक पुलकेशी यानें धुव्वा उडविला व 'दक्षिणापथस्वाधारण' व 'अनिवर्तकनिवर्तयितृ' अशीं बिरुदे मिळविलीं.[2] पुढील म्हणजे नवव्या शतकात कनोजच्या प्रतिहारी घराण्यात मिहिरभोज नावाचा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला.[1] त्याच्या कारकीर्दीत तर मुलतान आणि काबूल येथील इस्लामी राजानीं त्याचें अधिराजत्व मान्य केलें होतें. पुढें दहाव्या शतकात मथुरेच्या गहडवाल घराण्यातील गोविंदचंद्रानें गझनीच्या

१. Indus Civilisation by Mackay p.62.
२. Epigraphia Indica 18.23.

अमीराचा दोनदा पराभव केला, इतकेच नव्हे तर मुसलमान प्रजेवर त्यानें तुरुष्कदंड नावाचा करहि बसविला. पजाब व राजपुताना येथील चाहमान घराण्यापैकीं अर्णो राजानेहि मुसलमानास हात दाखविला. या विजयाचे स्मारक म्हणून बाधलेला तलाव आनासागर या नावाने आजहि अजर्मारास पहावयास मिळतो. यानंतर इ. स. १००१ मध्यें विशालदेव राजानें मुसलमानाचा पराभव केला. पुढे गझनीच्या महंमद शहाबुद्दीन घोरीच्या स्वाऱ्यास सुरुवात झाली. त्या वेळींहि इ. स. ११७८मध्यें अबूच्या पहाडाजवळ गुजराथच्या मूलराजाने त्याला असा लोळविला कीं त्याने हाय घेऊन पुढे बारा वर्षे हिंदुस्थानचे नाव सोडून दिले. बारा वर्षांनीं फितुरीचा फायदा येऊन पुन्हा त्यानें स्वारी केली त्या वेळीं तर तो पृथ्वीराजाच्या तावडींतच सापडला.[1]

चारपाचशे वर्षांतील या त्रोटक जंत्रीवरून या कालातहि भारतीयाची क्षात्रवृत्ति मलिन झाली नव्हती हे स्पष्टच आहे. ते अधिक स्पष्ट होण्याकरिता हेंहि आणखी लक्षात घ्यावे कीं ज्या या चार पाच शतकात भारतीयानीं इस्लामीयाना येथे थारा देऊं दिला नाहीं त्याच चारपाच शतकात युरोपियन राष्ट्राना या इस्लामी धडाडीपुढे सर्वत्र गुडघे टेकावे लागले होते आणि बगदादपासून स्पेनपर्यंत युरोपच्या दक्षिणभागावर इस्लामी चाद अप्रतिहत फडकताना उघड्या डोळ्यानीं पाहावा लागला होता. सिंध जिंकला त्याच सुमारास मुसलमानानीं स्पेन जिंकला. तो पुढें सतत आठशें वर्षें टिकला! स्पेनमधून त्यांना हाकून देण्यात आलें तें पंधराव्या शतकाच्या अंतीं. यावरून इस्लामी योद्धयापेक्षा भारतीयाचें क्षात्रतेज अद्याप हीनप्रभ झालेले नव्हते हेंच दिसून येईल.

मुसलमानाची राहणी थंड हवेंतील म्हणून ते हाडापेराने अधिक निकोप, त्याचा आहार मासयुक्त अतएव अधिक सकस व पौष्टिक वगैरे गोष्टींचा उल्लेखहि या पराभवमीमासेत करण्यात येतो. पण त्यात फारसें तथ्य नाहीं हें मुसलमानाच्यापुढें समान आहारविहारानीं युक्त असे जे युरोपियन ते

१. Dr. D. R. Bhandarkar's Slow Progress of Islam in Annals B. O. R. I Vol X, XI

टिकाव धरू शकले नाहींत एवढ्यावरूनच लक्षात येईल. हिंदूंच्या गजदळापेक्षा मुसलमानांचें घोडदळ व उष्ट्रदळ अधिक कार्यक्षम होतें हें विधानहि काहींसे खरे असलें तरी इतिहासावरून पाहता हिंदूंच्याजवळ घोडदळ नव्हते असेहि दिसत नाहीं. मुसलमानानीं हत्तीवर बहिष्कार घातल्याचेंहि आढळत नाहीं. कारण महंमद गझनीने तार्तर इलखखान याचा पराभव केला तो सर्वस्वीं गजदळाच्या जोरावर. आणि वर उल्लेखिलेल्या चाहमान व सोळंकी राजानीं मुसलमानाना चीत केले ते घोडदळाच्या साहाय्याने. गुर्जर म्हणजे कनोजचे प्रतिहार राजे याच्याजवळचे घोडदळ तर एवढ्या श्रेष्ठ प्रतीचे होतें कीं सुलेमान नावाच्या व्यापाऱ्याने इ. स. ८५१ मधील आपल्या प्रवासवृत्तात कनोजच्या प्रतिहार राजाविषयीं लिहिले आहे कीं त्याच्याजवळ उट आणि घोडे अगणित असून इतके उत्कृष्ट घोडदळ दुसऱ्या कोणा राजाच्या पदरीं नाहीं.

तर मग चार शतकानंतर का होईना इस्लामधर्मीयाचा पाय भरतखंडात कसा रोविला गेला ? अर्थात् या कालखंडामध्यें इस्लामीयाच्या मध्ये प्रभुत्व गाजविण्याला व दिग्विजयात यशस्वी होण्यास लागणाऱ्या गुणाची वाढ झाली असली पाहिजे आणि अशा गुणाना भारतीयामध्यें हळूहळू मंदी येत चालली असली पाहिजे.

इस्लामची ऐश्वर्योपासना

इस्लामचा उदय अरबस्थानात सातव्या शतकात झाला आणि पुढील अवघ्या दोन शतकात इजिप्त,इराक,सिरीया,तुर्कस्थान, ग्रीस, दक्षिण इटाली, दक्षिण फ्रान्स, स्पेन हा भूमध्यसमुद्राच्या लगतचा सर्व प्रदीर्घ प्रदेश त्यानें व्यापला ! हा प्रचंड दिग्विजय म्हणजे काहीं आकस्मिक घटनेची लहर नव्हे; त्याला तशीच ऐतिहासिक कारणे होतीं. अरबस्तान हा देश किनाऱ्यालगतचा प्रांत सोडला तर निर्जल खडकाळ असा आहे. येथें निकृष्ट भौतिक परिस्थितीशीं नेहमीं झुंजावें लागत असल्याने अरबी लोकामध्यें धाडसीपणा आणि काटकपणा हे गुण पिंडातच मुरलेले होते. या गुणाचा विनियोग पुष्कळदा आरबी टोळ्याच्या परस्पर भांडणात आणि लुटींत होत असे. पण या अरबाच्याविषयीं दुसरीहि एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कीं,

त्याना व्यापाराची आवड होती. इस्लामी धर्माच्या उदयाच्या सुमारास मक्का हे व्यापाराचे मोठे केंद्र असून त्याच्या नजीक असलेले काब्बा हें सर्व अरबी टोळ्याचे पवित्र क्षेत्र होतें. या क्षेत्राचे उत्पन्न मोठे असून ज्या अरबी टोळीच्याकडे क्षेत्राचे उपाध्येपण असे तिच्या हातीं धार्मिक सत्ता, धनसत्ता, व्यापारी सत्ता या एकवटल्या जात. या क्षेत्रास अरबस्थानातल्या सर्व जमाती यात्रेकरू म्हणून येत पण त्या आपआपल्या भिन्न भिन्न देव-देवताची पूजा करीत. काब्बामध्ये अशा रीतीने चागल्या दोनतीनशें दैवताच्या प्रतिमा उभारण्यात आल्या होत्या. या परस्पर झुजणाऱ्या टोळ्याची एक संघटना होऊ शकली तर त्यांचें बळ वाढून त्याच्या व्यापारास तेजी येणार होती. अशी संघटना व्हावयाची तर त्याला तशीच दूरदृष्टीची व ध्येयवादी विभूति पुढें यावी लागते. महंमदाच्या रूपाने अशी विभूति अवतरताच शिवाजीच्या झेंड्याखालीं ज्याप्रमाणे मावळ्याची एकजूट झाली तशी इस्लामी धर्माच्या छत्राखालीं सर्व अरबी जमातींची एक संघटना निर्माण झाली. ही संघटना सुलभ रीतीनें होऊ शकली नाहीं. शिवाजी-प्रमाणे महमदालाही अनेक स्वकीयाशीं झुंजावें लागले. पण शेवटीं त्याने यश जिंकले. ईश्वर एक असून इस्लामचे अनुयायी हे सर्व समान होत, हे धर्मात एकेश्वरीवादाचे आणि व्यवहारात समतावादाचे तत्त्वज्ञान हेंहि संघटना प्रभावी करण्यास उपकारक होते. महमदाच्या नंतर अबूबकर, उमर वगैरे खलिफानीं आपल्या साध्या राहणीनें व ध्येयवादी विचार-सरणीने इस्लामचे स्वरूप अधिक उज्ज्वल केले. व्यापाराची आणि मुशाफरीची आवड मूळची होतीच यामुळे युरोप व आशियाखंड यातील परस्पर व्यापाराचे हमरस्ते ज्या प्रदेशातून जात होते ते प्रदेश म्हणजे सिंध, तुर्कस्थान, इराण, इराक व दक्षिण युरोप हे सर्व प्रदेश त्यानीं हिरीरीनें हस्तगत केले. पूर्वीचें रोमन साम्राज्य पाचव्या शतकात रानटी लोकानीं उद्ध्वस्त केले होतें, ख्रिश्चन उपाध्यायाच्या सन्याशी कर्मठपणाखालीं ऐहिक जीवन कष्टाचे झालेलें होतें आणि इस्लामचे पुढारी ध्येयवादाने भारलेले होते, तेव्हां दक्षिणयुरोपचा सर्व भाग व इराण, इराक ह्या प्रातातील लोकानीं इस्लामी धर्माचें आणि इस्लामी राजसत्तेचें आधिपत्य मान्य केल्यास नवल नाहीं. पुढें मध्यआशियातील

मटक्या टोळ्यानींहि इस्लामी धर्माचा स्वीकार केला. आणि पूर्वेस चीनपासून पश्चिमेस स्पेनपर्यंत इस्लामी राज्याची एक अखंड साखळी बनली. युरोप आशियातील व्यापाराचे मुख्य हमरस्ते याच प्रदेशातून जात होते. ते सर्व अरब, तुर्क, अफगाण याच्या ताब्यात होते. व्यापाराच्या जोडीला लुटीची आवड व धाडस असलेले गझनीचा महंमद, घोरचा महंमद यासारखे उत्तम सेनानायक लाधले होते. पण इस्लामी लोक हे नुसते लुटारू नसून व्यापारीहि होते हे लक्षात ठेवले पाहिजे. अरबस्थानांतील घोड्याचा व्यापार हा एक कमालीचा किफायतशीर धंदा होता. राष्ट्रकूट व प्रतिहार हीं दोन्हीं राज्ये अरबी व्यापाराच्याकडून घोड्याची खरेदी फार मोठ्या प्रमाणावर करीत याचा वर उल्लेख आला आहेच. हा अरबी घोड्याचा व्यापार विजयनगरचे साम्राज्य व मराठ्यांचें साम्राज्य याच्या कालींहि जोरात असून अरबी व्यापाऱ्याना पेशव्यानीं कोकणात राहावयास परवानगी दिली असून वर त्याना जकात माफ केली होती.[1] हा व्यापार केवढ्या प्रमाणावर व तो किती किफायतशीर असे यासबंधीं १४ व्या शतकातील प्रवासलेखक इब्नबूतता लिहितो कीं या व्यापाऱ्याचा मोठा संघ असून एकेका व्यापाऱ्याजवळ सहा सहा हजार घोडे असत. अजाफ समुद्रावरील कबचाक येथे हे घोडे चार चार रुपयाला एक या दराने विकत घ्यावेत आणि त्याची निगा राखून त्याना तयार करून हिंदुस्थानात दर येईल त्याप्रमाणे शंभरापासून दोन दोन हजार रुपयापर्यन्त एक एक घोडा विकावा.[2] येवढा किफायतशीर हा धंदा होता ! नुसत्या घोड्याचाच नव्हे तर हरतऱ्हेच्या मालाची दर्यावरील वाहतूकही अरबाच्याच ताब्यात होती.

इस्लामधर्मीयाची व्यापाराच्या जोडीला दुसरी एक कर्तबगारीहि अवश्य लक्षात घेण्याजोगी आहे. ती म्हणजे त्याची विद्येची जोपासना ही होय. मेसापोटेमियातील आबासदी राजवट, इजिप्तमधील फातेमी राजवट व स्पेनमधील ओमीयदी राजवट या तिन्ही राजवटींत विद्येला उत्तम

१. पेशवे डायरी प्रस्तावना– म. गो. रानडे.

२. युसुफअली कृत मध्यकालीन भारत की सामाजिक अवस्था पृ. ७१.

आश्रय असे. बगदादचे खलिफा हे तर विद्यार्जनाचे मोठे भोक्ते होते. भारतीयाच्यापेक्षा ते विद्येत पुढारलेले नव्हते. पण ग्रीक भाषेतील आणि संस्कृत भाषेतील उत्तमोत्तम ग्रंथाचीं त्यानीं भाषातरे केलीं यावरून त्याची विद्यार्जनाची लालसा दिसून येते. नवीन विद्या शिकणाऱ्याच्या अंगीं जो उत्साह बाणतो तो त्याच्यामध्ये या कालात उत्कटतेनें दिसून येतो. उलट त्याच काळात भारतीयाची विद्यार्जनाची हौस वठूं लागली होती. ते स्वतःच्याच पाडित्याने कसे दिपून गेले होते व त्याच्यात विचारस्वातंत्र्य कसे कोळपूं लागलें होतें हें पुढें पाहू. येथे चालू मुद्दा म्हणजे भारतीयाना ज्याना तोंड द्यावयाचें होतें ते हरप्रकारच्या विद्येची जोपासना निष्ठेनें आणि उत्साहाने करीत होते हा होय. युरोपात चवदाव्या पंधराव्या शतकात विद्येचें पुनरुज्जीवन झालें त्या वेळीं त्याना ग्रीक ग्रंथ उपलब्ध झाले ते इस्लामीयानीं जतन करून ठेवलेल्या स्वरूपात झाले. तात्पर्य, ज्या कालात हिंदूंचा मुसलमानाशीं सबध आला त्या कालात विद्योपासना, व्यापार, सेनानायकत्व या बाबतींत मुसलमान वरचढ होत चालले होते.

इस्लामी धर्मातील समता व कडवेपणा याचाही फायदा मुसलमानाना मिळाल्याशिवाय राहिला नाहीं. लूट मिळेल तिचा एक ठराविक भाग सर्व सैनिकात वाटून देण्यात यावा असा इस्लामी सैन्यात सामान्यतः दंडक असे. पण इस्लामी सैनिकाचा लुटीवर मुख्य डोळा असला तरी धार्मिक भावनेचें तिला साहाय्य होत असे एवढें मात्र कबूल केले पाहिजे. कारण मुसलमान हे प्रथम प्रथम तरी काफराच्या बाजूने स्वतःच्या धर्मबाधवाविरुद्ध लढण्याचें नाकारीत. सिंधच्या दाहर राजाच्या हाताखालीं ५०० अरब लोकाची एक तुकडी असून तिचा नाईक अलाफी नावाचा अरब होता. त्याला दाहरनें महमद कासीमविरुद्ध लढण्यास आज्ञा केला असता त्याने उलट जबाब दिला कीं, आम्ही मुसलमान असल्यानें इस्लामच्या सैन्याविरुद्ध आमची तरवार म्यानातून बाहेर निघणार नाहीं! ती निघेल तर आम्ही नरकात जाऊं! असें म्हणून तो आपली तुकडी घेऊन निघून गेला.[1] तसेंच तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या रामरायाच्या फौजेत मुसलमानी पथकें होतीं त्यानीं तर आयत्या वेळीं शत्रूस मिळून ज्याचें अन्न खालें होतें

१. चि. वि. वैद्य-मध्ययुगीन भारत भाग १ ला.

स्याला सपशेल तोंडघशीं पाडलें. स्वधर्मबांधवांबरोबर लढणें हें नरकात लोटणारे आहे अशी अहर्निश शिकवण मुसलमानाना मिळे त्याचा परिणाम झाल्याविना कसा राहणार? मुसलमानातही पुढें हे तत्त्व राहिलें नाहीं आणि उत्तरेकडील मुसलमान व दक्षिणचे मुसलमान याच्यात तंटे सुरू झाले तेव्हा त्याचाहि विनाश ओढवला. पण मुसलमानाची ही वृत्ति उमगल्यानंतरहि तिच्या प्रतिकारार्थ तत्सदृश शिकवण हिंदु धर्ममार्तंडानीं आपल्या धर्मांत समाविष्ट केली नाहीं. सैनिकाना लढण्यास उत्साह वाटावा म्हणून 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं' 'रणागणावर मृत्यु आला असता स्वर्गलोक प्राप्त होतो' ही भगवद्गीतेतील घोषणा जशी सापडते, किंवा अन्नदात्याच्याकरिता जो लढणार नाहीं त्याची उत्तरक्रिया शास्त्रोक्त होणार नाहीं व तो नरकात पडेल; 'नवं शरावं सलिलस्य पूर्णं सुसंस्कृत दर्भकृतोत्तरीयं। तत्तस्य मा भून्नरक च गच्छेद्यो भर्तृपिंडस्य कृते न युद्धेत्।' (चाणक्य १०।३). अशा प्रकारची शिकवण जशी पूर्ववाङ्मयात सापडते तशी इस्लामी अनुभवानतर **स्वधर्मीयांविरुद्ध लढणें हें पाप होय** अशी नवी शिकवण समाविष्ट व्हावयास हवी होती. जीवनकलहात टिकाव धरावयाचा तर ज्याच्याशीं कलहाचा प्रसंग येईल त्याचे सामर्थ्य, शस्त्राचे आणि मनोवृत्तीचे, ज्या प्रकारचे असेल त्याला पुरून उरेल असें आपलें सामर्थ्य सिद्ध करावयास हवे होते. पण ते झालें नाहीं.

स्थायिक विरुद्ध सुसंघटित भुरटे

इस्लामी धर्म स्वीकारणाऱ्यात भटके लोकही सामील होत. त्याच्या कडवेपणाला भटक्या, लुटारू, पोटार्थी, बेफाट लोकाचा रानवट कडवेपणा म्हणता येईल. मध्यआशियामध्ये एकेकाळीं अशा लोकाचा एक मोठा जमाव तयार झाला होता. या लोकाना विशिष्ट अशी संस्कृति नव्हती, विशिष्ट परंपरा नव्हती. कलाकौशल्य किंवा व्यापार-उद्योग वगैरेंत रमणाऱ्या स्थिर जीवनाची आवड रुजली नव्हती. मुसलमानी धर्माचा ते अभिमान बाळगीत तो बराचसा लुटीला आणि क्रौर्याला समर्थनपर म्हणून. महंमद कासीमला सिंधमधील लोकानीं आपला जीव वाचविण्याबद्दल विनवणी केली

तेव्हा तो स्पष्ट उद्‌गारला कीं, "माझ्या धर्माची आज्ञा आहे ती कत्तल करण्याची, जीव वाचविण्याची नव्हे." ही वृत्ति भटक्या लोकाना मानवणारी अशीच होती. जिकडे लूट मिळेल तिकडे टोळधाडीसारखी धाव घ्यावयाची ही वृत्ति. लूट भरपूर असेल तर तिकडेच लूट संपेपर्यंत रमावें; परत अमुक देशाला यावयाचें असें मातृभूमीच्या कल्पनेचें बंधन नाहीं. राज्य स्थापण्यास सापडले तर तेथेच बैठक मारावी, नाहीं सापडले तर लूट करावी. नित्य नवी लूट कोठे मिळेल तिकडे दृष्टि. स्थैर्य, बैठ्या आयुष्याचें पूर्ण वावडें. उद्याची फिकीर नाहीं, प्राणाची पर्वा नाहीं अशी नंगी वृत्ति. मध्यआशियाच्या पठारावरून हिंदुस्थानात उतरणारे लढवय्ये नंग्या, लुटारू, पोटभरू वृत्तीचे होते.

अशा नंग्या लोकाशीं सामना द्यावयाचा झाल्यास मातबर संस्कृतीच्या राष्ट्राला मोठेच अवघड होऊन बसते. निर्लज्ज फटक माणसाशीं गांठ पडली म्हणजे सभाविताला त्याच्यापुढे हात टेकावे लागतात, किंवा गावकीमध्ये प्रामाणिक व नेकीच्या माणसाना गावगुंडाच्यापुढें नमते घ्यावे लागतें हा व्यक्तीच्या व्यवहारातला अनुभव सर्वांना असतोच. हाच अनुभव उपटसुंभ भुरट्या लष्करी टोळ्याशीं प्रसग आला असता प्रतिष्ठित राष्ट्राला येतो.

हा अनुभव जसा हिंदूना आला तसा तो रोमन राष्ट्रालाहि पूर्वी आला होता. इसवी सनाच्या चौथ्या शतकात रोमवर उत्तरेकडील ज्या टोळ्या हल्ले चढवूं लागल्या, त्या रोमन संस्कृतीशीं तुलना करता ज्याना रानटी म्हणता येईल अशा भुरट्या लुटारू लोकाच्याच होत्या. त्याच्यापुढे मातबर अशा रोमन राष्ट्राचा टिकाव लागला नाहीं. टिकाव न लागण्यास ते आतून पोखरलेलेंही होतेच. प्रचड राजरस्ते, मैल मैल लाब कालवे, विलासी प्रासाद, विस्तीर्ण साम्राज्य, सुव्यस्थित कायदेकानू ज्यात आहेत अशी संस्कृति त्यानीं हजार वर्षांच्या परिश्रमाने उभारली होती. पण उत्तरेकडून जर्मनीवर कोसळणाऱ्या रानटी हल्ल्यापुढें रणांगणावर ते टिकाव धरूं शकले नाहींत. हजार वर्षे जगाला दरारा दाखविणारें रोम अन्तर्गत यादवीने, श्रीमंताच्या ऐषआरामी वृत्तीने, दलिताच्या निसत्त्व जीवनानें, वसुलाच्या घटतीमुळे पोखरून गेलें होतें. त्यामुळें लढाई आणि

लुटारूपणा यातच निर्दाखलेल्या रागड्यापुढे ससंस्कृत रोमन राष्ट्राला हार खावी लागली एवढेच पाहावयाचे आहे. गिब्बन लिहितो कीं, दारिद्र्य आणि प्राणाची बेपर्वा या कारणाने या रागडे लोकात एक प्रकारचे सैतानी शौर्य सचारत असते. त्याचा प्रतिकार करावयाचा तर आपलें लष्करी सामर्थ्य, युद्धपद्धति समाजरचना सुधारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्याच्याकडे ज्यानीं दुर्लक्ष केले त्याना या रागड्याचा उपद्रव निमूटपणे सोसावा लागला.

रागड्याच्या आक्रमणाचे भय शास्त्रीय प्रगतीनतर आता उरलेले नाहीं. पण रोमवर पूर्वी कोसळली तशी आपत्ति पुन्हा युरोपियन सस्कृतीवर कोसळली तर काय होईल ? पुन्हा रानटी लोकाच्या टोळ्या युरोपवर धडकूं लागल्या तर युरोपची सस्कृति पूर्वीच्या रोमन सस्कृतीसारखीच त्याच्या भक्ष्यस्थानी पडेल काय ? असा एक काल्पनिक प्रश्न उपस्थित करून गिब्बन लिहितो कीं, "युरोपची स्थिति आता इतकी पालटली आहे कीं, पूर्वीसारखा एखादा रागडा तार्तर वीर आता दिग्विजय करीत चालून आला तर त्याला राशियातील दणकट शेतकरी, जर्मनींतील बलाढ्य सैनिक, फ्रान्समधील शूर सरदार आणि इंग्लंडातील निधडी जनता या सर्वांशीं सामने देत यावे लागेल. आणि युरोपला चेपीत चेपीत अटलांटिक महासागरापर्यंत तो आलाच तर दहा हजार बोटींत बसून युरोपियन लोक या रागड्याच्या दृष्टिपार अमेरिकेत जातील व तेथे आपल्या संस्कृतीचा विस्तार करतील. पण **भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीमुळें युद्धकला इतकी आमूलाग्र बदलली आहे कीं रानटी लोकांच्या हल्ल्यांपासून युरोप आतां अगदीं निर्वेध झाला आहे. कारण युरोपचा पराभव व्हावयाचा तर तो युरोपिअनांसारख्या शास्त्रपारंगत राष्ट्राकडूनच तो होऊं शकेल.** म्हणजे युरोपचा पराभव करण्यापूर्वी ते राष्ट्र रानटी असूंच शकणार नाहीं."

गिब्बननें लिहिल्याप्रमाणे सुदैवाने युरोपिअन संस्कृतीला आता अशिक्षित रागड्याची भीति उरलेली नाहीं. पण सुशिक्षित युरोपिअन रागड्याच्या टोळधाडेची भीति इतर राष्ट्राच्यापुढे येऊन बसली आहे त्याची वाट

काय ? गिब्बननें वरील मजकूर लिहिला तो १७९७ मध्ये म्हणजे पेशवाईच्या अखेर. योगायोग असा कीं तिकडे गिब्बन युरोपिअन संस्कृति रानटी लोकाच्या हल्ल्यापासून निर्धास्त झाली म्हणून समाधानाचा सुस्कारा टाकीत होता आणि त्याच वेळीं त्याचे सुशिक्षित साम्राज्यवादी देशबाधव हिंदी संस्कृतीचा अपहार करण्यात गुंतले होते ! आपला चालू मुद्दा इतकाच कीं, पूर्वी रानटी रागड्यांपुढें सुसंस्कृत रोमन राष्ट्राला जसे हात टेकावे लागले तसेच हिंदूंनाहि विद्येत आपणापेक्षा मागसलेल्या अशा इस्लामीयाच्या पुढें पराभव सोसावा लागला.

जागरूकतेचा अभाव

पण पराभव का सोसावा लागला ? शौर्यात कमतरता होती म्हणून नव्हे हें वर पाहिलेच. तर पराभवाचें एक कारण नुसते शौर्य पुरे पडत नाहीं. त्यास जागरूकतेची जोड द्यावी लागते हे होय. हिंदूचें शौर्य वाया जाण्याच्या अनेक कारणापैकीं हें एक प्रमुख कारण सागता येईल. या मुद्द्याच्या अधिक खोलात शिरले म्हणजे एकंदर राजकारणच मोगळ झालें होतें असे आपणास आढळून येईल. महमूद गझनीचीच गोष्ट घ्या. त्याने एक नाहीं, दोन नाहीं, तर चागल्या सतरा स्वाऱ्या हिंदुस्थानवर केल्या ! इतक्या स्वाऱ्या करण्याची त्याने उमेद धरावी हीच आधीं अचंब्याची गोष्ट नव्हे काय ? पाहिल्या एक दोन स्वाऱ्या कदाचित् भारतीयाना अचानक वाटल्या असतील किंवा उपेक्षणीयहि वाटल्या असतील. पण सालोसाल वळवाच्या सरीसारखे मुसलमानी सैन्य जणू अस्मानातून उतरल्याप्रमाणें उतरावें, हजारो हिंदूंची त्यानें कत्तल करावी, अगणित जडजवाहीर लुटून न्यावें, आणि बेसावधपणामुळे व गाफिलपणामुळें हिंदूना नुसतें बोटें चावीत किंवा मोडीत बसावे लागावें यांचा ग्रंथ कसा लावावयाचा ? इतक्या स्वाऱ्या झाल्या तरी त्याच्या प्रतिकाराची योजना करता येऊं नये किंवा स्वारी केव्हा येऊन थडकेल याची नुसती वार्ता कळण्याचीहि दक्षता बाळगूं नये यापरते आश्चर्य कोणतें ? १९१४–१८ सालच्या पहिल्या महायुद्धात जर्मनीनें विषारी धुराचा प्रथमच प्रयोग केला तेव्हा इंग्रज, फ्रेंच सैनिक इतके भेदरून गेले होते म्हणतात, कीं या गोष्टीचा प्रतिकार करण्याची

काहीं युक्ति शास्त्रवेत्त्याना न सुचती तर सैनिकाचा आत्मविश्वास खचला असता आणि युद्धाचा शेवट निराळाच झाला असता. प्रसंग आणीबाणीचा होता. विषारी धुराचें अस्त्र सर्वस्वीं नवे होतें; त्याच्या स्वरूपाची कल्पना संयुक्त सैन्यातील शास्त्रज्ञाना आगाऊ काहीच नव्हती. पण शास्त्रज्ञ हताश होऊन अस्मानाकडे डोळे लावून बसले नाहींत तर हें अस्त्र जर्मनीनें फेकण्यास सुरुवात केल्यापासून अवघ्या महिन्याच्या आतच त्यावरील तोडगा शास्त्रज्ञानीं बसविला व अंगावर येणाऱ्या अपयशाला जोराचा ठोसा लगाविला ! नुकत्याच संपलेल्या दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने हवाई छत्र्यानीं सैन्य नेण्याची युक्ति काढताच वर्षाच्या आत इंग्लंडने तोच प्रयोग इटलीवर केला ही आठवण ताजीच आहे. महमूद गझनीच्या स्वाऱ्या तर वर्षानुवर्षे चालल्या होत्या. मग त्याच्या प्रतिकाराची योजना सुचूं नये याचा अर्थ काय ? महमूद गझनीच्या पूर्वी सबक्तगिनाने हिंदूना दोनतीनदा पराभव चारलाच होता. नंतर महमुदाच्या वार्षिक स्वाऱ्या सुरू झाल्या ! पावसाळा सपला कीं गझनींतून बाहेर पडावें, दोन तीन महिन्यात हिंदुस्थानातील समृद्ध प्रातात उतरावे, आणि अचानक छापा घालून हिंदूंनीं वर्षभर जमा केलेली दौलत हातोहात पळवावी असा क्रम त्यानें कित्येक वर्षे बिनबोभाट चालविला होता. १०१९ मध्यें त्याने कनोजवर स्वारी केली तेव्हा त्या शहराचे सर्व सात कोट एका दिवसात त्याला जिंकता आले. या वेळच्या कनोजच्या राजाचें नाव होते राजपाल. त्यानें राज्यपालन केले तें असें कीं, महमूद येताच त्याला सपशेल शरण जाऊन कनोज सोडून इतरत्र राहण्याचें कबूल केलें ! पुढचाहि प्रकार ऐकण्यासारखा आहे. राजपालाचा हा नामर्दपणा पाहून इतर हिंदूंना चीड आली व त्यापैकीं काहीं राजे चंदेलच्या गंड राजाच्या हाताखालीं एकत्र होऊन राजपालावर स्वारी करून त्याला त्यानीं कंठस्नान घातलें. महमुदाला हा वृत्तान्त कळला तेव्हा आपल्या माडलिकाला मारलें म्हणून तो संतापला व या प्रकाराचा सूड उगविण्याकरिता त्यानें पुढच्याच वर्षी चंदेलीच्या गंड राजावर स्वारी केली. गंडानें प्रचंड सेना तयार केली. पण महमूद प्रत्यक्ष रणांगणावर येताच मात्र राजपालावर शूरत्व गाजविणाऱ्या या गंडानें हात-

पाय गाळले आणि हत्ती, खजिना, डेरे वगैरे सर्व रणागणावरच सोडून त्यानें तेथून पळ काढला !

अल्लाउद्दिनानें १२९३ मध्ये देवगिरी जिंकली ती देवगिरीकराच्या अशाच गाफीलपणानें. अल्लाउद्दीन दक्षिणेवर स्वारी करणार याची कल्पना रामदेवरावाला होती; इतकेच नव्हे तर त्याला रोखून धरण्याकरिता त्यानें आपला मुलगा शिंबदेव यास गुजराथच्या मोहिमेवर पाठविलाहि होता. पण आपल्या चुलत्याशी भांडून आपण वरगळकडे चाललो आहोत अशी थाप अल्लाउद्दीनाने मारताच त्याचा एलिचपूर येथील सुभेदार निश्चित बसला असें दिसतें कारण अल्लाउद्दीन यावयाचा तो आलाच पण प्रत्यक्ष देवगिरीच्या तटापासून थोड्या अंतरावर तो येऊन थडकेपर्यंत राजाला त्याची वार्ताहि नव्हती. ती कळली त्या वेळीं त्याचे बहुतेक सैन्य घेऊन राणी आणि राजपुत्र हे तीर्थयात्रेस गेलेले होते.[1] आठ हजार स्वारानिशीं अल्लाउद्दीन उत्तरेहून थेट देवगिरीपर्यंत येतो आणि राजधानीच्या तटापर्यंत येईपर्यंत राजाला वार्ता नसते याचा अर्थ काय ? हेराची पद्धतीच बद झाली होती काय ? हेर हे राजाचे डोळे होत 'चारचक्षुर्महीपालः' असे कौटिल्य, मनु, कालिदास कठशोष करून सांगतात. रामदेवराव हा या दृष्टीने आधळाच म्हटला पाहिजे. बरें, या स्वारीने देवगिरीचे राजे शहाणपण शिकले असेंहि नाहीं. बारा वर्षांची खंडणी थकल्यामुळे अल्लाउद्दिनानें मलीक काफर यास पुन्हा देवगिरीवर पाठविले. या वेळीं मागचा वचपा काढण्याचें तर बाजूसच राहिले पण रामदेवरावानें माडलिकत्व कबूल केलें व दिल्लीसहि गेला. फिरून सहा सात वर्षांनीं मलिक काफरानें रामदेवरावाच्या मुलास ठार केलें. या सर्व प्रकरणाचा अर्थ भोंगळपणा अथवा जाकरूकतेचा अभाव याशिवाय कसा लावावयाचा ?

भोळसट औदार्य

भोंगळपणाचा दुसरा प्रकार म्हणजे राजनीतीच्या भोळसट, अव्यवहार्य

१. Cambridge History Vol. III p. 96.

कल्पनाचा. दिल्लीचें सिंहासन मुसलमानाच्या हातीं ज्या हिंदु राजाच्या हातून गेलें त्या पृथ्वीराजाच्या वर्तनाची मीमांसा या प्रकरणीं सहजच सुचण्यासारखी आहे. ११९२ मध्यें महमद घोरीला दिल्लीचें सिंहासन बळकावता आले ते पृथ्वीराजाला विश्वासानें कंठस्नान घालून बळकावता आलें. पण पृथ्वीराजाने मनात आणले असतें तर उलट हाच प्रयोग उलट करण्यास वर्षापूर्वीच पृथ्वीराजास परिस्थिति सर्वस्वीं अनुकूल होती. विश्वासघात करण्याचेहि कारण नव्हतें. कारण वर्षापूर्वीच प्रत्यक्ष रणागणावरच पृथ्वीराजानें महमुदाला जिंकले होतें. त्याचा कायमचा निःपात करण्यांत विश्वासघातहि नव्हता. पण शरण आलेल्यास अभय देणे हे जें आदर्श क्षत्रियाचे कर्तव्य त्या स्वर्गीय उच्चतर किंवा फाजील अहंकाराच्या भरीं पडून पृथ्वीराजाने महमदाची गय केली. इतिहासकार स्मिथ लिहितो कीं सुलतानाला जबर जखम झाली होती व त्याच्या सैन्याची दाणादाण झाली होती. पण अशा स्थितींत शत्रूचा पाठलाग करण्याचे सोडून हिंदूंनीं त्याला निसटू दिलें.[1] आणि याचा परिणाम काय झाला? तर याच महमुदानें वर्षाच्या आतच आपल्या उदार, सरल मनाच्या जीवदात्याची स्वर्गात रवानगी केली! मेवाडचा राणा कुंभ यानेंहि मेवाडचा सुलतान महमूद यास कैद करून चितोडास ठेवलें होतें; पण त्यानेंहि माडलिकत्व कबूल केल्यावर शत्रूस सोडून दिलें. तसेंच मेवाडच्या स्वारींत औरंगजेब चितोडचा राणा राजसिंह याच्या तावडींत सापडला होता. पण गोहत्त्या न करण्याचें औरंगजेबानें कबूल करताच राजसिंहानें त्याला मोकळे जाऊं दिलें! असे अनेक भोळसट औदार्याचे प्रसंग आढळतात. त्याची परंपरा थेट ब्रिटिश अमलापर्यंत लागलेली आढळते. वॉरन् हेस्टिंग्जनें काशीचा राजा चेतसिंग याला त्याच्या राहत्या वाड्यात कैद केलें तेव्हा लोकसमुदाय खवळला व त्यानीं हेस्टिंग्जच्या बंगल्याला गराडा दिला! त्यातून हेस्टिंग्जला कोणीं वाचविलें तर हिंदूंनींच. भोसल्याचे वकील वेणीराम व विश्वंभर या दोघानीं हेस्टिंग्जला वेशांतर देऊन पालखींतून त्याला गंगापार सुरक्षित पोचविलें.[2]

१. Oxford History of India p 220.

२. गो. स. सरदेसाईकृत ब्रिटिश रियासत उत्तरार्ध. पृ. १३०.

असल्या घटनेचा विचार करताना मन दिङ्मूढ होऊन जातें. पृथ्वीराजानें केलें ते बरोबर केले कीं त्याने चूक केली ? क्षत्रियाचा जो उच्चतम धर्म म्हणून तो समजत होता त्या आदर्शाप्रमाणे प्रत्यक्ष व्यवहारात वागण्यात त्याने पाप केले कीं पुण्य केले ? शरण आलेल्यास अभय देणे हा आदर्श क्षत्रियाचा परमोच्च धर्म होय ही जी शिकवण परंपरेनें त्याच्या मनावर बिंबलेली होती ती त्याने कृतींत उतरविली ही त्याची थोरवी कीं मूर्खता ? पुढील बऱ्यावाईट परिणामाविषयीं पर्वा न करिता नीतीच्या उच्च ध्येयाशीं तो एकनिष्ठ राहिला म्हणून त्याचे गुण गावे कीं अव्यवहार्य नीतितत्त्वाच्या नादीं लागून राष्ट्रघातकी व्यवहार करण्याचा भोळसटपणा केला म्हणून त्याच्या नावाने खडे फोडावे ?

एकंदर घटनेचा विचार करता या बाबतींत असे स्पष्ट म्हणावेसे वाटते कीं, पृथ्वीराजानें मानीव नीतिकल्पनाना स्वतः बळी पडून आपल्या राष्ट्राचाहि बळी दिला ! त्याने पाप केले ते जाणूनबुजून मुळींच नव्हे; उलट, त्याच्या समजुतीप्रमाणे इतकेच नव्हे, तर त्या काळच्या प्रचलित समजुतीप्रमाणेहि, त्याने नीतीचा आदर्शपाठ दिला. त्याच्या हातून चूक झाली ती त्याला उमगण्यासारखी नव्हतीच मुळीं. पण राष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना पृथ्वीराजाच्या व्यवहाराला चूक न म्हणावे तर काय म्हणावे ? पृथ्वीराजाच्या वर्तनाचा दुसराहि हेतु संभवतो. तो म्हणजे विजयी जेत्याचा दुर्दम आत्मविश्वास हा होय. एतद्विषयीं 'रजपूत राज्याचा उदय व ऱ्हास' या ग्रथात ह. वा. देशपाडे लिहितात कीं, एखाद्या मात्रिकाने विषारी सापाला सोडावें व धरावें तशीच महत्त्वाकांक्षी जेत्याची प्रवृत्ति असते (पृ. २१७). पण त्यानींच पुढे म्हटल्याप्रमाणे असला मात्रिक शेवटीं बळी पडतो आणि तो मात्रिक राष्ट्रनेता असेल तर त्याच्या पाठोपाठ राष्ट्र बळी पडतें ! शत्रूला नामोहरम करून सोडून देण्यात जेत्याच्या अहंकारदर्पाचे समाधान होत असेल, पण असला प्राणघातक खेळ राष्ट्राच्या नशिबाशीं खेळणें योग्य होईल का हाच खरा मुद्दा आहे. तत्सम उदाहरणें म्हणून नेपोलियन व शिवाजी याचा देशपाडे यांनीं निर्देश केला आहे. म्हणजे नेपोलियन व शिवाजी हे हातीं गवसले असतां त्यांना त्यांच्या शत्रूंनी ठार केलें नाहीं. मग पृथ्वीराजालाच दोष का द्यावा

असा देशपाड्याच्या विवेचनाचा रोख आहे. पण नेपोलियनला हेलना बेटात मृत्यूपर्यंत डाबून टाकलें होते आणि शिवाजी चोरावर मोर झाला नसता तर त्यालाहि कदाचित् जन्मभर बंदिवासात खितपत पडावें लागलें असते. दोन्ही उदाहरणात डिवचलेल्या सर्पाला मोकळे सोडले नाहीं हीच महत्त्वाची बाब.

पृथ्वीराजाच्या एका चुकीमुळे हिंदुपदपादशाही नष्ट झाली असे म्हणण्याचा हेतु नाहीं; तर पृथ्वीराजासारख्याच्या व्यवहारात दिसून येणाऱ्या भोळसट मनोवृत्तीकडे येथें लक्ष वेधावयाचे आहे. त्याची चूक ही कीं नीतिनियम हे एकेरी, एकातिक आहेत असे मानणे ही होय. नीतिनियम हे समाजस्थैर्याकरिता आहेत. यामुळे एकंदर स्थैर्य कशाने लाभेल याचा विचार करून सज्जन आणि दुर्जन याच्यामीं वागण्यात तरतमभाव ठेवावा लागतो. याचाच अर्थ आदर्श समाजात लागू पडणाऱ्या नीतिनियमांना आजच्या अर्धसुसस्कृत समाजाच्या व्यवहारात मुरड घालावी लागते हा होय. आणि ही मुरड घालावयाची ती नीतीचे कडक नियम व्यवहारात पाळण्याची धमक नसते म्हणून दुबळेपणावर पांघरूण घालण्याकरिता घालावयाची असेंहि नव्हे; तर ती मुरड घातली नाहीं तर नीतीचा उद्देशच नासून जातो म्हणून. पृथ्वीराजासारख्याच्या भोसळट मनोवृत्तींत हा विवेक राहत नाहीं. म्हणूनच त्याचा व्यवहार अविवेकी अथवा चूक म्हणावा लागतो.

कार्याकार्यविवेक

याचा अर्थ भारतीयानीं आपल्या शत्रूप्रमाणे नीतिमुर्दाडच बनावयास पाहिजे असा नव्हे. 'यतो धर्मस्ततो जयः' ही भारतीयांची कल्पना खोटी नाहीं. अनीतीचा अवलंब कांहीं काळ यशस्वी झाला तरी अंतीं स्वतःवर उलटल्याशिवाय राहत नाहीं. जारणमारणादि अभिचारोपाय दुसऱ्यावर करणारे अंतीं स्वतःच त्याला बळी पडत असतात. 'यतो धर्मस्ततो जयः' या तत्वाची कास धरण्यांत पृथ्वीराजाची चूक नव्हती; तर

धर्माचा अर्थच त्याला बरोबर लावता आला नाही. शरण आलेल्यास अभय द्यावे हा धर्म त्याला आठवला; पण त्याबरोबर दुसराहि एक धर्म आहे तो मात्र का आठवला नाही! जो धर्म शरणागतास अभय देण्यास सांगतो तोच धर्म आततायीला जिवंत सोडूं नये असेहि सांगतो ना!

उद्यम्य शस्त्रमायान्तं अपि वेदान्तगं रणे
निगृह्णीयात्स्वधर्मेण धर्मापेक्षी नराधिपः ॥ (शांति अ.५६)
नाततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन। (मनु ८।३५१)

अशी व्यास आणि मनु यांची वचनें आहेत. मग पहिल्या सूत्राची तेवढी आठवण व्हावी व दुसऱ्याची पार विस्मृति पडावी यावरून हेंच निष्पन्न होतें कीं धूर्त, कपटी, उरफाट्या काळजाच्या शत्रूशीं प्रसंग असता कसें वागावें यांची खरी नीति, व्यवहारकुशल नीति, मनूने उपदेशिलेली नीति, कृष्णानें प्रतिपादलेली नीति, पांडवांनीं आचरलेली नीति, याविषयीं पृथ्वीराजाच्या मनात घोटाळा उडाला होता. शुक्रनीतिसारकर्त्याने युद्धाचे धर्मयुद्ध व कूटयुद्ध असे दोन भेद करून जरूर तेव्हा कूटयुद्धाचा आश्रय रामकृष्णादिकानाही करावा लागला यांची आठवण दिली आहे. 'रामकृष्णेद्रादिदेवैः कूटमेव आहृतं पुरा'(४।७।३८६). पृथ्वीराजासारख्याना हा विवेक राहिला नाहीं. खऱ्या धार्मिक वृत्तीची जागा मोळसट बेसावधगिरीनें पटकावली. शरणार्थी व आततायी यांतील भेद ओळखणाऱ्या दृष्टीला माघ आलें. यामुळें ज्याच्याशीं झुंजावयाचें त्याना पुरून उरेल असेंच धोरण आखलें जावयास हवे होतें ते गेलें नाहीं. राक्षसतागडीच्या लढाईत ९६ वर्षांचा जख्ख म्हातारा रामदेवराव शत्रूच्या हातीं पडला तेव्हां हुसेन निजामशहानें त्याचें मुंडकें उडविण्यास कमी केलें नाहीं. आणि वर उद्गारला 'मीं तर सूड उगवला; आता अल्ला माझें काहींहि करो!'[1] असल्या उरफाट्या काळजाच्या वृत्तीच्या लोकांशीं संबंध आला असता त्यांचा प्रतिकार करावयाचा तर त्याना याद राहील अशीच कठोर वृत्ति स्वीकारली पाहिजे. शिवाजीनें हें मर्म ओळखलें होतें. स्वभावानें सहिष्णु

१. Forgotten Empire p. 205, by Sewell.

असताही पोर्तुगीजानीं हिंदूंस नाहक छळताना पाहताच जरब बसविण्याकरिता चार पोर्तुगीज पाद्र्याना कंठस्नान घालण्यास त्यानें कमी केलें नाहीं (पत्रसारसंग्रह). शिवाय फाजील औदार्याची वृत्ति पृथ्वीराजाच्या एकाच उदाहरणात आढळती तर त्याच्या विवेचनास महत्त्वच आलें नसतें. एका राजाच्या चुकीमुळे मुसलमानाचे बूड दिल्लीच्या सिंहासनावर चिकटले असे कधींच म्हणता येणार नाहीं, तर भारतीयाच्या हातून अनेक वेळा चुका घडल्या ही महत्त्वाची बाब होय.

या प्रकाराचें आणखी एक मासलेवाईक उदाहरण देऊन आटोपतों. पृथ्वीराजानें महंमद घोरीच्या बाबतींत तो हातीं सापडला असता त्याला सोडून देण्याचा जो भोंगळ उदारपणा दाखविला तसाच उदारपणा त्याच्या पूर्वी सहा शतके गुप्तसम्राटापैकीं बालादित्यानें सहाव्या शतकात (सन ५२८ मध्यें) दाखविलेला आढळून येतो. पाचव्या शतकाच्या शेवटीं व सहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत हूणानीं माळव्यात व काश्मीरमध्ये साम्राज्य थाटलें होतें. हे हूण राजे आपणास महाराजाधिराज असें म्हणवीत. या हूणापैकीं मिहिरगुल हा राजा अत्यंत राक्षसी वृत्तीचा व उरफाट्या काळजाचा म्हणून प्राचीन भारतीय इतिहासात प्रसिद्ध आहे. त्याच्या सैतानी लीलानीं संतापून अनेक हिंदु राजे एकत्र झाले व बालादित्याच्या सेनापतित्वाखालीं त्यानीं मिहिरगुलाचा सपशेल पराभव केला. पण हातीं सापडला असता त्याचा पुरा निःपात न करता बालादित्यानें त्याला सोडून दिले. पुढे तो पळून काश्मीरात गेला आणि तेथेंहि त्याला एका हिंदु राजानेंच पुन्हा आश्रय दिला. आणि या उपकाराचीं फेड मिहिरगुलानें कशी केली ! तर त्या राक्षसानें त्या उपकारकर्त्या हिंदु राजाला लवकरच स्वर्गांत रवाना केलें !

बालादित्यानें क्रूरकर्म्या मिहिरगुलाला जीवदान का व कसें दिलें याची हकीगत चिनी प्रवासी युवानच्वंग यानें दिली आहे. प्रकार असा झाला कीं बालादित्याच्या मातेला सामुद्रिकाचा छंद होता. मिहिरगुल हा मोठा देखणा आणि हुशार आहे असें तिच्या कानावर गेले होतें; तेव्हां त्याला समक्ष पाहिल्याशिवाय तिच्यानें रहावेना. समक्ष पाहिल्यावर

असला माणूस फाशी जाणार हे ऐकून ती आपल्या पुत्राला म्हणाली, 'याने पुष्कळ पातके केली आहेत हे खरे पण याच्या पापाचा घडा अद्याप भरलेला नाही. आज जर तू याला फाशी दिलेस तर बारा वर्षे त्याचा चेहरा सारखा तुला भेडसावीत राहील. त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून पाहता तो एका छोट्या प्रातांचा राजा व्हावा अशी त्याची ललाटरेषा मला सांगते. तर त्याला सोडून द्यावेस हें बरें.' मातृभक्त बालादित्याचे मन मातेच्या या उदारबुद्धीनें पाझरले. त्यानें मिहिरगुलला सोडून दिला इतकेच नव्हे तर त्याचा एका राजकन्येबरोबर विवाह करून दिला![1] पुढें या मिहिरगुलाने काय गुण उधळले ते वर सांगितलेच आहेत. चिनी प्रवाशाच्या या हकीकतींत सांगोवांगीचा भाग असणारच, पण भावार्थ खोटा मानण्याचे कारण नाही.

भाबडेपणाचा दुसऱ्या प्रकारचा एक मासला मुलतानच्या सूर्यमंदिराच्या हकीकतींत दिसून येतो. हें मंदिर बराच काल मुसलमानाच्या ताब्यात होते. हिंदु चढाई करून आले कीं मंदिरातील सूर्याची मूर्ति फोडून टाकूं असा धाक मुसलमान घालीत व हिंदु कच खात! हिंदूंच्या या भोंगळ मनोवृत्तीचे मर्म खुद्द महमदी ग्रंथकारानाही उमगून चुकले होतें. ते कसे हे समजून घ्यावयाचे असल्यास महगद गझनीचा दरबारी पंडित अल्बेरुणी याचा ग्रंथ पाहा. हिंदूंच्या नीतिमत्तेविषयी तो लिहितो कीं, "हिंदूची नीतिमत्ता ही खिस्त्याच्या नीतिमत्तेप्रमाणें सत्य आणि अहिंसा यावरच उभारलेली आहे. डाव्या गालात मारली तर उजवा गाल पुढे कर हेच त्यातील तत्त्व. खरोखर केवढी भव्य कल्पना ही! पण लोकाना हा वेदान्त कळेल तर ना! त्याना फक्त पाठीवर कोरडे ओढलेले समजतात. आणि खरें सांगावयाचें म्हणजे कॉन्स्टंटाइन या बादशहानें खिस्ती धर्म स्वीकारल्यापासून खिस्ती धर्मानें चाबूक आणि तरवारच नेहमी हातीं वागविली आहे. आणि तेंच बरोबर. कारण त्याविना राज्य करणेंच अशक्य!"[2]

---

१. Western Records Vol. I. p. 171 by Beal.

२. Al Beruni's Indica, translated by Sachau. ch 71

चाणक्यनीतीविषयीं गैरसमज

राजकारणातील मुत्सद्देगिरीला आलेल्या या मरगळीचीं पाळेमुळे फार लांबवर पोंचलेलीं आढळतात. तिचे एक महत्त्वाचे गमक म्हणजे 'अर्थशास्त्र' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता जो आर्य चाणक्य त्याने प्रतिपादिलेल्या राजनीतीबद्दल अवास्तव गैरसमज विचारवंतामध्येही पसरूं लागला होता हें होय. प्राचीन आर्यावर्तातील बुद्धिवंताची गणना करण्याचा प्रसंग आला असता त्याच्या नामावलींत ज्याचा अवश्यमेव समावेश करावा लागेल अशा तोलाचा हा बुद्धिमान् व कर्तबगार पुरुष होऊन गेला. एका उदयोन्मुख व धाडसी राजपुत्राला हाताशीं धरून नंद राजाचें समूळ उच्छेदन करणारा व त्याला अफगाणिस्तानापासून बंगालपर्यंत पसरलेले विस्तीर्ण साम्राज्य मिळवून देणारा अशा प्रकारचा कर्तृत्ववान् पुरुष जगाच्या इतिहासात अन्यत्र क्वचितच आढळेल. याच पुरुषाने राजनीतीचें विववरण करणारा 'अर्थशास्त्र' नावाचा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिलेला आहे. ह्या ग्रंथामध्ये ज्या राजाला शत्रूंचा निःपात करून सम्राट् व्हावयाचे आहे त्याने शत्रूशीं, मित्राशीं, प्रधानाशीं, आणि प्रजाजनाशीं कोणत्या धोरणाने वागावे याची अत्यंत निर्भीड आणि व्यावहारिक अशी चर्चा केली आहे. या चर्चेमध्ये अनेक ठिकाणीं राजानें अवश्य वाटल्यास कपटाचा आणि क्रौर्याचा निःशंकपणे अवलंब करावा असे प्रतिपादन केलेले आहे हे खरें; पण जग जोपर्यंत कपटाने वागत आहे तोंवर साम्राज्य वाढविण्याचा हव्यास बाळगणाऱ्या महत्त्वाकांक्षी राजानें जगाचे कपटी रूप ओळखून कपट्याचा काटा कपटानेंच काढण्यास शिकले पाहिजे अशा प्रकारची चाणक्याची भूमिका होती.

कालांतरानें चाणक्याच्या या भूमिकेविषयीं विद्वानांना आणि विचारवंतानाहि भ्रम पडली व चाणक्यनीति ही काहीं तरी अघोरी नीति आहे अशी त्यानीं आपली समजूत करून घेतली. चाणक्याच्या अर्थशास्त्र ग्रंथाची राजेलोकाच्या भोवतीं घोटाळणाऱ्या मूर्ख व तोडपुड्या लोकाकडून कशी चेष्टा केली जात असे याचे वर्णन दंडीनें आपल्या दशकुमारचरितामधील एका पात्राच्या तोंडी घातले आहे. विदर्भ देशाचा अवंतिवर्मा नांवाचा एक राजा होता. तो बुद्धीने तरतरीत होता. पण दंडनीति अथवा राज-

नीति या शास्त्राविषयीं त्याला फारसा आदर नव्हता. हें पाहून त्याचा वृद्ध अमात्य वसुरक्षित याला फार वाईट वाटे. त्यानें राजाला एके दिवशीं एकातात गाठून राजशास्त्र पढल्यानें राजाला कशी दिव्यदृष्टि प्राप्त होते हें कळकळीने समजावून सांगितलें. राजावर त्याचा परिणामहि झाला. पण विहारभद्र नावाचा एक त्याचा खुषमस्कऱ्या जवळच बसलेला होता त्याने अमात्य निघून गेल्यानंतर वृद्ध अमात्याच्या उपदेशाची व दंडनीतीची उपरोधिक भाषेंत थट्टा करण्यास आरंभ केला. हा विहारभद्र खुषमस्कऱ्याचा गाळीव नमुना असून 'बाह्यनारीपरायण' व 'पैशून्यपंडित' होता. तो कावेबाजपणाने गोड हसून म्हणाला, " महाराज, काय ऐकता या धूर्त वृद्धाचा उपदेश ? अहो, आचार्य विष्णुगुप्त चाणक्याची शट्साहस्रीसहिता पठन करून करावयाचे काय ? ती शिकून अगदीं पहिलीच गोष्ट कळणार ती हीच ना, कीं राजाने आपल्या बायकापोरावरदेखील विश्वास टाकूं नये म्हणून ? पोट्ट मरावयाचें झाले तर किती माताला किती तादूळ लागतील आणि तेवढें राधण व्हावयास इधन किती लागेल ते देखील अगदीं मोजून-मापून तोलून घ्यावें असे सागणार हे किचकट शास्त्र ! त्या शास्त्रात आखून दिलेल्या दिनचर्येप्रमाणे वागावयाचें तुम्हीं ठरविलेत तर इतके व्याप तुमच्या पाठीस लागतील कीं सूर्य उगवला केव्हा व मावळला केव्हा याचे भानहि तुम्हास राहणार नाहीं. सकाळीं उठून मुखमार्जन झाले नाहीं तोंच अध्यक्ष जमाखर्च सादर करणार तो ऐकावयाचा. त्या जमाखर्चांत चाणक्याने द्रव्यापहाराचे चाळीस प्रकार वर्णिलेले असले तर त्याचे या धूर्त अध्यक्ष किंवा कारभारी यानीं आपल्या सुपीक मेंदूंतून चाळीस हजार प्रकार केलेले असावयाचे ! दुसऱ्या प्रहरात लोकाच्या कंटाळवाण्या फिर्यादीअर्यादी ऐकावयाच्या; तिसऱ्या प्रहरात स्नान-भोजन करावयाचें ! पण त्यात अन्न विषमिश्र नाहीं ना म्हणून नेहमीं भिऊन वागावयाचें. त्यानंतर रात्रीं अगदीं उशिरा निजेपर्यंत– संध्याकाळची घटकादीड घटका काय करमणुकींत जाईल तेवढी सोडून– नानाप्रकारचीं राजकीय कारस्थाने व खलबते करण्यात वेळ घालावावयाचा; आणि नंतर निद्रासुख घ्यावयाचें. पण अनेक चिंतानीं विव्हल झालेल्या या दुर्दैवी प्राण्याला निद्रासुख तरी कुठलें लाभणार ? तेव्हा महाराज, चाणक्यशास्त्र

शिकण्याचा हा विचारच तुम्ही सोडून द्या. आणि मी म्हणतों कीं ज्याना शास्त्रकार म्हणून मान दिला जातो ते शुक्र, अंगीरस, विशालाक्ष वगैरेंनी तरी शास्त्रातल्या सर्व गोष्टी व्यवहारात उतरविल्या होत्या का ? मग यांचें शास्त्र शिकण्याचा त्रास घ्याच कशाला ! आणि महाराज, तुम्हाला काय हो कमी आहे ? हजारों हत्ती तुमच्या दारात झुलताहेत, जामदारखाना रत्नांनीं भरलेला आहे, अप्सराप्रमाणे रमणी अंतःपुरात आहेत. तेव्हा हे सर्व भोग सोडून राजनीतिशास्त्र पठन करण्याचा कसला विचार करता !" या मिष्टास भाषणाचा राजावर काय परिणाम झाला असेल हें सागावयास नकोच. राजाने तत्काल आनंदानें उठून खुषमस्कऱ्याचा हात धरून म्हटलें, "बाबा विहारभद्रा, तूच माझा खरा गुरु ! !" (द्वितीयपीठिका अष्टमोच्छ्वासः)

वरील भाषण दंडीने एका हलकट खुषमस्कऱ्याच्या तोंडीं घातलें असल्याने खुद्द दंडीला चाणक्यनीतीविषयींहि अनादर वाटत नसेलही. पण चाणक्यनीतीविषयीं विपर्यस्त ग्रह पसरूं लागले होते हें दंडीनंतर थोडक्याच कालात होऊन गेलेल्या बाणभट्ट व भवभूति याच्या उद्गारावरून स्पष्ट दिसतें. 'कादंबरी'चा कर्ता बाणभट्ट राजचरित वर्णन करिताना लिहितो कीं, 'अमानुष क्रौर्याचा उपदेश करणारें कौटिल्यशास्त्र ज्यानें प्रमाण मानले आहे अशा राजेलोकाना न्याय्य व अन्याय्य असला विचार सुचणार कोठून !'[1] बाणाच्यानंतर एका शतकानें होऊन गेलेला कविवर्य भवभूति यानेहि आपल्या 'मालतीमाधव' ह्या नाटकामध्ये 'कौटिल्याच्या नीतिशास्त्रात निष्णात असलेल्याच्या हृदयात अपत्यस्नेहाला तरी जागा कुठली सापडणार ?' असे उद्गार काढले आहेत.[2] चाणक्याला नावे ठेवीत असता लोकशाहीस विरोध व एकमुखी एकतंत्री सत्तेचे समर्थन ह्या चाणक्यशाही धोरणाचा पुरस्कार मात्र अट्टाहासाने चालू होता. बाणाच्या आणि भवभूतीच्यानंतर राजनीतिशास्त्रावर ग्रंथ होण्याचें बंद झालें असें

१. किं वा तेषां साम्प्रतं येषाम् अतिनृशंसप्रायोपदेशानिर्घृणं कौटिल्यशास्त्रं प्रमाणम् ।

२. कुतोऽपत्यस्नेहः कुटिलनयनिष्णातमनसाम् ।

ाहीं. पण चाणक्यनीति म्हणजे कुटिलनीति असें कायमचे समीकरण मात्र नून गेले. यामुळेंच बहुधा चाणक्याचा अर्थशास्त्र हा सुप्रसिद्ध ग्रंथ विचार-ताच्या अभ्यासाचा विषय न होता अनास्था आणि अज्ञान याच्या सादी-ोपऱ्यात धूळ खात पडला. चाणक्याच्या ग्रथाची व त्यातील कुटिल ोतीची निंदा होऊं लागली म्हणून राजेलोक मोठे उदार महात्मे किंवा ार्मिक बनले अशातला मुळींच भाग नाहीं. त्याच्या मैतानी लीला मागे आसुरी भारत' या महाव्या प्रकरणात वर्णिल्याच आहेत. स्वतःच्या ालासी वृत्तीचे चोजले पुरविण्याकरिता क्रौर्याचा अंगीकार करण्याची ाना दिकत वाटत नव्हती. पण **राजव्यवहारांत आततायी शत्रूशीं ुजतांना क्वचित् अपरिहार्य ठरणाऱ्या व अवश्य असणाऱ्या क्रूर.-ाराच्या पाठीमागचें तत्त्वज्ञान मात्र चाणक्याच्या ग्रंथाबरोबरच ोपलें होतें.**

चाणक्याचा मूळ अर्थशास्त्र ग्रथ जो लक्षपूर्वक वाचील त्याच्या मनात ाणक्याचें तत्त्वज्ञान हे क्रौर्याकरिता क्रौर्य या तत्त्वावर अधिष्ठित झालेले ासून, ज्याला राज्य करावयाचें आहे, अफाट जनसमुदायावर सत्ता चाल-ावयाची आहे, त्याला क्रौर्याचा अवलंब करणे कित्येक प्रसंगी आवश्यक रतें असें प्रतिपादन करणारें आहे याविषयीं शका राहणार नाहीं. राज्य-कारभार हाकावयाचा तो अन्यायाने, जुलमानें, क्रौर्याने, कपटानें हाकावा असा उपदेश चाणक्याने केलेला नाहीं. राज्यशास्त्राचे मुख्य सूत्र म्हणजे सदा-चार आणि न्याय असेंच चाणक्यहि मानतो. पण जगात दुष्टपणा जोवर रलेला आहे तोवर त्या दुष्टपणाचा प्रतिकार करताना क्रौर्याचा व कपटाचा अवलंब करावा लागला तर राजाने कचरून उपयोगी नाहीं अशी ाणक्याची शिकवण आहे शासनकर्ता हा नेहमीं बलिष्ठ व समर्थच असला पाहिजे. आपले सामर्थ्य व बल कोणत्याहि कारणाने क्षीण होणार नाहीं याविषयीं त्यानें नेहमी दक्ष असले पाहिजे. ते सामर्थ्य टिकविण्या-करितां व वाढविण्याकरिता प्रसंगविशेषीं क्रूर व अन्याय्य अशा उपा-यांची योजना करावी लागली तर अशा वेळीं असले उपाय योजणें हें त्ताधीशाचें एक कटु पण आवश्यक कर्तव्य होय असे मानून, त्या उपा-

याची योग्य वेळीं योजना केली पाहिजे. 'कोपसंग्रह' या अध्यायात अर्थ-ग्रहाचे कांहीं जुलमी व कपटी उपाय सांगितले आहेत: पण ते राजद्रोही व अधार्मिक याच्या बाबतींतच वापरावे हें सांगण्यास चाणक्य विसरलेला नाहीं हें मागे येऊन गेलेच आहे (पृ. ९२). शिवाय असले उपाय आपत्कालीं आणि अपरिहार्य ठरतील तेव्हाच योजावयाचे असतात हें सांगण्यासही चाणक्य विसरलेला नाहीं. एरवीं राज्यकारभाराचें नेहमींचे धोरण सत्य व न्याय्य अशा तत्त्वावरच अधिष्ठित असलें पाहिजे असेंच त्याने प्रतिपादन केलें आहे. विस्तारभयास्तव त्याचा प्रपंच न करता त्याच्या ग्रथातील 'विद्याविनीतो राजा हि प्रजाना विनये रतः। अनन्या पृथिवीं भुङ्क्ते सर्वभूतहिते रतः'॥ (अध्याय ५) येवढाच श्लोक उद्धृत करतों.

चाणक्याचा पाश्चात्य अवतार

आर्य चाणक्याची १६ व्या शतकातील युरोपमधील सुप्रसिद्ध इटॅलियन मुत्सद्दी मॅकिआव्हेली ह्याच्याशीं नेहमीं तुलना करण्यात येते. या मुत्सद्द्याला हि चाणक्याप्रमाणेंच कुटिलनीतिप्रवीण म्हणून मानण्यात येतें. शेक्सपिअरने आपल्या 'महावा हेन्री' या नावाच्या नाटकामध्ये मॅकिआव्हेली याचा उल्लेख केला आहे तो खुनी मॅकिआव्हेली म्हणूनच केला आहे. या दोन्हीहि मुत्सद्द्याच्या तत्त्वज्ञानाविषयीं युरोपात व हिंदुस्थानात सारखाच अवास्तव गैरसमज पसरलेला आहे. चाणक्याप्रमाणेंच मॅकिआव्हेलीनेहि आपला राजनीतीवरचा ग्रंथ लिहिला तो राजनीतीचा साक्षात् व्यावहारिक अनुभव घेऊनच. फ्लोरेन्स येथील लोकशाही राज्यात चौदा वर्षे तो मोठ्या हुद्द्यावर होता. या अवधींत परकीय दरबारशीं होणारा सर्व पत्रव्यवहार व तहनामे याचे मसुदे लिहिणे वगैरे कामे त्याच्याकडे असत. उतारवयात त्याला आपल्या नोकरीला मुकावे लागलें, आणि नतरच त्याने आपला सुप्रसिद्ध 'प्रिन्स' नावाचा ग्रथ लिहिला. ह्या ग्रंथामध्यें क्रौर्य आणि कपट याचा अनेक ठिकाणीं उघडपणें पुरस्कार केलेला आहे. पण त्याच्या पाठीशीं असलेलें तत्त्वज्ञान समजून घेतलें पाहिजे.

चुकीच्या युद्धनीतीचा अवलंब केल्यामुळें इटली देशाची कशी दुर्दशा

झाली याचे बाराव्या प्रकरणात मॅकिआव्हेलीने वर्णन केलेलें आहे तें मार्मिक आहे. रोमन साम्राज्य लयाला गेल्यानंतर इटलीमध्यें अनेक छोट्या संस्थानाचें राज्य सुरू झालें होते. हीं बहुतेक संस्थाने प्रजासत्ताक पद्धतीचीं होतीं. पूर्वीचे सरदार जुलूम करीत म्हणून त्याची सत्ता मोडून काढून लोकानीं लोकशाही स्थापन केली होती. असे करण्यात त्याना धर्मगुरु पोप याची आतून फूसहि असे. यामुळे पोपच्या धार्मिक मताची छाप जनतेवर फार दाट पडलेली होती. या अमदानींत राज्यकारभारातील डावपेचाऐवजीं दया आणि धर्म याचेच स्तोम माजविण्यास सुरुवात झाली. याचा परिणाम असा झाला कीं, परकीयाच्या स्वाऱ्यापुढें इटलीचे सैन्य निष्प्रभ ठरले. या प्रकाराविषयीं मॅकिआव्हेली लिहितो, "रणागणावर सेनापति मुख्य चिंता वाहत ती म्हणजे आपल्या सैनिकाना कमींत कमी उपसर्ग कसा पोंचेल याविषयींची. शत्रूचे सैनिक तावडींत सापडले तरी ते त्याना सोडून देत. त्याबद्दल खंडणीहि घेत नसत. एखाद्या शहराला वेढा घातला तरी रात्रीं-अपरात्रीं छापा घालणे हे ते पाप समजत. आणि हिंवाळा सुरू होऊन कडाक्याचो थंडी पडूं लागली कीं तडक राजधानीला परत येत. ही लढाईची शिस्त ! आणि हेतु काय ? तर गरीब सैनिकाना तकलीफ पडूं नये हा होय. या सर्वांचा परिणाम शेवटीं व्हावयाचा तोच झाला. तो हाच कीं, इटलीच्या पायात दास्याच्या शृंखला पडल्या आणि सगळीकडे तिचें नाव बद्दू झाले !" (प्रकरण १२). राजाने प्रसंगविशेषीं कपटाचा आश्रय करावा असे जे प्रतिपादन केले आहे त्याचा खुलासा मॅकिआव्हेलीने स्वतः पंधराव्या प्रकरणात केला आहे तो विशेष मनन करण्यासारखा आहे. तो लिहितो, "राजाने आपल्या इष्टमित्राशीं व प्रजेशीं कशा प्रकारें वागावें या विषयावर पुष्कळानीं लिहिलेलें आहे. पण माझीं या बाबतींतील मते थोडीशीं निराळीं आहेत. ज्यानीं या विषयावर आजवर लिहिले आहे त्यानीं राजा हा कल्पित आदर्श सृष्टींत वावरतो आहे असें गृहीत धरून लिहिलें आहे. पण मी लिहिणार आहें तें आजच्या आपल्याभोंवतीं पसरलेल्या लौकिक व सत्यसृष्टींतील राजाविषयीं. लोकाचे आचार-विचार कसे असावेत आणि व्यवहारात ते प्रत्यक्ष कसे असतात यामध्यें जमीन अस्मानाचा फरक असूं शकतो. आणि ह्या अंतराकडे जो भोळसटपणानें डोळे-

झाक करील तो आपल्या नाशास मात्र कारणीभूत होईल. अंवतींमंवतीं सर्वत्र कापट्य व क्रौर्य पसरले असता एखाद्यानें हळवेपणाने जगात वागायचे ठरविलें तर त्याला अनुभव येईल तो कटु कडवट असाच येईल. म्हणून ज्ञाण्या राजाने काळ, वेळ, परिस्थिति पाहून मार्दव आणि काठिण्य या दोन्हींचाहि जरूर पडेल तसा उपयोग केला पाहिजे ''

चाणक्याच्या अर्थशास्त्रातील मुख्य सूत्रहि वरीलप्रमाणेच होय. चाणक्याने आपला ग्रंथ लिहिला तो काहीं एखाद्या काल्पनिक आदर्श परिस्थितीतील राजाच्या उपयोगीं पडावा म्हणून नव्हे, तर अनेक दुर्गुणानीं भरलेल्या व्यावहारिक सृष्टीमध्यें वावरणाऱ्या राजाच्या उपयोगीं पडावा म्हणून. आणि या व्यावहारिक जगात वागावयाचें म्हणजे सत्ताधीशाला क्रौर्य व कापट्य याचा उपयोग न करणें अपरिहार्य होते. सर्व जनतेची नीतिमत्ताच जेव्हा उच्च दर्जाची होईल तेव्हा असल्या उपायाचा अवलंब करण्याचे कारण उरणार नाहीं. पण दुष्टपणा, क्रौर्य, विश्वासघात हे दुर्गुण समाजात जोवर उघड माथ्यानें वावरत आहेत तोवर शासनकर्त्यानें पढिक नीतिनियमाचा जप करीत भोळसटपणानें वागणे हें अतीं घातक ठरेल. चाणक्याने अभिचाराचे आणि क्रूराचाराचे जे अनेक प्रयोग सांगितले आहेत ते या प्रयोगाचा विनियोग राज ने हवा तेव्हा करावा या भावनेने नव्हे तर आपत्प्रसगीं व शत्रूने असे प्रयोग केले असता आपल्याला ते उलटविता यावेत म्हणून. ज्याला राज्य करावयाचें आहे त्यानें जगातील सर्व सुष्टदुष्ट प्रकार नीट समजावून घेतले पाहिजेत. जरूर पडल्यास काट्याने काटा काढण्याची किंवा चाणक्याने व महाभारतकाराने योजलेली उपमा द्यावयाची तर एका बेलफळानें दुसरें बेलफळ फोडण्याची जागरूकता राखली पाहिजे यावर चाणक्याचा मुख्य कटाक्ष आहे. सहिष्णुवृत्तीचीं मागें उदाहरणे दिलीं आहेत तीं गुणदर्शक म्हणून. पण कार्याकार्यविवेकाच्या अभावीं तो गुण नासून त्याचा दोष बनतो हेहि सागणे येथे अवश्य आहे. मनूने हा कार्याकार्यविवेक स्पष्ट सांगितला आहे. 'स्वराष्ट्रे न्यायवृत्तः स्यात् उग्रदण्डः तु शत्रुषु' (७।३२). उग्रकर्म्या मुसलमानाशीं संबंध आला असता हा विवेक जागृत व्हावयास हवा होता. पण झाला नाहीं. मुसलमान हिंदूंचीं देवळें फोडीत होते, बाटवीत होते, गुलाम म्हणून विकीत होते; तरीही हिंदु राजे मुसल-

मानाच्या मशिदींचा उरुटा उद्धार करीत होते. राष्ट्रकूट व चालुक्य या दोन्ही राजवटींत मुसलमानाना सवलतीच मिळत होत्या. अनहिलपट्टणच्या राजा जयसिंगानें कॅबेच्या मुसलमानांनी आपल्या मशिदीची नासधूस झाली म्हणून तक्रार केली तेव्हा हिंदूंना व पारशाना दंड करून मशिदींच्या पुनरुद्धाराकरिता लाख बलोत्रे देऊं केले.[1]

घरबुडवी मनोवृत्ति

परकीयांशीं वागताना चुकींच्या नीतिविषयक कल्पनेच्या जाडीला आपसातील फूट व सामान्य जनतेतील राजकारणाविषयींचे औदासीन्य हीं भरीस भर म्हणून नादत होतीं.

पेशवाईच्या शेवटच्या काळात राघोबादादा व शिंदे-होळकरादि सरदार एकमेकाशी कसे लढले आणि परक्यांना त्यानीं स्वतःच्या घरात कसें शिरू दिले हा इतिहास सुप्रसिद्ध आहे. इतिहासाचा प्राचीन चित्रपट अवलोकन करू लागले तर या परधार्जिणेपणाचे, अंतः-कलहाचे आणि यादवीचे मासले फार प्राचीन कालापासून दिसून येतील. प्राचीन इतिहासातील शिकंदराची स्वारी ही आर्यांची येथील स्थिरस्थावर झाल्यावर परकीयानीं हिंदुस्थानच्या दरवाजावर मारलेली महत्त्वाची थाप होय. या प्रसगीं पोरस-शिकंदराचा जो सामना झाला त्यात इतिहास सागतो की, तक्षशिलेचा राजपुत्र अभी हा शिकंदराच्या बाजूने आपलाच देशबंधु जो पोरस त्याच्याविरुद्ध लढला. यानतर शका-च्या स्वाऱ्या झाल्या. त्यात मिॅनँडर राजाला येथील बौद्धधर्मीयाची मदत झाली असावी. मिॅनँडरने बौद्धधर्म स्वीकारला आणि बौद्धानीं त्याला मिलिंद बनवून त्याची परकी कुळी विसरून बौद्धधर्माचा आधारस्तंभ म्हणून त्याचा जयजयकार केला. बौद्धाची आणि वैदिकाची जी स्पर्धा कित्येक शतके चालू होती त्यात बौद्धानीं परकीय चिन्याची मदत घेतली असावी असे अनुमान भविष्यपुराणातील काहीं श्लोकावरून निघण्यासारखे आहे. त्या पुराणात वर्णन केले आहे कीं, बौद्धलोक चीन देशात गेले

१. Rastrakutas and Their Times p. 277 by A. S. Altekar.

(चीनदेशमुपागम्य युद्धभूमिमकारयत्); आणि तेथील राजाच्या साहाय्यानें त्यानीं हाहा नावाच्या नदीच्या तीरावर आर्य लोकाशीं मोठे युद्ध केलें. पण त्यात त्याना असा मार खावा लागला, कीं पुन्हा म्हणून आर्य राष्ट्राच्या भानगडींत पडावयाचे नाहीं अशी त्यानीं शपथ घेतली. "सर्वैश्च बौद्धवृन्दैश्च तत्रैव शपथ कृतम् । आर्यदेश न यास्यामः कदाचित् राष्ट्रहेतवे ।" (सावरकर–हिंदुत्व पृ.२४).

लहानमोठीं राज्यें देशभर पसरलेलीं असून त्याच्यात परस्परआक्रमण-विषयक युद्धें नेहमीं चालू असत; पण ते स्वाभाविक असून हिंदुस्थान-सारख्या खंडतुल्य देशात तो दोष म्हणता येणार नाहीं. मात्र परकीयाच्या आक्रमणप्रसंगीहि यादवी विसरली जात नसे हा दोष होय. राजकीय दृष्ट्या या सर्वांचा एक गट नसला तरी सास्कृतिक दृष्ट्या सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेला अफाट देश हा एकराष्ट्र होय ही भावना उत्पन्न झालेली नव्हती असेंहि नव्हे. असे असताहि, म्हणजे ही सास्कृतिक एकत्वाची भावना दृढ-मूल झालेली असूनहि, परकीयाचा हल्ला आला असता आपापसातील राज-कीय चुरस विसरून परक्यास एकजुटीने तोड देण्याची भावना मात्र उदित झाली नाहीं. इतकेच नव्हे तर परक्याना साहाय्य करण्याची खंत बाळगली गेली नाहीं हें आश्चर्य होय ! परकीयाच्या स्वाऱ्या अनेक प्रतापी सम्राटानीं परतवून लावल्या. पण असा पराक्रमी सम्राट् गाजत नसेल तेव्हा अनेक लहान राजानीं एकत्र जूट केल्याचे उदाहरण महमद गझनीच्या विरुद्ध चंदेलच्या गंड राजाच्या झेड्याखालीं एकत्र होण्याचे मागें पृ. ३१७ वर दिलें आहे त्यासारखें क्वचितच आढळते. आढळतो तो उलटाच प्रकार. म्हणजे हिंदूनें हिंदूच्याविरुद्ध परक्याच्या बाजूनें लढण्याचा ! इ. स.७१२ मध्यें सिंधप्रात काबीज केला गेला तो फंदफितुरीच्या जोरावरच. कासीमचें सैन्य सिंधूच्या परतीरावर आलें तेव्हा ती अफाट नदी उतरून पैलतीरीं कसें जावयाचें हीच त्याला आधीं चिंता पडली. पण त्याची चिंता हरण कोणीं केली ? तर एका हिंदू जहागिरदारानेंच ! सिंधूच्या पात्रात एक लहानसें बेट असून त्यावरील अधिकारी कोणी मोक्वा बसैया नावाचा होता. याचें आणि सिंधचा राजा दाहर याचें बरें नव्हतें. कासीमला हे मोठेंच घबाड सापडलें. त्यानें मोक्वाला त्या बेटाचा राजा करण्याचें लिहून दिलें मात्र,

तींच मोक्वाने स्वतः होड्या, वाटाड्ये वगैरे पटवून कासीमला आपल्या घरात घेतलें. दाहरचा पराभव झाला हें सांगावयास नकोच. पुढेंहि आरब वगैरेसारख्या परकीयांनीं स्वाऱ्या केल्या तेव्हाहि मोक्वानें त्यांना उत्साहानें साहाय्य करून परधार्जिणेपणाचा मोका वाया जाऊं दिला नाहीं. नवव्या शतकात उत्तरेस प्रतिहार आणि दक्षिणेस राष्ट्रकूट अशीं दोन बलाढ्य राज्यें होतीं. उत्तरेच्या प्रतिहाराचा दरारा एवढा होता कीं, मुलतानचे मुसलमानी राजे त्याचे माडलिक बनले होते. पण प्रतिहारी आणि राष्ट्रकूट यांचें बिनसलें तेव्हा मुसलमान स्वतंत्र होऊ पाहूं लागले असता राष्ट्रकूटाची त्यांना सहानुभूति मिळाली आणि प्रातिहाराच्या शत्रूचा धर्म म्हणून इस्लामी धर्मास राष्ट्रकूटाच्या दरबारीं मान मिळूं लागला. इस्लामी इतिहासकार मसूदी सांगतो कीं राष्ट्रकूटाच्या बल्लहरा (वल्लभराज) राजानें इस्लामचा मान जितका राखला तितका दुसरा कोणींच नाहीं.[1] पृथ्वीराजानें महमद घोरीला चारी मुंड्या चीत करून हाकून लावला असता पुन्हा बारा वर्षांनीं त्यानें स्वारी करण्याची उमेद बाळगली तीहि घरभेद्याच्या साहाय्यानेंच. या वेळीं पंजाबचे चाहमान आणि मथुरेचे गहडवाल यांचें काहीं कारणानें बिनसलें, आणि अविवेकी जयचंद गहडवाल यानें महमद घोर यास स्वारी करण्याविषयीं गुप्तपणे निरोप पाठविला. महमद खिलजीने विक्रमशिला येथील विद्यालय बेचिराख केलें त्या वेळीं त्याला विद्यालयाची माहिती पुरविण्याचे काम बौद्ध भिक्षूंनींच केले असें बौद्ध इतिहासकार तारानाथ म्हणतो.

परधार्जिणी राजनिष्ठा !

मुसलमानाचे राज्य येथें स्थिर झाल्यावर राजकीय दृष्टीला अधिकच मांद्य येत चाललें. पातशाहीपद हें मोंगलांचेंच असें मानण्याइतकी विवेकास घरंगळती लागली. शिवाजीच्या दृष्टीवर तें झापड पडूं शकले नाहीं यातच शिवाजीचें अलौकिकत्व आहे. पण त्याच्याच घराण्याच्या दुसऱ्या शाखेचा म्हणजे मुधोळच्या घोरपड्याचा इतिहास उघडून पाहा म्हणजे अगदीं निराळें चित्र दिसेल. भोसले-घोरपडे घराण्याचा मूळपुरुष सुजनसिंह हा

१. Elliot p. 42.

दक्षिणेंत आला तोच मुळीं अशा कल्पनेनें कीं मुसलमानाचें राज्य झालें तें ईशसंकल्पानुसारच झाले; त्याविरुद्ध लढणें हे देवाशीं लढण्यासारखें असून अन्यत्र पळून जाणें हाच योग्य मार्ग! पळून दक्षिणेंत आला तोहि स्वतंत्र राज्य कमविण्याकरिता नव्हे तर जो पदरीं ठेवील त्याच्या चरणीं तरवार अर्पण करण्याकरिता. दक्षिणेंतील मुसलमानाचें बहामनी राज्य मरमराटीस आलें ते अशा शूर हिंदु तरवारबहादराच्या जोरावरच. **त्यांच्यांत शौर्य पूर्वीसारखेच धगधगत होतें पण स्वत्वाची जाणीव नष्ट झाली होती.** शिवाजीचे वडील शहाजी राजे माडीधर इस्लामी बालराजा घेऊन सिंहासनावर बसावे येवढ्या तोलाचे सत्ताधीश होते पण त्या सिंहासनावर स्वतः बसावें ही धाडसी कल्पना त्यांना पचविता आली नाहीं. खुद्द सुजनसिंहाच्या वंशजांनीं निधड्या छातीनें व शूरपणाने लढण्याची परंपरा अखंड चालविली व अनेक वेळा आपल्या धन्याचें प्राणरक्षण केले. पण तो धनी परका! शौर्य गाजवावयाचे म्हणजे शौर्याकरिता शौर्य अशा बाण्यानें गाजवावयाचें. कशाकरिता आणि कोणाकरिता याचा विचारच नाहीं. लढाईंच्या पद्धतीतहि असाच एककल्लीपणा. घोरपड्याच्या युद्धपद्धतीविषयीं मुधोळच्या बखरकारानें लिहिले आहे कीं, "या लोकाचा संप्रदाय असा आहे कीं तरवार, खंजीर हींच आयुधे फक्त वापरावयाचीं. याशिवाय अग्निवर्षाव करणाऱ्या दुसऱ्या आयुधाना हात लावावयाचा नाहीं! बाणानीं आणि बंदुकानीं शत्रूचा नाश करणे हें मर्दाचें काम नाहीं असें हे लोक समजत!" एवढ्या शौर्याला स्वत्वाची भूल पडावी यापरतें मनोव्यामोहाचे अधिक शोचनीय उदाहरण कोणतें सापडणार? शिवाजीनें आपल्या स्वातंत्र्ययुद्धास हातभार लावण्याबद्दल घोरपड्याना विनंति केली तेव्हा घोरपड्यानीं विजापूरकराशीं असलेल्या स्वामिनिष्ठेची सबब सांगितली! पण एक मुसलमान धनी सोडून दुसरा मुसलमान धनी स्वीकारताना मात्र स्वामिनिष्ठा आडवी येत नसे बहामनी राज्य ढासळूं लागल्यावर या घोरपड्यानीं विजापूरचा आश्रय केला तेव्हा मात्र बहामनीशीं असलेली स्वामिनिष्ठा त्यांना गुंडाळून ठेवता आली. बरोबरच आहे. दुसरा धनी तरी परकीयच ना? कोणीकडून कोणा तरी परकीयाशीं स्वामिनिष्ठ असलें म्हणजे झाले! या खुळचट कल्पनेनें याच घोरपड्यानीं

मुसलमानाच्या सांगण्यावरून शहाजीला कैद केलें व शिवाजीविरुद्ध विजापूरकरांशीं स्वामिनिष्ठा जागविली. खुद्द शहाजीही विजयनगरच्या हिंदु राजाविरुद्ध विजापूरच्या इस्लामी राजाच्या वतीने लढला होताच ! यावरून शिवाजीच्या मावळ्यांच्या भावनाशेजारी त्याच काळीं इतरांच्या मनात कसल्या भावना नांदत होत्या याची कल्पना येते.

देशद्रोही व्यापारी

आणि या भावना शिवाजीच्या वेळेपर्यंतच होत्या असेंहि नाहीं. शिवाजीच्या वेळीं स्वातंत्र्याचे रोपटें नुकते कोठे दिसूं लागलें होतें. तें वाढेल, मोठें होईल याची खात्री नव्हती. पण पुढे पेशवाईंत त्याचा वटवृक्ष बनल्यावरही परधार्जिणेपणाची भावना नष्ट झाली नाही, देशप्रेमाची भावना रुजली नाहीं आणि राष्ट्राचे आणि संस्कृतीचे नष्टचर्य संपले नाहीं. यामुळेच मुसलमानी आक्रमणाप्रमाणेंच इंग्रजांच्या आक्रमणासही बळी पडावे लागले. ब्रिटिशांचा चंचुप्रवेश पेशवे दरबारात राघोबाने आपल्या हाताने कसा करून दिला हे सर्वश्रुतच आहे. दुसरा प्रकार व्यापाऱ्यांचा. यांच्या फितुरीचा प्रकार हा तर अधिक उद्वेग आणणारा आहे. राघोबा हा वैयक्तिक स्वार्थाकरिता उघड उघड लढत होता. पण पुढे उल्लेखिलेल्या व्यापाऱ्यांनीं घरबुडवेपणाचे जे धोरण स्वीकारलें त्यात वैयक्तिक स्वार्थ तर होताच पण या स्वार्थाच्या सांगाती विकृत धर्ममावना व विकृत सामाजिक तत्त्वज्ञान होतें हे विशेष. ज्या व्यापाऱ्यांच्या देशद्रोही कारवाया पाहून हे विचार सुचतात ते व्यापारी म्हणजे गुप्त नांवाचे पेढीवाले होत. गुप्तांचें घराणे अत्यंत धनाढ्य असून त्यांच्या पेढ्या सर्व हिंदुस्थानभर इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या बाहेर काबूल, कंदाहार येथेंहि होत्या. अबूच्या पहाडावरील एकजात संगमरवरी जैन मंदिरे तुम्हीं पाहिलीं आहेत काय ? त्यातील कलाकुसरीला तोड नाहीं. सर्व मंदिरें कलाकुसरीच्या शिल्पानीं डंवरून गेलीं आहेत. हीं मंदिरें याच पेढीवाल्यापैकीं विमलशहा यानें बांधलीं व त्याच्या पायीं दहा कोटींवर खर्च केला ! तीं मंदिरें अवलोकीत असता व त्यावरील झालेल्या अवाढव्य खर्चाचें मनन करीत असतां या गुप्त पेढीवाल्यांच्या उमाप दातृत्वाविषयीं तुम्हाला केवढा आदर

वाटेल ! आणि केवळ दातृत्व व धार्मिक भावना येवढींच लक्षात घेतली तर तो तुमचा आदर अनाठायीं आहे, असेहि म्हणता येणार नाहीं. पण या औदार्याची दुसरी बाजू मीं तुम्हास दाखविली म्हणजे मात्र तुम्हास धक्का बसेल. अधिक पाल्हाळ न करिता एकदमच सांगून टाकतों कीं या गुप्त पेढीवाल्यानीं ही जी कुबेरसंपत्ति जोडली ती आपला मायदेश परकीय ब्रिटिशाच्या घशात घालण्यास हरतऱ्हेची मदत करून ! आणि या शौर्याचा स्फोट कसा झाला ? तर गुप्ताच्या या आपल्या दृष्टीने देशद्रोही पण ब्रिटिशाच्या दृष्टीने इमानी अशा कामगिरीबद्दल ब्रिटिश अंमलदारानीं वेळोवेळीं दिलेल्या शिफारसपत्राच्या नकला सापडल्या म्हणून. या नकला जैन मंदिराबाबत सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे केलेल्या छापील अर्जात समाविष्ट केल्या होत्या. हीं छापील चोपडीं दैवयोगाने गुजराथसाहित्यसमेचे एक सभासद डाह्याभाई पटेल याच्या हातीं पडलीं व तीं त्यानीं समेतर्फे 'युगधर्म' मासिकात छापून काढलीं. मराठींत तीं आणण्याचे श्रेय प्रा. त्र्यं. श. शेजवलकर याचें आहे. गुजराथसाहित्यसमेचे चिटणीस प्रीतमराव देसाई याच्याकडून शेजवलकरानीं वरील इंग्रजी शिफारसपत्रांची एक टाइप केलेली नकल मिळविली व भारतइतिहाससंशोधक मंडळाच्या त्रैमासिकाच्या सहाव्या वर्षीच्या अंकात त्या शिफारसपत्रातील तेरा पत्राचे मराठी अनुवाद व आनुषंगिक अवश्य ती सर्व माहिती प्रसिद्ध केली. त्या शिफारसपत्रातील काहीं वाक्ये आपणापुढें मांडतो म्हणजे इंग्रजांच्या आक्रमण-काळीं आपलें धर्मकारण व राजकारण हीं दोन्ही कशीं विकृत झालीं होतीं हें सुस्पष्ट होईल.

हीं शिफारसपत्रे ब्रिटिश साम्राज्यसंस्थापक क्लाइव्हपासून तों कॅनिंगपर्यंतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानीं दिलेलीं आहेत. १७५७ मधील पहिल्या पत्रात क्लाइव्ह लिहितो कीं, " ही सनद अत्यंत अडचणीच्या वेळीं अत्यंत प्रशंसनीय मदत केल्याबद्दल देण्यांत येत आहे. गुप्ताच्या मदती-शिवाय आमचे राज्य दक्षिणहिंदुस्थानात वाढूं शकलें नसतें. यांची कामगिरी पूर्णपणें येथें सांगणें शक्य नाहीं. पण इतकें सांगतों कीं त्यांचे

आम्हावर महदुपकार आहेत." पढें १७६५ मध्यें क्लाइव्ह लिहितो, "हें शिफारसपत्र देण्यापूर्वी आपल्या घराण्यांतील थोर पुरुष माझे मित्र व विश्वासू सल्लागार कुवरजी याच्या मृत्यूबद्दल खेद नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों. आपण आपल्या पेढ्या आमच्या व परक्यांच्या राज्यांत स्थापून व्यापाराच्या निमित्त परक्यांच्या स्वाऱ्या, कारस्थानें वगैरेंची गुप्त बातमी पुरवण्याचें ठरविलें आहे ही फार उत्तम कामगिरी बजावीत आहात. आपल्या धर्मांत इंग्रजांनीं कधींही हात घालूं नये या तुमच्या मागणीबद्दल मी मोकळेपणाने येवढेंच इच्छितों कीं ते अशी गोष्ट कधींच करणार नाहींत. शेवटीं येवढेंच सागतों कीं तुम्हीं अर्काटमध्यें जी मदत केलीत ती मी कधींच विसरणार नाहीं." नतर १८०५ सालीं जनरल लेक लिहितो, "याच्याच तत्परतेनें केलेल्या मदतीमुळें उत्तर हिंदुस्थानात आमचे वर्चस्व स्थापन झालें. ब्रिटिशाच्या हितास आवश्यक अशी कोणतीही बातमी मोठ्या प्रयासाने काढण्यात हे तत्पर असत. याच्या कुटुंबास उच्च दर्जास चढविणें हें सर्व ब्रिटिश अधिकाऱ्याचें कर्तव्य आहे." याच सुरात पुढें वेळोवेळीं केलेल्या बहुमोल साहाय्याबद्दल निरनिराळे अधिकारी लिहितात, 'ग्वाल्हेरचा किल्ला डोंगराच्या टोकावर उंच व जवळ जवळ अभेद्य होता. आमच्या कार्यांत महाराजाधिराज सवाई शिकंदर सरूपचंद गुप्ताचें कळकळीचें साहाय्य नसतें तर किल्ला कोणत्याही उपायानें सर करता येता ना. किल्ल्यावर जाण्यास एकच चोरवाट होती. ती अत्यंत प्रयासानें समजून घेऊन आम्हास कळविल्यामुळें आम्हीं विनाश्रम किल्ला ताब्यात घेतला.' "स्वतःचे माणूस बळी देऊन कोंड्यावरच्या मोहिमेत चंबळा उतरून जाण्यास यांनीं फार साहाय्य केलें." "नेपाळच्या युद्धात आपण केलेलें साहाय्य व उपकार असंख्य आहेत." "पुण्याच्या युद्धात आपण एक महत्त्वाची गुप्त बातमी इतक्या वेळेवर दिलीत कीं ती न मिळती तर आम्हास जय मिळविण्यास फार काळ व सायास पडते." "सरूपचंद गुप्त याचे वशज हे काबूल, कंदाहार, समरकंद, हिरात इत्यादि ठिकाणीं डोळ्यांत तेल घालून नजर ठेवून सर्व माहिती कळवितात. लढाया, तह व लष्करी व्यवस्था हीं सर्व त्यांच्या माहितीवरच

अवलंबून असल्यानें सरकार त्याचें बहुत ऋणी आहे. त्याच्या सेवेचे योग्य बक्षीस त्याच्या धर्माची व कुटुंबाच्या मानाची योग्य व्यवस्था सरकारनें करावी यातच आहे." शेवटीं १८४४ मध्यें लॉर्ड एलन्बरो लिहितो, "तुम्ही मराठे, जाठ वगैरे युद्धात सैन्यास मुख्य असलेली जी पैशाची मदत ती इतक्या सढळ हातानें केलीत कीं आपला सराफीचा धंदा चांगला चालावा यावद्दल सरकार बांधलेले आहे." असो. येवढे त्रोटक उल्लेख पुरे आहेत. त्यावरून व्यापाराच्या दृष्टीनें स्वकीयाच्या राजवटीपेक्षा परक्या इंग्रजाची राजवट व्यापाऱ्याना अधिक सुरक्षित वाटत होती हे जसे स्पष्ट होतें तसे परके हे धर्मांत हात घालणार नसल्यास त्याच्याशीं फितुर होण्यात आपण काही पाप करीत आहो याची या व्यापाऱ्याना जाणीव कशी नव्हती हेंही दिसून येतें. धार्मिक व सामाजिक कर्तव्याच्या भावनेला यापेक्षा अधिक विकृत स्वरूप ते काय यावयाचें ? [1]

पाश्चात्याचे आक्रमणशील स्वरूप पेशवाईत व त्याच्या पूर्वीहि उमगलें नव्हतें असे नव्हे. १७८० सालीं पुरुषोत्तम महादेव हा पाटीलबुवास लिहितो–"पत्रीं आज्ञा कीं इंग्रेज बलवान नजीबखान यानीं होऊ न द्यावें. वजीर सुजाय उदौला याचे घरात पाय इंग्रजाचा शिरला अमता सारेच हाताखालीं घातलें हे त्यास न समजलेंसे नाहीं." (इतिहाससंग्रह). अर्थात् काबा ओळखला नव्हता असे नव्हे. आनंदीबाईनेंहि हा काबा ओळखला होता. १७७८सालीं सखाराम भगवंत यास धाडलेल्या पत्रात ती लिहितेः "हल्लीं इंग्रज घरात येऊं पाहतात. सुजादौले व महमद अल्ली याच्या घरातून प्रथम नम्रतेनें पायरव करून घेतली आणि आता सर्व दौलतीचे धनी जाहले आहेत. तसेंच आमच्या घरात होईल. म्हातारपणीं इंग्रजाच्या घरात ब्राह्मणी दौलत घातली हे अपेश येई तो अर्थ न करावा." [2] या पूर्वीहि पुष्कळ वर्षे ओळखलें होतें. याच्यापूर्वी ६२ वर्षे म्हणजे सन १७१६ मध्यें लिहिल्या गेलेल्या आज्ञापत्र नावाच्या सुप्रसिद्ध निबंधाचा

१. ब्रिटिश राज्यसंस्थापकाचे एतद्देशीय साहायक– व्य. श. शेजवलकर, भा. इ. सं. त्रैमासिक वर्ष ६ पृ. १५६.

२. ऐतिहासिक पत्रबोध पृ. ९९.

कर्ता रामचंद्रपंत अमात्य याने स्पष्टपणे ओळखले होतें. पण त्याचा प्रतिकार मात्र झाला नाहीं. आज्ञापत्राचा लेखक साहुकाराना सरकारनें सर्व प्रकारच्या सवलती द्याव्या याचे विवेचन करीत असता लिहितो, "साहुकारामध्ये इंग्रजादि टोपीकर हेही लोक साहुकारी करतात. पण ते करकड सावकारासारखे नव्हत. त्याचे खावंद प्रत्येक राज्यच करीत आहेत. राज्य करणारास स्थळलोभ नाहीं असे काय घडों पाहते! त्यास ही हद्दी जात, हातास आले स्थळ मेल्यानेहि सोडावयाचे नव्हेत. त्यास केवळ नेहमी जागा देऊ नये, कदाचित् जागा देणे झाली तर खाडीचे मोहारीं (तोंडी) समुद्रतीरी न द्यावी. तसे ठिकाणी जागा दिल्याने आरमार पाठीशीं घालून त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार. तेव्हा इतके स्थळ राज्यातून गेले. याकरिता जागा देणेच तर लाब खाडीकाठी द्यावी. त्यास इमारतीचे घर बाधो देऊं नये. या प्रकारे राहिले तर बरे; नाही तर याविषें प्रयोजन नाहीं." तात्पर्य, इंग्रजाचा कावा ओळखला गेला होता. पाश्चात्याचे बळ त्याच्या विज्ञानोपासनेत व लोकशाही समाजरचनेत आहे हें उमगलें नव्हते. पण ते बलिष्ठ व धूर्त आहेत हें ओळखल्याची यापेक्षा अधिक स्पष्ट ती कल्पना काय असावयाची? म्हणजे आक्रमणाचें स्वरूप कळत होते पण वळले मात्र नाहीं. दिल्लीचे बादशहा किंवा मराठे यापैकीं कोणीहि या प्रकाराचा निक्षून बदोबस्त केला नाहीं. उलट ज्याना वळलें त्यानीं काय केलें ते पाहा म्हणजे फरक तत्काळ लक्षात येईल.

जपानचा दाखला

आमच्यावर आला तसलाच प्रसंग आमच्या जपानी बंधूंवर आला होता. पण ते त्यातून सहीसलामत वाचले; वाचले नव्हे तर चागले बलिष्ठहि झाले हें आज आपण पाहतोच आहोंत. आज अमेरिकेच्या परमाणु-स्फोटकापुढें ते हतप्रत झाले असले तरी त्यानीं कमाविलेलें सामर्थ्य वाया गेलें असें मानणें गैर होईल. तेव्हां गेल्या पाउणशें वर्षांत त्यानीं सामर्थ्य संपादन कसें केलें हें पाहणें उद्बोधक आहे. सोळाव्या शतकांत १५४२ सालीं म्हणजे शिवाजीच्या काळापूर्वी पाश्चात्य मिशनऱ्यांनीं जपानमध्यें शिर-

काव करून घेतला आणि थोड्याच अवधींत काहीं लाख जपानी लोकांना प्रभु येशूचें भगत बनविलें. या मिशनऱ्यांचा पाढरा पाय कायमचा रोवला गेला असता तर त्यांच्या पावलावर पाऊल टाकून सैनिक आले असते आणि जपानी राष्ट्राच्या मानगुटीवर पश्चिमेकडील पाढरे भूत बसलें असतें हें भविष्य निश्चित होतें. मग हें टळले कसे ? ते टळण्याकरिता जपाननें काय केलें हें सांगताना टॉनबी हा आपल्या पुस्तकात लिहितो [1] कीं, "जपानने उपाय अंमलात आणला तो हा कीं, एक वटहुकूम काढून सर्व पाश्चात्य मिशनरी आणि व्यापारी यांना एकजात जपानबाहेर हाकून देण्यात आले आणि पुन्हा कोणी देशात पाऊल टाकील तर त्याला प्राणास मुकावें लागेल असे फर्माविले !" आणि मिशनऱ्यांनीं लाखो बाटगे निर्माण करून ठेवले होते त्यांचें काय केलें ? त्याचाहि निकाल लावणें आवश्यक होतें. कारण तो अस्तनींतील निखारा होता. तर या बाटग्यांना दयामाया न दाखविता त्यांचीं पाळेंमुळेंहि खणून काढलीं. इतकी कीं जपानमध्ये फिरण्यांनीं प्रथम १५४२ मध्यें प्रवेश केला, पण शभर वर्षांनतर जपानी बेटावर औषधालाहि फिरंगी राहिला नाहीं. येवढ्यानें तात्कालिक अरिष्ट टळलें, आणि पुढें दोनशें वर्षें जपाननें योगनिद्रेत घालविली. पण १८५३ मध्यें त्याने जेव्हा पुन्हा डोळे उघडले तेव्हा त्याला स्पष्ट दिसून आले कीं संहारक शस्त्रांनीं सुसज्ज असेलले पाश्चात्य एकदा पिटाळून लाविले तरी पुन्हा दारावर टोठाविल्याशिवाय राहणार नाहींत. आणि त्या वेळीहि गाफील न राहता त्यानीं ताबडतोब उपाय अमलात आणला तो म्हणजे पाश्चात्याचे शास्त्रीय ज्ञान आत्मसात् करण्याचा. तो उपाय अंमलात आणला म्हणूनच ते आज पाश्चात्य राष्ट्राशीं दोन हात करूं शकतात. **देवगुरूचा पुत्र कच याच्या कालापासून चालत आलेला हा मार्ग आहे.** दैत्य प्रबळ होतात ते संजीवनी विद्येमुळे; हे मर्म लक्षात येताच देवानीं उपाय योजला तो म्हणजे दैत्याची विद्या हस्तगत करणें हा होय. भारतीयानीं हें केले नाहीं म्हणूनच त्याना आपले राजकीय मरण उघड्या डोळ्यानीं पाहण्याची नामुष्की पत्करावी लागली.

१. Study of History by A. Toynbee Vol. IV p 91

राजकारणांत जनतेला स्थानच नाहीं

विद्येच्या हेळसांडीचा हा मुद्दा पुढे पाहूं. प्रस्तुत मुद्दा म्हणजे राजकारणात फंदफितुरी जी माजली या बाबतींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची ती ही कीं, राजकारण हें कांहीं व्यक्तींची वा कुलाची मिरासदारी होऊन बसले. फंदफितुरीचे भूत आपल्याच देशात नाचताना आढळतें असें नाहीं. कोणत्याहि देशाच्या इतिहासात त्याचे प्रताप दाखविता येतील. पण राष्ट्रातील बहुजनसमाजामध्ये राष्ट्रीय वृत्ति जागरूक असली, राजकारणाशी त्याचा नित्याचा संबंध असला म्हणजे फितुरीला चोहोंकडून जेरबंद बसतात. पण आपल्या देशात राजकारण हे सरदार-दरकदाराचे खेळणे होऊन बसले व सामान्य जनता राजकारणाविषयीं उदासीन राहिली.

देशभक्तीचा उदय होण्यास देशांतील बहुजनसमाजाला राजकारणांत आत्मीयता वाटावी लागते. राजकारण हे एका विशिष्ट वर्गाचे किंवा एखाद्या विशिष्ट कुलाचे काम होय, ही कल्पना राष्ट्रीयत्वाला, देशप्रेमाला बाधक होते. दोन हजार वर्षांपूर्वी मेग्यास्थेनिसने येथील लोकांचें वर्णन केले की, राज्यक्रांतीचा उपसर्ग येथील शेतकरीवर्गाला कधींच पोंहोचत नाहीं. शेजारीं तुमुल युद्ध चालले असले तरी शेतकरी आपलें औत धीमेपणाने हाकीत असतो. राजा कोणी का असेना, जो मागेल त्याला कर द्यावयाचा व ठरेल त्यात मीठभाकरी भागवावयाची ही त्याची समाधानी वृत्ति. मेग्यास्थेनिसने वर्णन केले ते हिंदूच्या शांतताप्रियतेचा गुण घेण्याच्या इच्छेने. पण तो जितका गुण त्याच्यापेक्षा जास्त दोषच ठरला आहे. राजकारणाच्या उलाढाली चालत त्या फक्त चळवळ्ये व लढवय्ये लोकाचा जो एक लहानसा वर्ग असे त्याच्यामध्ये चालत. राज्य-संपादनाची लालसाहि याच्यामध्येच आणि राज्य गेल्याची खंत बाळगावयाची तीहि यांनींच. वाणी—उदमी किंवा शेतकरी-हेटकरी याच्या दृष्टीनें राज्यक्रांति म्हणजे सोमाचे राज्य गोमाच्या हातीं जाणें एवढेच. घरमालकाने घर दुसऱ्याला विकल्याबद्दल भाडेकऱ्याला जितका हर्षामर्ष व्हावयाचा तितकाच राज्यक्रांति झाली म्हणजे साळ्या-माळ्याला !

वाजवाड्यातील पहिले बिऱ्हाड बदलून दुसरे बिऱ्हाड राहावयास आलें जणूं ! महाभारतकारानें प्रजेच्या या मनोवृत्तीचें वर्णन केलें आहे कीं, प्रजा म्हणजे दुभत्या गाई. कोणीहि त्याची धार काढावी. जो आबोण घालील त्याला पान्हा सोडावयाचा एवढें माहीत !

राज्ययंत्र क्षत्रियाच्या अथवा सरदार-दरकदाराच्या हातून वाण्या-उद्‌म्याच्या हातीं येणें ही शासनसंस्थेच्या विकासातील अवस्था आपल्या देशात अद्याप आलेली नव्हती. राज्यक्रांत्या देशी राजामध्येच होत तोंवर त्या क्रांतीनें प्रजेच्या सामाजिक जीवनात फारसा फरक पडत नसे. राजाच्या वैयक्तिक स्वभावामुळे दंडशासनात काय गरमनरमपणा होईल तेवढाच. बाकी एकाला कर द्यायच्याऐवजीं दुसऱ्याला कर दिला म्हणजे राजकारणातील प्रजेची जबाबदारी संपे. चक्रवर्ती राजे दिग्विजय करीत तेव्हाहि ते दुसऱ्या राजाना आपले स्वामित्व मान्य करण्यास लावण्याची मात्र महत्त्वाकांक्षा बाळगीत. राज्य खालसा करण्याची, फारशी प्रथा नसे तर जिंकलेल्या राजाला त्याच्या गादीवर पुन्हा स्थापन करण्याचीच पद्धत असे. त्यामुळें सामान्य प्रजा ही नित्याचे राजकारण आणि नैमत्तिक राज्यक्रांति या दोहोंविषयीं उदासीन असे.

अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र याची शिस्त बाधून देणारे ग्रथकारही एकतत्री राजसत्तेचाच पुरस्कार करीत. व्यापारी व शेतकरी याना राजकारणात स्थानच नसे. राज्यात चाललेल्या घडामोडींविषयीं सामान्य जनता कशी उदासीन असे याचे राजरंगिणीकारानें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. तो लिहितो कीं, " पेन्शनींत निघालेले वृद्ध कामगार, शिष्याकरवीं पाठ खाजवून घेत बसलेले आचार्य, मदिरातील वतनी नाटकशाळा, लोकाच्या ठेवी पचवून ढेकर देत पुराणश्रवणाला बसलेले सावकार, प्रायोपवेशनाचेंच शास्त्र माहीत असलेली भिक्षुक मंडळी, आणि वेळीं-अवेळीं राजद्रोहाच्या गोष्टी सागणारे रिकामटेकडे, या सर्व लोकाना राज्यावर आपत्ति आल्याची खंत तर नसेच, उलट त्याना त्यात आनंदच वाटे." या परिस्थितीचें एक कारण असें असे कीं, राजेलोक प्रजाजनाना विश्वासात असे क्वचितच घेत. राज्य हें आपलें व्यक्तीच्या मिरासदारीचें,

पूर्वसुकृताने लाभलेलें किंवा मनगटाच्या जोरावर मिळविलेलें अशा प्रकारची समजूत रूढ झालेली होती. राजाचा आणि प्रजेचा संबंध यावयाचा तो फक्त प्रजेकडून जास्तींत जास्त कर पिळून घ्यावयाच्या वेळीं. दहाव्या शतकात काश्मिरात एकदा असाच भयंकर दुष्काळ पडला होता. वितस्ता नदीचे पात्र सडलेल्या नासलेल्या प्रेताच्या राशींनीं झाकून गेलें होते, आणि सर्व देश अस्थि पसरलेल्या श्मशानासारखा दिसूं लागला होता. कल्हण लिहितो कीं, "अशाहि स्थितींत मंत्रिलोक आपल्याजवळचें शिल्लक असलेलें धान्य अतिशय महाग दराने विकून अधिकाधिक गबर होत होते. आणि खुद्द राजाविषयीं बोलावयाचे तर आधींच निःसत्त्व झालेल्या प्रजेला जो जास्तींत जास्त पिळून काढी अशालाच मंत्रिपदावर तो मुक्रर करीत होता." काश्मिरातल्या पहाडातील लोक हे मोठे काटक होत. त्याचा योग्य सन्मान करून त्याची उत्तम सेना तयार केली असती तर परकीयांना टक्कर देणें काश्मीरनरेशाना कठीण नव्हतें. पण त्याचा मित्रत्वानें उपयोग करून घेण्याऐवजीं ते लोक नाठाळ म्हणून त्यांना कठोरपणानेच वागविलें जाई. दिग्विजयाला निघण्यापूर्वी आपल्या गैर-हजेरींत राज्यव्यवस्था कशी ठेवली जाई याविषयीं ललितादित्य नावाच्या राजानें आपल्या मंत्रिमडळाला जो कानमंत्र दिला त्यावरून एतद्विषयक धोरण कळून येतें. तो म्हणाला, "या पहाडी लोकाना वठणीवर आणणे, आणि तेंहि विशेषतः संपन्न असतील तर, फारच कठीण पडतें; म्हणून ते दोषीनिर्दोषी कसेही असले तरी नेहमीं त्यांना शिक्षा ठोठावीत असावे. त्याच्यापाशीं वर्षभर पुरेल इतकीच खाण्यापिण्याची सामग्री आणि शेतीला अवश्य तेवढींच गुरेढोरें राहूं द्यावी. याहून अधिक राहू दिल्यास ते प्रबल होऊन उपद्रव देऊं लागल्याशिवाय राहणार नाहींत. ह्या खेडवळाना जर का पाघरायला लोकरीचा उबदार कपडालत्ता, खावयाला मिष्टान्न, बसायला घोडे, आणि शेजेला सुंदर तरुणी, असल्या गोष्टी मिळूं लागल्या तर प्रजेचें दुर्दैव ओढवलेच म्हणून समजावे."

अपराध विनाप्यत्र दण्डया गह्वरवासिनः
ते हि संभृतवित्तास्युः दुर्भेद्याः दुर्गसंश्रयाः ॥ ४।३४६

ललितादित्याच्या या उद्गारावरून त्या काळचे राज्ययंत्राचें स्वरूप नीट लक्षात येईल. तें म्हणजे हेच कीं राजा, त्याचे मन्त्रिमंडळ, आणि त्याचे खुषमस्करे एवढ्याचेंच जणूं काय ते राज्य ! बाकीच्या प्रजेने फक्त मागेल तेव्हा आणि मागेल तितका कर तेवढा राजास द्यावा ! राजघराण्यात हमेश घडून येत असलेले खून, रक्तपात वगैरे राक्षसी प्रकार प्रजेने नुसते उघड्या डोळ्यानीं पाहावे; पण राजा बेशिस्त वागूं लागला, अन्याय-जुलूम करू लागला, तर त्याला जाब विचारण्याचा आपला हक्क आहे ही जाणीवच प्रजेमध्ये नष्ट झालेली होती. राज्याभिषेकप्रसगीं प्रत्येक नवा राजा 'मी प्रजेचे न्यायाने पालन करीन' अशा प्रकारची शपथ वेदमन्त्रपूर्वक (अथर्व ३।४)घेत असे.पण या शपथेचा मंत्रघोष हवेत विरून जाण्याच्या आधीच राजाला त्या शपथेचे विस्मरण पडे या राज्याभिषेकप्रसगीं हजारो प्रजाजन हजर असत, त्यानीं ती शपथेची गभीर घोषणा ऐकलेली असे; पण शपथेची कठोर आठवण राजास करून देता देईल असा आत्मविश्वास उत्पन्न होण्याइतका राज्ययंत्राशी त्याचा सबधच येत नसे. यामुळे राजा चागला निघणे किंवा वाईट निघणे हें केवळ आपले भाग्य किंवा दुर्दैव, राजा अनन्वित जुलूम करूं लागला तर तो आपल्याच प्रारब्धाचा भोग असे म्हणून कपाळावर हात मारून निराशेचे सुस्कारे टाकणे एवढेच काय ते आपल्या हातीं असें प्रजा मानीत असे. यामुळे एक राजा गेला काय आणि दुसरा आला काय दोहोंचेहि सुहेरसुतक जनतेला काहींच नसे. राजा जनकाची सुप्रसिद्ध उक्ति थोड्या निराळ्या अर्थानें सर्व प्रजेला लागू होती. ती म्हणजे ' **मिथिलाया प्रदीप्तायां न मे दहति किंचन** । '

राजेच जर स्वकीयाविरुद्ध व स्वधर्मीयाविरुद्ध परकीयाशीं सगनमत करीत तर प्रजेला राज्यकारभाराविषयीं आत्मीयता वाटण्याचे कारणच नव्हतें. मुसलमानी आक्रमणाच्या वेळीं हीच स्थिति होती. जनतेतील ही उदासवृत्ति शिवाजीनें मात्र आपल्या उदार दूरदृष्टीच्या धोरणानें व आपल्या अलौकिक विभूतिमत्वाने नष्ट केली. काहीं काळ जनतेमध्ये विलक्षण जागृति झाली. शिवाजी आग्र्याहून सुटून सुखरूपपणे दक्षिणेत

१. शांतिपर्व २७७।४.

येऊं शकला हा चमत्कार अखिलभारतीय हिंदु जनतेच्या विश्वासाखेरीज घडणें अशक्य होते. या जागृतीचे तेज सभाजीच्या वधानंतर माजलेल्या दंगलींतही मराठ्यांनीं आपले राज्य टिकविले या कर्तबगारींत स्पष्ट दिसून येते. मात्र शिवाजीसारखी लोकोत्तर व्यक्ति अंतर्धान पावताच त्यानें पेटविलेली स्वत्वाची ज्योत मंद होणार हे दिसू लागले होते. कारण पंत-अमात्य आणि धनाजी जाधव याच्यात राजारामकालीन धामधुमींत वितुष्ट आल्याचें दिसते. शिवाजी सामान्यपणे वतन देण्याच्या विरुद्ध होता पण राजारामकालीन धामधुमींत वतने देणें पुनः अपरिहार्य ठरलें व सरदारकी आणि राज्य हीं दोन्ही खाजगी मालकीचीं ही कल्पना बळावू लागली

बेशिस्त लष्कर

जनतेला विश्वासात न घेण्याचा उत्तरपेशवेकालीन एक प्रकार **गाडदी फौज** ठेवण्याची नवी प्रथा सुरू करण्यात दिसून येतो. १७५० पर्यंत मराठ्यांची मुख्य मदार घोडदळावर असे. पण इंग्रजी व फ्रेंच याच्या कवायती सैनेची मर्दुमकी अवलोकल्यावर आपणही असले कवायती सैन्य तयार करावे असे पेशवे, शिंदे, होळकर वगैरेंना वाटूं लागलें. कवायती फौजेला तोंड द्यावयाचें तर आपली फौजही कवायतीने तयार केली पाहिजे हे धोरण रास्तच होतें. पण शिवाजीनें मावळे तयार केले तसे महाराष्ट्रातीलच खेडोपाड्यांच्या तालमींतून तयार झालेले तरुण जवान हातीं धरावयास पाहिजे होते व त्याची कवायती फौज तयार करावयास पाहिजे होती. पण त्याऐवजीं परकीय गाडद्यांची फौज उभी करण्यात आली. सदाशिवराव-भाऊने अमलीं पहिली फौज उभारली ती फ्रेंचानी मोडून टाकलेल्या पलटणींतील.[1] या गाडदी पलटणींत अरबी, सिद्दी, हबसाणी, गोसावी वगैरे अनेक जातींचे सैनिक असत. ते सर्व भाडोत्री सैनिक होते. आणि त्यातील सामान्य सैनिकाना शिलेदाराइतका पगार दिला जाई. तोफखान्यावर त्यांचीच नेमणूक असे. आणि सर्वांवर कडी म्हणजे राजधानीचे व राजाचे संरक्षक सैन्यही गाडद्यांचेच असे. नारायणरावाचे खुनी म्हणून या गाडद्यांचें

१ Introduction to Peshwa's Diaries by M. G Ranade.

नाव मराठ्यांच्या इतिहासात गाजलेलें आहे. माधवराव पर्वतीवरून स्वारीं येत असता त्याच्यावर वार करूं पाहणारा गाडदीच होता व पैसे चुकते झाल्याशिवाय नाना फडणीसाच्या शवास अत्यसंस्कार करूं देण्यास विरोध करणारे गाडदीच होते. धन्यावर शिरजोरी करावी इतकें त्यांचें प्रस्थ वाढलें होतें. हैदरावरील तिसऱ्या स्वारींत गोपाळराव पटवर्धनानें कडाप्पा ठाणें जेव्हा घेतलें तेव्हा येथील रयत सोईने निघून जात असताही सैन्यांतील गाडद्यानीं त्याना लुटावयास कमी केले नाहीं त्याबद्दल खुद्द गोपाळरावच लिहितो, 'गाडद्यानीं चिरगूट पाघरूण भांडीं कंबली तमाम हिरावून घेतल्या. इलाज काय ? श्रीमतास लिहिले आहे. गाडद्यांचें पारिपत्य करतील तेव्हा करोत.'[1] गाडदी हे सेनापतीलाही धूप न घालण्याइतके माजोरी झाले होते असें यावरून स्पष्ट दिसतें. युरोपियन सैन्याशीं झुंज द्यावयाची तर कवायती पलटण व तोफखाना हीं सैन्याचीं अंगे सज्ज करणें चुकीचें नव्हते. पण हीं दोन्ही अंगें पेलण्याचें सामर्थ्य मराठा जवानात नव्हते काय ? स्वतःचीं घोडीं आणि पागा ठेवून हौसेने सैन्यात सामील होणारे जे शिलेदार ते मराठी मुलखातले असल्याने त्याना जशी मराठी लष्करांविषयीं आपुलकी वाटेल तशी गाडदी याना वाटणे शक्यच नव्हतें. या गाडद्यांच्या जोडीला सैन्याच्या बरोबर सनदी पेंढारी असत ! ते बहुतेक मुलतानी बलुची पठाण असत. शत्रूच्या मुलखाची लूटमार करून पोट भरणे हा त्याचा राजरोस व्यवसाय. व तो उघडपणें मान्य केला जाई. पेशवेडायरींत नोंद आहे कीं ' मीरखान व हसनखान मुलतानी उर्फ पेंढारी यानीं पालपट्टी शिरस्त्याप्रमाणें देतो म्हणून अर्ज केला त्यास लष्करात रहाण्यास परवानगी दिली.'[2] अशा प्रकारे सैन्यातली ही व्यवस्था आपुलकीच्या भावनेला पोषक अशी मुळींच नव्हती. रामदासानी महाराष्ट्रधर्माचा जो उपदेश केला व 'मराठा तितका मेळवावा' हे जे राष्ट्रीय सूत्र प्रदिपादिलें त्याचें स्मरण त्याच्या पुण्याईवर पोट भरणाऱ्या रामदासी महंतानाही राहिले नाहीं. मग सेनापतींना कोठलें ? एवंच, मुलुखगिरींत देखील आपुलकीची भावना कमजोर होऊं दिली गेली.

१. पे. ले. समग्र खंड ४ था. वा. कृ. भावेकृत पेशवेकालीन महाराष्ट्र पृ ५२९.
२. पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ५३५.

युरोपियन अंमलदारही येथील परकीयांचींच वळणे तयार करीत ना ? मग तीं त्याच्या शिस्तींत वागत व शिरजोर होत नसत याचें कारण काय ? याचें कारण युरोपियनाचे गोरे सैन्य हें मुख्य असे व हिंदी सैन्याशीं त्याचें टराविक प्रमाण राखण्याची दक्षता घेण्यात येई. हें गोरें सैन्य अधिक कडक शिस्तीने बाधलेलें आणि युद्धतंत्रात अधिक वाकबगार असे. हिंदी सैन्य असे ते दुय्यम म्हणून असे. दुसरी तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे युरोपियनाच्या सैन्याचा तनखा कधीं तुंबत नसे, तर महिन्याच्या महिन्याला रोख पगार हातात पडे. ' खजिना म्हणजे राज्याचे जीवन ' असें आज्ञापत्रकार आर्जवून सागतो. पण पेशव्याचा कर्जबाजारीपणा कधींच सपला नाहीं आणि लष्कराला वेळच्या वेळीं तनखा देण्याचें साधले नाहीं. यामुळे गाडदी शिरजोर होऊ शकले. शिलेदाराचें सैन्य हे मराठा गड्याचें होते. पण शिलेदाराचा घोडा स्वतःच्या मालकीचा असल्यानें पराभवाची चाहूल लागताच त्वेषाने लढण्याऐवजीं आपले घोडे बचावण्याचीच तो काळजी घेई. त्यामुळे मराठ्यांचें लष्कर हें इग्रजी कवायती लष्करापुढे कमकुवत ठरे ! सैन्य ज्या प्रदेशातून कूच करी त्या प्रदेशातून खासदाणा गोळा करणाऱ्या टोळ्या खेडोपाडीं लुटून फन्ना करीत. असल्या बेशिस्तीमुळें खेडोपाड्यातील जननेता राजकारणात आपुलकी कशी वाटावी !

या राजकारणविषयक विकृत वृत्तीनेंच तेवढें मागले नाही, तर एकदर जीवनविषयक तत्त्वज्ञानच शिथिल झालें होतें. प्रारब्धवादाचें तिमिर वाढू लागले होते. विचारस्वातत्र्याचे तेज लोपू लागले होते. पूर्वीच्या प्रकरणातून वर्णिलल्या चौकसपणा, जागरूकता, सग्राहकता या वृत्ति दुर्बल झाल्या होत्या आणि पोकळ व अध अभिमान बळावूं लागला होता. यामुळें एके काळीं पुढारलेले आपण पाश्चात्याच्या मागे पडलो ते आजवर. यापुढें मागे पडावयास नको असेल तर लोकशाहीची आवड, परकीयापासूनहि विद्या स्वीकारण्याची सग्राहकता, जगमर सचार करून येणारी जागरूकता, प्रयत्नवादावर विश्वास, जीवनाकडे निर्मीडपणें पाहण्याचें धैर्य वगैरे रूपाने दिसून येणारी आपली पूर्वीची परंपरा पुन्हा वाहती केली

पाहिजे. तरच संस्कृतिसंगमावरील भोवऱ्यात आपल्या संस्कृतीचा प्रवाह लुप्त न होता जागतिक संस्कृतींशीं सलग्न होऊन पण स्वतःचे वैयक्तिक कामगिरीरूप वैशिष्ट्य कायम ठेवून तो अखंड चालू राहील. पण तसें होण्यास त्यावरील चुकीच्या तत्त्वज्ञानाचे माजलेलें शेवाळे दूर केलें पाहिजे. तरी आता हे तत्त्वज्ञानच कसें विकृत झाले होते हें पाहूं या.

प्रकरण चौदावें

विचारदौर्बल्याचें शेवाळें



राजकारण हे समाजाचें संरक्षक कवच होय, म्हणून त्याचा विचार स्वतंत्रपणे मागील प्रकरणीं केला. त्यात राजकारण कसें विकृत झाले होतें हें पाहिलें. आता या प्रकरणीं संस्कृतीच्या सर्वच क्षेत्रात कार्याकार्यविवेक अथवा स्वतंत्र विचार करू शकणारी प्रज्ञा ही कशी ढिली होत चालली होती इकडे नजर देऊं. राजकीय क्षेत्रात आम्ही पराभूत झालों ते केवळ नुसत्या लहरी दैवघटनेने नव्हे तर आमच्याच विवेकदौर्बल्यामुळे हे पाहिले. पण ह्या विवेकदौर्बल्याचे परिणाम राजकारणात ठळकपणे दिसत असले तरी त्याचीं पाळेंमुळे फार खोलवर दडलेलीं असतात. तीं राष्ट्राच्या मनोवृत्तींत रुतलेलीं असतात. तसाच प्रकार आपल्या संस्कृतीचा झालेला आढळतो. तो म्हणजे काहीं काळ जोमदार रीतीने तिचा प्रवाह वाहिल्यावर तिची गति मंद झाली आणि तिच्यावर अंधःश्रद्धेचें शेवाळे माजू लागलें.

विचारस्वातंत्र्य हें प्रगतिपर संस्कृतीचें चैतन्य होय. हें चैतन्य जेव्हा कोळपूं लागलें तेव्हा आम्ही मरगळूं लागलों आणि स्पर्धेत मागें पडलों.

चैतन्याला ओहोटी लागण्याचा हा काल चागला हजार वर्षांवर मानता येईल. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यानीं आपल्या 'मध्ययुगीन भारत' या सुप्रसिद्ध ग्रंथात हर्षवर्धनाच्या निधनानंतर मध्ययुगाला सुरुवात होते असें धरलें आहे. जयचंद विद्यालंकार (भारतीय इतिहास की रूपरेखा) यशोधर्म्याच्या मृत्यूनंतर म्हणजे आणखी एक शतक (इ.स.५४०) मागें धरतात. ऐतिहासिक विवेचनात अशा प्रकारची कालमर्यादा स्थूलमानानेंच धरावयाची असते हें सागावयास नकोच. मध्ययुगीन कालाच्या किंवा संस्कृतीच्या स्थिरावस्थेच्या दर्शक म्हणून ज्या चार-दोन गोष्टी पुढें

सांगण्यात येणार आहेत त्या अमुक एका शतकात एकदम अवतीर्ण झाल्या असें नव्हे. वर्षाकालाच्या सुरुवातीला आकाशात काळेंकुट्ट मेघाडंबर येऊन विजा चमकू लागल्या म्हणजे वर्षाकाल सुरू झाला असे आपण म्हणतों, पण हे मेघ निर्माण होण्याची तयारी आधीं कित्येक महिने चालू असते. तोच न्याय येथे लागू करावयाचा तर विचाराच्या स्थिरावस्थेची सुरवात म्हणून हर्षवर्धनाच्या नंतरचा काल हा एक ठळक प्रारंभस्थान म्हणून मानण्यास हरकत नाहीं. येथून पुढच्या हजार बाराशें वर्षांच्या काळाचे प्रमुख लक्षण म्हणजे **प्रारब्धवादाची पकड व विचार-स्वातंत्र्याचा लोप** हें होय.

प्रारब्धवादाची पकड

पैकीं पागळ्या प्रारब्धवादाची पकड कल्हणासारख्या इतिहासकारावरही बसावी हे दुर्दैव. कल्हणाने आपला इतिहासग्रंथ समाप्त केल्यानंतर थोड्या काळाच्या आतच काश्मीरचे राज्य मुसलमानाच्या मक्ष्यस्थानीं पडलें; आणि काश्मिराबाहेरील इतर प्रांतातहि तोच प्रकार घडला. त्या कालच्या मनोवृत्तीने एक प्रमुख लक्षण म्हणजे प्रारब्धवादात प्रकट होणारें राष्ट्राचें मनोदौर्बल्य हे होय. त्याची योग्य कल्पना कल्हणाच्या उद्गारावरून चागली येईल. अनेक राजवटींचा उदयास्त वर्णन केल्यावर या इतिहास-काराच्या मनावर जो ठसा उमटला तो येवढाच कीं,जगातील सर्व व्यापव वैभव हीं क्षणभंगुर होत. ग्रंथारंभींच तो लिहितो की,"अखिल जीवमात्र हे क्षणभंगुर आहे हें ज्या सज्जनाना पटलेलें असते त्याना कोणता रस आव-डत असेल तर तो शातरस हाय. आणि तोच अनेक ऐतिहासिक उला-ढालींनीं भरलेल्या माझ्या या ग्रंथात प्रधान रस आहे !" (१.२३)

या भूमिकेवरूनच तो इतिहासाकडे पाहत असल्यानें जेथे जेथें राजाच्या अनन्वित जुलमी कृत्याचें वर्णन करण्याचा प्रसंग येई तेथें तेथें प्रजेचें दुर्दैव किंवा ईश्वरी कोप असल्या शब्दाचाच जप करताना तो आढळतो. काश्मीरचें सिंहासन एके काळीं मिहिरगुल नावाच्या एका परकीय राजानें बळकाविल होतें. हा राजा अत्यंत जुलमी व क्रूरकर्मा म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्याविषयीं कल्हण तळतळून लिहितो, " इतक्या

अनन्वित जुलूम करणाऱ्या राजाचा प्रजेनें खूनच पाडावयास हवा होता." मग का पाडला नाहीं ? कल्हण याचे जें उत्तर देतो ते तत्कालीन विचारवन्ताच्या मनोवृत्तीवर चक्क प्रकाश पाडणारे आहे. तो लिहितो, " या राजाचा खून पाडला गेला नाहीं याचे कारण या देशातील उग्रदेवता त्याचें रक्षण करीत असाव्या हेच असलें पाहिजे. " एवं क्षुद्रोऽपि यद्राजा संभूय न हतो जनैः। तत्कर्मकारयद्भिः तद्दैवतैरेव रक्षितः ॥ १।३२४ ॥ किती विक्षिप्त कल्पना ! सर्व तऱ्हेचीं घोर पातकें करणाऱ्या राजाचें रक्षण म्हणे देवता करीत होत्या ! राज्यकारभारात स्वतःस काडीहि हलविता येत नाहीं या निराशेनें काळवंडलेल्या मनाचे हे विकृत उद्गार होत एवढाच याचा अर्थ ! राजेलोकांनीं आपल्या बांधवांना कंठस्नान घातलें तरी ते देखील उग्रदेवता सौम्यपणानें पाहत, पण उलट प्रजेनें हात उगारला कीं मग मात्र राष्ट्रातील सर्व देवतांचे उग्र तेज प्रकट होऊन इहलोकींची महती-देवता जी राजा तिचे रक्षण करण्याकरिता तिच्याभोंवतीं एक अभेद्य वलय निर्माण करीत ! कारण राजा म्हणजे साक्षात् ईश्वराची विभूति, आणि त्याला प्राप्त झालेले ऐश्वर्यपद हे पूर्वीच्या अनंत जन्मींच्या सुकृताचें फल; तेव्हा त्यानें कितीहि जुलूम केला तरी ते ईश्वरीसूत्र, ती विधिघटना, तो कर्मविपाक, असें म्हणून ती निमूटपणें सोसावा हीच विचारसरणी सर्वत्र पसरलेली. या प्रकारात फरक पडावयाचा असल्यास तो दगडाधोंड्यांचीं दैवते घडवून आणतील तेव्हा. आपण हाडामासांचीं चालतीं बोलतीं माणसे हे परिवर्तन घडवून आणूं ही धमकच नष्ट झाली होती. चक्रवर्मा नांवाचा एक राजा होता. त्याने एका चाडाळीला आपली पट्टराणी केलें. त्यासंबंधाने कल्हण लिहितो कीं, " खगेश्वर या काळीं आपल्या या काश्मीरमंडळात प्रखर आणि जागतीं दैवतें राहतच नसावींत. तीं राहत असतीं तर त्याच्या मंदिरात चाडाळीचा प्रवेश कधींच होता ना ! " मण्डलेऽस्मिन्प्रभावोग्राः न देवाः न्यवसन्ध्रुवम् । तद्वेश्मनि तदा नोचेत् श्वपाकी प्राविशत् कथम् ॥ ५।३९४. एकूण जागृत दैवतें काय करतील त्यावर भिस्त ! काश्मीरचा हर्षराजा हा एक प्रतापशाली राजा होऊन गेला. पण तोहि आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं सैतानी चाळे करूं लागला. त्याच्यासंबंधाने कल्हण लिहितो कीं, " या थोर राजाच्या

हातून अनन्वित चुका घडत त्या भूतसंचारामुळेंच असाव्यात. त्याची जन्मकुंडलीच वाईट. त्याच्या कुंडलींत लग्नीं कर्क रास, पंचमस्थानीं मंगळ व शनि, षष्ठस्थानीं बुध व गुरु, सप्तमात शुक्र व सूर्य, आणि दशमात चंद्र होता. असल्या योगावर जन्मलेले राजे कौरवाप्रमाचें स्वकुलनाशक निपजतात हे संहिताकारानीं स्पष्ट सांगितलेंच आहे!" कुंडलींतील योगाप्रमाणे राज्यामध्ये दुष्ट प्रवृत्ति उत्पन्न होऊं लागल्या असतील, पण प्रजेनें या प्रवृत्तींना प्रतिरोध करण्यास प्रत्यवाय कोणता? दोन-तीन हजार वर्षांच्या दीर्घ कालखंडातील अनेक राजाच्या उत्कर्षापकर्षांचें वर्णन करणाऱ्या या इतिहासकाराच्या मनावर ऐहिक वैभवाच्या क्षणभंगुरत्वाचा ठसा उमटला तर नवल नाही! पण अनेक राजाच्या अन्यायी लीलाचे अनेकवार चिडून, वैतागून वर्णन करण्याचा प्रसंग आला असताहि अन्यायी राजसत्ता नष्ट कशी करतां येईल याविषयीची कल्पना मात्र त्याला स्फुरलेली दिसत नाहीं. वेळीं-अवेळीं तो फक्त विविघटनेचेच तुणतुणे वाजविताना आढळून येतो. राजकारणाकडे कठोर विवेकवादाच्या दृष्टीने पाहण्याची धमक ओसरलेली दिसते. नक्षत्रें आणि कुडल्या पाहत बसणाऱ्याना इसवीसनपूर्व चौथ्या शतकातील चाणक्यानें मूर्खांत काढले होतें, तर अकराव्या-बाराव्या शतकात कल्हणासारखा चौकस इतिहासकारही नक्षत्राचें आणि कुंडल्याचे महत्त्व गाऊं लागला होता. एके ठिकाणीं तर तो स्पष्ट लिहितो कीं, "प्रजेच्या प्रारब्धानुसारच तिला सुष्ट किंवा दुष्ट राजा मिळत असतो. काहीं वृक्षांना मेघाकडून अमृतजल मिळते आणि काहींना त्याच मेघातून विद्युत्प्रपात मिळतो हें त्याच्या पूर्वसुकृताचें फळ होय!" (७।३४१).

पुराणप्रियता

या कालात शास्त्र, कला, वाङ्मय, धर्म, तत्त्वज्ञान या सर्व प्रांतांत बुद्धिमान् पुरुष चमकले नाहींत असें नव्हे. पण कोणत्याहि बौद्धिक प्रातात मूलगामी नवे स्वतंत्र असे विचार माडले गेले नाहींत. या कालानंतर स्मृति होण्याचें बंद पडलें. आठव्या शतकातला देवलस्मृतीचा कर्ता हा शेवटला स्मृतिकार होऊन गेला. त्यानंतरचे

सर्व धर्मशास्त्रकार हे निबंधकार होत. त्यानीं नवीन स्मृति न रचिता जुन्या स्मृति ह्या अनुल्लंघनीय मानल्या आणि त्यातहि एकमेकाशीं विरुद्ध असणाऱ्या सर्वच स्मृति प्रमाण मानून त्या सर्वांचा समन्वय करण्याचें काम आपल्या शिरावर घेतलें. हिंदुस्थानसारख्या खंडतुल्य देशांतील अनेकविध समाजाना सांस्कृतिक दृष्ट्या एका सूत्रात गोवावयाचें तर निरनिराळ्या काळीं आणि निरनिराळ्या स्थळीं प्रचलित असलेल्या आचारविचारांचा समन्वय करणें इष्ट होते हें नाकबूल करता येणार नाहीं. पण हा समन्वय करताना जुन्या काळच्या सर्व स्मृति ह्या नव्या काळावर बंधनभूत आहेत हें जें मूलभूत गृहीतकृत्य म्हणून स्वीकारलें गेलें, तें प्रारंभीं समन्वयाच्या दृष्टीनें सोईस्कर असलें तरी अंतीं विचारस्वातंत्र्याला मारक ठरलें. जुन्याबद्दल अभिमान कितीहि प्रखर असला तरी काल काहीं कोणाकरिता थाबत नाहीं; नव्या गरजा उत्पन्न होत असतात, नव्या अडचणी टोचत असतात, नवे अनुभव येत असतात व त्याला अनुसरून आचारविचाराची नवी माडणी करणें जरूर पडतें. तशी माडणी या काळातहि थोडीबहुत करण्यात आलीच. आणि त्याचें एक ठळक उदाहरण म्हणजे कलिवर्जाची यादी हें होय. पण हे फेरफार करीत असतांना त्यानीं जी भूमिका स्वीकारली ती मात्र अशी कीं, काल वाईट येत चालला, पूर्वीच्या लोकाचें तेज आपणात राहिलें नाहीं, त्याना अनेक गोष्टी पचत, त्या आपणास आता पचणार नाहींत तेव्हा युगऱ्हासानुरूप आपल्याला आचारविचार बदलले पाहिजेत. ही भूमिका स्वीकारण्यात पूर्वीच्याचा मान राखला जातो व आपणाकडे कमीपणा घेतल्यामुळें विनयहि शोभून दिसतो.

पण हा विनय प्रमाणाबाहेर गेल्यास विचारस्वातंत्र्य कोळपतें व मन खुरटें होतें. तें कधें हें दृक्प्रत्ययसिद्ध असें जें ज्योतिषशास्त्र त्यातहि प्रामाण्याचें बड माजलें यावरून लक्षात येईल. दीक्षिताच्या भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास या ग्रंथास लिहिलेल्या प्रशंसनात वैद्य उद्गारतात कीं, "बहुतेक ज्योतिषाचार्यांनीं 'प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं' हा सिद्धान्त मानून आपल्या नांवानें ग्रंथ लिहिले. पण आपल्या दुर्दैवानें सूर्यसिद्धान्तकारानें मात्र आपली माहिती साक्षात् सूर्यापासून सांगितली अशी थाप आपल्या

ग्रंथांत दिली आणि तेव्हापासून ज्योतिषात शब्दप्रामाण्याचें बंड सुरू झालें आणि शास्त्राची वाढ खुंटली." या शास्त्रातील अंधःश्रद्धेविषयीं खुद्द दीक्षित लिहितात, 'वेदागज्योतिष साप्रत जे वैदिकाच्या पाठांत आहे त्याविषयीं एक मोठा चमत्कार आहे. तो असा कीं, अर्थाकडे लक्ष दिलें तर वैदिकाच्या पाठातल्या पुष्कळ श्लोकात काहीं काहीं अशुद्धें आहेत; आणि असे असून सर्व ब्राह्मणाच्या तोंडी सर्व देशभर एक पाठ ! आणि या पाठाची योग्यता साक्षात् वेदाप्रमाणे मानण्यात येते ! (पृ.७१) नवे ग्रथ प्राचीन थोर महनीय ऋषींच्या वा देवताच्या नावावर प्रसृत करण्याची कृप्ति ही जुन्याचा मान राखणारी असली तरी विचारस्वातंत्र्यास विघातक होय. आद्य धर्मशास्त्रकार गौतम आपस्तंब हे स्वतःच्या नावानें ग्रंथ प्रसिद्ध करीत. मनु, याज्ञवल्क्य, नारद या स्मृतिकारानीं वेदवाङ्मयात लोकोत्तर विभूति म्हणून गाजलेल्या मनु, याज्ञवल्क्य, नारद या ऋषिवर्योच्या नावावर आपले ग्रथ प्रसिध्द केले. पुढे विष्णुस्मृतिकारानें भगवान् विष्णूच्या नावाचा उपयोग केला. आणि पुराणकारानीं तर देवतांच्या नावावर आपले ग्रथ मिरवावयाचे हा शिरस्ताच पाडला ! मनुस्मृतीचा टीकाकार मेधातिथि हा मनूविषयीं 'मनुर्नाम कश्चित्तत्पुरुषविशेषः' असे तरी म्हणूं शकतो, पण देवताच्या नावावर लिहिलेल्या स्मृति किंवा पुराणे याना मनुष्यकृत तरी कसें म्हणावयाचे ? तात्पर्य, ही प्रथा विचारस्वातंत्र्यास रोधक ठरल्यास नवल नाहीं.

प्रतिनिविष्ट पंडित

या कालात परमुलुखांतील मुशाफरी खुंटल्याने विद्येच्या बाबतींत बाहेरून कांहीं घेण्यासारखें आहे ही कल्पनाहि उरली नाहीं. अनेक शतकें शास्त्र, विद्या, कला वगैरेंच्या क्षेत्रात अखिल जगताच्या आघाडीवर मिरविल्यामुळें आमच्या पंडिताची दृष्टि स्वतःच्या ज्ञानानेंच दिपून गेली आणि ते आपल्याच मानीव जगात मिरवूं लागले. भोवतालच्या सत्यसृष्टीशीं ते पारखे होऊं लागले. उलट राजकीय क्षेत्रांत ज्याच्याशीं झुंजावयाचें होतें ते मुसलमान पंडित ग्रीक आणि संस्कृत विद्या अत्यंत कसोशीनें आत्मसात् करीत होते. आपले पडित प्रायः राजाश्रयावर गबर होत

आणि आपल्या आश्रयदात्याच्या औदार्याचे व आपल्या विद्वत्तेच्या वैभवाचे अतिरिक्त वर्णन करण्यातच गढून गेलेले असत. मासला म्हणून मिताक्षरेच्या शेवटी विज्ञानेश्वरानें स्वतःविषयी व आपल्या आश्रयदात्याविषयी जे उद्‌गार काढले ते पाहा : " आमच्या कल्याणनगरासारखे (दक्षिण हैदराबादेजवळील) नगर अखिल अवनीतलावर आज दुसरें कोठेहि नाहीं, पूर्वी झालें नाहीं, पुढे होणार नाहीं. आणि या नगरीतील श्रीविक्रमासारखा पृथ्वीपति दुसरा पाहावयास सापडणार नाहीं कीं ऐकावयास मिळणार नाहीं. आणि या त्याच्या पदरीं असलेला पंडित जो विज्ञानेश्वर त्याला तर दुसऱ्या कोणाची उपमाच नाहीं. कल्पवृक्षाच्या तोलाचा ही त्रिपुटी कल्पान्तापर्यंत नादो ! "

महंमद गझनीच्याबरोबर हिंदुस्थानात आलेला हुशार आणि चौकस बुद्धीचा मुस्लीम पंडित अल्बेरुणी याने आमच्या संस्कृतींत उत्पन्न झालेला हा दोष अचूक हेरला होता. आपल्या ग्रंथाच्या आरंभींच हिंदुस्थानातील लोकाच्याकडून जरूर ती माहिती मिळविण्याच्या मार्गांतील अडचणींचें वर्णन त्याने केलें आहे. त्यात हिंदु पंडिताच्या प्रतिनिविष्टतेविषयीं तो लिहितो, " हिंदु लोकाना असें वाटतें कीं, जगात आपल्या देशासारखा देश नाहीं, आपल्या राष्ट्रासारखे राष्ट्र नाहीं, आपल्या राजासारखे राजे नाहींत, धर्मासारखा धर्म नाहीं आणि शास्त्रासारखें शास्त्र नाहीं ! अहंकार, प्रतिनिविष्टता, वृत्तीचा ताठरपणा हे सर्वच या हिंदूच्यात सर्वत्र भरलेले आहेत. त्याना असे वाटते कीं, जगात जर कोठें शास्त्र, विद्या, कला असतील, तर त्या फक्त आपल्या देशात. तुम्ही जर खुरासानमधील किंवा पर्शियामधील विद्वानाच्याविषयीं त्याच्याशीं बोलणें काढलेंत, तर ते तुम्हाला तत्काल मूर्खांत काढतील. ते जर थोडेसे का होईना बाहेरच्या देशात फेरफटका करून येतील तर त्याना आपली चुकी तात्काळ लक्षात येईल. पण ते देशाबाहेर पाऊल टाकून इतराच्यात मिसळतील तेव्हां ना ! त्याचे पूर्वज काहीं असल्या खुरट्या वर्तनाचे नव्हते. त्याचा एक प्राचीन विद्वान् ज्योतिषी वराहमिहिर यानें लिहिलें आहे कीं, ग्रीक लोक हे पवित्र नसले तरी त्यानीं ज्ञानात इतरांच्यापेक्षा वरचढ केली असल्यानें त्याच्याविषयीं पूज्यभाव बाळगिला पाहिजे."

परकीय प्रवाशानें केलेले हें रोगनिदान अयथार्थ नव्हते. पूर्वीसारखा विश्वसंचार चालू राहिला असता, दिग्विजयी या नात्याने, धर्मोपदेशक या नात्यानें, सौदागर या नात्यानें पूर्वीसारख्या त्रिखंडातील मुशाफरी सुरू असत्या, तर परदेशात चाललेल्या नव्या प्रयोगाची दखलगिरी राहिली असती. पण धाडसी मुशाफरीला प्रोत्साहन देणारा सामाजिक व आर्थिक व्यवहारातील लवचिकपणा नष्ट झाल्यामुळे असो वा कोणत्याहि कारणामुळें असो, ही मुशाफरी दहाव्या शतकानंतर बद पडली. यामुळे युरोपमध्यें पधराव्या सोळाव्या शतकापासून पुढे विद्येच्या अनेक क्षेत्रात जी विलक्षण जागृति झाली त्याच्याविषयी नुसती पुसट कल्पनाहि आमच्याकडील पडिताना आली नाहीं. आपल्याच तेजाने दिपून गेलेले आमचे पडित फक्त त्या त्या विषयावरील पूर्वाचार्यांनीं लिहिलेल्या ग्रथावर टीका, उपटीका, उपोपटीका लिहून पूर्वाचार्यांच्या शब्दाचा कीस काढण्यात धन्यता मानू लागले. युरोपमध्ये मध्ययुगीन कालात हाच प्रकार झाला होता. या काळातले पाश्चात्य पंडित प्राचीन होमरचे काव्य कसे पिंजीत बसले होते याचे टीकाशास्त्राचा इतिहासकार वर्णन करितो कीं होमरच्या काव्यार्चीं भाष्ये म्हणजे पिळ्यानुपिळ्या कुटून कुटून वस्त्रगाळ केलेल्या वनस्पतीचा गाळीव अर्क होय.[१] असाच प्रकार आमच्याकडेहि झाला. शकराचार्यांसारख्या अव्वल दर्जाच्या तत्त्वज्ञान्यानेहि स्वतंत्र ग्रंथ न लिहिता प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहून त्याची एकवाक्यता करून आपले तत्त्वज्ञान त्याच्या मुखातून वदविले. ही परपरा आठव्या शतकातल्या शकराचार्यांपासून जी सुरू झाली ती विसाव्या शतकातल्या टिळकाचार्यांपर्यंत अखंड राहिली. हजार वर्षे चालत आलेली आपली ही परपरा ओळखूनच टिळकानींहि आपले कर्मयोगाचे तत्त्वज्ञान स्वतंत्र ग्रंथरूपाने न माडता गीतेवरील माष्याच्या रूपानें माडलें.

---

१. "In scholia on Homer we have thrice, nay thirty times decocted essence of the critical study of generations, centuries, millenia ! We have comment on comment of annotated annotation."–History of Criticism Vol. I by Saintsbury.

विचार-स्वातंत्र्याचा लोप

विचारस्वातंत्र्य कसें लोपूं लागले होते यांचीं अनेक शास्त्रांतील उदाहरणें देता येतील. पैकीं दृक्प्रत्ययनिष्ठ जे ज्योतिषशास्त्र त्यांतील विशेष रोचक होत. त्यांतील संपातचलन व ग्रहण हे दोन विषय पाहू. आधुनिक खगोल-विज्ञानाच्या मतानें सपाताचें विलोमगतीनें संपूर्ण भ्रमण होतें असे मानलें जातें[1]. आपल्या ज्योतिषाचार्यांतहि हे संपूर्ण भ्रमण मानणारा मुंजाल नांवाचा आचार्य दहाव्या शतकात होऊन गेला. पण मुंजालाचे मत खरें मानलें तर श्रुतींतील अमक्या मासात अमुक ऋतु येतो या वचनाला विरोध येतो म्हणून भास्कराचार्यांचा सतराव्या शतकातील टीकाकार मरीचिकार मुनीश्वर यानें मुंजालास दोष दिला व सपाताचे आंदोलन मानणेच योग्य असे ठरविले. त्यावर दीक्षित लिहितात, 'मरीचिकारानीं मुंजालास दोष दिला तो त्याच्या दृष्टीने ठीक आहे. पण संपाताची प्रदक्षिणा पूर्ण होणे न होणे हें आपल्या हातीं नाही हे मरीचिकाराच्या लक्षात आलेले नाहीं!' (पृ. ३३२). स्मृतिपुराणादि ग्रथातून वर्णिलेली युगगणनेची पद्धतीहि ज्योतिषशास्त्रास संमत नाहीं. पण ती स्मृतिप्रणीत असताहि रोमकसिद्धान्त नावाच्या ग्रंथाच्या कर्त्यानें स्वीकारली नाहीं म्हणून ब्रह्मगुप्ताचार्याने त्यावर ठपका दिला आहे. तो लिहितो: युगमन्वंतरकल्पाः कालपरिच्छेदकाः स्मृतावुक्ताः। यस्मान्नरोमके ते स्मृतिबाह्यो रोमकतस्मात्।' (दीक्षित पृ.१५५)

---

१. वर्षांतील ज्या दिवशीं दिवस-रात्र सारखी असतात त्या दिवशी सूर्य ज्या स्थानीं असतो त्यास सपात म्हणतात. हे स्थान विलोमगतीने म्हणजे कृत्तिका, भरणी, अश्विनी अशा रीतीनें हळूहळू सरकत जात असतें. पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरत असतां तिच्या आसाचें टोक उत्तर ध्रुवाकडे रोकलेले असतें. पण चंद्राच्या आकर्षणामुळें तें स्थिर राहत नसून ध्रुवाभोंवती अत्यंत सूक्ष्मगतीने शेंकडो वर्षांत लहानशा वर्तुलाकार कक्षेंत फिरत असतें. याचा परिणाम संपातावर होतो सायनवादी हें चलमान संपात हें वर्षाचें आरंभस्थान मानतात. त्यामुळें ऋतुमान व महिने यांत फरक होत नाही. निरयनवादी आरंभस्थान अचल मानतात त्यामुळें कालांतरानें ऋतुचर्येत फरक पडतो.

याच ब्रह्मगुप्तानें ग्रहणाच्याविषयीं दुसऱ्या एका आचार्याच्या शास्त्रीय विचारसरणीची कशी थट्टा केली आहे हें पाहण्यासारखें आहे. पाचव्या शतकात आर्यभट्ट नावाचा एक कुशाग्र बुद्धीचा ज्योतिषी आपणांत होऊन गेला. बहुतेक ज्योतिषी असे मानीत कीं, आकाशांतील सूर्यचंद्रादि तेजोगोल पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना रोज दिसतात तो भ्रम नसून तें त्याचे वास्तविक भ्रमणच होय. आर्यभट्ट हा एकच एक ज्योतिषी मात्र असा होऊन गेला, कीं ज्यानें हें सामान्य मत चुकीचें ठरविलें. सूर्यचन्द्रादिकाचें भ्रमण हें वास्तविक नसून पृथ्वी आपल्या आसाभोंवतीं फिरते त्यामुळे उत्पन्न झालेला दृक्भ्रम होय असें त्यानें निःसंदिग्धपणे प्रतिपादन केलें. अनुलोमगतिः नौस्थः पश्यत्यचलं विलोमगं यद्वत् । अचलानि भानि तद्वत् समपश्चिमगानि लङ्कायाम् ।। पण नंतरच्या ग्रथकारानीं त्याला जवळ जवळ मूर्खांत काढलें. येथें 'मूर्खांत काढलें' हे शब्द मी अतिशयोक्तीने लिहीत नाहीं; कारण सातव्या शतकातील ब्रह्मगुप्त यानें आर्यभट्टाविषयीं असे टाकून लिहिलें आहे कीं, या आर्यभट्टानें इतक्या चुका केलेल्या आहेत कीं, त्याची गणती करणें अशक्य आहे. 'आर्यभट्टदूषणानाम् संख्या वक्तुं न शक्यते !' तो विचारतो, पृथ्वी जर खरोखर फिरत असती तर तिच्यावरचे डोंगर-पर्वत ढासळले नाहींत कसे ? "आवर्तनं उर्व्याः चेत् न पतन्ति समुच्छ्रयाः कस्मात् ।" दुसरा एक लल्ल नावाचा ग्रंथकार शंका प्रदर्शित करितो कीं, पृथ्वी जर फिरत असती तर सूर्योदयीं घरट्यांबाहेर पडलेल्या पक्ष्याना सायंकाळीं आपलीं घरटीं कशीं सापडलीं असतीं ? 'यदि च भ्रमति क्ष्मा तदा स्वकुलायं कथमाप्नुयुः खगाः' (दीक्षित– पृष्ठें १९५, १९७, २२८).

याच ब्रह्मगुप्ताला, अल्बेरुणीच्या हकीकतीवरून पाहता, ग्रहणें हीं राहूकेतूनें चंद्रसूर्य ग्रासल्यामुळें लागतात असलें अशास्त्रीय मत आग्रहानें प्रतिपादन करावें लागलें. यावरून शब्दप्रामाण्याचा पारा कसा चढत चालला होता हें कळून येतें. ब्रह्मगुप्ताच्या पूर्वी होऊन गेलेल्या ज्योतिष्याना चंद्रग्रहण हें पृथ्वीच्या छायेमुळें होतें ह्या शास्त्रीय सत्याचा शोध लागलेला होता. यासबंधींचें ब्रह्मसिद्धान्ताच्या पहिल्या प्रकरणातील अवतरण अल्बेरुणीनें आपल्या ग्रंथात घेतलें आहे. त्या अवतरणात म्हटलें आहे,

" काहीं लोक म्हणतात कीं ग्रहणें हीं राहू-केतूमुळें लागत नाहींत. पण हा निव्वळ मूर्खपणा होय. वेद हे साक्षात् ब्रह्मदेवाच्या मुखातून निसृत झालेले. ते म्हणतात कीं, ग्रहणें राहू-केतूंच्या ग्रासामुळे लागतात. स्मृतिकार मनु, ब्रह्मपुत्र गर्ग, याचाहि असाच अभिप्राय आहे. पण या वेदप्रणीत व सुप्रतिष्ठित मताच्या विरुद्ध वराहमिहिर, श्रीगणेश, आर्यभट्ट, विष्णुचंद्र प्रतिपादन करीत आहेत कीं ग्रहणाशीं राहूकेतूंचा काडीमात्र संबंध नाहीं म्हणून. आता हें जर खरें असेल तर ग्रहणाच्या काळीं ब्राह्मणलोक अंगाला गरम तेल लावतात व शास्त्राज्ञेनुसार धर्मकृत्ये करितात तीं फुकट म्हणायचीं ? ग्रहणाविषयींची त्याची कल्पना जर खोटी असेल तर त्यांच्या धार्मिक कृत्यांचें फल त्याना स्वर्गांत कसें मिळू शकेल ? म्हणून वेद आणि मनुसंहिता अशा प्रमाणग्रंथाच्या विरुद्ध जातील असलीं मतें वरीलसारख्या ग्रंथकारांनीं माडण्याचे सोडून द्यावें हाच उत्तम मार्ग कारण वेद, स्मृति आणि संहिता यात जे जें आलेलें आहे ते सर्व सत्य होय."[१]

ब्रह्मगुप्ताने ज्या गर्गाचा उल्लेख केला आहे त्या गर्गाची दृष्टि किती विशाल होती हें म्लेच्छापासूनीह ज्ञानग्रहण करण्यास तो तयार होता याविषयीं दहाव्या प्रकरणात ' म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रं इदं स्थितम् । ' हा जो श्लोक दिला आहे त्यावरून दाखविलेच आहे. यावरून ब्रह्मगुप्ताच्या कालानंतर स्वतंत्र विचाराचे वारे उलटे वाहू लागले असें दिसतें. पाश्चात्य गॅलिलिओप्रमाणें खुद्द ब्रह्मगुप्ताला कदाचित् छळहि सोसावा लागला असेल आणि म्हणून त्याने शास्त्रीय सत्य पडपून टाकून रूढ मताला मुजरा केला असेल. सूर्यावरील डाग स्पष्टपणे दुर्बिणीतून पाहिले असताहि व ते पाहिल्याचें प्रकटपणें प्रतिपादन केल्यावरहि अंतीं धर्माचार्यांच्या छळाला कंटाळून आपलें मत भ्रामक होय असे गॅलिलिओनें दीनवाणें जाहीरपणें कबूल केलें; तसाच प्रकार ब्रह्मगुप्ताच्या बाबतीतहि झाला असावा. कारण अल्बेरुणी लिहितो : " मला तर वाटतें कीं, ब्रह्मगुप्तासारख्या कुशाग्र बुद्धीच्या ज्योतिषाने वरीलसारख्या रूढ मताचें समर्थन जेव्हां केलें तेव्हां सात्रेटिसासारखी त्याच्यावर काहीं तरी मोठी

---

१. Indica II p. 111.

आपत्ति आलेली असावी. त्यानें ब्रह्मसिद्धान्त रचिला तेव्हा तो बावधा तीस वर्षांचा होता. त्याच्यावर खरोखरच काहीं आपत्ति आली असेल तर त्याला अधिक दूषण न देता मी हा विषय येथेच सोडून देतो'' (पृ. ११२). उत्तरकालीं त्याने शास्त्र आणि रूढि याचा मेळहि घातला. ब्रह्मसिद्धान्ताच्या गोलाध्यायाचा उल्लेख करून दीक्षित लिहितात कीं, 'चद्रग्रहणीं-भू-छायेमध्ये आणि सूर्यग्रहणीं चद्रामध्यें प्रवेश करून राहू चद्र-सूर्यांस आच्छादतो असे ब्रह्मगुप्ताने सागितले आहे' (पृ. ४४३).

सॉक्रेटिसानें मृत्यु स्वीकारला, पण मते सोडलीं नाहींत. यामुळें त्याचें नाव ग्रीसच्या इतिहासात अजरामर होऊन राहिलेलें आहे. गॅलिलिओनें धर्मच्छळापुढे नमतें घेतले तरी त्याच्या पश्चात् धर्ममताना धूप न घालता शास्त्रीय सत्याची निष्ठेने जोपासना करणारी परंपरी युरोपमध्यें निर्माण झाली. हें दर्शविण्याकरिताच ज्योतिषशास्त्रातील थोडा तपशील येथें दिला आहे. तशी परपरा आपल्याकडे मात्र दुर्दैवाने निर्माण झाली नाहीं. भारतीयाची धार्मिक वृत्ति ही उदार व सहिष्णु कशी होती हें आपण मागें पाहिलेच आहे. त्यामुळें वेदाना शेलक्या शिव्या मोजणारा चार्वाक याचाहि छळ झाल्याचें आढळत नाहीं. पण हेंहि नमूद केलें पाहिजे कीं, येथे नवीन विचाराकरिता झगडणारे वीरही आढळत नाहींत. उत्तरोत्तर विवेकवादी तर्कनिष्ठ विचारप्रवाह आटत जाऊन अधश्रद्धेचें वैराण वाळवंट सगळीकडे पसरूं लागले व गूढविद्येचे बड माजलें. साक्षीपुराव्याचे सत्यासत्य ठरविण्याच्या बाबतींत दिव्य करण्याची पद्धती मान्यता पावली. मनुस्मृतीपेक्षा याज्ञवल्क्याच्या स्मृतींत दिव्य करण्याच्या पद्धतीचा विस्तार झालेला आढळतो. सातव्या शतकानंतरच्या काळात लिहिलेल्या भवभूतीचें मालतीमाधव, राजशेखराचें बालरामायण व कर्पूरमंजरी याच्यामध्यें मात्रिकाचें प्रस्थ आहे. सन ११२३ च्या सुमारास गागेयदेव नामक राजानें मुक्ति मिळविण्याकरिता आपल्या शंभर स्त्रियासह गंगेमध्ये उडी घेतली असें त्याच्या मुलानेंच एका ताम्रलेखात लिहून ठेविलें आहे![1] शत्रूवर जय मिळ-

१. Epigraphia Indica II. p. 4.

विण्याच्या बाबतीतहि पुराणग्रंथातून जारणमारणाचे मंत्र सविस्तर देण्यात येऊं लागले. दहाव्या-अकराव्या शतकाळील 'अग्निपुराण' हा एक ज्ञान-कोशच आहे. त्यात 'सर्वदा जप होमाद्यैः पाठाद्यैश्चारणे जयः' असा सिद्धान्त माडून ॐ मारय ॐ छिद असले शत्रूला मारण्याचे मंत्र दिलेले आहेत (अ. १३५). राजेलोक असल्या गोष्टीवर विश्वसून सैन्य सज-विण्याच्या कर्तव्याकडे सर्वथा दुर्लक्ष करीत असे येथे सागावयाचे नाहीं. पण विवेकवादापेक्षा गूढवादाची छाया दाट पसरत चालली होती एवढेच दिग्दर्शित करावयाचें आहे.

मंत्रतंत्र, जादूटोणा याचे प्रकार अथर्ववेदाइतके जुने आहेत पण त्याचा प्रसार जाणत्यानीं आणि श्रेष्ठानीं केलेला नव्हता. वेदत्रयीमध्यें अथर्ववेदाला स्थान नसे. चाणक्याच्या काळीं असले प्रकार सामान्य जनतेत रूढ होते. देवतेची मोठी पोकळ मूर्ति करून तिच्या आत लपून बसून देवता बोलते आहे असे भासविणें, वारुळात आधींच सोने पुरून ठेवून वारुळातील नागाच्या आराधनेनें प्राप्त झाले आहे असें दाखविणे, अगाला लखलखणारीं रसायनें चोपडून नदींत वा सरोवरात उभे राहून वरुण राजा आहोंत असें भासविणे, असले प्रकार चाणक्याने वर्णन केले आहेत. पण ते कशाकरिता ? तर धूर्त राजानें या सर्व साधनाचा उपयोग मूढ व अज्ञ जनतेला फसविण्याकरिता करावा म्हणून ! फलज्योतिष, मुहूर्तविद्या वगैरेवरहि त्याचा विश्वास नव्हता. धूर्त राजानीं स्वतःचा बडेजाव राखण्याकरिता व लोकाना भूल पाडण्या-करिता या विद्याचा अवश्य उपयोग करावा पण स्वतः मात्र याच्या नादीं लागूं नये. कारण नक्षत्राच्या नादीं लागणाऱ्यापासून ऐश्वर्य दूर जाते असें त्यानें स्पष्ट प्रतिपादन केले आहे. (नक्षत्रं अतिपृच्छन्तं बालं अर्थः अति-वर्तते ।) पण पुढें पुढे हे विवेकवादी धोरण मागें पडून अंधश्रद्धा जोरावत चालली. महमद बिन कासीमशीं लढण्यास दाहीर बाहेर पडला तो उत्तम मुहूर्त निवडून पडला आणि शत्रूला बुधग्रह अनुकूल होता त्याच्या परि-हारार्थ बुधाची सुवर्णमूर्ति आपल्या पाठीशीं बाधून घेतली. पण शेवट काय झाला ? तर दाहर मारला गेला ![1] गुप्ताच्या काळीं पुराणाना आधुनिक

१. Elliot I. p. 169.

संस्करण प्राप्त झालें असें मानण्यात येतें. या पुराणामध्यें चाणक्यानें भोळसटपणाच्या म्हणून झिडकारलेल्या सर्व भोळसट समजुतींचा जणूं काहीं उत्साहानें पुरस्कार करण्यात आला. या पुराणकारानीं वंशानुचरित वर्णनाचे अनुषगाने जुन्या इतिहासाचे थोडेंबहुत रक्षण केलें हे खरे, तसेंच अग्निपुराणासारख्या काहीं पुराणानीं नानाविद्याचा संग्रह केला हेंहि खोटें नाहीं. पण हा भाग सोडून दिला तर बाकीचा भाग निरनिराळ्या क्षेत्राच्या वर्णनानीं आणि उपास्यदेवतेसबंधींच्या अतिरंजित कथानीं भरलेला आहे. यामुळे धार्मिक भावनेला अवास्तव महत्त्व प्राप्त होऊन शास्त्र, विद्या, कला याच्या जोपासनेला तात्त्विक दृष्ट्या मूल्य कमी देण्यात येऊ लागले.

उदाहरणार्थ, देशावर परचक्र आलें तर देशातील जागतीं दैवते आपलें रक्षण करतील अशा कल्पना जनतेंत पसरत. महंमद कासीमने सिंधमधील देबाल शहराला वेढा दिला. त्या शहरात देवाचें मंदिर असून त्यामध्यें उंच ध्वज फडकत असे. ह्या ध्वजासंबधीं लोकांची अशी भोळसट समजूत होती कीं, मदिराचा हा उंच ध्वज जोंवर वाऱ्यावर फडफडतो आहे तोंवर देबाल शहराला कोणत्याहि प्रकारचा धोका नाहीं. महंमदाला याचा सुगावा लागताच त्याने पहिली गोष्ट केली ती हीच कीं, त्यानें आपला मोर्चा या मंदिराकडे वळविला व आपल्या मडिमारयंत्राचा मारा करून मंदिराचें शिखर व त्यावरील ध्वज हीं जमीनदोस्त केलीं. शहरवासीयाचा उत्साह खचला हें सागावयास नकोच. मुलतानचें सूर्यमंदिर हें हिंदूचें पवित्र क्षेत्र मुसलमानाच्या ताब्यात होतें. तें सोडविण्याकरिता हिंदूंनीं हल्ला केला कीं मुसलमानानीं मूर्ति फोडण्याचें भय घालावें कीं हिंदु तत्काळ मागें हटावे असें अल मसूदी सागतो.[१]

सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञानाची विकृति

या कालात एकंदर समाजधारणात्मक तत्त्वज्ञान विकृत होऊ लागलें. जातिभेदाचीं बंधनें अधिक कडक झालीं. निरनिराळ्या जातींत पूर्वी अन्नो-

१. Elliot p. 23

दकव्यवहार होत असे तो बंद पडून सोवळ्या-ओवळ्याचें बंड मर्यादेबाहेर वाढलें. वैदिक काळात व्रात्य लोकाना आर्य लोकाच्या सघात समाविष्ट करून घेण्याकरिता व्रात्यस्तोम नावाचा स्वतंत्र विधि असे याचा उल्लेख मागें आलाच आहे. मनुस्मृतीच्या काळापर्यंत म्हणजे खिती शकाच्या प्रारमीं ही स्थिति पार पालटून गेली. व्रात्य याचा अर्थ ब्रह्मकर्म न करणारे असा झाला व त्याच्याकरिता यज्ञाचे पुरोहितत्व स्वीकारल्यास पायश्चित्त घ्यावें लागू लागले "व्रात्याना याजनं कृत्वा त्रिभिः कृच्छ्रैर्व्यपोहति" याजनं या पदाचे स्पष्टीकरणही मेधातिथि व कुल्लुक या टीकाकारानीं व्रात्यस्तोमादियाजनं असे केलें आहे. धर्मसूत्रकाराच्या काळीं अन्नोदक-व्यवहारावर कडक बधन नसे. आपस्तब धर्मसूत्रकार लिहितो कीं, शूद्राच्या घरचे अन्न सेवन करू नये असे कोणी म्हणतात पण तो जर धार्मिक वृत्तीचा असेल तर त्याच्या हातचे अन्न घेण्यास हरकत नाहीं. 'सर्ववर्णाना स्वधर्मे वर्तमानाना भोक्तव्यम् शूद्रवर्जमित्येके। तस्यापि धर्मापनतस्य (१-६-१८) हें धोरण सुटत जाऊन त्यानें दुसरे टोक गाठले ते तीन भय्ये आणि चार चौके याचें! नवव्या दहाव्या शतकापर्यंत मिश्रविवाह बंद पडले नव्हते. सातव्या शतकातील कादंबरीकार बाणभट्ट याने आपल्या एका शूद्र सावत्र मातेपासून झालेल्या चद्रसेन नावाच्या पारशव बधूचा उल्लेख केला आहे. दहाव्या शतकातील सुप्रसिद्ध कवि व काव्यमीमासक राजशेखर हा स्वतः ब्राह्मण असून त्याची पत्नी चौहानवशीय क्षत्रिय राज-कन्या होती. अकराव्या शतकातील राजतरंगिणीकाराने मात्र असले अनुलोम पद्धतीचे विवाह निषिद्ध मानले (७।१२). हर्षभगिनी राजश्री ही विवाहाचे वेळीं प्रौढ होती असें बाणभट्टाने वर्णन केले आहे व सतीची चाल ही तर त्यानें मूर्खपणात काढली आहे 'यदेतत् अनुमरण नाम तन्मौर्ख्यम्'। पाचव्या शतकातील बराहमिहिराने स्त्रियाची नालस्ती करणाऱ्या पुरुषांचा उलट्या बोंबा मारणारे चोर म्हणून निषेध केला. अहो धाष्टर्य असाधूनां निन्दन्तामनघाः स्त्रियः। मुष्णतामिव चोराणा तिष्ठ चोरेति जल्पताम्। (बृहत्संहिता ७६।१७). पण बराहमिहिर व बाणभट्ट याना धर्मशास्त्रकारानीं धूप घातला नाहीं व बालविवाह, सती, बालविधवा-च्या पुनर्विवाहाचा निषेध याना उचलून धरलें.

राजतरंगिणीवरून असें दिसतें कीं, अस्पृश्याशीं संभाषण करणें हेंही पाप मानण्यापर्यंत मजल गेली. चंद्रापीड राजा चाभाराशीं बोलूं लागलेला पाहतांच दरबारी लोक बेचैन झाले. शेवटीं त्या चांभाराने विचारलें कीं, कुत्र्याच्याहिपेक्षा मी हलका झालों कीं काय ? (४।६७) या कालांत पोटजातींची संख्याही बेसुमार वाढू लागली. दहाव्या शतकापर्यंत ब्राह्मणातील पोटजातींना महत्त्व आलेलें नव्हतें. दानपत्रात ब्राह्मणाचा उल्लेख येई त्यात गोत्र व प्रवर तेवढा सांगण्यात येई. अकराव्या शतकापासून देशाचा आणि आडनावाचा उल्लेख होऊ लागला. बाराव्या शतकापर्यंत पंचद्रविड व पंचगौड या ब्राह्मणातील मुख्य भेदाचाहि उल्लेख येत नाहीं. शुद्धतेच्या कल्पना जसजशा अधिक कडक होत गेल्या तसतशी ब्राह्मणातील प्रांतीय भेदमूलक पोटजातींची संख्या वाढत गेली. कनोजीया, गुजराती, माळवी, काश्मिरी, देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाड अशा देशपरत्वें अखिलभरतखंडातील ब्राह्मण जातींच्या पंचवीस तीस पोटजाती बनल्या. त्या बनण्यासबबाच्या कारणाबाबत स्कंधपुराणात कथा आली आहे कीं, एका नागर ब्राह्मणानें आपली मुलगी जातकुळीची चौकशी न करिता ब्राह्मण म्हणविणाऱ्या एका गृहस्थाला दिली. पुढें बेंड बाहेर फुटलें कीं तो जातीनें चाडाळ होता म्हणून. ब्राह्मणात मोठीच खळबळ उडाली. तेव्हा असा प्रकार पुन्हा घडू नये म्हणून त्यानीं वडनगर येथें राहणाऱ्या सर्व ब्राह्मणकुलाची मोजदाद केली व या कुलाच्या बाहेर शरीरसंबंध निषिद्ध ठरविला. अशा रीतीनें नागरब्राह्मण ही एक स्वतंत्र पोटजात बनली. आर्यावर्तीतील ब्राह्मण हे अधिक शुद्ध व कुलीन या समजुतीनेंही या पोटजातींच्या फुटीर प्रवृत्तीस हातभार लावला. बंगालचा बल्लाळसेन, ओरिसाचा केसरी, गुजराथचा मूलराज यानीं आर्यावर्तातील ब्राह्मण मुद्दाम आपल्या प्रांतांत बोलावून आणले. हीं बाहेरून आलेलीं ब्राह्मणकुलें आपणास श्रेष्ठ समजत असल्यानें त्यानीं इतराशीं शरीरसंबंध निषिद्ध ठरविला व अशा रीतीनें नव्या पोटजाती निर्माण होऊं लागल्या. याच कालात क्षत्रियाच्यामध्येंही राजपुतान्यांतील, हिमालयातील आणि महाराष्ट्रातील असे भेद पडून ते रोटीबंद-बेटीबंद झाले. शिवाय अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या. त्यावरून

फुटीर प्रवृत्ति बळावत चाललेली स्पष्ट दिसते.[1] बधनें कडक झालीं म्हणून आचार सुधारला असें नाहीं. कुमारिलभट्टानीं आचारव्यतिक्रमाचीं उदाहरणे म्हणून 'अद्यत्वेपि मथुरानिवासी ब्राह्मणीना सुरापानम्' व ब्राह्मण लोक घोडे, उंट, खेचरे, सिंह याचा व्यापार करितात म्हणून निर्देश केला आहे[2]. उच्चवर्णीयानीं उजळ माथ्याने व्यापारात माल घेतला असता तर वैश्यवृत्ति सुधारली असती. तेंही झाले नाहीं.

पतितपरावर्तननिषेध

सामाजिक तत्त्वज्ञानाच्या विकृतीचे एक घातक उदाहरण म्हणजे बलात्कारानें बाटविलेल्याच्या शुद्धीचाही निषेध हें होय. आठव्या शतकातील देवल स्मृतिकारानें बलात्काराने बाटविल्या गेलेल्या व गर्भ राहिलेल्या स्त्रियानाही शुद्धिसंस्कार करून पुन्हा जातींत प्रविष्ट करावें असें प्रतिपादिले होतें.[3] पण अकराव्या शतकातील अल्बेरुणी लिहितो कीं, 'शुद्धीचें प्रायश्चित्त सांगितले असले तरी व्यवहार पाहिला असता बाटलेल्याना पुन्हा पहिल्या जातींत प्रविष्ट केले जात नसे. पुष्कळ वेळा त्याची स्वतंत्र जात होई.' या व रोटीबेटीव्यवहाराच्या कडक बदीमुळे पोटजातींची संख्या अतोनात वाढली. जुलुमानें बाटविलेल्यानाही परत न घेण्यात आपण आपल्या राष्ट्राचे संख्याबल खचीं करीत आहोत याची जाणीव नष्ट झाली. 'रजसा शुद्ध्यते नारी विमलं काचन यथा' असलीं वचनें मागें पडून कलिवर्ज्याच्या कल्पनेप्रमाणे बलात्कारानें दूषित झालेल्याहि स्त्रीचा स्वीकार करणें निषिद्ध ठरविलें 'बलात्कारादिदुष्टस्त्रीसंग्रहो विधिचोदितः।' बाटविलेल्याना परत स्वधर्मात घेण्याचें धोरण चालू असतें तर हिंदुस्थानात पाकिस्तान थाटू पाहणारें भूत वेळींच थडग्यात गाडलें गेलें असते. आजच्या मुसलमानापैकीं बहुसंख्य लोक पूर्वहिंदु होत. कांहींनी पूर्वीची चालरीतही राखली. मुंबई इलाख्यातील खोजा आणि कच्छी मेमण

१. चि. वि. वैद्य—मध्ययुगीन भारत, भाग १, पृ. ८.

२ जै. १.१.३ वरील तंत्र वार्तिक.

३. योषा गर्भं बिभर्त्ति या म्लेच्छात्कामादकामतः
कृच्छ्रसांतपनं शुद्धिः घृतैः योनेश्च पाचनम् ॥ ४८-४९.

याच्यात हिंदुधर्मशास्त्रातील वारसापद्धति १९२० पर्यंत रूढ होती. हे दोन्ही समाज पूर्वीचे हिंदु[1]. समुद्रयान करणें हें पाप मानण्यात येऊं लागलें. मलबार किनाऱ्यावरील राजाना पूर्वापार चालत आलेला समुद्रावरील व्यापार हातीं ठेवावयाचा होता; पण समुद्रयान करणे हें तर शास्त्रानें निषिद्ध ठरविले. तेव्हा त्यानीं अशी विक्षिप्त तोड काढली कीं, प्रत्येक हिंदु कुटुंबातील एकेका व्यक्तीनें इस्लाम धर्म स्वीकारावा आणि दर्यावर्दीपणा चालवावा![2] असल्या तर्कदुष्ट विचारसरणीने आपण आपल्या शत्रूंचे सख्याबल वाढवीत आहोत याची ह्या राजे लोकाना कल्पनाही नसावी हे आश्चर्यच होय. असाच प्रकार मध्यप्रातात हलवी नावाची जात आहे तिच्यासंबंधीं आढळतो. त्याच्यात अशी चाल आहे असें म्हणतात कीं, या जातींत जी अनौरस संतति निर्माण होते ती मुसलमानांस अर्पण करण्यात येते. जुलुमजबरदस्तीने बाटविण्याचा प्रयत्न परधर्मीय करीतच होते. त्यात ही आणखी भर. बाटलेल्याना परत घेण्याची तर आवश्यकताहि उमगेनाशी झाली. राजपुतान्यातील जेरिया हे मूळचे रजपूत असून मुसलमान झाले. पुढे त्यानीं हिंदुधर्मात येण्याची खटपट केली. पण राजपुतानीं त्याना परत घेतले नाहीं. सर्वच ठिकाणीं असा प्रकार झाला नाहीं हेंच विशेष. बाटलेल्याना परत हिंदु करून घेण्याच्या विरुद्ध मुसलमानी कायदा कडक होता तेव्हा धर्मभ्रष्टाची शुद्धि करणें राजसत्तेचे पाठबळ असल्याविना अशक्य होतें. तसें पाठबळ असताना शुद्धीचा अवलंब करण्यात आला हे शिवाजीनें निंबाळकराला शुद्ध करून घेतले यावरून दिसून येते. तत्पूर्वीही मधून मधून शुद्धीकरणे घडत. १३९८ मध्ये फिरोजशहा बहामनीनें विजयनगरच्या देवरायाचा पराभव करून दोन हजार ब्राह्मण मुली बाटविल्या पण एक लक्ष होन देऊन त्याना सोडवून परत आणल्यावर त्याना पुन्हा हिंदु धर्मात घेतलें. अशींच आणखी काहीं उदाहरणें श्रीरामशर्मा यानीं कलकत्ता रिव्हयूच्या १९३४ च्या दोनतीन अंकात दिलीं आहेत. देवलस्मृतीनंतरच्या धर्मशास्त्रकारानीं मात्र शुद्धीचा पुरस्कार केला नाहीं.

१. History of Dharmashastra by P. V. Kane Vol. II. p.389.

२. सावरकरसाहित्य भाग २ पान ९४.

धार्मिक बाबतींतहि सोवळ्या-ओवळ्याचे, व्रतवैकल्यांचें आणि शुभाशुभ-मुहूर्तांचें बंड माजत चाललें. बुद्ध आणि भिक्षुणींना नैष्ठिक ब्रह्मचर्यानें राहण्याची आज्ञा असे. पण आळशीपणामुळें आणि पोटभरूपणामुळें संघात शिरलेल्या असख्य भिक्षु-भिक्षुणींना योग्यानाहि कठीण असा मनोनिग्रह साध्य होणे दुर्घटच होते. यामुळें मठातून गुप्त अनाचार तर माजलेच पण या अनाचाराला उघडपणें भिरविता यावें म्हणून तांत्रिक पंथातील जो वाममार्ग त्याचे तत्त्वज्ञान निर्माण झाले. त्या पंथातील मद्यमैथुनादि पापमय पच'मकारा'ना पुण्याचीं साधने म्हणून मिरविता येऊं लागले. 'प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धि'सारख्या तंत्रग्रथातून "जनयित्रीं स्वसारं च स्वपुत्रीं भागिनेयिका। कामयन्तत्त्वयोगेन लघु सिध्येति साधक" ॥ असलीं बाष्कळ मते उघडपणे माडण्यात येऊ लागलीं (गंगापुरातत्वाक पृ. २१९). वैदिकधर्मीयांनीहि हा प्रकार अन्य तऱ्हेने मान्य केला. याच्यामध्यें मधुरपथ आणि पुष्टिमार्ग निर्माण झाले आणि त्यानीं आध्यात्मिक रूपकाच्या सबबीवर राधाकृष्णाच्या कामुक लीलाचे अमर्याद वर्णन करण्यास सुरुवात केली. अकराव्या शतकातील जयदेवाचे गीतगोविंद हे नादमाधुर्य आणि भावोत्कटता या दृष्टींनीं एक श्रेष्ठ दर्जाचें काव्य आहे. पण यातील भाव म्हणजे उत्तान शृगार असून तोहि परस्त्रीविषयक आहे याची जाणीव या काव्याचें रसग्रहण करीत असता मनाला टोचल्याशिवाय राहत नाहीं. राधा म्हणजे आत्मा आणि कृष्ण म्हणजे परमात्मा असे कितीहि निक्षून सांगितलें व राधेचे प्रेम हे शुद्ध निष्काममक्तीचे प्रतीक होय असें कितीही बजावलें तरी असल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून उत्तान वैषयिक शृंगाराचें वर्णन करावें हें विकृत मनोवृत्तीचेंच लक्षण होय.[1]

नाटकांतील प्रतिबिंब

अकराव्या शतकातील कृष्णमित्र नांवाच्या एका यतीनें प्रबोधचंद्रोदय नावाचें एक वेदान्तपर रूपकात्मक नाटक लिहिलें आहे. त्यात त्या वेळच्या काहीं धार्मिक पंथातील आचाराचें जें वर्णन आलें आहे तेंही त्या काळच्या

१. द. के. केळकरकृत काव्यालोचन (दुसरी आवृत्ति) पृ. २२६.

धर्माच्या प्रातात माजलेल्या वैचारिक अराजकतेचें निदर्शक आहे. नाटकाच्या तिसऱ्या अंकात शाति आणि करुणा या दोन स्त्रिया आपली मैत्रिण जी श्रद्धा तिच्या शोधाकरिता निरनिराळ्या पंथाच्या मठातून तपास करीत हिंडतात असें दाखविले आहे. दिगंबराच्या मठाजवळ त्या आल्यावर त्याना एक क्षपणक भेटतो. तो ओगळ, चिखलानें माखलेला, डोक्याचे केस उपटून काढलेला, आणि मोरपिसें हातात घेऊन नागडा-उघडा नाचणारा असा प्रवेश करतो. तो आकाशाकडे पाहून म्हणतो, "ॐ नमो अलिहन्ताणम्। आत्मा विमल आहे, आणि त्याचें ज्ञान ऋषींची सेवा केल्यानें होते. आता ही सेवा कशी करावयाची म्हणता? तर सागतों ऐका. त्याना घरीं बोलावून उत्तमोत्तम पक्वान्नाचें भोजन घालावें आणि ते स्त्रियाशीं रगून गेले तरी आपल्या मनाची शाति ढळूं देऊं नये– ईर्ष्यामल न कार्यं ऋषीणा दारान्नममाणानाम्। " त्यानंतर शाति आणि करुणा ह्या बुद्ध भिक्षूंच्या मठाकडे वळतात. तेथें त्याना बुद्ध भिक्षूचे विचार ऐकावयास सापडतात. तेथील बुद्ध भिक्षु म्हणतो, "अहो, हा सौगत धर्म सर्वश्रेष्ठ आहे. ह्यात भोग आणि मोक्ष ह्या दोहोचीहि चंगळ आहे. या धर्मात सधन श्रेष्ठींच्या सुंदर स्त्रिया आणि मिष्टान्नभोजन याच्या संगतींत चादण्या रात्री कशा मजेत जातात! असें पाहा, संसार क्षणिक आहे, आत्मा क्षणिक आहे. म्हणून भिक्षूनीं स्त्रियाच्याकडे वाईट नजरेनें पाहिलें तरी चित्तात मत्सराला थारा देऊं नये. कारण मत्सर हें मनाचे मालिन्य होय." नंतर शाति आणि करुणा ह्या कापालिकाच्या आश्रमाकडे वळतात. तेथे त्याना एक नरमुंडमाला धारण करणारा कापालिक भेटतो. तो आपल्या पंथातील उपासनेचे महत्त्व दिगंबर आणि भिक्षु याना पटवून देताना वर्णन करितो कीं, "आमचा धर्म कोणता म्हणून विचारता? तर आम्ही महाभैरवाची पूजा करितों. आणि ती कशी? तर जित्या माणसाचा कंठनाल चिरून, त्यातून चिळकाड्याप्रमाणें उडणाऱ्या रुधिराचें आम्ही बलिदान करितों! आणि मृताच्या कवटीच्या चषकात सुरेचा नैवेद्य समर्पण करितों! आमचा पंथ हा भोगाचा पंथ आहे. आमचा देवाधिदेव जो चंद्रचूड तो पार्वतीसमागमे नेहमी कैलासावर क्रीडा

करीत असतो." नंतर हा कापालिक भिक्षु व दिगंबर याना आपला महाप्रसाद म्हणजे दारू प्यावयास देतो व ते ती यथेच्छ पिऊन तर्रर्र होऊन आनंदानें नाचू लागतात.

हें वर्णन एका नाटकातलें आहे आणि तेंहि एका प्रतिपक्षीयानें केलेलें आहे. त्यामुळें तें अतिरंजित आहे हें उघड होय. हें त्या काळाचें प्रतिनिधिरूप म्हणून घेताना अतिशयोक्ति गाळूनच स्वीकारलें पाहिजे. पण याच काळात धार्मिकानीं कृष्णराधेच्या व्यभिचारी लीला वर्णाव्या, काव्यमीमासकानीं ध्वनिकाव्य अथवा उत्तम काव्य यांचीं उदाहरणें म्हणून अनैतिक शृंगाराचीं वर्णनें एकजात द्यावीं,[1] कवींनीं दानपत्राच्या प्रारंभीं ईशस्मरण करावयाचें तेंहि अकुंठोत्कंठवैकुठकंठपीठलुठत्करः । सरभः सुरतारंभे स श्रियः श्रेयसेस्तु वः ।'[2] असल्या कामुक वर्णनानें करावें, जगन्नाथपुरीच्या पवित्र देवालयात अश्लील चित्रें काढलीं जावीं, या सर्व गोष्टी साकल्यानें एकत्र घेतल्या असता राष्ट्राची विवेकवादी बैठक भंग होऊन **बुद्धाचा तोल जाऊं लागला** होता असें स्पष्ट दिसतें. एका बाजूला वर्षाचे बारा मास आणि दिवसाचे तिन्ही त्रिकाळ पुरून उरतील इतकीं देहदंडन करणारीं व्रत-वैकल्यें आणि दुसऱ्या बाजूला धर्माच्या नावाखालीं आणि काव्याच्या नावाखालीं भोगलालसेची तृप्ति करणारे विविध प्रकार हे राष्ट्राची विवेक-बुद्धि घसरूं लागल्याचे दर्शक होत.

या तमोयुगापूर्वी श्रद्धेचा आणि विवेकाचा असे दोन्ही प्रवाह जोरकसपणें वाहत होते. संन्यास, गूढवाद, मायावाद, प्रारब्धवाद याचा एक प्रवाह, व विजिगीषा, कर्मस्वातंत्र्य, विवेकवादित्व याचा दुसरा प्रवाह. हे दोन प्रवाह काहीं काल जोमदार पण अलगपणें वाहत होते. आश्रम-पद्धतीचा पुरस्कार करून या दोन्ही प्रवाहातील विरोध काढून टाकणें शक्य होतें. स्मृतिकारानीं तसा प्रयत्नहि केला. सहाव्या अध्यायात संन्यास आश्रमाचा प्रस्ताव करताना प्रारंभींच मनूनें असा सिद्धान्त मांडला कीं, सामाजिक ऋण फेडल्यावरच मोक्षमार्गाकडे माणसानें वळावें. ऋणानि

१. काव्य लोचन (दुसरी आवृत्ति) पृ. २२२, २३.

२. ११०९ मधील गोविंदाश्रयाचा लेख मध्ययुगीन भारत भाग ३. पृ. ६९८.

त्रीणि अपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत्। इतकेंच नव्हे तर ऋणाची फेड न करिता मोक्षाच्या मार्गाला लागणाराचा अधःपात होतो असें ठणठणीतपणे बजावण्यासही त्याने कमी केलें नाहीं. अनपाकृत्य मांक्षं तु सेवमानो व्रजत्यधः। पण स्मृतिकाराच्या या प्रयत्नालाहि यश आले नाहीं, आणि शेवटीं विवेकवादाचा प्रवाह आटत गेला आणि गूढवादाचा आणि अंधश्रद्धेचा फोफावत गेला. भागवत पुराणकाराने तर भगवद्भक्ताला ऋणत्रयहि बंधनकारक नाहीं असे उघडपणे प्रतिपादण्यास कमी केलेलें नाहीं.

देवर्षिभूतात्मनृणां पितृणां न किंकरो नायं ऋणी च राजन्।
सर्वात्मना यः शरण शरण्य गतो मुकुंद परिचर्यया च ॥ (११.५ ४१)

जेते वैदिक आर्य व जित वेदबाह्य अनार्य याच्या दीर्घ झगड्याला शेवटीं हे स्वरूप आले! जिताची वृत्ति ही स्वभावतःच नैराश्यमय, दुःखवादी, संन्यासपर अशी बनते. ती दीर्घ काल टिकल्यास तिच्या समर्थनपर असे तत्त्वज्ञान निर्माण होतें. या जिताच्या वेदबाह्याच्या तत्त्वज्ञानानें उत्तरकालीं वैदिक जयिष्णु तत्त्वज्ञानाला खाऊन टाकलें. महाभारतांतील संन्यास व अहिंसा याचे प्रवक्ते विदुर, धर्मव्याध तूलाधार हे वेदबाह्य शूद्र होत. वेदबाह्यांशीं मिळतें घेता घेता वैदिक जयिष्णुवृत्ति पूर्ण नरमावली. इतकी कीं शेवटीं सर्वच पथ, वेदाती, बौद्ध आणि जैन हे सर्वच असे प्रतिपादू लागले कीं, संन्यासाकडे आणि मोक्षमार्गाकडे व्यक्तीनें हवे तेव्हा वळावें. ज्या दिवशीं किंवा ज्या क्षणीं विरक्ति उत्पन्न होईल त्या क्षणीं संन्यास घ्यावा किंवा संघात शिरावें. अपरिपक्व बुद्धीचे लोक संघात आणि मठांत शिरल्यामुळे त्यात अनाचार माजला यावर तोड म्हणून बालवयातच संसारात जखडून टाकण्याकरिता स्मृतिकारानीं बालविवाहाचा पुरस्कार केला. या पुरस्कारानें अकालीं भिक्षु व भिक्षुणी होण्याच्या प्रथेस थोडा पायबंद बसला असेल.

व्यावहारिक शास्त्रांची हेळसांड

जातिभेदाचीं बंधनें दृढ होत गेल्यानें निरनिराळ्या हरहुन्नरीच्या

विद्याकडे श्रेष्ठ वर्णाचे लोक दुर्लक्ष करू लागले. वैद्यकीसारखा अत्यंत समाजोपकारक असा धंदा तर प्राचीन कालापासूनच निकृष्ट मानण्यात येत होता. भैषज्याविषयी अनादर हा तैत्तिरीय संहितेइतका प्राचीन आहे. ब्राह्मणेन भेषज्य न कार्यम् (तै. स. ६-४-९-३) असा तैत्तिरीय संहितेत उल्लेख आहे. 'चिकित्सितात् पुण्यतम न किंचिदपि सुश्रुम' अशी ज्या धंद्याविषयी सुश्रुतात यथार्थ स्तुति आहे त्या धंदेवाइकाविषयी औशनस स्मृतीने 'नृपाया विप्रतः चौर्यात् संजातो यो भिषक् स्मृतः' असले मुर्दाड विधान केले आहे. ज्ञानेश्वरीतहि वैद्यकाला हीन लेखले आहे, 'आणि आयुर्वेद हि आघवा । याच मोहरा पाडवा । जो जिवाकारणे करावा । जीवघातु ॥ (१३.२२४). असले सर्व प्रकार युरोपात झाले पण ते लोक त्यातून बाहेर पडले. पण आम्ही मात्र गुरफटूनच राहिलो आणि शास्त्रकलादिकात मागसत चाललो.

युरापमध्येंहि अधश्रद्धेचे तमोयुग दाट माजलें होते. पण पंधराव्या सोळाव्या शतकानतर त्याच्या बुद्धीला लागलेलें ग्रहण सुटले आणि आपल्याकडे दिवसेदिवस स्वग्रास होत चालले असा एकदरीत प्रकार झाला. कृष्णमिश्रानंतर दोन शतकानीं ज्ञानेश्वराच्या काळीं आमच्याकडे व्यवहारनिपुण हेमाद्रि व्रतवैकल्याच्या याद्या तयार करीत होता तर त्याच काळीं पाश्चात्यात उपाध्यायवृत्तीचा रॉजर बेकन हा शास्त्रीय प्रयोगाचे महत्त्व लोकाना पटवीत होता आणि शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर माणसाला हवेंतून उडताहि येईल असें भविष्य वर्तवीत होता.

एकटे ज्योतिषशास्त्र घेतले तर पूर्वीच्यात व आताच्यात केवढे अंतर पडले आहे हे आपल्या प्राचीन ज्योतिषशास्त्राचा ज्यानीं आमूलाग्र अभ्यास केला आहे त्या विद्वद्वर्य दीक्षित याच्या तोंडूनच ऐकावे. ते लिहितात—" कोपर्निकसाचा ग्रंथ शक १४६५ मध्यें झाला. त्याच्या पूर्वी आमच्या देशातील व युरोपातील ज्योतिष सारख्याच स्थितींत होतें म्हटलें तरी चालेल. मात्र आमचें युरोपच्याप्रमाणें वर्धमान स्थितींत नव्हतें. कोपर्निकसाच्या पूर्वी नुकतेच आमच्या देशातील शोधक ज्योतिषी पितापुत्र केशव दैवज्ञ आणि गणेश दैवज्ञ होऊन गेले. पण कोपर्निकसापासून युरोपांतल्या ज्योतिषशास्त्राचें इतकें स्थित्यंतर झालें आहे कीं

पूर्वीचें आणि नंतरचें यास अनुक्रमे वटवृक्षाचा नुकताच उगवलेला रोपा आणि अनेक शतके वाढून आपल्या छायेत हजारों जीवास आश्रय देणारा अतिभव्य वटवृक्ष याची उपमा शोभेल" (पृष्ठ ५२२). युरोपमध्ये कोपर्निकसापासून पुढे भौतिकशास्त्राना विलक्षण बहर आला व आम्ही मात्र आमच्या जुन्या ज्ञानाच्या चाकोरींत घाणा घालीत बसलों. माधवचपूच्या प्रस्तावनेत राजवाडे लिहितात कीं, "शहाजीच्या हयातींत युरोपात डेकार्ट, बेकन इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थ-संशोधनकार्याचे वाली जारीनें पंचभूताचा शोध लावण्यास लोकाना प्रोत्साहन करीत होते आणि आपल्याकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादि संत पंचमहाभूताना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटींत होते. अशाना स्क्रू, टाचणी, बदूक व तोफ याचा विचार वमन-प्राय वाटल्यास त्यात नवल कसलें?" (पृ. १०७).

पाश्चात्याचे आजचें श्रेष्ठत्व हे त्याच्या भौतिक शास्त्रातील प्रगतीत व लोकशाही संघटनेत आहे. **ज्याचे शास्त्र त्याचें शस्त्र, आणि ज्याचें शस्त्र त्याचें राज्य ही प्रणाली अपरिहार्य आहे.** शिवाय शास्त्रानें नुसत्या शस्त्रालाच तीक्ष्णता येते असे नव्हे तर ते शस्त्र चालवणाऱ्या बुद्धीलाहि येते. शास्त्राच्या उपासनेने बुद्धीला शिस्त लागते, वृत्तीला निर्भयपणा येतो, अंतःकरणात आत्मविश्वास बाणू लागतो. याचा साकल्याने परिणाम म्हणजे शास्त्रवेत्त्याची संस्कृति उन्नतीच्या मार्गाला लागते. लोकशाही पद्धतीने ऐक्याची भावना सर्व राष्ट्रात पसरून दृढमूल होते. मुसलमानाच्या पुढे हिंदूना नामोहरम व्हावे लागले तरी त्याची संस्कृति हिंदूंच्यापेक्षा फारशी श्रेष्ठ नव्हती. नव्या विद्या हस्तगत करण्याचा उत्साह त्याच्यात होता; पण शास्त्र, विद्या, कला, धर्म यापैकीं कोणत्याच बाबतींत त्याच्याजवळून शिकण्यासारखे काहीच नव्हते. यामुळे शिवाजीनें त्याच्याच तोडीची शिस्त व संघटना निर्माण करिताच तो औरंगजेबाच्या प्रबल सेनेलाहि पुरून उरला. पण मोगल आणि मराठे या दोघांचे सामने खेळले जात असता पाश्चात्य राष्ट्रात एक नवीन अपूर्व अशी शक्ति निर्माण होत होती. त्या शक्तीपुढें लवकरच मोगल व मराठे दोघेहि निष्प्रभ ठरले.

पाश्चात्यांचें बलस्थान

हे पाश्चात्य कडवे लढवय्ये आहेत, अत्यंत धूर्त आणि कावेबाज आहेत, त्यांचें आरमार बलिष्ठ आहे, आघीं बखार घालतात आणि पाहता पाहता त्या बखारीचा अभेद्य किल्ला बनून जातो हें चाणाक्षांनीं ओळखिले होतें. पेशवाईत ओळखलें होतें एवढेच नव्हे तर 'आज्ञापत्रकारा'च्या काळीं म्हणजे राजारामाच्या वेळीं व तत्पूर्वी शिवभारतकाराच्या काळीं म्हणजे शिवाजीच्या काळींहि हे बलिष्ठ आहेत, युद्धविद्येंत विशारद आहेत, हें हिंदु आणि मुसलमान या दोघांनींहि ओळखिले होते. शिवभारतकार तिसऱ्या अध्यायात प्रारंभींच लिहितो, " अथाग्नियंत्रसंधानविशेषोद्यम-विक्रमान् । प्राकारयुद्धकुशलान् ऋध्या जितधनेश्वरान् ॥ मयमायाधरान् अब्धिमध्यसंचारदुर्धरान् । " पुढें पेशवाईत तर अधिक स्पष्टपणे उमगूं लागलें. त्यांचीं शस्त्रेंहि आपणापेक्षा अधिक संहारक, अधिक अचूक होतीं हें पटलेलें होतें; तथापि दारूगोळा तयार करण्याचे व तोफा ओतण्याचे काहीं प्रयत्न येथें झाले असले तरी शिवाजीच्या वेळेपासून पेशवाईअखेर तोफा आणि बंदुका पाश्चात्यापासून विकत घेण्याचाच प्रघात असे. मुंबईहून तोफा व गोळे खरेदी करून पाठविण्याचें काम पेशव्याचा साष्टी येथील अधिकारी व मुंबई येथील रत्नोजी आगरवाले व पालनजी पार्शी हे करीत[1]. अर्थात् ज्या शत्रूशीं सामना द्यावयाचा त्याच्याकडूनच संहारक शस्त्रें विकत घेण्याचा लाचारपणा करणारास जय कितपत मिळणार हें वर्तविण्यास कुडली माहण्याची आवश्यकताच नाहीं. पण हा लाचारपणा स्वीकारल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण भौतिक शास्त्राची अक्षम्य हेळसांड झालेली होती. फिरंग्याकडून शस्त्रें विकत घेऊनहि त्यानें करामत काय होई याचें खरे शास्त्र्यांनीं वर्णन केलें आहे कीं, " आमच्या फौजाचे मोर्चे एखाद्या किल्ल्यास बसले म्हणजे मोर्च्यांत गोलंदाजानीं एकदा तोफेचा बार कादून पुनः बार भरून ठेवावा, मग चिलीम ओढावी, घटका दोन घटका गप्पागोष्टी कराव्या, इकडे तिकडे थोडें हिंडावें, मग तोफेजवळ जाऊन भरलेला बार सोडावा

१. पेशवेकालीन महाराष्ट्र पृ ५३१.

व दुसरा मरून ठेवावा. पुनः चिलीम, गप्पा वगैरे प्रकार व्हावे; याप्रमाणें सायंकाळपर्यंत दहा-पाच वार काढून तोफ तळावर आणून पोचती केली म्हणजे संपला रोजगार. या लिहिण्यात अतिशयोक्ति बिलकल नाहीं. इंग्रज प्रेक्षकानीं जे लिहून ठेवलें व जुना पत्रव्यवहार आम्हीं जो वाचला आहे त्यावरून अशीच वहिवाट असल्याचें अनुमान निघतें." ('मराठे इंग्रज' प्रस्तावना.)

पाश्चात्यांचें बळ त्यांच्या श्रेष्ठ शस्त्रांत व शिस्तींत आहे हें हिंदूंनीं ओळखिलें होतें पण त्यांचीं श्रेष्ठ शस्त्रें आणि श्रेष्ठतर शिस्त या दोन्हीच्याहि पाठीशीं असणारें त्यांचें खरें बळ ओळखिलें गेलें नव्हतें. हें त्यांचें श्रेष्ठतम बल त्यांच्या शास्त्रीय प्रगतींत होतें. दिल्लीदरबारचें रुपेरी छत फोडण्याचा भीमपराक्रम करणारे सदाशिवरावभाऊ आमच्यात होते पण यःकश्चित् घड्याळ करणारा जिनगर आमच्यात नव्हता. इंग्रज हे शत्रूचें सैन्य दहापाच मैलावर असतां आपल्या दुर्बिणींतून न्याहाळीत होते तर आम्ही नक्षत्राकडे पाहून ज्योतिष्याना मुहूर्त विचारीत होतों. स्टीफन्सन् हा आपल्या खिस्तपुराणाच्या शेकडों प्रती छापखान्यातून छापून काढून गोरगरिबाना वाटीत होता तर त्याच वेळीं एकनाथी भागवताची एकेक प्रत चार महिने खपून आम्ही हातानें लिहून काढीत होतों. पाश्चात्याचे हें शास्त्रीय प्रगतींतील मर्म आम्हीं ओळिखलें नव्हतें. आम्ही दिल्लीन्द्रपदलिप्सवः होतों. आमची नजर बादशाही सिंहासनावर खिळलेली होती. आणि या सिंहासनावर अधिष्ठित झालेले मुसलमान सुलतान आमच्यापेक्षा विद्येमध्यें कोणत्याही रीतीनें पुढारलेले नव्हते. पण जगात इतर राष्ट्रें पुढारलेलीं होतीं त्याची काय वाट ! त्याची दखलगिरी आम्हीं बाळगिली नाहीं हाच आमचा घोर प्रमाद. पेशवाईच्या अखेरीस पुण्यास देवीची साथ उद्भवली. तिचा प्रतिकार यशस्वी रीतीनें कसा करावा हें आम्हास माहीत नव्हते. पण शेजारच्या रेसिडेन्सींत गोरे लोक रहात होते त्यानीं देवीची लस टोचून घेतली, आणि त्यापैकीं कोणी दगावलाहि नाहीं. पुण्यातील लोकाना हें वृत्त कळलें तेव्हां रेसिडेन्सींतील गोऱ्या डॉक्टरला मुद्दाम पाचारण करून हजारों लोकानीं त्याच्याजवळून लस टोचून घेतली. नाना फडणिसानें १७९५

मध्यें काशीस कर्मनाशी नदीवर पूल बाधावयास काढला असता नदीचें पाणीच हटेना. झालें ! आमच्या इंजिनिअरानीं हातपाय गाळले. मात्रिक-तात्रिकानीं जलदेवतेला प्रसन्न करण्याकरिता तोडगे केले. नानाचा काशी येथील कारकून कुंटे यानें कुमारस्वामी कोमटी याच्या विद्यमानें अनुष्ठान आरंभिलें. पण शास्त्रीय उपाय योजण्याचे सोडून अर्थशून्य बडबड करणाऱ्या या मात्रिकाकडे पाहून जलदेवता मनात फक्त हसली असावी. शेवटीं नाना फडणिसानें केलें काय तर बेकर नावाच्या इंग्रज इंजिनियरला बोलावणे धाडलें, आणि तो आल्यावर कृष्णाचा स्पर्श होताच यमुनेनें वाट द्यावी त्याप्रमाणें बेकरच्या कळीच्या बबाचा स्पर्श होताच जलदेवतेने सुखानें पूल बांधूं दिला ! (जुन्या ऐतिहासिक गोष्टी इतिहाससंग्रह). इंग्रज लोक हे असल्या विद्येंत आपल्यापेक्षा पुढारलेले आहेत हें नाना फडणिसासारख्याना कळून चुकले होतें. पण ही विद्या आपण आत्मसात् केली पाहिजे याची आवश्यकता मात्र त्याना पटल्याचे दिसत नाहीं.

जगाचें अक्षम्य अज्ञान

त्याचें एक कारण म्हणजे हिंदूंचा विश्वसंचार थाबला होता व ते कूप-मंडूकवृत्तीचे झाले होते. या वृत्तीचें उत्तम निदर्शक उदाहरण म्हणजे त्याचें भूगोलाचे ज्ञान होय. नाना फडणीस त्यातल्या त्यात चौकस व जागृत बुद्धीचा मुत्सद्दी असल्यानें हरतऱ्हेच्या ज्ञानाचा सवाई माधवराव पेशव्याच्या शिक्षणक्रमात समावेश करावा असें त्यास वाटे. पण त्या काळीं खुद्द हिंदूचें भूगोलविषयक ज्ञान हिंदुस्थानच्या बाहेरील प्रातांविषयीं सर्वस्वीं शून्याकार होतें. पुर्तुतुनिया, रोम वगैरे काहीं तुरळक नावें त्याच्या कानावरून गेलीं असतील तेवढींच. पण बाकीच्या जगाची त्याना कल्प-नाहि नव्हती. नाना देशींचे नाना सौदागर हरतऱ्हेचे, हरहुन्नरींचे जिन्नस विकावयास घेऊन आपल्या बंदरीं येत तसले पदार्थ तयार करण्याची कारागिरी आपल्याकडे नाहीं याची अस्पष्ट जाणीव असे. पण परकीय सौदागर जेथून येतात त्या सातासमुद्रापलीकडे कोणते देश आहेत, तेथें शास्त्र, विद्या, कला कोणत्या दशेप्रत आलेल्या आहेत याची कधीं चौक-

शीच केली गेली नाहीं. उलट चौकस व जागरूक असे पाश्चात्य मराठ्यांचा इतिहास लिहीत बसले होते. स्प्रेगल या जर्मन पंडितानें १७९१ त मराठ्यांचा इतिहास लिहिला (भा. इ सं. त्रै. ४।११३). नाना फडणिसाला वाटले कीं, सवाई माधवरावाकरिता आपण एक भूगोल तयार करावा. पण आपल्या देशात ही विद्या पूर्ण लुप्त झालेली. म्हणून डॉ. फिन्डले नावाच्या एका फिरंग्यापासून एक भूगोल त्याने तयार करवून घेतला. बरें, भूगोल तयार करावयाचा तर फिन्डलेकडून नुसती माहिती मिळवून घेऊन आपल्याकडील एखाद्या हुशार पंडिताकडून तो लिहवून तर काढावा? तसें न करिता एनाजिन्सी फिन्डलेलाच तो लिहावयास सांगितला. आणि फिन्डलेनेहि त्याचा भरपूर फायदा करून घेतला. इंग्रजाची विलायत रूमस्थानानजीक आहे, रूमचा बादशहा मुख्य असून दिल्ली वगैरे त्याचे सुभे आहेत असल्या भाकडकथा मागून भूगोलवर्णनाच्या या चोपड्यात इंग्रज हिंदुस्थानात आले ते दैवी योजननेच आले असा प्रचारात्मक मजकूरहि दडपून देण्यात आला आहे. "हिंदूंचीं कलियुगाची पाच हजार वर्षें भरत आलीं आणि तेरबी सद्दीही आली असे योग एकत्र होऊन दिवसेंदिवस धर्माचा उच्छाद व्हावा यास्तव इंग्रजी लोकात ईश्वरी शक्ति जास्त होऊन हिंदु व मुसलमान याचा गर्वपरिहार होऊन इंग्रजाचा व्याप पृथ्वीवर होऊं लागला."[1] असला हा भूगोल सवाई माधवरावासारख्या श्रेष्ठ पदाधिष्ठित व्यक्तीला नानाफडणविसाने खरोखरच शिकावयास दिला असेल असे मानणें कठीण आहे. पण असला एक कागद दप्तरीं सापडला आहे येवढे मात्र खरे. त्यातील भावार्थ जो कीं आपल्या लोकाचें भूगोलविषयक ज्ञान अगदी कोनें होतें ते खोटें नाहीं. संजीवनी विद्या हरण करण्याकरिता देवाचा गुरु जो बृहस्पति त्याने आपल्या साक्षात् पुत्राला शत्रूच्या गोटात पाठविलें हा पुराणातरींचा प्रकार नाना फडणिसादि मुत्सद्दी पुराणात वाचीत होते; पण तो दाखला आजकालहि व्यवहारांत आणला पाहिजे ही जाणीव त्याना पटली नाहीं. इंग्रज हे शास्त्रविद्येंत आपल्यापेक्षा पुढारलेले आहेत हें त्याना दिसत होतें. तोफा व दारूगोळा

१. मराठे इंग्रज परीक्षण– प्रो. द. बा. पोतदार.

तयार करण्याच्या विद्या थोड्याबहुत ते त्याच्यापासून शिकत होते. अहमदाबाद, पुणें वगैरे ठिकाणीं तोफाचे कारखाने उभारले होते. पण या विद्याच्या पाठीमागे असलेल्या शास्त्रीय प्रगतीची यथार्थ कल्पना त्याना झालेली नव्हती. ती होणें तर शेपन्नास तल्लख बुद्धीचे विद्वान् आणि कारागीर विलायतेस पाठवावयास हवे होते. जपाननें हें मर्म ओळखलें आणि म्हणून अवघ्या पन्नास वर्षांच्या मुदतींत शास्त्रीय प्रगतींत आपलें राष्ट्र पाश्चात्य राष्ट्राच्या मालिकेंत त्याने आणून बसविलें. आम्हीं हें मर्म ओळखले नाहीं म्हणून पाश्चात्याच्या आहारीं गेलों. हें मर्म आमच्या पूर्वजाच्या लक्षात का आलें नसावे व शास्त्रीय प्रगति कुंठित का झाली असावी याची थोडी अधिक चर्चा पुढील प्रकरणीं करण्यात येईल.

— —

प्रकरण पंधरावें

संस्कृतीच्या स्थिरावस्थेची चर्चा

आपल्या भारतीय संस्कृतीचा विकासप्रवाह कैक शतकें जोमानें आणि वेगानें वाहल्यानंतर मुसलमानी संस्कृतीच्या आक्रमणाच्या सुमारास त्याचा जोर कमी होऊं लागून तो स्थिरावूं लागला व त्यावर अज्ञान, मिथ्याभिमान, फुटीरपणा वगैरेंचें शेवाळें माजू लागलें, व त्याच्या योगानें प्रथम मुसलमानाच्या पुढे व नंतर इंग्रजाच्या पुढे आपणास लाचारपणा स्वीकारावा लागला हें आपण मागील दोन प्रकरणीं पाहिलें. या दोन्ही आक्रमकाचा आपणास यशस्वी प्रतिकार करता आला नाहीं याचीं कारणें सर्वस्वीं एकाच प्रकारचीं नसलीं तरी सामाजिक जीवनात व रणांगणावर अशा दोन्ही ठिकाणीं अवश्य असणारी उभारी व शिस्त हीं कमकुवत झालीं होतीं हें कारण समान होय. मुसलमान हे हिंदूंच्यापेक्षा शास्त्र, विद्या, कला यात अधिक पुढारलेले होते असें नव्हे; पण नवीन विद्या हस्तगत करण्याची तीव्र लालसा मात्र त्याच्या ठिकाणी उदित झालेली होती. हिंदु पंडित हे आपल्या विद्येनें स्वतःच दिपून गेले होते तर मुसलमान हे हिंदूंची विद्या व ग्रीकाची विद्या अत्यंत हौसेनें आणि चिकाटीनें आत्मसात् करीत होते. हिंदूंत जातीच्या उपजाती वाढत होत्या तर भिन्न भिन्न देवतांची उपासना करणाऱ्या भिन्न जातींना एकेश्वरी पंथाची घोषणा करणारा इस्लाम एकत्र आणीत होता. हिंदु हे समुद्रयान निषिद्ध मानण्याच्या मार्गावर होते तर मुसलमान हे स्पेनपासून चीनपर्यंत खुष्कीनें आणि अरबस्थानापासून मलाया द्वीपकल्पापर्यंत समुद्रमार्गें व्यापारी वाहतूक काबीज करीत होते. हिंदु हे शत्रु तावडींत सापडला असताही औदार्याच्या भ्रामक कल्पनांस बळी पडून गैरमुत्सद्दीपणानें वागत होते तर मुसलमान हे शत्रूला जरब बसेल अशा रीतीनें पुरे ठेचून काढीत होते. पराभव

होतोसा वाटताच दैताचा प्रतिकूल कौल समजून हिंदु पळ काढीत होते तर मुसलमान शिस्तीने शेवटपर्यंत टिकाव धरीत होते. आणि शेवटी मुसलमानास उत्तम रणनेते लाभले तसे हिंदूंना लाभले नव्हते. अर्थात् या सर्व बाबतींत इस्लामच्या समोर हिंदु नामोहरम व्हावेत हे क्रमप्राप्तच होतें. त्याप्रमाणें ते बाराव्या तेराव्या शतकात हतप्रभ झाले. दोन तीन शतकानतर इस्लामधर्मीयातही फाटाफूट, मत्सर व चुरस सुरू झाली आणि औरंगजेबाला गोवळकोडा व विजापूर येथील इस्लामी राज्यें बुडवून टाकणें इष्ट वाटलें. मुसलमानी राजामधील फुटीचा फायदा घेण्याइतके हिंदूही हळू हळू सावध झाले व त्यांना शिवाजीसारखा अव्वल दर्जाचा नेता मिळाला. यापुढें हा लढा मुसलमान व मराठे यामध्येच राहिला असता तर अखिल भरतखंडभर मराठ्यांचें राज्य पसरणे अशक्य नव्हते. पण सतराव्या अठराव्या शतकात पाश्चात्त्यांच्या आक्रमणाचा जो प्रचंड रणगाडा फिरूं लागला त्याला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य मुसलमान वा हिंदु यापैकीं कोणाच्याही अंगीं वसत नव्हते. या आक्रमणाचे स्वरूपच निराळे होतें. या आक्रमणाच्या काळीं हिंदु व मुसलमान दोन्हीही समाजशासन, शास्त्र, शस्त्र, शिस्त या बाबतींत पाश्चात्त्यांच्यापेक्षा मागासलेले होते.

ते तसे मागें का पडले असावे याविषयीं तर्क लढविणें हा इतिहासातील एक कूट व म्हणूनच आकर्षक असा उद्योग होय. या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्याइतकें इतिहासशास्त्र प्रौढ झालेलें नसलें व आवश्यक तेवढी साधनसामग्री उपलब्ध झालेली नसली तरी त्याकरिता थांबून न बसता सुचतील तीं अनुमानें बाधीत राहण्यानेच इतिहासशास्त्राची प्रगति होणार आहे. म्हणून पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणप्रसंगीं भारतीय संस्कृतीचा जोम कमी का झालेला होता याची पाश्चात्य इतिहासकारापैकीं एकदोघांनीं केलेली मीमांसा प्रथम पाहूं या.

इतिहासमीमांसक मार्क्स

गेल्या शतकातील पाश्चात्य इतिहासमीमांसकामध्यें कार्ल मार्क्स याचें स्थान फार उच्च आहे. इतिहासमीमांसेचें एक स्वतंत्र दर्शनच त्यानें स्थापन

केले. इतिहासातील अनेक घटनाचा उलगडा एका विशिष्ट तत्त्वानुसार होऊ शकेल असें तत्त्व माडणारा तो दार्शनिक होय. मार्क्सनें जें असें व्यापक तत्त्व म्हणून माडले तें म्हणजे ऐतिहासिक घडामोडी या आर्थिक घडामोडींच्या पोटीं जन्मास येत असतात हे होय. कोणत्याही राष्ट्राची प्रगति वा परागति होत असेल तर त्याचीं कारणे त्या राष्ट्राच्या आर्थिक औद्योगिक जीवनात शोधलीं पाहिजेत. आर्थिक जीवन रुद्ध झालेले असेल तर एकंदरींत सांस्कृतिक जीवनच रुद्ध अथवा स्थिर होईल. हा आपला सिद्धान्त मार्क्सने हिंदुस्थानच्या ऐतिहासिक घडामोडीला लावून पाहिला आहे. पाश्चात्यांच्या पुढें हिंदुस्थानला टिकाव धरता आला नाही ही ऐतिहासिक घटना मार्क्सच्या मीमांसेचा विषय आहे. या मीमांसेत हिंदु हे राजकारणात आणि उद्योगकारणात मागासलेले असल्यानें त्याचा पराभव हा ठरून चुकलेलाच होता हें मार्क्सनें योग्य रीतीने दाखविलें आहे. पण ते मागसले का हाच खरा अधिक कूटप्रश्न आहे. त्याचें मात्र मार्क्सने दिलेलें उत्तर समाधानकारक नाहीं.

हिंदुस्थान इग्रजाचा गुलाम बनला तो हिंदु संस्कृति ही पाश्चात्य संस्कृतीच्या चढाओढींत मागे पडत चालली होती म्हणून बनला.

हिंदुस्थानचें हें मागसपण दोन तऱ्हेचें आहे. उद्योगधंदे व भौतिकशास्त्रोपासना यातील मागसपण हें एक, व सामाजिक आणि राजकीय संघटना यामधील मागसपण हें दुसरें. इंग्लडचा आणि हिंदुस्थानचा सामना झाला तेव्हा या दोन्ही अंगात हिंदुस्थान हा इंग्लंडपेक्षा मागासलेला होता. उद्योगधंद्याची वाढ व शास्त्रीय शोध या दोहोंचा परस्परावलंबी असा संबंध आहे. दोहोंचीहि प्रगति परस्पराच्या मदतीनेंच होते आणि दोहोंनाही साहाय्य होतें तें राजकारणात वैश्यवर्गाचें स्थान सुप्रतिष्ठित होत जाणें, म्हणजेच व्यापारात लहानमोठ्या प्रमाणात भाडवलशाही व राज्यकारभारात कमीअधिक स्वरूपाची लोकशाही याचे होत असतें. उद्योगधंदे ज्या प्रमाणांत वाढलेले असतील त्या प्रमाणात युद्धोपयोगी शस्त्राचीहि निपज होऊं शकते. कारण शांततेच्या काळात जे उद्योगधंदे जीवनाच्या हरएक गरजा दूर करतात तेच उद्योगधंदे युद्धकाळीं आपल्या सैन्याची रसद व शत्रुसंहाराचीं शस्त्रें पुरवूं शकतात. तसेंच लोकशाहीचें. लोकशाही ही

जितक्या प्रमाणात सर्व लोकात विस्तारलेली असेल व रुजलेली असेल तितक्या प्रमाणात लोकाना राष्ट्रावरील सकट तें सर्वांवरील संकट असें वाटू लागतें व स्वयंस्फूर्तीनें सैन्यात शिरण्यास लाखों नागरिक तयार होतात. यामुळें उद्योगधंद्यात भाडवलशाही व राज्यकारणात लोकशाही हीं ज्या राष्ट्रात सुप्रतिष्ठित झालेलीं असतील ते राष्ट्र बलिष्ठ ठरावें हें स्वाभाविक. साम्यवादाचा उदय शेदीडशे वर्षांपूर्वी झालेला नसल्यानें त्याचा विचार तूर्त बाजूस ठेवूं. या दृष्टीनें इंग्लंड व हिंदुस्थान याची झुंज ज्या वेळीं जमली त्या वेळीं हिंदुस्थान हें दुर्बल ठरावें हें क्रमप्राप्तच असें होतें. भाडवलशाहीचें उद्योगकारण व राजकारण हें खाजगी उद्योगधंद्यापेक्षा व जमीनदारी राजकारणापेक्षा पुढारलेलें असतें हाच त्याचा अर्थ, व तो मार्क्सनें योग्य रीतीनें लावून दाखविला आहे.

पण पुढारलेलें राजकारण व उद्योगकारण हिंदुस्थानात निर्माण का झालें नाहीं याची त्यानें केलेली कारणमीमासा मात्र प्रत्ययोत्पादक नाहीं. उद्योगधंद्यामध्यें व शास्त्रीय शोधामध्यें मागसलेलें हिंदुस्थान जागतिक राजकारणात पराभूत झालें हें ठीक पण जे हिंदुस्थान दहाव्या बाराव्या शतकापर्यंत उद्योगधंद्यात व वैद्यक, ज्योतिष, रसायन आदि करून शास्त्रात त्या कालाच्या मानानें पाश्चात्य राष्ट्राच्या तोडीचें होते ते हिंदुस्थान पंधराव्या सोळाव्या शतकापासून हळू हळू मागें का पडूं लागले हाच खरा अवघड प्रश्न आहे. या बाबतींत मार्क्सनें जीं कारणें दिलीं आहेत तीं समाधानकारक वाटत नाहींत.

शास्त्रीय संशोधन, उद्योगधंद्याची प्रगति व व्यक्तिस्वातंत्र्यसंवर्धन या सर्व बाजूंनीं अपकर्षाचा हेलकावा पाहण्याचा प्रसंग हिंदुस्थानावरच आला असें नव्हे—युरोपलाही या अवस्थेचा अनुभव चाखावा लागला होता. तोही थोडा काळ नव्हे, तर जवळ जवळ हजार वर्षें. पांचव्या शतकातील रोमन राज्याच्या अमलापासून तों पंधराव्या शतकातिल विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालापर्यंतचा दहा शतकाचा दीर्घकाल हा युरोपच्या इतिहासांत अज्ञानाधकाराचा काल म्हणून मानला जातो. या कालात व्यापाऱ्यांचे संघ स्थापिले गेले, खुष्कीनें पूर्वेकडील दूरदूरच्या देशांतील माल आणून व्यापार करण्याचा उद्योग चालू राहिला, कलाकौशल्याला उत्तेजन

मिळत राहिलें. पण नवनव्या उद्योगधंद्यांची वाढ होणें, व्यापाऱ्याचें शासन-संस्थेंत वजन वाढणें, विचारस्वातंत्र्य फैलावणें, भौतिक शास्त्राचें संवर्धन होणें या दिशेनें हा काल स्थिरावस्थेचा काल होय.

या कालाच्या अंतीं युरोप या स्थिरावस्थेंतून बाहेर पडलें आणि हिंदुस्थान मात्र त्याच अवस्थेंत घुटमळत राहिलें. असें का व्हावें ? युरोपलाहि आपली मध्ययुगीन कात टाकण्याला दहा शतकें लागलीं. तर त्याच हिशेबानें मिळाला त्यापेक्षा थोडा अधिक काल स्वतःच्या प्रगतीस मिळता तर कदाचित् हिंदुस्थानही आपल्या स्थिरावस्थेंतून बाहेर पडला नसता म्हणून कशावरून असा विचार साहजिकपणें सुचेल. तसें घडलें नाहीं ही वस्तुस्थिति आहे. किंबहुना तसे काहीं घडेल अशीं पूर्वचिन्हें पेशवाईअखेरपर्यंत दिसून येत नाहींत.

शास्त्रीय ज्ञानाची वाढ ही राष्ट्राच्या गरजाबरोबर स्वाभाविकपणें होत जावी हा एक प्रकार. तो हिंदुस्थानात इंग्रजी राज्य स्थापन होण्याच्या आधीं घडला नाहीं दुसरा प्रकार म्हणजे जपानमध्यें घडला तो. पाश्चात्त्यांच्या विज्ञानप्रगतीपुढें आपला टिकाव लागणार नाहीं हें लक्षात येताच जपाननें ते विज्ञान आत्मसात् करण्याची भीष्मप्रतिज्ञा केली व तींत विलक्षण यश संपादलें. आज जपानचा पराभव झाल्यामुळें त्याची शास्त्रीय जोपासना फुकट गेली असें क्षणभर वाटण्यास संभव आहे. पण हें खरें नाहीं. जपानी बादशहानें स्वतः कबूल केल्याप्रमाणें जपानचें शास्त्रीय संशोधन व त्यास लागणारी अजस्र साधनसंपत्ति हीं अमेरिकेच्या मानानें कमी पडलीं हें जपानच्या पराभवाचें कारण. त्याचें चीनवर आक्रमण व साम्राज्यशाही धोरण यानींही पराभवास हातभार लावला. पण आज पराभव झाला असला तरी त्याची विज्ञानोपासना व औद्योगीकरण हीं फुकट गेलीं असें समजणें चूक होईल. जपानचा पुनरुद्धार व्हावयाचा असेल तर तो याच्याच बळावर. या दृष्टीकडे ज्या राष्ट्रानें पाठ फिरवली त्याला चालू आतरराष्ट्रीय जीवनकलहात स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगणेंच अशक्य होईल.

पण जपानसारखा प्रकार हिंदुस्थानात का घडला नाहीं ? शास्त्रीय

ज्ञानात आपला टिकाव लागणार नाहीं हे ध्यानीं येताच तें ज्ञान आत्मसात् करण्याचा भगीरथ प्रयत्न जसा जपानने सुरू केला तसा करण्याचें हिंदुस्थानला का सुचलें नाहीं किंवा त्याला अगत्य का वाटले नाहीं ? मराठे, रजपूत किंवा मोगल यापैकीं कोणालाच कसे वाटले नाहीं ?

टोपीकराचे शस्त्र आपल्यापेक्षा तिखट आहे याचे ज्ञान त्याना नव्हते असें नव्हे; ते सर्वांना प्रत्यक्ष रणागणावरच मिळत होतें; पण त्या शस्त्राच्या पाठीशीं असलेल्या शास्त्रीय प्रगतीची मात्र त्याना यथार्थ कल्पना झाली नसावी. शास्त्रीय प्रगतीमुळेच साध्य होणाऱ्या अशा आरसे, झुंबरें, घड्याळ, दुर्बीण, देवीची लस, शोभेचे दारूकाम अशा अनेक चिजा बाजारपेठात येऊं लागल्या होत्या. असल्या फर्मासीच्या चिजा आपल्याकडे दुर्मिळ असल्याने त्या जबर मोल देऊन विकत घेण्यात येत. पेशव्याच्या खाजगी खर्चाच्या एका नोंदीत तीन घड्याळयाना२७७७रुपये दिल्याचे नमूद आहे. इंग्रजाच्याकडून नजराणे म्हणून किंवा विकत म्हणून घेतलेल्या हुन्नरी वस्तूंत घड्याळे व दुर्बिणी असत. काच हिंदुस्थानात फार प्राचीन काळापासून माहीत आहे पण दुर्बिणी करण्याची विद्या निघाली नव्हती. त्यामुळें याबाबत इंग्रजावर अवलंबून रहावें लागे. भेणबत्त्या, आरसे, पचरंगी काचेचीं भिंगें, कुलुपे, कागद या वस्तूही इंग्रज पुरवीत. असल्या वस्तु इकडे होत पण इंग्रजाचा माल या प्रत्येक बाबतींत अधिक टिकावू व सुबक येऊं लागला होता. असल्या जिनसानीं व्यापारी जगात इग्रजानीं आपले वर्चस्व केव्हाच स्थापन केलें होते.[1]

पण या जिनसाकडे पाहण्याची दृष्टि ही फक्त कौतुकाची होती. त्या श्रीमंताच्या उपयोगी असत व ऐश्वर्य-प्रदर्शनापुरताच त्याचा उपयोग मानण्यात येई. त्याना आधारभूत असलेलें शास्त्रीय ज्ञान हे फर्मासीच्या चिजाच्याबरोबर प्राणघातक चिजाही निर्माण करू शकतें याचें योग्य आकलन झालें नव्हतें.

---

१. पेशवे दप्तराच्या २२ व्या भागांत असली पुष्कळ माहिती आलेली असून त्यातील व इतर ग्रंथातील माहितीचें उत्तम संकलन वा. कृ. भावेकृत 'पेशवेकालीन महाराष्ट्र' (प्रकरण २०) मध्ये सापडेल.

जपान व हिंदुस्थान

तें न होण्याचें एक कारण लक्षात येण्यास टोपीकर व्यापारी आणि हिंदु राजे याच्यामध्यें जेव्हा कटकटी सुरू झाल्या त्या वेळचा काळ आपण लक्षात घेतला पाहिजे. अठराव्या शतकाच्या मध्याला प्रथम इंग्रजांनीं बंगालमध्यें पाय रोविला व त्या शतकाच्या शेवटीं सर्व देश हस्तगत केला. हा सर्व प्रकार अठराव्या शतकात घडला, एकोणिसाव्या शतकात नव्हे, हें लक्षात घेणें महत्त्वाचें आहे. अशाकरिता कीं शास्त्रीय शोधातील डोळे दिपवून टाकणारे असे क्रांतिकारक जे शोध ते एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील होत. वाफेचा व विजेचा उपयोग उद्योगधंद्यात व दळणवळणाच्या साधनात होऊं लागला तोहि एकोणिसाव्या शतकात —म्हणजे हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यानंतरच्या कालात ! त्याच्या पूर्वी म्हणजे सतराव्या व अठराव्या शतकात विज्ञानाच्या बाबतींत युरोप हिंदुस्थानच्या पुढें गेलेलें होते हे खरें व त्यामुळेंच घड्याळें, दुर्बिणी, कागद, लोखंड, औषधें वगैरे विज्ञानसाध्य अशा अनेक चिजा हिंदुस्थानच्या पेठेंत मिरवूं लागल्या होत्या. पण वाफेच्या व विजेच्या साहाय्यानें विराट् रूप धारण करणारी प्रचंड कारखानदारी अद्याप अस्तित्वात आली नव्हती.

वाफेच्या यंत्राचा शोध लागला तो १७८२ मध्यें. पण प्लासीच्या रणागणावर बंगाल इंग्रजाचा ताब्यात गेला तो त्यापूर्वी म्हणजे १७५७ सालीं, आणि वाफेनें चालणाऱ्या आगगाड्या, आगबोटी व गिरण्या ह्या सुरू झाल्या त्या तर पेशवाई नष्ट झाल्यानंतर अथवा हिंदुस्थान सर्वच्या सर्व इंग्रजाच्या ताब्यात गेल्यानंतर. यामुळें टोपीकर हे अनेक दुर्मिळ व फर्मासी चिजा हिंदी पेठांतून माडूं लागलं असले तरी ते हिंदुस्थानच्या पेठांच्या पेठा धुळीस मिळवतील हें दृश्य त्या वेळीं स्वप्नींही येणें कठीण होतें. सुताचें कापड तर हिंदुस्थानातूनच इंग्लंडमध्यें एवढ्या प्रमाणावर जात होतें कीं त्यावर निर्बंध घालून इंग्रजी धंद्यांना उत्तेजन देणें इंग्लंडला आवश्यक वाटलें. अशा स्थितींत उद्योगधंद्यांवर पुढें

येणाऱ्या संकटाचें चित्र डोळ्यापुढें उभें रहावें कसें ? आमचे लोक परदेशीं मुशाफरी करून तेथील प्रत्यक्ष स्थिति अवलोकन करते तरच भावी संकटाची कल्पना येण्याचा काहीं संभव होता; पण तसला जागरूकपणा व चौकसपणा आपणामध्यें लोपला होता हे आपण मागें पाहिलेंच आहे. अर्थात् पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान आत्मसात् करण्याचे अगत्य एकोणिसावें शतक अर्धें लोटून गेल्यानंतर जपानला जसें पटावे तसें अठराव्या शतकातील पेशव्याना तितकेंसें पटलें नसल्यास अगदींच आश्चर्यकारक नव्हे.

आता प्रश्न असा कीं, मध्ययुगीन अज्ञानयुगातून युरोप बाहेर पडलें तसें हिंदुस्थान का पडलें नाहीं ? मध्ययुगापूर्वी ग्रीसमध्यें ज्या प्रमाणात भौतिकशास्त्राची व चिकित्सक बुद्धीची वाढ झाली होती तेवढी वाढ त्या वेळीं हिंदुस्थानातही झालेली होती. त्या काळीं वैद्यक, ज्योतिष, गणित ह्या शास्त्रात ग्रीक आणि हिंदु सारखेच पुढारलेले होते. दोघाच्यात दळणवळण असून एकमेकाच्या विद्येचा लाभहि एकमेव घेत होते. रोमच्या अस्ताबरोबर युरोपमधील चिकित्सक बुद्धि खुरटली, पण सुमारें दहा शतकें लोटल्यावर तिला पुनश्च नवे धुमारे फुटू लागले व दोन तीन शतकात जगाला गवसणी घालण्याइतका तिचा विस्तार वाढला. उलट हिंदुस्थानात मात्र सातव्या आठव्या शतकापर्यंत वैद्यक, ज्योतिष, गणित, रसायन, स्थापत्य वगैरे शास्त्राची जोपासना जी चालू होती त्याची ज्योत जी एकदा मंद होऊं लागली (रसायनाचा जोर चार पाच शतकें अधिक टिकला) ती पाश्चात्यांच्या हातीं स्वातंत्र्याचें उदक सोडण्याच्या कालापर्यंत, म्हणजे अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत, पुन्हा प्रज्वलित झालीच नाहीं. हें असें का व्हावें ? पाश्चात्यांच्यामध्यें दहा शतकाच्या दीर्घ निशेनंतर का होईना विज्ञानोपासनेचा सूर्य उमाळ्यावर येऊं लागला व दोन तीन शतकात आपल्या तेजानें सगळ्या जगाला दिपवून सोडूं लागला. पण हिंदुस्थानात शास्त्रीय ज्ञानाला नवा बहर अठराव्या शतकापर्यंत आलाच नाहीं. हिंदूंमध्यें बुद्धीचो कुशाग्रता कमी होती असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. कुशाग्रतेची साक्ष देणारी रमण, बोस, रामानुज, कपिलाश्रमाचे लिमये अशी मंडळी आपणांमध्यें आजकाल वावरत आहेतच ना ! मग पाश्चा-

त्याची बुद्धि भौतिक शास्त्राकडे वळली तशी आपल्याकडील चिकित्सकांची का वळली नाहीं? हिंदुस्थानातीलच चिकित्सकांची नव्हे तर युरोपबाहेरच्या दुसऱ्या कोणत्याच देशातील चिकित्सकाची का वळली नाहीं?

मार्क्सकृत मीमांसा

वळली नाहीं यामुळें साहजिकच अशी शंका सुचते कीं युरोप व आशिया या खंडातील भौगोलिक व आर्थिक परिस्थिति ही भिन्न असल्यानेंच तर हा फरक पडला नसावा ना? या फरकासंबंधीं मार्क्स व एंजल्स यानीं आपल्या परीनें विचार केला आहे. मार्क्स व एंजल्स याचा पत्रव्यवहार, मार्क्सची 'न्यू यॉर्क ट्रिब्यून' पत्रातील लेखमाला व त्याचा माडवलशाहीवरील सुप्रसिद्ध ग्रंथ यात तो आलेला आहे. मार्क्सचें हिंदुस्थानच्या इतिहासाकडे लक्ष गेलें तें पुढील कारणाकरिता. १८४८ सालीं युरोपमध्यें लोकशाही स्वरूपाच्या क्रांतीची मोठी लाट उसळली, पण ती यशस्वी न होता साम्राज्यशाही व माडवलशाही याचा अंतीं विजय झाला. तो का झाला या घटनेचा विचार करताना मार्क्सला असे आढळून आलें कीं आशिया, आफ्रिका वगैरेतील मागसलेले देश जोंपर्यंत लुटावयास मिळत आहेत तोंवर मांडवलशाही नष्ट होणें शक्य नाहीं; उलट तिचा अधिकाधिक विकासच होईल. माडवलशाहीच्या या आक्रमणापुढें उद्योगधंद्यात मागसलेल्या देशाचा टिकाव लागणें शक्यच नाहीं. पण या मागसलेल्या देशांना मारतामारताच मात्र भाडवलशाही स्वतःचें मरणही ओढवून घेईल. ते ते देश पादाक्रांत केल्यावर त्याच्या कानाकोपऱ्यातून कच्चा माल शोधून घेण्याकरिता व पक्का माल फैलावण्याकरिता आगगाड्या, तारायंत्रें वगैरे सुरू करावीं लागतील त्यातूनच पुढें या मागसलेल्या देशातून भांडवलशाही यंत्रयुग सुरू होईल व अशा रीतीनें जगभर माडवलशाही यंत्रयुग विस्तारलें गेलें व आणखी लुटायला देश राहिले नाहींत असें झालें म्हणजे भांडवलशाही ही आपल्या मरणानेंच मरेल व त्यातून समाजसत्तावाद यशस्वी होईल.

या पद्धतीनें उपपत्ति बसवीत असता आशियांतील राष्ट्रें हीं उद्योगधंदे व शास्त्रीय शोध यात मागें कां पडलीं याचा विचार क्रमप्राप्त आला. हा

विचार मनात घोळत असता १८५३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीची सनद पुनश्च चालू ठेवण्याचा प्रश्न पार्लमेंटपुढें आला. तें टिपण साधून मार्क्सनें हिंदुस्थानविषयक आपले विचार 'न्यू यॉर्क ट्रिब्यून' या वर्तमानपत्रात एका लेखमालेच्या रूपानें माडले. त्याचा मित्र एजल्स याच्याबरोबर त्यानें पत्रव्यवहारानें विचारविनिमय केला तोही प्रसिद्ध आहे. त्याच्यावरून दोघाचेही विचार कळून येतात, व ते गैरमाहितीवर उभारलेले आहेत हेंही कळून चुकते !

मार्क्सच्या मते हिंदुस्थानात उद्योगधंद्याची वाढ झाली नाहीं याचीं कारणे तीन. पहिले कारण खेड्यापाड्यात शेतजमिनीच्या खाजगी मालकीचा अभाव. दुसरे कारण म्हणजे दळणवळणाच्या साधनाचा अभाव. तिसरें खेड्यातील स्वयंपूर्ण जीवन. या तिन्ही विधानाना इतिहासात पुरेसा पुरावा आळूदन येत नाहीं हें इतिहासज्ञास सागावयासही नको. पण मार्क्सच्या महनीय व्यक्तिमाहात्म्याने त्याचीं चुकीचीं विधानेंही प्रमाणभूत मानलीं जाण्याचा सभव आहे म्हणून दिग्दर्शन करतों. मार्क्सने आपल्या कॅपिटल ग्रथामध्ये हिंदुस्थानातील गावगाड्याचें वर्णन दिलेलें आहे. त्यात तो लिहितो कीं, "या छोटेखानी गावगाड्याचा पाया म्हणजे जमिनीची समाईक मालकी, धंद्याची कुलपरंपरा व परस्पराच्या गरजा गावातल्या गावात भागविण्याची स्वयंपूर्ण व्यवस्था हा होय. गरजा थोड्या आणि जरूर ते सर्व कारू नारू गावातल्या गावातच. यामुळें राजाला कर म्हणून जो माल बाहेर जाई तो सोडला तर औद्योगिक व्यापव्यवहार गावकुसूच्या आतच चालावयाचा. गरजा अल्प व त्या निवारण्याची योजना गावातल्या गावात, यास्तव हा गावगाडा शतकानुशतकें लोटलीं किंवा राज्यकात्या आल्या आणि गेल्या तरी आपल्या ठराविक चाकोरीच्या बाहेर घेण्याचें कारणच उद्भवलें नाहीं. यामुळें गावगाड्याची ठराविक चाकोरी हीच हिंदुस्थानच्या, किंबहुना आशियातील देशाच्या, मागसलेपणास जबाबदार होय." हिंदुस्थानविषयक जें वाङ्मय त्या कालीं मार्क्सला उपलब्ध होतें त्यावरून मार्क्सनें हें गावगाड्याचें वर्णन केलें आहे (विल्क्स व कॅबेल या दोघाच्या ग्रंथाचा तळटीपेंत उल्लेख आहे.) पण मार्क्सला मिळाले ते ग्रंथ हिंदुस्थानच्या परिस्थितीचा योग्य परिचय करून देणारे नसावे असें

दिसतें. मार्क्सच्या मतें हिंदुस्थानच्या मागसलेपणाचीं कारणें (१) जमिनीवरील खाजगी मालकीचा अभाव, (२) खेड्यातील अल्प गरजा भागविण्यापुरते अल्प व स्वयंपूर्ण उद्योगधंदे, व (३) दळणवळणाच्या साधनाचा अभाव हीं होत. पण इतिहास या कारणाचा पाठपुरावा करताना दिसत नाहीं. कसें तें क्रमशः पाहूं या.

पहिलें कारण शेतीची समाईक मालकी. युरोपमध्ये अनेक देशात प्राचीन काळीं खेड्यातील जमीन ही समाईक मालकीची असे. आता हिंदुस्थान हें फार पुरातन अवस्थेतच आहे अशी चुकीची समजूत झाली असेल तर येथील खेड्यातील जमीन ही समाईक मालकीची अमात्री असा गैरसमज पसरला असावा. पण तो गैरसमज होय. वस्तुस्थिति अशी कीं खेड्यातील गुरचराईचें रान तेवढें समाईक असे व असते, पण शेतीच्या लहान लहान पट्ट्या या ज्याच्या त्याच्या मालकीच्या असतात व त्या गहाण टाकता येतात किंवा विकता येतात. नागरठी, बेणणी, कापणी अशा प्रसंगीं इरजीकाचा म्हणजे गावातील सगळ्यानीं एकमेकाना मदत करण्याचा धारा असतो; पण मालकी ज्याची त्याची खाजगी असते. आणि हा प्रकार आज शेकडो वर्षें रूढ आहे. 'स्थाणुच्छेदस्य केदारम्' हा न्याय मनूनें स्वीकारला आहे. कुटुंबाकुटुंबाचीं तर खाजगी जमीन असेच पण समाईक कुटुंबपद्धति रूढ असतानाहि जरूर वाटल्यास भावाभावाची किंवा बाप व मुलें याची वाटणी होण्यास, जमिनीसुद्धा सर्व जिंदगीची वाटणी होण्यास, कायद्याची किंवा रूढीची मना नसे. स्मृतिकाराना विभक्त कुटुंबपद्धति गौण वाटे असेंही नाहीं. उलट विभक्त झाल्यानें हव्यकव्य, श्राद्ध वगैरे धर्मक्रिया एकाच्या ऐवजीं अनेक ठिकाणीं होऊं लागतात म्हणून विभक्ततेचें त्यानीं स्पष्ट समर्थनही केलें आहे ! मनु लिहितो, "एवं सह वसेयुर्वा पृथग्वा धर्मकाम्यया । पृथग्विवर्धते धर्मः तस्माद्धर्म्या पृथक्क्रिया ॥ (९.१११). स्मृतिग्रथामध्यें ही वाटणी कशा प्रकारें करावयाची याचा तपशीलही दिलेला आहे. वाटणीमध्ये काहीं वस्तु वाटावयाच्या नसतात, त्याचा जो मनुस्मृतीत उल्लेख आहे (वस्त्रं पत्रं अलंकारं कृतान्नं उदकं स्त्रियः । योगक्षेत्रं प्रचारं च न विभाज्यं प्रचक्षते ॥) त्यातही जमिनीचा समावेश नाहीं. खरेदीविक्रीला गावकऱ्याची संमति लागे

पण या संमतीचाही अर्थ गावकऱ्याना कळवावें लागे येवढाच होता. याज्ञवल्क्यस्मृतीचा टीकाकार विज्ञानेश्वर लिहितो कीं, "ग्रामानुमतिः व्यवहारप्रकाशनार्थं न पुनः अनुमत्या विना व्यवहाराऽसिद्धिः ॥"(याज्ञ.२.११४) वस्त्र, अलंकार वगैरेंची वाटणी करूं नये असें जें मनूचें वचन आहे त्यातूनही टीकाकारानीं पळवाटा काढल्या आहेत. बृहस्पति स्मृतिकार तर निपटून लिहितो कीं असल्या जिनसाचे वाटप करू नये असे म्हणणारांनीं नीट विचारच केलेला नसावा ! कारण वस्त्रालंकार हें तर श्रीमंताचें धन होय. तेव्हा सर्वांची युक्तियुक्तीनें वाटणी करावी. सेतू व क्षेत्र याची देखील वाटणी करावी. "वस्त्रादयोऽविभाज्याः यैरुक्तं तैर्न विचारितम् । धनं भवेत् समृद्धानां वस्त्रालंकारसंश्रितम् । यथा भागानुसारेण सेतुः क्षेत्रं विभज्यते ॥"[१] स्थावरजिंदगीचे वाटप करूं नये, ती समाईक समजावी, सबंध गावाची किंवा सबंध कुटुंबाची समाईक मानावी अशी युरोपातल्याप्रमाणें हिंदुस्थानातही अति प्राचीनकालीं प्रवृत्ति होती. याचे अवशेष पंजाब व मलबार यात सबंध गावाची समाईक जमीन व कुटुंबाची समाईक जमीन या रूपानें आजही काहीं ठिकाणीं आढळतात. त्या प्रवृत्तीच्या निदर्शक वचनाचा उल्लेख विज्ञानेश्वराने दायभागावर लिहितांना केला आहे. पण तीं वचने बंधनकारक नाहींत असाच त्याचा अभिप्राय आहे. स्थावर विकताना सर्वांची संमति घ्यावयाची ती विभक्त-अविभक्त वगैरे संशय राहूं नये म्हणून व्यवहारसौकर्याकरिता घ्यावयाची हें त्यानें स्पष्ट केलें आहे.

ह्या खाजगी मालकीच्या हक्काचा मागोवा घेत प्राचीनतर कालाकडे गेलों तर तो थेट वैदिक कालापर्यंत जाऊन पोंचतो. वैदिक वाङ्मयातहि खेड्यापाड्यातील शेतजमीन समाईक मालकीची होती असे उल्लेख नाहींत.[२] उलट वसिष्ठ ऋषि आपल्या जिंदगीची वाटणी करीत आहे असा उल्लेख आढळतो. अर्थात् हिंदुस्थानची स्थितिप्रियता ही जमिनीवरील समाईक मालकीच्यामुळें उत्पन्न झाली ही उपपत्ति टिकण्यासारखी नाहीं. मार्क्सलाही थोडी शंका आली होती. १८५३ च्या 'ट्रिब्यून'मध्यें तो निःशंकपणें लिहितो

१. गायकवाड प्रत पृ. १९५.

२. There is no trace in Vedic literature of communal property, nor is there mention of communal cultivation–*Vedic Index*. Vol.I. p.100.

कीं, " ब्रिटिश राज्यापूर्वी हिंदुस्थानात औद्योगिक प्रगतीस अवश्य अशी जी खाजगी मालकी तिचा पत्ता नव्हता. जमीनदारी व रयतवारी या खाजगी मालकीच्या संस्था ब्रिटिशानीं सुरू केल्या." पण हा मजकूर लिहिण्याच्या आधीच्याच महिन्यात एंजल्सला जे त्यानें पत्र पाठविलें त्यात तो कबूल करतो कीं, "खाजगी मालकीचा पश्न हा एकंदरीत गुंतागुंतीचा दिसतो कारण त्या विषयावर लिहिणाऱ्या ग्रंथकारात मेळ नाहीं!" अशी शंका होती तर रास्त मार्ग म्हणजे समाईक मालकीच्या प्रश्नावर ठाम मत देण्याचे टाळणे हा नव्हे काय ?

दुसऱ्या मुद्याविषयीं पाहता असे दिसते कीं हिंदुस्थानातल्या शहराचा मार्क्सने विचार केलेला नसावा. खेड्यातल्या गरजा थोड्या असत व व्यापव्यवहार, उद्योग क्षुद्र असत हे खरे. पण शहराची स्थिति तशी नव्हती. का हिंदुस्थानात फक्त खेडींच होतीं असा मार्क्सचा समज होता ? शहरातील उद्योगधंदे त्या त्या काळच्या मानानें समृद्ध होते. उद्योगधंदे अगदींच खुरटे असते तर इंग्लंडच्या पेठेंत हिंदुस्थानचे रेशमी व सुती कापड का जातें ? तें येवढ्या प्रमाणावर जात होतें कीं १८१३ सालीं इंग्लंडला त्यावर ८० व ७० टक्के जकात बसविणें आवश्यक वाटलें. वस्तुतः खंडतुल्य अशा भरतखंडाला ब्रह्मदेशीं व्यापून टाकतील येवढीं मोठमोठीं साम्राज्यें जेथे नादलीं तेथें त्या साम्राज्याच्या विविध गरजा भागविणारा उद्योगधंदा मोठ्या प्रमाणावर असलाच पाहिजे. 'भारतीयाची ऐश्वर्योपासना' या सातव्या प्रकरणात याविषयीं माहिती दिलेली आहे ती वाचकाच्या लक्षात असेलच. अलीकडील शास्त्रीय शोधानंतरचे व वाफविद्युत्कारखानदारीनंतरचे विराट्स्वरूपी उद्योगधंदे मात्र नव्हते. पण तसें ते पूर्वी युरोपातही नव्हते. तथापि कालांतरानें का होईना, युरोपात शास्त्रीय शोध लागले तसे हिंदुस्थानात लागले नाहींत तें का हें कूट आहे. मात्र हिंदुस्थानात त्यापूर्वी खाजगी मालकी माहीत नव्हती किंवा उद्योगधंदे उदयास आले नव्हते व त्यामुळें शास्त्रीय शोधाची भूमिका तयार नव्हती असा पक्ष मांडता येणार नाहीं हें उघड होय.

व्यापारवृद्धि न होण्यास दळणवळणाच्या साधनाचा अभाव हें एक मार्क्सनें तिसरें कारण म्हणून दिलें आहे. त्यातहि फारसें तथ्य नाहीं.

हल्लींच्यासारखीं आगगाडी, आगबोटी, मोटारी हीं साधनें पूर्वी कोठेंच नव्हतीं. खडी टाकून केलेले पक्के रस्ते हे देखील इंग्लंडात १८०२ नंतर बाधले गेले. त्यापूर्वी मालाची ने-आण जनावराच्या पाठीवरूनच होई. पण हिंदुस्थानात ती ने-आण फार मोठ्या प्रमाणावर चाले. ती करणारे लमाण असत, त्याचे हजारों बैलाचे ताडे असत व त्याचा संचार सर्व देशभर असे. मार्क्स 'ट्रिब्यून'मधल्या लेखात लिहितो कीं, दळणवळणाच्या साधनाभावी हिंदुस्थानची उत्पादनशक्ति पागळी झाली आहे व त्यामुळें निसर्ग सढळ हातानें देत असताही लोकात दैन्य नादावें हा प्रकार हिंदुस्थानातल्याइतका इतर क्वचितच आढळतो. याचा पुरावा देताना तो लिहितो कीं, "१८४८ मध्यें नेमलेल्या एका कमिटीपुढें असा पुरावा माडण्यात आला कीं या सालीं खानदेशात धान्याची धारण एका क्वार्टरला (१४ शेर) ६ ते ८ शिलिंग होती तर त्याच वेळीं पुण्यात ती ६४ ते ७७ होती." हा पुरावा खरा असला तरी तो सर्वसाधारणरीत्या दळणवळणाच्या साधनाचा अभावदर्शक मानणें चुकीचें होईल. पावसाळ्यात पूर आला असता, रस्ते वाहून गेले असताना, अति चिखल झाला असता दळणवळणाचीं संकटें मधून मधून थोडे दिवस उद्भवतात. ती नित्याची स्थिति नव्हे. दिग्विजयाकरिता, व्यापाराकरिता, विद्यार्जनाकरिता, यात्रेकरिता लोक सर्वत्र हिंडत. त्याचा संचार एरवीं कसा होऊं शकता? सामान्य लोक काशीपासून रामेश्वरापर्यंत यात्रा करीत. त्या यात्रेचे टप्पेहि ठरलेले सर्वांच्या परिचयाचे असत. पेशवेकालीं काशीपासून पुण्यास हरकारा पाठविला तर तो सुमारें वीस बावीस दिवसात एवढा प्रवास आटपी. मुसलमानी अमदानींत रस्ते होते येवढेंच नव्हे तर त्यावर वाट फुटण्याच्या ठिकाणीं इशारा देणारे दगडही रोवलेले असत. असला एक १५९९ मधला पाच फूट लाब, तीन फूट रुंदीचा मार्गदर्शक शिलाफलक वऱ्हाडातील कळंब गावीं सापडलेला नागपूर म्युझियमध्यें ठेवलेला आहे.[1] चिनी प्रवासी पाचव्या सातव्या शतकांत आले त्यांच्याही प्रवासवृत्तात रस्ते नसण्याची तक्रार नाहीं. युवान-च्यागनें तर सबंध भरतखंड पालथें घातलें तरीही दळणवळणाच्या

१. या मा. काळे. भा. इ. सं. त्रैमासिक वर्ष ५.

साधनाबद्दल त्यानें तक्रार केलेली नाहीं. शिलालेखांत राजपथ व सार्थवाह यांचे उल्लेख येतात. रावबहादूर का. ना. दीक्षित याना बंगालमध्यें घनोरा गावाजवळ दोन्ही बाजूंनीं बांधून काढलेल्या जुन्या रस्त्याचे अवशेष सापडले आहेत.[1] भरहुत येथील स्तूपावर नाशिकच्या श्रीमंताच्या देणग्याचा उल्लेख आहे हें सांगून सर भांडारकर दक्षिणच्या प्राचीन इतिहासांत लिहितात कीं, " प्रांतोप्रांतींचे दळणवळण फारसें अवघड असलेलें दिसत नाहीं. "[2] बुद्धाच्या कालापर्यंत पाठीमागें गेले तरीही वेगळी स्थिति आढळत नाहीं. त्या वेळींही राजगृह व पाटलीपुत्र येथून उत्तरेस तक्षशिला व पश्चिमेस उज्जैनी व मडोच येथपर्यंत शेकडों मैलाचे रस्ते होते असा उल्लेख आढळतो. पाटलीपुत्राहून बनारस, कोसांबी, भारुत, बेसनगर, उजैन येथपर्यंत रस्ता येऊन पुढे एक फाटा सिंधुमुखाकडे जाई व दुसरा भडोचकडे निघे. व्यापारी इतके धनाढ्य होते कीं एका अनाथपिंडक नांवाच्या नवकोट नारायणाने एक रस्ता स्वतःच्या खर्चानें बांधला होता. देशातल्या देशात तर ने-आण सुरू होतीच पण समुद्र ओलांडून आजूबाजूंच्या द्वीपांतरींही व्यापार सुरू होता. हा इतिहास आता सुशिक्षिताच्या परिचयाचा झाला आहे. अर्थात् दळणवळणाच्या अभावीं हिंदुस्थान मागासला ही उपपत्ति रास्त नव्हे.

तात्पर्य, जमिनीची समाईक मालकी, खेड्यांतील अल्प गरजा भागविण्यापुरते उद्योगधंद्याचे आकुंचित क्षेत्र, व दळणवळणाच्या साधनाचा अभाव हीं जीं कारणे मार्क्सनें दिलीं आहेत त्याना ऐतिहासिक आधार दिसत नाहीं.

इतिहासमीमांसक बकल

मार्क्सच्या कालीं इंग्लंडमध्यें एक प्रख्यात इतिहासमीमांसक होऊन गेला तो म्हणजे बकल हा होय. ह्याचें मार्क्ससारखें इतिहासमीमांसेच्या क्षेत्रांत स्वतंत्र दर्शन आहे. त्याच्या दर्शनाचें सूत्र हें कीं, कोणत्याही राष्ट्राचें भवितव्य हें त्या राष्ट्राच्या मानवी कर्तबगारी व भौगोलिक परि-

१. History of Bengal Vol. I. p. 660. ed. by R. C. Majumdar.
२. History of the Deccan 3rd ed. p. 76.

स्थिति यानीं व मूलतः भौगोलिक परिस्थितीनें ठरून जात असतें. राष्ट्राचा ललाटलेख लिहिणारी भवितव्यता दुसरी कोणी नसून भौगोलिक परिस्थिति ही होय ! अशाच प्रकारची उपपत्ति चौदाव्या शतकातील आरबी इतिहासमीमासक इब्न खाल्दून यानें माडली होती. बकलनें तिचा प्रपंच सागोपाग थाटला आहे. या सूत्राचें उदाहरण म्हणून ग्रीस व हिंदुस्थान याची त्यानें तुलना केली आहे. ग्रीस व हिंदुस्थान या दोन प्रदेशातील लोकाची मनोवृत्ति भिन्न घाटाची का झाली यांचें कारण बकलच्या मतें या दोन प्रदेशातील नद्या, पर्वत, जंगलें, खाद्य पदार्थांची सुबत्ता व हवामान यातच साठविलेलें आहे. आपल्या ग्रंथाच्या[1] दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभींच तो लिहितो कीं, राष्ट्राच्या एकंदर भवितव्यावर सृष्टीतील ज्या चार गोष्टींचा परिणाम होतो त्या म्हणजे हवामान, अन्न, जमीन आणि नद्या, पर्वत जगलें या रूपाने प्रकट होणारें सृष्टीचे स्वरूप. हें सृष्टीचें स्वरूप उग्र भयानक असेल तर त्या देशात राहणाराची कल्पनाशक्ति तरल होईल व विचारशक्ति पागुळेल. उलट, सृष्टीचे स्वरूप सौम्य असेल तर कल्पनाशक्ति स्वैर न होता विचारशक्तीची वाढ होईल. कल्पनाशक्ति मोकाट सुटल्यानें अदृष्ट व अद्भुत याचे आकर्षण वाढतें व पौरुषप्रयत्नावरील विश्वास कमकुवत होतो. असाच प्रकार हिंदुस्थानात घडला असें बकलनें प्रतिपादन केले आहे. .

या संदर्भात युरोप व अशिया याची तुलना करताना तो लिहितो कीं, युरोप व आशिया यातील सृष्टीचे स्वरूप पाहिलें तर युरोपात सृष्टीचे देखावे सौम्य व मध्यम आकाराचे तर आशियातील देखावे उग्र, अजस्र, विराट् होत. ग्रीस आणि हिंदुस्थान याच्या क्षेत्रफळाची तुलना केली तर ग्रीस हा हिंदुस्थानच्या चाळिसाव्या हिश्शाइतका लहान भरेल. ग्रीसमधला उंचातला उंच पर्वत हा हिमालयाच्या तिसऱ्या हिश्श्याइतकाही उंच येणार नाहीं. तसेंच, हिंदुस्थानाच्या मानानें ग्रीसमध्ये वादळें कमी, भूकंप कमी, हिंस्र पशू कमी, आणि पर्वतावरून पाण्याचे प्रचंड लोट घेऊन वाहणाऱ्या नद्याही कमी. या निसर्गाच्या स्वरूपातील भेदामुळेंच ग्रीक

१. History of Civilisation in England by T. H. Buckle.

आणि हिंदु याच्या स्वभावात भेद उत्पन्न झाला. ग्रीकाच्यात विचार-स्वातंत्र्याची वाढ झाली तर हिंदुस्थानात अंधश्रद्धेचे पीक फोफावलें. हवामानाचा परिणाम खाद्यपदार्थांवरही होतो. हिंदुस्थानातील हवामान उष्ण असल्याने थोडक्या अन्नाने पुष्कळ श्रम करण्याची ताकद उत्पन्न होईल असें अन्न सेवन करण्याकडे प्रवृत्ति होते. हिंदुस्थानातले असे अन्न म्हणजे तादूळ हें होय. शिवाय जमीन शेतीला अनुकूल अशी असल्यानें या तादुळाचे पीक उमाप येतें. अन्न· अल्पश्रमात मिळूं लागल्याचा अतिम परिणाम असा होतो कीं, मजुरीचे दर निकृष्ट होतात, श्रीमंत व गरीब यामधील अंतर कमालीचें वाढते व निकृष्ट वर्गाला वर मान करावयास उसतच सापडत नाहीं. मजुरीच्या दराची योग्य कल्पना येण्याचे एक साधन म्हणजे व्याजाचा दर हे होय. व्याजाचा दर जितका चढा तितका मजुरीचा दर हलका असे धरून चालण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानात प्राचीन काळीं मनुस्मृतीवरून पाहता व्याजाचा दर पंधरा टक्के पासून साठ टक्केपर्यंत होता असें दिसते. याचा अर्थ मजुरीचे दर फार फार हलाखीचे असले पाहिजेत. ते तसे असल्याशिवाय इतके जबर व्याज देऊन पैसे उसने घेण्याची जरूरी भासती ना. पण मजुरी हलकी असली तर कर्ज फिटायचें कसे ? कर्ज फिटत नसे म्हणूनच शेतकरी-कामकरी कर्जात नेहमीं बुडलेला असावयाचा. तात्पर्य, बकलच्या मते अन्न सढळ हाताने देण्याच्या सृष्टिमातेच्या औदार्याचाच अंतिम परिणाम म्हणजे दलित वर्गाची पिळवणूक परमावधीस गेली हा होय !

मार्क्सचा मित्र एजल्स यानेही हिंदी संस्कृतीच्या खुरटलेल्या अवस्थेला येथील हवापाण्यालाच जबाबदार धरले आहे. मार्क्सच्या मतें जमिनीची खाजगी मालकी हीच हिंदुस्थानात स्थापन होऊ शकली नाहीं. तें मत गैरसमजुतीवर आधारलेलें आहे हें आपण वर पाहिलेंच. मार्क्सचा मित्र एंजल्स याचाही असाच गैरसमज होता. त्याच्याही मतें जमिनीची खाजगी मालकी व तिच्यातून विकास पावणारी सरंजामी या संस्कृतीच्या विकासांतील एकापुढच्या एक अवस्था हिंदुस्थानात विकसित झाल्या नाहींत. मार्क्स याचें कारण देत नाहीं, पण एंजल्स देतो. याचें कारण त्याच्या मतें हिंदुस्थानची भौगोलिक स्थिति हेंच होय.

या भौगोलिक स्थितीविषयींचे त्यांचें वर्णन मात्र बकलच्या पेक्षा अगदीं भिन्न आहे. मार्क्सला लिहिलेल्या पत्रात (६ जून १८५३) तो लिहितो. "खाजगी मालकी हिंदुस्थानात कां स्थापन झाली नसावी याचा विचार करता मला वाटतें कीं त्याचें कारण हवामान आणि शेतजमीन यातच दिसून येतें. तेथील जमीन म्हणजे मुख्यतः वैराण, उजाड माळरान होय. असल्या उजाड मरुभूमीचा एक मोठाच्या मोठा पट्टा इजिप्तमधील सहारा, अरबस्थान, इराण, हिंदुस्थान व तार्तरी या देशातून गेलेला दिसतो. यामुळें येथील शेती ही मुद्दाम साठविलेल्या जलाशलावर, पाणी बंधाऱ्यावर अवलंबून असे; व असलीं मोठीं कामें हीं खाजगी मालकीचीं नसून सबध जमीन प्रातिक सरकार वा मध्यवर्ती सरकार याच्याच ताब्यात असत." तात्पर्य, जमीन निकस आणि पर्जन्य अल्प या सृष्टिप्रकोपामुळें खाजगी मालकी उत्पन्न होऊं शकली नाहीं, व संस्कृतीची वाढ खुंटली. बकलच्या मते सृष्टीच्या औदार्यामुळें वाढ खुंटली तर एंजल्सच्या मतें तिच्या कृपणपणामुळें संस्कृतीची वाढ खुटली ! हीं परस्परविरोधी विधानें माडलीं गेलीं याचे कारण दोघाचींही माहिती अपुरी होती हें होय. सहारापासून तार्तरीपर्यंतच्या मरुभूमीच्या ज्या दीर्घ पट्ट्याचा उल्लेख एंजल्सने केला आहे तो पट्टा हिंदुस्थानातील मारवाड, कच्छचें रण व रजपुताना या भागातून जातो हें खोटें नाहीं. पण अखिल भरत-खंडाचा विचार करता हा पट्टा म्हणजे भरतखंडाचा एक अल्पसा भाग होय. बाकीचा निरनिराळ्या नद्याच्या खोऱ्यातील भाग हा ओसाड मुळींच नव्हे. दुष्काळी भाग म्हणून जे प्रसिद्ध आहेत त्या भागातहि पीक येतें तेव्हा असें येतें कीं तें तीन वर्षें पुरावें. अर्थात् खाजगी मालमत्ता उत्पन्न न होण्यास एंजल्सने दिलेलीं हवामान व जमिनींचा निकसपणा हीं कारणें काल्पनिक होत हें सागावयास नकोच. खाजगी मालकी उत्पन्न झाली नव्हती हें मतच मुळात निराधार होय हें वर आलेंच आहे. यामुळें याविषयीं अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

बकलच्या मतें भरतखंडातील सृष्टीच्या विराट् स्वरूपामुळें अंधश्रद्धेची प्रवृत्ति बळावली व पौरुषप्रयत्नावरील विश्वास शिथिल झाला, याही विधानाचा पाठपुरावा इतिहास करीत नाहीं. खरा प्रकार असा असता

तर प्राचीन कालाकडे जों जों अधिक जावें तो तों पौरुषप्रयत्नावरच्या अविश्वासाचा आविष्कार अधिक उठावानें आढळावा. तसा तो आढळत नाहीं. वैदिक काळीं सृष्टीच्या सुंदर, भव्य व भयानक अशा विविध रूपाची मारतीयानीं दैवते मानून पूजा, प्रार्थना केली पण त्या काळातील व तेथून पुढें अनेक शतकातील त्याची वृत्ति ही गागरून भिऊन दडपून गेलेल्याची मुळींच दिसत नसून उलट 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' असल्या धाडसी जोमाची दिसून येते. त्यानीं अनार्यांशीं सामना दिला, जंगले तोडून काढलीं, वसाहती केल्या, आणि समुद्रावरील मुशाफरींतही प्रावीण्य संपादन केले. विंध्य पर्वत उच ताठ मान करून उभा होता त्याला मान मोडून लवविण्याचा पराक्रम अगस्त्य मुनीनीं फार प्राचीन काळीं गाजविला. त्यानंतर दाशरथी रामचद्रानें सिलोनपर्यंत झेंडा मिरविला. पुढील काळात ग्रीक, शक, हूण वगैरेंना पिटाळून लावणारे सम्राट् निघाले. तात्पर्य, पौरुषप्रयत्न ढिला पडलेला या प्राचीन काळात दिसून येत नाहीं. वस्तुतः पाहता या विषयाचा इतका प्रपंच करण्याचेंहि कारण नाहीं. पण गैरमाहितीवर उभारलेल्या मतातील अवास्तवपणा दाखविण्याकरितांच वरीलसारख्या सामान्य घटनाचा उल्लेख करावा लागतो आहे. त्यावरून आपल्या देशातील भव्य-भयानक निसर्ग व सुपीक जमीन यामुळें विवेकशक्ति दडपली गेली ह्या बकलच्या मताने भारतीय संस्कृतीच्या स्थिरावस्थेचा उलगडा होत नाहीं हें दिसून येईल. भौगोलिक परिस्थितीचा परिणाम व्हावयाचा तो प्राचीन काळीं अधिक तीव्र स्वरूपाचा व सृष्टीवर जसजसें स्वामित्व प्रस्थापित होत जाईल तसतसा अुत्तरोत्तर तो सौम्य होत गेलेला आढळावा. पण आपल्या इतिहासांत पहावें. तों प्राचीन काळीं पौरुषवृत्तीचा आविष्कार जोमाने आढळत असून उत्तरकालीं त्याचा जोर कमी झालेला दिसतो. शास्त्र-कलाविद्यांमध्यें प्राचीनकालीं आत्मविश्वासाचें आणि विचारस्वातंत्र्याचें तेज धगधगलेले आढळतें व उत्तरकालीं मंद झालेलें आढळतें. त्याचा उलगडा केवळ भौगोलिक कारणांनीं समाधानकारक होत नाहीं.

जातस्य हि ध्रुवो मृत्युः

आर्यांच्या हिंदुस्थानातील आगमनानंतर काहीं शतकें त्यांच्या संस्कृतीचा प्रसार आणि विकास जोमानें चाललेला आढळावा व अुत्तरोत्तर त्याचा जोर दुर्बल होत जावा यावरून आणखी एक उपपत्ति सहज सुचण्यासारखी आहे. ती अशी कीं उन्नतीमागून अवनति हा निसर्गस्वभावच असावा. उत्तरोत्तर दुर्बलत्वाचे कारण अटळ, अपरिहार्य असून मानवी संस्कृतीच्या मूलघटकातच ते अन्तर्भूत असावें. याला दाखला प्राण्याच्या आयुर्मर्यादेचा. कोणताहि प्राणी वा वनस्पति घेतली तरी तिची आयुर्मर्यादा ही त्यातील मूलभूत बीजशक्तीनेंच नियमित झालेली असते. वृक्ष हा काहीं काल फोफाट्याने वाढावा, फलाफुलानीं डंवरावा, काहीं काल शाखाविस्ताराच्या वैभवानें डुलावा, पण कालातरानें हळूहळू वठूं लागण्याच्या प्रारब्धातून त्याची सुटका नसावी असा नियतीचा दंडक दिसतो. चराचराला व्यापून टाकणारा व सृष्टीच्या मूलभूत घटनेतच अन्तर्भूत असलेला असा हा नियम असावा. 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' ज्याला ज्याला उत्पत्ति आहे त्याला त्याला मरण हे अटळ आहे. बाल्य, तारुण्य, वार्धक्य, मरण या अवस्थातून कोणाचीहि सुटका नाहीं. यमराजाच्या धर्मसभेतील हा सर्वंकष विधिनियम होय. प्राणिकोटीच्या बाबतींत ह्या सर्वंकष नियमाचा आढळ सर्वत्र आढळतो. तारुण्यातील उन्मादाचा आस्वाद चाखल्यानंतर वार्धक्याच्या कषायाचे घुटके चुकविता येत नाहींत. व्यक्तीप्रमाणें एकेका कुटुंबाचा इतिहास पाहिला तरीहि हाच प्रत्यय येतो. कुटुंब दोनतीन पिढ्या भरभराटलेलें दिसावें व नंतर उतरती लागून पुढें दोनतीन पिढ्यात नामशेषहि व्हावे असे अनेक उदाहरणात आढळून येतें. राजघराण्याचे इतिहास पाहिले तर असेंच आढळून येतें कीं संस्थापकाने मोठ्या धडाडीनें व कल्पकतेने राज्य कमवावें, पुढें एकदोन पिढ्यानीं मूळ संस्थापकाच्या पावलावर पाऊल टाकून त्याचा विस्तार करावा, त्यानंतरच्या पिढ्यानीं वैभवाच्या ऐषआरामात धुंद व्हावें व नंतर ऱ्हास व अंत व्हावा. प्राचीन काळचीं मौर्य, शातवाहन, गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, वर्धन वगैरे रियासती किंवा अर्वाचीन कालांतील मोगल, मराठे, वगैरे रियासती पाहिल्या तरी प्रत्येक

रियासत काहीं पिढ्यानंतर मोडकळीस येते असें दिसून येतें. यावरून सर्व मानवी संस्थाच्या मूलभूत घटकावयवातच असें काहीं असावें कीं त्यामुळें त्या संस्थाचें बाल्य, तारुण्य, वार्धक्य हीं सर्व अन्तर्गत नियतीनेंच कालबद्ध असावींत अशी कल्पना साहजीकच सुचते.

आणि जें व्यक्तीला वा कुलाला लागू तेच अनेक कुलाचा समूह जो समाज त्यालाही का लागू नसावें? अविच्छिन्न सांस्कृतिक परंपरा चालविणारा जो लोकसंघ तो समाज व ती परंपरा तुटली म्हणजे तो समाज नाश पावला असें मानले तर प्राचीन काळचे इराकमधील खाल्डियन, क्रीटमधील मिनोयन, मॅक्सिकोंतील मय असे समाज व त्याच्या संस्कृति कालाच्या उदरात गडप झालेल्या आढळतात. यावरून प्रत्येक संस्कृतीच्या नशिबीं असाच अंत लिहिला असला पाहिजे असें अनुमान का माडूं नये? स्पेंग्लर नावाच्या जर्मन ग्रंथकारानें ते ठसठशीतपणें माडलें असून पाश्चात्य संस्कृति ही आतां वार्धक्याच्या घरात गेली आहे असें त्यानें प्रतिपादिलें आहे. त्याच्या मतें शास्त्र, विद्या, कला, राजकारण, समाजकारण यात खोल, अन्तर्भेदी वैयक्तिक प्रतिभेच्या आविष्कारापेक्षा उथळ विस्ताराकडे समाज वळूं लागला कीं त्याचा ऱ्हासकाल सुरू झाला असे समजावें. आणि हें परिवर्तन अटळ अशा नियतीनेंच येत असतें; तें टाळता येत नाहीं; त्याचें स्वरूप ओळखून युगधर्म जाणून घेऊनच प्राप्त परिस्थितीला तोंड देत राहणें येवढेंच मानवाच्या हातीं आहे[१] असें त्यानें प्रतिपादन केलें आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या वार्धक्याचें लक्षण म्हणून स्पेंग्लर सांगतो कीं, कोणत्याहि ललितकलेंत पाश्चात्याची प्रतिभा आतां नवीन कांहीं श्रेष्ठ व भव्य अशी कृति निर्माण करूं शकणार नाहीं. चित्रकला व संगीतकला याच्या क्षेत्रात कांहीं भर टाकणें आता त्यांना शक्य नाहीं. आणि वास्तुकलेंतील त्याची कामगिरी तर तीनशें वर्षांपूर्वीच संपून

१. 'A century of purely extensive effectiveness is a time of decline. True. But we cannot help it.'—Decline of the West. Vol. I. p. 44. by Splenger, tr. by Atkinson.

गेली आहे.[१] त्याच्या मते तरल प्रतिभेचे युग संपून चिकित्सक प्रज्ञेचे युग सुरू होणे हे ऱ्हासाचें लक्षण होय व ते आता पाश्चात्यात दिसूं लागलें आहे असें त्याचे प्रतिपादन आहे. वरीलसारख्या प्रतिपादनानें जीवनातील उत्साह, आशावाद हीं करपून जाणार नाहींत काय असे कोणी विचारील तर त्याला स्पेंग्लर उत्तर देतो कीं, सुदृढ आणि निकोप मनाच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होणार नाहीं. अमुक घटना अटळ आहे हें बुद्धीला पटलें म्हणजे ते कितीहि अप्रिय असले तरी सरळपणें मान्य करणें हेंच निकोप बुद्धीचे लक्षण. म्हणून आजचा काल हा पाश्चात्य संस्कृतीचा वार्धक्याचा काल होय हे ओळखून या कालातच साध्य होणाऱ्या गोष्टींचीच उपासना करणे रास्त. उदाहरणार्थ, काव्याचा त्याग करून यांत्रिक सुधारणेची जोपासना करणें हे आजच्या युगधर्मास अनुसरून होय.[२]

युगऱ्हास

आपल्या धर्मशास्त्रकाराच्या युगऱ्हासाच्या कल्पनेशीं जुळती अशी ही स्पेंग्लरची कल्पना आहे. या कल्पनेप्रमाणे ऱ्हास हा नियतीचा सर्वंकष नियम होय. दिवसाच्या पाठोपाठ रात्र यावी तशी विकासाच्या पाठोपाठ अवनति यावी हे सृष्टीचें अनुल्लघनीय सूत्र होय. तेव्हा हिंदु संस्कृतीनें दोन तीन हजार वर्षें वैभवानें मिरविल्यावर तिची पडती कमान सुरू व्हावी हे नियतीच्या नियमानेच प्राप्त होणारे प्रारब्ध आहे. इंग्रज इतिहासमीमासक टॉनबी यानेहि नियतिसिद्ध ऱ्हासाची उपपत्ति चक्रनेमिक्रमाच्या रूपानें मान्य केली आहे. त्याच्या मते हा पडता काल सुरू होण्याचें पूर्वचिन्ह म्हणजे राज्यविस्तार आणि संस्कृतिविस्तार हे होय. या विस्ताराबरोबर संघटना दुर्बल होते आणि ऱ्हासास प्रारंभ होतो. रोमन राज्य प्रमाणाबाहेर विस्तारलें तेव्हाच त्याच्या नाशाचीं बीजें रोवलीं गेलीं व अशोकानें साम्राज्य व धर्म याच्या विस्ताराची रूपरेखा आखली तेव्हाच त्यानें पुढील नाशाची मुहूर्तमेढ रोवली असें टॉनबीचें प्रतिपादन आहे. युरोपियनाचें साम्राज्य

१. Decline of the West p. 40.
२. „ p. 41.

हेंही असेंच आज अफाट पसरलेलें आहे. तेव्हा त्याचें काय व्हावयाचें ? विस्ताराच्या पोटीं ऱ्हास हा नियम सार्वत्रिक असेल तर युरोपियन संस्कृतीचा ऱ्हास हा अटळ आहे असें मानल्यावाचून गत्यंतर नाहीं. स्पेंग्लर तसें निर्वेधपणें मानतो. टॉनबी मात्र या अशुभ भविष्यानें गडबडून गेलेला आहे. म्हणून त्यातून पळवाट काढण्याकरितां लिहितो कीं, 'जिवंत विद्यमान संस्कृतीचें भविष्य स्पष्टपणें वर्तवितां येत नाहीं.' पण तें भविष्य भयानक असूं शकेल याची पोटात भीति असल्यानें शेवटीं तो लिहितो कीं, पुढचें भविष्य स्पष्ट दिसत नसल्यानें तें अशुभ न ठरो म्हणून अनुतापपूर्वक प्रभूची प्रार्थना करूं या.[1]

टॉनबी गडबडला आहे याचें कारण येवढेंच कीं पाश्चात्यांचें साम्राज्य आज जगावर पसरलें आहे तें यापुढें तसेंच चालणार नाहीं या भीतीचा गोळा पोटात उठला आहे म्हणून. ज्या परक्या देशाचें स्वातंत्र्य पाश्चात्यांनीं हरण केलें ते देश जागृत होत आहेत, सुसंघटित होत आहेत, सुविद्य होत आहेत; तेव्हा आज नाहीं उद्या ते पाश्चात्यांचें साम्राज्यशाही जूं झुगारून दिल्याविना राहणार नाहींत हे सुस्पष्ट दिसत आहे. पण यांत गागरून गडबडून जाण्यासारखे काहींच नाहीं. खरी गोष्ट अशी कीं साम्राज्याचा नाश म्हणजे सस्कृतीचा नाश ही टॉनबीची कल्पनाच कोती होय. दुसऱ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य हरण करण्याची व त्याना नागवून आपलें घर भरण्याची कल्पना ही मानवी संस्कृतीतील एक रोगट कल्पना होय. साम्राज्यशाही नष्ट झाली तर हा रोग नाहींसा होईल पण त्यामुळें संस्कृति नष्ट न होता उलट अधिक निकोप होईल. आता टॉनबी याला अशी भीति वाटत असेल कीं पाश्चात्यांचें नुसतें साम्राज्य नष्ट होऊनच न मागता पौर्वात्याचा वरचष्मा होऊन पौर्वात्यांची गुलामगिरी पत्करण्याचा प्रसंग आपणावर येईल तर ती भीति रास्त होय. कारण राजकीय स्वातंत्र्य हें सास्कृतिक जीवनाचें संरक्षक कवच होय. हें कवच मंगलें म्हणजे

१. 'The destiny of a live civilisation is necessarily obscure... We must pray and ask favour in contrit spirit.'—Study of History Vol. VI. p.320–321 by Toynbee.

सांस्कृतिक जीवनाचीं सर्वच अंगोपांगें विकल होऊन जातात. पण साम्राज्य प्रमाणाबाहेर वाढलें कीं ऱ्हासास प्रारंभ होतो हे खरे मानलें तरी शेवटीं सर्व सांस्कृतिक जीवनच धोक्यात येतें अशी अगदीं अपरिहार्य प्रणालि. मांडणें आवश्यक दिसत नाहीं.

ध्रुवं जन्म मृतस्य च

स्पेंग्लरच्या मताप्रमाणें ऱ्हास व मृत्यु पावणे ह्या नैसर्गिक अटळ अवस्था होत. तशा त्या असतील तर त्याचा व्यापार सर्वत्र अप्रतिहत दाखविता आला पाहिजे. स्पेंग्लरला तसा तो दाखविता आलेला नाहीं. सर्वत्र तसा तो आढळतही नाहीं. स्पेंग्लरने हिंदु संस्कृतीतील बौद्धिक ऋतुमानाच्या व परिवर्तनाच्या अवस्थाचे एक कोष्टक दिलें आहे. त्या अवस्था अशा कीं यातील वैदिक काल हा वसंतऋतु; ब्राह्मण व उपनिषदे याचा काल हा बुद्धीच्या परिपाकाचा ग्रीष्मऋतु; सूत्रें, योग, वेदान्त याचा काल हा शरदृऋतु व बौद्धमताच्या प्रसाराचा आणि षड्दर्शनाचा काल हा शिशिरऋतु होय. ही मांडणी अगदीं शिथिल स्वरूपाची आहे हें सांगावयास नकोच. विकास आणि ऱ्हास हे नियतीनेंच ठरत असतील तर त्याची कालमर्यादा निश्चित सांगता यावी. स्पेंग्लरच्या वरील कोष्टकाप्रमाणें पाहिलें तर भारतीय संस्कृतीच्या आयुमर्यादेचा काल चांगला दोन तीन हजार वर्षांचा येतो. ज्या देशाचा सुदीर्घकालीन इतिहास उपलब्ध आहे असा दुसरा देश म्हणजे इजिप्त होय. त्याच्या इतिहासात विकास आणि संकोच यांचें चक्रच दृष्टीस पडतें. या देशाच्या प्राचीन इतिहासाचे अभ्यासक फ्लिंडर्स पेट्री यांनीं असें दाखविलें आहे कीं इसवीशकपूर्व पांच सहा हजार वर्षांपासून खिस्तीशकाच्या तेराव्या शतकापर्यंतच्या या देशाच्या इतिहासात संस्कृतीच्या संकोचविकासाचे साधारणपणें तेरातेरांशें वर्षांचे असे आठ फेरे आढळून येतात. येथें आयुर्दाय अल्प दिसतो. पण या फेऱ्यावरून दुसरें अनुमान सुचतें तें अधिक महत्त्वाचें आहे. तें हें कीं हे फेरे लक्षांत घेतल्यास स्पेंग्लरप्रमाणें 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' येवढेंच म्हणून न थांबता 'ध्रुवं जन्म मृतस्य च' हेंही म्हटलें पाहिजे! समाजाच्या बाबतींत मृत्यु व पुनर्जन्म

या संज्ञा वापरण्यापेक्षा संकोच व विकास या संज्ञा अधिक रास्त होत. जेथें परंपरा अजीबात तुटेल तेथे मृत्यु म्हटला तर पुनःपुनः टवटवीत होणाऱ्या अवस्थेला संकोच-विकास ही संज्ञा अधिक सार्थ ठरेल. चीन व हिंदुस्थान यातील दीर्घकाल अविच्छिन्न परंपरा टिकविणाऱ्या संस्कृतीच्या संबंधीं मृत्यूची संज्ञा न वापरिता संकोच-विकासाची वापरणे न्याय्य होईल हें आता सागावयास नकोच.

या दृष्टीनें आपल्या संस्कृतीला संकोचावस्था का प्राप्त झाली याचा विचार कर्तव्य आहे– वृद्धावस्थेनंतर अपरिहार्य रीतीनें येणाऱ्या मृत्यूचा नव्हे ! तो विचार चालू असता विकासातील प्राथमिक अवस्था जी जमिनीची खाजगी मालकी तीच हिंदुस्थानाने ओलांडली नाहीं हें मार्क्सचें मत गैर माहितीचें कसें आहे हे आपण पाहिलें. तसेच हिंदुस्थानातील पर्वत, नद्या, जंगलें याच्या भव्य भयानक रूपानें हिंदूंची विचारशक्ति व आत्मप्रत्यय दडपून गेला या बकलच्या मताचाही इतिहास पाठपुरावा करीत नाहीं ह्याकडे लक्ष दिलें. एंजल्सच्या मताप्रमाणे हिंदुस्थानातील भूमि निकस म्हणून संस्कृति खुरटली तर बकलच्या मताप्रमाणें जमीन अतिसुपीक म्हणून संस्कृति खुरटली हीं मतें एकमेकाना काट देणारीं आहेत हेंही आपण पाहिलें. हिंदुभूमि ही मरुभूमीही नाहीं व अमर्याद पीक देणारी मयभूमीही नाहीं. व्याजाचा दर मारी त्या अर्थी मजुरी अल्प अथवा जीवनवेतन अल्प पुरत असलें पाहिजे व यामुळे फार मोठा समाज गुलामगिरीच्या अवस्थेंत डाबला गेला असला पाहिजे असें मानलें तर ज्या हवापाण्याची बकलनें तारीफ केली आहे त्या अथेन्समध्ये दोन लाख पसतीस हजार लोकसंस्थेंत एक लाख गुलाम होते याचा अर्थ काय करावयाचा ? रोममध्यें याहीपेक्षां प्रमाण मोठें होतें. शिवाय मन्वय-मयायक निसर्गदेखाव्यानीं भारतीयाची बुद्धि गागरली नाहीं तर ग्रीसच्या भूमीमध्यें शास्त्रकलाची वाढ झाली तशी हिंदुस्थानच्या भूमीमध्येंही झाली हें 'भारतीयाची ऐश्वर्योपासना' या प्रकरणात दाखविलेंच आहे. तेव्हां भूमि व हवापाणी याचा मानवी स्वभावावर होणाऱ्या परिणामाला अनुलक्षून संस्कृतीचा संकोच-विकासाचा नियम बसविता येतो असें दिसत नाहीं. बकल हा जमीन हवापाण्याला प्रमुख

स्थान देत असला तरी तोही मानवी कर्तबगारी हा एक घटक मानतोच व तो मानून निसर्ग आणि मानवी बुद्धि याच्या संघर्षातून संस्कृतीचा संकोच-विकास होत असतो असें प्रतिपादन करितो.[1] निसर्ग हा फारच कठोर असेल तर संस्कृतीच्या वाढीला मर्यादा बसेल हे खरें. अखंड बर्फाच्या प्रदेशात राहणारे एस्किमो संस्कृतीच्या विकासात काहीं मर्यादेच्या पलीकडे जाऊं शकले नाहींत. पण हिंदुस्थानचें हवापाणी पाहिलें तर तें संस्कृतीच्या विकासाला युरोपपेक्षा फारसे प्रतिकूल आहे असे मुळींच नाहीं. शिवाय पंधराव्या सोळाव्या शतकापर्यंत हिंदुस्थान युरोपच्या कोणत्याही प्रकारें मागे होता असेही नाहीं. सातव्या आठव्या शतकात तो विद्येच्या बाबतींत मुसलमानाच्याही मागे नव्हता. पण नवी विद्या हस्तगत करण्याचा नवोत्साह मुसलमानात नव्यानेच प्रादुर्भूत होत होता तर आम्ही आमच्या विद्येने कृतकृत्य होऊन शिथिलयत्न झालों होतो, व रणागणावरील शिस्त आणि कडवेपणा व सामाजिक जीवनातील ऐक्याची भावना याही आमच्यात दुर्बल होऊं लागल्या होत्या हे आपण मागें पाहिलेंच.

शास्त्राची वाढ

तेव्हा पुन्हा विचारात घेण्याचा मुख्य प्रश्न म्हणजे सोळाव्या सतराव्या शतकानंतर युरोपमध्ये शास्त्राची, उद्योगधद्याची, लोकशाहीची जी वाढ झाली तशी आपणाकडे का झाली नसावी ? शास्त्रीय शोध हे गरज व कल्पकता यांचें अपत्य होत. उदाहरणार्थ, अनेक उद्योगधद्यांशीं संबद्ध असलेल्या रसायनादि शास्त्रांची वाढ ही त्या उद्योगधंद्याच्या विकासास रोकून धरणाऱ्या अडचणी व त्या अडचणींचा परिहार करणारी मानवी बुद्धिमत्ता याच्या झगड्यातून होत असते. या अडचणी काहीं वेळा फार जाचक होऊ लागतात. कोळशाच्या वगैरे खाणींच्या धंद्यात खाणींत सारखे साचत राहणारे पाणी बाहेर काढून टाकणें व खाणींतील वायु पेट घेणार नाहीं याविषयीं दक्षता घेणे जरूर असते. ही जरुरी दमट हवेच्या

१. All the changes of which history is full must be the fruit of a double action; an action of external phenomena upon the mind and another action of the mind upon the phenomena.-Ch.I.

इंग्लंडसारख्या देशात विशेष तीव्र स्वरूपात भासूं लागते. यामुळें पाणी उपसून काढणाऱ्या पंपाचा रचनाविशेष व निरनिराळ्या वायूंचे गुणधर्म याचें संशोधन अगत्याचें होऊन बसतें. यामुळें या विषयाच्या संशोधनाकडे लक्ष लागणें स्वाभाविक होतें[1]. भूस्तरशास्त्राची वाढ ही खाणी, कालवे आणि रेल्वेचे बोगदे वगैरेच्या खोदकामातून झालेली आहे.[2] शिवाय नव्या शोधाचा उपयोग करून घेण्यास लागणारा आत्मप्रत्यय, धाडस, भांडवलाची उभारणी, माल खपणारी बाजारपेठ व जेथें न खपेल तेथें बळजबरीने लादण्याची सत्ता अशा अनेक गोष्टींची अनुकूलता असावी लागते. ती नसल्यास शोध लागूनही ते व्यवहारात उतरत नाहींत व शास्त्राची वाढ जोमानें होत नाहीं. या अनुकूलतेशिवाय आणखी ज्याचा उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे श्रेष्ठ प्रतिभावान् त्या त्या शास्त्रास लाधणें हा होय. यासंबंधीं विचार करणारा एक ग्रंथकार लिहितो कीं, सतराव्या शतकात युरोपात शास्त्राना जो एकदम अपूर्व बहर आला तो विशेष अनुकूल परिस्थिति लाभली म्हणून होय. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, परिस्थिति पोषक आणि थोडे पण श्रेष्ठ प्रतिभावान् शास्त्रज्ञ असा सर्व अनुकूल संच या काळीं लाभला होता.[3] पुढील शतकात ही अनुकूल परिस्थिति टिकली नाहीं, सरकारी आश्रय फारसा मिळाला नाहीं. सरकारचें लक्ष फक्त युद्धोपयोगी शास्त्राकडे तेवढे असे. व्यापाऱ्याच्या ज्या श्रेणी अथवा संघ होते त्याची प्रवृत्ति आपली विद्या गुप्त ठेवण्याची असल्यानें नवनव्या शोधाना त्याचा विरोधच होता. नव्या शोधाची कुलमक्तेदारी (पेटंट) घेऊन विकण्याची युक्ति अमलात नव्हती. या अनेक कारणामुळें अठराव्या शतकाच्या प्रथमार्धांत शास्त्रीय ज्ञानाची विशेष वाढ झाली नाहीं. पण कोलंबस, वास्को ड गामा वगैरेच्या धाडसी प्रयत्नानीं दर्यावरील मुशाफरीला जोर चढत आलेला होता, माल खपविण्याच्या नव्या

---

१. Science for the Citizens p 551 by L. Hogben.

२. Social Function of Science p 34 by Burnal.

३. 'The great scientific outburst depended on the favourable conjunction of social, political, economic factors and on the genius of men.' Burnal p. 24.

नव्या बाजारपेठा हस्तगत होत होत्या व भाडवल जमत होतें. एकोणिसाव्या शतकात वॅट्स, फॅरडे सारखे शास्त्रज्ञ, वाफेच्या व विद्युत्च्या यत्राची युक्ति, कारखानदारीला लागणारें भाडवल, व आफ्रिका हिंदुस्थान वगैरे ठिकाणच्या हुकमी बाजारपेठा याचा संच जमताच उद्योगधद्याना उधान भरती आली. यापुढें शास्त्रीय शोध हे धंद्याना अधिकाअधिक उपकारक होऊ लागून प्रयोगशाळाच्या उभारणीवर अधिकाधिक द्रव्य खर्चण्यात येऊं लागले. प्रयोगशाळेइतकेच त्या प्रयोगशाळेंत अनन्यभक्तीनें विद्येची उपासना करणारे शास्त्रज्ञ लाधले हे महत्त्वाचें होय. या शास्त्रज्ञाची शास्त्रभक्ति ही अव्यभिचारी होती, पैशाच्या लोभानें उद्भवलेली नव्हती. विद्युज्जननाच्या अद्भुत शोधानंतरही (१८३३) रॉयल इन्स्टिटयूटचा खर्च चालविणें फॅरडेला कठिणच जाई.[1]

इंग्लंडमधील शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीची ही जी त्रोटक हकीगत दिली आहे तीवरून त्या वाढीला अनेक प्रकारची अनुकूलता कशी लागते ह्याचा बोध होईल. तो ध्यानीं घेऊन आपल्या इतिहासाला लावून काय अनुमानें सुचतात तीं पाहूं. इग्लडातील खाणींचा उल्लेख वर केला तसेच हिंदुस्थानातही खाणींतून लोहसुवर्णादि खनिज द्रव्यें खणून काढून शुद्ध करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चाले हे मागे पाहिलें आहे. अशा पुष्कळशा अर्धवट सोडून दिलेल्या खाणी आज ठिकठिकाणीं सापडतात. काहीं काल खणल्यानंतर त्या सोडून का दिल्या ? तर त्यासंबंधीं असे दिसतें कीं, खाणी खणत खणत पाणी लागेपर्यंत खणावयाच्या व पाणी लागलें म्हणजे सोडून द्यावयाच्या व दुसरीकडे खणावयाचें. देशाचा विस्तार मोठा असल्यामुळें खोलवर खणलेल्या खाणी पाणी उपसून पुढे चालू ठेवण्याची निकड भासली नसावी. व त्यामुळें इंग्लंडमधें पपाचा व खाणींतील वायूच्या गुणधर्माचा जितका कसून शोध झाला तशा शोधाचें अगत्य भारतीयाना तीव्रतेनें भासलें नसावें या संबंधाचें संशोधन पुढें विकास पावलें नसावें. शिवाय मुशाफरी बंद झाल्यानें इतर देशात काय चालले आहे याचा कानोसा घेण्याचेंहि बंद पडलें असावें.

---

१. Burnal p. 28.

दर्यावरील धाडसी मुशाफरीची आवड पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत पंधराव्या सोळाव्या शतकात विशेष जोरानें उसळलेली दिसते. त्याला कारण चिमुकल्या भूप्रदेशामुळें व्यापाराचा व वाढत्या लोकसंख्येचा कोंडमारा आणि समुद्राच्या नित्य सानिध्यामुळें दर्यावरील धाडसी जीवनाची आवड व ओढ. उलट हिंदुस्थानचा भूप्रदेश हा खंडतुल्य, देशातल्या देशातच व्यापाराला उमाप क्षेत्र. यंत्रयुगापूर्वीच्या व्यापाराला हें क्षेत्र पुरून उरण्याइतकें विस्तीर्ण होते. हिंदुस्थानच्या बाहेर पाठविण्यासारखे जे रेशीम, केशर, मोती, असले मौल्यवान् जिन्नस ते बाहेर घेऊन जाण्यास देशोदेशींचे व्यापारी हिंदुस्थानच्या बंदरातच ठाण देऊन बसलेले असत. हिंदुस्थानातलें रेशीम खिस्ती शकाच्या प्रारंभी रोममध्ये सोन्याच्या भारंभार इतक्या उंची भावाने विकलें जात असे व त्यामुळे रोमच्या सोन्याला लागलेल्या गळतीबद्दल रोमन लोकसभेत गवगवाही झाला याचा उल्लेख मागें केला आहे. येथें हें सांगितलें पाहिजे कीं, हें रेशीम रोममध्ये नेणारीं जहाजें बहुधा रोमन व्यापाऱ्याचीं असत. हिंदी व्यापारीही नौकानयनात प्रवीण होते. त्यानीं पूर्वद्वीपकल्पांत व्यापार, धर्मप्रसार, वसाहती कशा थाटल्या हें आपण पाहिले. पण इस्लामच्या उदयानंतर दर्यावरील व्यापाराचे प्रमुखत्व अरबी लोकाच्या हातीं गेले. यामुळें सातव्या आठव्या शतकानंतर देशादेशींच्या संचारामुळें येणाऱ्या चौकसपणास व जागरूकतेस हिंदु लोक मुकत चालले. दर्यावर्दीपणाला दुसरा वाव आरमारात मिळावयाचा पण राजसत्तेला आरमाराचीही विशेष जरुरी भासलेली दिसत नाहीं. पश्चिम किनाऱ्यावरील राजाना आरमारी युद्धाचा प्रसंग यावयाचा तो अरबाशीं. पण त्याच्याशीं सलोख्याचें धोरण असल्यानें राष्ट्रकूटाना आरमाराचें महत्त्व वाटले नसावें.[1] महंमद बिन कासीमची व जुनेदची सिंधवरील स्वारी सोडली तर इस्लामचें पुढील काळातील आक्रमण हें खुष्कीच्या मार्गानें झालें होतें, दर्याच्या नव्हे. त्यानंतर सोळाव्या शतकात वास्को-ड-गामानें कालिकत येथें उतरून हिंदूंची कत्तल केली तोंपर्यंत हिंदुस्थानचा बराच भाग इस्लामी सत्तेखालीं गेला होता. सोळाव्या शतकापासून युरोपियन व्यापाऱ्याचें आक्रमण सुरू झालें. ते आरमार व

१. Rashtrakutas by Dr. Altekar p. 257.

शस्त्रें यांनीं सज्ज होते. पण त्याचा मुख्य पेशा व्यापाऱ्यांचाच होता. त्याना आश्रय दिल्यानें कराच्या रूपानें खजिन्यात भर पडे व चैनीच्या हरहुन्नरी वस्तु मिळत. यामुळें या व्यापाऱ्याना सवलती देण्याचेच धोरण दिल्लीच्या बादशहाचें असे. या व्यापाऱ्याच्या मायदेशातील राजकीय सत्तेचें व विद्यासंपन्नतेचें स्वरूप कोणींच ओळखलें नव्हतें. तें आक्रमणाच्या रूपानें डोळ्यावर येण्याच्या स्वरूपात एकोणिसाव्या शतकापर्यंत परिणत झालेंच नव्हतें. पूर्वतयारी मात्र सुरू होती; ती लक्षात न येण्यास देशाच्या बाहेरचा संचार मंद झाला होता.

देशविस्तार

या संचारमंदीचें एक कारण म्हणजे देशाचा विस्तार आणि सधनता हें होय ! बकल या इतिहासमीमासकाचा तर्क कीं, हिंदुस्थानच्या विराट् सृष्टिस्वरूपानें हिंदूंची चिकित्सक वृत्ति पागुळली व सुपीकतेनें संपत्तीची विषम वाटणी झाली आणि त्याच्या संस्कृतीचा विकास रुद्ध झाला तो चपखल बसत नाहीं हे पाहिले. पण देशाच्या विस्ताराचा व सुपीकतेचा दुसरा एक स्वाभाविक परिणाम म्हणजे देशाबाहेरील संचाराची मंदी हा होय. मागें पहिल्या प्रकरणात मॅक्समुल्लरचे विधान उद्धृत केलें आहे कीं, शिकंदराच्या मोहिमेसारखी मोहीम एखाद्या हिंदुसाम्राटाला सुचली असेल याची कल्पना देखील करवत नाहीं (पृ. ९). त्यानें हें विधान केलें आहे ते हिंदु लोकाना राजकीय दृष्टि नव्हती हें दाखविण्याकरिता हेटाळणीच्या स्वरात केले आहे. पण विचारान्तीं असें दिसून येईल कीं, बाहेरच्या प्रदेशावर चालून जाऊन आक्रमण करण्यासारखा विलोभनीय प्रदेश हिंदुस्थानच्या पश्चिम सीमेच्या लगत बाहेर नव्हताच मुळीं. विलोभनीय प्रदेश होता तो पूर्वद्वीपकल्पाचा मसाल्याचा प्रदेश होय. त्या प्रदेशावर पूर्वकिनाऱ्यावरील राजानीं स्वारी केल्याचा उल्लेख 'विश्वसंचारा'च्या प्रकरणात आलाच आहे. हिंदुस्थानच्या बाकीच्या प्रदेशातील राजाचें लक्ष या पूर्वद्वीपाकडे विशेष गेलें नसले तर त्याचेंहि कारण हेंच कीं हिंदुस्थान हा देशच येवढा विस्तीर्ण आहे कीं तो जिंकण्यांतच कोणाही सम्राटाची सबंध उमर खर्ची पडावी. शिवाय देश समृद्ध.

तेव्हा तो सोडून बाहेरच्या कमी समृद्ध देशाकडे भारतीयाचें लक्ष जाईल कशाला ? पश्चिम सीमेपलीकडील बलुचिस्तान, अफगाणिस्तान हे देश हिंदुस्थानातच मोडत. त्याच्या पलीकडे सैस्तान व उत्तरेस मध्य आशियाचे निर्जल प्रदेश. हे दोन्ही प्रदेश विशेष समृद्ध असे कधीच नव्हते. आठव्या शतकानंतर तर ते रेताड रणच बनले. त्याच्या पूर्वी हा प्रदेश वसतीयोग्य व यूरोप-आशियाच्या दळणवळणाच्या हमरस्त्यावर असल्यानें व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा होता तेव्हा तेथे हिंदूंच्या वसाहती होत्या हें मागें पाहिलेंच आहे. त्यानंतर तो प्रदेश उजाड झाला. तिकडे जाण्यासारखें आकर्षण काहीं राहिलें नाहीं. उलट मध्य एशियातील भटक्या टोळ्याना मात्र हिंदुस्थानचे आकर्षण अधिकाधिक वाटूं लागल्यास नवल नाहीं. म्हणजे हिंदुस्थानचा विस्तार आणि सुपीकता हीं हिंदु संस्कृतीच्या स्थिरावस्थेला काहीं अंशीं कारणीभूत झालीं असे म्हणावें लागतें. सरस्वतीच्या तीरावरून पूर्वेकडे व दक्षिणेकडे वैदिक आर्य दिग्विजय करीत निघाले ते पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत व दक्षिणेस सिलोनपर्यंत सर्व देश आक्रमण करीपर्यंत कित्येक शतके लोटलीं. नवीन प्रदेशाच्या आक्रमणाचे प्रभावी आकर्षण होते तोवर त्याचा उत्साह कित्येक शतकें जोमात राहिला. या उत्साहानें हिंदुस्थानचे बाहेर पूर्वद्वीपकल्पेहि त्यानीं व्यापून टाकलीं पण येथें विस्ताराची स्वाभाविक मर्यादा संपली. आधुनिक यंत्रयुगापूर्वीचीं प्रवासाचीं साधनें लक्षात घेता यापेक्षा विस्तार अशक्यच होता. किंबहुना झाला आहे हाच विस्तार झेपण्यासारखा नव्हता. खुद्द भरतखडच सर्व एकछत्राखालीं आणणें अशक्यप्राय असल्याने शिकंदराप्रमाणें हिंदुस्थानच्या बाहेरील प्रातावर दिग्विजयाची स्वारी काढण्याचा बेत कोणा हिंदुसम्राटानें केला नसल्यास त्याला बिलकूल नावें ठेवता येणार नाहींत अफाट भरतखंडाची दौलत हीं येवढी मोठी होती कीं तेवढी टिकविण्यातच सर्व शौर्य आणि बुद्धिवैभव खर्ची पडावें. यामुळें भरतखंडाच्या बाहेरील जगात काय उलाढाली चालल्या आहेत याकडे लक्ष देण्याचें अगत्य वाटले नसावें.

धर्मभावनेचें शैथिल्य

पण परक्या बुभुक्षिताच्या टोळधाडी वरच्यावर येऊं लागल्या तेव्हा

मात्र त्याचा यशस्वी प्रतिकार करण्यास उपयोगी पडणारी जूट आणि संघटना निर्माण करण्याचे अगत्य वाटावयास हवें होतें. एखादा प्रभावी सम्राट् निघे तेव्हा तो परकीयाना पिटाळून लावी. पण एरवी परक्याच्या आक्रमणप्रसंगी जुटीने आणि शिस्तीनें प्रतिकार करण्याचे तंत्र निर्माण झालें नाहीं. जूट निर्माण करणाऱ्या दोन जोरदार भावना म्हणजे धर्मभावना व राष्ट्रभावना. पैकीं मुसलमानाच्या पूर्वीच्या आक्रमणाविरुद्ध जूट निर्माण करण्यास धर्मभावनेचा फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. कारण हे आक्रमक स्वतःच येथील वैदिक किंवा बौद्धधर्म स्वीकारीत हें कनिष्क, मिनँडर, मिहिरगुल वगैरेंच्या उदाहणावरून दिसून येईल. परकीयानीं धर्मभावनेस विरोध करण्याचे टाळल्यानें व धर्मभावनेच्या सहिष्णु आणि सग्राहक वृत्तीमुळे तिच्यातील पीळ आणि जोर शिथिल झाला होता. यास्तव हिंदुधर्मभावनेवर आघात करणारे मुसलमानी व खिश्चन आक्रमण सुरू झालें तेव्हा धर्मभावनेच्या बळावर संघटन करण्याइतकी ती भावना प्रखर राहिली नव्हती. देवद्रोही कुत्याना मारून काढावें अशी जळजळीत भाषा बोलणारा रामदासासारखा एखादाच साधुसंत सापडावा याचा दुसरा अर्थ काय ! गोव्यास राहणाऱ्या हिंदूंना खिस्ती पोर्तुगीजाचा अनेक प्रकारचा जुलूम सहन करावा लागे. पोरक्या मुलास सक्तीनें बाटविण्यात येई, मंदिरें उभारण्यास परवानगी मिळत नसे, विवाहविधिही सरहद्दीबाहेर उरकावा लागे. तरी देखील तत्रस्थ हिंदु प्रजेच्या धर्मरक्षणाकरिता मराठ्यानीं विशेष यातायात केलेली दिसत नाहीं. वसई पडल्यानंतर गोव्यावर पेशवे चालून गेले (१७३९) तेव्हा तेथील पोर्तुगीज सधन कुटुंबें गोवे मोकळे सोडून मुरगावास गेलीं. तेव्हा धन हातीं लागणारें नसल्यानें मराठ्याचा उत्साह कमी झाला. याबाबत चिमाजीआप्पास आलेल्या एका पत्राचा उल्लेख करून प्रो. पिसुर्लेकर लिहितात कीं, "गोवें काबीज करण्यात लुटीखेरीज अधिक उच्च ध्येय दिसत नाहीं. महाराष्ट्रधर्मरक्षणासाठीं संग्राम करणाऱ्या मराठ्याना गोव्यात हिंदुधर्माची पताका फडकवावयाची इच्छा झाली नाहीं...फिरंग्यावर ठ्यंकटरावानें जय मिळविल्यावर गोव्यात हिंदूचें देऊळ असावें वगैरे भाषा तहाचे वेळीं बोलण्यात आली. पण पुढें या मुद्यास महत्त्व देण्यात आलें नाहीं.....हिंदूंची ही

वृत्ति पोर्तुगीजास ठाऊक होती. विजरई लिहितो कीं 'धर्मस्वातंत्र्याच्या मुद्यावर मराठे मर देतील असे वाटत नाहीं. बाजीरावानें पाठविलेल्या तहाच्या खर्ड्यांत या बाबतींत एक शब्दही नाहीं.' विजरईनें लिहिल्याप्रमाणें धर्मस्वातंत्र्यावर मर देण्यात खरोखरच आला नाहीं. वाटाघाटीच्या सुरवातीस गोवीयात महाराष्ट्रधर्म चालवावा असे कलम होतें पण तहाच्या प्रसगीं तेंही गाळले[1]" पोर्तुगीजाच्या नतर येणाऱ्या फ्रेंच व इंग्रज या फिरंग्यानीं धर्मात हात न घालण्याचें सहिष्णु व धूर्तपणाचें धोरण स्वीकारल्यानें त्याच्याविरुद्ध धर्मभावनेस चेतविण्याची संधि उरली नाहीं. उलट इंग्रजाच्या सहिष्णुवृत्तीने व शिस्तवार राज्यपद्धतीने गुप्त पेढीवाल्यासारख्याना देशद्रोह करण्याइतकी भुरळ पडली.

राष्ट्रभावनेचा अभाव

धर्माच्या बरोबरीनें एकजुटीला उत्तेजन देणारी दुसरी भावना म्हणजे राष्ट्रीय भावना होय. या भावनेचा उठाव आपल्या विचारवंतानीं केलेला आढळत नाहीं. हिमालयापासून समुद्रापर्यंतचा हिंदुस्थान हा एक अखंड, एकसंघ असा देश आहे ही भावना जनमनामध्यें रुजविण्यात आली होती. ती रुजविण्यात अखिलभारतीय तीर्थक्षेत्रे, अखिलभारतीय संस्कृत भाषा व धर्माच्या क्षेत्रातील संग्राहक धोरण कशीं उपकारक ठरलीं हें आपण पाहिलें. पण सामाजिक व राजकीय ऐक्याची भावना रुजविण्यात आली नाहीं. झाले ते उलटच झालें. जातिभेदाला जन्माचें अधिष्ठान दिल्यानें उच्चनीचत्वतेची भावना उत्तरोत्तर तीव्र होत गेली. वैदिक आर्य हिंदुस्थानात आले तेव्हा संख्येने अल्प होते. ज्या अनार्यांशीं त्याचा संबंध येई त्याच्यातील मोठमोठ्या जमातींच्या जमाती व्रात्यस्तोमासारख्या विधीनें त्याना आर्यसमाजात घ्याव्या लागल्या असतील. अनार्यांच्या स्त्रियानाहि आर्य-गृहव्यवस्थेंत स्थान द्यावें लागलें असावें. आर्यांच्यामधील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णांत परस्पर रोटी बेटीव्यवहार असेच. यामुळें वर्णांच्या कल्पना वैदिक वाङ्मयाच्या काळापासून रूढ असल्या तरी लवचिक होत्या. अनार्यांशीं फार प्रमाणावर

१. सरदेसाई स्मारक ग्रथ पृ. २५, २९.

संकर झाल्यावर व बौद्ध जैनाचे वैदिक धर्मावर हले सुरू झाल्यावर वैदिक धर्माभिमान्याना आपली चूक कळून येऊन, आपला वैदिकधर्म सुरक्षित राहावयाचा असल्यास कडक शिस्तीची बंधनें समाजावर लादलीं पाहिजेत अशी भावना उसळली असली पाहिजे. बौद्धधर्माचा व समतेचा प्रसार करणारें अशोकाचें साम्राज्य पुष्यमित्रानें नष्ट केल्यावर वैदिक धर्माचा दुर्दम्य उत्साहानें पुरस्कार करण्यात आला, त्याचे स्वच्छ प्रतिबिंब मनुस्मृतीमध्यें पडलेलें आहे. समता आणि स्वातंत्र्य याऐवजीं वर्णभेद, जातिभेद, जन्मजात उच्चनीचत्व, शिस्तपालन याचा अट्टाहासानें पुरस्कार करण्यात आला. धर्मशास्त्र हें सृष्टयुत्पत्तीबरोबर ब्रह्मदेवानेंच निर्माण केले, वेद हेच धर्माचें मूळ होय, ब्राह्मण हे जन्मानेच चारी वर्णाचे गुरु होत, द्विजाची शुश्रूषा करणे हाच फक्त शूद्राचा अधिकार, वगैरे तत्त्वें मनुस्मृतींत अधिकारवाणीनें आणि अत्यत आवेशानें प्रतिपादन करण्यात आलीं आहेत. अशाच आवेशानें राजा हा परमेश्वराचा अंश होय या तत्त्वाचाही पुरस्कार करण्यात आला. सत्ताधीश राजाना तो रुचण्यासारखाच होता. यामुळें क्षत्रबळ आणि ब्रह्मबळ हीं एकवटून या दोन्ही बळाची सत्ता निमूटपणें मान्य करण्यातच समाजाचें कल्याण आहे अशी आग्रहाची जी शिकवण सुरू झाली त्यातून समाज बाहेरच पडला नाहीं.

शासनसंस्थेंत राजशाही आणि विद्येमध्ये वेदविद्या हींच तेवढीं प्रतिष्ठित समजण्यात येऊं लागलीं. शासनसंस्थेमध्यें लोकशाहीचा कोणत्याही स्मृतिकारानें नुसता उल्लेख देखील केला नाहीं, मग समर्थन करणें तर दूरच. छोटीं छोटीं लोकशाहीरूपाचीं गणराज्यें हीं टिकत नाहींत या अनुभवामुळें अर्थशास्त्रकारानींहि राजशाहीच उचलून धरली. ब्राह्मण श्रेष्ठ कीं क्षत्रिय श्रेष्ठ याविषयीं झालेले तंटे वसिष्ठ-विश्वामित्राच्या कथेंत व बौद्धग्रंथांत पाहावयास सापडतात. बौद्धधर्मानें श्रेष्ठस्थानीं ब्राह्मणाऐवजीं क्षत्रियांची स्थापना केली पण जातिभेद नष्ट केला नाहीं. समतेचे तत्त्व धर्माच्या प्रातात पसराविण्याचें श्रेय बौद्धधर्म आणि भागवतधर्म यानीं मिळविलें, पण व्यावहारिक क्षेत्रात तें त्याना उतरविता आलें नाहीं. व्यावहारिक क्षेत्रात जातिभेदाच्या, वंशपरंपरेच्या, उच्चनीचत्वाच्या तत्त्व चाच सारखा गजर होत राहिला. यामुळें राज्ययंत्रात राजे आणि त्याच्या मोंवतालचे प्रधान व

सरदार याच्याव्यतिरिक्त इतराना काहीं स्थान असूं शकतें याची जाणीवच नष्ट झाली. राजशाही ह्या एकाच पद्धतीचा अव्याहत पुरस्कार होत राहिल्यानें राज्य हें राजघराण्याचें ही कल्पना बद्धमूल झाली. युद्धाकरितां कर्जे उभारलीं तरी तीं राजाच्या वैयक्तिक जबाबदारीवर. अशा स्थितींत सर्वांच्या राज्याची कल्पना किंवा राष्ट्राची कल्पना रुजावी कशी ?

व्यापाऱ्यांत राजकीय दृष्टीचा अभाव

व्यापारी व सावकार याच्या हातीं धनाची सत्ता असल्याने समाजात प्रतिष्ठा आणि राजकारणात प्रवेश मिळण्याबद्दल त्याच्यात चळवळ होणें शक्य होतें. पैकीं ब्राह्मणासारखी प्रतिष्ठा समाजात आपणासही मिळावी याबद्दल दक्षिण-हिंदुस्थानातील सोनार, कासार वगैरे पाच कारागीरवर्गांनीं केलेल्या पंचाल-ब्राह्मण चळवळीचा तेवढा उल्लेख आढळतो. पण हीहि चळवळ बद्धमूल झाली नाहीं, आणि वेदविद्येचें महत्त्व दुसऱ्या कोणत्याहि विद्येला मिळालें नाहीं. कृषि व वैद्यक अशा समाजाच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या विद्या ह्या तर उघडपणें कनिष्ठ लेखण्यात येत. अहिंसेच्या विकृत कल्पनेमुळे असो, वा प्रतिष्ठित वर्गाला कष्टाच्या कामापासून दूर राखण्याच्या स्वार्थी वृत्तीमुळें असो, आपत्कालींहि ब्राह्मणानें कृषीचा अवलंब करूं नये असें स्मृतिकार बजावतात. वेदविद्येचें जतन करणें हें ब्राह्मणाचें आद्य कर्तव्य असेल, पण आपत्कालींही त्याने नागरास हात घालू नये असा कटाक्ष का ? कृषिकर्म हें पाप. पण ते कोणीं तरी केलेच पाहिजे म्हणून तें करणाऱ्या शूद्राला पुण्य, पातक काहींच नाहीं ही कल्पना माडली गेली. खाणींत काम करणें आणि मोठमोठ्या पाटबंधाऱ्यासारख्यात काम करणें याची पातकात गणना करून त्याना प्रायश्चित्त सांगितलें आहे ! उपपातकाची यादी देताना मनूनें 'सर्व आकरेषु अधीकारः महायन्त्रप्रवर्तनम्'[1] याचा त्यात समावेश केला आहे. खाणींत किंवा बंधाऱ्यावर काम करणें कष्टाचें असेल, पण तें पातक काय म्हणून ? ब्राह्मणाना सुवर्णदक्षिणा व राजाना सुवर्णालंकार ह्याचा लोभ असे, पण ती मिळवून देण्याकरिता खाणींत कष्ट करणें हें मात्र पाप !

१. सुवर्णाद्युत्पत्तिस्थानेषु राजाज्ञया अधिकारः । महतां प्रवाहप्रतिबन्धहेतूनां सेतुबंधादीनां प्रवर्तनम् । —कुल्लूकाची टीका.

पाटबंधारे आणि कृषि हीं तर समाजाच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया होत. हा पाया भक्कम मरणाऱ्या वर्गाकडे तुच्छतेनें पाहणे हें विकृत सामाजिक तत्त्वज्ञानाचे मासलेवाईक उदाहरण होय. कृषि, वाणिज्य, शिल्प यावरच आर्थिक जीवनाची उभारणी टिकत असते. या समाजाच्या मूलभूत गरजा मागविणाऱ्याला व कष्ट करणाऱ्याला समाजात योग्य प्रतिष्ठा मिळणें अवश्य आहे. पण हिंदुसमाज सहिष्णु असला तरी जातिजातींतील जन्मजात उच्चनीचतेचा व जन्मजात नियतकर्माचा हिरिरीनें प्रसार करण्यात त्यानें एकदा जी कठोर वृत्ति स्वीकारली ती पुढें नरमावलीच नाहीं. भागवतधर्मानेंहि अध्यात्माच्या प्रातांत समतेचा पुरस्कार केला तरी व्यावहारिक क्षेत्रात विषमता कायम राखली. ज्या जातींत पूर्वप्राक्तनानें जन्म मिळाला त्या जातीचें नियतकर्म करीत राहावे हाच धर्मशास्त्राचा एकमेव आदेश. शिंदे, होळकर याच्यासारखे पराक्रमी पुरुष सरदारी मिळवीत, क्षत्रियाचा पेशा स्वीकारीत, पण तें धर्मशास्त्राच्या आज्ञेला डावलून. असे पराक्रमी पुरुष निघतील तेव्हा ते राजकारणात आपला प्रवेश करून घेत पण ते सरदार बनून पुढे त्याची सरदारी वंशपरंपराधिष्ठित होई. ब्राह्मण किंवा वैश्य याच्यातही धाडसी आणि पराक्रमी असत ते जातिनियत धंद्याच्या धार्मिक तत्त्वाला धाब्यावर बसवून क्षत्रियाचा पेशा स्वीकारीत व सरदार किंवा राजे बनत. पण बाकीच्याची राजकारणात आपुलकी वाटण्यासारखी परिस्थिति नव्हती. आपआपले उद्योगधंदे सांभाळूनही राजकारणात भाग घेता येणें शक्य आहे हे सामाजिक तत्त्वज्ञानच आपणात माडलें गेलें नव्हतें. वास्तविक व्यापारी, उदमी, सावकार याच्या हातीं धनाची केवढी सत्ता ! पण त्या सत्तेच्या जोरावर राजकारणात स्थान मिळविता येईल ही कल्पनाच कधीं व्यापाऱ्याना सुचूं शकली नाहीं ! चिररूढ तत्त्वज्ञानाची अशी ही कडक पकड मनावर बसते. मागें अबूवरील देवळें बांधणाऱ्या गुप्त पेढीवाल्याची हकीकत दिली आहे. मंदिरें बांधण्याकरिता त्यानीं दहा कोटि रुपये खर्च केले यावरून त्याच्या सधनतेची कल्पना येईल. त्यानीं इंग्रजाना पैशाची मदत केली व त्याच्यासाठीं हेरगिरीहि केली याचाही उल्लेख मागें आला आहे. पण या कामगिरीबद्दल राजकारणात आपणाला स्थान मिळावें अशी अट त्यांनी

घातली काय ? कलकत्त्यास गव्हर्नराचें कार्यकारी कौन्सिल असे त्या कौन्सिलात आपल्या पेढीचा मुनीम कायमचा सभासद असावा अशी मागणी त्यानीं केली असती तर अनेक अडचणींतून बाहेर पडण्यास त्याचें साहाय्य घेणाऱ्या इंग्रजाना त्याची अट मान्य करणें भागच पडले असतें. पण ही अट घालावयाचें सुचावयाचेच कसें ? जुन्या परंपरागत मळलेल्या वाटेनें जाणें हीच मानवी मनाची नित्याची प्रवृत्ति. यामुळे आपला व्यापार सुरक्षित राहावा व धर्म निर्वेध चालावा येवढ्यावर गुप्त पेढीवाले राजी होते. व्यापार सुरक्षित राहण्यास राजसत्तेचा पाठिंबा लागतो हे त्याना कळत होतें; पण राजसत्तेत हक्काचें स्थान व्यापाऱ्यालाहि निर्माण करता येतें ही लोकशाही कल्पना त्याच्या मनाला शिवली नव्हती. या गुप्त पेढीवाल्यात कोणी धाडसी निघाला असता तर त्याने फक्त एखादी जहागिरी मिळविली असती इतकेंच.

सावकारी व वतनदारी

गुप्तासारखे परक्यांना फितुर झालेले सावकार सोडून स्वकीय राजाना कर्ज देणारे सावकार घेतले तरी त्यानींही कर्ज देताना राजकारणात प्रवेश मिळण्याची अट घातलेली दिसत नाहीं. पैशाच्या जोरावर ते जहागीरदारी मिळवीत व छोटे राजे बनत. पण मध्यवर्ती शासनसंस्थेत हक्काचे स्थान मिळविण्याची कल्पना आपल्याकडे निघाली नव्हती. पेशव्याना कर्ज काढण्याचा प्रसंग नित्याचा असल्यानें अनेकाकडून कर्ज काढावें लागें. '१७४० सालीं लाख लाख रुपयेपर्यंत ज्यानीं कर्जे सरकारास दिलें असे सावकार पुण्यास सुमारें १६२ होते.'[1] परशुराम नाईक अनगळ यानें थोरल्या बाजीरावास लक्षावधि रुपये कर्ज दिलें होतें. महादजी शिंद्यास कर्ज देणारा गोपाळ नाईक ताबवेकर यानें काशीपासून रामेश्वरापर्यंत अनेक पेढ्या स्थापून कोट्यवधि रुपयाची जिंदगी संपादन केली होती.[2] असले धनवंत सावकार लाखों रुपये सरकारास कर्जाऊ देत असतानाहि त्याच्या जोरावर राजकारणांत हक्क संपादण्याची कल्पना येथें उत्पन्न होऊ शकली नाहीं. जें

१. पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ३१६.

२. कित्ता, पृ. ३६९

काय संपादन करावयाचें तें वतन. या वतनाच्या मायेनें आपल्या पूर्वजांचीं मनें कायमचीं मारून गेलेलीं होतीं. ह्या वतनाच्या लोभामुळें सामाजिक दृष्ट्या हितानहिताचा विचार मागें पडून वैयक्तिक स्वार्थ बळावला. आपलें वतन संभाळणे हाच श्रेष्ठ पुरुषार्थ होऊन बसला. तें संभाळण्याकरितां बाधबद्रोह, ग्रामद्रोह, धर्मद्रोहही करण्यास मन कचरेनासें झालें. येथवर या वतनाची मगरमिठी घट्ट झाली. आणि वतनें वंशपरंपरागत. वंशपरंपरेचें तत्त्व हें एक मूलभूत तत्त्व म्हणून सरसहा प्रतिपादण्यात आले. यामुळें समुद्र-रशना पृथ्वीच्या चक्रवर्ती राजापासून तो टीचभर गावच्या पाटलापर्यंत वंश-परंपरेनें वतन खाणाऱ्या वतनदाराची अखंड साखळी निर्माण झाली. प्रत्येक वतनदार आपल्यापुरतें पाही. आणि हीच वृत्ति सर्वत्र प्रभावी होऊन राहिलेली. शिलेदार लष्करात आपले घोडे घेऊन गेला म्हणजे आपल्या राजाला हार खावी लागली यापेक्षा आपले घोडें फुकट मरेल कीं काय याचीच त्याला चिंता असे याचा उल्लेख मागे केला आहे. खेड्यापाड्या-तही हीच वृत्ति. जें ते गाव आपआपल्यापुरतें पाही. आपला गावगाडा हा स्वावलंबी व संतुष्ट असे त्याचे वर्णन करण्यात येतें. त्या गावगाड्यासंबंधी हरत-हेची माहिती ज्यानीं गोळा केली ते लिहितात कीं "संबध काळी पाढरीचीं सामाजिक, राजकीय जबाबदारी गावाने सर्व मिळून घ्यावी, कोणत्याही कारणानें त्याला परगावाशीं किंवा खुद्द सरकारापाशीं सुद्धा तोंड वेंगाडण्याची गरज पडू नये हें ध्येय डोळ्यापुढे ठेवून आमच्या पूर्वजानीं गावगाडा भरला. म्हणून तो पूर्वीच्या बेबंदशाहींतून वाचून निघाला."[१] पण गावगाड्याच्या या स्वयपूर्णतेची दुसरी बाजू ते कशी माडतात तें पाहा. ते लिहितात, "जें ते गाव आपआपल्यापुरते पाही. शेजारच्या गावावर बंड आलें तर त्याचे शिवमाऊ त्याच्या मदतीला न धावतां खुशाल आपआपल्या शेतात नागर कुळव हाकीत." साराश, वतन, वंशपरंपरा, तुटक वृत्ति यामुळें सर्व समाजात एक वारें खेळणें कठीण असे. जातिभेद, उच्चनीच भाव, वेतन, वंशपरंपरा या सर्वांच्या अहर्निश शिकवणीनें विचारस्वातंत्र्य दडपले गेलें. त्याच्या विरुद्ध उठावणी झाली पण ती धार्मिक बाबतींत. बौद्ध, जैन, लिंगायत, मानभाव, भागवत

१. त्रिंबक नारायण अत्रेकृत गांवगाडा, पृ. १७, १८.

या पंथानीं समतेचा पुरस्कार केला पण तो अध्यात्माच्या आणि धर्माचरणाच्या क्षेत्रात, व्यवहाराच्या क्षेत्रात तो त्यांना उतरून दाखवितां आला नाहीं. यामुळे लोकशाहीच्या कल्पना रुजल्या नाहींत व सर्व समाजपुरुषात एक रक्त खेळत आहे ही जाणीव उत्पन्न झाली नाहीं.

त्या त्या धंद्यात नवीन शोध लागण्यालाही जन्मजात धंदाच प्रत्येकानें करावा ही कल्पना, तसेच उत्पादक, कष्टाच्या व कसबी धंद्याविषयीं हीन भावना ह्या बऱ्याच अंशीं कारणीभूत झाल्या असाव्या. आठव्या शतकानंतरच्या पडत्या काळात साक्षरतेचें क्षेत्र अगदीं संकुचित झालें. प्राचीन काळीं त्रैवर्णिकाचे उपनयन होत असे व शूद्र सोडून बाकी जनता साक्षर असे. ग्वाल्हेर संस्थानातल्या मंदसोर येथील लेखावरून कारागिराच्यामध्यें पाचव्या शतकात विद्याव्यासंग कसा होता व नियत कर्मच केले पाहिजे याचीं जोखडही कशी नव्हती याचे चित्र दृष्टीस पडतें. मंदसोर येथें सूर्याचें एक भव्य मंदीर पाचव्या शतकात एका धनाढ्य वीणकर संघानें बांधलें. त्या संबंधींच्या लेखात लिहिलें आहे कीं हा संघ मूळ लाट देशचा असून दशपूरच्या राजाची कीर्ति ऐकून दशपुरास आला. तेथें आल्यावर काहींनीं आपला पूर्वीचा विणकराचा धंदा सुरू ठेवला पण संघातील इतर सभासदांनीं निरनिराळ्या विद्या कला संपादन केल्या. कोणीं धनुर्वेदाचें अध्ययन केलें, कोणी ज्योतिषात पारंगत झाले, कोणी धर्मोपदेशक बनले.[1] विद्येचें हें खेळतें वारें पुढील काळीं राहिलें नाहीं. क्षत्रिय-वैश्याचे उपनयन लुप्त झाले व साक्षरता फक्त ब्राह्मणातच संकुचित झाली. ब्राह्मणाची वेदविद्या ही उत्पादक नसल्यानें देणग्या देऊन त्यांची विद्या जगविणें जरूर होतें. पण त्या देणग्यानीं पुण्य जोडतें या कल्पनेनें या देणग्याचा पूर जरूरीपेक्षा अधिक या क्षेत्रात वाहूं लागला. पिकाला पाणी लागतें पण तें अधिकांश झाल्यास बाधक होतें. तसाच प्रकार येथेंही झाला. मंदीर, मठ, अग्रहार याच्यावर पैशांची खैरात होऊं लागली. या मंदीरमठांना जोडून पाठशाळा असत. पण त्यात प्रामुख्यानें वेदविद्याच शिक-

१. Select Inscriptions p. 290.

विली जाई. दहाव्या शतकातील राजेंद्र चोल याच्या कारकीर्दीत एका मंदिराला देणग्या दिल्याचा लेख आहे त्यातील तपशील असा : मंदिराला जोडलेल्या पाठशाळेत ऋग्वेद व यजुर्वेद शिकणारे प्रत्येकी ७५, छादोग्यसाम, तवलकारसाम, वाजसनेय शिकणारे प्रत्येकी २०, अथर्व व बौधायन, गृह्यकल्प शिकणारे प्रत्येकी १०, रूपावतार ४०, व्याकरण शिकणारे २५, मीमासा ३५, वेदान्त १० इतक्या विद्यार्थ्यांची अन्नाछादनाध्यापनाची व्यवस्था करण्यात आली होती.[1] हीच प्रथा पेशवाईत दिसून येते. पेशव्याची श्रावणमासदक्षिणा प्रसिद्ध आहे. ही दक्षिणा लाखों रुपयाची वाटण्यात येई व गुणी जनाची संभावना करण्यात येई. पण त्यात कोणत्या विद्या प्रामुख्यानें वावरत हें या संबंधीच्या एका यादीवरून दिसून येईल. त्या यादीत नावें आहेत तीं-आश्वलायन दशग्रंथी, आपस्तंब पंचग्रंथी, तेलंग जटापाठी, काण्व क्रमपाठी, व्याकरण कौस्तुभ पढलेले, नैयायिक भावानंदी जाणणारे, काव्यपाठी माघान्त पढणारे, अलंकारी कुवलयानंद पढविणारे वगैरे.[2] या यादीमध्यें व्यवहारोपयोगी अशा धंदेवाइकाचें नाव आढळतें ते 'वैद्य शारङ्गधर पढविणारे व रसायनक्रिया जाणणारे' याचें होय. आठव्या शतकानतरच्या पडत्या काळात ज्या एकाच शास्त्राची जोपासना क्षीण झाली नाहीं तें शास्त्र म्हणजे रसायनशास्त्र हें होय. मागें 'ऐश्वर्योपासना' या प्रकरणात उल्लेखिलेले कांहीं रससिद्ध तेराव्या चौदाव्या शतकांतले आहेत (पृ. १४७). पाऱ्याचे विलक्षण गुणधर्म समजून आल्यानें व त्याच्या सेवनाने अमरत्व प्राप्त होण्याच्या आशेनें ही विद्या जागृत राहिली असावी. ही विद्या सोडल्यास बाकीच्यांत नवीन भर पडणें बंद झालें हे तें. पेशव्याच्या पूर्वी दोनशें वर्षे अकबर बादशहाच्या कारकीर्दीत हिंदु लोक व मुसलमान लोक कोणत्या विद्याचा अभ्यास करीत ह्याविषयीं अबुलफाजल लिहितो कीं, 'हिंदु हे व्याकरण, वेदान्त, पातंजल हें शिकतात तर मुसलमान हिशेब, अंकगणित, शेती, राज्यशास्त्र, इतिहास, मूगोल, नीति वगैरे शिकतात.[3]

१. Corporate Life by Majumdar, p. 201.

२. य. न. केळकर कृत भूतावर भ्रमण, पृ. १५८.

३. Ayeen Akbery, translated by F. Gladwin Vol.I p. 193.

साक्षरता मुख्यतः ब्राह्मणात आणि त्याचें लक्ष वेदवेदान्त– व्याकरण यांकडे; याचा परिणाम श्रेष्ठ दर्जाची व न्याय-व्याकरणादिकाच्या अभ्यासानें प्रखर झालेली बुद्धिमत्ता भौतिक शास्त्राच्या वाट्यास येईनाशी झाली. असावी. यामुळें भौतिक शास्त्रातील शोधक बुद्धि मरगळली असावी.

कसेंहि असो, इंग्रजांच्या आक्रमणकालीं आम्ही भौतिक शास्त्रात आणि सामाजिक संघटनेंत मागसलेले होतों ही गोष्ट निर्विवाद आहे. त्याच्या काहीं संभाव्य कारणाची चर्चा केली. या कारणापैकीं प्रकृतिधर्मानुसार संस्कृतीला मरगळ येते असें मानलें तरी व्यक्तीला एकदा वृद्धावस्था प्राप्त झाल्यावर पुन्हा तारुण्यात प्रवेश करिता येत नाहीं तो नियम समाजाला लागू आहे असे मानण्याचें मुळींच कारण नाहीं. व्यक्ति वृद्ध होत असली तरी समाज वृद्ध न होता समृद्ध होऊं शकतो. त्याची नेहमींच प्रगति होत असते असें नाहीं. प्रगति-परागतीचे हेलकावे त्याला खावे लागतात. पण समाज जागृत असेल, त्याचे दोष त्याला दिसत असतील, पुनश्च वैभवावर चढण्याचा हुरूप असेल, तरीही तो दुर्बल होत जावा असे नियतीचे सूत्र दिसत नाहीं. वृक्ष शुष्क होत होत अंतीं वठलाच पाहिजे हा दाखला समाजास लावणे गैर आहे. दाखला द्यावयाचा तो वनाचा. असख्य वृक्ष वठले तरी नवे त्यांची जागा घेण्यास उगवत असतात व वन हें पर्ण-पुष्पानीं डंवरलेलें असतें. तसेंच समाजाचें. आपला समाज आता जागृत झाला आहे, पुनश्च वैभवानें मिरविण्याचा त्याचा कृतनिश्चय झाला आहे. तरी आता आपल्या संस्कृतीच्या रुद्ध झालेल्या प्रवाहाकडून पुनश्च जोमानें वाहणाऱ्या प्रवाहाचें दर्शन घेऊं या.

प्रकरण सोळावें

संस्कृतिगंगेचा पुनश्च जोरकस प्रवाह !



आपल्या संस्कृतीचा मूळचा जोरकस प्रवाह कालांतराने दुबळा कसा झाला व त्यावर अंधश्रद्धेचे शेवाळें कसे माजले हे आपण पाहिलें; व या अवस्थेला कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या असाव्या याविषयीं तर्क चालविण्याचा प्रयत्न केला. शेवाळें माजलेल्या या संचितावस्थेंत हा प्रवाह आज कित्येक शतके रुद्ध होऊन बसला होता. त्याला आता कालगतीने पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षाने जोराचा धक्का दिला आहे. या धक्क्यानें जागे होऊन अंधश्रद्धेचें शेवाळे झाडून जर आपण टाकू आणि प्रवाह रुद्ध करणाऱ्या जाचक आचारविचाराचे धोडे बाजूला जर सारू तर आपली संस्कृतिगंगा पुनश्च आपल्या विमल प्रभावी रूपाने वाहू लागेल, आणि जागतिक संस्कृतीच्या पुण्योदकात स्वतःची म्हणून काहीं भर अभिमानाने टाकूं शकेल.

जागतिक संस्कृतीची उंची जेणेंकरून वाढेल असें आमच्याजवळ देण्यासारखें नाहीं असेंहि नाहीं. पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षानें व आक्रमणानें आमच्यातले दोष आम्हास जाणवूं लागले आहेत. प्रगतीच्या शर्यतींत काहीं बाबतींत त्यानीं आमच्यापुढे आघाडी मारली आहे हें आम्हाला कळून चुकलें आहे. आम्ही विद्येची हेळसांड करून मिथ्याभिमानाच्या रंगणात फिरत राहिलों हें पटूं लागले आहे. ही हेळसांड टाकून पुनश्च पूर्वीची उत्साही वृत्ति उजळली पाहिजे हे उमगू लागलें आहे. पण आजहि प्रत्येक बाबींत पाश्चात्यांच्या पायाशीं धूळपाटी घेऊन बसण्याची आम्हांस आवश्यकता आहे असें नाहीं. मनाला शाश्वत शांतीची जोड मिळवून देणारी अध्यात्मविद्या घ्या. या विद्येकरिता आम्हाला काय पाश्चात्यांच्या पाठशाळात गेलें पाहिजे ? मुळींच नको. साक्षात् मृत्यूशीं

धीटपणानें चर्चा करणाऱ्या आपल्या नचिकेताचे तत्त्वज्ञान आम्हालाच नव्हे तर इतरानाहि पुरून उरेल. सार्वजनिक आरोग्याचे व स्वच्छतेचे धडे पाश्चात्यापासून शिकावे म्हणता ? सुतराम् नको. सोवळ्या-ओवळ्याचा आम्हीं अतिरेक केला असेल, पण प्रातर्विधीकरिता जलाचा उपयोग न करणारे पाश्चात्य आम्हास शुचिर्भूतपणा काय शिकवणार ? सामाजिक जीवनात स्त्रियाना प्रतिष्ठित स्थान देणे हें एक पाश्चात्य संस्कृतीचे लक्षण समजण्यात येतें. पण याहि बाबतींत दोन्ही संस्कृतींचा शतकानुशतकाचा आचार पाहिल्यास स्त्रियाच्याकडे उदार दृष्टीनें पाहण्याच्या बाबतींत भारतीयानींच दोन गोष्टी पाश्चात्याना सांगाव्या अशी स्थिति आहे. अगदीं अलीअलीकडे पर्यंत, म्हणजे १९१४-१८च्या महायुद्धापर्यंत, इंग्लंडमधील प्रतिष्ठित विद्यापीठे हीं स्त्रियाना पदवी देत नसत व त्याना वकिलीसारख्या धंद्याची सनद देत नसत हे सांगितले तर खरे सुद्धा वाटणार नाहीं. आपल्या देशात घोषा, लोपामुद्रादि सूक्तकार स्त्रियाची व भरसभेंत पतीशीं वेदान्त विषयावर चर्चा करणाऱ्या गार्गीसारख्या विदुषी स्त्रियाची परंपरा फार प्राचीनकालीं रूढ होती. विवाहाचे वय झाल्यावरहि गृहिणीपदाची जोखीम न स्वीकारता बराच काल विद्येच्या उपासनेत घालविणाऱ्या स्त्रिया असत; त्याना ब्रह्मवादिनी स्त्रिया असें स्वतंत्र नाव हारीत स्मृतीमध्यें दिले आहे (द्विविधः स्त्रियः ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च). यापैकीं काहीं विद्यालयातून अध्यापनाचे कामहि करीत व उपाध्याय पत्नीहून त्याचें स्थान स्वतंत्र दर्शविण्याकरिता पाहिल्याना उपाध्यायानी म्हणून दुसऱ्याना उपध्याया असें म्हणत. पुरुषाप्रमाणें स्त्रियांचा उपनयनेंही एके काळीं होत असत. तो प्रकार पुढें बंद पडला व स्त्रियाचा सामाजिक दर्जाहि खालावला तरी गाथासप्तशतींत ज्याचीं कवने घेतलेलीं आहेत अशा रेवा, माधवी वगैरे कवयित्री व राजशेखराची पत्नी अवंतिसुंदरी अशा विदुषी याची परंपरा सुरू होती. ही परंपरा पाहून पाश्चात्य पंडिताना अचंबा वाटला तर आश्चर्य नाहीं. त्याच्यापैकीं एक पंडित प्राचीन भारतातील वैवाहिक जीवनाची चर्चा करीत असता गार्गीसंबंधीं लिहितो, "वेदान्तासारख्या विषयावर एका स्त्रीनें भरसभेमध्यें धीटपणें चर्चा करावी हा प्रकार आमच्या ॲरिस्टॉटल किंवा प्लेटोलाहि किती हास्यास्पद वाटला असता ! आणि

मध्ययुगातील धर्मोपदेशकाना ? ते तर आपल्या सभामधून गंभीरपणें चर्चा करीत होते कीं, स्त्रियाना आत्मा आहे असें मानावें कीं न मानावें !"[१] कुटुंबातील गृहिणीच्या दर्जाची महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचे आर्थिक स्वातंत्र्य ही होय. या बाबतींत तर पाश्चात्यानाच मान खालीं घालावी लागेल. कारण विवाहित स्त्रीला स्वतःचे स्त्रीधन ठेवण्याचा हक्क इंग्लंडमध्यें १८८२ पर्यंत नव्हता, आणि आपल्याकडे याज्ञवल्क्याच्या काळापासून तो मान्य केलेला आहे. वैदिक काळातील स्त्रियाचा दर्जा वैदिकोत्तर काळीं राहिला नाहीं. तो पुनश्च त्याना प्राप्त करून देणे जरूर आहे.

आपल्या संस्कृतीतील वरीलपेक्षा अधिक महत्त्वाच्या बाबी म्हणजे सामाजिक ऋणाची कल्पना, आश्रमव्यवस्था व सहिष्णुता. माणूस जन्माला येतो तो समाजाचें ऋण घेऊनच येतो व ते त्याने फेडलेच पाहिजे ही एक आपल्या प्राचीन धर्मशास्त्रकारानीं माडलेली उदात्त कल्पना होय; आणि ती अंमलात आणण्याकरिता जीवनाचे चार भाग पाडून विद्येच्या काळीं विद्यार्जन, गृहस्थाश्रमात ससारसुख, म्हातारपणीं वानप्रस्थाश्रम व अंतीं सर्वसंगपरित्याग अशी जीवनाची सुंदर, प्रमाणबद्ध माडणी त्यानीं केली होती. ही आश्रमसंस्था टिकली नाहीं हें दुर्दैव. समाजाचें ऋण फेडल्याशिवाय मोक्षमार्गाकडे वळणारा माणूस अधोगतीला जातो अशा खणखणीत वाणीनें स्मृतिकाराने बजावले असताहि सन्यासमार्गाचाच पगडा समाजावर बसला व सर्वश्रेष्ठ आश्रमसंस्था नष्ट झाली. पण तिच्यातील कल्पना ही एक चिरंतन उपकारक अशी कल्पना होय. तिसरी गोष्ट सहिष्णुवृत्तीची. ही वृत्ति भारतीयानीं धर्माच्या प्रातात तरी कशी नमुनेदारपणें जागविली याचीं उदाहरणें मागें अकराव्या प्रकरणात दिलींच आहेत. ह्याच सहिष्णुवृत्तीचा परिपोष जागतिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रात झाला तर आजच्या जगाचा रंग सर्वस्वीं पालटेल. या बाबतींत घडा घालून देण्याची योग्य पात्रता कोणात असेल तर ती भारतीय संस्कृतीतच आहे.

पण... पण राजकीय पारतंत्र्याच्या लोहशृंखलानीं जखडून गेलेली आपली ही संस्कृति आज जगाला सहिष्णुतेचा उपदेश कोणत्या तोंडानें

१ Sexual Life in Ancient India by Meyer. Vol. I. P. 440.

करणार ? तो उपदेश तिच्या तोंडून खणखणीत वाणीनें बाहेर पडावयाचा असेल तर तिला प्रथम आपल्या पायातील पारतंत्र्याच्या बेड्या तोडाव्या लागतील. आणि त्या तोडावयाच्या तर ज्यानीं त्या पायीं ठोकल्या त्याचें सामर्थ्य त्याच्या ज्या विद्येंत आणि समाजरचनेंत साठविलेलें आहे तीं हस्तगत करावीं लागतील. स्वतंत्र झाल्यावर व स्वतःस सामर्थ्य प्राप्त झाल्यावर त्या सामर्थ्याचा उपयोग परक्याच्या पायात बेड्या घालण्याकरिता आपण कधीहि करणार नाहीं हें साक्षात् कृतीनें सिद्ध करून जगताला तिला धडा घालून देता येईल. पण तें होण्यास आजची दुर्बलावस्था ज्या कारणानें प्राप्त झाली आहे तें ओळखून भौतिक शास्त्राची उपासना, सर्वे नः सुखिनः सन्तु हा समतावाद, व ऐहिक आपत्ति दूर करण्यास ऐहिक मार्गाचा अवलंब ह्या गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

दुर्दैवानें असा एक विचारवंताचा वर्ग आपणामध्यें आहे, कीं ज्याना आपली अवनति दूर करण्याचा उपाय म्हणजे ईश्वराच्या न्यायीपणावर भरवंसा ठेवून धार्मिक वृत्तीनें आयुष्य कंठीत बसणें येवढाच होय असें वाटतें ! आणि दुसरा एक असा वर्ग आहे कीं ज्याना अवनति झाली आहे हेच मुळात मान्य नाहीं !!

धर्मानुष्ठान हेंच स्वातंत्र्यसाधन

या दोन पथाच्या विचारसरणीचें दिग्दर्शन म्हणून 'नवयुगधर्म' व 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' या दोन ग्रंथातील मासलेवाईक उतारे पाहूं. राजकीय स्वातंत्र्याकरिता आज आपल्या देशात चालू असलेल्या लढ्याची पद्धति ही नवयुगधर्मकाराना सर्वस्वीं फोल वाटते. आजची चळवळ ही मानवी प्रयत्नाच्या अनुरोधानें चालविली जात आहे. तिच्यात ईश्वरी कृपेचे आवाहन नाहीं. पण नवयुगधर्मकाराच्या मतें ईश्वरी कृपा संपादन करणें हीच चळवळीची खरी दिशा होय. ते लिहितात, " धर्म ही एक किमया आहे ही गोष्ट आजकाल लोक विसरले आहेत. आज जें राजकारणास महत्त्व प्राप्त झालें आहे तें योग्यच आहे असें जरी मानलें, तरी आज शें-दीडशें वर्षांचा जडलेला पारतंत्र्याचा राजयक्ष्मा दूर होण्यास सद्धर्मानुष्ठानावाचून दुसरा इलाज नाहीं; उपासनेच्या बळावाचून दुसरें बळ

नाहीं; ईश्वरी कृपा संपादन करण्यापलीकडे दुसरा तरणोपाय नाहीं असें आम्हास तरी स्पष्ट वाटत आहे! आग्लविद्याब्राह्मीचें दूध प्यालेल्या कित्येक प्रागतिक चळवळ्या वाघानीं बारा हात उडी मारण्याच्या अवसानानें शेपट्या झाडाव्या, परंतु पुढे चारी बाजूंनीं मारलेले पोलादी गज पाहून त्यावर गुरगुरत आपलीं नाकें घासून रग जिरवावी अशाच प्रकारच्या आजच्या साऱ्या राजकीय चळवळी परिणामीं दिसत आहेत. उघड्या डोळ्यानीं प्राण जात नाहीं म्हणून काहीं धडपड करावयाची इतकेंच! असले हे निराशेचे उद्गार सांगण्यास येवढी ग्रंथप्रवृत्ति नको होती असे कोणी म्हणेल; त्यास आम्हास येवढेच सांगावयाचें आहे कीं, आम्ही निराशावादी नाहीं; प्रबल आशावादीच आहोंत; पण **ईश्वर करील तें खरें अशी आमची बळकट श्रद्धा आहे.** त्या ईश्वरी कृपेस पात्र होण्यासाठींच धर्मानुष्ठानाची आम्हास जरूर आहे."[1]

ग्रंथकर्त्याने आपलें प्रामाणिक मत स्पष्ट शब्दात माडले आहे हें उघड आहे; म्हणून तितक्याच प्रामाणिकपणें आणि निःसंदिग्धपणे येथे सांगितलें पाहिजे कीं, राजकीय चळवळीची आज जगभर अवलंबिली जात असलेली लौकिक, व्यावहारिक, मानवीप्रयत्ननिष्ठ, त्यागप्रधान अशी प्रणाली सोडून ईश्वरकृपासंपादनाच्या अनुष्ठानप्रधान मार्गाला जर आपला देश लागेल तर त्या चळवळीला यश येण्याची आशाच नष्ट होईल. सर्वशक्तिमान् ईश्वरानें मनात आणल्यास काय वाटेल ते होईल हें तर खरेंच; पण मानवाला बुद्धीचें देणें दिले असताहि त्यानें त्याचा उपयोग करण्याऐवजीं केविलवाणेपणानें आपली करुणा भाकीत बसावें या दौर्बल्याबद्दल ईश्वरालाहि मानवाचा तिटकारा वाटल्यावाचून राहणार नाहीं. म्हणून ईश्वराच्या अमूर्त स्वरूपाची उपासना करीत बसण्यापेक्षा ईश्वराचें मूर्तस्वरूप जी जडसृष्टि आणि चैतन्यसृष्टि त्या सृष्टीचें रहस्य उकलण्याचा प्रयत्न करणारीं जीं भौतिक शास्त्रें व सद्भावना बलिष्ठ करणारीं सामाजिक शास्त्रें त्याची उपासना करणें हेंच समाजाच्या हिताचें होय.

---

१. स. कृ. फडकेकृत नवयुगधर्म पृ. ७६४. नवयुगधर्म या ग्रंथातील विचारसरणीचा परिचय व परीक्षण यांकरितां 'वादळी वारें' लेख ६ वा पाहा.

कोण म्हणतो आमची अवनति झाली ?

आता आपली अवनति झाली आहे हाच मुळीं भ्रम आहे अशा प्रकारची विचारसरणी ऐकू या. शास्त्रीय ज्ञानात एके काळीं आपण उच्च स्थानावर होतों; पण कालांतराने घसरत घसरत खालीं आलो ते पुन्हा शास्त्रीय ज्ञानाची कास धरल्याशिवाय आपण जगातील श्रेष्ठ राष्ट्रमालिकेंत स्थान मिळवूं शकणार नाहीं असा आपला सूर आहे. पण आपण मागसलो हाच मुळीं भ्रम असून, आपल्या राष्ट्राचा नाश टाळण्याकरिता आपली प्रगति आपण होऊन जाणूनबुजून एका मर्यादेनंतर थाबविली असे कोणी प्रतिपादन केलें तर तुम्ही काय म्हणाल ? हे प्रतिपादन काल्पनिक नसून 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' या ग्रथाच्या कर्त्यांनीं स्पष्ट शब्दात माडलेले आहे. ते लिहितात कीं, " इतिहासात तरी जेथे जेथे मानवी प्रगति तेथें तेथें नाश असा त्रिकालाबाधित सिद्धान्त दिसून येतो. प्रगति म्हटली कीं नाश ठेवलेलाच. **हिंदु व चिनी लोकांनीं किंचित् कालपर्यंत प्रगति केली व ते तेथें थांबले. ते समाज आज पृथ्वीच्या पाठीवर जिवंत आहेत.** ग्रीक आणि रोमन लोक सारखे प्रगति करीत गेले ते विनाश पावले ! "[1] असे हें प्रतिपादन आहे !

किंचित् कालपर्यंत प्रगति करण्याची तरी आमच्या पूर्वजाना का अवदसा आठवली कोणास ठाऊक ! खरे म्हटले तर भिल्ल, कातकरी वगैरेप्रमाणें त्यानीं वन्यावस्थेत राहावयाचे होतें. किंबहुना पाशवी अवस्थेतून वरच यावयाचे नव्हते. कारण प्रगति म्हणजे नाश ! पण या मताचा विचार करण्याचेच कारण नाहीं. कां तर त्यातील किंचित् काल प्रगति वगैरे सर्व कसें निराधार आहे व भारतीयानीं हरएक शास्त्र-विद्या-कलामध्ये कशी प्रगति केली होती हे मागे 'भारतीयाची ऐश्वर्योपासना' या प्रकरणीं मीं दिग्दर्शित केलेंच आहे.

रोमन व ग्रीक समाज नष्ट झाले असे म्हणण्याचीहि एक रूढि पडून गेली आहे. पण ते समाज नष्ट झाले म्हणजे काय झाले ? त्याचे साम्राज्य

१. गो. म. जोशीकृत हिंदूंचें समाजरचनाशास्त्र पृ ४१. या ग्रथातील एकदर विचारसरणीच्या परीक्षणाकरितां 'वादळी वारे' लेखाक २ पाहा.

नष्ट झालें, राजकीय सत्ता परक्यांच्या ताब्यात जाऊन अवनति प्राप्त झाली, येवढेच ना ? पण त्याची संस्कृति काहीं नष्ट झाली नाहीं. तिची परंपरा युरोपियन संस्कृतीच्या रूपानें अद्याप अविच्छिन्न चालू आहे. ग्रीकानीं सवर्धन केलेली सौंदर्याची आणि स्वातत्र्याची आवड आणि रोमनानीं उत्पन्न केलेली कायदेकानूंतील शिस्त याची परंपरा अद्यापिहि चालू आहे. रोमविषयीं बोलावयाचें तर रोमन लोकाना परकीय असा शार्लमेन राजा रोमच्या गादीवर बसला हे खरें पण त्याने रोमन पोपकडून आपणास राज्याभिषेक करून घेण्यात धन्यता मानली. मग रोमन समाज नष्ट झाला हें म्हणण्यात स्वारस्य काय ? पुढे कित्येक शतके रोमचें राजकीय वर्चस्व खालावले तरी धार्मिक वर्चस्व गाजतच होतें. आणि ग्रीकाविषयीं बोलावयाचें तर विद्येचे पुनरुज्जीवन युरोपात झाले तेव्हा ऋषितुल्य मान कोणाला मिळूं लागला असेल तर तो ग्रीकानाच. आपल्या महर्षि शास्त्रकाराना भरतखंडात जो मान दिला जाई तोच अरिस्टॉटलला युरोपात मिळे. त्याच्या वचनाच्या विरुद्ध 'ब्र' काढणारास पाखंडी गणण्यात येई. मग ग्रीक व रोमन समाज नष्ट झाले या उक्तीचा अर्थ काय ? राजकीय श्रेष्ठत्वाची जोड मिळाली असती तर ग्रीक व रोमन विद्येला अधिक जोर चढला असता येवढेच. राजकीय स्वातत्र्य काहीं काल नष्ट झाले येवढया अर्थी ते समाज विनाश पावले असे म्हणावयाचें तर हिंदुस्थानची व चीनची तीच गत आहे. अर्थात् ग्रीक व रोमन समाज नष्ट झाले हा एक पोकळ वाक्प्रचार होऊन बसला आहे. क्रीट, सुमेर, मेक्सिको येथील समाज नष्ट झाले असें कदाचित् म्हणता येईल कारण त्या संस्कृतीचा साक्षात् वारस म्हणविणारा समाज आज उभा नाहीं. परंपरेनें वारस सर्व जगच आहे. पण येथील लेख सापडले तर तें अविच्छिन्न परंपरेच्या बळावर वाचील असा समज हयात नाहीं. ग्रीक व रोमन संस्कृतीचा प्रकार असा मुळींच नाहीं. वैदिक वाङ्मय जितक्या भक्तिभावानें आपल्या देशात जतन केलें जात आहे तितक्याच भक्तिभावाने ॲरिस्टॉटल, प्लेटो, होमर याचे ग्रंथ पाश्चात्य देशात अभ्यासिले जातात. अर्थात् ग्रीक संस्कृतीनें युरोपच्या एका कोपऱ्यातल्या लहानशा बेटातून बाहेर पडून सर्व युरोप व्यापलें येवढाच त्याचा अर्थ. शिवाय खुद्द त्या बेटातहि आपल्या जुन्या

संस्कृतीचा अभिमानी असा समाज उभा आहेच. परकीय बलिष्ठ राजकीय सत्तेपुढें त्याना काहीं काल नमावें लागलें तेंहि प्रगतमुळे नव्हे तर त्याच्यात उत्पन्न झालेल्या दोषामुळे. या दोषाचा आणि प्रगतीचा साहचर्यभाव मुळींच नाहीं. अर्थात् प्रगति म्हणजे नाश हा सिद्धान्तच तर्कदुष्ट आहे.

विपत्ति हीच खरी संपत्ति !

याच ग्रंथकाराने दुसरे एक प्रमेय मांडले तें फारच लोकविलक्षण आहे. तें म्हणजे विपन्नावस्थेतच मानवी सस्कृति शुद्धावस्थेत राहते हें होय. अर्थात् आजची विपन्नावस्था दूर करून जीवन अधिक सुखमय करण्याचा प्रयत्न करणें हे परिणामीं घातकी होय असे त्याचे प्रतिपादन आहे. तो म्हणतो : ' आम्हाला असें वाटतें कीं, सृष्टीचा नियम जो दुःखशोकात मानवाची शुद्धावस्था राहणे तो डोळ्यापुढून सरून मानव हा सुख हें आपलें ध्येय मानून चालूं लागला म्हणजे हळूहळू त्याची अधोगति होऊं लागते' (पृ. १४६). चिनी लोकानीं प्रगति केली नाहीं याबद्दल ग्रथकाराला समाधान वाटत असून तो लिहितो, " चिनी लोकाबद्दल स्टोडार्ड म्हणतो कीं, हजारो वर्षें अत्यंत दारिद्र्यात आयुष्य घालाविल्या-कारणानें कोणत्याहि भयंकर परिस्थितींत जगणे हें चिनी मानवाला जितकें शक्य आहे तितकें ते दुसऱ्या कोणालाहि नाहीं. नैसर्गिक निवडीचे नियम ज्या कोणाला कळत असतील तो असे म्हणेल. अशा परिस्थितींत आपले वंश टिकविण्याची आपल्यामध्यें जी हातोटी आहे ती नष्ट कशी होईल या विवंचनेनें तर आज आमचा (पाश्चात्याचा) जीवनक्रम सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत ! " (पृ. २६७).

स्टोडार्ड व त्याचे समानधर्मे याची ही विचारसरणी भ्रातमनस्काची आहे. युरोपात भौतिकशास्त्रीय विज्ञानाची कल्पनातीत वाढ झाली आहे पण त्या ज्ञानानें प्राप्त करून दिलेली सत्ता आणि मत्ता न्याय्यपणें वापर-ण्याऱ्या प्रामाणिक बुद्धीची वाढ मात्र त्या प्रमाणात झालेली नाहीं; त्यामुळें 'विचाराचे मोवरे' या प्रकरणात दिग्दर्शित केल्याप्रमाणें काहीं पाश्चात्य पंडित भ्रातचित्त झालेले आहेत. आणि यामुळें एकीकडे यंत्र-

शक्तीला शिव्याशाप देत, दुसरीकडे ज्या राष्ट्रात ही यंत्रशक्ति बद्धमूल झाली नाही किंवा खरें बोलावयाचे तर स्टोडर्डच्याच जातभाईनीं स्वार्थी हेतूनीं होऊं दिली नाही, त्या चीन व हिंदुस्थानातील यंत्रपूर्व संस्कृतीचें पोकळ स्तुतिस्तोत्र गात सुटले आहेत. पण ही स्तुति पोकळ आहे, भ्रात-चित्ताची तरी आहे, किंवा स्वार्थी मतलबी तरी आहे.

ढोंगी स्तुतिपाठक

काहीं वर्षांपूर्वी महात्मा गांधीनीं सामुदायिक सत्याग्रह करून प्रेमानें जग जिंकण्याचा ख्राइस्टप्रणीत प्रयोग हिंदु राजकारणात सुरू केला तेव्हा युरोप-अमेरिकेतील अनेक ख्रिस्ती पंडितानीं व धर्ममार्तंडानीं 'साधु! साधु!' म्हणून माना डोलावल्या का न डोलावतील? ख्राइस्टने उपदेशि-लेल्या ह्या मार्गाचा प्रयोग प्रत्यक्ष व्यवहारात करून पाहण्याची धमक यापैकीं एकाहि पंडितात किंवा धर्ममार्तंडात नव्हती. तेव्हा हा प्रयोग हिंदुस्थानातला एक महात्मा परस्पर करतो आहे, त्याच्याकरिता हालअपेष्टा सोसाव्या लागणार त्या हिंदी जनता सोसणार आहे, आणि जय मिळाल्यास येशूच्या यशाचे तोंड उज्ज्वल होणार आहे; असली सुवर्णसधि कोण दवडील! अर्थात् युरोप-अमेरिकेंतून महात्माजींवर अभिनदनाचा वर्षाव झाला तर नवल कसलें! पण हीं अभिनंदने पोकळ होतीं हें नुकत्याच संपलेल्या युद्धात स्पष्ट झाले आहे. या युद्धात महात्माजींनीं इग्लडला संदेश पाठविला तो हा कीं, अग्निवर्षाव करीत हिटलर तुमच्यावर चाल करून आला तरी त्याच्यापुढें हात जोडून प्रेमानेच त्याला जिंका. पण या संदेशाला पाठिंबा देण्यास वरीलपैकीं एक तरी पंडित वा धर्ममार्तंड पुढे सरसावला का! उलट हेच धर्माचार्य प्रेमधर्माऐवजीं शस्त्रधर्माचे समर्थन करूं लागले आणि ज्या रशियाला तो धर्मलंड, भ्रष्ट म्हणून वाळींत टाकण्याचा कंठशोष त्यानीं केला, त्याच रशियाचे गळ्यात गळा घालणें हे पुण्यकर्म होय असें हे धर्माचार्य उघडपणें व्यास-पीठावरून प्रतिपादन करूं लागले! हें त्याचे धोरण चूक होतें असें मला म्हणवत नाहीं. ते व्यवहार जाणतात येवढाच त्याचा अर्थ; आणि म्हणूनच अशा व्यवहारज्ञ, धूर्त किंवा दुसऱ्या भोळसट, भ्रातचित्त

यानीं केलेल्या आपल्या संस्कृतीच्या पोकळ स्तुतीपासून आपण चार पावलें दूर राहिलें पाहिजे.

या स्तुतिपाठकाच्या आहारीं जसें गेलें न पाहिजे तसेंच आपल्या संस्कृतीची निष्कारण खोटीनाटी निंदा करणाऱ्या दुराग्रही प्रतिनिविष्ट निंदकाच्याहिपासून चार पावले दूर राहिले पाहिजे. संस्कृत वाङ्मयाच्या दीर्घ अभ्यासानंतर दुराग्रही पंडिताची संख्या कमी होत चालली आहे. चाणक्याचा अर्थशास्त्र हा श्रेष्ठ ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून भारतीयाना वैभव-विन्मुख व आबटतोंड्ये म्हणून मोडून काढणे अशक्यच झाले आहे. मात्र दुर्दैवानें अज्ञान आणि दुराग्रह याची परंपरा संपूर्ण अद्याप नष्ट झालेली नाहीं. अजूनहि हिंदुस्थान हा विचित्र चालीरीतींचा रानटी देश आहे असें समजून समाजशास्त्रीय प्रबंध नटविण्याकरिता हिंदुस्थानातील काल्पनिक चालीरीतींचा अन्याय्य व उपमर्दकारक उल्लेख बेफिकीरपणें करण्यात येत असतो. पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वी ज्या वेळेला हिंदुस्थानविषयीं माहिती देणारें वाङ्मय फारसे उपलब्ध नव्हते त्या वेळीं असले उल्लेख कदाचित् खपले असते; पण अवघ्या दहा पधरा वर्षांपूर्वीचा असला उल्लेख दाखविला तर काय म्हणाल ? एक इटालियन पंडित हिंदु नीतिमत्तेविषयीं लिहितो: "हिंदुस्थानातील कांहीं प्रातात कर्जफेडीकरिता धनको हा ऋणकोची बायको गहाण म्हणून हक्कानें मागून घेतो. (मागून घेत असे असेंहि या पंडिताने म्हटले नसून घेतो म्हणजे 'आज घेतों' असा वर्तमानकाळी चक्क प्रयोग आहे !) आणि कर्ज फिटेपर्यंत तिचा उपभोग घेतो. कर्ज फिटल्यानंतरहि कांहीं काल ती धनकोजवळ राहिली तर कर्ज फिटल्यानंतर तिला जीं मुले होतील त्यापैकीं निमीं तो ऋणकोला देऊन टाकतो ! !"[1] या प्रकाडपंडिताला ही माहिती कोठून मिळाली हें सैतान जाणे ! अवघ्या दहा वर्षांपूर्वी लिहिलेला हा ग्रंथ ! यावरून हिंदुस्थानविषयी पंडितामध्यें(!)हि केवढें अज्ञान आहे याची कल्पना येईल. असल्या बाष्कळ पंडिताकडे दुर्लक्ष केलेलेंच बरें !

सुदैवानें विद्येची एकनिष्ठपणें सेवा करणारे पंडितहि आढळतात.

१. Hindu Social Institutions. p. 146. by. Dr. Walawalkar.

अशाच्याहि मुखातून अज्ञानानें वा मिथ्याग्रहानें मारतीय संस्कृती-विषयीं जे विपरीत अभिप्राय प्रकट झाले आहेत त्याचा उल्लेख मागील अनेक प्रकरणात मीं केला आहे व त्याचा योग्य तो परामर्श घेण्यासहि कमी केलें नाहीं. पण अशा पंडिताशीं मतभेद होण्याचा प्रसंग आला तरी त्याच्या विद्येच्या निरलस एकनिष्ठ उपासनेबद्दल माझ्या मनात आदरच आहे हें येथें स्पष्ट सागून टाकतों. एक साधें उदाहरण म्हणून द्यावयाचें तर कोठे इंग्लंड, फ्रान्स आणि नॉर्वे हे देश आणि कोठें आपला महाराष्ट्र! पण आपल्या महाराष्ट्रातील मराठी भाषेच्या व्याकरणाचा सूक्ष्म अभ्यास इंग्रज ग्रियरसन, फ्रेंच झुल् ब्लोक आणि नॉर्वेजियन स्टेन कोनों यानीं करावा, आपण केला नसेल इतक्या कसोशीनें करावा, या त्याच्या विद्येच्या लालसेचे कौतुक कोणाला वाटणार नाहीं! किंबहुना आपल्या प्राचीन संस्कृतीचें जें ज्ञान आपणास आज हस्तगत झाले आहे ते उकरून काढण्यात आजवर तरी पाश्चात्य पंडिताचाच घाम आमच्यापेक्षा अधिक गळाला आहे. पण कौतुक करीत असताहि त्याचे अपसिद्धान्त आपण पाखडून पारखूनच घेतले पाहिजेत. तसे ते पारखून घेण्याची चिकित्सक विवेचक बुद्धि जागृत झाली म्हणजे आपली पूर्वपरपरा काय आहे, आज आपण प्रगतीच्या मार्गावर नक्की कोठें आहों व आपल्यापुढें गेलेल्याच्या-पासून आपणास काय घ्यावयास हवें या सर्वांचा उमज पडेल.

दोषपरिमार्जन

या दृष्टीनें पाहू गेलें तर असे दिसून येईल कीं, आज आपण पाश्चात्त्याच्या पाठीमागें पडलों आहों ते मुख्यतः भौतिक शास्त्राच्या हेळसांडीमुळें व समाजघटनेंतील दुर्बलतेमुळे. ज्याचें शास्त्र त्याचें शस्त्र असा आजच्या युगाचा दंडक आहे; तेव्हा या शास्त्राकडे दुर्लक्ष करून कोणत्याहि राष्ट्राला जीवनकलहात टिकाव धरता येणार नाहीं. शिवाय या शास्त्राच्या उपासनेनें नुसतें शस्त्र-संभारांचेंच सामर्थ्य वाढतें असें नव्हे तर आत्मप्रत्ययाचेंहि बल वाढतें, बुद्धि अधिक धीट, निर्भीड व आत्मविश्वासपूर्ण होते, जीविताकडे ती निर्भयपणें पाहूं लागते व जीवितातील अडचणींचा परिहार करण्याची

चमक तिच्यात उत्पन्न होते. शास्त्रीय शोधानीं उपलब्ध करून दिलेल्या सामर्थ्याचा योग्य विनियोग माणसाला जर पुढेंमागें करता आला तर आजच्या जगाचें रूप नितान्त पालटून जाईल तें कसें त्याचा प्रपच करण्याचें हें स्थल नव्हे.[1] पण आज या सामर्थ्याचा पाश्चिमात्य राष्ट्रें दुरुपयेाग करीत आहेत या देखाव्यानें भाबावून न जाता, व यंत्रशक्ति व भौतिक विद्या याच्या नावानें करंटेपणाने बोटें मोडीत न बसता या नवोदित सामर्थ्याच्या जोरावरच मानवी संसाराला नवीन रमणीय घाट देता येईल ही खूणगाठ मनाशीं बाधून त्या भौतिक विज्ञानाची उपासना करण्याचा वसा आपण जितक्या लवकर घेऊं तितका उत्तम.

भौतिकशास्त्राच्या उपासनेबरोबरच या उपासनेमुळें लाभणारे जें सामर्थ्य तें मूठभर लटपट्ये लोकानीं बळकावून बसूं नये यास्तव सामर्थ्याचे केंद्र जें राजकीय सत्ता व औद्योगिक मत्ता हीं सर्व जनतेत विभागलीं जातील अशा साम्यनिष्ठ समाजरचनेचा पुरस्कार केला पाहिजे. आणि ऐहिक संसार हा औट घटकेचा असला तरी परलोकाकडे डोळे लावून बसून या लोकींचा ससार कसा तरी संपवून टाकण्याची विरक्त वृत्ति टाकून देऊन "अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिही लोक" ही आशावादी उत्साही वृत्ति स्वीकारली पाहिजे.

परंपराभंगाची भीति

तुमच्यापैकीं काहींना येथें अशी शंका येईल कीं, हे प्रकार आपल्या पूर्वपरंपरेशीं विसंगत तर नाहींत ना ! आपल्या समाजाची वृत्ति ही मूळपासूनच निवृत्तिपर आहे; आणि भौतिक शास्त्राच्या उपासनेनें सुखाचीं साधनें वाढविण्याऐवजीं मनोजय संपादून वासनाक्षय करणे हा अधिक श्रेष्ठ मार्ग होय असें आपण आजवर मानीत आलों आहों. शिवाय जन्मजात जातिभेदाची कल्पना आमच्या हाडींमासीं खिळली असल्यानें, राजकारणात काय किंवा समाजव्यवस्थेंत काय लोकशाहीचें किंवा समतेचें तत्त्व आपणास मानवलेलें नाहीं. असा सर्व प्रकार असताना पाश्चात्य संस्कृतीच्या दिखाऊ वैभवानें दिपून जाऊन आपल्या पूर्वपरंपरेशीं विसंगत

१. त्याच्या दिग्दर्शनाकरितां 'बादळी वारे' लेखांक पहिला पाहा.

असे नवे प्रकार सुरू करणें हे अंतीं आत्मघातकीपणाचे तर होणार नाहीं ना? अशा प्रकारची शंका काहीं काहीं मनोवृत्तींना प्रामाणिकपणे डाचत असते. पण ती निराधार असते हें दाखविण्याकरिताच आपल्या प्राचीन इतिहासातील आपली ऐश्वर्योपासना, आपला विश्वसंचार, आपली लोकशाही याचे दिग्दर्शन मागील काहीं प्रकरणातून केले आहे. आपली ही प्राचीन परंपरा सातव्या आठव्या शतकात हीनप्रभ होऊं लागली. त्यापूर्वीची वैदिक परंपरा जिला म्हणता येईल ती तशी नव्हती. उत्तरकालीं मात्र असा विपरीत प्रकार झाला कीं, वैदिकानीं वेदबाह्यांना जिंकले तरी अंतीं जित आर्येतराचा नैराश्यवाद व निवृत्तिपरता ह्यानीं वैदिक जयिष्णु, आनंदी उत्साही वृत्तीला ग्रासून टाकले. या ग्रस्त स्थितींत आज सुमारें हजार-बाराशेंवर वर्षें आपण गुरफटलो आहोंत. मध्यंतरी पाश्चात्य राष्ट्रानीं विद्येच्या प्रातांत कल्पनातीत दौड मारली आहे. इतकी कीं, मागें 'भारतीयाची ऐश्वर्योपासना' या प्रकरणात भारतीयाच्या अनेक शास्त्रातील बुद्धिवैभवाचे व प्रगतीचे जें वर्णन केले आहे तें तत्कालीन जगात अभिमानास्पद वाटण्यासारखें असले व बुद्धिवैभवाचें देणे फक्त ईश्वराच्या लाडक्या युरोपलाच मिळालेले आहे असे मानणाऱ्या उर्मट पाश्चात्याच्या नाकावर टिचण्यास उपयोगी पडण्यासारखें असलें तरी त्या काळच्यापेक्षा आजची पाश्चात्याची विद्या कल्पनेबाहेर वृद्धिंगत झाली आहे हें ध्यानीं घेतले पाहिजे. तें नीट ध्यानीं घेतलें म्हणजे पूर्वपरंपरेचा योग्य अभिमान तर जागृत राहीलच पण त्या अभिमानात गुरफटून जाऊन आपण आलस्यात घोरत पडणार नाहीं.

यंत्रशक्तीचें अटळ आगमन

आलस्य झाडून टाकण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. अथवा आमच्या आलस्यनिद्रेतून आम्हीं खडबडून जागें व्हावें येवढी जोराचीच थप्पड इंग्लंडनें आमचें स्वातंत्र्यसर्वस्व हरण करून दिलेली आहे! कोणत्याहि पद्धतीनें का होईना पण जागृति आणणारी अशी ही क्रिया असल्यानेंच रानडे, लोकहितवादी वगैरेनीं दैवी योजना म्हणून तिचें स्वागत केलें.

पण ही जागृति उत्पन्न होण्यास इंग्रजाच्या राजकीय आक्रमणाचीच आवश्यकता होती काय ! समजा, इंग्रजाचे पाय आपल्या या मायभूमीकडे वळलेच नसते तर आज आपण कोणत्या स्थितींत असतों ! भौतिक शास्त्रांतील शोधानीं निर्माण केलेल्या सुखसोयींपासून आपण अलिप्त राहूं शकलों असतों काय ! युरोपमध्ये मोटारी आणि विमानें घरघर फिरूं लागलीं असता आम्ही आमचीं भिमथडी तट्टेंच दामटीत बसलों असतों ! तेथें बिजली चमचमूं लागली असताहि आम्ही आमचे जुनेपुराणे हिलालच नाचवीत बसलो असतो ! तेथे वाफेचे माग धडाडूं लागले तरी आम्ही नखाच्या भोकातूनच सूत कातीत बसलों असतों ! तेथें यंत्रावर एका दिवसात सतराशेसाठ ग्रंथ छापले जात असता आम्ही एका पोथीची नक्कल करण्यात सतराशेसाठ दिवस मान मोडून घेत बसलों असतों ! अथवा तेथें मिनिटास असंख्य गोळ्या फेकणाऱ्या बदुका निर्माण होत असता आम्ही आमच्या मावळ्याचे विळे-कोयते घासीत बसलो असतों काय ! केव्हाहि नाहीं. राजकीय आक्रमण होवो वा न होवो, पाश्चात्यानीं शास्त्रसामर्थ्यानें सिद्ध केलेल्या सर्व उपयुक्त व संहारक चिजा आम्हाला त्याच्यापासून घेणे प्राप्त होतें. स्वतः तयार करिता येत नसल्याने मागतील ती जबर किंमत देऊन विकत घेणें प्राप्त होतें, नव्हे आम्ही घेऊं लागलोंच होतो. बंदुकीचें महत्त्व शिवाजीच्या वेळेपासून कळून चुकलें होतें. पण ती बनविण्याची विद्या देशात नसल्यानें फिरंग्यापासून त्या आर्जवून विकत घ्याव्या लागत. आणि तेहि मग गिऱ्हाइकाचें अगतिकत्व ओळखून जुन्या बंदुकाहि नव्याच्या वरमावानें विकीत. घड्याळें आणि दुर्बिणी याहि चिजा अमोलिक आहेत हें पटलें होतें व आम्न्यानीं एखादें फिरंगी जहाज लुटून असल्या चिजा हस्तगत केल्या म्हणजे त्या आग्रयापासून आपणास मिळाव्या म्हणून मातबर सरदार आम्न्याची अजीजी करीत होते. आम्हीं फिरंग्याचें औषध घेऊं लागलों होतों. त्यानीं दिलेला चहा मोठा फर्मास म्हणून रुप्याच्या चहादाणींतून पिऊं लागलों होतों. साराश, राजकीय आक्रमण झालें नसतें अशी कल्पना केली तरी व्यापारी आक्रमण अपरिहार्यच होतें. अर्थात् पाश्चात्यांकडून यंत्रें इकडे आल्याशिवाय राहिलीं

नसती आणि यंत्रांबरोबर यंत्राशीं संलग्न असणारी सर्व परिस्थिति येथे निर्माण झाल्याविना राहिली नसती.

पण कोणी म्हणेल परकीय मालावर कडक बहिष्कार घातला असता तर! तरीहि परिस्थिति बदलली नसती. बहिष्काराची प्रतिक्रिया म्हणून राजकीय आक्रमण ठेवलेलेंच होतें! कारण हे पाश्चात्य व्यापारी नुसते व्यापारी नसून त्यांच्या पाठीशीं शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशी बलवत्तर लष्करी सत्ता होती. त्या सत्तेच्या जोरावर त्यानीं आपला माल आमच्या मार्थी मारलाच असता. या शस्त्रास्त्रापुढें आमचा टिकाव लागणें दुर्घटच नव्हे तर अशक्यच होते. याला दुसरा एकच पर्याय होता. तो म्हणजे व्यापारी आक्रमण सुरू झाल्यावर पाश्चात्याची विद्या पुढारलेली आहे हें ध्यानीं येताच तत्काळ तीं विद्या हस्तगत करण्याच्या उद्योगास लागणें हा होय. हें आपल्या देशात घडलें नाहीं. यार्चीं कारणें आपण पाहिलीं. जपाननें हेंच केलें म्हणून तो आक्रमणाला बळी पडला नाहीं.

जपानच्या उदाहरणावरून आणखीही दोन महत्त्वाच्या गोष्टी नीट पटतील. त्या ह्या कीं, पाश्चात्याची विद्या किंवा त्याच्या संस्था पौर्वात्य देशात रुजणार नाहींत, व रुजावयाच्या तर त्याला दीर्घकाल लागेल, ह्या कल्पनाहि सर्वस्वीं भ्रामक होत. पाश्चात्याची विद्या पौर्वात्यात उत्तम रुजूं शकते हें जपाननें सिद्धच केलें आहे. पाश्चात्य राष्ट्रात भौतिक शास्त्राची उपासना आणि लोकशाहीचे प्रयोग आज दोन तीन शतकें चालू आहेत. तेव्हा त्याच्या खाद्याशीं खादा भिडवून उभें राहण्यास आपणासहि असा दीर्घ काल लागावा हा केवळ भ्रम होय. तसेंच नवीन शोध लावण्याला जी दीर्घ तपश्चर्या लागते तशी ती उपलब्ध झालेले शोध आत्मसात् करण्याला लागत नाहीं. अवघ्या पन्नास पाऊणशें वर्षांत पाश्चात्याच्या तोडीचा माल पाश्चात्याच्या पेठेंत माडून जपाननें हें प्रत्यक्ष सिद्धच करून दाखविलें आहे. तीच गोष्ट लोकशाही संस्थाची. चाळीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या राजकारणात लोकशाहीची अगदीं अत्यल्प क्षुद्र अशी सुरवात झाली. तेव्हा काहींना वाटलें कीं, येवढीच मात्रा पचण्यास आपणास चारपाच पिढ्या लागतील. पण हा त्याचा भ्रम होता हें आता सागावयास नकोच.

धर्मभावनेस धक्का

आणखी एक शंका पुढें येऊन म्हणेल कीं, या नव्या विद्येनें आमची धर्ममावना तर उत्सन्न होणार नाहीं ना ? तसे असेल तर तिला दुरूनच नमस्कार केलेला बरा नाहीं का ? या बाबतींत पहिली गोष्ट अशी कीं, तिला दूर ठेवणें तुमच्या हातींच आता राहिलेली नाहीं. कायमचे दास्यात राहूं पण परकीयाच्या विद्या स्वीकारणार नाहीं असेंच म्हणावयाचें असेल तर गोष्ट निराळी. एरवीं पाश्चात्याची विद्या हस्तगत केल्याविना जीवन-कलहात टिकाव लागणार नाहीं हें निश्चित. शका पुन्हा म्हणेल, आमचें राज्य गेलें तरी चालेल, आमचें स्वातंत्र्य गेलें तरी चालेल, पण आम्ही आमचा धर्म व आमची संस्कृति हीं टिकवून धरूं. तर हाहि सर्वस्वीं भ्रम होय. आक्रमणशील सस्कृतीपुढे दुबळी फुरंगटलेल्या वृत्तीची सस्कृति टिकाव धरूं शकत नाहीं. राजकीय स्वातंत्र्य हें सस्कृतीचें संरक्षक कवच होय असें मी मागें म्हटलें आहे तें याच हेतूनें नुसती भाषेची गोष्ट घेत-लीत तर मुसलमानी आक्रमणामुळें मराठी भाषेवर केवढा परिणाम झाला तें ध्यानीं घ्या. घरींदारीं इतके इस्लामी शब्द घुसले आहेत कीं 'जमीन', 'हवा' असल्या शब्दाची दाढी धरून मुद्दाम ते दाखवावेत तेव्हा परकी म्हणून ओळखले तर ओळखतात. आज घुसले यापेक्षां किती तरी अधिक घुसले असते पण त्याना पायबंद बसला तो संतवाङ्मयानें आणि शिवाजी-च्या राजकीय वर्चस्वानें व त्याच्या राजव्यवहारकोशानें. शिवाजीचें हें धोरण वाढत्या राज्यविस्ताराबरोबर टिकलें नाहीं तरी वाङ्मयसेवकाची दृष्टि निवळली व संस्कृत शब्द योजण्याचा प्रघात वाढूं लागला. म्हणूनच भाषा अविंधमय होण्याची टळली. जी गोष्ट भाषेची तीच धर्माची. राजसत्ता पाठीशीं उभी असल्याशिवाय धर्मालाहि अवसान चढत नाहीं. विश्वामित्राचे यज्ञ निर्विघ्न पार पडेनात तेव्हा विश्वामित्राला धनुर्धारी रामचद्राचें साहाय्य घ्यावें लागलें हा प्राचीन दाखला विसरून कसें चालेल ? अर्वाचीन काळींही जेथें इस्लामी आक्रमण दीर्घकाल नादलें तेथील म्हणजे पंजाब प्रातातील हिंदूंना जुन्या धर्माला मुरड घालून शीखपंथासारखा पंथ काढणें अपरिहार्य वाटलें. तेव्हा धर्मरक्षणाकरिताहि राजकीय स्वातंत्र्य हें अवश्य होय

हें विसरता कामा नये. 'बुडाला औरंग्या पापी' व 'उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया' असे उद्‌गार समर्थांच्या मुखातून निघाले त्यातहि राजकीय सामर्थ्यांच्या माहात्म्याचाच प्रतिध्वनि उमटलेला आहे. तात्पर्य, राजकीय स्वातंत्र्य हीच काहीं संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची निशाणी नव्हे, भौतिक शास्त्राच्या बाबतींत आम्ही प्रगति केली नाहीं तेच उत्तम केले असल्या अपरिपक्व कल्पना उगाळण्याचें सोडून दिलें पाहिजे व चालू युगातील भौतिक शास्त्राची प्रभावी विद्या व त्या विद्येनें साध्य होणारीं सुखसाधने सर्वांच्या पदरात पडतील अशी समाजव्यवस्था याचे स्वागत केले पाहिजे.

भौतिक शास्त्रे हीं धार्मिक प्रवृत्तीला विघातक आहेत हेहि धर्म याचा अर्थ समाजधारणापोषक नैतिक आचारविचार येवढाच घेतला तर खरें नाहीं हा मुद्दा इंग्रजी अमल सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या पिढींतील जाणत्यानींहि ओळखला होता. त्याचा दाखला म्हणून मराठी भाषेचे अर्वाचीन पद्धतीतील आद्य व्याकरणकार दादोबा तर्खडकर याचा देता येईल. त्यांनीं आपलें आत्मचरित्र अर्धेमुर्धे लिहून ठेवलेलें प्रसिद्ध झालें आहे. त्यात त्यानीं स्वतः इंग्रजी शिकून नावलौकिक मिळविला याबद्दल त्याच्यावर लोभ करणारे त्याचे गुरुजी बापूशास्त्री शुक्ल यानीं काय उद्‌गार काढले व त्याला त्यानीं काय उत्तर दिलें हें वर्णिलें आहे. दादोबा लिहितात : "एकदा सुमारें पंचवीस वर्षांवर या शास्त्रीबोवाची माझी सुरतेंत गाठ पडली. तेव्हा ते मला म्हणाले, 'दाद्या, तुझें केलेलें व्याकरण मीं पाहिले आणि मला फार संतोष झाला. तसे तुझे दुसरे गुण व विद्वत्तेचा स्तव ऐकून मला फार संतोष होतो. पांतु गड्या, तूं नास्तिक झालास रे! तुझी आपल्या धर्मावर निष्ठा नाहीं हें ऐकून मी दिलगीर आहें.' म्या नम्रतेनें म्हटलें, 'धर्माविषयीं जो आपण मला ठपका दिलात तो जर धर्माचा यथायोग्य अर्थ समजून दिला असलात तर तो मला लागत नाहीं.' मग त्याजवर शास्त्रीबोवा काहींच फारसे बोलले नाहींत आणि आपल्या गुरूबरोबर वाद करावा हेंहि मला अगदीं आवडलें नाहीं." दादोबांचें हेंच समंजस धोरण डोळ्यापुढें ठेवून पूर्वसंस्कारामुळें नव्या जमान्याकडे ज्याना निर्विकार-

बुद्धीनें पाहता येत नाहीं त्याच्याशीं वाद घालीत न बसता नव्या विद्येचें व नव्या समाजव्यवस्थेचें स्वागत करणे हें आपले कर्तव्य होय.

मौक्तिक शास्त्राच्या अध्ययनाने चिकित्सकवृत्ति बळावेल याचीही काहींना धास्ती वाटते. त्याच्या मतें चिकित्सक वृत्तीसारखें अनर्थकारक दुसरे काहीं नाहीं. नवयुगधर्मकार लिहितात, "इंग्रजाच्या संसर्गानें कित्येक घाणेरडे रोग इकडे आले आहेत, त्याचप्रमाणें **संशोधन आणि चिकित्सा हे पंडुरोगासारखे दोन रोगच आमच्या सुशिक्षितांच्या मागें लागले आहेत.**" पाश्चात्य संस्कृतीकडे घाणेरड्या रोगाकडे पाहावे तशा उद्वेगकारक दृष्टीनें पाहणाऱ्या असल्या चिडखोर वृत्तीची कोण कशी समजूत काढूं शकेल ? येवढेंच लिहितों कीं चिकित्सक वृत्ति हा रोग असेल तर या रोगानें इंग्रजी झाल्यापासूनचे टिळक, भाडारकर, राजवाडे प्रभृति आपले सर्वच पुढारी आणि पंडित या रोगाने नासले आहेत असे आपणास म्हणावें लागेल. हे म्हणण्यास तुम्ही धजाल असें वाटत नसल्यानें अधिक लिहीत नाहीं.[1] चिकित्सक दृष्टीवर मुद्दाम झापड ओढून शास्त्रीय ज्ञानाने सिद्ध झालेल्या गोष्टीही आपण नाकारण्यास तयार आहात काय ? निस्सीम पुराणमतवादी त्या नाकारण्यास कसा तयार असतो हें पाहावयाचें असल्यास रघुनाथ भास्कर गोडबोले याचा 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' पाहा. कोशकार प्रस्तावनेंत लिहितात कीं, 'या ग्रंथात व युरोपियन लोकाच्या ग्रंथात फेर इतकाच आहे कीं ते लोक अनुमानानें पृथ्वी सूर्यापेक्षा लहान आहे व सूर्यामोंवतीं फिरते असें मानतात तर आम्ही शास्त्राधारानें पृथ्वी अतिशय मोठी व स्थिर समजतों.' पुढें सूर्यासंबंधीं लिहिताना ते सागतात कीं, 'पृथ्वी फिरणारी व सूर्य स्थिर असें कधींही म्हणूं नये. कारण ऋषींव्यतिरिक्त इतरास चिंतन करण्यास अशक्य ज्या गोष्टी त्या त्यानीं तर्केंकरून कधींही साधावयास जाऊं नयेत." या कोशाचे परीक्षण करताना विष्णुशास्त्री चिपळूणकर लिहितात कीं 'कोणत्याही तऱ्हेचीं भ्रामक मतें दुराग्रहास वर्धक होतात. त्याचे निरसन करणें हें देशहितेच्छूचें कर्तव्य होय हें

१. अधिक चिकित्सेकरितां 'वादळी वारे' लेख ६ पाहा.

जाणूनच कोशकाराच्या आग्रहमूलक अभिप्रायाचें आम्हीं खंडन केलें आहे.[1] तात्पर्य, चिपळूणकर सागतात कीं कोणतीही नवी गोष्ट स्वीकारावयाची झाली कीं जुनी परंपरा ढासळेल म्हणून बुजणारी वृत्ति सोडून दिली पाहिजे. खुद्द आपल्या पूर्वजानीं ही वृत्ति स्वीकारली असती तर अनेक शास्त्रकलात त्यानीं जें प्रावीण्य संपादन केलें तें त्याना केव्हांच साध्य झालें नसतें. नव्याच्याच नव्हे तर परक्याच्याही गुणाचें स्वागत करण्यास कचरण्याचे कारण नाहीं. फक्त आपल्या गुणाचाही योग्य अभिमान डोळ्याआड येऊं दिला नाहीं म्हणजे झालें. टिळकाची अशीच वृत्ति होती. प्राचीन गर्गाचार्य हा विद्वान् म्लेच्छाना ऋषितुल्य मानी तीच परंपरा चालवून टिळक, हरबर्ट स्पेन्सरविषयीं लिहितात कीं, 'स्पेन्सरसारखे ज्ञानी पुरुष फारच विरळा. शेंकडों वर्षांत एखाददुसरा उत्पन्न होत असतो. खिस्ती मिशनऱ्याच्या कोत्या समजुतींप्रमाणें जरी हे नास्तिक ठरले तरी भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणें ज्ञानी हेच अखेर ईश्वरास प्रिय होतात.[2] इतक्या निःसंदिग्ध शब्दांनीं स्पेन्सरचें गुणग्रहण टिळक प्राजळपणे करतात. पण गुणग्रहणप्रसंगींही स्वाभिमानाचा विसर त्याना पडलेला नाहीं. स्पेन्सरच्या अज्ञेयमीमासा ग्रंथाच्या परीक्षणात्मक लेखात टिळक लिहितात, "स्पेन्सरसाहेबानीं या अज्ञेयवादास जें स्वरूप आणले आहे त्यापेक्षाही परिणत स्वरूप आमच्या ग्रंथातून या तत्त्वास प्राप्त झालें आहे. अशी स्थिति असता स्पेन्सरच्या आधारावर आम्हास उपदेश करूं पाहणें म्हणजे घरचें सोनें विसरून लोकाच्या रुप्याकरिता धाव घेण्यासारखें आहे. यावरून स्पेन्सरची योग्यता आम्ही कमी मानतों असें कोणींही समजूं नये. हे आधुनिक काळचे ऋषिवर्य आम्हासही पूज्य व वंद्य आहेत. पण त्यामुळें आम्ही आमच्या ऋषिवर्यास विसरून स्पेन्सरचेच पोवाडे गात बसावें हें आम्हास बरें वाटत नाहीं."[3] टिळकांच्या या उद्गारांत नव्या-जुन्याची

१. निबंधमाला अंक ८२.

२. केसरीतील लेख भाग ४ था. पृ. ३६७.

३. केसरीतील लेख भाग ४ था. पृ. २३९–४०.

सागड घालण्यार्चे सूत्र उत्तम रीतीनें माडलें गेलें आहे. आणि आधुनिक शास्त्रीय संस्कृतीची गाठ पडल्यापासून गेल्या शेसवाशें वर्षांत होऊन गेलेले आपले सर्व थोर पुढारी ह्याच धोरणाचा पुरस्कार करीत आलेले आहेत. नवे ज्ञान घेत असताना त्या त्या क्षेत्रात पूर्वी आपण केलेल्या प्रगतीचा अभिमान जागता ठेवण्याची विस्मृति होऊं देता उपयोगी नाहीं हें मुख्य धोरण. ज्ञानाचीं नवीं नवीं क्षेत्रें हस्तगत करण्यातही कचरून उपयोगी नाहीं कारण शिक्षणातील अभ्यासक्रमात पूर्वीसारखें व्याकरण, काव्य, वेदान्त व हिशेब येवढ्याचाच समावेश करून आता मागेल काय? मुळींच नाहीं. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, कायदा, रसायनादि शास्त्रें या सर्वांचा समावेश अभ्यासक्रमात अवश्य आहे. तो केल्यानें आपली परंपरा सोडल्यासारखें होत नाहीं. फक्त हे सर्व विषय शिकवीत असतां त्या त्या विषयात आपल्या पूर्वजानीं केलेल्या प्रगतीचा अभिमानपूर्वक उल्लेख अवश्य केला पाहिजे. आज तो होत नसला तर आपल्या काहींसा असहायतेचा व काहींसा अज्ञानाचा तो परिणाम होय. तें अज्ञान नाहींसे व्हावें म्हणूनच आपल्या संस्कृतीतील उपेक्षित भागाकडे पूर्वीच्या प्रकरणातून लक्ष वेधलें आहे.

संगमाचा प्रारंभ

शास्त्रीय संस्कृतीतून आपण छापखाने घेतले, वर्तमानपत्रें घेतलीं, वाङ्मयामध्यें धर्म व अध्यात्म यावर भर होता तो सोडून हरएक लौकिक-विषयाचें आविष्करण-विवेचन-प्रतिपादन सुरू केलें. यातही काहीं आपण चूक केली असें मानण्याचे कारण नाहीं. निष्कारण अनुकरण म्हणून परक्याची नक्कल करणें तेवढें सोडलें पाहिजे. भौतिक शास्त्राच्या वाढीबरोबर बळावत जाणारा वाङ्मयातील वास्तववाद स्वीकरण्यात हानि नाहीं, पण जे सामाजिक प्रश्न आपणांत अद्याप उत्पन्न झाले नाहींत त्या प्रश्नाची पाश्चात्य वाङ्मयातून आपल्या वाङ्मयांत उसनी नक्कल करणें हें मात्र विकृत ठरेल. वाङ्मयाप्रमाणें कलेच्या प्रातात- गायन, चित्र, मूर्ति, वास्तु या कलात- पाश्चात्याच्यापासून कांहीं थोडे प्रकार उचलण्यास हरकत नाहीं. मात्र या सर्व प्रातांत आपलें पूर्वीचें जुनें श्रेष्ठ ठेवणें अवश्य जतन केलें

पाहिजे. गायनकलेमध्यें आयलें बैठकीचें रागदारी गाणें कायम ठेवून सामुदायिक साधिक गायनात पाश्चात्याचा स्वैरमेलाची पद्धति स्वीकारण्यासारखी आहे. चित्रकलेंत पाश्चात्याची छायाप्रकाश पद्धति व दृक्प्रमाण पद्धतीचा स्वीकार केला तरी आपली उठावदार रेखापद्धति, अनेक व्यक्तींच्या मेळ्यात प्रमुख व्यक्ति ही दीर्घप्रमाण व इतर अल्पप्रमाण रेखाटणे, व चित्राचे मागे कल्पून जवळचे लाबचे देखावे दाखविणें ह्या गोष्टींचा त्याग करण्याचें कारण नाहीं. मूर्ति व कोरीव कलाकुसर यात गज, सिंह, कमल वगैरे प्रतीकाची पूर्वपरंपरा राखली पाहिजे. तसेंच मूर्ति व चित्र यामध्ये शरीरसौष्ठवापेक्षा चेहऱ्यावरील भावनिदर्शन याला आपल्या कलावंतांनी दिलेलें महत्व रास्त असेंच होतें. फक्त शरीरसौष्ठवात आपल्या कलेंत जो एक साकेतिकपणा– कानापर्यंत लाब रेखाटलेले डोळे वगैरे– रूढ झाला होता त्याऐवजीं वास्तविकतेचा स्वीकार केला म्हणजे झालें. वरील-सारख्या गोष्टी स्वीकारल्यानें आपली परंपरा नष्ट न होता ती अधिक पुष्ट मात्र होईल.

आहार, विहार, पोषाख, सणवार, संस्कार या बाबतींत चालू परंपरेंत फारसा बदल करण्याचें कारणच नाहीं; किंबहुना, असल्या बाबींतच संस्कृति गुरफटली गेली आहे अशी सामान्य जनाची समजूत असल्यानें त्या बाबतींत पूर्वपरंपरेला न छिवचणेंच शहाणपणाचें होईल. मासांहाराइतकेंच बलसंवर्धन शाकाहारानें होत असेल तर पूर्वपरंपरेस अनुसरून शाकाहाराचा पुरस्कार करणेंच योग्य ठरेल. दसरा-दिवाळीसारखे सणाचे दिवस, उपवासाचे दिवस, पौर्णिमा-अमावस्या याच्यासारखे अनध्यायाचे दिवस, हे बदलण्याचा प्रसंगच प्राप्त होत नाहीं. आज पौर्णिमेऐवजीं रविवारीं शाळा-कचेऱ्यांना सुट्टी दिली जात असेल तर तो परकीय आक्रमणाचा परिणाम होय. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर या गोष्टी अशाच चालू ठेवण्याचें अगत्य नाहीं. पोषाखाच्या बाबतींत यंत्राशीं काम असतां पोशाख सुटसुटीत पाहिजे येवढी गोष्ट संभाळली असता आपल्या हवामानाला अनुकूल असा रूढ पेहराव सोडण्याचें कारण नाहीं.

वरीलपेक्षांहि ज्या क्षेत्रात अधिक खळखळ वाटेल ते क्षेत्र म्हणजे समाजरचनाक्षेत्र होय. पण विचारान्तीं ती खळखळ निरर्थक वाटल्यावाचून

राहणार नाहीं. आपल्या समाजरचनेचे वर्णाश्रमधर्मप्रधान असें वर्णन रूढ आहे. पैकीं आश्रम संस्था जी बहुतांशीं नष्ट झाली आहे तिचा तर पुनरुद्धारच केला पाहिजे. आणि वर्णसंस्था ही गुर्णकर्मविभागाने कोणत्याही कालीं अवश्य अशीच आहे. म्हणजे समृद्ध अशा कोणत्याही राष्ट्रामध्ये ज्ञानोपासक, धाडसी, व्यवहारचतुर व कष्टाळू असे चारी वर्ग कार्यक्षम असणें अत्यावश्यक आहे. पण जन्मजात जातिभेदांशीं वर्णविभागाची घातलेली सांगड फोडली पाहिजे. पण ती फोडण्यातही पूर्वपरंपरा झुगारली देण्याचा प्रश्न नसून त्या परंपरेचा विकास करण्याचा प्रयत्न आहे. समतेचा पुरस्कार हा आपण नव्यानेंच आज करीत नाहीं आहोत. भागवतधर्मानें तो यापूर्वीच केलेला आहे. स्त्रिया, वैश्य, शूद्र ह्या सर्वांनाच परागति मिळेल असा घोष करून भागवतधर्मानें समतेचा पुरस्कार आणि चोखामेळ्याला संतश्रेष्ठ मानून वारकरीपंथानें अस्पृश्यतानाशाचा पुरस्कार आध्यात्मिक क्षेत्रात आधींच केला आहे. आध्यात्मिक क्षेत्रात या समतेचा पुरस्कार करण्यासही पुरस्कर्त्यांना त्या त्या काळच्या सनातनी वृत्तींशीं झगडावेंच लागले व तो झगडा त्यानीं यशस्वीपणें जिंकला. अध्यात्माच्या क्षेत्राप्रमाणें व्यावहारिक क्षेत्रात समतेचा पुरस्कार करण्यापर्यंत ते मजल नेऊं शकले नाहींत. पण यंत्रशक्तिमूलक कष्टनिवारण आणि समृद्धि यामुळें आजचा काल अधिक अनुकूल असल्याने समतेचा व्यावहारिक क्षेत्रताही पुरस्कार करण्यात वारकरीपंथाची पताकाच आपण पुढें नेत आहोंत असेंच होत नाहीं का! आणि ती पुढें नेणे आवश्यक आहे. कारण सर्वांना समान सधि या रूपानें समतेचा स्वीकार हा यंत्रयुगाच्या दुष्परिणामावरील उतारा होय. यांत्रिक औद्योगीकरण स्वीकारले म्हणजे आपल्या संस्कृतीतील समाधान, शांति नष्ट होतील अशा शंकेची धास्ती घेण्याचेंही यामुळें कारण उरणार नाहीं. विद्युत्शक्तीचा विपुल प्रसार झाल्यास घरगुती धंदे शक्य होऊन शहरातील रोगट व स्वैर जीवनही अनावश्यक ठरेल, व असें झालें असता यांत्रिक औद्योगीकरणामुळें आपली परंपरागत समाजरचना उत्सन्न होईल ही भीति निराधार ठरेल.

तात्पर्य, अशा रीतीनें पूर्वग्रह सोडून विचार केला असता युगधर्म ओळखून नवीन शास्त्रीय संस्कृतींतून अवश्य त्या गोष्टींचें जलग्रहण

केल्यानें आपली संस्कृतिगंगा गढूळ तर होणार नाहींच पण तिचा स्थिर झालेला प्रवाह पुनःश्च जोरानें वाहूं लागून सहिष्णुता, संग्राहकता, अनाक्रमिकता, अहिंसा, विद्योपासना वगैरेंचें अमृतजल सर्व जगास पाजून विश्व स्नात करण्याचें श्रेय तिला मिळवितां येईल.

हें लिहीत असताना नव्या विद्येचा दुरुपयोग केला असता काय अनर्थ ओढवूं शकतो याची जाणीव क्षणार्धांत लाखाचा संहार करू शकणाऱ्या परमाणुस्फोटकानें ताजी केली जात आहे. पण नव्या ज्ञानाचा सदुपयोग करण्याचा घडा जगताला आपण घालून देऊं अशी उमेद आपण का धरूं नये ? त्यात आपणास यश आलें तर आपलें व सगळ्या जगाचें कल्याण होणार आहे !

समाप्त

परिशिष्ट

संस्कृति-संगमाच्या परीक्षणांतील कांहीं मुद्यांची चर्चा

पुस्तकाचे एकंदर जें स्वागत झालें त्याबद्दल परीक्षणकाराचा व वाचक-वर्गाचा मी ऋणी आहें. अनुकूल परीक्षणें स्वमतपोषक असल्यानें त्यासंबंधीं लिहिणें नको. तेव्हा प्रतिकूल परीक्षणासंबंधीं दोन शब्द लिहितों.

प्रातिकूल परीक्षणामध्यें सर्वांत विस्तृत परीक्षण आलें तें 'समाज-जीवन' या मासिकात आलेलें. या मासिकाच्या दुसऱ्या वर्षाच्या बाराव्या अंकापासून तिसऱ्या वर्षाच्या पाचव्या अंकापर्यंत हें परीक्षण क्रमशः आलेलें आहे.

या परीक्षणामध्यें लेखक श्री. गो. म. जोशी यानीं संस्कृति-संगम पुस्तकातील कांहीं तपशिलाच्या चुका नजरेस आणल्या आहेत त्याबद्दल प्रथम त्याचे आभार मानतो. मुख्य विचारसरणी मात्र पसंत नसली तरी ती त्याना खोडून काढता आलेली नाहीं.

एकंदर पाच अंकापैकीं पहिले दोन अंक किरकोळ तपशिलाच्या चार पाच चुका दाखविण्यात खर्ची पडले आहेत. आणि यावरच त्याचा मुख्य भर दिसतो. तिसऱ्या लेखाच्या शेवटीं 'सर्वच ग्रंथ ताळतंत्र नसलेला म्हणून यापेक्षा जास्त शाई, कागद व वेळ याचा अपव्यय करण्याची इच्छा होत नाहीं ' असा शेरा दिला आहे. पुढील लेखात ते लिहितात, " आम्ही हा शेवटचा लेख मागील लेखांकात कबूल केलें होते म्हणून निष्वळ लिहीत आहोंत." त्यांच्या दृष्टीनें परीक्षण लिहून लक्ष देण्याइतक्या किंमतीचें संस्कृति-संगम हें पुस्तक नव्हे. पण 'भारतसंरक्षक संघा'ची जबाबदारी त्याच्यावर असल्यानें भारताचें संरक्षण करण्याकरितां वेळेचा अपव्यय सोसण्यास ते तयार झालें आहेत.

पहिल्या दोन लेखांत त्यांनीं तपशिलाच्या कांहीं चुका दाखविल्या आहेत. उदाहरणार्थ, साकेत म्हण अयोध्या पाहिजे तेथें मथुरा म्हटलें आहे. उषेचा अनिरुद्धाशीं विवाह झालेला असता प्रद्युम्नाशीं झाला असें

लिहिलें आहे. 'अष्टादशद्वीपनिखातयूपः' हें वर्णन कार्तवीर्याचें असता दशरथाच्या नावावर दिलें आहे. सत्राजित हा राजा नसता त्यास राजा म्हटलें आहे. मालविका नाटकातील छलित हा नृत्यप्रकार असता त्यास नाटक म्हटलें आहे. मुसलमानाना पराभूत करणाऱ्या राजाची जी जंत्री दिली आहे तींतील काहीं माहिती चुकीची आहे.

अशा प्रकारच्या तपशीलाच्या चुका राहणें हा दोष होय, व त्याचें माप लेखकाच्या पदरात घालणे यात वावगें काहीं नाहीं. पण अशा प्रकारच्या चुका जमेस धरल्या तर मूळ विवेचनात अथवा विचारसरणींत फेरबदल करावा लागतो कीं काय हा अधिक महत्त्वाचा प्रश्न असतो. तसा तो वरीलसारख्या चुकानीं करावा लागत नाहीं. उषा प्रद्युम्न-विवाहाचा उल्लेख आला आहे तो आर्य आणि असुर याच्या एकीकरणाच्या प्रसंगीं असुर हे देखणे होते हे दाखविण्याकरिता आला आहे. तेथें प्रद्युम्नाऐवजीं अनिरुद्ध हें नाव घालावयास लागल्यानें मुख्य विवेचननात काहीं फरक करावा लागत नाहीं. उषेचा प्रद्युम्नाशीं विवाह झाला अशा विधानानें सासऱ्याचा आणि सुनेचा विवाह झाला अशा प्रकारची यट्टा करण्यास अवसर सापडतो व जोशी यानीं तिचा अवलंब केलाहि आहे. पण मिश्रविवाहाचा मुद्दा व असुर हे देखणे होते हा मुद्दा अढळ राहातो व जोशी यानीं तो खोडलेला नाहीं.

तसेंच 'यवनराजानें साकेत अथवा मथुरा या नगरीला वेढा दिला या उल्लेखावरून मथुरेला वेढा देण्याइतके यवन आत आले होते' असें वाक्य आहे. त्यात साकेताला मथुरा म्हटलें तेथे अयोध्या पाहिजे. पण ही दुरुस्ती केल्यानें यवन बरेच आत आले होते हे जें प्रमेय त्याला बाध येत नाहीं. तुम्ही म्हणाल कोठवर आले होते याला नाहीं का महत्त्व ! जोशी यानीं हा प्रश्न उपस्थित करून असें मासविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, वाटेल त्या नगराऐवजीं वाटेल तें नगर योजलें गेलें तर पेशा-वरापर्यंत आलेला शत्रु पुण्यापर्यंत आला किंवा काशीवर चाल करून आलेला आक्रमक दक्षिणेंतल्या काचीपर्यंत चाल करून आला असलीं विधानेंहि खपून जातील ! विपर्यासाच्या भूमिकेवरून हीं उदाहरणें मोठीं चटकदार दिसतील आणि कोणास वाटेल कीं, मथुरा आणि अयोध्या

या दोहोंतील अंतर असेच प्रचंड असावे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, मथुरा आणि अयोध्या यामधील अंतर हें शेदीडशें मैलापेक्षा अधिक नाहीं. त्यातहि अयोध्या ही मथुरेच्या पूर्वेकडे आहे. म्हणजे पश्चिमेकडून चालून येणारा शत्रु मथुरेऐवजीं अयोध्येपर्यंत चालून गेला असें म्हटल्यानें पूर्वेकडे अधिक अंतरावर गेला असेच उलट होईल. तेव्हा शिकंदर सिंधु नदीवरूनच परत गेला तरी त्यामागून आलेले काहीं राजे पूर्वेस अयोध्येपर्यंत आले हा जो मुख्य मुद्दा त्या मुद्यास काहींच बाध येत नाहीं; उलट मथुरा या चुकीच्या नावाच्या ऐवजीं अयोध्या हें नाव घातल्यानें तो मुद्दा उलटा अधिक बळकटच होत आहे. शिवाय यवनराजा मथुरा आणि अयोध्या या दोन्ही स्थळीं गेला असा इतिहास असल्यानें जोशी याचें त्यावरील सर्वच विस्तृत भाष्य फोल होत आहे. "Menander occupied Mathura, invested Sakata and perhaps took Patilputra" (Oxford History p. 118.),

पूर्वी नाटकात स्त्रियाच्या भूमिका स्त्रियाच करीत असत असें मीं विधान केले व त्याला मालविकाग्निमित्रातील छलिताचा दाखला दिला. यावर छलित हे नाटक नसून तो एक नृत्याचा प्रकार होता हे जोशी यानीं दाखविले आहे ते रास्त आहे. पण स्त्रिया नाटकात काम करीत हें या छलितावरून ठरत नसले तथापि प्राचीन भारतात नाटकामध्यें स्त्रियाच्या भूमिका स्त्रिया घेत असत हे विधान काहीं जोशी यानीं खोडलेलें नाहीं. नाटकात स्त्रियानीं काम करण्याविषयीं भारताच्या नाटकशास्त्रात स्पष्ट उल्लेख आहे. नाटकात कोणत्या व्यक्तीला कोणतें काम द्यावें याची व्यवस्था सागत असता भरत लिहितो, 'साधारणपणें स्त्रिया या जात्याच कोमल असतात, त्याना ललितकलाची आवड असते व त्याचा आवाज मधुर असून रूपहि सुंदर असते. म्हणून त्याना योग्य अशी स्त्रियाची भूमिका स्त्रियासच द्यावी.' (नाट्यशास्त्र अ.३५).

वरील प्रकारच्या तपशिलाच्या चुका जोशी यानीं दाखविल्या आहेत त्याचा विचार झाला. तो तपशील दुरुस्त करणें रास्त आहे. पण तो दुरुस्त करीत असतांना एकंदर विवेचन कोठेंहि फिरवावयास नको हें वाचकाच्या लक्षात येईल.

आता निरनिराळ्या प्रकरणामध्ये जी विचारसरणी माडली आहे तिच्या-संबंधीं जोशी याचें म्हणणें काय आहे तें प्रकरणशः पाहूं या.

संस्कृतिसंगमाच्या दुसऱ्या प्रकरणात पाश्चात्यानीं भारतीय सस्कृतीवर जे अवास्तव व निरर्गल आरोप केले आहेत त्याचें दिग्दर्शन व परीक्षण केलें आहे. त्यांत संस्कृत वाङ्मयाची सरसकट अवहेलना करणाऱ्या मेकॉलेला उर्मट म्हटलें आहे. त्यावर जोशी लिहितात कीं– " परतु आज त्या गोष्टीला नव्वद वर्षे होऊन गेलीं तरी मेकॉलेनें आखून दिलेल्या रेषेवर-हुकूम कार्यक्रम विश्वविद्यालयातून चाललेला आहे ही गोष्ट प्राध्यापकाच्या नजरेस यावयास पाहिजे होती " (३।२।३८). पण नजरेस आली नाहीं हें विधानच निराधार आहे. सध्याचा शिक्षणक्रम हा अराष्ट्रीय वृत्तीचा असून तो बदलला पाहिजे याविषयीं सुमारें वीस वर्षांपूर्वी मीं केसरीत लेखमाला लिहिली होती, तिच्यातील महत्त्वाचा भाग ' वादळी वारे ' या पुस्तकात संग्रहीत केलेल्या कोणाहि वाचकास पाहावयास सापडेल. राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यानीं याबाबत चळवळी केल्या. राष्ट्रीय विद्यालयें स्थापन केलीं. त्या सर्व प्रयत्नाना मिळावें तितकें यश मिळालें नाहीं याला कारण स्वातंत्र्याच्या अभावरूपी राजकारण हे होय; शिक्षण-क्रमातील दोष लक्षात आले नाहीत हें नव्हे. असें असता ' प्राध्याप-काच्या नजरेस ही गोष्ट आली नव्हती ' हें विधान जोशी कशाकरिता करीत आहेत ? शिक्षणक्रमातील दोष दिसत असूनहि ते दूर करता येत नाहींत हा परकीय सत्तेखालील राजकारणाचा दोष आहे. पण राजकार-णाला योग्य तें महत्त्व देण्यास मात्र जोशी कबूल करीत नाहींत. त्याचा असा एक सिद्धान्त आहेत कीं, 'दुःखशोकातच मानवाची शुद्धावस्था राहते' (हिंदूंचें समाजरचनाशास्त्र पा. २६७) ह्या सिद्धान्तावर विश्वास असणाऱ्याला परवशतेच्या स्थितीबद्दल दुःख वाटण्याचें कारण नाहीं. आजच्या शिक्षणक्रमातील दोष संस्कृति-संगमकाराच्या नजरेस आले नाहींत हें विधानच निराधार असल्यानें त्यावर केलेलें वक्तव्य अनावश्यक आहे.

जोशी लिहितात कीं, 'आज स्नातक परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यापुढें न्यायशास्त्र हा शब्द उच्चारल्याबरोबर मिल, बोसाके हीं नावें येतात कीं गौतम, वात्सायन हीं येतात; तत्त्वज्ञान उच्चारल्याबरोबर प्लेटो, ब्रॅडले हीं

नावें येतात कीं कणाद, शंकर हीं नावें येतात ही गोष्ट निःप्राजळपणें प्राध्यापक सागतील तर बरें होईल.' जोशी याना अगदीं निष्प्राजळपणें सागतों कीं ते म्हणतात त्याप्रमाणें आपल्याकडील विद्वानापेक्षा पाश्चात्य विद्वानाचींच नावें आजच्या स्नातकापुढें येतात. पण या मुद्द्यावर वाद होता कधीं ? त्यामुळें ज्यावर वाद नव्हताच त्यावर केलेलें सर्व वक्तव्य अनावश्यक आहे. वर उल्लेखिलेल्या ' शिक्षणांतील राष्ट्रीय दृष्टि ' या माझ्या निबंधात मीं लिहिलें आहे कीं, ' बौद्धिक पारतंत्र्याच्या नाशाचे शिक्षण द्यावयाचें म्हणजे हिंदूंना उज्ज्वल परंपरा नाहीं, शास्त्रकलावाङ्मय यात ते मागासलेले आहेत वगैरे जी विचारसरणी परकीयानीं लिहिलेल्या पुस्तकाच्या द्वारें विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न चालू आहे तिची लाट थोपविणें होय ' (वादळी वारे पा. १६४). इतकें स्पष्ट लिहिलें असता आणखी निष्प्राजळपणें तें काय सागावयाचें ? 'वादळी वारे' हें पुस्तक जोशी यानीं वाचलें नसेल. पण संस्कृति-संगम या पुस्तकावर ते टीका करीत असले तरी तें पुस्तक तरी त्यानीं नीट वाचलें कीं नाहीं याची शंकाच आहे. एरवीं ते असलीं विधानें करते ना. संस्कृति संगमातील भारतीयाची ऐश्वर्योपासना, विश्वसंचार वगैरे प्रकरणें जीं लिहिली आहेत तीं आपल्या उज्ज्वल परंपरेची आठवण करून देण्याकरितांच लिहिलेलीं नाहींत काय ? मात्र आपल्या दोषाचीहि विस्मृति होऊं नये या हेतूने दोषाचेहि दिग्दर्शन केलें आहे. अर्थात् या बाबतींत निष्प्राजळपणें सागण्यासारखें नवें काहीं नाहींच आहे.

शेवटीं जोशी लिहितात, "आपण जें प्रत्यक्ष वर्तनानें करीत आहोंत तेंच मेकॉलेने सागितले म्हणून त्याला उर्मट म्हणण्याचें कारण काय ?" आम्ही वर्तनानें काय करीत आहोंत ? तर गौतमाचें न्यायशास्त्र शिकविण्याऐवजीं ॲरिस्टॉटलचें शिकवीत आहेत. पण ह्या बाबतींत राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करणारे लोक हे अगतिक आहेत ही गोष्ट जोशी याना दिसत नाहीं का ? राष्ट्रीय शिक्षणाच्या पुरस्कर्त्यानीं अनेकदा प्रयत्न करून पाहिला. त्याला योग्य फळें आलीं नसतील तर तो परकीय सत्तेचच दोष आहे. पण त्यावरून ' संस्कृत भाषेतील सर्व ग्रंथभाडार घेतले तरं तें युरोपमधील एखाद्या दुसऱ्या एकट्या ग्रंथाच्याही तुलनेस पुरणार नाहीं

असा मेकॉलेचा उर्मट अभिप्राय सध्याचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या सर्व शिक्षकाना मान्य आहे हे जोशी याना कोणी सागितलें ? तो अभ्यासक्रम याना शिकवावा लागतो, ॲरिस्टॉटलच्या जोडीला गौतमाचें न्यायशास्त्र याना शिकवता येत नाहीं हे त्या शिक्षकाचे अगतिकत्व होय; मेकॉलेचा उर्मट अभिप्राय मान्य आहे म्हणून नव्हे. निदान संस्कृति-संगमकाराला तरी वरील प्रश्न विचारण्याचे कारण नाहीं. त्यानें लिहिलें आहे, " काट-कोनत्रिकोणाचा सिद्धान्त शिकविताना पायथागोरसच्या बरोबर शुल्बसूत्राचा उल्लेख व दशाशपद्धतीसारखी बहुमोल पद्धति शोधून काढण्याचा मान भारतीयाचा आहे या गोष्टी विद्यार्थ्यांच्या कानावरून जावयाच्या तर त्याला राष्ट्रीय दृष्टि पाहिजे " (वादळी वारे पा. १७६). एवंच एतद्विषयक जोशी याचें प्रतिपादन सर्वच अनावश्यक आहे.

कणाद, गौतम, चाणक्य वगैरे शास्त्राचा अभ्यास आमच्या विद्यालयात झाला पाहिजे ही गोष्ट उभयपक्षीं मान्य आहे. मात्र जोशी याच्या लिहिण्यावरून कोणी असा समज करून घेईल कीं, खुद्द जोशी याच्या लिखाणात पाश्चात्याच्यापेक्षा पौर्वात्य विद्वानाचीच दखलगिरी अधिक घेतली जात असेल तर त्याची फसगत होईल. कारण जोशी याच्या स्वतःच्या लिखाणात पाश्चात्य विद्वानाच्या मतार्चा अवतरणे जागोजाग आढळून येतात. फार काय भारतीय संस्कृतीचे लक्षण म्हणून जें सूत्र ते वारंवार उच्चारतात तेंहि पाश्चात्याच्या भाषेत आणि पाश्चात्याच्याकडून उसनें घेतलेले तें सूत्र म्हणजे 'भारतीयाची प्रवृत्ति' Divide, specialise and co-ordinate according to rank अशी आहे (३।२।३४).

पुढें तें लिहितात कीं, " पाश्चात्य शास्त्रें हीं श्रेष्ठ आहेत असें मेकॉलेच्या हुकुमानुसार मानणाऱ्या गुलामी मनोवृत्तीच्या लोकाना सनातनी लोक कोणत्या मुद्द्याकरिता जीव टाकीत आहेत ही गोष्ट कशी ध्यानात येणार ? " बरोबर आहे. आणि सनातनी परंपरेच्याविरुद्ध ब्र काढणारा माणूस हा गुलामी वृत्तीचा असतो अशी जोंपर्यंत जोशी यानीं आपली समजूत करून घेतली आहे तोंपर्यंत सुधारक कशाकरिता जीव टाकताहेत हें जोशी याना तरी कसें कळेल ? संस्कृति-संगमकाराचीं मतें कोणास कशींहि वाटोत पण त्याचा लेखक हा गुलामी मनोवृत्तीचा आहे असा शेरा

कोणीहि सुबुद्ध वाचक मारील असें मला वाटलें नव्हते. गुलामी वृत्तीचा अहेर स्वीकारूनहि पुन्हा स्पष्ट प्रतिपादावयास हरकत नाहीं कीं रसायन, वास्तव, खगोल, गणित वगैरे आजचीं पाश्चात्यांचीं शास्त्रें हीं पूर्वीच्या आपल्या शास्त्रापेक्षा फार पुढारलेलीं आहेत. तत्त्वज्ञान, न्यायशास्त्र वगैरेंत तितकी प्रगति झालेली नाहीं ही गोष्टही सत्य आहे. पण आजच्या शास्त्रांच्या जोडीला पूर्वीचीं शास्त्रें शिकवूं नयेत असा आग्रह संस्कृति-संगमकारानें धरला आहे कोठें ? आजच्या प्रभावी भौतिक शास्त्रावर बहिष्कार घालणें हें आत्मघातकी आहे असें मात्र त्याचें स्पष्ट मत असून तें त्यानें संस्कृति-संगमात मांडलें आहे. पण आपलें जुनें न्यायशास्त्र किंवा वेदान्त शिकवूं नये असें कोठेंहि प्रतिपादन केकेलें नाहीं. उलट संस्कृतिसंगमात लिहिलें आहे " मनाला शाश्वत शांतीची जोड मिळवून देणाऱ्या विद्येकरिता आम्हांला काय पाश्चात्याच्या पाठशाळेंत गेलें पाहिजे ? मुळींच नाहीं. साक्षात् मृत्यूशीं धीटाईनें चर्चा करणाऱ्या नचिकेताचें तत्त्वज्ञान आम्हालाच नव्हे तर इतरानाही पुरून उरेल. स्वच्छतेचे धडे आम्हीं पाश्चात्यापासून शिकावे ? सुतराम् नको. आपल्या संस्कृतींतील याहीपेक्षा अधिक श्रेष्ठ बाबी म्हणजे सामाजिक ऋणाची कल्पना, आश्रमव्यवस्था व सहिष्णुवृत्ति...." वगैरे. तात्पर्य, जुन्यातील योग्य तें टिकवावें व नवें योग्य तें स्वीकारावें ही त्या पुस्तकातील माझी भूमिका आहे.

जोशी यानीं दुसरा एक मुद्दा उपस्थित केला आहे कीं, ' मेकॉलेसारख्या पाश्चात्यानीं जसे आघात केले तसे तीर्थकीर्तीर्थ कोकजे याच्यासारखेहि करीत आहेत. मग मेकॉलेलाच तेवढें उमेट म्हणण्यात अर्थ काय ! ' आपणाला हिणविणारे पाश्चात्य आणि आपणातील काहीं गोष्टींत परिवर्तन करूं पाहणारे कोकजे आदि परिवर्तनवादी यांच्यांतील फरक न उमगणाराविषयीं काय लिहावें ? परिवर्तनवाद्यांना आपल्या पूर्वजाविषयीं अनादर नसून पूर्वजानीं ज्याप्रमाणें कालमानाप्रमाणें आचारविचारात परिवर्तन केलें तसेंच आजच्या काळीं परिवर्तन घडवून आणणें हें आपलें कर्तव्य होय असा त्याचा पक्ष आहे. त्यांना पूर्वजाना मूर्खांत काढावयाचें नाहीं आहे. असल्या परिवर्तनवाद्यांना मेकॉलेसारख्या दुसऱ्याची हेटाळणी करणाऱ्या

चर्मटाच्या पंक्तीस बसवावयाचें तर यज्ञसंस्थेस फुटकी नाव म्हणून हीनत्व देणारे उपनिषत्कार, श्राद्धाच्या प्रसंगी मासभक्षण केलेंच पाहिजे ही मनूची आज्ञा मोडणारे उत्तरकालीन स्मृतिकार, कलिवर्ज्य धान्यावर बसवून संन्यास घेणारे शंकराचार्य या सर्व प्राचीन परिवर्तनवाद्यांना उर्मट म्हणावें लागेल. या सर्वांना उर्मट म्हणावयास माझी तरी जीभ वाहत नाहीं. जोशी यांना योग्य वाटल्यास त्यांनी म्हणावें.

संस्कृति-संगमाचीं प्रकरणें पाच व सहा यांमध्यें भारतीय संस्कृति व पाश्चात्य संस्कृति या दोहोंचें चित्र रूढ समजुतीपेक्षा निराळें कसे काढता येईल हें दाखविलें आहे. 'आध्यात्मिक युरोप' आणि 'आसुरी भारत' या प्रकरणाविषयीं जोशी यानीं वरीलप्रमाणेंच विपर्यास केला आहे. हीं प्रकरणें लिहिताना युरोपियन संस्कृति ही अध्यात्मप्रधान व भारतीय ही आसुरी होय असलें प्रमेय मला मांडावयाचें होतें असा मिथ्याग्रह संस्कृतिसंगमाचा कोणीहि वाचक करून घेणार नाहीं. सुष्टदुष्ट प्रकार दोन्हीकडे आढळतात, यामुळें भारतीय किंवा पाश्चात्य संस्कृति याच्यावर आध्यात्मिक व आसुरी असा शेरा मारणें अवास्तव होय हें ध्यानीं ठसावे व दोन्ही संस्कृतींतील उपेक्षित मागाकडे लक्ष जावे हा त्या प्रकरणाचा उद्देश आहे व तो पुस्तकात अगदीं स्पष्ट शब्दात मांडलेला आहे. आसुरी भारत या प्रकरणाच्या शेवटचीं पुढील वाक्यें पाहा : "वरील मासले वाचून तुम्ही म्हणाल दोषस्थलेच टिपून घ्यावयाचीं तर पाश्चात्य संस्कृतीचे नाहीं का असेंच ओंगळ चित्र रेखाटता येणार? तुमचा मुद्दा अगदीं रास्त आहे. कोणत्याही संस्कृतीचें असें चित्र रेखाटता येईल हेच मला मुख्यतः दाखवावयाचें आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं पाश्चात्य हे आसुरी व भारतीय हे आध्यात्मिक हें समीकरण आपण सोडून दिलें पाहिजे. ते देण्यास मनाची तयारी व्हावी म्हणून रूढ समजुतीपेक्षा निराळीं चित्रें साधार कशीं रेखाटता येतील हें मुद्दाम दिग्दर्शित केलें आहे. स्वतःच्या संस्कृतीविषयीं कठोर वृत्ति स्वीकारली आहे तींहि दोषस्थळें मान्य करूनहि स्वतःच्या संस्कृतींतील अभिमानास्पद कामगिरीची योग्यता पटवून देतां येईल ही खात्री आहे म्हणून." यावरून मूळ पुस्तकावरील भूमिका स्पष्ट होईल.

जुगार, वेश्यावृत्ति, मद्यपान याचे जे उल्लेख 'आसुरी भारत' प्रकरणांत केले आहेत ते हीं व्यसनें पाश्चात्यांच्याप्रमाणें आपणातहि पूर्वीपासून आहेत हें दाखविण्यासाठीं. औद्योगीकरणानंतर पाश्चात्यात तीं जास्त वाढलीं आहेत हेंही मान्य करण्यास हरकत नाहीं. पण त्यामुळे औद्योगीकरण आणि व्यसनवृद्धि याचें अभेद्य साहचर्य मात्र मानण्याचें कारण नाहीं. जोशी लिहितात. "मद्यपान हें अयोग्य असें केळकराना वाटत असल्यास कामकरीवर्गाची खेचाखेच कोठेंच होणार नाहीं अशा तऱ्हेची व्यवस्था त्यानीं सुचविली पाहिजे; नाहीं तर प्रभावी भौतिक शास्त्राचा परिणाम दारूबाजींत झाल्याशिवाय राहणार नाहीं" (३।४।४४). जी व्यवस्था जोशी याना हवी आहे तशी व्यवस्था सुचविणे मुळींच अवघड नाहीं. ती व्यवस्था म्हणजे **साम्यवाद**. कामगारवर्गाची खेचाखेच करा असे यंत्र सागत नाहीं तर माणसाची लोभी वृत्ति सागत आहे. कोंदट चाळींत निकृष्ट वेतनावरच कामकऱ्यानीं गुजराण करावी असें यंत्र कशाला सागेल ? तेव्हा भौतिकशास्त्राचा आणि कामकऱ्याच्या दाट कोंदट वस्तीचा अतूट असा संबंध मुळींच नाहीं. शिवाय बाष्पशक्तीच्या ऐवजीं विजेच्या शक्तीचा उपयोग वाढत्या प्रमाणावर झाल्यासहि इष्ट परिणाम होणें अशक्य नाहीं. वीज ही खेडोपाडी पुरविता येण्यासारखी शक्ति आहे. तिचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर केल्यास एकाच शहरात गिरण्याची गर्दी झालेली दिसण्याचे कारण नाहीं. हें स्थित्यंतर घडवून आणता आले तर पूर्वीप्रमाणेच प्रत्येक कारागिराला आपल्या घरीं एखाद-दुसरें विजेने चालणारें यंत्र ठेवून त्यावर गुजराण करणें अशक्य ठरणार नाहीं. जेथे मोठा कारखाना अवश्य ठरेल तेथेंहि अनेक कारखाने एकाच शहरात थाटण्याचें कारण उरणार नाहीं. शिवाय, या कारखान्यात जे मजूर येतील त्याना हवाशीर राहणाऱ्या जागा, पोटभर सकस अन्न, करमणुकीचीं साधनें वगैरे देणें तरी अशक्य का व्हावें ? आज ही विलोमनीय स्थिति अवतरलेली नाहीं. पण ती कशी अवतरेल याविषयींची मतप्रणाली स्पष्टपणे माडण्यात आलेली आहे. तिचें नाव **साम्यवाद** ! पण तो शब्द जोशी ऐकून तरी घेतील कीं नाहीं कोणास ठाऊक ! ते घेवोत वा न घेवोत, भौतिक शास्त्राची वाढ आणि व्यसनाची वाढ याचें शाश्वत साह-

चर्य आहे असा सिद्धान्त मात्र मुळींच सिद्ध होण्यासारखा नाहीं. प्रत्येक विद्येचा दुरुपयोग होत आलेला आहे तसा आज भौतिक शास्त्राचा होत आहे. पण दुरुपयोग लक्षात आल्यावर तो टाळावयाचे उपायहि निघतात. लोभी वृत्तीला मर्यादा घालणारा साम्यवाद हा आजचा त्यावरील उपाय आहे. पण तो जोशी याना सर्वस्वीं नापसंत ! साम्यवादाचा प्रयोग करून पाहणाऱ्या रशियाविषयीं जोशी लिहितात कीं, ' युरोपातील द्विपादपशूला व त्यात रशियाला पोटाची खळगी भरण्यापलीकडे मानव म्हणून काहीं असतो ही कल्पनाच उरलेली नाहीं.'

याच प्रकरणातील राजतरांगिणीतील राजाच्या आसुरी लीला वर्णिल्या आहेत त्या धड नाकारता येईनात तेव्हा तो ग्रंथच प्रामाणिक नाहीं असा ईश्वरी प्रसादाचा हवाला दिला आहे कीं Kalhan combines fact with fiction. कल्हणाचीं सर्वच विधानें काटेकोर नसतील, पण तो प्रधानपुत्र होता व पूर्वीचे लेखी दाखले पाहून लिहिण्याचा त्याने प्रयत्न केला होता. शिवाय त्यातल्या त्यात विश्वसनीय असा संस्कृत वाङ्मयातील एकमेव ग्रंथ म्हणजे राजतरंगिणी होय. उद्या सुदैवाने अधिक विश्वसनीय असा एखादा ग्रंथ उपलब्ध झाला आणि त्यावरून काश्मीरचे राजे हे सद्गुणी होते असें ठरले तर ते नको आहे कोणास ? पण तोवर उपलब्ध असलेल्या सामग्रीकडे डोळेझाक करता येत नाहीं. श्रेष्ठ इतिहासकाराच्या अंगीं असणारे सर्व गुण कल्हणाच्या ठिकाणीं कदाचित् नसतील पण त्यानें दुष्कृत्यें वर्णन केलीं आहेत तीं स्वकपोलकल्पित आहेत असें मानण्याला आज तरी कोणताच पुरावा उपलब्ध नाहीं.

जोशी यानाहि कल्हणाचा पुरावा अगदींच अमान्य करणे जड गेलें असावें म्हणून त्यानीं दुसराच एक गैरलागू मुद्दा उपस्थित केला आहे. असुरी भारताचें वर्णन करिताना संस्कृति-संगमांत मीं लिहिलें आहे कीं, ' संस्कृतीचें मूल्यमापन करतांना व्यावहारिक वर्तणूक जी लक्षात घ्यावयाची ती सत्ताधीशाची घेणें हा उत्तम पक्ष. तेव्हा आसुरी लीला खेळण्याचें सामर्थ्य ज्याच्या मनगटांत असतें अशा सत्ताधीशाची वृत्ति पाहणें महत्त्वाचें असतें.' जोशी यावर

लिहितात, "हिंदु संस्कृति ही संकराच्या विरुद्ध असल्यानें संकरप्रजेच्या वर्तनावरून ठरणारी नीति ही हिंदु समाजाची नीति नव्हे. अर्थात् संकर-प्रजा ही संस्कृतिबाह्य ठरते." मीं उदाहरणें दिलीं आहेत तीं राजांचीं म्हणजे क्षत्रियांचीं दिलीं आहेत. आणि क्षत्रियात संकर होत असे असें म्हटलें आहे. तें विधान जोशी याना मान्य आहे कीं नाहीं कोणास माहीत. चालू प्रकरणीं तें सोयीचें असल्यानें जोशी मान्य करीत आहेत व राजांचीं दुष्कृत्यें हीं संस्कृतिबाह्यांचीं दुष्कृत्यें म्हणून निकालात काढीत आहेत. यावर प्रथम असें सांगावयास पाहिजे कीं संकरप्रजा संस्कृतिबाह्य ठरवावयाची झालें तर आजच्या हिंदु समाजाचा मोठा भाग संस्कृतिबाह्य ठरेल. विवाह-प्रसंगीं सवर्णा वधूच प्रशस्त समजावी असें ध्येय स्मृतिकार माडीत असले तरी असवर्णा प्राचीनकालीं निषिद्ध नव्हती. इतकेंच नव्हे तर मनूच्या काळा-पर्यंत ब्राह्मण पिता आणि क्षत्रिय माता याची संतति ही ब्राह्मणसदृश मानिली जात असे. म्हणजे ब्राह्मण व क्षत्रिय या दोन वर्णांपासून जी संकरप्रजा निर्माण होत असे ती ब्राह्मणातच मोडत असे. 'त्रिषु वर्णेषु जातो हि ब्राह्म-णाद्ब्राह्मणो भवेत्' अशीं वचनेही सापडतात (अनुशासन पर्व अ. ४७). हें संकराचें प्रमाणहि तुरळक नसावें. महाभारताच्या वनपर्वात युधिष्ठिर नहुष आणि याच्या संवादात युधिष्ठिराने संकराचे जें वर्णन केले आहे त्यावरून पाहिले तर एके काळीं संकर फार मोठ्या प्रमाणावर झाला असला पाहिजे. युधिष्ठिर म्हणतो, ' जातिरत्र महासर्प मनुष्यत्वे महामते । संकरात्सर्ववर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः ॥ सर्वः सर्वास्वपत्यानि जनयन्ति यदा नराः । वाङ्मैथुनमथो जन्म मरणं च समं नृणाम् ॥ (अध्याय १८२।३१,३२). तसेंच शांतिपर्वात जनक-पराशर संवादात जनक पराशराला विचारतो कीं, वाटेल त्या योनींत उत्पन्न झालेले पुरुष मुनित्वाच्या पदवीस कसे चढले ? त्यावर पराशर उत्तर देतो कीं, हें सर्व तपाने होतें. मुनींनीं वाटेल त्या जातींतील स्त्रियाच्या ठिकाणीं पुत्र उत्पन्न केले व त्यांना मुनित्व प्राप्त करून दिले. उत्पाद्य पुत्रान् मुनयो नृपते यत्र तत्र ह स्वेनैव तपसा तेषा ऋषित्वं विदधुः पुनः । या प्रकारांची उदाहरणें म्हणून पराशरानें ऋष्यशृंग, कश्यप, वेद, ताण्डय, कृप, कक्षीवान, कमठ, यवक्रीत, द्रोण, आयु, मतंग, दत्त, द्रुपद, मत्स्य वगैरे नीच कुलात उत्पन्न झालेल्या अनेक ऋषींचीं नावें दिलीं आहेत. या वर्णनांतील

'उत्पाद्य पुत्रान् यत्र तत्र' या शब्दावरून संकराची कल्पना येईल. याच प्रकाराची उदाहरणे भविष्यपुराणांतही दिलेली असून वरील संवादातील पराशरासंबंधाने 'श्वयाकी गर्भसंभूतः पिता व्यासस्य पार्थिव। तपसा ब्राह्मणो जातः संस्कारः तेन कारणम्' असा खुलासा केला आहे. वरील वचनें अगदींच बिनबुडाचीं नसतील तर एके काळीं संकर फार मोठ्या प्रमाणावर होत असला पाहिजे, आणि तसे असेल तर भरतखंडातील सर्वच प्रजा ही जोशी याच्या मताप्रमाणें संस्कृतिबाह्य ठरेल आणि मग हिंदुसमाजाची नीति ठरविण्याला आधारच नाहींसा होईल.

स्वतःच्या सोयीप्रमाणें हवा तो सिद्धान्त जोशी कसा माडतात याचा आणखी एक दाखला पहा. भारतीय व पाश्चात्य याच्या संस्कृतींची तुलना करण्यासबंधीं जोशी यानीं असा एक मोठा सिद्धान्त प्रतिपादला आहे कीं, कोणत्याहि सस्कृतीचें मूल्यमापन त्या संस्कृतींतील मूल्यश्रेणीनेंच केलें पाहिजे. हा सिद्धान्त सागून जोशी लिहितात कीं, 'हा सिद्धात पाश्चात्याना जसा कळला नाहीं तसा तो आमच्याकडील पुढाऱ्याना कळलेला नाहीं' (३।२।२९). जोशी यांचा वरील सिद्धात पुढाऱ्याना कळलेला आहे कीं नाहीं कोणास ठाऊक पण तो मला आकलन झालेला नाहीं हें मी निष्प्राजलपणें कबूल करतों. कारण तो सिद्धात नसून अपसिद्धात आहे. कोणत्याहि संस्कृतीचे मूल्यमापन त्याच संस्कृतींतील मूल्यश्रेणीनें करावें या प्रतिपादनाला काहीं अर्थच नाहीं. ही भूमिका एकदा घेतल्यावर कोणत्याहि दोन संस्कृतींची तुलनाच होऊं शकत नाहीं. खुद्द जोशी याना तरी वरील सिद्धात खरोखर आकलन झाला आहे कीं नाहीं याची शंकाच आहे. कारण तो झाला असता तर पाश्चात्य संस्कृतीला पाश्चवी, रानटी म्हणून विशेषणे ते देते ना! हीं विशेषणें पाश्चात्य संस्कृतिनिरपेक्ष अशा दुसऱ्या कोणत्या तरी मूल्यश्रेणीच्या अपेक्षेनेंच देणें शक्य आहे. खुद्द जोशी यानीं हिटलर व स्टालिन यांना आसुरी ठरविण्याकरिता आधार घेतला आहे तो गीतेंतील मूल्यश्रेणीचा! पाश्चात्य मूल्यश्रेणीचा नव्हे!

संस्कृति-संगमांतील आठवें प्रकरण 'भारतीयाचा विश्वसंचार' असें आहे. त्यात समुद्रावरील सफरी वर्णन केलेल्या आहेत. त्या प्रकरणांत

'अष्टादशद्वीपनिखातयूपः' हें वर्णन कार्तवीर्याला लागू असतांना दशरथाच्या नावावर चुकीनें आलें आहे. ही चुकी जोशी यानीं बरोबर काढली आहे. पुढें जोशी लिहितात कीं 'किल कार्तवीर्यः' या वचनात किल असल्यानें ही पूर्वीची दंतकथा आहे व कालिदासाच्या रघुवंशातील 'पारसीकान् तथा जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना' अनुमान काढावयाचें झाल्यास समुद्रयान निषिद्ध होतें असेंच अनुमान निघतें. हें जोशी यांचें म्हणणे मल्लिनाथाच्या टीकेला धरून आहे. पण रघुराजाच्या दिग्विजयात ज्या ज्या दिशेला तो गेला त्या त्या दिशेच्या देशाचें वर्णन असता येथें मात्र तसें वर्णन नाहीं. असें का ? तर तेथून पुढें रघु समुद्रावरून गेल्यानें स्थलाचें वर्णन करण्यास अवकाश नसावा अशी शंका सुचते व ती डॉ. दिवेकर यानीं लोकशिक्षणाच्या एका अंकात सविस्तर माडून रघुवंशातील मूळ पाठ प्रतस्थे स्थलवर्त्मना याऐवजीं प्रतस्थेऽस्थलवर्त्मना असा अवग्रहयुक्त असावा किंवा स्थलवर्त्मना ऐवजीं जलवर्त्मना असावा व समुद्रयान निषिद्ध ठरल्यानंतरच्या टीकाकारानीं तो बदलला असावा असें प्रतिपादन केलें होतें, एवढें वाचकांना यासंबंधीं कळविणें जरूर आहे.

हा मुद्दा सोडला तरी कालिदासाचा काळ खिस्ती शतकाच्या पहिल्या काहीं शतकात कोठेंहि धरला तरी याच शतकात भारतीय हे समुद्रावरील मुशाफरी करीत असत यांचें जें धावते वर्णन भारतीयाचा विश्वसंचार या प्रकरणभर केलें आहे तें अविश्वसनीय आहे असें जोशी यांनीं दाखवून दिलें असतें तर त्याचा मुद्दा सिद्ध झाला असता. तसें काहींच दाखविलेलें नाहीं. तें दाखविणें कठीण असल्यानें त्यानीं एक नवीनच मुद्दा उपस्थित केला आहे. परदेशगमनाच्या बाबतींत जोशी यानीं १९२७ सालीं जिनीव्हा येथें लोकसंख्येचा विचार करण्याकरितां भरलेल्या परिषदेचा उल्लेख करून असें प्रतिपादन केलें आहे कीं "जेते म्हणून किंवा व्यापारी पेशानें एका देशांतील लोकसंख्या दुसरीकडे गेली असतां सांस्कृतिक, वाशिक, राष्ट्रीय व आर्थिक प्रश्न उपस्थित होतात; व त्यांचें पर्यवसान बहुधा युद्धात, दास्यांत अगर साम्राज्यशाहीत होतें (वर्ष ३ अंक २). प्रभावी भौतिकशास्त्रें शिकण्याकरितां देखील रशियनानें जर्मनींत जाऊं नये व जर्मनानें इंग्लंडांत जाऊं नये. त्यामुळें सांस्कृतिक मतें बिघडतात असेंच तीं राष्ट्रें मानीत

नाहींत का ! असेंहि ते विचारतात ! वर्ष ३ अंक ५ मध्यें हाच विषय पुन्हा आला आहे. तेथें ते लिहितात, "विश्वसंचार बाटेल त्या राजकीय परिस्थितींत चालू राहतो आणि तो चालू राहावा हा सिद्धांत श्री. केळकरांना कोणीं सांगितला ?" यावर एवढेंच उलट विचारलें असता पुरे कीं, असा सिद्धात मीं माडला आहे कोठें ? विश्वसंचार पूर्वी होता हें इतिहासावरून दाखविलें आहे व तें जोशी यानीं खोडलेलेंहि नाहीं. तशाच प्रकारचा संचार नेहमीं चालू राहील किंवा राहावा असें प्रतिपादिलेले नसून, विश्वसंचार अजिबात लोपल्यास जागरूकता लोपते व अन्य देशात ज्ञानाची प्रगति झालेल्याची दखलगिरी राहत नाहीं असें लिहिलें आहे. पूर्वीचा ऐतिहासिक विश्वसंचार अमान्य करणे कठीण गेल्यामुळे जोशी यानीं स्वतःच्याच एके ठिकाणीं लिहिलेल्या मताविरुद्ध दुसऱ्या ठिकाणीं विरुद्ध लिहिण्यासही कमी केलेलें नाहीं. ते लिहितात, "परदेशगमनाचा निषेध कोठें होता तो एक विवेकबुद्धि असलेल्या केळकरासच माहीत. केळकर सागतात परदेशगमनाचा निषेध कडक रीतीने लागू होता त्या ब्राह्मण जातीनेंच या वसाहतीकरणात प्रामुख्यानें भाग घेतला आणि पुन्हा समुद्रयान निषिद्ध ठरलें तें उत्तरकालीं. यावरून पहिल्या वाक्यात सागितलेल्या ब्राह्मणाना तो लागू नव्हता. ज्या काळचा नियम त्या काळच्या ब्राह्मणाबद्दल सांगावयास पाहिजे." ज्या काळचा नियम त्या काळच्यापुरता बंधनकारक मानला पाहिजे हा मुद्दा अगदीं योग्य आहे. आणि जेव्हा निर्बंध नव्हता त्या कालीं ब्राह्मणानीं वसाहतीकरणात प्रामुख्यानें भाग घेतला हेंच दाखविलें आहे. पुढे तो निर्बंध कां घालण्यात आला असावा ? त्याबद्दल दोन अनुमानें काढतां येण्यासारखीं आहेत. एक म्हणजे शौचाशौचाच्या कल्पना कडक होत गेल्या, त्यामुळे समुद्रयान निषिद्ध ठरविण्यात आलें असावें. किंवा दुसरें म्हणजे समुद्रयान निषिद्ध ठरविण्यासारखी काहीं विशिष्ट परिस्थिति उत्पन्न झाली असावी. देशातील बुद्धिमान् आणि कर्तबगार प्रजा बाहेर जाऊन स्थायिक होऊं लागली तर परदेशगमनाचा निषेध करणें अवश्य ठरेल. तसा प्रसंग उपस्थित झाला होता असा ऐतिहासिक पुरावा सांपडला तर या निषेधापाठीमागचा विशिष्ट परिस्थितींतील हेतु स्पष्ट होईल.

अद्याप तसा पुरावा कोणीं माडलेला नाही. उद्या तो तसा उपलब्ध झाला तरी परदेशगमननिषेध हें नैमित्तिक म्हणजे विशिष्ट परिस्थितींत आवश्यक असें ठरेल. त्यामुळें वाणिज्याकरिता, ज्ञानार्जनाकरितां किंवा जागरूकतेनें आजूबाजूच्या देशांतील परिस्थिति समजावून घेण्याकरितां परदेशीं गमन करूं नये असा सार्वत्रिक निष्कर्ष निघणार नाहीं. पण असा विवेक न करितां द्विजाने समुद्रप्रयाण करू नये असा निरपवाद नियम मात्र धर्मशास्त्रात रूढ झाला. त्या विषयींचे मूळ वचन जोशी यानींच वर्ष ३ अंक २ च्या एका लेखाच्या शीर्षभागींच दिलेलें आहे तें म्हणजे 'द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्यापि संग्रहः' हें होय. याचा अर्थ नावेंतून समुद्रावरील सफर केलेल्या द्विजाला शुद्ध करून घेतला असताहि संग्रह करणें हें कलिवर्ज्य होय असा आहे. म्हणजे त्यानें **प्रायश्चित्त घेतलें तरीहि त्याचा स्वीकार करूं नये.** यापेक्षा अधिक कडक शब्दात समुद्रयानाचा निषेध तो कसा करावयाचा ? पण वरील वचन जोशी यानींच उद्धृत केलें असताहि अवघ्या दोन महिन्यानंतरच्या पाचव्या अंकात ते विचारतात, 'परदेशगमनाचा निषेध होताच कोठे !' ते लिहितात, "परदेशगमनाचा निषेध कोठें होता तो एक विवेकबुद्धि असलेले केळकर आणि परमेश्वर या दोघानाच माहीत." पण या दोघाच्यापेक्षा तो जोशी याना चागला माहीत आहे. 'द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्यापि संग्रहः' हें वचन त्यानीं स्वतःच उद्धृत केलेलें आहे. तें वचन त्यानीं सोईप्रमाणे आठवावे किंवा सोयीप्रमाणें विसरावें हें त्याचें पाहणें आहे. तिसऱ्या अंकात दिलेलें तें वचन त्याना पाचवा अंक लिहिताना अडचणीचें वाटलें हें स्पष्ट आहे. कारण पाचव्या अंकात हें वचन मागे सारून दुसरेंच वचन पुढें आणले आहे. ते लिहितात, 'परदेशगमनानंतर तेथलि काहीं चिजा समाजरचनेंत घुसडून दिल्या जातील म्हणून त्याना परत आल्यावर संस्कार सागितलेला आहे. "अंगवंगकलिंगा च गत्वा संस्कारमर्हति." येथील जोशी यांची हातचलाखी पहाण्यासारखी आहे. या ठिकाणीं असें विचारावयाचें कीं ' शोधितस्यापि संग्रहः ' या पूर्वीच्या वचनाऐवजीं संस्कारमर्हति हें नवें वचन कां आता पुढें केलें ? ' शोधितस्यापि संग्रहः ' या वचनात संस्कारानें शोधित झाला असताहि संग्रह करूं नये असे स्पष्ट रेखीव शब्द

आहेत. मग परदेशगमनाचा निषेध होता कोठें हें परमेश्वरालाच माहीत म्हणण्यात हशील काय? शिवाय विश्वसंचार या प्रकरणात समुद्रावरील प्रवासाचा उल्लेख असता जोशी येथें 'अंगवंगकलिंगा च गत्वा सस्कार-महंति' याचा म्हणजे देशातील काहीं प्रातांचा उल्लेख आहे. अंगवंग कलिंग हे भरतखंडाबाहेरील परदेश समजावयाचे कीं काय? आणि त्यानीं 'द्विजस्याब्धौ' हा श्लोक या ठिकाणीं टाळावा का! पण टाळण्याशिवाय निभाव नव्हता.

याच संदर्भात जोशी लिहितात कीं, 'ज्ञान कोठूनहि घ्यावें पण समाज-रचना देखील कोठूनहि घ्यावी का!' पण संस्कृति-संगमात समाजरचना वाटेल तेथून घ्यावी असें निरपवाद प्रतिपादन केलें आहेच कोठें! जाग-रूकतेच्या दृष्टीने आणि ज्ञानाच्या दृष्टीनें परदेशगमनावर कडक निषेध कायमचा घालणे अनिष्ट आहे असाच संस्कृति-संगमातील सूर आहे. 'द्विजस्याब्धौ' या वचनात एकातिक सिद्धान्त सागितलेला आहे. ज्ञान कोठूनहि घ्यावें असा विकल्प नाहीं. जोश्याना तो विकल्प मान्य आहे म्हणून त्याना तें वचन टाळून 'अंगवंगकलिंगा'चें वचन पुढें करावें लागलें. समुद्रयानासंबंधीं जोशी यांचें मत अलीकडे थोडें नरम झालेले दिसतें. कारण 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' हें पुस्तक लिहिताना त्याची समुद्रयानासंबंधीं दृष्टि फारच कडक होती. परदेशात जाऊन स्थायी झालें असता **वंशनाश** होतो असा भडक सिद्धान्त तेथे त्यानीं माडला आहे. त्याचा सविस्तर परामर्श वाचकाना 'वादळी वारे' पृष्ठ ४० वर आढळेल.

असाच विपर्यास अनेक विषयासंबंधीं जोशी यानीं केला आहे. पुढील नवव्या प्रकरणातील प्राचीन भारतातील लोकशाहीसंबंधीं असाच घोटाळा जोशी यानीं केला आहे. अंक ३।५ यात ते लिहितात, "प्राचीन भारतांतील लोकशाही प्रकरणात केळकर सागतात कीं "या अवकाशात राजकारणातील अमुक एक प्रयोग आमच्याकडे व्हावयाचा राहून गेला असें झालें नाहीं (पान१८३), व पुढें राज्ययंत्र क्षत्रियाच्या अथवा सरदारांच्या हातून वाण्या-उदम्याच्या हातीं येणें ही शासनसंस्थेच्या **विकासांतील** अवस्था अद्याप आलेली नव्हती (पान ३१३). अशा तऱ्हेचे संगतवार सिद्धान्त आपणां

सर्वांना सुशिक्षित करणारें मुंबई विश्वविद्यालयच जाणे ! " जोशी यांनीं जी विसगति दाखविली आहे तिचा परिहार खुद्द संस्कृति-संगम पुस्तकातच स्पष्ट दिलेला आहे. तो जोशी यांनी पाहिला नसला तरी वाचकाना केव्हांहि काढून पाहता येण्यासारखा आहे. जोशी यांनीं उद्धृत केलेल्या वरील वाक्यातील ' शासनसंस्थेच्या विकासातील अवस्था ' या शब्दाकडे प्रथम लक्ष वेधलें पाहिजे. तें दिलें असता असें लक्षात येईल कीं, शासनसंस्थेच्या निरनिराळ्या प्रकाराचे प्राथमिक प्रयत्न प्राचीन हिंदुस्थानात झाले; विकासावस्थेतील झाले नाहींत. लोकशाहीचा प्राथमिक व लहान प्रदेशापुरता व्यास अशा स्वरूपाचा प्रयत्न प्राचीन हिंदुस्थानात झाला; पण कालांतरानें तो साम्राज्यशाहीच्या प्रयोगात नष्ट झाला. युरोपमध्ये असेंच झालें. ग्रीसमध्यें एकेका शहरापुरतीं छोटीं छोटीं लोकशाही संस्थानें कांहीं काल नांदलीं व कालांतराने साम्राज्यशाहीच्या लोंढ्यापुढें वाहून गेलीं. पण साम्राज्यशाही शिगेला पोंचल्यावर नष्ट झालेली लोकशाही फ्रान्समधील राज्यक्रांतीच्या आसपास पुन्हा विकसित स्वरूपात उसळून वर आली तो प्रकार मात्र हिंदुस्थानात झाला नाहीं. म्हणजे लोकशाहीचा संकुचित प्रयोग प्राचीन भारतात झाला पण तिचा विकसित प्रयोग अर्वाचीन भारतात झाला नाहीं असा पक्ष माडला आहे. आणि त्यात विसंगति कसलीहि नाहीं हें वाचकाच्या सहज लक्षात येईल. हा सर्व खुलासा संस्कृति संगमातच सापडेल. त्यातील पुढील वाक्यें पाहा : " कालांतराने द्वैराज्य, वैराज्य, गणराज्य वगैरे सर्व पद्धति साम्राज्यशाहींत बुडून गेल्या. पाश्चात्य राष्ट्राच्या इतिहासातही असाच प्रकार आढळतो. प्राचीन काळीं ग्रीसमध्यें लहान लहान लोकशाही स्वरूपाचीं राज्यें होतीं; पण राजशाही पद्धतीशीं झुंजण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां तीं निर्बल ठरलीं. त्यानंतर लोकशाही पद्धति जी गाडली गेली ती अठराव्या शतकांत बॅस्टाइल तुरुंग फोडून तिला बाहेर काढीपर्यंत दृष्टीस पडली नाहीं. त्यानंतर मात्र लोकशाहीच्या तत्त्वानें चांगलें मूळ धरले. मध्ययुगांत वाळून गेलेल्या लोकशाहीला युरोपात जशी नवी पालवी फुटली तसा मध्यंतरी वठून गेलेल्या लोकशाहीचा अवतार पुनश्च आजच्या संस्कृति-संगमावर दिसूं लागेल हें निश्चित होय" (पान १९७।९८) असा हा मूळ उतारा आहे. पण वर वर दिसणारी विसंगति-

दर्शक वाक्यें उद्धृत करणें जोशी याना सोयीचें होतें. परिहारदर्शक वाक्यें उद्धृत केलीं असतीं तर त्यावर टीका कशी करिता आली असती !

जोशी लिहितात, "केळकराना हात जोडून विनंति करावयाची कीं, तुम्ही भारतीय संस्कृतीबद्दलची सिद्धातावली तयार करा आणि त्या सिद्धातान्या मर्यादेंत लिहा. नाहीं तर एका प्रकरणात भारतीय संस्कृतींत लोकशाही संस्था होत्या असें सागून दुसऱ्या प्रकरणात लोकशाही संस्थाचा मुळींच उदय झाला नव्हता असे लिहिण्याचा प्रसंग येता ना." पण मौज अशी कीं, 'लोकशाही संस्थांचा मुळींच उदय झाला नव्हता असें संस्कृति-संगमात लिहिलेलेंच नाहीं. खुद्द जोशी यानींच जे वाक्य चार ओळींपूर्वीच उद्धृत केलें आहे तें असें कीं, 'राज्ययंत्र क्षत्रियाच्या हातून वाण्याउद्योग्याच्या हातीं येणें हीं शासनसंस्थेच्या **विकासांतील** अवस्था आपल्या देशात अद्यापि आली नाहीं. दोन ओळींपूर्वी हें वाक्य त्यानीं उद्धृत केले आहे आणि आता 'लोकशाहीचा मुळींच उदय झाला नव्हता' असें वाक्य मीं योजल्याचें माझ्या पदरीं बाधीत आहेत. म्हणजे माझी नसलेली विसगति दाखविण्याच्या घाईत स्वतःच विसंगत लिहीत आहेत ! लहान स्वरूपात लोकशाही प्राचीन युरोपात व प्राचीन भारतात दोन्हीकडे होती. पुढच्या काळात राजशाहींत ती दोहोंकडे लुप्त झाली. नंतर विकसितावस्थेत युरोपात प्रकट झाली; पण हिंदुस्थानात झाली नाहीं असें मीं प्रतिपादन केलें आहे आणि त्यात कोणतीच विसंगति नाहीं हें वाचकास सागावयास नकोच. लोकशाही होती आणि मुळींच प्रकट झाली नव्हती असलें विसंगत विधान मीं केलेलें नाहीं. जोशी यानीं वाचलें नाहीं त्याला माझा नाइलाज आहे ! तें वाचलें असतें तर मला विनंति करण्याकरिता हात जोडण्याचे कष्ट जोशी याना पडले ते पडते ना !

प्रकरण १२ व १३ यातील परामवाच्या मीमासेविषयीं जोशी लिहितात कीं, "हिंदूंनीं एकजुटीनें तोंड दिलें नाहीं म्हणून पराभव झाला असे केळकराचें म्हणणें आहे. पराभवाशीं युद्धशास्त्राचा काहीं संबंध येतो असें त्याना मुळींच वाटत नाहीं. युद्धतंत्र आणि युद्धातील हत्यारें याचा जयापयाशीं केळकराच्या मतानें फारच कमी संबंध असतो" (३।५।११५).

प्रतिपक्षानें न प्रतिपादिलेली मते त्याच्या गळ्यात बाधण्याचा शिरस्ता जोशी यानीं येथेंहि चालू ठेवला आहे. युद्धातील हत्याराचा जयापजयाशीं संबंध नसतो असें तर मी म्हटलें नाहींच पण ज्याची शस्त्रे प्रखर त्याचाच जय होतो असेंच उलट म्हटलें आहे ! आणि म्हणून पाश्चात्यांशीं टक्कर देणें असेल तर त्याचीं हत्यारें आणि त्या हत्याराच्या पाठीमागें असणारें शास्त्र हीं दोन्ही हस्तगत केलीं पाहिजेत असेंच मीं प्रतिपादन केलें आहे. संस्कृतिसंगम पान ३३९ वर मीं लिहिले आहे कीं, " ज्याचें शास्त्र त्याचे शस्त्र आणि ज्याचें शस्त्र त्याचे राज्य. ही प्रणाली अपरिहार्य आहे." पुन्हा पुढील पानावर लिहिले आहे : " पाश्चात्यांचें बळ त्याच्या श्रेष्ठ शस्त्रांत व शिस्तींत आहे हें हिंदूंनीं ओळखलें होतें " यापेक्षा अधिक स्पष्ट तें काय लिहावयाचें ! तरीही जोशी सुखेनैव लिहितात कीं, युद्धाच्या हत्याराचा व जयापजयाचा केळकरांच्या मतें फारच कमी संबंध असतो !

विपर्यासाचे आणखी काहीं मासले पाहा. जोशी लिहितात, ' एकदा नीतितत्त्वे मानल्यावर आपल्या सोईकरिता त्याना मुरड घालावी हें केळकरी मतलबी तंत्र भारतीयांना कसेंसेच वाटतें' (३।५।१०९). येथेंहि वाचकाना सांगितलें पाहिजे कीं, सोईकरिता मुरड घालावी असे मीं प्रतिपादन केलेलें नसून जोशी माझ्या पदरीं तें निष्कारण बांधीत आहेत. मुळातील पुढील वाक्यें पाहा : " जो धर्म शरणागतास अभय देण्यास सांगतो तोच धर्म आततायीला जिवंत सोडूं नये असेंहि सांगतो ना ? मग पहिल्याची आठवण व्हावी आणि दुसऱ्याची विस्मृति का पडावी ? " हीं मूळचीं वाक्यें. वाचक हो, या वाक्यांत नीतिनियमाना सोईकरिता मुरड घालावी असलें मतलबी तत्त्वज्ञान सांगितलेलें आहे का ? हिंसा आणि अहिंसा या दोन्ही तत्त्वाची सांगड प्राचीन भारतीयानींच घातलेली आहे. जी मनुस्मृति धर्माचें लक्षण सांगताना 'अहिंसा सत्यमस्तेयं' अशा श्लोकात अहिंसेला पहिलें स्थान देते तीच मनुस्मृति ' आततायिनं आयान्तं हन्यादेव अविचारयन् ' असा दण्डक घालून देते. यात विसंगतीहि नाहीं आणि केळकरी मतलबी तंत्रहि नाहीं. तर भगवद्गीतेंत प्रतिपादिलेला श्रेष्ठ कार्याकार्यविवेक आहे. भगवंतानीं अर्जुनाला युद्धासच प्रवृत्त केलें. पण त्यावरून त्यांना अहिंसा हें नीतितत्त्व अमान्य होतें असें तुम्ही म्हणाल काय ?

भगवद्गीताकार व मनुस्मृतिकार याच्या प्रतिपादनात विसंगति नसून कार्याकार्यविवेक आहे. त्याचाच अनुवाद संस्कृतिसंगमात केला आहे. त्यात केळकरी मतलबी तंत्राचा काहीं संबंध नाहीं. मनुस्मृति व भगवद्गीता यातील कार्याकार्यविवेक जोशी याना मान्य नसल्यास त्यावर टीका करण्यास ते स्वतंत्र आहेत. पण सोईकरिता नीतिनियमाना मुरड घालावी असें संस्कृतिसंगमात कोठेंहि प्रतिपादन केले नसता तें निष्कारण माझ्या पदरीं जोशी बाधीत आहेत. तसें बाधल्याशिवाय टीका करणें अवघड आहे.

न प्रतिपादिलेलीं मतें दुसऱ्याच्या गळ्यात बाधण्याचा आणखी एक प्रकार पहा. जोशी लिहितात, " प्राचीन परंपरेतील बालविवाह, मद्यपान-निषेध, व्रतें-वैकल्यें टाकून दिल्याने राजकीय स्वातंत्र्य मिळूं शकतें असें केळकर अगर इतर दुसरे कोणीं यानीं सिद्ध केले आहे काय ! " इतर कोणाच्याकडे मला लक्ष द्यावयास नको. पण जोशी माझ्या गळ्यात बाधतात असा सिद्धात मीं कोठेंच माडलेला नाहीं. जोशी यानीं तो अवश्य काढून दाखवावा. पुन्हा ते लिहितात कीं, " केळकराना असा प्रश्न आहे कीं, आम्ही पहाटे उठून स्नानसंध्या करतो त्यामुळे आमच्या राजकीय क्षेत्रातील काम करण्याच्या शक्तीवर कोणता हानिकारक परिणाम झाला ! " (३।५।११८) पण असा परिणाम होतो असे केळकरानें प्रतिपादन केले आहे कोठें ! मग उगाच भुई झोडपण्यात हशील काय ! तुम्ही संध्या करता कीं नाहीं हें केळकर विचारीत नाहीं. पण तुम्हास राजकीय स्वातंत्र्य मिळवावयाचे असल्यास व तें टिकवावयाचें असल्यास भौतिकशास्त्राचा अभ्यास पाश्चात्यांच्या बरोबरीनें केला पाहिजे असें मात्र केळकराचें मत आहे; व तें त्यानें स्पष्टपणें माडलें आहे. तेव्हा त्या मताचें खंडन काय करावयाचें असेल तें अवश्य करा. पण तेंच नेमके जोशी टाळीत आहेत.

जुटीची भावना आपणांत कमी होती असें मीं प्रतिपादन केलें आहे. त्यावर जोशी लिहितात कीं, ' ही साफ खोटी गोष्ट ' व नतर कनोजच्या जयपाळानें सबक्तागिनाच्या विरुद्ध लढताना हिंदु राजाची जूट कशी घडवून

आणली होती; तसेंच महमद गझनीच्या विरुद्ध आनंदपालानेंहि हिंदु राजाची एकी कशी केली होती याचे स्मिथच्या इतिहासातील उतारे दिले आहेत. पण समकालीन तवारिखकाराचा आधार नसलेलें व विसंगतीनें भरलेलें स्मिथचें हे विधान खोटें आहे असें प्रो. दे. माडारकर यांनीं दाखवून दिलें आहे याची दखलगिरी जोशी यानीं घेतली आहे काय ! महंमदाच्या विरुद्ध ज्या हिंदु राजाची जूट झाली त्यात अजमेरच्या राजाचें नाव स्मिथ देतो. पण माडारकर म्हणतात कीं, हें राज्यच मुळीं महमदानंतर शंभर वर्षांनीं अस्तित्वात आलें ! समकालीन उत्बी याच्या लेखात या हिंदु राजाच्या जुटीचा मुळींच उल्लेख नाहीं. स्मिथचा आधार फेरिस्ता. पण तो समकालीन नाहीं. (माडारकर ॲनल्स खड ११ पृ. १३०.) मांडारकराचा लेख जोशी यानीं कदाचित् पाहिला नसेल. पण चिंतामणराव वैद्याचा ग्रंथ तरी चाळला असेल ना ? चिंतामणराव वैद्यही लिहितात कीं, " हिंदुस्थानने एकत्र होऊन केलेल्या या शेवटच्या प्रयत्नाचें फेरिस्तानें फारच अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केले आहे. पण समकालीन उत्बीने या प्रयत्नाला अशा तऱ्हेचें व्यापक स्वरूप दिलेलें नाहीं. " (मध्ययुगीन भारत भा. ३ पृ. ६५). जूट नसलेलीं मीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. सिंध काबीज केला गेला तो फंदफितुरीवर. प्रतिहारी आणि राष्ट्रकूट याचे बिनसले तेव्हा मुसलमानाना राष्ट्रकूटाची सहानुभूति मिळाली. चाहमान आणि गहडवाल याचे बिनसलें तेव्हा गहडवालानें शहाबुद्दीन यास स्वारी करण्याविषयीं गुप्त निरोप पाठविला. पेशवाईच्या शेवटच्या काळात शिंदे-होळकर आपआपसात लढले व परक्यांना घरात शिरूं दिलें. अशीं उदाहरणे दिलीं असता तीं न खोडता जुटीची भावना नव्हती हें विधान 'साफ खोटें' आहे म्हणून शेरा मारून जोशी मोकळे ! या बाबतींत जोशी यांना इतिहासकाराचा आणखी पुरावा पाहिजे असल्यास त्यानीं ज्या इतिहासकाराचा आपल्या लेखात उल्लेख केला आहे त्या ईश्वरीप्रसाद याचीं पुढील वाक्यें त्यांनीं नजरेखालीं घालावीं. मुसलमानाचे पाय हिंदुस्थानात कसे रोवले गेले याविषयीं ते लिहितात : Though numerically the Hindus were superior to their invaders their inability to make common cause

against their enimies frustrated their designs. Where a confederacy was organised its members often fell out among themselves. The need of defending their homes drew them together but self-interest predominated over the interests of Hindustan. (*History of Medieval India p. 83.*) जोशी ज्याचा हवाला देतात त्या इतिहासकाराचा हा शेरा आहे. जुटीची भावना नव्हती हें माझ्या पदरचें नाहीं.

असो. वरील विवेचनावरून जोशी यानीं घेतलेले आक्षेप कसे निराधार व विपर्यस्त आहेत हें वाचकाच्या लक्षात येईल.

गेल्या दोन अंकात मिळून 'समाजजीवन' या मासिकात आलेल्या परीक्षणातील विवाद्य विषयाचें विवेचन केलें. आता या अंकात आणखी दोनतीन परीक्षणातील काहीं मुद्याची चर्चा करितों.

प्रथम महाराष्ट्र-साहित्यपत्रिकेतील परीक्षण घेतों. हे परीक्षण रावसाहेब ना. गो. चापेकर या ज्येष्ठ साहित्यिकानीं लिहिलेलें आहे. माझ्या पुस्तकाविषयीं त्याचा अभिप्राय असा आहे कीं, " पुस्तकात माहितीची रेलचेल आहे, भाषेत अनुरंजकता आहे, विचारसौष्ठव आहे, आणि हात अंधश्रृंखलानीं निगडित झालेला नाहीं. पण 'संस्कृति-संगम' या विषयाचें विवेचन मात्र या बहुमोल ग्रंथात आढळत नाहीं." हा अभिप्राय लेखकाला चागलाच डोळे चोळून पाहावयास लावणारा आहे. 'संस्कृति-संगम' नांव असलेल्या पुस्तकात इतर अनेक गोष्टी असल्या पण संस्कृति किंवा संगम दोन्ही नसेल तर पुस्तकाचा मुख्य उद्देशच विफल झाला असें म्हटलें पाहिजे. चापेकराचा अभिप्राय तोच दिसतो. कारण परीक्षणाच्या शेवटी ते लिहितात कीं, "पुस्तकात संस्कृतीहि नाहीं व संगमहि नाहीं." इतर कोणाच्या लेखणीतून असलें विधान बाहेर पडलें असतें तर त्याकडे लक्ष देण्याचें कारण नव्हतें. पण एका पोक्त वयस्क साहित्यिकानें केलेलें हें विधान वाचून मला शंका आली कीं पुस्तक लिहितांना मी झोपेंत तर नव्हतों ना! एरवीं संस्कृति-संगम या विषयावर लिहावयास घेतलें पण संस्कृति व सगम या दोन्हीविषयीं कांहीं न लिहितां पुस्तक पुरें केलें हा

प्रकार झाला तरी कसा ! म्हणून पुस्तक पुन्हा चाळून पाहिलें, अभिप्राय परत वाचून पाहिला, पण परीक्षणकाराला काय म्हणावयाचें आहे याचा उमज पडेना.

थोडा विचार केल्यावर वाटूं लागलें कीं, इतके निपटून ज्या अर्थी चापेकरानीं लिहिलें आहे त्या अर्थी संस्कृति आणि संगम या दोन्ही शब्दांपाठीमागें असणाऱ्या कल्पनाविषयीं चापेकरांच्यात व माझ्यात अगदीं मूलग्राही असा मतभेद असला पाहिजे.

अर्थात् हा मतभेद नीट समजावून घ्यावा म्हणून चापेकराचें परीक्षण मीं बारकाईनें वाचून पाहिले व अन्यत्रही चापेकरानीं संस्कृतीविषयीं काय लिहिलें आहे हेही थोडें चाळलें. पण पाहतो तों चापेकराच्या व माझ्या संस्कृतिविषयक कल्पनेंतही महत्त्वाचा असा कोणताच फरक नाहीं ! तेव्हा त्याच्या अभिप्रायातलें मर्म मला उमगलें नाहीं हें कबूल केलें पाहिजे.

संस्कृति या शब्दानें व्यक्त होणारी माझी कल्पना मीं प्रस्तावनेच्या सुरवातीलाच माडली आहे. ती म्हणजे बाह्यसृष्टि व अंतःसृष्टि याच्यावर मानवानें जो काहीं जय मिळविलेला आहे त्याचें संकलित स्वरूप म्हणजे त्याची संस्कृति. आता चापेकराच्या मतें संस्कृति कशाला म्हणतात हें पाहूं लागलों तर त्याचें मत फारसें भिन्न दिसत नाहीं. ते लिहितात, "पदार्थाच्या अंगीं निसर्गतः वसत असलेल्या गुणाचा उपयोग करून मनुष्य आपल्या बुद्धीच्या प्रभावानें नवी सृष्टि तयार करतो. हिला आधिभौतिक सृष्टि म्हणतां येईल. अशा संस्कृतीचें जें फल त्याच्यावर अखिल मानवजातीचा हक्क असतो व त्या फलाची देवाण-घेवाण अपरिहार्य आहे. संस्कृतीचें दुसरें कार्य वैचारिक होय. या प्रकारात विवेकशक्तीचा उपयोग करून तो काहीं निष्कर्ष काढीत असतो. या बाबतींतहि देवाण-घेवाण चालत आलेली आहे." येथपर्यंत चापेकरांच्या विचारसरणींत व संस्कृति-संगमांतील विचारसरणींत फरक आढळत नाहीं. तेव्हां आणखी पुढें पाहूं. पुढें ते लिहितात कीं, " संस्कृति बुडाली हा जो लौकिकरीत्या आक्रोश केला जातो तो आचारासंबंधीं होय. या दृष्टीनें आचारशास्त्राची चर्चा

करणें अवश्य होतें " यावरून संस्कृति म्हणजे प्राधान्यानें आचार असा ते दुसरा एक अर्थ घेत असावेत व या भूमिकेवरून 'सस्कृति-संगमां'त संस्कृति नाहीं असा आरोप करीत असावेत असे वाटूं लागले व मतभेदाचा तळ येथें थोडा पायाला लागूं लागला म्हणून समाधानही वाटलें. पण तेंहि टिकावयाचे नव्हतें. कारण वरील वाक्यात आचाराला दिलेलें महत्त्व पुढील काहीं वाक्यात त्यानींच स्वतः कादून घेतलें आहे. ते लिहितात, " काहीं आचार भौगोलिक परिस्थितीवर अवलबून असतात. उदाहरणार्थ, थंड प्रदेशातील व उष्ण प्रदेशातील आचार परस्परविरोधी असतात. ह्याची देवघेव होणे शक्य नाहीं." मीहि असल्या देवघेवीचीं उदाहरणें दिलीं नाहींत. नंतरच्या वाक्यात चापेकर लिहितात, " आचार परिस्थितीनुरूप बदलत असल्याने एकंदरींत **आचारांचा विचार गौण ठरतो.**" आचाराचा विचार जर गौण आहे तर त्याला महत्त्व न दिल्याबद्दल संस्कृति-संगमकाराला दोष का दिला आहे कोण जाणे !

आचार म्हणजेच काय ती संस्कृति असें चापेकराचेही मत नाहीं हे वर दिलेच आहे. श्री. दा. ना. आपटे याच्या 'हिंदी-सुमेरी-संस्कृति' या पुस्तकाचें परीक्षण करताना चापेकरानीं संस्कृतीचें वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे: "कोणत्याहि समाजाची प्रगति हीच त्याची संस्कृति होय. आपल्या बुद्धिसामर्थ्यानें मनुष्य एक प्रकारची जडसृष्टि निर्माण करतो, घरें बाधतो, वस्त्रें विणतो, शेती करतो वगैरे. हेंच त्याचें सास्कृतिक कर्म" (साहित्य-समीक्षण पृ. २३). संस्कृति-संगमातील सस्कृतीचें वर्णन अशाच धर्तीचे आहे. तेव्हा संस्कृतिविषयक कल्पना चापेकराची माझ्याहून काहीं निराळी आहे का म्हणून पाहता, तसें काहीं दिसत नाहीं. मग माझ्या पुस्तकात संस्कृति नाहीं असें जें चापेकर चक्क लिहितात त्याचा अर्थ काय ? चापेकरच जाणोत !

संस्कृति आणि संगम या दोन शब्दापैकीं पहिल्याचा विचार केला. आता संस्कृतीच्या संगमाविषयीं चापेकराचे काय म्हणणें आहे तें पाहूं. आधिभौतिक व वैचारिक अशीं जीं त्यानीं संस्कृतीचीं दोन अगें मानलीं आहेत त्या दोहोंच्याही बाबतीत देवाण घेवाण भिन्न संस्कृतींत होत असते हें त्याना मान्य आहेच. मग मतभेद कोठें ? तर ते लिहितात, " संगम न

होताहि संस्कृति सर्वत्र पसरत रहाणार. तो तिचा स्वभावच आहे. या कारणास्तव पुस्तकाचा विषयच आम्हास समजत नाहीं. जगात जी देवघेव होते ती मनुष्याच्या अनुकरणप्रियतेनें होत असते. या देवघेवीकरिता संगमाची आवश्यकता असतेच असे नाहीं." मी तर देवाण-घेवाण यालाच पर्याय म्हणून संगम हा लाक्षणिक शब्द वापरीत आहे व दहाव्या प्रकरणाला 'प्राचीन संगमावरील देवाण-घेवाण' असे नावच स्वच्छ दिले आहे. देवाण-घेवाण मान्य आहे पण संगम मान्य नाहीं यातील सूक्ष्म फरक काय ! संगम म्हणजे राजकीय आक्रमण असें चापेकराना म्हणावयाचे असल्यास देवाण-घेवाणीला राजकीय आक्रमणाची जरूर नाहीं असेंच मींहि प्रतिपादिले आहे व जपानचा दाखलाहि दिला आहे (पा. ३ पहा). देवाण-घेवाण त्यांना मान्यच आहे. फक्त चापेकराचे म्हणणे कीं, प्रसरण पावणें हा संस्कृतीचा निसर्गतःच स्वभाव असल्याने ती अनुकरणबुद्धीने आपोआपच पसरेल. कबूल. आपोआप पसरून जरी दोन संस्कृतींत देवाण-घेवाण झाली तरी त्या देवाणघेवाणीला लाक्षणिक रीत्या, अलंकारिक रीत्या, संगम हें नाव देणें चूक होईल काय ! मला तरी असे वाटत नाहीं. संगम हा शब्द मुळात नद्याच्या एकत्र येण्याला लावितात. तो लक्षणेनें येथे संस्कृतींच्या एकत्र येण्याला लाविलेला आहे. नद्याचे जल एकमेकात घुसते तशीच दोन संस्कृतींतील काहीं गोष्टींची देवाण-घेवाण होते हे या दोहोतील साधर्म्य. या साधर्म्यावर लक्षणा आधारलेली आहे. आणि साधर्म्यावर लक्षणा आधारणें हा मार्ग शिष्टसंमत आहे. दोहोंमध्ये साधर्म्यच नसेल तर लक्षणा लटकी पडेल. एरवीं नव्हे. चापेकर म्हणतात, "प्रसरण पावणे हा संस्कृतीचा धर्मच आहे." मान्य. सखल दिशेने वाहत जाणे नदीचा धर्म आहे. या अशा दोन नद्या आपआपल्या प्रकृतिधर्माप्रमाणें वाहत असतां एकत्र आल्या म्हणजे संगम होतो. तोच न्याय संस्कृतीस लागू. प्रसरण पावणें हा संस्कृतीचा धर्म आहे ना ? मग अशा दोन संस्कृति प्रसरणवशात् एकत्र आल्या असता व त्याच्यात देवाण-घेवाण सुरू झाली असता त्या प्रकारास संगम हा शब्द लावण्यास हरकत कोणती ? आणि ती नसेल तर पुस्तकाचा विषयच आम्हास समजला नाहीं असें जे चापेकर लिहितात त्याचा अर्थ काय ? तेच जाणोत !

दुसरे असे कीं प्रसरणशीलता हा संस्कृतीचा स्वभावधर्म असला तरी जित आणि जेत्याच्या सस्कृतीची गाठ पडली असता देवाण-घेवाणींत काय ठेवायचे, काय घ्यायचें याचा संभ्रम पडतो व म्हणून त्याचें विवेचन करावें लागते. चापेकरच पुढे लिहितात, "जित आणि जेते याचा सबंध आला म्हणजे जिताकडून दासवृत्तीने अनुकरण होत असतें. इंग्लिशाचा व हिंदूंचा आज दीडशें वर्षे 'संगम' झालेला आहे. या कालात हिंदूंचें इंग्लिशानीं काय घेतले याचे उत्तर केळकरानीं दिलेले दिसत नाहीं." चापेकरानीं नीट वाचलेले दिसत नाहीं. एरवीं 'देवाण-घेवाण' या प्रकरणात सस्कृत भाषेतील विचारसंपदेचा केवढा खोल ठसा पाश्चात्य विचारवंताच्या मनावर उमटला आहे त्याचे जे चित्र रेखाटले आहे ते त्याच्या नजरेतून सुटतें ना. आपला व पाश्चात्याचा संगम हा जित-जेत्याचा सगम होय. अशा स्थळीं जेत्यानीं जितापासून काहीं शिकावे अशी फारशी अपेक्षा नसते. असे असताही संस्कृत भाषेतील ग्रथवैभवाने शोपेनहार, नित्शे, गटे, इमरसन मारून जावेत किंवा मॅक्स मुल्लर, रोमॉ रोलॉं, जोड यानीं रामकृष्णपरमहस, विवेकानद, राधाकृष्ण याच्या चरित्रावर व तत्त्वज्ञानावर ग्रथ लिहावे याला काहींच अर्थ नाहीं का? जित आणि जेते याच्या मीलनाला सगम हे नाव देण्यास मन का कचरते हे मी जाणतो. पण सर्व जगाच्या सस्कृतिच सध्याच्या दळण-वळणाच्या साधनाने एकाच वळणावर जाणार आहेत या गोष्टीला अनुलक्षून संगम हा शब्द वापरला आहे, व त्याचा खुलासाही पहिल्याच प्रकरणात करताना लिहिले आहे, 'पाश्चात्य सस्कृतीच्या व आर्य संस्कृतीच्या सगमावर मनोहर देखावा दिसूं लागेल असे म्हटलें ते त्या देखाव्याच्या उत्तर-रूपाला अनुलक्षून. सर्व जगाची मिळून एक सस्कृति पुढेमागें होणार आहे हे चापेकरानाही मान्य आहे. या बाबतींत माझी भूमिका मीं पहिल्या प्रकरणात स्पष्ट केली आहे. ती अशी कीं, जित आणि जेते एकत्र आले असता प्रथम झगडाच होतो. तो झगड्याचा काल अद्यापिहि संपलेला नाहीं. पण कालातराने या झगड्याला सगमाचें स्वरूप प्राप्त होणार आहे. कारण पाश्चात्याचें शास्त्र आणि लोकशाही हीं आपणाला स्वीकारावीं लागतील. (खरें म्हणजे या दोन्ही गोष्टींची बुजलेली आठवण आपणाला

ताजी करावी लागेल. कारण भौतिक शास्त्रोपासना व लोकशाही या गोष्टी पूर्व अपरिचित नव्हत्याच.) व आपली सहिष्णु आणि समाधानी वृत्ति पाश्चात्यांन आत्मसात् करावी लागेल. तात्पर्य, संगम शब्द वापरण्यात आजच जित आणि जेते याचा पूर्ण मिलाफ झाला आहे असें गृहीत धरलेले नाहीं. सध्याच्य आक्रमणाचे व झगड्याचे रूपांतर संगमात होणार आहे असा आशावाद मात्र आहे. प्रास्ताविक पहिल्या प्रकरणात मीं लिहिले आहे कीं, ' पाश्चात्त व भारतीय या संस्कृतींच्या भेटीचे प्राथमिक स्वरूप झगड्याचे आहे असले तरी, पाश्चात्य संस्कृतीच्या काही गोष्टींना आपल्या घरीं नांदवून घ्यावे लागेल. म्हणजे अंतीं ते तडजोडीचें ठरेल ' (पृ. ४).

पुढे चापेकर दुसरा मुद्दा काढतात तो असा कीं, " जित जेत्यांच्य संबंधापासून थोडासा फायदा होईल पण तोट्याचें माप कोणी करून पाहावे ? " मीहि फायद्याच्या भूमिकेवरून लिहिलेले नाहीं तर पाश्चात्यांचीं भौतिक शास्त्रे आत्मसात् करणे जीवनकलहात टिकून राहण्याला अवश्यमेव म्हणून. जेत्यांच्या उर्मटपणाचा तर मीं निषेधच केलेल आहे. सध्याच्या इतिहासाचा ओघ पाहता सर्व संस्कृति एकरूप होत चालल्य आहेत व त्यातून माणुसकीचा धर्म निष्पन्न होणार आहे हे चापेकरांनीच लिहिले आहे. 'हिंदूंच्या सामाजिक संस्था' या पुस्तकाच्या परीक्षणात चापेकर लिहितात कीं, " जगभर हिंडण्याचे प्रवाससौख्य प्राप्त झाले असत कोणतीहि संस्कृति अबाधित राहणें शक्य नाहीं. अशा स्थितींत जगाच एकच धर्म होईल आणि तो म्हणजे माणुसकी हा होय" (म. सा प. अंक ५६). मला तरी यापेक्षा निराळे काय म्हणावयाचे आहे ? तात्पर्य संस्कृति आणि संगम या दोन्ही कल्पनाविषयीं म्हणण्यासारखा मतभेद नसता पुस्तकात संस्कृतीहि नाहीं व संगमहि नाहीं असा शेरा चापेकरांनी का मारला आहे हे मला तरी समजत नाहीं !

(३)

मुंबई साहित्य-संमेलनाच्या ७ व्या अधिवेशनासंगीं साहित्यसंघाने जो वाङ्मय-परिचय प्रसिद्ध केला आहे त्यात प्रो. भाटवडेकर यांनीं 'संस्कृति संगम' पुस्तकाचा परिचय करून दिला आहे. त्यातील एक दोन मुद्द्या

कडे आता वळतों. ते लिहितात कीं, " संस्कृति या विषयाचा कोणत्याहि दृष्टीने विचार करावयाचा म्हटला म्हणजे ती निर्माण कशी होते, तिच्या उत्पत्तिस्थितिलयासबंधीं काहीं नियम ठरविता येतात कीं काय, इत्यादि जे मूलगामी प्रश्न अपरिहार्यपणे उत्पन्न होतात त्याचा विचार या ग्रंथात कोठेहि केलेला नाहीं. " यावर मला येवढेच म्हणावयाचे आहे कीं माझ्या पुस्तकाचे नाव 'मानवी सस्कृतीचा इतिहास', 'सस्कृतीचे उत्कर्षापकर्ष', 'संस्कृतीचा उद्गमविकास' अशासारखे काहीं ठेवले असतें तर वरील प्रश्न अवश्य व अपरिहार्य ठरले असते. पण मीं दोन सस्कृतींची– म्हणजे पाश्चात्य व भारतीय याची– गाठ पडलेली आहे व त्या प्रसगीं जे प्रश्न उत्पन्न होतात त्याचाच प्रामुख्यानें विचार केलेला आहे. आणि पाश्चात्यांचें भौतिक शास्त्र व लोकशाही या गोष्टी आत्मसात् करणें अपरिहार्य असल्यानें त्या स्वीकारण्यास मनोवृत्ति तयार व्हावी म्हणून दोन्ही सस्कृतींतील उपेक्षणीय भागाकडे लक्ष वेधले आहे. संगमावर उत्पन्न होणाऱ्या प्रश्नाचा येथे विचार कर्तव्य आहे; उगमाचा व लयाचा नव्हे. म्हणून सगम हे नाव दिलेले आहे. माझी भूमिका काय आहे ती प्रस्तावनेत मीं खुलासेवार माडलेली आहे. त्यात संस्कृतीच्या सर्ग-स्थिति-लयाचा तात्त्विक विचार मी माडणार आहे अशी भूमिका घेतली असती आणि पुस्तकात मात्र तशी माडणी केली नसती तर वाचकाच्या अपेक्षाचा भग केल्याच्या पातकाचा धनी मी ठरलो असतो. अशा प्रकारच्या अपेक्षा चेतवण्यासारखे प्रस्तावनेत मीं काहीं लिहिलेले नाहीं. आता प्रस्तावनेतील माझी भूमिका वाचून ती मुळातच आकुंचित आहे, किंवा विषय निवडण्यातच मीं चूक केली, असे वाटल्यास तसे म्हणणे रीतीस धरून होईल. पण भलत्याच अपेक्षा जागृत करून त्या मीं सफल केल्या नाहींत म्हणून नाक मुरडणें योग्य नाहीं.

भाटवडेकर पुढें लिहितात कीं, " कोणतीहि संस्कृति विशिष्ट भौतिक परिस्थितीवर अवलबून असते. ती निर्माण होण्यापूर्वी आवश्यक परिस्थिति निर्माण व्हावी लागते. शास्त्रीय संस्कृतीला अनुकूल परिस्थिति निर्माण करावयाची तर, म्हणजे हिंदुस्थानांत औद्योगीकरण संपूर्ण अंमलात आणावयाचे तर, ती निर्माण झाल्यावर आपले आचारविचार किती बदलून

जातील यांचें भविष्य आज कसे करतां येईल ? जपानने पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान आत्मसात् केले त्याबरोबर त्याचे दुर्गुणहि स्वीकारले नाहींत काय ? " याविषयीं दोन गोष्टी सांगावयाच्या. पहिलें असें कीं हिंदुस्थानचें भवितव्य जगाच्या भवितव्याशीं निगडित झाले असल्यानें हिंदुस्थानचे औद्योगीकरण झाले पाहिजे व झाल्याविना राहणार नाहीं. हा प्रश्न आता वादाच्या कक्षेंत राहिलेला नसून औद्योगीकरण हें काँग्रेसनें नेमलेल्या राष्ट्रीय नियोजनसमितीनेंहि गृहीतच धरलेले होतें. या औद्योगीकरणानंतर त्याच्या अनुरोधाने येणारे दोषहि येणार नाहींत असे नाहीं. पण हे दोष कसे टाळावयाचे हा प्रश्न आता सर्वच राष्ट्रापुढे येऊन पडलेला आहे. औद्योगीकरणानंतर संपत्तीचें वाटप अधिकाधिक विषम होत चाललें. या दोषावर उतारा म्हणून साम्यवादाचा प्रयोग करून पाहिला जात आहे. शहरात कारखान्याची खेचाखेच झाल्यानें तेथील आरोग्य बिघडूं लागलें. यावर उपचार म्हणून वाफेच्या शक्तीऐवजीं जलोद्भव विद्युच्छक्ति वापरून कारखाने रेल्वेच्या दोन्ही बाजूंला लाबवर पसरलेले असे उभारणे याचा प्रयोग करता येण्यासारखा आहे वगैरे. औद्योगीकरणाच्या पोटीं सर्वांत घातुक दोष उत्पन्न झाला आहे तो संहारक शस्त्राची निर्मिति हा होय. हा दोषानुर सर्व जगाच्याच पुढे आता विक्राळ रूपानें उभा आहे. संहारक शस्त्राची वाढ आजच्या वेगाने चालू राहिल्यास मनुष्यजातिच मुळात नाहींशी होणें अशक्य नाहीं. पण तसें होण्यापूर्वी ज्या लोभी वृत्तीच्या पोटीं ही वाढ होत आहे त्या लोभी वृत्तीला तो वेसण घालूं शकेल अशा आशेवरच आज सर्वत्र जागतिक पुनर्घटनेची भाषा बोलली जात आहे. मग तीच आशा हिंदुस्थानने का बाळगूं नये ? म्हणजे औद्योगीकरण तर स्वीकारूं पण दोष तर टाळूं असा प्रयोग करून पाहण्याची हिंमत हिंदुस्थानानें का धरूं नये ? दुसरा एकच विकल्प म्हणजे साध्य झालेले शास्त्र आणि यंत्र मानवाने फेकून द्यावें हा होय. पण ही गोष्ट अशक्य दिसते. जपानने पाश्चात्यांचे शास्त्र उचलले व दोषहि उचलले. पण पुढच्यास ठेच मागचा शहाणा या न्यायाने काहीं बोध घेता येणार नाहीं का ? निदान शास्त्र घेऊन त्याच्या अनुषंगाने येणारे दोष कसे टाळावयाचे याचे प्रयोग तरी करीत राहिलें पाहिजे ना ? रशियातील साम्यवाद स्वीकारावयाचा

म्हणजे तेथील दडपशाहीच्या उग्र स्वरूपाचें अनुकरण अपरिहार्यच ठरेल का हेही प्रयोगानेंच ठरणारें आहे. रशियानेहि अनुभव येत गेला तसतसा आपल्या धोरणात योग्य तो बदल केला. गर्भपात, घटस्फोट, व्यभिचार या विषयात आरंभीं पूर्ण स्वातन्त्र्य होतें ते आता नियत्रित केले आहे असे म्हणतात. तेव्हा रशियाच्या या अनुभवाचा आपणास काहींच फायदा होणार नाही का ? असो.

(४)

'आदेश' पत्राच्या ३०।५।४२ व ६।६।४२ च्या अकात श्री. बाळशास्त्री हरदास यांचें परीक्षण आलेले आहे. त्यात ते लिहितात, "'आध्यात्मिक युरोप' व 'आसुरी भारत' हीं दोन प्रकरणे वाचलीं म्हणजे लेखकाची कींव करावीशी वाटते. काश्मीरच्या राजापैकीं चार दोन जुलमी राजाचीं उदाहरणे दिल्यानें काम कसे भागणार ?" चार दोन राजाचीं उदाहरणे असा शब्दप्रयोग वापरून आसुरीपणाचा देखावा हरदास बुद्धयाच सौम्य करीत आहेत. चार-दोन किरकोळ उदाहरणाचा प्रश्न असता तर मीही त्याला महत्त्व दिले नसते. पण आसुरी लीलाचीं एक नव्हे अनेक उदाहरणे दिलीं आहेत तीं वाटल्यास त्यानीं खोडून काढावीं आणि मग माझी कींव करावी. तीं उदाहरणें का दिलीं याचाहि मीं खुलासा केला आहे कीं, संस्कृतीचे मूल्यमापन करताना ध्येये आणि व्यवहार हीं दोन्ही लक्षात घेतलीं पाहिजेत. ध्येयें उच्च होतीं एवढ्याचकरिता सस्कृति उच्च मानावयाची झाली तर शत्रूवरहि प्रेम करावयास शिकविणाऱ्या खाइस्टची संस्कृति कोणत्या तोडाने तुम्ही आसुरी म्हणणार ? तिला आसुरी म्हटले जातें ते त्या संस्कृतींत वाढलेलीं राष्ट्रे खाइस्टच्या ध्येयाचा व्यवहारात आज खून पाडीत आहेत म्हणून. आमच्याइकडच्या सत्ताधीशानींहि तेंच केले. आमचींहि ध्येये उंच होतीं पण सत्ताधीशानीं त्याची कशी धूळधाण केली हें दाखविण्याकरिता 'आसुरी भारत' हें प्रकरण लिहिले आहे. पंडित कोकजेशास्त्री याचाही 'आसुरी भारत' या प्रकरणावर अशाच प्रकारचा आक्षेप आहे. ते लिहितात, केळकर याचे ' सस्कृति-सगम ' हें पुस्तक चागलेंच गाजलें. अनेक आघात-प्रत्याघातातील टाकीचे घाव सहन

करून आजची भारतीय संस्कृति घडविली गेली आहे हे त्यात चांगल्या प्रकारे दर्शविलें आहे. मात्र भारताच्या एका कोपऱ्यातील एखाद्या राजवंशाचें भेसुर चित्रण करून त्याच्या आधाराने भारतीय सर्वसामान्य जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याची पद्धत तर्कदुष्टच म्हणावी लागेल. बुद्धानें यौवराज्याचा, अशोकानें साम्राज्याचा, आणि हर्षवर्धनाने संपत्तीचा त्याग केला त्यास जगाच्या इतिहासात तोड मिळणार नाहीं. या महनीय त्यागाचें उदाहरण सतत पाहणारी जनता त्यागमय जीवनास आदरणीय म्हणून मान देऊं लागणे स्वाभाविक होते. ऐवढा एक दोष सोडून दिल्यास ग्रथकाराचे विवेचन मान्य होण्यासारखेच आहे. (मराठी साहित्य १९१४-४४ कोकजे याचा लेख पृ. ६६.) या बाबतींत वाचकाना सागावयास नकोच कीं बुद्ध, अशोक, हर्षवर्धन या थोर पुरुषाचा कोकजे यानीं जितक्या गौरवाने उल्लेख केला आहे तितक्याच गौरवाने मीही केला आहे. आसुरी भारत उठून दिसावे म्हणून तो गाळलेला नाहीं. पण अशीं उदाहरणे सतत लोकाच्यापुढे होतीं असे इतिहास सागत नाहीं. तसेच काश्मीरचे राज्य कोपऱ्यातलें येवढ्यावरून आसुरी भारताची बोळवण कोकजे करीत आहेत यावरून इतर प्रातातील उदाहरणाकडे त्याचे दुर्लक्ष झाले असावे असें दिसते. कारण हर्षचरितात स्कंदगुप्ताच्या तोडीं घातलेली विश्वासघाताची जीं उदाहरणे दिलीं आहेत तीं श्रावस्ती, वत्स, अश्मक, मगध, कलिंग, काठेवाड, आंध्र, गया अशीं सर्व काश्मीरच्या बाहेरच्या भिन्न भिन्न प्रातातील आहेत. हीच यादी थोड्याफार फरकाने कौटिल्याचे अर्थशास्त्र व वराहमिहिराचे बृहत्संहिता या ग्रथातही समाविष्ट आहे. कौरव पाडवाचे युद्ध, यादवाची यादवी, परशुरामाचें निःक्षत्रीकरण हे सर्व काश्मीरच्या बाहेरील आहे. बहुपत्नीकत्वाची, मोठे ऋनाने बाळगण्याची व राजाच्या परिवारकात दासींची योजना करण्याची चाल सर्वत्र दिसून येते. राजपुत्रापासून राजानें स्वतःचें रक्षण कसें करावें याविषयीं काश्मीराबाहेरील कौटिल्याला मुद्दाम इषारा द्यावा लागला आहे तो निरर्थक नव्हे. यावरून कोकजे यानीं केलेला तर्कदुष्टतेचा आरोप तर्कशुद्ध आहे काय याचा वाचकानी विचार करावा. प्राचीनभारतीय इतिहासात अभिमान वाहण्यासारख्या पुरुकळ

गोष्टी आहेत. त्याकडे लक्ष वेधणें हीच भूमिका आहे. पण प्राचीन राजर्षींचें काल्पित चित्र काढून त्यात रंगून जाण्यानें ऐतिहासिक दृष्टि विकृत होते. म्हणून ह्या विकृतीवरील उतारा या दृष्टीनें आसुरी मारताचा घोट कितीही कडू लागला तरी प्राशन करणे वैचारिक आरोग्याच्या दृष्टीनें हितावह झाल्याविना राहणार नाहीं अशी माझी समजूत आहे. हरदास लिहितात, "आमच्या व्यासंगावरून आमची अशी खात्री झाली आहे कीं, युरोपातील सर्व समाजरचनाशास्त्रे ही आध्यात्मिक नाहींत." माझ्या व्यासगावरून मला जो बोध झाला तो मीं मांडला. सत्य मिथ्या पारखण्यास वाचक समर्थ आहेत. हरदास पुढे खुलासा करितात कीं, "बाह्य नानात्वाची प्रतीति मिथ्या मानून आतरप्रतीतीला प्राधान्य देणारे तत्त्वज्ञान हा जिचा आत्मा ती संस्कृति आध्यात्मिक होय." आतरप्रतीतीला प्राधान्य देऊन समाजरचना करावयाची म्हणजे काय याचा मला उमज पडलेला नाहीं. समाजरचनेत व आचारात जीं वेळोवेळीं परिवर्तनें झालीं तीं बदलत्या अनुभवाप्रमाणेंच झालेलीं आहेत. मग तात्त्विक दृष्ट्या बाह्य नानात्वाला मिथ्या म्हणा वा न म्हणा. बलिष्ठानीं कनिष्ठाना लुबाडावे हा जो सामाजिक व्यवहार त्यात या मिथ्यात्वाच्या तत्त्वानें कांहीच फरक पडलेला नाहीं. बाह्य मिथ्यात्वाच्या केवढाहि गजर केला तरी 'शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः। शूद्रो हि धनमासाद्य ब्राह्मणानेव बाधते'॥ व विधवेनें व्रत पाळावे पण विधुराने अग्नीचा लोप होऊं नये म्हणून पुन्हा संसार थाटावा असाच व्यावहारिक दडक मनूने उपदेशिला आहे. आणि म्हणूनच संस्कृतीचें मूल्य जोखताना तत्त्वाच्या व ध्येयाच्या जोडीला व्यवहार पहावा लागतो.

असो. या सर्व परीक्षणकाराचा मी आभारी आहे. परीक्षणातील कांहीं आक्षेपाना उत्तरें देण्याचा प्रयत्न केला म्हणून माझ्या पुस्तकातील उणीवाची मला जाणीव नाहीं अशी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं. कांहीं आक्षेपाच्या बाबतींत माझी भूमिका स्पष्ट करणे अगत्याचें वाटलें म्हणून चार शब्द लिहिले एवढाच या लेखाचा अर्थ.

पुस्तकातील सर्वच प्रमेयें सर्वांना पटतील अशी अपेक्षा कोणताच लेखक धरीत नाहीं. आक्षेपाच्या रूपानेहि काहीं प्रमेयाचा खल होणें आवश्यक असते. या खलामुळे आपल्या व पाश्चात्याच्या संस्कृतीतील उपेक्षित मागाकडे वाचकाचें लक्ष वेधले गेलें तरीहि माझे श्रम वाया गेले नाहींत असे मला वाटेल. एवढें सागून **वाङ्मयशोभेच्या** वाचकाची रजा घेतों.[1]

---

१. **वाङ्मयशोभा** मासिकातील लेख. लेखांत संस्कृति-संगमातील अवतरणांची पाने पहिल्या आवृत्तीतील आहेत, प्रस्तुत आवृत्तीत मजकूर आगेमागें सांपडेल.

ग्रंथ–ग्रंथकार–नामसूचि

मराठी

नांव	पृष्ठ
अत्रे, त्रिं. ना.—गाववगाडा	४१६
आगरकर, गो. गो.—निबंध	१४, १५
आपटे, द. वि.—मुधोळची बखर	२५३, ३३५
काळे, त्रिं. गु.—रामायणनिरीक्षण	२५०
केतकर, श्री. व्यं.—प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास	२५२, २९९
,, —ज्ञानकोश, हिंदुस्थान खंड	२९९
केळकर, न. चिं. —समग्र केळकर	२२५, २६७
केळकर, य. न.—भूतावरील भ्रमण	४१८
केसरीकार—केसरी	१२६
कोसांबी, धर्मानंद—हिंदी सस्कृति व अहिंसा	१३८
खरे, वासुदेवशास्त्री—मराठे इग्रज प्रस्तावना	३७४-७५
गुणे, पा. दा.—युरोपचा प्रवास	६६–६८
गोखले, गं. श.—सह्याद्रीतील लेख	२०१
गोविंदसुत—आधिभौतिक सुधारणा व आध्यात्मिक धारणा	३७
चिपळूणकर, वि. कृ.—निबधमाला	१५०, ४३८
जाधव, भास्करराव—विविधज्ञानविस्तारातील लेख	२५७
जोशी, गो. म.—हिंदूचे समाजरचनाशास्त्र	३८, ४२५, ४२७
जोशी, चिं. वि.—जातककथा	२२०
टिळक, बा. गं.—गीतारहस्य	२२
,, —निबंध खंड ४ था	११९, ४३८
तर्खडकर, दादोबा पाडुरंग—आत्मचरित्र	४३६

नांव पृष्ठ

दीक्षित, ग. बा.—भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास १४४, ३५५, ३५८-५९, ३६१, ३७२
देशपांडे इ. वा. —रजपूत राजाचा उदय व ऱ्हास ३२०
पटवर्धन, रा. वि.—सूर्यसिद्धान्त २३४
पाठकशास्त्री—यजुर्वेद भाषातर १११, १२६
पाध्ये-टिकेकर—आजकालचा महाराष्ट्र ३२
पारसनीस, द. बा.—इतिहाससंग्रह ११०
पिसुर्लेकर—सरदेसाई स्मारक ग्रथातील लेख ४१०
पुरुषार्थ गणेश अक २०४
पोतदार, द. वा.—मराठे इग्रज परीक्षण ३७७
पत अमात्य—आज्ञापत्र ३४०
फडके, स. कृ.—नवयुगधर्म ३१, ४२४
भावे, वा. कृ.—पेशवेकालीन महाराष्ट्र २९०, ३४७, ३७४, ३८४
राजवाडे, वि. का.—राधामाधवचपूप्रस्तावना ३७३
,, —भारतीय विवाहसस्थेचा इतिहास १११
राजवाडे, श. रा.—खिस्तातक ४७, ५२, ५३
वैद्य, चिं. वि.—महाभारतोपसंहार ८८
,, —मध्ययुगीन भारत १३१, ३१२, ३६६, ३७०
शेजवलकर, त्र्य. शं.— भा. इ. स. त्रैमासिकातील लेख ३३७-३९
सरदेसाई, गो. स.—ब्रिटिश रियासत ३१९
सावरकर, वि. दा.—सावरकरसाहित्य ३६७
ज्ञानेश्वर—ज्ञानेश्वरी ३७२

हिंदी

जयचंद्र विद्यालंकार—भारतीय इतिहास की रूपरेखा ११८
युसुफअली—मध्यकालीन भारत की सामाजिक अवस्था ३११

संस्कृत

नांव	पृष्ठ
अग्निपुराण	३६२
अथर्ववेद	२९६
आपस्तंबधर्मसूत्र	३६४
ऋग्वेद	१२४, १७४, २४४, २४६, २४८
ऐतरेयब्राह्मण	१५३
कुमारिल–तंत्रवार्तिक	३६६
कृष्णमित्र–प्रबोधचंद्रोदय	३६८–७०
कौटिल्य (चाणक्य) अर्थशास्त्र (मराठी भाषांतर–हिवरगावकर करंदीकर)	६४, ९०–९२, १११, ११२, १७५, ३१३, ३२९
कौशिकसूत्र	१२७
गर्गसंहिता	२३६
छांदोग्योपनिषद्	८९
जयदेव–गीतगोविंद	२८७
जातक–सुरापान (पाली)	११२
ताण्ड्यमहाब्राह्मण	२७८
दण्डी–दशकुमारचरित	३२५–२६
देवलस्मृति	३६६
परमानंद–शिवभारत	३७४
प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धि	३६८
पाणिनी–अष्टाध्यायी	१५३, २९१
बाण–कादंबरी	३२७
,, –हर्षचरित	९३
बौधायनधर्मसूत्र	२४२, २४७
बृहस्पतिस्मृति	३९०
भगवद्गीता	८३, २८४

नांव	पृष्ठ
भरत–नाट्यशास्त्र	१३३
भवभूति–मालतीमाधव	३२७
भविष्यपुराण	२६५
भागवतपुराण	२८७, ३७१
भोज–युक्तिकल्पतरु	१७६
मंजुश्रीमूलकल्प	२६४
मनुस्मृति	८३, १२८, १५२, २८५, ३२२, ३३१, ३८९, ४१३
महाभारत	१५७, १५८, २४९, २८५, २९४, ३२२, ३४५
मुंडकोपनिषद्	८४, २८३
मेधातिथि–मनुभाष्य	२८५, ३५५, ३६४
यजुर्वेद (मराठी भाषातर पाठकशास्त्री)	१११, १२५
रसप्रकाशसुधाकर रसरत्नसमुच्चय रसेंद्रचिंतामणि	प्रफुल्लचंद्र राय याच्या पुस्तकातील उतारे १४७
रामायण	२८७
वराहमिहिर–बृहत्संहिता	३६४
वात्स्यायन–कामसूत्र	१११, १३८
विज्ञानेश्वर–मिताक्षरा	३५६, ३९०
शतपथब्राह्मण	२४०
शुक्रनीतिसार	३२२

इंग्लिश

नांव	पृष्ठ
Abul Fazal—Ayeen Akbery	४१८
Altekar, A. S.—Rastrakutas	१३५, १६७, २७२, ३३२, ४०७
Archer, W.— India and the Future	१३
Al Beruni— Indica	३२४, ३५६, ३६०

नांव	पृष्ठ
Ayyangar and Rao— South Indian Jainism	२६५
Banergi Shastri, A.— Asura India	२४६
Banerji, Gauranganath— Hellenism in Ancient India	२३०
Beal— Life of Huen Tsang	१२०, १३१, २७१
— Western Records	३२४
Beams— Comparative Grammar	१६, १७
Beni Prasad— State in Ancient India	१५३
Bhandarkar, R. G.— History of the Deccan	१३२, ३९३
Bhandarkar, D. R.— Aspects of Indian Culture	२८०
— Carmichel Lectures	१५४, १५५
— A. B. O. R I.	३०८
Bose, Phanidra— Indian Teachers in China	१९७
Buckle— History of Civilisation	३९३–९७, ४०४
Burnal— Social Function of Science	४०५, ४०६
Cambridge History of India Vol. I	२४
Vol. III	३१८
Chamanalal— Hindu America	२०३
Coulton— Life in Middle Ages	७५
Cunningham, J. D.— History of Sikhas	२८९
Dandekar, R N.— Guptas	२७०
—Progress of Indic Studies	१८१
Das, S. K.— Economic History of Ancient India	१३०
Davids, Rhys— Budhist India	१९, १७३
Elliot and Dowson— History of India	१२४, २२३, २७२, ३३४, ३६२, ३६३
Engels—Correspondence	३९५
Epigraphia Indica	१५२, १५५, ३०७
Gauba— Uncle Sham	३३
Gibbon— Decline and Fall	३१५
Graves— History of Education	९, १०
Hogben— Science for the Citizens	४०५
Inge, Dean— Outspoken Essays	५४

नांव	पृष्ठ
Jayaswal— Hindu Polity	१५३, १५८, १६३
Jesperson— Study of Language	१७, २२५
Joad— Story of Indian Civilisation	३०६
Kane, P. V.— History of Dharmashastra	३६७
Lecky— History of European Morals	७२
Legacy of India	१४१, २१०, २१४
Levy— Pre-Dravidian Antiquities	२५४
McCabe— Horrors of Inquisition	२६६
Macaulay — History of England	६६
Macdonell and Keith—Vedic Index	३९०
Machiavelli— Prince	३२९-३३१
Mackay— Indus Civilisation	३०७
Majumdar, R. C — Corporate Life	१६७, ४१८
— Suvarnadwip	१८२, १८३
Marshall— Indus Civilisation	२४५
Marx, Karl— Capital	३८०
— Articles on India	३८७–९३
Mayo, Miss— Mother India	७
Megasthenis — Ancient India	९४, १५६
Meyer— Sexual Life in Ancient India	४२२
Müller, Max— Ancient Sanskrit Literature	८
Nag, Kalidas— India and Pacific World	१८३
Nitche— Twilight of Gods	४६
Oppert— Original Inhabitants of India	२५९
Paranjape, M.R.—Source Book of Indian Education	११
Radhakrishna— Eastern Religions and Western Thought	२१६
Ranade, M. G.—Introduction to Peshva Diaries	३११, ३४६
Ranade, R. D.— Constructive Survey	१२३
—Mysticism in Maharastra	७८
Ray, P.—Hindu Chemistry	२४, १४५
Revealing India's Past	९५
Rolland, Roma— Vivekananda	४०

नांव		पृष्ठ
Ruskin—Stones of Venice		११
Saintsbury— History of Criticism		३५७
Savarkar, V. D.— Hindutva		३३३
Seal, B.— Positive Sciences of Hindus		१४४, २२२
Senart— Caste in India		९
Sewell— Forgotton Empire		३२२
Sharma, Shriram— Religious Policy of Moguls		२७३
Sircar, Dinesh—Select Inscriptions		१५६, १७३, १९८, २१२, २२७, २६८, २६९, ३०४, ४१७
Smith, Vincent—Earl History of India		१७२, २६४, ३०२
	— Oxford History	३१९
Sorokin, P.— Cultural Dynamics		५६
Splenglar— Decline of the West		३९८, ४००
Stein, A — Sun-buried Cities		१९९
Taylor, Isac— Origin of Aryans		२०
Taylor— Mediaeval Mind		७२, ७३, ७७
Thilly, F.— History of Philosophy		१३
Thomas, Wendel— Hinduism Invades America		४०
Tilak, B. G. — Orion		१४७
Toynbee— Study of History	Vol. V	२१९
	Vol. IV	३४१
	Vol. VI	४०१
Urwick— Message of Plato		२१५
Vishwanath— Racial Synthesis		२४१
Winternitz— History of Sanskrit Literature		१९, २५, २१७
Wood, Clement— Torquemeda		२६०
Woodroff—Is India Civilised ?		१४, ४२, ४३

द. के. केळकरकृत

संस्कृति-संगम

१ 'मी हा ग्रथ समग्र वाचला. झोपी गेलेल्यांसें जागे करणारा व जागें असलेल्यास उभें करणारा असा हा ग्रंथ आहे.' 'जाणत्यां सुशिक्षित पुरुषानीं व बायकानीं हा ग्रथ अवश्य वाचला पाहिजे.' 'समजण्यास सुलभ, विचार करण्यास घनरसभरित व बुद्धीला सतेज करणारा असा हा ग्रंथ निर्माण केल्याबद्दल प्रो. केळकर याचे धन्यवादपूर्वक अभिनंदन केले पाहिजे.' **डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीचे परीक्षक.**

२ आसुरी सस्कृति जिला म्हणावें अशी ऐहिक भोगाची लालसा भरतखडातसुद्धा प्राचीन कालापासून आजवर कशी बळाविली आहे हे ग्रंथकारानें फार हृदयंगम रीतीने वर्णिले आहे व अध्यात्मिकता आणि भोगलालसा या एकाच वेळीं कशा अस्तित्वात असतात यार्ची दिलेलीं उदाहरणे फार उद्बोधक आहेत...संस्कृति-सगमासारखा विषय आकर्षतेनें माडून सामान्य वाचकास देखील त्याची जिज्ञासा व गोडी लावणे हे दुर्घट काम प्रा. केळकर यानीं यशस्वी रीतीने साधले आहे. **समीक्षक (श्री. म. वर्दे).**

३ ग्रंथातील प्रत्येक पानन् पान कर्त्याचा जबरा व्यासंग आणि अधिकारी लेखणी वाचकाच्या मनात भरवते व पुस्तकाची ओघवती माषा लेखकाची कळकळ व्यक्त करते. **शालापत्रक.**

४ 'संस्कृति सगम' या ग्रथातून भाषासौदर्याचे हवे तेवढे नमुने काढून दाखविता येतील. पण भाषासौदर्य हे या ग्रंथाचे प्रधान वैशिष्ट्य नसून विचारसौंदर्य हेच खरे वैशिष्ट्य होय. सर्व प्रकारच्या विचारवंताना हा ग्रंथ नेत्राजनासारखा उपकारक वाटेल. खऱ्या विद्वानाचे चर्मचक्षु वर्तमान स्थितीचे प्रेक्षण करण्यात गुंग असतात, त्याचे ज्ञानचक्षु पूर्वेतिहासाच्या परिशीलनात मग्न असतात तर त्याचे तर्कचक्षु भावी परि-

स्थितीकडे वळलेले असतात. संस्कृति-संगम या ग्रंथात आढळणारी विद्वत्ता या अर्थानें खरोखरीच त्रिनेत्री आहे. **सह्याद्रि** (शि. ल. करंदीकर).

५ श्री. केळकर यानीं लिहिलेला हा ग्रंथ इतका सुंदर व नवी दृष्टि देणारा आहे, कीं कोणत्याही साक्षर गृहस्थानें तो न वाचणे म्हणजे आपल्या ज्ञानाचा अपुरेपणा ठेवण्यासारखें आहे....अशा ग्रंथाबद्दल द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत. **चित्रमयजगत्.**

६ 'काव्यालोचन', 'वादळी वारे', 'संस्कृति-संगम' या ग्रंथावरून प्रो. केळकर याच्या अष्टपैलू बुद्धिमत्तेची चागलीच ओळख होऊ शकते.... 'संस्कृति-संगमा'त शास्त्रीय ग्रंथाचा रुक्षपणा कोठेच आढळून येत नाहीं. काहीं प्रकरणें तर कादंबरीइतकीं रसाळ आणि मनोरंजक आहेत. **नवयुग.**

७ गेल्या काहीं वर्षांत मराठींत जे उत्तम ग्रंथ निर्माण झाले आहेत त्यात या ग्रंथाची गणना करता येईल असें निःसदिग्धपणें म्हणावयास हरकत नाहीं. **विविधवृत्त.**

८ विचार करा आणि काहीं कृति करूं लागा असेच वाचकाना जणूं काहीं हे पुस्तक बजावीत आहे. व त्याचबरोबर पुस्तकाचा मोठा गुण हा आहे कीं, त्यातील भाषा सुरेख, चटकदार व चित्ताकर्षक असल्याने इतके नवे नवे विचार खच्चून भरलेलीं प्रकरणें एकामागून एक वाचीत असता मेंदूला शीण न वाटता उलट गुदगुल्याच होतात. **केसरी.**

९ केळकरानीं हा ग्रंथ पट्टीच्या वकिलाने आपल्या अशिलाची बाजू कुशलतेनें माडावी तसा लिहिला आहे. यातील विवेचन साधार, युक्तिवाद-शंकाचें निराकरण करणारा, व भाषा ओजस्वी आणि प्रभावी आहे. हा ग्रंथ वाचल्याशिवाय कोणींही राहूं नये अशी आमची शिफारस आहे.

महाराष्ट्र.

द. के. केळकरकृत

काव्यालोचन (दुसरी आवृत्ति)

१ लेखकाचे परिश्रम, बुद्धिमत्ता व विषयप्रतिपादनकौशल्य या गोष्टी पुस्तकातील कोणतीहि चार पानें वाचलीं असता कळून येतील.

पं. रंगाचार्य रड्डी (विविधज्ञानविस्तार).

२ ज्या पुस्तकाचा मराठी भाषेला अभिमान वाटेल असें हे पुस्तक आहे.

रा. प्र. कानिटकर (चित्रमयजगत्).

३ सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असें हे पुस्तक मराठी टीकावाङ्मयास आपल्या अपूर्वतेनें भूषणभूत झाले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

रा. श्री. जोग (लोकशिक्षण).

वादळी वारे (दुसरी आवृत्ति)

१ सर्वच लेखात स्वतंत्र विचारशक्तीचा व मनोवेधक लेखनपद्धतींचा ठायीं ठायीं प्रत्यय आल्यावाचून राहत नाहीं. **महाराष्ट्र.**

२ वैचारिक प्रगतीच्या दृष्टीने या ग्रथाची सर्वत्र प्रसिद्धि होणे जरूर आहे. **लोकमान्य.**

३ प्रस्तुत पुस्तकाच्या योगाने वाचकाच्या मानसिक आरोग्यवर्धनास मदत होईल असे प्रकाशक म्हणतात. त्याची आशा रास्त आहे. **धनुर्धारी.**

४ ग्रथकाराची काव्यसुधा प्रत्येक पानात पाझरत आहे. **केसरी.**

साहित्यविहार

खोल व्यासगामुळें आलेला विचाराचा पक्केपणा हा जसा साहित्य-विहाराचा एक प्रमुख गुणविशेष आहे तद्वत् वावदूकतेपेक्षा युक्तिवादावर भर देण्याची यातील पद्धति विलोभनीय आहे. या पुस्तकातील साहित्य आणि प्रगति, पुरोगामी साहित्य, वाङ्मयातील अमरता हे लेख मौलिकतेच्या दृष्टीनें महत्त्वाचे वाटतात. **लोकमान्य.**

समग्र-केळकर-वाङ्मय

खंड १२, एकंदर पृष्ठसंख्या १२५००

प्रत्येक खंडास रुपये ६ प्रमाणें एकूण किंमत ७२ रुपये.

संपूर्ण सेट घेणारांस कि. ५० रु. फक्त

१ टिळक खंड, २ लोकमान्य खंड, ३ केसरी खंड, ४ राजकारण खंड, ५ असहकारिता खंड, ६ वार्ताहर खंड, ७ इतिहास खंड, ८ कादम्बरी खंड, ९ नाट्य खंड, १० साहित्य खंड, ११ संस्कृति खंड, १२ तत्त्वज्ञान खंड-- **या बारा खंडांमिळून** १ संपूर्ण टिळक चरित्र, २ राज्यशास्त्र, ३ तिरंगी नवमतवाद, ४ विलायतचीं बातमीपत्रे, ५ मराठे आणि इंग्रज, ६ आयर्लंडचा इतिहास, ७ फ्रेंच राज्यक्रांति, ८ इतिहास-विहार, ९ नवलपूरचा संस्थानिक, १० बलिदान, ११ गॅरिबॉल्डी चरित्र, १२ तोतयाचें बंड, १३ चंद्रगुप्त, १४ कृष्णार्जुनयुद्ध, १५ अमात्य-माधव, १६ संगीत बीर-विडंबन, १७ सत मानुदास, १८ नवरदेवाची जोडगोळी, १९ सरोजनी, २० तरुण हिंदु नागरिक, २१ हास्यविनोदमीमांसा, २२ भारतीय तत्त्वज्ञान अशीं एकूण २२ संपूर्ण पुस्तकें समाविष्ट झालीं असून तात्यासाहेबांच्या सर्व प्रस्तावना, त्यांचे सर्व राजकीय आणि सांस्कृतिक लेख असें १२५०० पृष्ठांचें वाङ्मय फक्त ५० रुपयात देत आहोंत.

व्यवस्थापक:—य. गो. जोशी प्रकाशन, ६२३/१५ सदाशिव, पुणें २.